# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती इतिवृत्तांत

**दिनांक ०४-०६-२००१ ते दिनांक ३०-०१-२००२**

**रजिष्टर क्र. २**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद
# स्थायी समिती सभा

| अ. क्र | स्थायी समिती सभेचा दिनांक | विषय क्र. | शेरा |
|---|---|---|---|
| ०१. | ०४-०६-२००१ | विषय क्र. २/१ ते ११/१० | |
| ०२. | ११-०७-२००१ | विषय क्र. १२/१ ते २४/१३ | |
| ०३. | ०८-०८-२००१ | विषय क्र. २५/१ ते २९/५ | |
| ०४. | ११-०९-२००१ | विषय क्र. ३०/१ ते ३६/७ | |
| ०५. | १५-०९-२००१ | विषय क्र.३७/१ ते ३९३ | |
| ०६. | ०९-१०-२००१ | विषय क्र. ४०/१ ते ४१/२ | |
| ०७. | २५-१०-२००१ | विषय क्र. ४२/१ ते ४७/६ | |
| ०८. | १३-११-२००१ | विषय क्र. ४८/१ ते ५६/१ | |
| ०९. | १५-१२-२००१ | विषय क्र. ५७/१ ते ६३/७ | |
| १०. | ०२-०१-२००२ | विषय क्र. ६४/१ | |
| ११. | २४-०१-२००२ | विषय क्र. ६५/१ | |
| १२. | ३०-०१-२००२ | विषय क्र. ६६/१ ते ७४/९ | |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ०४-०६-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. सोमवार दिनांक ०४-०६-२००१ रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृहात " मा. सभापती श्री. प्रशांत देसरडा यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती " वंदे मातरम् " या गिताने सुरुवात झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. कावडे साहेबराव रणुबा | स. सदस्य |
| २) | स. स. श्री. सिध्द जगदिश कन्हैयलाल | -//- |
| ३) | स. स. श्री. जबिदां दलबीरसिंग रणजीतसिंग | -//- |
| ४) | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ५) | स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | -//- |
| ६) | स. स. श्री. सलीम पटेल समशेर पटेल | -//- |
| ७) | स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| ८) | स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली | -//- |
| ९) | स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| १०) | स. स. श्री. शे. इलियास किरमानी शे. उमर | -//- |
| ११) | स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतू | -//- |
| १२) | स. स. श्री. ओक जयवंत केशवराव | -//- |
| १३) | स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | -//- |
| १४) | स. स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |

सभागृहातर्फे नेपाळ मधील राज घराण्यातील हत्याकांडात मृत्यू पावले त्यांना ०२ मिनिटे स्तब्धता पाळुन श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

**मा. सभापती** : सभेला सुरुवात विषय पत्रिकेने करण्यात येत आहे. त्यानंतर सर्वसाधारण चर्चा घेण्यात येईल.

**श्री. जयवंत ओक :** विषय पत्रिकेवर चर्चा करण्या अगोदर जनरल चर्चा करावी स्थायी समितीची आजची सभा ही दोन महिन्यानंतर होत असून, वार्डातील विकास कामे थांबवुन आहेत. बऱ्याच संचिका कोंबुन पडलेल्या आहेत त्यावर सध्या होत नाही. नगरसेवकांनी पत्र दिल्यानंतर अधिकाऱ्यांच्या मागे राहुन कामे सुरु घ्यावी लागते अशी परिस्थिती असेल तर योग्य नाही.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** १२५ कोटी रुपयाचे बजेट ठेवण्यात आलेले आहे. त्यात फारच घसरण घेरुन ८८ व ९० कोटी झालेले आहे. स. सदस्यांनी प्रस्तावित केलेली कामे कशी करण्यात येणार आहे. याचा खुलासा व्हावा मनपाचे उत्पन्न कमी झाले त्याची कारणे काय? याचा ही खुलासा करण्यात यावा.

**श्री. मीर हिदायत अली :** माझ्या वार्डामध्ये एका कामाबाबतची ८ लाखाची संचिका मंजुरीसाठी गेली बजेट नाही म्हणून सांगण्यात आलेले आहे सदरचे चालु काम अर्धवट राहील्याने वाढीव कामासाठी संचिका गेलेली होती. लोकांच्या घरात पाणी घुसण्याची शक्यता आहे. याची उपाययोजना होणे आवश्यक आहे.

**श्री. जयवंत ओक :** मागील बैठकीच्या विषयपत्रिकेवर ५० हजारापेक्षा जास्त परंतु रु. १० लाख मर्यादेपर्यंत मंजुर केलेल्या निविदाचे तपशील दिलेला आहे. यात कोणतही कामे झालेली आहे. कुठली कामे आहे. याची माहिती देण्यात यावी. आताच चर्चा झाली बजेट नाही. म्हणून संचिकेवर रिमार्क येतात असेल सांगितले गेले. वार्डात विकास कामे व्हावीत म्हणून प्रत्येक नगरसेवकांनी १०-१५ पत्र दिलेले आहे. कुणाची ही कामे झालेली नसून यादीमध्ये दर्शविलेली कामे कोणती आहे याचा खुलासा दयावा. मागील वर्षाच्या बजेटमध्ये कोणतीही विकास कामे झालेली नसून प्रशासन दिशामुळे करत आहे. चुकीची माहिती देण्यात येते. वार्डातील नागरिकांना विज, रस्ते, ड्रेनेज पाणी, ई. सुविधा देणे गरजेचे आहे. त्या सुध्दा प्रशासन पुरवू शकत नाही. सर्व जनतेची ओरड आहे. एखाद्या कामाची संचिका असेल व नगरसेवकांना त्या संचिके मागे फिरावे लागत असले व प्रशासनाकडुन कोणतीच विकास कामे होत नसेल तर, शहरातील जनता येथे मोर्चा काढेल आदोंलन करतील व अधिकाऱ्यांना त्यांचे जागेवर बसणे कठीण होईल. याची दखल मा. आयुक्तांनी घ्यावी १० लाखाचे काम असेल तर, त्यात विभागणी करुन १ ते २ लाखाचे असे वेगवेगळे तुकडे करुन कामे करण्यात येऊ नये. यामुळे कोणतीही विकास कामे होणार नाही, रहिवाशांना महत्वाच्या गरजा म्हणजे ड्रेनेज लाईट, पाणी आणि विज मिळावयास पाहिजे. हीच मागणी सर्वांची आहे. बजेटमध्ये का तुट आलेली आहे. याचा सुध्दा खुलासा करण्यात यावा.

**मा. सभापती** : बजेटनुसार उत्पन्न का कमी आलेले आहे. कृपया याचा मुख्य लेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** अर्थसंकल्प कमी झाला असे म्हणणे आहे. १२८ कोटीची तरतुद करण्यात आलेली होती. डिसेंबर २००० अखेर आढावा घेतला असता ११४ कोटी अपेक्षीत होते. ३१ मार्च २००१ पर्यंत उद्दीष्टांच्या तुलनेत २६ कोटीची तुट आलेली आहे. शासनाकडुन महानगरपालिकेस विकास कामासाठी १० कोटी येणार होते. त्यापैकी ४ कोटी प्राप्त आहे. ६ कोटी तुट तसेच वित्त आयोगाकडुन १० कोटी येणार होते ते आलेले नाही. त्याचप्रमाणे जकातील उद्दीष्ट ५३ कोटी होते. त्यापैकी ४८ कोटी प्राप्त झाले. मालमत्ता कर वसुली पोटी १५ कोटीचे उद्दीष्ट होते ते सुधारीत करुन १० कोटी ठेवण्यात आले. त्यापैकी निव्वळ वसुली ८.५० कोटी पर्यंत प्राप्त झालेली आहे. पाणीपट्टी वसुल १२ कोटी निश्ति केले ते सुधारीत करुन कोटी निश्चित करण्यात येऊन त्यापैकी ६.५० कोटीच वसुली झालेली असून, इतर काही वसुली कमी आलेली असून, एकुण २६ कोटी तुट आलेली आहे. प्रत्यक्षात ८८ कोटी झालेले आहे. ३१ मार्चच्या नंतर स्पील ओव्हरची एकुण ४ कोटीची कामे केलेली आहे. स्पील ओव्हरच्या कामाचा आढावा घेतला असता एकुण १९ कोटी ४७ लक्ष रुपयाची ही कामे आहेत. चालु आर्थिक वर्षात कार्यकारी अभियंता, शहर अभियंता, अति. शहर अभियंता यांचे विभागांमार्फत देखभाल दुरुस्तीची ४२ कोटीची तरतुद एकुण उत्पन्नाच्या तुलनेत इतर खर्च ४२ वर होत नसु त्यात मेंन्टनंस, महसुली खर्च, एमएसईबी, पाणीपुरवठा, नगरसेवकांचा स्वेच्छानिधी, विभागाअंतर्गत अंतरर्भुत असलेली काही कामे यावर खर्च होतात. चालु आर्थिक वर्षात विकास कामे करण्यासाठी आपणास

फक्त २२ कोटी रुपये उपलब्ध होतील. जे कामे प्रथम येतील त्यांना मान्यता देण्यात येईल.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** २६ कोटीची तुट महानगरपालिकेस आलेली असून, यास कोण जबाबदार आहे. याचा मा. आयुक्तांनी खुलासा करावा. आताच मुख्यलेखाधिकारी यांनी सांगितले शासनाकडुन १० कोटी ऐवजी ४ कोटी आहे. शासनाकडुन येणारे ६ कोटी आले नाही. ही बाब समजुन घेऊ शकतो परंतु उद्दीष्टाप्रमाणे मालमत्ता कर, पाणीपट्टी, जकता यावर प्रत्येक वर्षी येणाऱ्या मालाची आवक शहरातील मालमत्ता, यात दरवर्षी वाढ होत असते. त्याप्रमाणात वसुली वाढत जाते. परंतु आपण ठेवलेले उद्दीष्ट प्रत्येक वर्षा पुर्ण होत नाही. उत्पन्न मिळाले नाही तर, विकास कामे होणार नाही.

**मा. सभापती** : आता मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा केला शासनाकडुन १० कोटी येणार होते. त्यापैकी ४ कोटी आले, पाणीपट्टी वसुली तसेच मालमत्ता वसुली मध्ये प्रत्येकी १.५० कोटी असे एकुण ३ कोटी वसुली कमी झालेली आहे. प्रत्येक वर्षी शहरात येणाऱ्या मालाची आवक वाढत जात असते. त्यामुळे जकातीची उत्पन्न सुध्दा ठरल्याप्रमाणे वसुल झालेले नाही. यास कोण जबाबदार असा प्रश्न सभागृहात उपस्थित झालेला असून, मा. आयुक्तांनी यावर काय कार्यवाही केलेली आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** २२ कोटी मध्ये मोठमोठया रस्त्याची किंवा इतर मोठमोठी विकास कामे केल्यास लहान लहान गल्यामध्ये कामे करण्यास बजेट राहणार नाही. म्हणुन सर्व वार्डात विकास कामे झाली पाहिजे. काही वार्डात कामे होते. तर काही वार्डामध्ये वर्ष भरामध्ये एकही काम होत नाही हे योग्य नाही.

**मा. सभापती** : मा. आयुक्त यांनी सविस्तर या संदर्भात खुलासा करावा.

**मा. आयुक्त** : मुख्य लेखाधिकारी यांनी महानगरपालिकेचे उत्पनन का घटले आकडेवारीनुसार खुलासा केलेला आहे. आवक कमी झाल्याने व स्पील ओव्हरचा विषय लक्षात घेता उपलब्ध रक्कम कसे वाढविता येईल हा मुख्य विषय आहे. जकातीचे उद्दीष्ट ५० कोटीचे होते ४८ कोटी वसुली झालेली असून, त्यात २ कोटी रुपये कमी आलेले आहे. या वर्षाचा अर्थसंकल्प मंजुर करतांना सविस्तर चर्चा झालेली आहे. जकातीमध्ये ज्यांनी कमी उत्पन्न आले अधिकारी/कर्मचारी किंवा इतर कर्मचारी यांना करणे दाखवा नोटीस काढलेली होती त्यात कुणाचे वेतनवाढ थांबवायचे कुणाचे दोन तर कुणाचे तीन वेतनवाढी थांबवायचे तर कुणाला द्रव्य दंडाची शिक्षा देण्याबाबत प्रस्तावित केले होते. त्यामुळे त्यांचेवर जरब बसेल व वसुली वाढेल हाच या मागचा उद्देश होता. शिक्षा करण्यात येईल यात दोन प्रकार आहे. एक मेजरच मायनर शिक्षेमध्ये निलंबीत करणे, बडतर्फ करणे एका पदावरुन दुसऱ्या पदावर पदावनत करणे, आणि ताकीद देणे, द्रव्य दंडाची शिक्षा करणे, गौण शिक्षेमध्ये वेतनवाढ थांबविणे एक वर्षासाठी थांबविणे किंवा कायम स्वरुपी थांबविणे हे सर्व यामध्ये येते. ही कार्यवाही मागील वर्षी ज्यांनी कामात कुचराही केली यांचे वर होईल.

**श्री. नंदकुमार फुलारी :** जकातीचे उद्दीष्ट पुर्ण न झाल्या संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन आपण सर्वसाधारण सभेत दिले होते. त्याचा खुलासा व्हावा.

**मा. आयुक्त** : या मागचा उद्देश असा होता की, उर्वरीत १६ दिवसामध्ये आपल्या जकात उद्देश असा होता की, उर्वरीत १६ दिवसामध्ये आपल्या जकात विभागातील कर्मचाऱ्यांची जास्तीत जास्त वसुली करुन दयावी. लोक कामाला लागतील संबंधित अधिकाऱ्यांना निलंबन का करण्यात येऊ नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस दिलेल्या होत्या. मी रजेवर गेल्यानंतर जो खुलासा प्राप्त झाला त्या संचिकेवर त्यावेळच्या आयुक्तांनी या प्रकणामध्ये निलंबनाची आवश्यकता नाही गौण शिक्षा करण्यात यावी. आज निर्णय दिला आहे. जी कार्यवाही व्हायची आहे ती २ ते ४ दिवसाच्या आत होणार आहे. आता जास्तीत जास्त वसुली करण्याच्या दृष्टीने नियोजन करुन वसुली करता येईल या विषयी चर्चा होणे गरजेचे आहे. आपल्याला जकातीचे खाजगीकरण अपेक्षीत होते. म्हणुन आपण मालमत्ता कराचे उद्दीष्ट २४ कोटीचे ठेवलेले आहे व खाजगीकरणातुन आपल्या महानगरपालिकेस ६१ कोटी रुपये मिळवील असे अपेक्षित होते. परंतु ती कार्यवाही पुर्ण होऊ शकली नाही हा भाग वेगळा मालमत्ता कराची वसुली २४ कोटी होईल असे यावर्षी अपेक्षीत आहे. यात सिडको हस्तांतरण होईल व ४ कोटी रुपये मालमत्ता कराचे मिळतील अशी अपेक्षा होती. तसेच अनाधिकृत वस्त्यातुन कर मिळेल आता सध्या मा. राज्य पालांनी वटहुकुम काढलेला असून, त्याची प्रत आपल्याला प्राप्त झालेली आहे. गुंठेवारी डेव्हलपमेंट, ज्या खाजगी जमिनीमध्ये ०१-०१-९५ च्या अगोदर ज्यांनी प्लॉट पाडुन त्या जागेवर लोकांनी घरे बांधलेली आहे. ती वसाहत कशी अधिकृत करायची याची माहिती वा वटहुकुममध्ये दिलेली आहे आणि तसा विषय येणाऱ्या सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी येणार आहेत. यात उत्पन्न अपेक्षीत आहे. रु. १६/- प्रति चौरस फुटाप्रमाणे विकास खर्च आकारण्यात येणार असून, त्या त्या भागातील नागरिकांनी पैसे भरावे आणि त्यानंतर नियमित करण्याची कार्यवाही होईल. जे सर्वेक्षण झालेले आहे. त्यांचा सुध्दा तपशील आम्ही सर्वसाधारण सभेमध्ये ठेवणार आहोत. जकातीचे खाजगीकरण होईल व तेथील २०० ते २५० कर्मचारी मालमत्ता, कराची वसुलीसाठी मिळवील अशी अपेक्षा धरलेली होती परंतु खाजगीकरण न झाल्याने आता मागील वेळाप्रमाणेच परिस्थिती आहे. परंतु संबंधित अधिकाऱ्यांना मी ताकीद दिलेली आहे की, मालमत्ता कराची वसुली ही आतापासुन करावी म्हणजे पुढील काळात वसुली करण्यास अवघड जाणार नाही. यासंबंधी लवकरच दर महिन्याचा आढावा घेण्याचे पध्दत प्रशासनामार्फत सुरु करण्यात येईल. खालचे जे कर्मचारी आहे. त्यांना फार वाईट सवयी लागलेल्या आहेत. त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. आपल्या सर्वांचे सहकार्य मिळावयास ती कार्यवाही होईल तसेच वसुलीचे प्रमाणही वाढवु शकेल. जी भरीव वाढ होईल ती किती प्रमाणात होईल ते आताच सांगता येणे शक्य नाही. कारण सिडको हस्तांतरण झाल्यास किती रक्कम घ्यायची व त्यानुसार किती वसुली होईल त्यावर सुध्दा आपली वसुली अवलंबुन आहे. जो सुध्दा कार्यवाही १ महिना १५ दिवसामध्ये होईल असे वाटते. जास्तीत जास्त वसुली होण्याच्या दृष्टीने संबधित अधिकाऱ्यांना सक्त सुचना देणार असून, वसुलीमध्ये जे अधिकारी मागे पडतील त्यांचेवर काम कार्यवाी करायची याचा सुध्दा मी अभ्यास करुन कार्यवाही करणार आहे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** महानगरपालिकेला प्राप्त होणारे उत्पन्न हा जनतेचा पैसा आहे तो योग्य रितीने मार्गी लावणे हे प्रशासनाचे काम आहे, आताच मा. आयुक्तांनी सांगितले की, खालच्या कर्मचाऱ्यांना वाईट सवयी लागलेल्या आहेत असे असेल तर, योग्य नाही. चांगली कामे व्हावीत. विकास कामासाठी २२ कोटी रुपये आहे असे सांगण्यात आले. सर्व वार्डात लहान मोठी विकास कामे व्हावीत. महानगरपालिकेची प्रतिमा कशी अजाळेल यावी प्रशासनाने लक्ष दयावे.

**श्री. जयवंत ओक :** हे सभागृह कुण्याही अधिकारी/कर्मचारी यांचे विरोधात नाही जनतेची कामे झाली पाहिजे हा आमचा मुळ उद्देश आहेत. वसुली कमी होते म्हणुन कामे करता येत नाही असा प्रश्न निर्माण होतो. जनतेला लाईट, पाणी, रस्ते ड्रेनेज अशा सुविधा उपलबध करत देण्याचे काम मनपाचे आहे. नगरसेवकांनी पत्र दिल्यानंतर कार्यवाही होत नसून, त्या पत्रामागे, स. सदस्यांना फिरावे लागते. नगरसेवकांनी पत्र दिल्यानंतर किती दिवसात कार्यवाही करणार याचा निर्णय आज घेण्यात यावा व जे संबंधित अधिकारी/कर्मचारी कार्यवाही करणार नाही. त्यांचेवर कडक कार्यवाही मा. आयुक्तांनी करावी. स्वेच्छानिधीतील कामे एक वर्षामध्ये होऊ शकली नसून संचिका पडुन आहेत. खासदार आमदार निधीतुन काही विकास कामे करायच्या संचिका होत्या त्या सुध्दा मंजुर झालेल्या नाही. कुणास जबाबदार धरायचे, वार्डामध्ये एकदा लाईट बंद झाल्यानंतर त्या ठिकाणी १५ दिवस लाईट चालु होत नाही. ड्रेनेजची लाईन चोकअप आल्यानंतर किती दिवसात चालु व्हावयास पाहिजे याचे काहीतरी नियोजन असावे तसा निर्णय आज घेण्यात यावा असे माझे मत आहे. काही ठिकाणी वेळेवर पाणी येत नसुन काही वार्डात २ ते ३ दिवस पाणी मिळत नाही अशी परिस्थिती आहे. किती दिवसात १ वेळात पाणी येईल त्याचा अवधी ठरवावा. या बैठकीमध्ये जास्त चर्चा मी करु इच्छित नसुन पुढील बैठकीत कोणती कामे केली कुठली केली याची सविस्तर माहिती घेणार आहोत. जनतेची कामे न झाल्यास जनता येथे मोर्चा घेऊन येतील. प्रशासनास काम करणे अवघड होईल. आताच मा. आयुक्त यांना राज्यपालांचा वटहुकुम प्राप्त झालेला आहे. त्याबद्दल अभिनंदन परंतु प्रशासनाने त्यासंबंधी तात्काळ कार्यवाही करावी अशी सभागृहाच्या वतीने विनंती.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** जास्त रक्कमेचे जी जी इस्टीमेंट आहे ती कामे न करता लहान लहान इस्टीमेंटची कामे करावी.

**श्री. शेख इलियास किरमाणी :** माझ्या वार्डामध्ये ८-७ दिवस पाणी येत नाही. पाण्याचा टंचाई विचारात घेता वार्डातील एक विहीरीची साफसफाई करुन पिण्यासाठी पाणी वापरण्यात यावे असा ठराव पास आलेला असून, संचिका मंजुरीसाठी थांबवुन आहे आता पावसाळयाचे दिवस येतील व त्याचा उपयोग होणार नाही. दररोज माझ्या वार्डातील ३० ते ४० महिला दारी येऊन बसतात. अस असेल तर वार्डातील जनता कुणीही पाणीपट्टी भरणार नाही. स्वतः मा. आयुक्तांनी जातीने लक्ष देऊन प्रत्यक्ष पाहणी केल्यास बाब लक्षात येईल.

**श्री. जयवंत ओक :** पाणी पुरवठा विभागामधील खालचे कर्मचारी व्यवस्थित कामे करत नाही. पाणी सोडणारे कर्मचारी कमी जास्त प्रमाणात पाणी सोडतात त्यामुळे

काहींना पाणी मिळते तर काही भागात पाणीच मिळत नाही अशी परिस्थिती आहे.

**श्री. शे. इलियास किरमानी :** अल्प मुदतीची निविदा काढुन ताबडतोब कार्यवाही केल्यास योग्य होईल. सध्या वार्डात नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नाही. मा. आयुक्तांनी त्यांचे अधिकारामध्ये ही कार्यवाही तात्काळ करावी.

**मा. सभापती** : स. सदस्य श्री. किरमानी यांनी त्यांचे वार्डातील पाणी प्रश्नासंबंधी सुचना केली त्यांचे वार्डातील विहिरीचे कामाची कार्यवाही कोणत्या स्तरावर आहे. सदरचे काम शॉर्ट टेंडर काढुन कार्यवाही कावयास पाहिजे होती त्याकामासाठी का दिरंगाई झालेली आहे. खुलासा दयावा त्या कामासंबंधीची संचिका कुठे आहे.

**श्री. फुलारी नंदकुमार :** माझ्या वार्डात सुध्दा पाण्याची टंचाई आहे.

**कार्यकारी अभियंता :** स. सदस्य श्री. किरमानी यांचे वार्डात मी स्वत: पाहणी केलेली आहे. संचिका प्रशासकीय मंजुरीसाठी पाठविण्यात आलेली आहे. संचिका आल्यानंतर कार्यवाही करावी लागेल सध्या संचिका कुठे आहे. हे सांगता येणार नाही.

**श्री. जयवंत ओक :** आताच मा. आयुक्तांनी म्हटले की, खालचे कर्मचारी यांना वाईट सवयी लागल्या त्यातील हा एक प्रकार असून, संबंधित अधिकारी यांना संचिका कुठे आहे हे सुध्दा माहिती नाही म्हणजे खालचे अधिकारी/कर्मचारी यांचे दुर्लक्ष आहे असे दिसुन येते.

**मा. सभापती** : स. सदस्य श्री. किरमानी यांचे वार्डातील पाणी प्रश्नाबाबतची संचिका कोणत्या विभागात आहे. याची तपासणी करुन तात्काळ संबंधित अधिकारी यांनी मान्यता घेऊन कार्यवाही करावी तसेच स. सदस्य श्री. फुलारी यांचे वार्डातील पाण्याचा प्रश्न सोडवण्याची कार्यवाही करावी.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** ३ महिन्यापुर्वी काका पाथ्रीकर यांना एका रस्त्याचे डांबरीकरणाचे काम दिलेले होते. अद्याप सुरु केलेले नाही. आता पावसाळयाचे दिवस आले असून, काम कसे करणार त्यांनी काम केले नाही तर त्यांना काळया यादीत समाविष्ट करावे.

**मा. सभापती** : यापुढे संबंधित गुत्तेदारास कामे दिली जाणार नाही.

**श्री. जगदीश सिध्द :** अगोदर संबंधित गुत्तेदारास ब्लॅक लिस्ट करावे व काम दुसऱ्यास देण्याची कार्यवाही व्हावी.

**मा. आयुक्त** : संबंधित गुत्तेदारास काळया यादीत घेण्याची कार्यवाही चालु राहील. परंतु ज्यावेळी वर्कऑर्डर देतांना त्यात जी मुदत दिलेली आहे. त्यानुसार काम सुरु करण्यास उशीर झालेला असेल तर, त्या गुत्तेदारांची काम करण्याची इच्छा नाही असे समजुन टेंडर काढतांना ज्यांची दुसऱ्या, क्रमांकावर निविदा आहे त्यांची संचिका माझ्याकडे तात्काळ आणावी. ती मंजुर करण्यात येईल.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** संत एकनाथ रंग मंदिर येथील कर्मचारी श्री. रगडे यांना १ वर्षापुर्वी निलंबित करण्यात आले त्यांनी जी रक्कम जवळ बाळगली होती ती मनपाकडे भरेली आहे व त्यांनी विनंती करुन सुध्दा एक वर्ष गेले. त्यांना कामावर घेण्याबाबत कार्यवाही झालेली नाही. आता ते सेवानिवृत्तीय आलेले असून, त्यांची सेवा १ वर्षे राहीलेली आहे. तरी त्यांना कामावर घेण्याची कार्यवाही व्हावी.

**सहाय्यक आयुक्त-१ :** यासंबंधी १५ दिवसामध्ये चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** संबंधित कर्मचारी यांनी जो गुन्हा केला होता तो मान्य केला व महानगरपालिकाची रक्कम सुध्दा अदा केलेली आहे. संबंधित कर्मचारी यांना भविष्यात पेन्शनसाठी त्रास होईल.

**श्री. जयवंत ओक :** त्यांनी महानगरपालिकेत ३० वर्षे चांगल्याप्रकारे सेवा केलेली आहे. त्यांना पुन्हा कामावर घेतले नाही. तर त्याचे नुकसान होईल. एक वर्षांनी संबंधित कर्मचारी सेवानिवृत्त होणार आहे. म्हणुन कुणाचे नुकसान घेणार नाही याची दक्षता घ्यावी. व मानवतेच्या दृष्टीकोनातुन संचिका मा. आयुक्त यांनी मागवुन ८ दिवसाच्या आत योग्य ती कार्यवाही करुन त्यांना कामावर घेण्यात यावे. तसे आदेश मा. सभापती यांनी दयावे.

**मा. आयुक्त** : आपल्या भावनाशी मी सहमत आहे. परंतु कोणत्याही कर्मचाऱ्यांनी शासकीय रक्कमेचा अपहार केलेला असेल केवळ अपहारीत रक्कम भरणा केली म्हणुन गुन्हा माफ होत नाही. म्हणुन त्यांची शिक्षा माफ करता येत नाही. अपहार प्रकरणात शासनाने चार नियम घालुन दिलेले असून, त्याचे पालन करणे आवश्यक आहे. ज्यांनी शासकीय रक्कमेचा अपहार केला अशा कर्मचारी यांचेवर पहिली कार्यवाही १) त्यांनी सेवेतुन निलंबित करणे, २) अपहार केलेली रक्कम वसुल करणे, ३) त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करणे, ४) झालेल्या प्रकरणांची विभागीय चौकशी करणे, तरी सुध्दा आताच आपण सांगितले की, त्यांनी ३० वर्ष सेवा केली. पेन्शनला भविष्यात त्रास होईल. त्यांचे बद्दल आपल्या व्यक्त केलेल्या आपल्या भावनेचा विचार करत १५ दिवसाच्या आत योग्य तो निर्णय घेतला जाईल.

**श्री. मधुकर सावंत :** माझ्या वार्डात रमानगर भागात एक व्यक्तीने महानगरपालिकेच्या जागेवर चहाची टपरी एकुण अतिक्रमण केले. सदर टपरी काढुन त्या जागेवर स्वेच्छानिधीतुन वस्ता करण्यात यावा म्हणुन पत्र दिले. अतिक्रमण काढण्याबाबत संबंधित प्रशासकीय विभागास कळवुन सुध्दा कार्यवाही करण्यात आलेली नाही. यासंबंधी न्यायालयाची स्थगित असून, सदर प्रकरणाची संचिका वकीलाकडे आहे असे सांगण्यात येते. अशाच प्रकारे महानगरपालिकेच्या जागा अतिक्रमणात जात असून, न्यायलयीन प्रकरण होतात व जागा हस्तांतर होण्यास वेळ जातो.

**श्री. शे. इलियास किरमानी :** विश्वास नगर प्रभागात २०X३० चे प्लॉट पाडुन विक्री होत आहे व त्या जागेवर बांधकामे ही होत आहे. आपले कर्मचारी इमारत निरीक्षक बांधकामे होऊ देण्यासाठी १०-२० हजार रुपयाची मागणी करत पैसे घेतात व सर्रासपणे बांधकामे चालु आहे. एक घर रस्त्यात आहे यासंबंधी मी प्रशासनाकडे पत्रही दिले ८ दिवस झाले. कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले गेले परंतु अद्याप संबंधित अनाधिकृत भुखंड पाडुन विक्री करणाऱ्यावर कार्यवाही केलेली नाही. अशाप्रकारे अतिक्रमण होते राहीले तर उदया या भागात तेथील नागरिकांना सुख सुविधा देण्याचा प्रश्न निर्माण होईल म्हणुन हा प्रकार तात्काळ बंद करावा. जे अधिकारी/कर्मचारी व्यवस्थित कामे करत नसतील कामात दिरंगाई करत असतील तर त्यांचेवर कडक कार्यवाही करावी त्यांचे बदल्या करण्यात यावा.

**श्री. भरत लकडे :** माझ्या वार्डाममध्ये सुध्दा असाच प्रकार असून, स्वतः इमारत निरीक्षक बांधकामे करण्यास जनतेला प्रवृत्त करतात पैसे घेतात व नगरसेवकांना बदनाम करतात. यासंबंधी मी पत्र दिले पत्र दिल्यानंतर सुध्दा कार्यवाही केली जात नाही. एक खुल्या जागेवर अतिक्रमण होत आहे. इमारत निरीक्षक कार्यवाही करीत नाही.

**श्री. किशोर शिंदे :** काही इमारत निरीक्षकांच्या बदल्या केल्यातरी ते पुर्वीच्या भागात जास्त नागरिकांकडुन रक्कम वसुल करतात अशा इमारत निरीक्षकांवर चौकशी करुन कडक कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : अशा कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने कार्यवाही करावी. उपआयुक्त (म) यांनी यासंबंधीचा खुलासा दयावा.

**उपआयुक्त (म.) :** गाजावाजा न करता ७-८ दिवसात ७० अतिक्रमण काढले. कुणी कर्मचारी नागरिकांकडुन पैसे घेऊन बांधकामे होऊन देत असतील तर त्यांचे वर कार्यवाही करण्यात येईलच परंतु कर्मचाऱ्यांच्या बदल्या संदर्भात मा. आयुक्तांकडे संचिका सादर केली असून, जवळपास सर्वच इमारत निरीक्षक यांचे बदल्या होतील. तरी सुध्दा चौकशी करुन कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. मधुकर सावंत :** सर्वच इमारत निरीक्षक यांच्या बदल्या कराव्या. नगरसेवकांच्या नावाखाली वार्डातील जनतेकडुन पैसे काढतात व नगरसेवकांना बदनाम करत आहे. त्यांचे बदल्या केल्या तरी कार्यवाही करण्यात यावी.

**मा. सभापती** : मा. आयुक्तांकडे कर्मचाऱ्यांच्या बदल्या संदर्भात गेलेली असून, मा. आयुक्त यांनी तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री. शे. इलियास किरमानी :** ज्या इमारत निरीक्षक यांनी रक्कम जमा केल्या त्यांची चौकशी व्हावी. नुसत्या बदल्या करुन चालणार नाही. महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण करुन दिले. महानगरपालिकाचे यात नुकसान होत नही.

**श्री. भरत लकडे :** जागेवर अतिक्रमण करुन दिले. महानगरपालिकाचे यात नुकसान होत नाही.

**उपआयुक्त (म.) :** ज्या ठिकाणी अतिक्रमण करुन विना परवानगीने बांधकामे आली. त्यासंबंधी कार्यवाही करण्यात येईल. व ज्या इमारत निरीक्षक यांनी पैसे घेऊन बांधकामे घेऊ दिले. अशा कर्मचाऱ्यांची सुध्दा चौकशी करण्यात येईल.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा, श्री. सावंत मधुकर :** इमारत निरीक्षाकांच्या मालमत्तेची सुध्दा चौकशी व्हावी. व त्यानुसार नियमाने कार्यवाही करण्यात यावी.

**मा. सभापती** : ज्या इमारत निरीक्षक यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या अशांच्या तात्काळ बदल्या करण्यात याव्यात तसेच त्यांचे मालमत्तेची सुध्दा चौकशी व्हावी.

**श्री. मीर हिदायत अली :** १ माणसाला ४-४ ठिकाणी जमीन दिली. मुजीब कॉलनी येथे एक व्यक्तीला १० हजार रुपयाची मागणी करण्यात आली. दिले म्हणुन तोडण्यत आले.

**श्री. भरत लकडे :** महानगरपालिकेच्या जागेवर एका व्यक्तीने घर बांधले. त्यानंतर मी पत्र दिले. वारंवार चर्चा होऊन तशी तक्रार सुध्दा देण्यात आलेली आहे. तरी सुध्दा संबंधित विभागाने अद्याप कार्यवाही केलेली नाही.

**उपआयुक्त (म.) :** जे कर्मचारी व संबंधित विभागाचे अधिकारी कामात हलगर्जीपण करत असतील तर त्यांचेवर दोन प्रकारे कार्यवाही होऊ शकते. त्या कर्मचाऱ्यांना त्या पदावन न ठेवणे दुसरे असे की, चौकशी करुन नियमाने कार्यवाही

करणे जे जे कर्मचारी अशा प्रकरणात गुंतलेले असतील त्यांची चौकशी करण्यात येईल.

**श्री. जगदीश सिध्द :** शहागंज भागात सरदार वल्लभभाई पटेल यांचे पुतळयाजवळ संजय गांधी निराधार योजने अंतर्गत टपऱ्या बसविण्यासाठी परवानगी दिली. आता, सध्या त्या ठिकाणी किती क्षेत्राची जागा दिली व आता प्रत्यक्षात किती अतिक्रमण आहे. जाण्या-येण्यासाठी रस्ता नसुन १२-१२ रस्त्यावर अतिक्रमण झाले. फुटपाथवर मोठया प्रमाणात अतिक्रमण झाले. महिलांना जाता येत नाही. अशी परिस्थिती आहे. उदया दुसरे कुणी महात्मा गांधी यांचे पुतळया समोर परवानगी मागतील तर परवानगी देणार काय? किती लोकांना परवानगी दिली, किती जागेवर दिली याची माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती** : मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** या रस्त्यावर एकूण ४४ टपऱ्यांना परवानगी देण्यात आलेली असून, मंजुरी दिल्यानुसार त्याचे पालन न करता तेथील दुकान धारकांनी दुकानच्या साईज वाढवुन घेतलेल्या आहेत.

**मा. सभापती** : परवानगी दिलेल्या ४४ टपऱ्या व्यतिरिक्त ज्या टपऱ्या झालेल्या असतील त्य काढण्याची कार्यवाही करण्यात यावी. ज्यांनी परवानगीच्या व्यतिरिक्त जास्तीच्या जागेवर साईज वाढवुन टपरी (दुकान) मोठी केली असेल, त्यांचेवर सुध्दा कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. जगदीश सिध्द :** चार-पाच दिवसापुर्वी कार्यवाही केली त्याबद्दल अभिनंदन परंतु सहाय्यक आयुक्त-१ यांना निलंबित करण्यात आले त्यात प्रकरणात २ कर्मचारी तसेच वरीष्ठ अधिकाऱ्यांचे अभिप्राय असतांना फक्त एकच कर्मचारी यांचेवर दोषी ठरवुन कार्यवाही होणे बरोबर नाही. ज्या कर्मचारी/अधिकारी यांनी सदर प्रकरणात अभिप्राय दिला त्यांना फक्त कारणे दाखवा नोटीस दिली. त्यांना सुध्दा निलंबीत करावे. एकतर्फी कार्यवाही झालेली आहे. असे सिध्द होते. सर्वांवर कार्यवाही व्हावी. चौकशी करावी जे निलंबनाचे आदेश काढले त्यावर मा. आयुक्तांची सही असते किंवा कसे.

( मा. आयुक्त यांची सही नसलेल्या व कॉम्प्युटर केलेली प्रत सभागृहात दाखवतात.)

**मा. उपआयुक्त (म.) :** संबंधित सहाय्यक आयुक्त यांना मा. आयुक्तांच्या सही शिक्क्या निशी निलंबीत आदेश पारित केलेले आहे. स. सदस्य यांनी दाखवलेली प्रत ही कॉम्प्युटर टाईप दुय्यम प्रत असू शकते. कॉम्प्युटरमध्ये सेव्ह केलेली असते. ज्याला ज्याला कोड मिळाले ते काढतात.

**श्री. जगदीश सिध्द :** कॉम्प्युटरची प्रत बाहेरच्या व्यक्तींना का देण्यात आली. त्यांचेवर कार्यवाही करावी. विभागात गोपनियत पाळली जात नाही काय?

**मा. सभापती** : मा. आयुक्तांच्या सही निशी निलंबनाचे आदेश दिले आहे. किंवा काय यांची मा. आयुक्तांनी स्वतः लक्ष घालुन सध्या आहेत. किंवा नाही ते पहावे. ज्या कुणी कर्मचाऱ्यांनी ही प्रत बाहेरच्या व्यक्तीला दिली त्यांचेवर मा. आयुक्त यांनी कार्यवाही करावी. गोपनियता पाण्यात यावी. अशा प्रकारे दुसरेही प्रकणातील कागदपत्रे बाहेर जात असतील.

**श्री. जगदीश सिध्द :** एका अधिकाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही तर एका अधिकाऱ्यांना फक्त कारणे दाखवा नोटीस दिली जाते हे योग्य नाही. प्रकरण एकच असून,

संचिकेमध्ये नेमके काम आले. त्या संचिकेसह सविस्तर माहिती स्थायी समिती समोर सादर करावी.

**मा. सभापती** : मा. आयुक्तांनी या संदर्भात माहिती दयावी.

**मा. आयुक्त** : जी कार्यवाही झाली त्यात सहाय्यक आयुक्त-१ यांना निलंबीत करण्यात आले. सुपरवायझरी जबाबदारी योग्य बजावली नाही. म्हणुन उपआयुक्त (प्र.) यांनी सुध्दा य प्रकरणामध्ये करणे दाखवा नोटीस दिली आहे. या प्रकरणामध्ये आणखी दोन क. लिपीक यांचा सुध्दा समावेश आहे त्यांना सुध्दा कारणे दाखवा नोटीस दिली आहे. अशा प्रकरणाची सखोल चौकशी करुनच निर्णय घ्यावे लागतात. स्वतःच अर्ज, स्वतःच दाखल करुन घेताल, स्वतःच नोटींस करतात संशयास्पद आहे. प्राथमिक चौकशी अहवालाप्रमाणे सादर झाला त्यानुसार कार्यवाही केलेली आहे. जे दोषी असतील, त्यांचेवर चौकशी करण्यासाठी एक चौकशी अधिकारी यांची नेमणुक करण्यात येईल व जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल कोणीही दोषी सुटणार नाही.

**मा. सभापती** : प्रभारी जे आयुक्त होते त्यांनी मान्यता दिली त्यांचेवर सुध्दा कार्यवाही का करण्यात येऊ नये. दोन कनिष्ठ लिपीक यांचेवर सुध्दा कार्यवाही व्हावी.

**मा. आयुक्त** : आयुक्तांच्या समकक्षेत असलेल्या अधिकारी दर्जाचे प्र. आयुक्त म्हणुन सदर प्रकरणात त्यांनी मान्यता दिली. परंतु त्यांचेवर कार्यवाही करणे हे माझ्या कक्षामध्ये येत नाही. त्यांचेवर कार्यवाही करण्याचे अधिकार मला नाही प्रभारी आयुक्त पदावर जे काम करतात त्यांना कामाची पुर्णतः माहिती नसते या प्रकरणात वरिष्ठांची दिशाभुल करुन स्वतःच्या फायदयासाठी संबंधित अस्थापनाचे अधिकाऱ्यांने संचिका सादर केलेली होती असा संशयास्पद चौकशी अंती समजले त्यानुसार त्यांचेवर कार्यवाही केलेली आहे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** प्रभारी आयुक्तांच्या संदर्भात मा. विभागीय आयुक्तांना कळवावे.

**मा. सभापती** : अहवाल सादर होईल त्यानुसार कार्यवाही करता येईल. अहवालाची एक प्रत नगर विकास सचिव यांचेकडे पाठवावी व प्रभारी आयुक्त यांचेवर कार्यवाही करण्याचे कळवावे असा निर्णय स्थायी समिती सभेत घेण्यात येत आहे.

**श्री. जगदीश सिध्द :** सहाय्यक आयुक्त-१ जेवढे दोषी तेवढेच उपआयुक्त (प्र.) दोषी आहेत, उपआयुक्तांवर किती दिवसात कार्यवाही करणार आहे. तसेच दोन कनिष्ठ लिपीक यांचेवर सुध्दा कार्यवाही करण्यात यावी.

**मा. आयुक्त** : प्राथमिक चौकशी ५ दिवसात केली. चुकलं नाही. ना संबंधित अधिकाऱ्यांवर कारणे दाखवा नोटीस बजावणी आहे. त्या संबंधीचे स्पष्टीकरण येईल. त्यानुसार सर्वांवरच नियमाने कार्यवाही करण्यात येईल. एकतर्फी कार्यवाही केलेली नाही. स. सदस्य यांचा गैरसमज आलेला दिसतो. तो त्यांनी काढुन टाकावा. शक्य तितक्या लवकर आपण निपटारा करु.

**श्री. मीर हिदायत अली :** उर्दु माध्यमाचे ९ शिक्षकांची भरती करण्यासाठी राखीव संवर्गातुन जेष्ठता यादी मागविली आहे. उर्दु माध्यमाचे राखीव संवर्गातुन उमेदवार मिळणार नाही. यात काही जागा खुल्या संवर्गासाठी करण्यात याव्यात.

**श्री. मधुकर सावंत :** शाळा सुरु होण्यास १० दिवस बाकी असून, साध्या वार्डात बालवाडी वर्ग उघडण्याबाबत मागील सर्वसाधारण सभेत निर्णय झालेल्या असतांना अद्याप बालवाडी वर्ग सुरु केलेले नाही. महानगरपालिकेत सध्या शिक्षणाधिकारी कायमस्वरुपी नाही. शिक्षणाधिकारी केव्हा येणार खुलासा दयावा.

**मा. सभापती :** शिक्षणाधिकारी महानगरपालिकेस येण्यासाठी मा. आयुक्त यांनी मा. शिक्षण सचिव यांना फॅक्स करुन शिक्षण अधिकारी बोलावुन घ्यावे.

**उपआयुक्त (म.) :** संपुर्ण शाळेचा आढावा घेतला असता ५५ शिक्षकाची गरज आहे. स. सदस्य यांनी सुचना केल्यानुसार राखीव संवर्गातुन उर्दु माध्यमाचे शिक्षक मिळणार नाही. यादी मागविण्यात आलेली आहेत उमेदवार न मिळाल्यास खुल्या संवर्गातुन शिक्षक भरती करण्यासंदर्भात मा. आयुक्त हे धोरणात्मक निर्णय घेऊन शकतील. शिक्षणाधिकारी आल्यानंतर सविस्तर माहिती घेऊन कार्यवाही करता येईल.

**श्री. भरत लकडे :** वतन टेक्स स्टाईल कडुन वसुली करण्यासंदर्भात त्यांचे मालमत्तेला बिल लावण्यात आले त्या अधिकाऱ्यांचे चांगली कार्यवाही केल्याबद्दल अभिनंदन करावे.

**मा. सभापती :** हे त्यांचे काय आहे व कर्तव्य ही आहे.

**श्री. जयवंत ओक :** वतन टेक्सस्टाईल प्रमाणे इतर कुणाकडे महानगरपालिकेची थकबाकी असेल तर, त्यांचेही मालमत्तेस सिल लावण्यात यावे व वसुलीची कार्यवाही करावी.

**मा. उपआयुक्त (प्र.) :** वतन टेक्सस्टाईल संदर्भात ९९ मध्ये प्रकरण न्यायालयात गेले. येणाऱ्या मालावर १००% माफी दयावी असे. संबंधित कंपनी मालकाचे म्हणणे होते. तसा सर्वसाधारण सभेत ठराव सुध्दा आलेला होता. पुन्हा सदर कंपनीकडुन वसुली करण्यात यावी म्हणुन ठराव पास झाला त्यानुसार संबंधित मालकाने वसुली न देता प्रकरण न्यायप्रविष्ठ केले न्यायालयाने संबंधितांची व महानगरपालिकेची बाजु ऐकल्यानंतर शासनाने यासंबंधी योग्य तो निर्णय १० एप्रिल पर्यंत घ्यावा असे निर्देश दिले. संबंधितांने पुन्हा न्यायालयात विनंती अर्ज केला त्यानुसार न्यायालयाने आपण महानगरपालिकेची असलेली थकबाकी १० में. पर्यंत भरावी. असे निर्देश दिले संबंधित कंपनी मालक यांनी १० मे आठवडयात या कंपनीत ८ लोक लावण्यात आलेले आहे. ही कार्यवाही केल्यानंतर संबंधिताने पुन्हा न्यायालयाकडे विनंती करुन कामागाराची उपासमार होत आहे व ३ लक्ष रुपये भरण्यास तयार असून, उर्वरीत असून, रक्कम टप्याटप्याने भरले तडजोड करावी अशी विनंती केली त्यानुसार न्यायालयाने आपणास महानगरपालिकेची थकबाकी भरण्यासंदर्भात दोन वेळेस आपले म्हणणे मांडण्याची सवलत दिली आता कोणती तडजोड करता येणार नाही आपण महानगरपालिकेची संपुर्ण थकबाकी भरावी. म्हणुन आपण केलेली कार्यवाही योग्यच आहे ६ तारखेला सुनावणी आहे. ह्य

**श्री. जयवंत ओक :** अशीच कार्यवाही मालमत्ता कराच्या संदर्भात झाली तर महानगरपालिकेस खुप उत्पन्न मिळेल. सर्व न्यायालयीन केसेस निकाली काढण्यात मोठमोठया हॉटेल मालकाकडे महानगरपालिकेची थकबाकी आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** भंगार मालावर वसुली करण्यासंदर्भात न्यायालयात केस दाखल झालेली असून, काय कार्यवाही केली.

**मा. उप आयुक्त (म.) :** सन ९९ मध्ये भंगार या मालावर (२% ऐवजी प्रती टन ६०/- रु प्रमाणे जकात आकारावी बाबत सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुर केला त्यानुसार प्रकरण शासनाकडे सादर झाले. शासनाची मंजुरी नाही. व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार आर. एल. स्टील कंपनीने रु. ६०/- प्रती टन प्रमाणे जकात वसुली बाबत दिवानी दावा दाखल केला. प्राथमिक दृष्टया मान्य करुन मा. न्यायालयाने आदेश दिले. दुसऱ्या दिवशी दाखल करण्यात आले. महानगरपालिकेने लेखी जवाब दाखल केला प्रतिज्ञापत्र दाखल केले. त्यात जोपर्यंत शासनाची मंजुरी होऊन राजपत्रात प्रसिध्द होत नाही तो पर्यंत सवलत देता येत नाही असे नमुद केले आहे. मंत्रालयातुन महानगरपालिकेस पत्र प्राप्त झालेले नाही.

**मा. सभापती :** मा. आयुक्त यांनी अधिकारी/कर्मचारी यांचेवर जी कार्यवाही केली. कर्मचाऱ्यांमध्ये एक प्रकारचा वचक निर्माण केला, शिस्त लावली. त्याबद्दल सभागृहातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

**विषय क्र. २/१ :**

दिनांक ३०-०३-२००१ रोजी संपन्न झालेल्या (का. प. क्र. १७ व १८) स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** इतिवृत्तातील पान क्रमांक १९ वर विषय क्र. १२६/८, १२७/९, १२८/१० मागील बैठकीत विषय पत्रिकेवर विषय नव्हते. इतिवृत्तांत आले याचा खुलासा द्यावा.

**मा. सभापती :** नगरसचीव यांनी खुलासा करावा.

**नगरसचीव :** मुळ विषयपत्रिकेवर हे प्रस्ताव नव्हते. परंतु मा. सभापती यांनी ऐनवेळेचे प्रस्ताव म्हणुन मंजुर केलेले होते व या सर्व प्रस्तावावर त्यांची ऐनवेळी प्रस्ताव मंजुर केला आहे, म्हणुन स्वाक्षरी केलेली आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** सभागृहात हे विषय आलेले नव्हते. आले होते तर वाचुन का दाखविले नाही. स. सदस्यांना त्याच्या प्रती द्यावयास पाहिजे होत्या. सभापती याचेवर कार्यवाही करावी. ,

**श्री. मधुकर सावंत :** मागील बैठकीत आम्हा सदस्यांना त्या प्रस्तावाच्या प्रती मिळालेल्या नाही.

**मा. आयुक्त :** जे विषय मागील बैठकीत नव्हते ते इतिवृत्तात आले असा प्रश्न उपस्थित झाला यामध्ये आपणांस दोन-तीन प्रकारे कार्यवाह्या करता येतील ते सभागृहानेच ठरवावे.

१. ठराव इतिवृत्तांत आले आता कायम करण्यासाठी इतिवृत्त सादर झाले. आपण मंजुर करणार काय?

२. ठराव झाल्यास व्यास खंडण करण्यासाठी मुंबई प्रांतींक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५१ खाली तसा प्रस्ताव नगरविकास सचीव यांचेकडे पाठवावा लागेल. त्या अगोदर आपण हे पाहिले पाहिजे की, एक महिन्यापुर्वी जवळपास हे विषय आलेले होते, त्यांचे टेंडर झाले का?

अॅग्रीमेंट झाले का? नोटीस किती दिवसांची होती. छाननी केव्हा झाली. महानगरपालिकेचे नुकसान तर होणार नाही. तसा खुलासा घेऊनच कार्यवाही करता येईल. या ठरावानुसार कार्यादेश द्यावयाचे की नाही हे सभागृहाने ठरवावे त्यानुसार कार्यवाही होईल.

**मा. सभापती** : अतिरिक्त शहर अभियंता यांनी खुलासा करावा की, या प्रस्तावानुसार कामे सुरु आले किंवा काय?

**अतिरिक्त शहर अभियंता :** इतिवृत्तातील विषय क्र. १२६/६, १२७/९ ऐनवेळी मंजुर झाल्यानुसार दोन्ही कामे चालु आहेत.

**कार्यकारी अभियंता :** इतिवृत्तांतील विषय क्र. १२६/१० यास सर्वसाधारण स्तभेने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार वर्क ऑर्डर दिलेली. तांत्रिकदृष्ट्या स्थायी समितीची या प्रस्तावास मंजुी घेतली नव्हती म्हणुन प्रस्ताव सादर केलेला होता. ऐनवेळी सभागृहात ठेवण्यत आले. काम सुरु केलेले आहे. जवळपास २०% काम आलेले आहे.

**मा. सभापती** : सभापतीवर कार्यवाही करावयाची बाब सर्वसाधारण सभेच्या अधिकारातील आहे. स. सदस्यांना वैयक्तिकरित्या न्यायालयात कार्यवाही करता येते.

**श्री. जगदीश सिध्द :** मागील बैठकीत ऐनवेळी ठराव देऊन इतिवृत्तात सादर झाले व त्या इतिवृत्तास आता स्विकृती मिळणार असून, यापुर्वी इतर प्रस्ताव मंजुर घेऊन सुध्दा कामे केलेली नाही. याचे कारण काय?

**ठराव :**

दिनांक ३०-०३-२००१ रोजी संपन्न झालेल्या (का. प.क्र. १७ व १८) स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, सेवायोजन कार्यालय (कॅप्सुल आयलँड) ते नुतन कॉलनी व्हाया पोलीस वर्कशॉप या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सन १९९९-२००० च्या सा. बा. खात्याच्या डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. १४,२९,०००/- चे तयार करण्यात आले असून, सदरचा खर्च सन २०००-२००१ या सालवील पुर्नडांबरीकरण या लेखा शिर्षाखाली (दहावा वित्त आयोग २०००-२००१) करण्यात येईल. करीता अदांजपत्रकीय प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सेवायोजन कार्यालय (कॅप्सुल आयलँड) ते नुतन कॉलनी व्हाया पोलीस वर्कशॉप या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १४,२९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहानुरवाडी सर्वे नं. ९/२ येथील १२ मीटर रुंद विकास योजनेतील रस्त्याचे खडीकरण, सरफेस ड्रेसिंग साईड गटार व पुलाचे बांधकाम करण्याच्या कामाकरीता सा. बा. खात्याच्या सन २०००-२००१ च्या दरसुचीनुसार रक्कम रुपये १२,२५,२५०.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी र. रु. १२,२५,२५०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. जयवंत ओक :** प्रस्तावानुसार जे काम करायचे ती जागा वादाची आहे असे वाटते त्या जागेवरील परिस्थिती काय आहे. त्याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : रेखांकनात हा रस्ता मंजुर आहे का?

**अतिरिक्त शहर अभियंता** : सर्व्हे नं. ९/२ मधुन १२ मीटर रुंद डी. पी. रस्ता आहे व रामतारा गृहनिर्माण संस्थेस अप्रोच आहे.

**श्री. जयवंत ओक :** सन ७५ च्या डी. पी. प्लॅन नुसार व ९५ च्या प्लॅन मध्ये कोणते बदल आहे. प्रस्ताव स्थगित ठेवावा प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुनच निर्णय घेण्यात यावा. कोणता डी. पी. प्लॅन आहे. नकाशा दाखवावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** रामतारा हाऊसींग सोसायटी जवळ डी. पी. प्लॅन १९७५ किंवा ९५ चा आहे काय हे पहावे लागेल.

**श्री. जयवंत ओक :** सन १९७५ चा डी. पी. प्लॅन मागवावा ९५ च्या डी. पी. प्लॅन मध्ये बदल झालेला आहे काय ते समजेल.

**मा. सभापती** : डी. पी. प्लॅन केव्हाचा आहे. सादर करावा.

**श्री. जयवंत ओक :** या जागेच्या संदर्भात वाद चालु होता. तात्कालीन आयुक्त श्री. बलदेवसिंह यांनी या संदर्भात टिप्पणी तयार केली. माहिती मागविली तर ह्या जागेवर खेळाचे मैदार म्हणुन दिसुन आले. त्यांनी या जागेच्या संदर्भात स्थगिती दिली होती. सदर संचिका मागवावी तोपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवावा. जागेवरती वस्तुस्थिती काय ती पहावी त्यानंतरच पुढील बैठकीत निर्णय घ्यावा.

**उपअभियंता (नगररचना-२) :** १९७५ च्या विकास योजनेत ९७-९८ ला महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७९१ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यात आली असून, त्यात ३०% महानगरपालिकेस मोफत मिळणार उर्वरीत ७०% जागेवर बांधकाम परवानगी दिलूेली आहे. तात्कालीन आयुक्त यांनी स्थगिती दिली होती. त्या जागेवर सध्या ९०% काम झालेले आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा, श्री. जयवंत ओक :** प्रस्तावास आमचा विरोध नसुन, प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुनच निर्णय घ्यावा. कमीटी स्थापन करावी.

**मा. सभापती** : शहानुरवाडी येथील सर्व्हे नं. ९/२ येथील १२ मीटर रस्त्यावर खडीकरणाचा प्रस्ताव सादर झालेला आहे. त्यानुसार प्रत्यक्ष स्थळ पाहणीसाठी कमीटी स्थापन करण्यात येत असून, त्या कमीटीत स. सदस्य श्री. जयवंत ओक श्री. दलबीरसिंग जबिंदा श्री. मधुकर सावंत व स. स. श्री. किशोर तुळशीबागवाले, संबंधित प्रभागाचे नगरसेवक यांचा समावेश करण्यात येत असून, तसेच संबंधित विभागाचे अधिकारी बरोबर राहतील कमीटीने पुढील बैठकीपर्यंत स्थळ पाहणी करुन अहवाल सादर करावा तोपर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो. या प्रस्तावासंबंधी सभागृहात ठरल्यानुसार प्रत्यक्ष स्थळ पाहणीसाठी समिती स्थापन करण्यात येते. या समितीमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री जयवंत ओक, दलबीरसिंग जबिंदा, मधुकर सावंत, किशारे

तुळशीबागवाले तसेच संबंधित प्रभागाच्या नगरसेविका सौ. साधना सुरडकर व संबंधित विभागाचे अधिकारी यांचा समावेश असेल. समितीने स्थळपाहणी करुन आपण अहवाल पुढील बैठकीपुर्वी सादर करावा. त्यानंतर यावर निर्णय घेण्यात येईल. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ५/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, उस्मानपुरा पोलीस चौकी मागील महानगरपालिकेची जुनी इमारत पाडुन नवीन सार्वजनिक सभागृह बांधण्याकरीता नकाशे व अंदाजपत्रक वास्तु विशारद श्री. सुनिल राका अँड असोसिएटस यांचे कडुन घेण्यास मा. आयुक्तांनी दिनांक ०५-०१-२००१ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक र. रु. १८,६२,५२१/- चे सन १९९९-२००० च्या सा. बा. विभागाच्या जिल्हा दरसुची प्रमाणे, तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्तांनी दि. २४-०४-२००० नुसार मान्यता दिलेली आहे.

करीता उस्मानपुरा पोलीस चौकी मागील मनपाची जुनी इमारत तोडुन नवीन सार्वजनिक सभागृह बांधणेच्या कामाचे र. रु. १८,६२,५२१/- चे अंदाजपत्रक स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उस्मानपुरा पोलीस चौकी मागील महानगरपालिकेची जुनी इमारत पाडुन नवीन सार्वजनिक सभागृह बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १८,६२,५२१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६/५ :**

उपसंचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला अंगुरीबाग चुनाभट्टी येथील मिळकत न. भु. क्र. १३४७५ व १३४७६ मधुन ड्रेनेज लाईन व रस्त्यासाठी प्रत्येकी २७ चौ. मी. क्षेत्र संपादन करणे आवश्यक आहे. सदरील भाग प्रभाग क्रमांक ८१ मधील आहे.

दलालवाडी भागातील ड्रेनेज लाईन उक्त मिळकतीतुन टाकणेसाठी तसेच त्या भागातील मिळकत धारकांना येण्या-जाण्यासाठी सुध्दा रस्ता उपलब्ध होईल. करीता उक्त मिळकतीमधुन ९X३ मीटर प्रत्येकी क्षेत्र संपादन करण्यासाठी कार्यकारी अभियंता यांनी सुचविले आहे. याठिकाणी या मिळकतीच्या उर्ध्व पातळीवरील ड्रेनेजचे काम पुर्ण झाले आहे. या मिळकतीतुन टाकावयाच्या ड्रेनेज लाईनमुळे सदरील ड्रेनेज काम अपुर्ण असून, या भुसंपादनामुळे सदर ड्रेनेजचे काम पुर्ण होऊन सदर ड्रेनेज लाईन कार्यान्वित होईल.

सबब उक्त मिळकती मुल्याकंन झेन ४९ मध्ये असून, या भागातील जमिनीचा या वर्षाकरीता शिघ्र सिध्द गणक दरानुसार दर रुपये १९५० प्रति चौ. मी. आहे. करीता २७+२७ = ५४ चौ. मी. साठी रु. १,४५,३००/- मोबदला निश्चित होतो. तसेच संपादन करावयाच्या जागेचे नोंदणीकृत दस्तऐवज करुन घेणे रु. १०,५३०/- खर्च येईल. हा खर्च महापालिका व संबंधित मिळकत धारक यांनी निम्मा निम्मा करावयाचा आहे. संबंधित मिळकत धारकाचे मालकी हक्काचे कागदपत्र तपासुन मोबदला देण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला अंगुरीबाग चुनाभट्टी येथील मिळकत न. भु. क्र. १३४७५ व १३४७६ मधुन ड्रेनेज लाईन व रस्त्यासाठी प्रत्येकी २७ चौ. मी. क्षेत्र संपादन करण्यास तसेच रु. १९५०/- प्रती चौ. मी. प्रमाणे २७+२७ = ५४ चौ. मी. साठी रु.

१,४५,३००/- मोबदला संबंधित जमीन मालकांना देण्यास त्याचप्रमाणे जागेचे नोंदणीकृत दस्तऐवज करुन घेण्याकरीता र. रु. १०,५३०/- च्या खर्चास व हा खर्च महापालिका व संबंधित मिळकतधारक यांनी निम्मा करुन मिळकतधारकांचे मालकी हक्काचे कागदपत्र तपासुन मोबदला देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी त्यांचेकडील पत्र जावक क्रमांक सीआर-३६५/औबाद/२००१/५१० दिनांक १७-०२-२००१ नुसार आरोपी लोकसेवक श्री. जगन्नाथ दादाराव थोराव व श्री. सोनुबा चिमाजी गारोडी, दोन्ही इमारत निरीक्षक, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे विरुध्दची लाचलुचपतीची सापळा केस प्रकरणी त्यांचेविरुध्द न्यायालयात अभियोग लावण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. पत्रासोबत सदरच्या गुन्हा प्रकरणांच्या तपासाचे संपुर्ण कागदपत्र संच त्यांनी पाठविलेला आहे.

सर्व कागदपत्रे बारकाईने तपासणी आहेत. संबंधित सर्वश्री ज. दा. थोरात व सो. चि गाराडे यांच्या विरुध्द न्यायालयात अभियोग लावण्यासाठी पुरेसा पुरावा दिसुन येत आहे.

सबब, प्रसताव मान्य करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी त्यांचेकडील पत्र जावक क्रमांक सीआर-३६५/औबाद/२००१/५१० दिनांक १७-०२-२००१ नुसार आरोपी लोकसेवक श्री. जगन्नाथ दादाराव थोराव व श्री. सोनुबा चिमाजी गारोडी, दोन्ही इमारत निरीक्षक, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे विरुध्दच्या लाचलुचपत सापळा केस प्रकरणी त्यांचेविरुध्द न्यायालयात अभियोग लावण्याची परवानगी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८/७ :**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो किराडपुरा (स्लम) येथे नाला संरक्षित भिंत बांधणे बाबतच्या कामाकरीता सा. बा. च्या वर्ष १९९९-२००० च्या दरसुचीनुसार र. रु. १८,२४,५४८.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम " खुली गटार " व संरक्षित भिंत बांधणे शासकीय अनुदान २०००-२००१ या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी दिनांक ०१-०२-२००१ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तसेच दिनांक ०७-०३-२००१ रोजी स्थायी समितीत अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यत आल्या असता अंतीम तारखेपर्यंत एकुण (१५) निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण (३) निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. एस. कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | एस. एम. भंडोरे | १.२% जास्त दराने |
| ३. | मन्नान खान | २% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची असलेली मे. एम. कन्स्ट्रक्शन यांचे निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो किराडपुरा (स्लम) येथे नाला संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची मे. एस. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पैठणगेट बाहेरील सार्वजनिक शौचालय तोडुन शाळा बांधणेकरीता सा. बा. विभागाचे सन ९८-९८ चे जिल्हा दर सुचीनुसार र. रु. २१,१८,३८२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त महोदच यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मान्यतेस्तव सर्वसाधारण सभेपुढे ठेवला असता, मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र. २०९/२ दिनांक १९-०१-२००१ अन्वये प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार कार्यालयीन निविदा सुचना जा. क्र./मनपा/लेखा/नि/७७/२००१ दिनांक १४-०३-२००१ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यात एकुण ३ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | मन्नान खान | ४.९९% जास्त दराने |
| २. | एस. ए. नवाब | ७.१०% जास्त दराने |
| ३. | शेख शरीफ | निविदेसोबत भरावयाची इसार रक्कम कमी असल्याने निविदा उघडण्यात आली नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची निविदा श्री. मन्नान खान यांची प्राप्त झालेली आहे. तथापि संबंधित गुत्तेदारास दराबाबतच्या वाटाघाटीस्तव बोलाविण्यात आले असता अं. प. दरापेक्षा ४.९९% जास्त दराऐवजी ३% जास्त दराने सदर निविदेस मा. आयुक्त महादोय यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार श्री. मन्नान खान यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९६% जास्त दराऐवजी ३% जास्त दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. किशारे तुळशीबागवाले :** शौचालय तोडुन शाळा बांधण्याचा उद्देश काय दुसऱ्या जागेवर शाळा बांधावी.

**श्री. जयवंत ओक :** शौचालय तोडुन टाकणार, आवश्यक असेल तर, राहु द्यावे. दुसऱ्या जागेवर बांधावे कारण शौचालयासाठी महानगरपालिकेचा खर्च झालेला पैसा वाया जाईल. दुसरीकडे आजुबाजुला सार्वजनिक शौचालय जनतेसाठी आहे काय?

**शहर अभियंता :** या शौचलयाच्या बाजुलाच महानगरपालिकेचे शॉपींग सेंटर आहे. तेथे शौचालय उपलब्ध आहे. या शौचालयाची गरज नाही म्हणुन तोडुन एकुण त्या जागेवर शाळा बांधण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

**मा. सभापती** : प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात देतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठणगेट बाहेरील सार्वजनिक शौचालय तोडुन शाळा बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे

निविदाधारक श्री. मन्नान खान यांचेशी आलेल्या वाटाघाटीत ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडुन अं. प. दरापेक्षा ४.९९% जास्त दराऐवजी ३% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०/९ :**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. ब्रिजवाडी (स्लम) येथे नांव संरक्षित भिंत बांधणेच्या बाबतच्या कामाकरीता सा. बा. खाते यांचे वर्ष ९९-२००० च्या दरसुचीनुसार रक्कम रु. २०,२८,९६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील काम खुली गटार/संरक्षित भिंत बांधणे व शासकीय अनुदान २०००-२००१ या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिनांक १६-११-२००० रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे, तसेच सर्वसाधारण सभेत दिनांक १९-१२-२००० रोजी अंदाजपत्रकास मान्यता मिळाली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकुण १७ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण (८) निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. डी. अजितसिंग | २८.११% कमी |
| २. | एस. के. कन्स्ट्रक्शन | २६.६% कमी |
| ३. | जी. आर. घोडेले | २२.२२% कमी |
| ४. | राज कन्स्ट्रक्शन | २१.७८६% कमी |
| ५. | न्युस्टार कन्स्ट्रक्शन | २१.३२% कमी |
| ६. | महंमद सलीम | २०.७८% कमी |
| ७. | एस. एम. मंडोरे | १५.७८% कमी |
| ८. | अनुयोग कन्स्ट्रक्शन | निविदा उघडली नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच २८.११% कमी दराची असलेली श्री. डी. अजितसिंग यांच्या निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. जगदीश सिध्द :** निविदा २८.११% कमी दराने आलेली काम चांगले होईल काय?

**अतिरिक्त शहर अभियंता :** संबंधित एजन्सीज ने तसे लिहुन दिलेले आहे. स्वतःचा ट्रक आहे बी-१ निविदेप्रमाणे पेसीफिकेशन नुसार ठेकेदार काम करुन देणार आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ब्रिजवाडी (स्लम) येथे नाला संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २८.११% कमी दराची श्री. डी. अजितसिंग यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, एन-६, साईनगर, येथील म्हाडा वसाहतीमधील खुल्या जागेवर उद्यान विकसित करणेच्या कामाच्या अंदाजपत्रकास मा. स्थायी समिती ठराव क्र. १०३/२ दिनांक १३-०३-२००१ अन्वये मान्यता मिळाल्यानुसार सदरील कामाची निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१/२००१ दिनांक ०४-०४-२००१ अन्वये

निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या तारखेला २९ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या तारखेला १२ निविदा प्राप्त झाल्या. त्या. उपस्थितासमोर उघडण्यात आल्या असता प्राप्त झालेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. बादल महेंद्रकुमार | १२.२४% कमी |
| २. | इंडियन कन्स्ट्रक्शन | १६.८९% कमी |
| ३. | श्री. कुलवंतसिंग | १६.८६% कमी |
| ४. | एस. एच. असोसिएटस | ३०.३३% कमी |
| ५. | श्री. एस. ए. नवाब | १९.५३% कमी |
| ६. | अलिफ असोसिएस | १८.१५% कमी |
| ७. | बसरा कन्स्ट्रक्शन | १४.९९% कमी |
| ८. | श्री. सु. रा. काकडे | १८.३७६% कमी |
| ९. | श्री. संतोष मोरेगांवकर | १५.५०% कमी |
| १०. | श्री. शेख मसुद | २३.२३% कमी |
| ११. | श्री. एल. जी. अग्रवाल | इ. एम.डी. नसल्याने निविदा उघडली नाही. |
| १२. | श्री. व्ही. जी. स्वामी | निविदा उघडली नाही. |

प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.३३% कमी दराची एस. एच. असोसिएटस यांची निविदा आहे. करीता निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**
**श्री. भरत लकडे :** या प्रस्तावात रक्कम दिलेली नाही.
**शहर अभियंता :** १२,०९,१००/- एवढी रक्कम आहे.
**मा. सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**
प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-६, साईनगर, येथील म्हाडा वसाहतीमधील खुल्या जागेवर उद्यान विकसित करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३०.३३% कमी दराची एस. एच. असोसिएटस यांनी निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**
**श्री. शिंदे किशोर :** ऐनवेळी जे प्रस्ताव सादर आले त्यात एक-एक प्रस्ताव १.५० कोटीचे जवळपास आहेत एकाच वार्डात एवढया मोठया रक्कमेची कामे कल्यास इतर वार्डात विकास कामे होतील काय? सगळयाच वार्डात विकास कामे व्हावीत अशी अपेक्षा आहे.
**श्री. किशोर तुळशीबागवाले :** माझ्या वार्डातील एका कामाबाबत ४ वर्षापासुन इस्टीमेंट आले. अद्याप काम झालेले नाही.

**श्री. सलीम पटेल :** २२ कोटी रुपये विकासासाठी आहे असे आताच सांगितले गेले सगळयाच नगरसेवकांच्या वार्डात विकास कामे व्हावीत.

**श्री. मधुकर सावंत :** झोन क्र. ४ मध्ये सर्वात जास्त वसुली होते तेथे विकास कामावर जास्त खर्च करावा.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** शहागंज, किराणाचावडी, मोंढा भागात विकास कामे झालेली नाही.

**मा. सभापती** : आताच चर्चा घेऊन ऐनवेळचे विषय इतिवृत्त आले अशी चर्चा झाली म्हणून ऐनवेळचे कोणतेच विषय या बैठकीत घेण्यात येत नसून, पुढील बैठकीत सादर करावे व यापुढे सुध्दा ऐनवेळी कोणते विषय मी सभापती पदावर असे पर्यंत मंजुरीसाठी घेतले जाणार नाही. याची सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

**श्री. भरत लकडे :** आताच सादर झालेले ऐनवेळचे विषय घ्यावे पुढील बैठकी पासुन घेण्यात येऊ नये.

**मा. सभापती** : ऐनवेळचे विषय पुढील बैठकीत विषय पत्रिकेवर सादर करावे व यापुढे ऐनवेळी विषय कुणीही आणु नये.

या बरोबर " जण गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ११-०७-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. शुक्रवार दिनांक ११-०७-२००१ रोजी मा. सभापती प्रशांत देसरडा, यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समिती सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृहात " येथे दुपारी ३.३० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरुवात झाली. सभेला कार्यालयीन अधिकारी यांचेसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. अशरफ मोतीवाला | स. सदस्य |
| २) | स. स. श्री. कावडे साहेबराव राणुबा | -//- |
| ३) | स. स. श्री. सिध्द जगदिश कन्हैयलाल | -//- |
| ४) | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ५) | स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | -//- |
| ६) | स. स. श्री. सलीम पटेल समशेर पटेल | -//- |
| ७) | स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| ८) | स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली | -//- |
| ९) | स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| १०) | स. स. श्री. शे. इलियास किरमानी शे. उमर | -//- |
| ११) | स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतू | -//- |
| १२) | स. स. श्री. ओक जयवंत केशवराव | -//- |
| १३) | स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | -//- |
| १४) | स. स. श्री. डॉ. श्रीमती आशा बिनवडे | -//- |

(महानगरपालिकेचे सन्माननीय सदस्य श्री. रतनकुमार पंडागळे यांच्या मातोश्रीचे दु:खद निधन झाल्याने सभागृहातर्फे ०२ मिनिटे सर्वांनी स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली.)

**संवाद :**

**श्री. जयवंत ओक :** पंधरा दिवसानंतर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकी आचारसंहिता लागणार अशी माहिती मिळाली. मा. जिल्हाधिकारी किंवा मा. विभागीय आयुक्त यांचेकडुन तसे सुचनापत्र आले का? आचारसंहिता लागणार असेल तर, जी विकास कामे अपुर्ण राहीलेली आहेत ती तात्काळ करण्यात यावी. आचारसंहिता लागल्यानंतर नवीन कामे करता येणार नाही. परंतु या अगोदर मंजुर झालेली विकास कामे करता येतील किंवा नाही, खुलासा करावा.

**मा. सभापती :** उपआयुक्त यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** कोणत्या तारखेला आचारसंहिता लागेल याबाबतची अधिकृत घोषणा झालेली नाही. जिल्हाधिकारी यांचेकडुन तसे काही माहिती झालेली नाही. निवडणुक कार्यक्रम जाहीर होताच त्याचबरोबर आंचारसंहितेच्या बाबतीत निवडणुक आयोगाकडुन एक पुस्तिका आपल्या माहितीसाठी येते. त्यात

आचारसंहितेच्या काळात कोणतही कामे करावी, कोणती करुन नये यासंदर्भात सर्व माहिति दिलेली असते. निवडणुक आयोगाकडुन जे मार्गदर्शन येईल. त्यानुसार कार्यवाही केली जाईल जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन तशी माहिती आपल्याकडे येईल.

**श्री. जयवंत ओक :** श्री. स्थायी समितीचा सभापती असतांना निवडणुकीची आचारसंहिता लागलेली होती. या कालावधीत विकास कामांना मंजुरी देऊन कामे करता यांनी म्हणुन न्यायालयात गेलो असता विकास कामे मंजुर करण्यास बैठक बोलविता येईल व ती कामे करता येतील फक्त बैठकीस पत्रकारांचा समावेश असु नये असे निर्देश दिलेले होते. ही बाब मा. जिल्हाधिकारी, मा. विभागीय आयुक्त यांचे निदर्शनास आणुन द्यावी.

**मा. सभापती** : स. सदस्य श्री. ओक जेव्हा या सभागृहाचे सभापती असतांना निवडणुकीची आचारसंहिता लागलेली होती. परंतु त्यांनी शहरातील तातडीची व महत्वाची विकास कामे करण्यासाठी न्यायालयाकडे परवानगी मागितली असता तातडीची व महत्वाची कामे करता येतील अशी न्यायालयाचे निर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी यांच्या माहितीसाठी प्रशासनामार्फत पाठविण्यात यावी.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** क्रांतीचौक येथील सर्व्हे नं. ५४ मधील महानगरपालिकेची जागा रु. २००/- रु, २८१/-, रु. २८४/- प्रमाणे भाडेपट्टयाने दिलेल्या आहेत. सध्या त्या जागेला अकृषी कर लावण्यात येत असून, तो मनपास भरावा लागतो. उत्पन्न कमी व कर जास्त जात आहे. अशा किती जागा भाडेपट्टयाने दिलेल्या आहेत याचा मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मा. सभापती** : सर्व्हेनं. ५४ मधील किती जागा भाडेपट्टयाने दिलेल्या आहेत. किती लोकांना भाडेपट्टयाने जागा दिली, एन. ए. भरलेला आहे. तो किती भरलेला आहे. नियमाने किती एन. ए. लागु होतो.

**मालमत्ता अधिकारी :** सर्व्हे नं. ५४ मधील जागा भाडयाने दिलेली आहे. अकृषी करापोटी मनपाने पाच लाख रुपये आतापर्यंत भरणा केलेले आहेत.

**मा. सभापती** : एन. ए. पोटी एकुण किती रक्कम भरावी म्हणुन मनपास नोटीस आलेली होती.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** संबंधित लोकांनी पी. आर. कार्ड कसे काढले. उत्पन्न कमी व उत्कृष्ट मनपास अकृषी करापोटी जास्त रक्कम भरावी लागत आहे. यास कोण जबाबदार?

**मालमत्ता अधिकारी :** सखोल चौकशी करुन कलम ८१ (बी) प्रमाणे नोटीस देण्यास प्रस्तावित नोटसी देऊन कार्यवाही करण्यात येईल. त्या जागेचा ७/१२ (सातबारा) मनपाच्या नावांवर आहे. यासंबंधी नगर भुमापन कार्यालयात अपील करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** पहिलेच मनपाचे उत्पन्न कमी होत आहे. जकात पाणीपट्टीची वसुली कमी आहे. त्याच स्थितीत आहे. काही वाढ होत नाही. त्यातल्या त्यात पाच लाख रुपये भरुन मनपाचे नुकसानच होत आहे. एखादे २५ हजार रुपयांचे विकासाचे काम वेळेवर होत नाही. स्पील ओव्हरच्या कामासाठी पत्र दिले ते सुध्दा काम होत नाही.

**मा. सभापती** : पाच लक्ष रुपये कसे भरले. परवानगी कशी देण्यात आली. माझ्या माहितीप्रमाणे पैसे भरले नाही तर, आयुक्तांच्या गाडीला सील लावु अशी नोटीस संबंधित विभागाकडुन आली म्हणुन पाच लाख रुपये भरले.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** पाच लक्ष रुपये भरले. उत्पन्न काहीच नाही. नुसत्या बैठका होतात. कामे काहीच नाही. सर्वच वसुली कमी झालेली आहे. अधिकारी जागेवर बसत नाही. वसुली कमी घेण्याचे कारण काय?

**मा. सभापती** : सदर जागेचा ७/१२ मनपाच्या नावांने व पी. आर. कार्ड संबंधित लोकांच्या नांवे आहे. याबाबत प्रशासनातर्फे काम कार्यवाही करण्यात आली. संबंधित लोकांना एन. ए. भरावा म्हणुन नोटीस येते व मनपास सुध्दा माझ्या माहिती प्रमाणे १ कोटी ९६ लक्ष रुपये एन. ए. भरावा म्हणुन नोटीस आणि या संदर्भात प्रशासन काम कार्यवाही करणार आहे. उत्पन्न २५ हजार व एन. ए. पोटी ५ लक्ष रुपये भरणे योग्य होणार नाही. ७/१२ मनपाच्या नावाने व पी. आर. कार्ड दुसऱ्याच्या नावांवर अशा किती मालमत्ता आहेत याचा खुलासा करावा.

**उपआयुक्त (म) :** सर्व्हे नं. ५४ च्या बाबतीत एक महिन्यापुर्वी जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन एक पत्र आले, त्याचा संदर्भ घेऊन चौकशी केली असता रु. नं. ५४ मध्ये नगर परिषद असतांना काही लोकांना लिजवर जागा दिलेल्या आहेत. असे दिसुन आले. राणी लक्ष्मीबाई जयंती त्यावेळी चौकशी केली. ही प्रकरणे १९७२ ते १९७७ दरम्यान झालेले असून, सदर संचिका मागविली असता त्यात ज्या त्रुटी आढळुन आल्या त्या दुरुस्त केल्या आहेत. अपील करुन जे पी. आर. कार्ड तयार केले ते कसे करण्यात आले म्हणुन विचारणा केली. ते २६ व्हावे व आजच्या तारखेला सुध्दा मनपाची त्या जागेवर मालकी हक्क आहे. म्हणुन नमुद केले. अपीलाची तारीख वाढविल्यानंतर त्या जागेचे पी. आर. कार्ड रद्द होईल. हा एक भाग आला. नगरपालिकेने जो करार केलेला आहे. तो महानगरपालिका झाल्यानंतर बंधनकारक असतो. ज्यांची लीजवर दिलेल्या जागेची मुदत संपलेली आहे. अशांना आपण नोटीस दिलेल्या आहेत. त्यानुसार काहींचे उत्तर कालच प्राप्त झाले. बुरुज समाज व लिंगायत समाजासाठी स्मशानभुमीसाठीची जागा सोडुन बाकीची जागा आपण आपल्या ताब्यात घेणार आहोत. तशी कार्यवाही चालु आहे. नोटीसचे उत्तर आलेले असून, नवीन आयुक्त साहेबांसमोर ते ठेऊन जागा आपल्या ताब्यात घेण्याचा निर्णय घेण्यात येईल व त्यापुढे या जागेवर काय योजना राबवायच्या यासंबंधी सभागृहाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल. उत्पन्नाच्या बाबतीत जे मुद्दा उपस्थित केला तो बरोबर आहे. उत्पन्न वाढले तर, विकास कामे आपण करु शकतो. उत्पन्न ८० ते ९० कोटीपर्यंत सुध्दा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. कामे न झाल्यास जनतेला तसे म्हणता येणार नाही, उत्पन्न कमी झाले म्हणुन कामे करुन शकलो नाही. यावर्षीची मालमत्ता व मागील वर्षाची थकबाकी वसुल करण्यासाठी आपण नियोजन केलेले आहे. माझ्याकडे पाणीपट्टी व कर वसुली संदर्भात माहिती आहे. विभागानुसार २००० ते २००१ मध्ये एकुण २६ कोटी ७० लक्षची वसुली येणे आहे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले (म) :** इतर माहिती न देता पाच लक्ष रुपये अकृषी कर मनपाने भरुन मनपास त्या जागेपासुन उत्पनन किती मिळाले. उत्पन्न नाही. कर

कसा भरला याचा खुलासा द्यावा. पी. आर. कार्ड असे बनविले. त्यास जबाबदार कोण

**उपआयुक्त (म.) :** एन. ए. जो असतो तो संबंधित मालकास भरावा लागतो. त्या जागेवर मनपाचा मालकी हक्क आहे. म्हणुन आपण कर भरलेला आहे. परस्पर संबंधिताकडुन एन. ए. वसुली करावा असे आपण कळविले तर मनपाची इ ाोनरशीप जाऊ शकते. मालकी हक्क जाऊ शकतो. आपण भरलेला एन. ए. आपण त्यांचेकडुन वसुल करु शकतो. जागा तात्यात घेण्यासंदर्भत अपील केलेले आहे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** आता त्यांना नोटीस दिल्या. कोणीतरी न्यायालयात जाईल. स्थगिती आदेश आणतील व येणारे उत्पन्न येणार नाही. यासाठी तातडीचा ठोस असा निर्णय घेण्यात यावा.

**मालमत्ता अधिकारी :** नोटीस दिली आहे. स्थगिती आदेश प्राप्त नाही. कॅव्हेट दाखल केला आहे.

**श्री. मीर हिदायत अली :** एकाच व्यक्तीच्या नांवे कटकटगेट येथील मनपाची जमीन ३-४ व्यक्तींना दिले. बांधकाम परवानगी आहे. पी. आर. कार्ड आहे. महानगरपालिकेची जमीन चार लोकांच्या नांवे आहे.

**मा. सभापती** : कटकट गेट येथील जागा कुणाच्या नांवावर आहे. त्याची चौकशी करुन याबाबत सविस्तर माहिती सन्माननीय सदस्य मीर हिदायत अली यांना देण्यात यावी.

**श्री शे इलियास किरमाणी :** मालमत्ता अधिकारी प्रशासकीय अधिकारी सुध्दा आहेत. दोन्ही पदाचा चार्ज असलेले श्री. जरारे हे नेहमी कार्यालयात नसतात. त्यांचेकडुन चार्ज काढुन घ्यावा व प्रशासकीय अधिकारी ही दोन पदे तांत्रिक संवर्गातुन भरण्यात यावे.

**श्री. नंदकुमार फुलारी :** तांत्रिक कर्मचाऱ्यांमधुन प्रशासकीय अधिकारी पद भरावे. सध्या चार्ज दिलेले श्री. जरारे यांना तया विभागाची काहीही माहिती नाही. या अगोदर टेक्नीकल अधिकारी या पदावर होते. श्री. खखडकर यांची नेमणुक करण्यत आली होती. त्यांची बदली का करण्यात यावी.

**श्री. जगदीश सिध्द :** प्रशासकीय अधिकारीपदावर उपआयुक्त संवर्गातील बाहेरील अधिकाऱ्याची नेमणुक करावी. बाहेरील अधिकाऱ्यांचा येथील कर्मचाऱ्यांवर दबदबा असतो. इथले अधिकारी यांचा दबाव नसतो. काम सुध्दा व्यवस्थित करत नाही. आपल्याकडील अधिकारी यांचे लोकप्रतिनिधींशी जास्त संबंध झाले. येथील अधिकारी लिडर जास्त व अधिकारी कमी सेवा निवृत्तीनंतर हेच नगरसेवक म्हणुन निवडुन येणार.

**श्री. मधुकर सावंत :** सन्माननीय सदस्य श्री. सिध्द यांनी मांडलेल्या बाबीस माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती** : शहराचा व्याप लक्षात घेता प्रशासकीय अधिकारी दोन असतात, अशी सुचना स. सदस्यांनी केलेली आहे. सिडकोचे लवकरच मनपाकडे हस्तांतरण होणार आहे. म्हणुन प्रशासनास सुचना करतो की, प्रशासकीय अधिकारी म्हणुन दोन पदे असावीत. अशी कार्यवाही करण्यात यावी. तांत्रिक कर्मचाऱ्यामधुन पदे भरण्याची कार्यवाही व्हावी.

**श्री. शे. इलियास किरमाणी :** ज्यांना या पदावर प्रमोशन दिले होते व जेथे नेमले होते. त्यांना पुन्हा तेथे आणावे.

**श्री. नंदकुमार फुलारी :** शहरात अतिक्रमणांची पाहणी केली असता मा. सभापती यांचेच वार्डात तीन मजली इमारत विना परवानगीने होत आहे. मनपाची परवानगी घेतलेली नाही. सध्या खालच्या मजल्यात मारुती व्हॅन सर्व्हिसेस म्हणुन दुकन सुरु झालेले आहे.

**मा. सभापती** : मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** सुराणानगर येथे ही इमारत होत आहे. दोन महिन्यापुर्वीच स्लॅब पडलेला असून, संबंधितास दोन महिन्यापुर्वी मु. प्रां. म. न. पा अधिनियम १९४९ चे कलम ४७८ अन्वये नोटीस सामील केली आहे.

**मा. सभापती** : संबंधित व्यक्तीने विना परवानगीने इमारत बांधलेली आहे. त्यास नोटीस दिली. या संबंधात आवश्यक ती कार्यवाही पुर्ण करुन सदरील बांधकाम पाडण्यात यावे.

**श्री. साहेबराव कावडे :** ज्यांनी बांधकाम केले त्यांनी, अधिकाऱ्यांना हाताशी धरुनच केले असावे. पाडण्याची गरज पडणार नाही. सभागृहात नुसती चर्चा होते. कार्यवाही करु असे अधिकारी फक्त सभागृहात सांगतात. परंतु प्रत्यक्षात काहीही कार्यवाही करीत नाही.

**श्री. जयवंत ओक :** जी इमारत झाली ती दोन दिवसात झाली नाही. अधिकाऱ्यांना हाताशी धरुनच काम केलेले असावे परंतु या शहरात ११४ अनाधिकृत वसाहती आहेत व अनाधिकृत २० हजार घरे आहेत. ती घरे ४०,५०,८० फुटांच्या रस्त्यामध्ये येतात. मग तीही घरे आपण पाडणार आहात काय? त्या भागाचे इमारत निरीक्षक कोण? प्रशासकीय अधिकारी कोणते ही जबाबदारी सर्वांचीच आहे. केवळ प्रशासकीय अधिकारी यांनाच जबाबदार धरता येणार नाही. अतिक्रमण होणारी जागा दुसऱ्या एखाद्या जमिनीत/जागवे येत असेल, रोड बायंडींग मध्ये येत असेल तर, असे अतिक्रमण ताबडतोब काढयात आले पाहिजे, अशी आमची मागणी आहे. या शहराअंतर्गत मोकळया जागा २० वर्षात अद्याप मनपाने लोकांच्या जागा खरेदी का ताब्यात घेतल्या नाही. म्हणुन लोक २० x ३० चे प्लॉट पाडुन सरसकट विक्री करत आहे. यात कोण दोषी म्हणावे.

**श्री. नंदकुमार फुलारी :** शहानुरवाडी येथील मनपाच्या जागेवर तीन इमारतींचे बांधकाम झाले. २० हजार स्क्वेअर फुट जागा शाळेसाठी ठेवलेली होती तीन लोकांनी घरे बांधली. आपल्याकडे ताळमेळ नाही.

**मा. सभापती** : शहानुरवाडी येथील मनपाच्या जागेवर कुणी अतिक्रमण, करुन बांधकाम केले असेल, त्यांचेवर कार्यवाही करुन अतिक्रमण झालेले बांधकाम पाडण्यासंदर्भात नियमाने त्वरीत कार्यवाही करण्यात यावी.

**मालमत्ता अधिकारी :** निश्चीत कोणत्या जागेवर अतिक्रमण केले याबाबत माहिती घेऊन पुढील बैठकीत सविस्तर खुलासा करण्यात येईल.

**मा. सभापती** : शहानुरवाडी येथील शाळेसाठी ठेवण्यात आलेल्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे. पुढील बैठकीत संबंधित अधिकारी यांनी सविस्तर माहिती सादर करावी.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** स्पील ओव्हरची कामे करावी, लागणार आहे, तसेच २००१ या चालु वर्षाची काही विकास कामेही प्रस्तावित आहेत. सन २००१-२००२ या वर्षासाठी उत्पन्न १२५ कोटीचे निश्चित केले. प्रत्यक्षात ८० ते ९० कोटीचे येणार आहे. याचा विचार होता. विकास कामासाठी फक्त १० ते १५ कोटीच

रक्कम शिल्लक राहते. असे चित्र समोर आहे. यासाठी सर्व अधिकारी यांच्या समवेत एक विशेष बैठक बोलवावी. वसुली संदर्भात चर्चा करुन सर्व वार्डातील विकास कामे कशी करणार याची विचारणा करण्यात यावी ७५ लक्ष रुपयांपर्यंतचे मोठे मोठे इस्टीमेंट तयार केलेले आहे, तसे न करता कमीत कमी रक्कमेचे इस्टीमेट तयार करुन सर्वच वार्डात विकास कामे होतील याची काळजी घेण्यात यावी.

**श्री जयवंत ओक :** प्रभाग समिती स्थापन केल्या, सभापती यांना गाडया दिल्या परंतु विकास कामांसाठी काही अधिकार दिले नसुन, संपुर्ण वर्ष विकास कामे न होताच जाणार अशी शंका आहे. प्रभाग समिती कशा पध्दतीने कामे करणार कोणती कामे होणार याची थोडक्यात माहिती द्यावयास पाहिजे.

**मा. सभापती** : मालमत्ता तसेच जकात कर वसुलीच्या संदर्भात आकडेवारी देण्यात यावी म्हणुन उपआयुक्त यांना पत्र दिलेले होते. त्यानुसार त्यांनी सर्व सदस्यांना माहिती दिलेली असून, त्याची प्रत आपण सर्वांकडे दिलेली आहे. आताच सविस्तर चर्चा केल्यास निश्चित उत्पन्न किती होऊ शकेल हे आपल्या लगेचच लक्षात येईल आपण चार प्रभाग समिती स्थापन केलेल्या आहे. जसे उत्पन्न येईल तसे आपल्या प्रभाग समिती मार्फत विकास कामे केली जातील. उपआयुक्त (म.) यांनी वसुली संदर्भात २००१-२००२ चा जो अहवाल दिला त्यात आकडेवारीचा विचार करता मालमत्ता कराची वसुली २३५ लक्षची व्हावयास पाहिजे ती फक्त ६३ लक्ष झालेली आहे. वसुली वाढविण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावे. तसेच स. सदस्य श्री. तुळशीबागवाले यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे वसुलीची परिस्थिती पाहता मोठमोठया रक्कमेचे इस्टीमेट तयार नकरता सर्वच वार्डात विकास कामाबाबतचे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे.

**श्री. साहेबराव कावडे :** वसुली संदर्भात २ ते ४ दिवसानंतर बैठक बोलवावी. त्या बैठकीत फक्त वसुलीवर चर्चा करण्यात यावी. सर्व अधिकाऱ्यांना ताकीद देऊन वसुली जास्तीत जास्त कशी होईल. यासंबंधी सुचना कराव्यात. मा. आयुक्तांनी यात जातीने लक्ष द्यावे. एकाच अधिकाऱ्याकडे दोन तीन चार्ज दिलेले आहे. त्यामुळे कामे होत नाहीत. एका अधिकाऱ्यांकडे एकच चार्ज देण्यात यावा.

**मा. सभापती** : वसुलीच्या संदर्भात उपआयुक्त यांनी जी माहितीची प्रत दिलेली आहे त्यावर सर्वांनी अभ्यास करावा. येत्या ६ दिवसांच्या आंत एक विशेष बैठक घेऊन वसुली बाबत चर्चा करुन वसुली जास्तीत जास्त कशी वाढेल याबाबत योग्य त्या सुचना अधिकाऱ्यांना देण्यात येतील.

**डॉ. आशा बिनवडे :** शहरामध्ये दिवसेंदिवस अनाधिकृत बांधकामे जास्त होत आहे. यात आपले कर्मचारी यांचा सुध्दा हात आहे. असे दिसते. अतिक्रमण झालेल्यावर तात्काळ कार्यवाही करण्यासाी दोन प्रशासकीय अधिकाऱ्यांची गरज आहे. अशी आताच चर्चा झाली. त्याचबरोबर इमारत निरीक्षक सुध्दा वाढविण्याची आवश्यकता आहे. शेकडो बांधकामे अनाधिकृत आहेत. अधिकाऱ्यांना त्याकडे लक्ष देण्यास वेळ नसतो. काही वेळा जाणुन बुजून दुर्लक्ष केले जाते. महानगरपालिकेचे जे वकीलांचे पॅनल आहे. ते न्यायलयीन प्रकरण योग्य त्या पध्दतीने हाताळत नाही. पॅनल बदलण्यात येऊन शहराचा व्याप लक्षात घेता वकीलांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. जे पॅनल सध्या आहेत.

त्यांचेकडुन महानगरपालिकेच्या बाजुने निकाल लागत नसून बऱ्याच केसेसचा निकाल मनपाच्या विरुध्द लागतो असे चित्र आहे.

**मा. सभापती** : शहरातील अनाधिकृतपणे होणारी बांधकामे या अधिकारी/कर्मचारी जबाबदार असतात. अशी शंका स. सदस्यांनी व्यक्त केली. याच अनुषंगाने काही प्रकरणात वादविवाद निर्माण होतात. प्रकरणे न्यायप्रविष्ट होतात. त्यासाठी महानगरपालिकेला आणखी पॅनलवर वकीलांची आवश्यकता आहे असे वाटते. सध्या कार्यरत असलेले वकीलांचे पॅनल यातील ज्यांनी चांगल्या प्रकारे काम हाताळले नाही ते बदलुन नवीन पॅनल घेण्याबाबत कार्यवाही व्हावी.

**श्री. जयवंत ओक :** एकाच अधिकाऱ्याकडे दोन चार्ज ठेवणे योग्य नाही. न्यायालयीन प्रकरण बाजुला ठेवुन पुढील योग्य ती कार्यवाही मा. आयुक्तांनी करावी.

**मा. सभापती** : मा. आयुक्तांना सुचना करु इच्छितो की, ज्या अधिकाऱ्यांकडे दोन किंवा तीन चार्ज असतील ते काढुन जे अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती मिळणार असेल त्यांचेकडे चार्ज देण्यात यावा. एकाच अधिकाऱ्यांकडे एकच पदाचा चार्ज दिल्यास सर्व विभागाची कामे वेळेवर होतील असे सभागृहाचे मत आहे. मा. आयुतांनी यासंबंधी ताबडतोब कार्यवाही करावी.

**श्री. नंदकुमार फुलारी :** महानगरपालिकेचे स्वतंत्र न्यायालय स्थापन करणार होते. कार्यवाही कुठपर्यंत आलेली आहे. खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** महानगरपालिकेची प्रकरणे चालविण्यासाठी स्वतंत्र न्यायलय स्थापन करण्याच्या प्रस्तावास मा. उच्च न्यायालयाने मान्यता दिलेली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या आलेल्या ज्या सुचना होत्या त्यानुसार टाऊन हॉल ही इमारत त्यांचेकडे हस्तांतर करण्याची आपण अनुमती दिलेली आहे. आपल्याकडुन कोणतीही कार्यवाही थांबवुन नाही. जिल्हा सत्र न्यायधीश यांनी या इमारतीची पाहणी केली. डायस वगैरे कसे असावे याबाबत सुचना केल्या. यानंतर वकील संघाचे लोक त्यांना जाऊन भेटले. ही इमारत जिल्हा न्यायालयाची संलग्न राहील. फक्त या इमारतीमध्ये महानगरपालिकेचीच प्रकरणे चालतील असे सांगितले. इमारतीस मनपाच्याच बोर्ड राहील. लवकर न्यायालय चालु करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

**श्री. जगदीश सिध्द :** उपआयुक्त (प्र.) यांचेकडुन जकात वसुली संदर्भात एका पत्रानुसार माहिती प्राप्त झाली. त्यात २००१-२००२ चे उद्दीष्टाबाबत माहिती दिली. एप्रील २००१ मध्ये ३.३१ कोटी, मे मध्ये ४.०१ कोटी, जुन मध्ये ३.७८ कोटी असे दिले. शहरामध्ये सर्व बिल्डरांची एकुण १२ हजार बांधकामे चालु आहेत. किमान ३ रुम, किचन, बाथरुम चे एक बांधकाम धरता १२ हजार कामे चालु आहेत. त्यासाठी लागणारे लोखंड ३७ कोटी ३८ लाखाचे आले, सिमेंट ६० कोटींचे आले. यावर नियमाप्रमणे ३% जकात धरल्यास लोखंडावर १ कोटी ११ लक्ष तर सिमेंटवर १ कोटी ८० लक्ष जकात येऊ शकते ही एक महिन्याची आवक आहे. याची बेरीज केली असता २ कोटी ९१ लक्ष रुपये होतात. बांधकामासाठी लागणारे वाळु, खडी, टाईल्स, फरशी हे साहित्य धरण्यास जवळपास एका महिन्यामध्ये ५ कोटीच्या वर जकात वसुली व्हावयास पाहिजे होती. लहान मोठया सर्व बिल्डरांची चालु असलेल्या बांधकामाची यादी तयार केल्यास २० ते २५ हजार बांधकामे शहरामध्ये चालु असतील. या बांधकामावर आकारण्यात येणारी जकात व इतर जकात

वसुली यांची एकुण रक्कम ही दर महिन्याला किमान १० कोटी रुपये वसुल व्हावयास पाहिजे होते परंतु तसे झालेले दिसुन येत नाही. उपआयुक्त यांनी सर्व चुकीची माहिती दिलेली आहे. वसुली करण्यास सक्षम नाही (बिल्डरांच्या नावाची यादी सभागृहात वाचुन दाखवितात.) माझ्याकडे असलेल्या बिल्डरांची यादी ही खरी असून, तपासली करु शकता.

**मा. सभापती** : जकात वसुली तसेच मालमत्ता वसुली संदर्भात जी आकडेवारी आपल्याकडे सादर झालेली आहे ती फारच कमी असून, वसुली संदर्भात चर्चा करण्यासाठी आठ दिवसांच्या आंत एक विशेष बैठक बोलाविण्यात येईल.

**श्री. जयवंत ओक :** पाणीपट्टी जकात व इतर कराची वसुली कण्यासाठी बैठक बोलवावी. सविस्तर चर्चा करावी. झोनवाईज अद्यापपर्यंत आपण विभागीय अधिकारी म्हणुन नियुक्त्या केलेल्या नाही. त्या करण्यात याव्यात जेणे करुन वसुलीत वाढ होऊ शकेल.

**श्री. इलियास किरमाणी :** वृत्तपत्रात कचऱ्याबाबत वेगवेगळया प्रकरच्या बातम्या छापुर येत आहेत. वार्डात प्रत्येक गड्डयामध्ये कचऱ्याची गाडी येत नाही. सध्या कचऱ्याच्या गाडया किती आहेत. प्रत्येक वर्षा कचऱ्याच्या किती गाडया नवीन घेतल्या जातात. जुन्या गाडया कुठे गेल्या याची सुध्दा माहिती देण्यात यावी. तसेच कर्मचाऱ्यांना ओळखपत्र दिलेले नाही. काही कर्मचाऱ्यांना दिले. ओळखपत्रावर एकुण खर्च किती झालेला आहे. याची सुध्दा माहिती देण्यात यावी. वर्ग-४ च्या ज्या कर्मचाऱ्यांना गणवेश दिलेले आहे. त्यांनी कामे करतांना गणवेशमध्ये असावे. सफाई मजुर कर्मचारी हॉटेलच इतर ठिकाणी बसलेले असतात. गणवेशामध्ये येत नसल्याने ते कर्मचारी किंवा बाहेरील व्यक्ती आहे हे समजुन येत नाही. त्यामुळे सफाई कामगारांनी गणवेशामध्ये कामावर येण्याची सक्ती करण्यात यावी. तसेच कचऱ्यासाठी लागणाऱ्या गाडयांची संख्या वाढवावी. जेणे करुन वार्डातील जनता कचऱ्याच्या व इतर तक्रारी आमच्याकडे घेऊन येणार नाही.

**मा. सभापती** : आपल्याकडे प्रभाग समित्यांची स्थापना झालेली आहे. हा विषय प्रभाग समिती अंतर्गत येतो प्रभाग समितीमध्ये या विषयावर चर्चा झालेली आहे. कचऱ्यासाठी असलेल्या गाडया, फवारणी मशीन नादुरुस्त असलेले ताबडतोब दुरुस्त करुन घेण्याची कार्यवाही व्हावी. किती गाडया खरेदी केल्या जातात, जुन्या गाडया किती, कचरा कुंडया किती, किती कुंडयाची आणखी आवश्यकता आहे. याची संपुर्ण चौकशी करुन संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्यांना ओळखपत्र देण्याची कार्यवाही व्हावी. ज्यांना दिले नाही ते केव्हा देणार खुलासा करावा. तसेच नगरसेवकांचे ओळखपत्र अद्याप दिलेले नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** अधिकारी कर्मचारी यांना ओळखपत्र वाटप करण्यात आलेले आहे. ओळखपत्र लावत नसतील तर तसे कार्यालयीन परिपत्रक काढुन सुचना देता येतील.

**मा. सभापती** : जे कर्मचारी ओळखपत्र लावत नसतील त्यांना सक्त ताकीद करण्याबाबत ओक अधिकारी यांना पत्र द्यावे व कार्यवाही करावी असे कळवावे. तसेच ज्या कर्मचाऱ्यांना गणवेश दिले जाते त्यांनी गणवेशामध्येच येण्याची ताकीद

द्यावी. नसता अशा कर्मचाऱ्यांना दंडात्मक कार्यवाही करावी. तसेच विभागीय अधिकाऱ्यांच्या मा. आयुक्तांनी तात्काळ नियुक्त्या काढाव्यात.

**श्री. भरत लकडे :** सध्या आपल्याकडे किती हातगाडयात आहेत. असतील तर वार्डात का दिल्या जात नाही.

**श्री. इलियास किरमाणी :** कनिष्ठ अभियंता यांना अद्याप ओळखपत्र देण्यात आलेले नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** सर्व कर्मचारी/अधिकारी यांना ओळखपत्र देण्यात आलेले आहे. ज्यांना मिळाले नसतील त्यांनी उपआयुक्त (म.) यांचे विभागातुन घेऊन जावे.

**श्री. साहेबराव कावडे :** माझ्या वार्डामध्ये कचरा वाहुन नेण्यासाठी हातगाडया नाहीत.

**मुख्यलेखाधिकारी :** कचऱ्यांच्या हातगाडया आपण प्रत्येक वर्षी खरेदी करत नाही. जुन्या गाडया दुरुस्तीस दिलेल्या आहेत. १५० गाडयांची निविदा आपण काढलेली आहे. गाडया घेण्यासाठी वर्क ऑर्डर दिलेल्या आहे. १५ दिवसात गाडया येतील.

**विषय क्र. १२/१ :**

दिनांक ३१-०३-२००१, दिनांक ०५-०५-२००१ व दिनांक ०४-०६-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. जगदीश सिध्द :** दिनांक ०४-०६-२००१ च्या इतिवृत्तातील पान क्र. ११ वर मा. सभापती यांनी रुलींग दिलेले आहे की, परवानगी दिलेल्या ४४ टपऱ्या व्यतिरिक्त ज्या टपऱ्या असतील त्या काढण्याची कार्यवाही करण्यात यावी. ज्यांनी परवानगीच्या व्यतिरिक्त जास्तीच्या जागेवर साईज वाढवुन टपरी (दुकान) मोठी केली असेल त्यांचेवर सुध्दा कार्यवाही करण्यात यावी असे दिले आहे. यावर संबंधित अधिकारी यांनी काय कार्यवाही केली. खुलासा द्यावा.

**मालमत्ता अधिकारी :** शहागंज येथे ज्यांच्या अनाधिकृत टपऱ्या तसेच जास्तीच्या जागेवर अतिक्रमण केलेले होते ते काढण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**श्री. जगदीश सिध्द :** संबंधित अधिकारी सभागृहाची दिशाभुल करत आहेत. चुकीची माहिती देत आहेत. टपऱ्या उचलुन आणल्या पुन्हा त्या जागेवर टपऱ्या आलेल्या आहेत.

**मालमत्ता अधिकारी :** परवानगी व्यतिरिक्त ज्या टपरी धारकांनी टपरीच्या समोर जे अतिक्रमण केलेले होते ते काढुन घेण्यात आलेले आहे.

**श्री. जगदीश सिध्द :** लोकांनी टपऱ्या वाढविलेल्या आहेत. दिलेल्या जागेव्यतिरिक्त समोरील जागेवर अतिक्रमण केलेले आहे. टपरीचा काही भाग सुध्दा अनाधिकृत जागेवरच येतो. म्हणुन समोरील झालेले अतिक्रमण काढुन चालणार नाही तर, नियमाप्रमणे परवानगी किती, अतिक्रमण किती झाले. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**मा. सभापती :** ४४ टपऱ्यांच्या व्यतिरिक्त ज्या टपऱ्या झालेल्या आहेत. त्या काढण्यात याव्यात तसेच अनाधिकृतपणे जास्तीच्या जागेवर अतिक्रमण केले काढण्यात यावे. असे स. सदस्य यांचे म्हणणे होते. सध्या टपऱ्या त्याच जागेवर आहेत. काढण्यात आलेल्या नाही असे स. सदस्यांचे म्हणणे आहे. कुणाच्या टपऱ्या काढाव्या, अनाधिकृत किती, जास्तीच्या जागेवर अतिक्रमण केलेले कुणाचे काढण्यात आले. या संदर्भात माहिती देण्यात यावी.

**श्री. जयवंत ओक :** इतिवृत्तातील पान क्र. ८ वर श्री. रगडे यांना १५ दिवसाच्या आत योग्य ती चौकशी करुन कामावर घेण्यात येईल असे आश्वासन दिले होते. सदर कर्मचारी हे थोडया दिवसांनी सेवानिवृत्त होणार आहे.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी याबाबतचा खुलासा करावा.

**सहाय्यक आयुत-१ :** संबंधित संचिका मा. आयुक्तांकडे सादर करण्यात आलेली होती. महानगरपालिकेच्या रक्कमेचा अपहार केल्याबद्दल मा. आयुक्तांनी कार्यवाही करण्याचे आदेश सदर संचिकेमध्ये केलेले आहेतच संबंधित कर्मचाऱ्यावर पोलीस गुन्हा दाखल करण्यात यावा. असे दिले आहे.

**श्री. जयवंत ओक :** पान क्र. ९ वर मा. आयुक्त यांनी रुलींग दिलेले आहे. त्यांनी ३० वर्ष सेवा केली. पेन्शनला भविष्यात त्रास होईल. त्यांचेबद्दल आपण व्यक्त केलेल्या भावनेचा विचार करुन १५ दिवसांच्या आंत योग्य तो निर्णय घेतला जाईल असे दिले. यानंतर प्रशासनाच्यावतीने काय कार्यवाही करण्यात आली, खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** तत्कालीन आयुक्तांनी बैठकीपुर्वी ऑर्डर केलेली आहे. महानगरपालिकेच्या रक्कमेचा अपहार केल्याबद्दल फौजदारी गुन्हा दाखल केला नसल्याने तो दाखल करावा यासंबंधीची संचिका सादर झालेली आहे. रक्कम तात्काळ भरुन आरोप सिध्द झाल्यास बडतर्फीचा प्रस्ताव ठेवावा. मालमत्ता अधिकारी यांना देखील गौण शिक्षा झाली. सदर संचिका चर्चा करावी म्हणुन परत झाली. अंतीम निर्णय झाला असल्याने त्याचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार स्थायी समितीचा आहे.

**मा. सभापती** : सभागृहात चर्चा झाल्यानंतर संचिका मा. आयुक्तांकडे गेलेली होती. सदर कर्मचाऱ्यांस बडतर्फे करण्यात यावे. असे आयुक्तांनी लिहीले. आता पुन्हा संचिका नवीन आयुक्तांकडे पाठवुन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. जयवंत ओक, श्री. दलबीरसिंग जबिंदा :** संबंधिताने गुन्हा केला म्हणुन कबुली दिलेली आहे. रक्कम भरलेली आहे. तसेच मा. आयुक्तांनी सुध्दा योग्य ती कार्यवाही करुन कामावर घेण्यात येईल असा उल्लेख केला होता.

**मुख्यलेखा परिक्षक :** संबंधित श्री. रगडे यांनी अपहारीत सर्व रक्कम मनपाकडे भरलेली नाही. पुर्ण ऑडीटनंतर आणखी १३ पावत्या मिळाल्या आहेत.

**श्री. मधुकर सावंत :** प्रत्येक वेळेस वेगवेगळया रक्कमेच्या पावत्या संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या. ४ हजार, ५ हजार, ४ हजार अशी रक्कम भरणा करावी म्हणुन कळविले. नंतर १३ पावत्या मिळाल्या. आता सांगण्यात येते की, किमान ९१ हजार रुपये बाकी आहे. हे बरोबर नाही.

**मुख्य लेखा परिक्षक :** रिपोर्ट केल्यानंतर १३ पावत्या मिळालेल्या नव्हत्या. ज्या ज्या रक्कमेच्या पावत्या मिळाल्या नाही. त्या त्या पध्दतीने पत्र देऊन मागणी केलेली होती. एकुण २३ पावत्या पैकी १० पावत्या दिल्या आहेत. या संदर्भात मा. आयुक्तांनी सदर कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सदर कर्मचाऱ्यांनी पावत्या सादर कराव्यात. पुढील योग्य ती कार्यवाही करता येईल.

**श्री. जगदीश सिध्द :** पान क्रमांक १२ दर मागील बैठकीत चर्चा झाली. एका अधिकाऱ्यांना निलंबित केले व त्याच प्रकरणातील उपआयुक्त (प्र.) यांना नोटीस देऊन पुढील चौकशी होण्यासाठी काय कार्यवाही केली. सदर संचिकेची मागणी केली असता मा. आयुक्त यांनी उपआयुक्त(प्र.) यांची चौकशी करण्यासाठी

एक चौकशी अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात येईल असे सांगितले होते. चौकशी अधिकारी म्हणुन कोणाची नेमणुक करण्यात आलेली आहे, खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** या प्रकरणा संदर्भात मागील बैठकीत चर्चा झालेली होती. सहाय्यक आयुक्त-१ यांना निलंबीत केले. त्याप्रमाणे त्याच प्रकरणात उपआयुक्त (प्र.) यांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे यात दोन कनिष्ठ लिपीक यांचा सुध्दा समावेश असून, नोटीसचे उत्तर प्राप्त झालेले आहे. मध्यंतरी प्रभारी आयुक्त यांनी निलंबनाची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. गौण शिक्षा करावी असे दिले होते. त्यानंतर पुन्हा सभेत चर्चा झाली. आता नवीन आयुक्त येतील. चौकशी अहवाल सहीत संचिका त्यांचेकडे पाठविण्यात येईल. चौकशी अधिकारी म्हणुन मी स्वत: होतो.

**श्री. जगदीश सिध्द :** किती दिवसात कार्यवाही होणार, निश्चित माहिती द्यावी.

**मा. सभापती** : नवीन आयुक्तांसमोर संचिका सादर करण्यात येईल. मा. आयुक्त जी सॅक्शन घेतील त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**डॉ. आशा बिनवडे :** इतिवृत्तातील पान क्र. ७ वर सदस्य श्री. जबिंदा यांनी काका पाथ्रीकर या ठेकेदाराने वार्डातील कामे सुरु केलेली नाही अशी सुचना केलेली होती. त्याचप्रमाणे माझ्याही वार्डामध्ये रस्त्यांची कामे दिलेली असून, अद्याप सुरु केलेली नाही. काम करीत नसेल तर, त्यांचा काळया यादीत समावेश करावा. यापुढे कामे देण्यात येऊ नये.

**अतिरिक्त शहर अभियंता :** सन्माननीय सदस्य श्री. जबिंदा यांचे वार्डातील कामास संबंधित ठेकेदाराने सुरुवात केलेली आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** ३० जुन पर्यंत कामाची मुदत दिलेली होती. अद्याप कामास सुरुवात केलेली नाही.

**अतिरिक्त शहर अभियंता :** स. सदस्य श्री. जबिंदा यांचे वार्डातील काम संपल्यानंतर स. सदस्या डॉ. श्रीमती बिनवडे यांचे वार्डातील कामे सुरु करण्यात येतील.

**मा. सभापती** : कोणत्याही ठेकेदाराने वेळेवर कामे केली नाही तर मा. आयुक्तांनी नियमानुसार कार्यवाही करावी. अशा ठेकेदाराची २५% रक्कम एक वर्षासाठी डिपॉझिट ठेवण्यात यावी. काळया यादीत समावेश करणार म्हणुन नोटीस दिलेली आहे काय, खुलासा द्यावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** अंतीम नोटीस आपण दिलेली होती. संबंधित ठेकेदाराने आता काम सुरु केलेले आहे.

**मा. सभापती** : इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक ३१-०३-२००१ दिनांक ०५-०५-२००१ व दिनांक ०४-०६-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३/२ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, न्यु समर्थनगर येथे नाल्यास संरक्षित भिंत बांधणे बाबत सा. बा. विभागाच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रकी रक्कम रु. ११,१२,३००/- ला स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविल्या असता एकुण ३१ (एकतीस)

कोऱ्या निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारण्याच्या अंतीम तारखेला एकुण ०५ (पाच) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. डी. अजितसिंग | २२% कमी दराने |
| २. | श्री. जी. जी. जोशी | १९.७८६% कमी |
| ३. | मे. एस. कन्स्ट्रक्शन | १८.९९% कमी |
| ४. | मे. बसरा कन्स्ट्रक्शन | १६.८६% कमी |
| ५. | श्री. कुलवंतसिंग | १५.३९% कमी |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री. डी. अजितसिंग याची असून, अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी दराची आहे. करीता, निविदा स्विकृतीसह प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. जगदीश सिध्द :** २२% कमी दराने काम करणार ते व्यवस्थित होईल काय याचा खुलासा करावा.

**श्री. भरत लकडे :** सुरगोणीवार यांचे वार्डामध्ये संबंधित ठेकेदाराने काम केलेले होते. ५% रक्कम डिपॉझिट ठेवलेली होती काय खुलासा करावा.

**मुख्य लेखा अधिकारी :** कार्यादेश देतांना नियमाप्रमाणे जी रक्कम डिपॉझिट ठेवायची असते ती घेण्यात येते.

**डॉ. आशा बिनवडे :** प्रस्तावानुसार संबंधित ठेकेदार श्री. डी. अजितसिंग यांनी माझ्या वार्डात सारंग गृहनिर्माण सोसायटीमध्ये काम घेतले आहे. वेळेवर काम करत नाही.

**मा. सभापती** : प्रस्तावानुसार श्री. डी. अजितसिंग यांना काम देण्यात आले. संबंधित ठेकेदार वेळेवर काम करत नाही. असे स. सदस्य यांनी सुचना केली. संबंधित अधिकारी यांचा खुलासा करावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** घेतलेले काम संबंधित ठेकेदार पुर्ण करुन देणार आहे. प्रस्तावानुसार दिलेले काम चांगले करुन घेतले जाईल. चांगल्या प्रतीचे काम करेल असे आपण लेखी स्वरुपात लिहुन घेतलेले आहे.

**मा. सभापती** : संबंधित ठेकेदाराकडुन उत्कृष्ट दर्जाचे काय करुन घेण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहील. प्रस्तावास मंजुरी देण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, न्यु समर्थनगर येथे नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी दराची श्री. डी. अजितसिंग यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४/३ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांचे तजविजनुसार प्रस्ताव सादर करत आहे की, नाथसुपर मार्केट तळमजला येथील दुकान क्र. श्री. गोविंद भागाजी थोरात यांना दिनांक २४-०४-९३ पासुन भाडेपट्टया देण्यात आलेले असून, त्यांना वार्षीक भाडे रु. २१,१५६/- आहे. त्यांच्या मुलाने अर्ज देऊन विनंती केली आहे की, माझ्या वडीलांच्या आजारपणामुळे

(कॅन्सर) माझे दुकन दिनांक १०-०१-९४ पासुन ३० जुलै ९७ पर्यंत बंद होते. या काळातील भाडे मला माफ करावे. करीता प्रस्ताव स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

**श्री. मधुकर सावंत :** भाडे वसुल करावे. प्रस्ताव येण्यास उशीर का करण्यात आलेला आहे.

**श्री. नंदकुमार फुलारी, श्री. भरत लकडे :** भाडे माफ करण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवता येतो का, कोणत्या आयुक्तांनी यास मंजुरी दिलेली आहे. नियमात बसते काय? खुलासा द्यावा.

**मालमत्ता अधिकारी :** अटी शर्तीनुसार दुकान बंद असले तरी भाडे घेण्यात यावे असे आहे. संबंधिताने अर्ज दिल्यानुसार मा. उपआयुक्त यांनी प्रस्तावित केल्यानुसार संचिका मा. आयुक्तांकडे गेल्यानंतर मा. आयुक्त यांनी दिनांक १०-०५-२००१ रोजी यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्रस्ताव स्थायी समितीसमोर देण्यात आलेला असून, योग्य तो निर्णय सभागृहाने घ्यावा.

**मा. सभापती :** माझ्या माहितीप्रमाणे तत्कालीन आयुक्त श्री. डुघरेकर यांनी यास मान्यता दिलेली आहे. नियमाने भाडे वसुल करावयास पाहिजे. असे वाटते.

**श्री. साहेबराव कावडे :** ज्यावेळेस दुकाने भाडयोन दिले जाते त्यावेळी एक करारपत्र लिहुन घेतले जाते. त्यानुसार नियमाप्रमाणे भाडे वसुल करावयास पाहिजे. अशा बऱ्याच केसेस येतील. सर्वांचे भाडे माफ करणार काय? योग्य तो निर्णय घ्यावा.

**मुख्य लेखा परिक्षक :** नियमानुसार भाडे माफ करता येत नाही. प्रस्तावाच चुकीच्या पध्दतीने सादर केलेला आहे.

**मा. सभापती :** संबंधित भाडेकरुन व महापालिका यांचा जो करार झालेला आहे. त्यानुसार कार्यवाही करावी. नियमात बसत नसेल तर, प्रस्ताव नामंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव नामंजुर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १५/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या मालकीची जुनी वाहने व यंत्रसामुग्री इत्यादींचा जाहीर लिलाव दिनांक १०-०५-२००१ रोजी यांत्रिकी कार्येशाळा, बायजीपुरा येथे दुसऱ्यांदा बोली पध्दतीने करण्यात आला. जाहीर लिलाव करण्याबाबतची नोटीस विविध वर्तमानपत्रात देण्यात आली होती. जाहीर लिलाव खालील समिती सदस्यांसमोर करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. जगदीश सिध्द | स्थायी समिती सदस्य |
| २. | मुख्य लेखा परिक्षक | महानगरपालिका, औरंगाबाद |
| ३. | अतिरिक्त शहर अभियंता | महानगरपालिका, औरंगाबाद |
| ४. | मेकनिकल इंजिनिअर | पाटबंधारे विभाग, औरंगाबाद |

| अॅटम क्र. | वर्णन | जास्तीची बोली बोलणाऱ्या | मनपाने काढलेली किंमत | बोलीमध्ये आलेली किंमत | सेल्स टॅक्स | बोलीदाराने भरावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | एम एक्स व्ही १७९ (ॲम्बेसेडर कार) मॉडेल-१९७९ | श्री. शकील खान बद्रोद्दीनखान | १५,००० | ७,००० | ७०० | ७७०० |
| २. | एमव्हीजी/८८९० (ॲम्बेसेडर कार) मॉडेल - १९८८ | श्री. नजीमोद्दीन इमानदार | १५,००० | ७,००० | ७०० | ७७०० |
| ३. | एमव्हीजी/८८९० (ॲम्बेसेडर कार) मॉडेल - १९८८ | श्री. जमील अहमद वलद अन्तरकादरी | १५००० | ५६०० | ५६० | ६१६० |
| ४. | एमएच-२०/८२२२ (ॲम्बेसेडर कार) मॉडेल - १९८९ | श्री. जमील अहमद वलद अन्तरकादरी | १५००० | ५००० | ५०० | ५५०० |
| ५. | एमएच-२०/२०० (ॲम्बेसेडेर कार) मॉडेल-१९९२ | श्री. अनिल बळवंत कुलकर्णी | ३५००० | २७००० | २७०० | २९७०० |
| ६. | एमएच-२०/९९९१ (ॲम्बेसेडेर कार) मॉडेल- १९९२ | शकीलखान | ३०,००० | १३,००० | १३०० | १४३०० |
| ७. | एमएए/१०५ (जीप) मॉडेल-१९८५ | उत्तमराव जिजा उकीरडे | ३५००० | ३९५०० | ३९५० | ४३४५० |
| ८. | एमएच-२०/३८६८ (मीनीबस) मॉडेल-१९८३ | अशोक पचलौर | ३५००० | ४५००० | ४५०० | ४९५०० |
| ९. | एमडब्ल्युपी/१५०७ मेटाडोर मॉडेल-१९८३ | विक्रम गायकवाड | ३६,००० | १३,००० | १३०० | १४३०० |
| १०. | एमएक्सीव्ही/५२६६ ट्रॅक्टर मॉडेल-१९२२ | संदीप सुधाकर कुऱ्हाडे | २०,००० | ३५,५०० | ३,५५० | ३९,०५० |
| ११. | एमटीबी/४१४८ फारे व्हील ट्रॉली | अशोक पचलौरे | १२००० | ८२०० | १०६६ | ९२८६ |
| १२. | एमडब्ल्युपी/५८५ ट्रॅक्टर ट्रॉली | उत्तमराव उकीरडे | २२,००० | ३०,००० | ३,९०० | ३३,९०० |
| १३. | जुने भंगार | अब्दुल खान | ८००० (प्रती टन) | ५,७०० | ५७० | ६२७० |

वरील प्रमाणे खालील ॲटमसाठी ऑक्शन कमीटीने ठरविलेल्या किंमतीपेक्षा जास्तीची किंमत आलेली आहे.

| **ॲटम क्र.** | **वर्णन** | **कमीटीने ठरविलेली किंमत** | **बोलीमध्ये जास्तीची आलेली किंमत** | **बोली दराने भरावयाची रक्कम सेल्स (५) टॅक्स सह.** |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ७. | एमएए/१०५ (जीप) | ३५,००० | ३९,५०० | ४३,४५० |
| ८. | एमएच-२०/३८६८ (मीनीबस) | ३५,००० | ४५,००० | ४९,५०० |
| १०. | एमएक्सव्ही/५२६६ (ट्रॅक्टर) | २०,००० | ३५,५०० | ३९,०५० |
| १२. | एमडब्ल्युपी/५८५ (ट्रॅक्टर ट्रॉली) | २२,००० | ३०,००० | ३३,९०० |

तसेच खालील ॲटमसाठी ऑक्शन कमीटीने ठरविलेल्या किंमतीपेक्षा कमी किंमत आली.

| **ॲटम क्र.** | **वर्णन** | **कमीटीने ठरविलेली किंमत** | **बोलीमध्ये जास्तीची आलेली किंमत** |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १. | एमएक्सव्ही/१७९ (ॲम्बेसेडर कार) | १५,५००/- | ७,०००/- |
| २. | एमएक्सव्ही/८८९० (ॲम्बेसेडर कार) | १५,०००/- | ७,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | एमव्हीजी/८९९० (ॲम्बेसेडर कार) | १५,०००/- | ५६००/- |
| ४. | एमएच-२०/८२२२ (ॲम्बेसेडर कार) | १५,०००/- | ५,०००/- |
| ५. | एमएच-२०/२०० (ॲम्बेसेडर कार) | ३५,०००/- | २७,०००/- |
| ६. | एमएच-२०/९९९१ (ॲम्बेसेडर कार) | ३०,०००/- | १३,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | एमडब्ल्युपी/१५०७ (मेटडोर) | २६,०००/- | १३,०००/- |
| ११. | एमटीबी/४१४८ (ट्रॉली) | १२,०००/- | ८,२००/- |
| १३. | जुने भंगार | ८,०००/- | ५,७००/- |

वरील प्रमाणे ॲटम क्र. ७, ८ व १० व १२ करीता ऑक्शन कमीटीने ठरविलेल्या किंमतीपेक्षा जास्तीची बोली असलेली असल्यामुळे संबंधित बोलीदारास विक्री करण्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिली आहे.

तसेच ॲटम क्र. १, २, ३, ४, ५, ६, ९, ११ व १२ करीता ऑक्शन कमीटीने ठरविलेल्या किंमतीपेक्षा कमी बोली आलेली आहे व जाहीर लिलावची ही दुसरी वेळ आहे. त्यामुळे या सर्व ॲटमची ऑक्शन कमीटीतर्फे परत किंमत काढुन फेर जाहीर लिलाव करण्यासाठी मा. आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. तरी स्थायी समितीचा निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

**श्री. मीर हिदायत अली, श्री. मधुकर सावंत :** गाडयांची किंमत पहिल्यापेक्षा कमी झालेली आहे. कमीटीत स. सदस्य श्री. सिध्द यांचा सदस्य म्हणुन समावेश होता. त्यांचे मत घ्यावे.

**श्री. जगदीश सिध्द :** गाडया जुन्या झालेल्या आहेत. पुन्हा लिलाव केल्यास आणखी यापेक्षा कमी किंमत येऊ शकते. म्हणुन आता फेरलिलाव न करता आलेल्या किंमतीत विक्री करावी.

**अतिरिक्त शहर अभियंता :** पुन्हा लिलाव केल्यास आणखी कमी किंमत येईल. आलेल्या किंमतीनुसार विक्रीची कार्यवाही केल्यास योग्य होईल.

**मा. सभापती** : सभागृहाची भावना लक्षात घेता प्रस्तावानुसार पुन्हा गाडयांचा फेरलिलाव न करता प्रसतावात दर्शविल्याप्रमाणे बोलीनुसार जी किंमत आली त्यानुसारच विक्रीची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीची जुनी वाहने व यंत्रसामुग्री इत्यादीच्या करण्यात आलेल्या लिलावात ॲटम क्र. ७, ८, १० व १२ करीता ॲक्शन कमीटीने ठरविलेल्या किंमतीपेक्षा जास्तीची बोली आल्यामुळे सदरील ॲटम बोलीदारास विक्री करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

त्याचप्रमाणे ॲटम क्र. १, २, ३, ४, ५, ६, ९, ११ व १३ करीता ऑक्शन कमीटीने ठरविलेल्या किंमतीपेक्षा कमी बोली आलेली असली तरीही सभागृहात झालेल्या चर्चेनुसार या साहित्याकरीता फेरलिलाव केल्यास कमी किंमत येण्याची शक्यता आहे. त्यामुळे सभागृहात ठरल्याप्रमाणे या ॲटम क्रमांकाच्या वाहन/यंत्रसामुग्री यांचा फेरलिलाव न करता आलेल्या बोलीच्या किंमतीमध्ये संबंधित बोलीदारास विक्री करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६/५ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, ईटखेडा येथे गट नंबर ५२, ५३ मंजुर रेखांकनामध्ये २२५ मी. मी. व्यासाची चिनी पाईप लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रकीय रक्कम रु. १०,३८,०००/- ला स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागविल्या असता विक्रीच्या शेवटच्या तारखेपर्यंत एकुण २१ (एकवीस) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. स्विकारणेच्या अंतीम तारखे पर्यंत एकुण ३ (तीन) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. एन. आर. घोडेले | ४.९९% जास्त दराने |
| २. | मे. विपुल कन्स्ट्रक्शन | ०७% जास्त |
| ३. | मे. न्यु स्टार कन्स्ट्रक्शन | १०% जास्त |

प्राप्त निविदापैकी मे. एन. आर. घोडेले, यांनी चर्चेअंती मा. आयुक्तांच्या मंजुरीनुसार सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दराने करण्याचे मान्य केले आहे. तरी मे. एन. आर. घोडेले यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ईटखेडा येथे गट नंबर ५२, ५३ मंजुर रेखांकनामध्ये २२५ मी. मी. व्यासाची चिनी पाईप लाईन टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. एन. आर. घोडेले यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७/६ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, पीरबाजार जवळ संजयनगर गृहनिर्माण संस्था व प्रतापनगर येथे नाल्यास दगडी संरक्षित भिंत बांधणेबाबत सन १९९९-२००० च्या सा. बा. विभागाच्या दरसुची दराने रक्कम रुपये १९,७१,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तसेच स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविल्या असता एकुण २१ (एकवीस) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतीम तारखेला एकुण ५(पाच) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. डी. अजितसिंग | २५.१% कमी दराने |
| २. | मे. बसरा कन्स्ट्रक्शन | १७.८६% कमी |
| ३. | मे. न्यु. स्टार कन्स्ट्रक्शन | १६.८८% कमी |
| ४. | मे. अतीफ असोसिएटस | १३.८६% कमी |
| ५. | श्री. एस. एम. मंडोरे | १३.८६% कमी |

वरीलप्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री. डी. अजितसिंग यांची असून, अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.०१% कमी दराची आहे. करीता श्री. डी. अजितसिंग यांची अं. प. दरापेक्षा २५.०१% कमी दराची निविदा स्विकृतीसह प्रस्ताव सादर.

**मा. सभापती** : प्रस्तावानुसार काम चांगले करुन घेण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहील. प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पीरबाजार जवळ संजयनगर गृहनिर्माण संस्था व प्रतापनगर येथे नाल्यास दगडी संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २५.०१% कमी दराची श्री. डी. अजितसिंग यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८/७ :**

औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार ५० फुट रुंद रस्ता चेलीपुरा ते रोशनगेट या रस्त्याने बाधीत मिळकती महानगरपालिकेने सन १९८९-९० मध्ये खाजगी वाटाघाटीने संपादन केलेल्या आहेत. त्यावेळी आठ मिळकतधारकांनी मोबदला घेतलेला नाही व त्यांनी बाधीत क्षेत्राचा ताबा दिलेला नाही.

भुसंपादनाची आर्थिक तरतुद लक्षात घेता फक्त कॉर्नर राऊंडींगमध्ये बाधीत असलेल्या मिळकती न. भु. क्र. १००९३ व १००९३/१ ह्या मिळकती बाधीत असून, ती संपादन करणे आवश्यक आहे. बाधीत क्षेत्र अनुक्रमे ७२-२५ व १४४.४३ चौ. मी. आहे. सदर बाधीत क्षेत्र संपादन करणे बाबत प्रकरण प्राईज फिक्सेशन समितीसमोर ठेवले असता वरील मिळकतीसाठी चालु वर्षाचे शिघ्र सिध्द गणकदरानुसार मोबदला देणेबाबत मान्यता दिली आहे.

सबब उक्त मिळकती मुल्यांकन झोन क्र. ०१-१२-०१ मध्ये असून, शिघ्र सिध्द गणक दर रु. ७८००/- प्रती चौ. मी. आहे.

करीता उक्त मिळकती बाधीत क्षेत्र ७२.२५+१४४.४३ (२१६.६०) चौ. मी. X १६,९०,१०४/- (रुपये सोळा लाख नव्वद हजार एकशे चार) निश्चित होतो. तसेच सदर जागा नोंदणीकृत दस्तऐवज करुन घेणेसाठी रु. १,७०,०४०/- खर्च येईल.

सदरील खर्च अर्जदार व महानगरपालिका निम्मा निम्मा करणार आहे. करीता नोंदणीकृत दस्तऐवज करुन घेणेसाठी अग्रीम रक्कम श्री. डी. डी. काळेले, शाखा अभियंता यांचे नांवे काढणेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार ५० फुट रुंद रस्ता चेलीपुरा ते रोशनगेट या रस्त्यामध्ये कॉर्नर राऊंडींग मध्ये बाधीत होत असलेली मिळकत न. भु. क्र. १००९३ व १००९३/१ ह्या मिळकतीचे अनुक्रमे ७२.२५ व १४४.४३ चौरस मीटर इतके बाधीत क्षेत्र संपादन करुन सदरील जमिनीचा मोबदला रक्कम रु. १६,९०,१०४/- (सोळा लक्ष नव्वद हजार एकशे चार) संबंधित जमीन मालकांना देण्यास त्याचप्रमाणे, नोंदणीकृत दस्तऐवज करुन घेण्यासाठी लागणारा एकुण खर्च र. रु. १,७०,०४०/-अग्रीम म्हणुन श्री. डी. डी. कालेले, शाखा अभियंता, यांचे नांवे काढण्यास व नोंदणीकृत दस्तऐवजाचा खर्च मनपा व मिळकतधारक यांनी निम्मा निम्मा करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९/८ :**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. नारेगांव (स्लम) येथे दगडी गटार बांधणे बाबतच्या कामाकरीता सा. बा. खाते यांचे वर्षा ९९-२००० च्या दरसुची नुसार रु. ३६,८८,६०४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम " शासकीय अनुदान २०००-२००१ व खुली गटार आणि संरक्षित भिंत बांधणे " या शिर्षकातुन करण्यात येईल.

सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक २१-११-२००० ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तसेच सर्वसाधारण सभा दिनांक १९-१२-२००० रोजी अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण २१ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण ६ निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एम. के. कन्स्ट्रक्शन | २५.७८% कमी |
| २. | श्री. डी. अजितसिंग | २५.५१% कमी |
| ३. | मे. न्यु स्टार कन्स्ट्रक्शन | २५.३२% कमी |
| ४. | मे. राणा कन्स्ट्रक्शन | २१.९९% कमी |
| ५. | श्री. शेख शरीफ | ९.७८६% कमी |
| ६. | मे. अनुयेग कन्स्ट्रक्शन | निविदा उघडलेली नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.७८% कमी दराची असलेली मे. एम. के. कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**मा. सभापती** : काम चांगले करुन घेण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर राहील. प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. नारेगांव (स्लम) येथे दगडी गटार बांधणे बाबतच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.७८% कमी दराची मे. एम. के. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०/९ :**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. नक्षत्रवाडी गांव (स्लम) येथे दगडी गटार बांधणे व अर्धगोलाकार गटार बांधणे आणि स्लॅब टाकणे या अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १३,९७,८८०/- (तेरा लाख सत्यान्नव हजार आठशे ऐंशी रु.) ला प्रशासकीय मंजुरी दिनांक २४-१२-२००० रोजी दिलेली आहे. सदरील कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता अंतीम तारखेपर्यंत एकुण २३ निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. एन. आर. घोडेले | ४.९९% जास्त |
| २. | कुलवंतसिंग | १०.००% जास्त |
| ३. | न्यु. स्टार कन्स्ट्रक्शन | १२.००% जास्त |

तथापि कंत्राटदाराने वाटाघाटी अंती हे काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास संमती दिली आहे. करीता मे. एन. आर. घोडेले यांची अंदाजपत्रकीय दराची (वाटाघाटीनंतरची) निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. नक्षत्रवाडी गांव (स्लम) येथे दगडी गटार बांधणे व अर्धगोलाकार गटार बांधणे आणि स्लॅब टाकणे याकामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. एन.आर. घोडेले यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१/१० :**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर मुकूंदवाडी (स्लम) येथे पुर्नडांबरीकरण करणेसाठी रक्कम रु. १२,२४,४३०/- च्या अंदाजपत्रकास दि. २०-११-२००० रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरील कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता अंतीम तारखेपर्यंत एकुण ७ (सात) निविदा विकल्या गेल्या. निविदा स्विकारण्याच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण ३ (तीन) मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | पाटील कन्सट्रक्शन | ४.९९% जास्त |
| २. | अे. सी. कोठारी | ९.८९% जास्त |
| ३. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | १०.००% जास्त |

वाटाघाटी अंती हे काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास कंत्राटदाराने संमती दिली आहे. करीता श्री. पाटील कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची (वाटाघाटी नंतरची) निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. संजयनगर मुकूंदवाडी (स्लम) येथे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. पाटील कन्स्ट्रक्शन यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२/११ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जलशुध्दीकरण केंद्र, फारोळा येथे जलशुध्दीकरण प्रक्रियेत क्लोरीन गॅसचा वापर केला जाते. वार्षीक क्लोरीन गॅस खरेदी करण्यासाठी (१५० मे. टन) रुपये २०,२७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन ठराव क्रमांक ३ दिनांक १९-०१-२००१ अन्वये सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार दैनिक वर्तमानपत्रातुन निविदा सुचना प्रसिध्दीस देण्यात येऊन "डी" फॉर्मवर उत्पादक अथवा अधिकृत विक्रेते यांच्याकडुन दर मागविण्यात आले. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण चार (४) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा

स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकुण ४ (चार) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. राजदीप इंटरप्रायजेस इतर दुरुस्ती | रु. ८७००/- (प्रती टनर ९०० कि. ग्र.) |
| १. | हॅड्रोलीक टेस्टींग | रु. १४००/- प्र. नग |
| २. | व्हॉल्व बदली करणे | रु. १२००/- प्र. नग |
| ३. | टनरल रंग देणे | रु. १३००/- प्र. नग |
| ४. | स्टीम पुनींग | रु. ७००/- प्र. नग |
| २) | मे. शिरीष इंटरप्रायजेस | निविदा उघडण्यात आली नाही. (कागदपत्रांची पुर्तता नसल्यामुळे) |
| ३) | मे. पुष्पतारा सर्व्हिसेस | निविदा उघडण्यात आली नाही. (कागदपत्रे संशयास्पद असल्यामुळे) |
| ४) | मे. फोनेक्स केमिकेल्स | निविदा उघडण्यात आली नाही. (सिलेंडर क्षमता कमी असल्यामुळे) |

वरील निविदेमध्ये निविदेतील अटी/शर्तीनुसार पुर्तता करणारी निविदा मे. राजदीप इंटरप्रायजेस यांची उघडण्यात आली असून, त्यांचा दर रुपये (७००/- प्रती टनर(९०० किग्रॅ) असा दिलेला आहे. व दुरुस्तीचे रु. १४०० प्रती नग टेस्टिंग, रु. १२००/- प्र. नग व्हॉल्व, रु. १३००/- प्र. नग रंग देणे रु. रु. ७०० स्टीम पुलींग प्रमाणे सादर केलेले असून, त्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

तरी मे. राजदीप इंटरप्रायजेस यांचे दर रुपये ८७००/- प्रती टनर व दुरुस्तीचे दर रु. १४००/- टेस्टींग, रु. १२००/- व्हॉल्व बदलणे, रु. १३००/- टनरला रंग देणे व रु. ७००/- स्टीम पुलींग, आवश्यकतेनुसार खरेदी व दुरुस्ती करण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**श्री. मीर हिदायत अली :** प्रस्तावात दिलेले दर जास्त आहे. इतर महानगरपालिकेमध्ये कमी दराने क्लोरीन गॅस पुरवठा केला जातो. माहिती घेण्यात यावी.

**मा. सभापती** : ठिक आहे. इतर महानगरपालिकेत कोणत्या दराने क्लोरीन गॅस पुरवठा होतो. त्याची संबंधित अधिकारी यांनी माहिती घ्यावी प्रसताव तुर्त स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा.

**विषय क्र. २३/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा म.न.पा. प्राथमिक शाळेची जुनी इमारत पाडुन त्या ठिकाणी शाळा व शाळेलगत दुकाने बांधण्याकरीता सा. बा. विभागाने सन ९९-२००० च्या जिल्हा दरसुचीनुसार र. रु. ४८,८९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त यांनी दिनांक ११-०१-२००१ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्रस्ताव मान्यतेस्तव सर्वसाधारण सभेसमोर ठेवला असता विषय क्र. २०८/१ दिनांक १९-०१-२००१ च्या इतिवृत्तान्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव कार्यालयीन निविदा सुचना जा. क्र./मनपा/लेखा/नि/७७/२००१ दि. १४-०३-२००१ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण ९ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | एम. के. कन्स्ट्रक्शन | १७.९८% कमी दराने |
| २. | मन्नान खान | १७.७८६% कमी |
| ३. | हायवे कन्स्ट्रक्शन | १६.०९% कमी |
| ४. | एस. ए. नवाब | १३.१३% कमी |
| ५. | सुजात हाश्मी | १५.३७% कमी |
| ६. | डी. अजितसिंग | १३.८९% कमी |
| ७. | न्यु. स्टार कन्स्ट्रक्शन | नोंदणी प्रमाणपत्र योग्य नसल्याने निविदा उघडण्यात आली नाही. |
| ८. | शेख शरीफ | १२.०१% कमी |
| ९. | मौला अलीयार खान | १२.३१% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९८% कमी दराची निविदा एम. के. कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. त्यास मा. आयुक्तांनी दिनांक २९-०५-२००१ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार एम. के. कन्स्ट्रक्शन यांची अं. प. दरापेक्षा १७.९८% कमी दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. मीर हिदायत अली :** संबंधित ठेकेदाराने घेतलेले काम चांगल्या प्रतीचे करुन द्यावे. कामाची क्वॉलटी चांगली नसेल तर, यात नगरसेवकांची बदनामी होते.

**मा. सभापती** : काम चांगल्या प्रतीचे करुन घेण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहील प्रस्ताव सर्वानुमते मंजुरी करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा मनपा प्राथमिक शाळेची जुनी इमारत पाडुन त्या ठिकाणी शाळा व शाळेलगत दुकाने बांधण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १७.९८% कमी दराची मे. एम. के. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४/१३ :**

उपसंचालक नगररचना, औरंगाबाद महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला कोकणवाडी येथे महानगरपालिकेची शाळा ही जिल्हा परिषदेच्या इमारतीमध्ये भरते. सदर जिल्हा परिषदेने इमारतीमधुन महानगरपालिकेने शाळा स्थलांतरीत करावे असे पत्र दिलेले आहे. असा अभिप्राय शिक्षणाधिकारी यांनी दिलेला आहे.

त्यानुसार सदर प्रभागात महानगरपालिकेच्या शाळेसाठी जागा संपादन करणे आवश्यक आहे. तसेच या प्रभागात विकास योजनेत प्राथमिक शाळेसाठी जमीन आरक्षित आहे. परंतु सदर आरक्षणाखालील जमीन जगजीवन राम मागासवर्गीय गृह निर्माण संस्था व त्यांचे सभासद यांचे मालकी हक्काबाबत वाद आहे. करीता, त्यालगत असलेली न. भु. क्र.

१८३२५/१ क्षेत्र ९१०.९ चौ. मी. खुली जागा आहे. सदर जागा महानगरपालिकेच्या शाळेसाठी जागा संपादन करणे बाबत त्या वार्डाचे सन्माननीय नगरसेवक यांनी विनंती केली असून, मिळकतधारक उक्त जमीन देण्यास संमती दर्शविलेली आहे

सबब मिळकतधारकास उक्त मिळकतीचा मोबदला वजावटी आता एकुण रक्कम रु. २६,३७,०५७/- दोन हफ्त्यात द्यावयाचे आहे. त्यापैकी पहिला हप्ता रजिष्ट्री करतेवेळी व दुसरा हप्ता रजिष्ट्री झाल्यानंतर एक महिन्याची द्यावयाचे आहे. तसेच खरेदी खत करणेसाठी येणारा खर्च रु. ४,०९,९०५/- येतो. सदर खरेदी खताचा संपुर्ण खर्च मिळकतधारक करणार आहे. सदर खर्च मोबदल्याची रक्कमेतुन वळती केलेली आहे. म्हणजेच मिळकतधारक मोबदला रु. २६,३७,९०५/- आणि खरेदी खताचा खर्च रु. ४,०९,९०५/- येतो. तो अग्रीम म्हणुन श्री. डी. डी. काळेले, शाखा अभियंता यांना देण्यात यावा. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**डॉ. आशा बिनवडे** : प्रस्ताव चांगला आहे. जागा भुसंपादन करावयाची यासाठी जागा कुणाची आहे? जाहीर प्रगटन देण्यात यावे. जागेचा वाद चालु असल्यास पुन्हा कामास अडचण येईल. कोणाची मालकी आहे, व्यवहारापुर्ती तपासावे.

**उपअभियंता (नगररचना) :** जागा वादाची आहे किंवा काम पी. आर. कार्ड बघुनच कार्यवाही करण्यात येईल. जाहीर प्रगटन दिले नाही.

**मा. सभापती** : या जागेसंबंधी कुणाचा काही वाद आहे किंवा काम यासाठी वृत्तपत्रात जाहीर प्रगटन देऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी. हा विषय मंजुर करण्यात येतो. आजच्या बैठकीत जे विषय मंजुर करण्यात आलेले आहे. त्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोकणवाडी प्रभागामध्ये महानगरपालिकेच्या शाळेसाठी जागा संपादन करण्यासाठी मिळकतधारकांना संमती दिल्यानुसार न. भु. क्र. १८,३२५/१ क्षेत्र ९१०.९ चौरस मीटर इतके क्षेत्र संपादन करु सदरील जागेचा मोबदला सर्व वजावटी जाता र. रु. २६,३७,०५७/- (रुपये सव्वीस लक्ष सदतीस हजार सतावन्न मात्र) रजिष्ट्रीचे वेळी पहिला हप्ता व रजिष्ट्रीनंतर एक महिन्यांनी दुसरा हप्ता असे दोन हप्त्यामध्ये संबंधित जमीन मालकास देण्यास त्याचप्रमाणे खरेदीखता करीता लागणारी र. रु. ४,०९,९४५/- अग्रीम म्हणुन श्री. डी. डी. काळेले शाखा अभियंता यांना देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

**मा. सभापती** : शहानुरवाडी येथील रस्त्याचे जागेसंबंधीत पाहणी करण्यास कमीटी स्थापन केलेली होती. त्याचा अहवाल सादर आलेला आहे.

**अतिरिक्त शहर अभियंता :** सदर प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली असता नगररचना विभागाने जागेचे योग्य ते मोजमाप करुन द्यावे असे दिले आहे.

**श्री. जयवंत ओक :** रस्त्यांसाठी जी जागा होती त्यात बदल करण्यात आलेला आहे. जागा बदल करण्याचा अधिकार संबंधित अधिकाऱ्यांना पोहचतो काय अशा पध्दतीने कार्यवाही करता येते काय? खुलासा द्यावा. नगरसेवकांच्या भावना ह्या जनतेला सुविधा मिळाव्या यासाठी असतात.

**मा. सभापती** : रस्त्याच्या जागेत बदल करण्याचा अधिकार आपणास आहे काय कुणाच्या अधिकारात बदलला याची रितसर परवानगी घेतलेली होती काय?

**उप अभियंता (नगररचना) :** विकास योजनेत बदल करावयाचा झाल्यास त्यासाठी किरकोळ फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करावी लागते. किरकोळ फेरबदलाची कार्यवाही करण्यासाठी शासनाची त्यास मंजुरी घ्यावी लागते.

**श्री. जगदीश सिध्द :** या प्रकरणासंदर्भात तत्कालीन आयुक्त श्री. बलदेवसिंग यांनी संचिका सिल कराव्या म्हणुन शेरा दिला होता व चौकशी होऊन पुढील कार्यवाही करावी असे दिले होते. त्यानुसार कार्यवाही होते काय? रस्त्याच्या जागेमध्ये इमारत झाली म्हणुन रस्ता बदलण्यात आलेला आहे असे चित्र दिसते.

**मा. सभापती** : नगररचना विभागाचे अधिकारी श्री. डी. पी. कुलकर्णी आज उपस्थित नाहीत. ते सुट्टीवर आहेत. त्यांनी अहवाल सादर करुन त्यात असे म्हटले आहे की, नगररचना विभागाने सदर रस्त्याची आखणी करुन घ्यावी व पुढील काम सुरु करावे असे समितीने ठरविले. रस्त्याची पाहणी करुन व्यवस्थित आखणी करावी असे ठरले. त्यानंतर समितीतील कुठल्याही सदस्यांचा आक्षेप नाही.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** समितीमध्ये माझा पण समावेश होता. अहवालावर माझी सही घेतलेली नाही.

**मा. सभापती** : अहवालावर जास्त चर्चा न करता संबंधित विभागाचे अधिकारी श्री. डी. पी. कुलकर्णी हे आज सभेत उपस्थित नाही, रजेवर गेलेले आहेत. या संबंधित पुढील बैठकीत चर्चा करुन योग्य तो निर्णय घेता येईल.

याबरोबरच " जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | स्थायी सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ०८-०८-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. बुधवार दिनांक ०८-०८-२००१ रोजी मा. सभापती, प्रशांत देसरडा, यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे दुपारी ३.०० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरुवात झाली. सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. अशरफ मोतीवाला | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. सिध्द जगदिश कन्हैयलाल | -//- |
| ३. | स. स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग | -//- |
| ४. | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ५. | स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | -//- |
| ६. | स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| ७. | स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली | -//- |
| ८. | स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| ९. | स. स. श्री. शे. इलियास किरमानी शे. उमर | -//- |
| १०. | स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतू | -//- |
| ११. | स. स. श्री. ओक जयवंत केशवराव | -//- |
| १२. | स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | -//- |
| १३. | स. स. श्री. डॉ. श्रीमती आशा बिनवडे | -//- |

**संवाद :**

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** आजची सभा विशेष सभा म्हणुन वसुली या विषयावर चर्चा करणार आहे काय किंवा इतर विषय सुध्दा मंजुर करणार याचा खुलासा करावा.

**मा. सभापती** : विषयपत्रिकेवर जे विषय आलेले आहेत त्यावर अगोदर चर्चा करावी नंतर वसुली संदर्भात चर्चा करता येईल.

**श्री. इलियास किरमानी :** इतिवृत्त देण्यात आलेले नाही. का देण्यात आले नाही.

**मा. सभापती** : मागील महिन्यामध्ये बऱ्याच सभा पार पाडल्या त्यामुहे कामाचा व्याप लक्षात घेता इतिवृत्त तयार होऊ शकले नाही व या अगोदर संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या सभेतील सर्व विषय आपण स्विकृतीसह मंजुरी दिलेली आहे. पुढील बैठकीत इतिवृत्त देण्यात येईल. आता दिलेला विषय हा वेगळा आहे. इतिवृत्तांचा नाही. म्हणुन पुढील बैठकीत मागील सभेचे इतिवृत्त कायम करता येईल.

**श्री. सावंत मधुकर :** मागील महिन्यामध्ये ज्या सभा झाल्या त्या याही महिन्यामध्ये होतील. म्हणुन पुढील बैठकीत आजचे इतिवृत्त देणार नाही काय?

**श्री. इलियास किरमानी :** सभा कोणत्या नियमाने बोलविता येते. याची माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती** : नगरसचिव यांनी खुलासा करावा.

**नगरसचिव** : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची-३ चे प्रकरण २ खालील नियम क्र. ३ (अ) व ३ (ब) प्रमाणे व या व्यतिरिक्त शासनाने

मंजुर केलेले जादा नियमातील नियम क्र. ६६ (१) प्रमाणे स्थायी समिती सभांचे आयोजन करण्यात येते. मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्याचा विषय कार्यकम पत्रिकेवर घेतलेला नाही. पुढील सभेपुढे मागील सभेचे इतिवृत्त सादर करण्यात येईल त्यास मंजुरी देता येते. यानंतर प्रत्येक सभेचे इतिवृत्त विषयपत्रिकेसोबत देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. मागील महिन्यामध्ये प्रभाग समित्या तसेच महिला व बाल कल्याण समिती, सर्वसाधारण सभा व विशेष सभा यामुळे इतिवृत्त तयार होऊ शकले नाही. म्हणुन विषयपत्रिकेसोबत इतिवृत्त देण्यात आलेले नाही.

**श्री. इलियास किरमाणी :** मागील बैठकीनुसार सर्व कार्यवाही झालेली आहे काय? इतिवृत्त दिले नाही म्हणुन काहीही चर्चा करता येत नाही. बऱ्याच वेळा ऐनवेळी विषयपत्रिका वाटप केली जाते. त्याबद्दल आम्हाला चर्चा करता येत नाही. म्हणुन आजची बैठक नंतर बोलाविण्यात यावी.

**मा. सभापती** : मागील बैठकीत जे विषय होते त्यास आपण स्विकृतीसह मंजुरी दिलेली आहे जे विषय मागच्या बैठकीत झाले त्यानुसार प्रशासनाच्या माध्यमातुन कार्यवाही झालेली नसेल तर, चर्चा करण्यात यावी. मागील सभेचे इतिवृत्त पुढील बैठकीत सादर करण्यात येईल. विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**विषय क्र. २५/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सन २००१-२००२ या आर्थिक वर्षाकरीता शहरातील पथदिवे दुरुस्ती करीता सोडीयम व्हेपर लॅम्प खरेदी करण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विद्युत दरसुची नुसार र. रु. १९,६०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च " विद्युत सहित्य खरेदी " या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी स. स. १९,६०,०००.०० चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**चर्चा :**

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** प्रस्तावानुसार किती सोडीयम व्हेपर घेणार किती वॅटचे घेणार कोणत्या कंपनीचे घेणार याची माहिती दिलेली नाही. मागील आर्थिक वर्षात अशाच प्रकारचा प्रस्ताव आला त्यास मंजुरी दिली कोणते. सहित्य खरेदी केले. प्रत्येक वेळेस तावडीने प्रस्ताव मांडुन मंजुरी घेतली जाते. हे योग्य नाही कोणत्या वार्डात लावण्यात आले याचा काहीही हिशोब नाही. आता गणपती बसविण्याचे दिवस आले ऐनवेळी प्रस्ताव येतात. गोडाऊनमध्ये साहित्य असतांना देण्यात आलेले नाही, अशा बऱ्याच वेळा तक्रारी आलेल्या आहे. जुने सहित्य कुठे गेले. किती व कोणते साहित्य खरेदी केले होते. त्याची सुध्दा माहिती देण्यत यावी व प्रस्तावानुसार आता कोणते व किती साहित्य खरेदी करणार याचा तपशील द्यावयास पाहिजे होता. संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मा. आयुक्त** : विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक सादर केलेले आहे. निविदा काढुन सविस्तर प्रस्ताव सभागृहापुढे सादर करण्यात आला या प्रस्तावास मान्यता देण्यास हरकत नसावी.

**अतिरिक्त शहर अभियंता :** यामध्ये १५० वॅटचे १२०० सोडीयम व्हेपर दिवे तर ७० वॅटचे दिवे घेणार आहोत.

**श्री. सावंत मधुकर :** मागील वेळेस सुध्दा ४ वेळेस अंदाजपत्रकास मंजुरी घेतली कोणते साहित्य घेतले, किती नग घेतले त्याची काहीही माहिती सभागृहाला नाही. घेतलेले साहित्य कोणत्या कंपनीचे होते ते सुध्दा माहित नाही.

**श्री. इलियास किरमाणी :** रेल्वेस्टेशन भागात आपण खांबवरील सोडीयम व्हेपर दिव्याची पाहणी केल्यास निकृष्ट दर्जाचे साहीत्य लावलेले आढळुन येईल. एकदा दिवा लावल्यानंतर २ ते ४ दिवसात बंद पडतो. अशी परिस्थिती आहे. १५ दिवसाच्या आत नवीन दिवा लावण्याची गरज पडते. साहित्याची वेळोवेळी मागणी केली जाते. साहित्य खरेदी केले जाते. परंतु तक्रारीनुसार साहित्य वार्डात वेळेवर दिले जात नाही. मागील वर्षी खरेदी केलेले साहित्य कुठे लावण्यात आले. टयुब फिक्चर किती, सोडीयम वेपरचे १५० व २५० वॅटचे किती, मरक्युरीचे १२५-२५० वॅटचे किती बल्ब तसेच दोघांचे १५०-२५० वॅट करीता किती चौक, ३ सेट-४ सेट किती-किती साहित्य खरेदी केली व आणखी किती साहित्य शिल्लक आहे. जुने खराब झालेले साहित्याचे आपण काम करतो. याचा सर्व खुलासा देण्यात यावा.

**श्री. मधुकर सावंत :** मागील वर्षी ३२ लाखाचे दोन प्रस्ताव सभागृहाच्या मंजुरीसाठी सादर झाले होते. एकुण ७२ लाखाचे साहित्य खरेदी केले. कोणते साहित्य घेतले याची माहिती सविस्तर देण्यात यावी.

**मा. आयुक्त** : किती साहित्य खरेदी केलेले आहे. त्याची लेखी माहिती देण्यात यावी. मा. सभापती यांना एक प्रत देऊन त्याची एक प्रत मला सुध्दा देण्यात यावी. तसेच मागील वर्षा खरेदी केलेले साहीत्य तसेच या प्रस्तावानुसार कोणते साहित्य खरेदी करणार याची सुध्दा माहिती देण्यात यावी.

**श्री. इलियास किरमाणी :** विषय मंजुर करण्यात यावा. परंतु पुढील बैठकीत सर्व सविस्तर माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती** : मागील वर्षा ७२ लाखाचे कोणते विद्युत साहित्य खरेदी केले आणि प्रस्ताव सादर केल्यानुसार यामध्ये कोणते विद्युत साहित्य खरेदी करणार याची सविस्तर माहिती देण्यात यावी. आयएसआय मार्कचे साहित्य घ्यावे दुसरे घेण्यात येऊ नये.

**श्री. इलियास किरमाणी :** निकृष्ट दर्जाचे साहित्य आणण्यात येऊ नये. यात महानगरपालिकेचे नुकसान हेते.

**मा. सभापती** : मागणी केल्यानुसार उत्कृष्ट दर्जाचे साहित्य आणावे नसता संबंधित अधिकाऱ्यावर कार्यवाही केली जाईल.

**श्री. जगदीश सिध्द :** साहित्य ठराविक कंपन्याचेच मागविले जाते. यात फॅक्सोलाईट व सुर्या या कंपन्याचा सुध्दा समावेश करावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** फिलीप्स, बजाज, तसेच क्रॉमप्टन या कंपन्याचे विद्युत साहित्याची मागणीसाठी दरपत्रके मागविली जाते.

**श्री. जगदीश सिध्द :** आय. एस. आय. मार्क असलेल्या कंपन्याचेच साहित्य मागवावे. बजाज या कंपनीला आय. एस. आय. मार्क नाहीत फॅक्सोलाईट तसेच सुर्या या कंपन्याचे साहित्य बाबतचे दर मागविण्यात यावे.

**मा. सभापती** : बजाज या कंपनीला आय. एस. आय. मार्क नाही. पिप्री, पुणे महानगरपालिका फॅक्सो लाईट व सुर्या कंपनीकडुन साहित्य घेण्यात येते.

ही नांवे देखील यात सामील करण्यात यावी. यात फॅक्सोलाईट तसेच सुर्या या कंपन्यांना शासनाने आय. एस. आय. मार्क म्हणुन मान्यता दिलेली आहे. साहित्याचे दर मागणी करतांना या कंपन्यांचा समावेश करण्यात यावा. सर्व कंपन्याचे साहित्याची गुणवत्ता चांगल्या प्रतीचे असावी. आय. एस. आय. मार्क असावेत याची तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्यात यावी. विषय क्र. १ मंजुर करण्यात येत आहे. मागील वर्षाचे खरेदी केलेले साहित्य तसेच प्रस्तावानुसार कोणते साहित्य खरेदी करणार याबाबतची सविस्तर माहिती संबंधित अधिकारी यांनी पुढील बैठकीत दयावी. सभागृहात माहिती सोबत आणावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे सन २००१-२००२ या आर्थिक वर्षाकरीता शहरातील पथदिवे दुरुस्तीसह सोडीयम व्हेपर लॅम्प खरेदी करण्यासाठी रक्कम रुपये १९,६०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच इतर कंपन्यासोबत फॅक्सोलाईट व सुर्या या कंपन्याकडुनही दर मागविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सन २००१-२००२ या आर्थिक वर्षाकरीता पथदिव्यांच्या दुरुस्तीकरीता ४० वॅट टयुब रॉड व चौक खरेदी करण्याच्या कामाकरीता सन २०००-२००१ वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या (विद्युत) दरसुचीनुसार र. रु. १९,९४,०००.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च " विद्युत साहित्य खरेदी " या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी र. रु. १९,९४,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००१-२००२ या आर्थिक वर्षाकरीता पथदिव्यांच्या दुरुस्तीसाठी ४० वॅट टयुब रॉड व चौक खरेदी करण्यासाठी तयार करण्यात आलेली र. रु. १९,९४,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सतेच इतर कंपन्यासोबत फॅक्सोलाईट व सुर्या या कंपन्या कडुनही दर मागविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७/३ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, शहरातुन रस्त्यावर केरकचरा टाकणे, रस्त्यावर मुलास शौचास बसविणे, अथवा नेमुन दिलेल्या ठिकाणी कचरा न टाकतना नालीत टाकणे, किरकोळ विक्रीधारक, हॉटेल व इतर दुकाने यांचा कचरा कचराकुंडीवर न टाकता नालीमध्ये टाकाला जातो. नाली साफ करणे अथवा त्या भागातील स्वच्छता राखणे कठीण जात असल्यामुळे मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ प्रकरण १४ नियम ५ (१) व (२) तरतुदीनुसार सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणेसाठी म्हणुन अस्वच्छता करणाऱ्यास नोटीस देणे व त्यांचेकडुन आकस्मिक खर्च, दंडात्मक कार्यवाही करण्यास व दंड वसुल करण्याचे अधिकार सर्व विभागातील स्वच्छता निरीक्षकांना प्रदान करण्यात यावे व

अस्वच्छता करणाऱ्यांकडुन खालील प्रमाणे दंड दंडात्मक कार्यवाही म्हणुन वसुल करण्याचे अधिकार प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अ. क्र. | तपशील | दंड |
|---|---|---|
| १. | कोणत्याही रस्त्यावर अगर सार्वजनिक ठिकाणी लहान मुलास शौचास बसवुन उपद्रव करणे. | रु. ५०/- |
| २. | नेमुन न दिलेल्या ठिकाणी अगर जागेत कोणत्याही प्रकारचा कचरा टाकुन उपद्रव निर्माण करणाऱ्यास | रु. १००/- |
| ३. | रस्त्यावर अगर सार्वजनिक ठिकाणी प्रौढ व्यक्तीने शौचास/लघवीस बसणे अगर थुंकणे | रु. १५०/- |
| ४. | फेरीवाले व इतर फुटकळ किरकोळ विक्री करणारे | रु. १५०/- |
| ५. | केबीनधारक आणि तत्सम रस्त्यावर अथवा रस्त्याच्या बाजुला धंदा/व्यवसाय करणारे | रु. २००/- |
| ६. | हॉटेल आणि इतर मोठे व्यावसायीक संस्था/उद्योगधंदे | रु. ५००/- |

**चर्चा :**

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** प्रत्येक वर्षी अशा प्रकारचा प्रस्ताव मंजुरीसाठी येतो व मंजुर केल्यानंतर सुध्दा त्याची अंमलबजावणी करण्यात येत नाही. आतापर्यंत किती लोकांवर दंडात्मक कार्यवाही केलेली आहे. खुलासा दयावा. अधिकारी सभागृहाची दिशाभुल करत असतील तर त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. किशोर शिंदे :** माझ्या वार्डात संडासची स्वच्छता राहत नाही. ती असावी. एका वार्डामध्ये किती संडास महानगरपालिकेने बांधलेले आहे. संडासची सुविधा व तेथे स्वच्छता ठेवली तरच प्रस्तावातील क्र. ३ मध्ये जे दिले ते लागु पडते.

**मा. सभापती** : मागील वर्षी प्रस्ताव मंजुर केलेला होता. असे आताच स. सदस्य यांनी सुचना केलेली आहे. त्यानुसार काय कार्यवाही केली. माहिती दयावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** दंड आकारावा अशी कायद्यात तरतुद आहे. किती दंड आकारावा निश्चित झालेले नसल्याने आपण दंडात्मक कार्यवाही केलेली नाही. सुरत पॅटर्न वेळेस आपण रु. ५/- रु., १०/- दंड आकरणी करत होती. यासंबंधी प्रशासकीय कार्यवाही म्हणुन इतर महानगरपालिकेप्रमाणे या वर्षापासुन दंड आकारणी बाबत कार्यवाही करण्याचे प्रस्तावित करीत आहोत. सभागृहाने निर्णय घेतल्यानंतर त्यानुसार कार्यवाही करता येईल.

**मा. आयुक्त** : मागील वर्षी असाच प्रस्ताव सादर केलेला होता. संबंधित अधिकाऱ्यांनी आजपर्यंत किती लोकांवर रु. ५/-, रु. १०/- दंडात्मक कार्यवाही केली माहिती द्यावी.

**आरोग्य वैदयकीय अधिकारी :** माझ्याकडे सध्या माहिती नाही. नंतर देण्यात येईल.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** एक किंवा दोन लोकांवर तरी कार्यवाही केलेली आहे किंवा काय माहिती द्यावी. कुणावरच कार्यवाही केलेली नाही. अधिकारी सभागृहाची दिशाभुल करतात व सभागृहाचा वेळ वाया घालवतात अशा अधिकाऱ्यांवर मा. आयुक्तांनी कडक कार्यवाही केली पाहीजे.

**श्री. भरत लकडे :** प्रस्तावानुसार काही वार्डात कार्यवाही केली जाईल काही वार्डात नाही सर्व ठिकाणी होईल का?

**मा. आयुक्त** : आपण सर्वांनी मिळुन चर्चा करावी व एका वार्डात किमान १० केसेस झालेल्याच पाहीजे असा निर्णय घ्यावा लागेल. दुसरी एक सुचना

अधिकाऱ्यांना अशी की, सभागृहात स. सभासदांनी प्रश्न विचारल्यानंतर अधिकाऱ्यांनी मोघम उत्तर देणे योग्य होणार नाही. वार्डात अगोदरच घाण आहे असे स. सदस्यांनी सुचना केलेली आहे. त्या अगोदर आपल्याला हे पाहणे जरुरी आहे जे स्वच्छता निरीक्षक असतात ते काय कामे करतात.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** अ. क्र. ६ मध्ये हॉटेल आणि इतर मोठे व्यावसायीक संस्था असे दिले यात मोठमोठे शहरात हॉस्पीटलस आहेत त्याचा समावेश करण्यात यावा.

**श्री. मीर हिदायत अली :** झोन अधिकारी झोन अंतर्गत येणाऱ्या लहान मोठया नाल्या साफसफाई करण्याची कार्यवाही करत नाही.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजुर केल्यानंतर संबंधित अधिकारी यांनी प्रत्येक तीन महिन्याचा अहवाल स्थायी समिती समोर ठेवावा. जे की, प्रत्येक वार्डात किती केसेस केलेल्या आहेत. अ. क्र. ६ मध्ये हॉटेल्स व इतर मोठे व्यावसायीक संस्था/उद्योगधंदे असे दिले यात हॉस्पीटल याचा समावेश करण्यात यावा. अशी दुरुस्ती करण्यात येते तसेच मागील वर्षी ठराव मंजुर झाल्यानुसार किती (केसेस) लोकांवर दंडाची कार्यवाही संबंधित अधिकारी यांनी केलेली आहेत. त्याची माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी.

**श्री. किशोर शिंदे :** ज्या वार्डात शौचालये आहे ती स्वच्छ करावीत तसेच ज्या वार्डात शौचालये नाहीत तेथे बांधण्यात यावीत असे केल्यास प्रस्तावानुसार कार्यवाही करणे योग्य होईल.

**श्री. जयवंत ओक :** शहरातील नागरिकांना सुविधा देण्याच्या दृष्टीने मा. आयुक्तांच्या चांगल्या भावना आहे. सर्वच वार्डाचा विचार केल्यास एकुण ५२ स्लम भाग येतात. या भागात एकुण ४७ सार्वजनिक शौचालय बांधलेले आहे परंतु सध्या ते बंद अवस्थेत असून, तोडण्यात आले किंवा नाही संडास स्वच्छते अभावी बंद झालेले दिसुन येतील असे शौचालय दुरुस्त केल्यास व नवीन काही शौचालय बांधण्याची कार्यवाही केल्यास तेथे मुबलक पाणी दिल्यास प्रस्तावानुसार दंडात्मक कार्यवाही करणे योग्य होईल. शहरात असे किती शौचालकय आहे त्याचा सर्व करावा पुढील बैठकीत माहिती देऊन हा प्रस्ताव मंजुर करावा. तसेच संडास साफ करणारे कर्मचारी सुध्दा वेळेवर साफसफाई करण्यासाठी आले पाहिजे जेणेकरुन संडासमध्ये अस्वच्छता दिसुन येणार नाही.

**श्रीमती आशा बिनवडे :** जे कुणी थुकंतील त्यांचेवर कार्यवाही करणार ही कार्यवाही जागेवर करणार किंवा कशी खुलासा करावा.

**मा. आयुक्त** : लहान मुलांचे समजुन घेऊ शकतो. परंतु इतर बाबतीत शहरातील स्वच्छता ठेवण्याबाबत शिस्त लावण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. प्रथम सर्वे करण्यात यावा.

**श्री. जयवंत ओक :** शहरामध्ये कचऱ्यांच्या कुंडयाची परिस्थिती काय आहे. वेळेवर कचरा उचल्याची कार्यवाही केली पाहीजे. कुंडयाच्यावर कचरा असेल तर, लोक कचरा कुठे टाकतील व अशा लोकांवर कार्यवाही करता येईल का प्रश्न निर्माण होतो. अशा परिस्थितीत कार्यवाही केल्यास जनता नगरसेवकांकडे येतील त्याचे तक्रारी मांडतील त्यासाठी वार्डातील संडास, कचऱ्यांच्या कुंडया वेळोवेळी साफसफाई केलेल्या असाव्यात. जेणे करुन आपणास दंड आकारता येईल.

**मा. आयुक्त** : मागे मुंबई मध्ये थुंकणाऱ्यांना रु. ५०/- दंड आकारणी होत होती. आपणास जेथे सुविधा नाही तेथे उपाययोजना करावी लागेल. त्यानंतर त्या त्या भागात दंडात्मक कार्यवाही करता येईल.

**श्री. भरत लकडे :** माझ्या वार्डामध्ये कचरा कुंडीच नाही तेथे काय कार्यवाही करणार दंडात्मक कार्यवाही करता येईल का?

**मा. आयुक्त** : नाशिक, पुणे, कोल्हापुर, तसेच अमरावती महानगरपालिकेत अशा प्रकारची दंडात्मक कार्यवाही राबविली जात असे. याही महानगरपालिकेमध्ये कार्यवाही केल्यास महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवु शकते. काही भागात शौचालयाची व्यवस्था नाही. म्हणुन समजुन घेऊ शकतो. लहान मुलांबाबतीत समजु शकतो. परंतु काहीतरी दंड लावण्यात यावा व जेथे शौचालयाची व्यवस्था नाही ते नव्याने शौचालय महानगरपालिका फंडातुन बांधण्याची गरज आहे. जेथे आहे ते स्वच्छ करण्याची नितांत गरज आहे. लोक तोडफोड करतात यांचेशी मी सहमत आहे. वार्डातील ५-६ जेष्ठ नागरिकांना जबाबदारी देऊन त्यावर देखरेख ठेवता येईल.

**श्री. नंदकुमार फुलारी :** कुण्या तरी व्यक्तिला शौचालयाचा ठेका देण्यात यावा व २५/- पैसे, ५०/- पैसे एका व्यक्तीसाठी आकारणी करण्यात यावी. जेणेकरुन स्वच्छताही राहील महानगरपालिकेचा फायदा होईल.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** वार्डात संडास किती आहेत कोणत्या वार्डात नाहीत. ठिकठिकाणी कुंडया आहेत का? कचरा वेळेवर उचलला जातो का याचा सर्व करण्यात यावा. आताच स. सदस्य श्री. लकडे यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचे वार्डात कचरा कुंडयाच नाहीत लोक कचरा रस्त्यावरच टाकणार वर काय कार्यवाही करु शकता दंडात्मक कार्यवाही करता येईल का?

**मा. आयुक्त** : आपणांस पहिल्यांदा मुख्य रस्त्यावर शौचालयाची व्यवस्था आहे का याची पाहणी करावी लागेल. कोठे आवश्यकता आहे हे निश्चित करावे लागेल त्यानुसार शौचालयाचे बांधकाम केले जाईल. तसेच शहरात जेथे कुंडयाची व्यवस्था नाही तेथे कुंडया दिल्या जातील. परंतु जेथे कुंडया दिलेल्या आहेत. तेथे अशी कार्यवाही करण्यास हरकत नसावी.

**मा. सभापती** : स. सदस्यांच्या सुचनेवरुन असे लक्षात येते की, शहरामध्ये जे शौचालय महनगरपालिकेने बांधलेले आहे ते नादुरुस्त आहे. त्यामुळे प्रौढ व्यक्ती रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी शौचास बसवु शकतात अशी भावना स. सदस्यांनी व्यक्त केलेली आहे. यानुसार अधिकाऱ्यांना सुचना करु इच्छितो की, महानगरपालिका मार्फत बांधण्यात आलेले सर्व शौचालय एक महिन्याच्या आत दुरुस्त करु चालु करण्याची कार्यवाही करावी तसेच ज्या ज्या वार्डात कचरा कुंडया नाही व स. सदस्यांनी मागणी केलेली आहे. किंवा करतील त्यानुसार कचरा कुंडया देण्याची कार्यवाही करावी. जेणे करुन प्रस्तावानुसार आपणास कार्यवाही करता येईल.

**मा. आयुक्त** : ज्या भागात शौचालयाची व्यवस्था आहे व कचरा कुंडया उपलब्ध आहे. तेथे प्रस्तावानुसार उपद्रव करणाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही करण्याची मान्यता देण्यात यावी जेथे कचरा कुंडया नाही. तेथे देण्यात येतील त्यानंतर त्या भागात दंडाची कार्यवाही सुरु करण्यात येईल लहान मुलांसाठी ५०/- रु. ऐवजी १०/- रु. ठेवावे. काही तरी ठेवावे व दंडात्मक कार्यवही सुरु

करावी लागेल. रस्ता दुभाजकावर लोक कचरा टाकतात. कचरा कुंडया वाढविले पाहिजे हे म्हणणे बरोबर आहे.

**मा. सभापती** : हा विषय मंजुर करण्यात येत आहे. ज्या ज्या वार्डात शौचालय आहेत ती नादुरुस्त असेल तर, एक महिन्याच्या आत कार्यवाही करण्यात यावी त्यानंतर दंडाची कार्यवाही करण्यात यावी ज्या भागात शौचालय व कचरा कुंडयाची व्यवस्था आहे. त्या भागात दंड आकारण्यात यावे. लहान मुलांसाठी रु. ५०/- ऐवजी रु. १०/- आकारण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातुन रस्त्यावर केरकचरा टाकणे, रस्त्यावर मुलांस शौचास बसविणे अथवा नेमुन दिलेल्या ठिकाणी कचरा न टाकता नालीत टाकणे, किरकोळ विक्री धारक, हॉटेल व इतर दुकाने यांचा कचरा कुंडीवर न टाकता नालीत टाकणे यामुळे शहरात त्या त्या भागातील स्वच्छता राखणे कठीण जात असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-१४ नियम क्र. ०५ (१) (२) च्या तरतुदीनुसार सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणेसाठी म्हणुन अस्वच्छता करणाऱ्यास नोटीस देणे व त्यांचेकडुन आकारतील खर्च दंडात्मक कार्यवाही करण्यास व दंड वसुल करण्याचे अधिकार सर्व विभागातील स्वच्छता निरीक्षकास प्रदान करण्यास व अस्वच्छता करणाऱ्याकडुन खालील प्रमाणे दंड दंडात्मक कार्यवाही म्हणुन वसुल करण्याचे अधिकारी प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | तपशील | दंड |
|---|---|---|
| १. | कोणत्याही रस्त्यावर अगर सार्वजनिक ठिकाणी लहान मुलास शौचास बसवुन उपद्रव करणे. | रु. १०/- |
| २. | नेमुन न दिलेल्या ठिकाणी अगर जागेत कोणत्याही प्रकारचा कचरा टाकुन उपद्रव निर्माण करणाऱ्यास | रु. १००/- |
| ३. | रस्त्यावर अगर सार्वजनिक ठिकाणी प्रौढ व्यक्तीने शौचास/लघवीस बसणे अगर थुंकणे | रु. १५०/- |
| ४. | फेरीवाले व इतर फुटकळ किरकोळ विक्री करणारे | रु. १५०/- |
| ५. | केबीनधारक आणि तत्सम रस्त्यावर अथवा रस्त्याच्या बाजुला धंदा/व्यवसाय करणारे | रु. २००/- |
| ६. | हॉटेल आणि इतर मोठे व्यावसायीक संस्था/उद्योगधंदे | रु. ५००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८/४ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, सद्यस्थितीत औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये रु. ६५/- प्रमाणे दैनिक वेतन सर्व संवर्गातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना देण्यात येते. यापुर्वी सर्वसाधारण सभेने अशासकीय ठराव क्र. २०१/१२ दिनांक ०४-०२-२००० नुसार ठराव पारीत केला होता की, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना रु. ६५/- दैनिक वेतनाऐवजी रु. ९०/- प्रतिदिन दैनिक वेतन देण्यात यावे.

महानगरपालिकेचे सन २०००-२००१ चे महसुली उत्पन्न ८७.९३ कोटी होते. यामध्ये शासकीय अनुदान रु. ४ कोटीचा समावेश आहे म्हणजे निव्वळ उत्पन्न रु. ८३-९३ कोटी येते.

सन २०००-२००१ या वर्षामध्ये कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, बोनस, पाचवा वेतन आयोग थकबाकी शिक्षकांचे चटोपाध्याय आयोग थकबाकी यावर रु. ३८.२१ कोटी खर्च झालेला आहे.

महसुली उत्पन्नाच्या तुलनेत प्रत्यख अस्थापना खर्चाची टक्केवारी ४५.५२% टक्के येते. पाचवा वेतन आयोग थकबाकी वगळल्यास निव्वळ वार्षिक अस्थापना खर्च रु. ३५.२५ कोटी येतो. त्याची महसुली उत्पन्नाच्या तुलनेत अस्थापना खर्च टक्केवारी ४२% येते. त्यामुळे सद्यस्थितीत अस्थापनावर ४२% खर्च आहे. शासनाचे संकेत आहेत की ४२% च्या वर अस्थापना खर्च जाऊ नये, शासनाची ही बाब विचारात घेता कामगारांच्या मागणीनुसार दैनिक वेतन वाढवुन देणे शक्य होणार नाही. तथापि दोन वर्षात न केलेली वाढ व महागाई निर्देशांक विचारात घेता व महानगरपालिकेची आर्थिक परिस्थितीचा विचार करता दैनिक वेतनाचा दर रु. ६५/- ऐवजी रु. ७५/- करणेचे प्रस्तावित असून, त्यामुळे रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांचे वेतनावर करण्यात येणाऱ्या एकुण खर्चात वार्षीक रु. ४१.२७ लक्ष ने वाढ होईल. करीता प्रचलित दर रु. ६५/- मध्ये रु. १४/- ची वाढ करुन रु. ७५/- प्रमाणे दैनिक वेतन अदा करणे बाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**चर्चा :**

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना ६५/- ऐवजी ९०/- दैनिक वेतन देण्यात यावे असा सर्वसाधारण सभेने ठराव मंजुर केला. त्यावेळी प्रशासनाने का आक्षेप घेतला नाही. सर्व हजर होते. पुन्हा स्थायी समिती समोर प्रस्ताव आणण्याची का गरज भासली.

**मुख्य लेखाधिकारी :** सर्वसाधारण सभेत अशासकीय प्रस्ताव मांडुन मंजुरी देण्यात आलेली आहे. आता प्रशासनाच्या माध्यमातुन प्रस्ताव सादर केलेला आहे.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** चुकीचा खुलासा करण्यात येऊ नये. सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानंतर सभागृहात प्रशासनामार्फत खुलासा करुन का आक्षेप घेण्यात आले नाही.

**मुख्य लेखाधिकारी :** अशासकीय प्रस्ताव सादर होऊन मंजुर करण्यात आलेला होता. सभागृहात मा. महापौर यांनी परवानगी दिल्यानंतर सभागृहात खुलासा किंवा प्रशासकीय मत मांडता येते. हा प्रस्ताव प्रशासनामार्फत मांडुन मंजुर केलेला नाही. याबाबत प्रशासनाचे मत जाणुन घेऊन प्रशासनाची काय भुमिका आहे हे समजावुन सांगण्यासाठी पुन्हा प्रशासकीय प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यात आलेला आहे.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** सर्वसाधारण सभेने प्रस्ताव मान्य केल्यानंतर इतिवृत्तात नोंद झाली त्यानंतर इतिवृत्त कायम करतांना प्रशासनामार्फत मा. महापौर यांना पत्र देऊन चुकीचा प्रस्तावावर निर्णय घेतला म्हणुन आक्षेप का घेतले नाही. जेणे करुन प्रशासनामार्फत आज प्रस्ताव आणण्याची वेळ झाली.

**मुख्य लेखाधिकारी :** अशासकीय बरेच प्रस्ताव मंजुर होतात. आर्थिक परिस्थिती पाहता रु. ६५/- ऐवजी ठराव मंजुर झाल्यानुसार ९४/- रुपये दैनिक वेतनाची मागणी केलेली आहे. ती देणे शक्य नाही. सध्या रु. ६५/- दैनिक वेतन देण्यात येते. प्रस्तावानुसार प्रशासनाचे मत लक्षात घेता रु. ७५/- रु. दैनिक वेतन देण्याचे मान्य केलेले आहे व त्यानुसार प्रस्ताव सादर केलेला आहे. इतर महानगरपालिकेमध्ये ही जवळपास हाच दैनिक वेतन देण्यात येतो. महानगरपालिकेला जवळपास २०० कोटी रुपये देणे आहे. त्यात महाराष्ट्र

राज्य विद्युत मंडळास ११८ कोटी, कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगापोटी २.७५ कोटी दयावे लागणार आहे. तसेच भत्ते, बोनस, शिक्षकांचे चटोपाध्याय आयोग थकबाकी दयावी लागणार आहे. असे एकुण १९७.२२ कोटी देणे आहे. वसुली विचार करता व त्यानुसार खर्च ४५% (टक्याचे) वर होत आहे. शासनाचे संकेत आहेत की, ४२% च्या वर अस्थापना खर्च जाऊ नये. शासनाची बाब विचारात घेतो कामागारांच्या मागणीनुसार दैनिक वेतन वाढवुन देणे शक्य होणार नाही. तथापी दोन वर्षात न केलेली वाढ व महागाई निर्देशांक विचारात घेता व महानगरपालिकेची आर्थिक परिस्थितीचा विचार करता दैनिक वेतनाचा दर रु. ६५/- ऐवजी, ७५/- करणेचे प्रस्तावित केले असून, १०/- रुपयाने दैनिक वेतनात वाढ प्रस्तावित करीत आहोत.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** सन १९९८ मध्ये दैनिक वेतनावरील एकुण १४०० कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत समावेश करुन त्यांना पाचवा वेतन आयोग लागु केला तरी ३५% चे वर अस्थापना खर्च जाणार नाही असा अहवाल मुख्य लेखा परीक्षक व मुख्यलेखाधिकारी यांनी पाठविला होता. तो कशाच्या आधारे पाठविला त्याचा खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** मागील वर्षाच्या अर्थसंकल्पानुसार अस्थापनेवरील खर्च ३५% पर्यंत जातो. १२८ कोटी विचारात घेतले तर ३५% च्या वर जाणार नाही. मागील वर्षा १३५ कोटीचे बजेट घेण्यात आले होते. सुधारीत १२८ केले. त्यातुन ३१ मार्च पर्यंत ८८ कोटीच उत्पन्न आहे. ८८ कोटी विचारात घेऊन अस्थापना खर्च काढल्यास ते ४५% पर्यंत जाते. प्रत्येक वर्षी आपण १० ते १५ टक्यांनी बजेटमध्ये वाढ करण्यात येते. परंतु येणार उत्पन्न पुरेपुर येत नाही. म्हणुन उत्पन्न कमी आले तरी, अस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे पगार, भत्ते वगैरे हा खर्च कमी होत नाही.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** वसुली होत नाही म्हणुन कर्मचाऱ्यांच्या दैनिक वेतनात वाढ करायची नाही हे प्रशासनाचे धोरण योग्य नाही. सध्या जकातीचे उत्पन्न फारच घटले आहे त्याकडे लक्ष नाही. तसेच अनाधिकृत नळ कनेक्शनचा सर्व करण्याबाबतची फाईल गहाळ झाली. जे उत्पन्न वाढविण्याचे नियोजन केले त्याची अंमलबजावणी होत नाही. शहरातील ओपन स्पेस वरील जागा मोठमोठया बिल्डरांना वेगवेगळया अटी शर्तीवर दिलेल्या आहे. तेथे दुकान केंद्र उभारली गेली. ठरल्याप्रमाणे महानगरपालिकेस बऱ्याच लोकांनी दुकाने दिलेल्या नाही. ज्या महानगरपालिकेने दुकाने बांधल्या आहेत. त्याचे भाडे वेळेवर मिळत नाही. न्यायालयातील केसेस थांबवुन आहे. तसेच पाणीपट्टी मालमत्ता कर, सुध्दा वसुलीत मागे आहे. कोणतीच वसुली ठरल्याप्रमाणे होत नाही. जकातीची रक्कम भरण्यासाठी काही लोक चेक देतात. ते चेकबाऊन्स होतात. पुन्हा त्यावर काहीही कार्यवाही होत नाही. यात महानगरपालिकेचे नुकसान होते. तसेच तलावातील गाळ बऱ्याच लोकांनी घेऊन गेले. त्याबाबतीत कोणतीही वसुली करण्यात आलेली नाही. वसुली करण्याबाबत नियोजन पुर्वक कार्यवाही होत नाही. मा. आयुक्तांनी याबाबत ठोस पावले उचलावी. कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन वाढवुन देण्याबाबत. सर्वसाधारण सभेने ठराव पास केलेला असतांनी पुन्हा स्थायी समिती सभेत कोणत्या नियमाने आणता येतो खुलासा दयावा.

**मुख्यलेखाधिकारी :** नियम क्रमांक ५१ (२) नुसार स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर केलेला आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे.

**मा. आयुक्त** : यासंदर्भात इतर ३-४ महानगरपालिकांकडुन माहिती घेण्यात आलेली आहे. अमरावती महानगरपालिकेत रु. ४४/-, सोलापुर येथे रु. ६५/- व कोठे रु. ९४/- दैनिक वेतन आहे. त्या महानगरपालिकांमध्ये दैनिक वेतनावर काम करणाऱ्यांची संख्या २०० ते ४०० आहे. परंतु आपणाकडे दैनिक वेतनावर १४०० कामगार आहे. वसुलीमध्ये दुर्लक्ष होत आहे. यावर माझाही आक्षेप आहे. वसुलीबाबत पाहिजे तसे लक्ष अजुनही दिले जात नाही. थोडीफार वाढ झाली परंतु माझे समाधान नाही. स्थायी समितीपुढे प्रत्येक वेळी १ वसुलीचा आढावा घ्यावयास पाहिजे. ढिल देऊन जमणार नाही. आपण अस्थापना खर्च तर कमी करुन शकत नाही. वसुली वाढविली तर विकास कामे करता येईल. आजची परिस्थिती अशी आहे की, महानगरपालिकेला एकुण २०० कोटीचे कर्ज देणे आहे. ते लवकरात लवकर परत फेड केले नाही तर त्याचे व्याज वगैरे धरुन त्यात वाढ होत राहील. कोणतेही सरकार ही रक्कम माफ करणार नाही. महानगरपालिकेलाच परतफेड करावी लागणार आहे हे विसरुन चालणार नाही. विद्युत बिलापोटी असलेली थकबाकी आपणास अगोदर भरणे आवश्यक आहे. सध्या महानगरपालिकेची परिस्थिती चांगली नाही म्हणुन आपण तो एकदम भरु शकत नाही. परंतु पाणीपट्टी जकात तसेच इतर वसुलीत वाढ झाल्यास महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारेल व महानगरपालिकेकडे असलेली थकीत रक्कम परतफेड करता येईल. उदा. २० कोटी थकबाकी आहे. त्याचे व्याज १०% नी धरल्यास २ कोटीचे नुकसान होते. जे कर्मचारी वसुली करण्यासाठी प्रयत्न करणार नाही. त्यांचे वर आपण नियमाने कार्यवाही करणार आहोतच. सध्या कर्मचाऱ्यांच्या बदली संदर्भात कार्यवाही चालु आहे. महानगरपालिकेची आजची आर्थिक परिस्थिती पाहता आपण दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना रु. १०/- पेक्षा जास्त दैनिक वेतन देऊ शकू असे वाटत नाही. आर्थिक परिस्थिती सुधारल्यास यापेक्षाही आणखी दैनिक वेतनात वाढ करता येईल.

**श्री. मधुकर सावंत :** सफाई कर्मचारी हे सकाळीच कामावर जातात. शहर स्वच्छ ठेवण्याचे काम हे कामगार करतात त्यांना ७५/- दैनिक वेतन फारच कमी होतो. ९०/- करण्यात यावे.

**श्री. जयवंत ओक :** कामागारांवर अन्याय होणार नाही यास प्रशासन सहमत आहे. आताच मा. आयुक्तांनी खुलासा केला महानगरपालिकेस २०० कोटी रुपये देणे आहे. परंतु या शहरात अनाधिकृत जागेवर बऱ्याच लोकांनी २०X३०, ३०X४० प्लॉट पाडुन विक्री सुरु केली. अशी जागेवर मालमत्ता कर लावल्यास महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल. व जे २०० कोटी महानगरपालिकेस देणे आहे ते देणे सोपे होईल. कोणतेही आयुक्त येथे आल्यावर त्यांनी धडाडीने व नियमानुसार कामे केली पाहीजे. डिनोटीफाईड येरीयांना कर लावण्यात याव. कर भरण्या संदर्भात २०-२० वर्षापासुन न्यायालयात केसेस पडुन आहोत. तडजोड करुन घेतल्यास केसेस निकाली लागतील उत्पन्न वाढेल. परंतु तसे काहीही होत नाही. या सभागृहात सर्व पक्षाचे नगरसेवक असले तरी सर्व सदस्य प्रशासनाला बरोबर घेऊन चालणारे आहे. अनाधिकृत वस्त्यांना अधिकृत करण्यासंदर्भात व कर लावुन महानगरपालिकेचे उत्पन्न

वाढविण्याच्या दृष्टीकोनातून जो राज्यपालांचा आदेशनां प्राप्त झाला त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. हे शहर फार वेगळया पध्दतीने बसलेले आहे. मा. आयुक्तांनी शहरात जनतेच्या भेटी घेऊन समस्येची माहिती घ्यावी. ज्याप्रमाणे विकास कामे करणे गरजेचे आहे. त्याहीपेक्षा उत्पन्न वाढविणे गरजेचे आहे. विषय वेगळा आहे. परंतु उत्पन्न वाढविण्याच्या संदर्भात आपण चर्चा करत आहोत. वसुलीवर भर देण्यात येऊन कामगारांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळावा अशी सभागृहाची अपेक्षा आहे. स्थायी समितीला या प्रस्तावावर निर्णय घेण्याचा अधिकार असेल तर, सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव पाठविण्याची गरज नाही.

**श्री. मीर हिदायत अली :** ७५/- रुपये, ऐवजी ८०/- रु. दैनिक वेतन करण्यात यावे.

**श्री. मधुकर सावंत :** ५/- रुपये वाढविण्यात यावे.

**मा. सभापती** : दैनिक वेतन रुपये ९०/- केल्यास किती खर्च होईल

**मुख्यलेखाधिकारी :** रुपये जास्तीचा खर्च होईल.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** वाहन चाल यांना आपण ११४/- दैनिक वेतनावर आदेश दिले त्याप्रमाणे या कर्मचायांना सुध्दा ९०/- देण्यात हरकत नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** वाहन चालकांना दैनिक वेतन रुपये ११४/- देण्यात यावे या संदर्भात शासनाचे डायरेक्शन होते. त्यानुसार कार्यवाही केलेली आहे.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** वर्ग-४ मध्ये मंजुर कर्मचा-यांना साफसफाई, ड्रेनेज तसेच इतर स्वच्छतेची सर्वच कामे करावी लागतात. एक वेळेस वार्डात ड्रेनेजची लाईन चोकअप झालेली होती. एका मजुर कर्मचाऱ्यांने हाताने नाक दाबुन काम केले. अशी सुध्दा वेळ या कर्मचाऱ्यांवर येत असते. म्हणुन ९०/- दैनिक वेतन देण्यात यावे.

**मा. सभापती** : वर्ग-४ च्या सर्वच कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन रुपये ७५/- देण्या संदर्भात प्रशासनामार्फत प्रस्ताव सादर केलेला आहे. ७५/- रुपये दैनिक वेतन ऐवजी ८०/- रुपये दैनिक वेतन देण्यास मान्यता देण्यात येते. प्रस्ताव सादर केल्यानुसार रुपये ५/- ने वाढ करण्यात आलेली आहे. तसेच वर्ग-३ मध्ये दैनिक वेतन/ठरावीक वेतनावर जवळपास ६० कर्मचारी काम करतात. वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना सध्या देण्यात येणारा दैनिक वेतन रुपये ७५/- हा फारच कमी आहे. म्हणुन दैनिक/ठराविक वेतनावरील सर्वच वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनात वाढ करण्याबाबतचा तसा प्रस्ताव पुढील बैठकीत प्रशासनामार्फत सादर करावा.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** वसुली होत नाही म्हणुन कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन ९०/- रुपये करण्यात आलेला नाही हे प्रशासनाचे धोरण योग्य नाही.

**मा. आयुक्त** : यानंतर वसुलीत वाढ करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न राहील. सर्वांचे सहाकार्य मिळावे.

**मा. सभापती** : मा. आयुक्तांनी नियमानुसार जास्तीत जास्त वसुली करावी कुण्याही कर्मचाऱ्यांच्या पाठीशी हे सभागृह राहणार नाही. जे कर्मचारी कामे व्यवस्थित करत नसतील त्यांचेवर नियमाने कार्यवाही झाली पाहिजे. त्यांची वेतनवाढ थांबविली पाहिजे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या प्रत्यक्ष चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेतील दैनिक वेतन सर्व संवर्गातील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना रुपये ६५/-

दैनिक वेतन ऐवजी रुपये ८०/- प्रमाणे दैनिक वेतन अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच वर्ग-३ च्या दैनिक वेतन/ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांचे दैनिक वेतनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनामार्फत पुढील बैठकीत सादर करण्यात यावा. असे सर्वानुमते ठरविण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**श्री. शिंदे किशोर :** हर्सुल येथील वाळु संबंधित ठेकेदार घेऊन गेले त्याची रक्कम देण्याऐवजी चेक देण्यात आले. ते चेक बाऊन्स झाले. संबंधितावर आतापर्यंत काय कार्यवाही केली.

**मा. आयुक्त** : प्रत्येक स्थायी समितीला एक आढावा घेण्यात यावा. सखोल माहिती घेण्यात यावी. आजच्या सभेत जकातविषयी आढावा घेण्यात यावा.

**मा. सभापती** : मालमत्ता कर किंवा जकात वसुली या संदर्भात कोणत्याही एका विषयावर आजच्या बैठकीत चर्चा करण्यात यावी. मालमत्ता अधिकारी आजच्या बैठकीत उपस्थित नाही. म्हणुन जकात या विषयावर आजच्या बैठकीत चर्चा करावी.

**कार्यकारी अभियंता :** मागील बैठकीत विषय पत्रिकेवरील विषय क्र. ११ क्लोरीन गॅस खरेदी बाबतचा विषय स्थगित ठेवण्यात आलेला होता तो मंजुर करावा.

**मा. सभापती** : मागील बैठकीत विषय क्र. ११ स्थगित ठेवण्यात आलेला होता त्यावर चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल, चर्चा करावी इतर महानगरपालिकेमध्ये कोणत्या दराने पुरवठा केला जातो. याची माहिती घेण्याचे आदेश दिले होते.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** मागील बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यासाठी विषय पत्रिकेवर आलेले नाही. म्हणुन त्या बैठकीचे इतिवृत्तांवर चर्चा करणे योग्य होणार नाही.

**मा. सभापती** : महत्वाचा विषय होता. आपण चर्चा करावी. निर्णय घ्यायचा किंवानाही हे आपल्या हातात आहे.

**विषय क्र. २९/५ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जलशुध्दीकरण केंद्र, फारोळा येथे जलशुध्दीकरण प्रक्रियेत क्लोरीन गॅसचा वापर केला जातो. वार्षीक क्लोरीन गॅस खरेदी करण्यासाठी (१५० मे. टन) रुपये २०,२७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन त्यास ठराव क्र. -३ दिनांक १९-०१-२००१ अन्वये सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेल्या आहे.

त्यानुसार दैनिक वर्तमानपत्रातुन निविदा सुचना प्रसिध्दीस देण्यात येऊन " डी " फॉर्मवर उत्पादक अथवा अधिकृत विक्रेते यांच्याकडुन दर मागविण्या त आले. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण (४) चार कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकुण ४ (चार) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| **१.** | मे. राजदीप इंटरप्रायजेस इतर दुरुस्ती | रु. ८७००/- (प्रति टन र ९०० किग्रॅ) |
| १. | हेड्रोलीक टेस्टींग | रु. १४००/- प्र. नग |
| २. | व्हॉल्व बदली करणे | रु. १२००/- प्र. नग |

| | | |
|---|---|---|
| ३. | टनरला रंग देणे | रु. १३००/- प्र. नग |
| ४. | स्टीम पुर्णांक | रु. ७००/- प्र. नग |
| **२.** | मे. शिरीष इंटरप्रायजेस | निविदा उघडण्यात आली नाही. (कागदपत्रांची पुर्तता नसल्यामुळे) |
| १. | मे. पुष्पतारा सर्व्हिसेस | निविदा उघडण्यात आली नाही. (कागदपत्रे संशयास्पद असल्यामुळे) |
| २. | मे. फोनेक्स केमिकल्स | निविदा उघडण्यात आली नाही. (सिलेंडर क्षमता कमी असल्यामुळे) |

वरील निविदेमध्ये निविदेतील अटी/शर्तीनुसार पुर्तता करणारी निविदा मे. राजदीप इंटरप्रायजे यांची उघडण्यात आली असून, त्याचा दर रुपये ८७००/- प्रति टनर (९०० कि. ग्र) असा दिलेला आहे व दुरुस्तीचे रु. १४००/- प्रति नग, टेस्टींग, रु. १२०० प्र. नग व्हॉल्व, र. १३००/- प्र. नग रंग देणे रु. ७००/- स्टीम पुर्णांक प्रमाणे सादर केलेले असून, त्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

तरी मे. राजदीप इंटरप्रायजेस यांचे दर रु. ८७००/- प्रति टनर व दुरुस्तीचे दर रु. १४००/-, टेस्टींग रु. १२००/- कॉटन बदलणे, रु. १३००/- टनरला रंग देणे व रु. ७००/- स्टीम पुर्णांग आवश्यकतेनुसार खरेदी व दुरुस्ती करण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. जयवंत ओक :** क्लोरीन गॅस सध्या आहे का? क्लोरीन गॅसची आवश्यकता असेल तर, प्रस्ताव मंजुर करावा. नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार नाही. मलेरीया काविळ यासारखे रोग होऊ नये याची काळजी घेतली जावीत नसता शहरात एखादा रोग पसरत गेल्यास जनता मृत्यूमुखी पडेल.

**मा. आयुक्त** : क्लोरीन गॅसचा मागील खरेदी केलेला पुरवठा आपल्याकडे आहे. परंतु आणखी क्लोरीन गॅसची आवश्यकता पाडणार आहे. पुणे कल्याण-डोंबविली महानगरपालिकास १२०००/- रुपये दराने पुरवठा केलेला असेल त्या दराने आपणास संबंधित ठेकेदाराने पुरवठा करावा. नाशिक महानगरपालिकेला पुरवठा ज्या दराने केलेला आहे. त्या दरानुसार तसेच पुरवठा करण्यासाठी येणारा खर्च ही त्याप्रमाणेच देण्यात येईल व दर्जा सुध्दा चांगला पाहिजे. क्लोरीन गॅस येथे आणल्यानंतर त्यास चांगल्या प्रकारे ठेवण्यासाठी जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंता यांची राहील.

**मुख्य लेखाधिकारी :** क्लोरीन गॅस खरेदीसाठी निविदा पध्दतीने कार्यवाही केली असता रु. (७००/- (प्रती टन र. ९०० कि. ग्रॅ. दर प्राप्त झाले. इतर महानगरपालिकेस केलेला पुरवठा दर असा की, नाशिक ७,७००/- कल्याण-डोंबविली १२,०००/- पुणे १२,७०५/- याप्रमाणे पुरवठा केलेला आहे. पुणे, कल्याण-डोंबविली येथे पुरवठा करण्यात आलेले दर व या महानगरपालिकेमध्ये निविदा नुसार आलेले दर यात जवळपास ४०००/- रुपये फरक येत आहे. सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा.

**मुख्यलेखाधिकारी :** निविदा काढण्यात आल्या होत्या. त्यातील अटी व्यतिरिक्त निविदा धारकाने अटी टाकलेल्या आहेत. पुरवठा धारकाने लावलेल्या अटी योग्य नाही.

१. यासंबंधी काही वाद निर्माण झाल्यास न्यायालयाचे ज्युरीस डिक्शन (Jurisdiction Mumbai) मुंबई राहील त्याऐवजी औरंगाबाद राहील अशी दुरुस्ती करावी लागेल.

२. करामध्ये वाढ झाल्यास मालाचे दर वाढतील ही अट होती. ऐवजी करात वाढ झाली तरी दर तेच राहतील. अशी दुरुस्ती करावी.

**मा. सभापती** : कर वाढविण्यात आला तरी दर पुर्वीचेच राहतील, शिवाय न्यायालयीन कामाचे संदर्भात मुंबई ऐवजी औरंगाबाद न्यायालय राहील. या अटीसह प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे जलशुध्दीकरण प्रक्रियेत लागणारा वार्षिक क्लोरीन गॅस, खरेदी करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणारी मे. राजदीप इंटरप्रायजेस यांची " कर वाढविण्यात आला तरी दर पुर्वीचेच राहतील शिवाय न्यायालयीन कामाचे संदर्भात मुंबई ऐवजी औरंगाबाद न्यायालय राहील" या अटीसह खालील दर्शविलेल्या दराची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| | दर रु. ८७००/- (प्रति टन र ९०० किग्रॅं) इतर दुरुस्ती | |
| १. | हेड्रोलीक टेस्टींग | रु. १४००/- प्र. नग |
| २. | व्हॉल्व बदली करणे | रु. १२००/- प्र. नग |
| ३. | टनरला रंग देणे | रु. १३००/- प्र. नग |
| ४. | स्टीम पुर्णांक | रु. ७००/- प्र. नग |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

**श्री. जगदीश सिध्द :** जकात वसुली संदर्भात माहिती घेतली असता, मा. सभापती यांचे नावांने उपआयुक्त (प्र.) यांनी दिनांक १०-०७-२००१ ला पत्र देऊन माहिती दिली. दि. ११-०७-२००१ रोजी स्थायी समितीची सभा झालेली आहे. सभेच्या अगोदर फक्त १ तासाने माहिती मिळाली. सभा सुरु होण्याच्या अगोदर १ तास माहिती कळविल्यास सभागृहात स. सदस्य काहीही बोलु शकत नाही. या पत्रामध्ये एप्रील, मे, जुन महिन्यात जकात पोटी महानगरपालिकेस मिळालेले उत्पन्नाची आकडेवारी दिलेली आहे. मागील बेठकीत या विषयावर चर्चा झालेली होती. परंतु इतिवृत्त न दिल्याने उपआयुक्त यांनी या बैठकीत सविस्तर माहिती देण्यात येईल असा खुलासा केलेला होता. एप्रील २००१ मध्ये ३-३१ कोटी तर मे महिन्यामध्ये ४.०१ कोटी तर जुनमध्ये ३.७८ कोटीची वसुली दाखविलेली आहे. शहरातील चालु असलेली बांधकामे व त्यासाठी येणारे सिमेंट, रेती, विटा व इतर साहित्य

यामुळे किती वसुलीत वाढ झाली असा प्रश्न होता. त्यानुसार उपआयुक्त यांनी मागील २००० मधील एप्रील, मे, जुन महिन्यात वसुलीत झालेली वाढ याची टक्केवारी दाखवुन दिशाभुल केलेली आहे. शहरामध्ये ४० हजार अवैध बांधकामे असून, सर्व बिल्डरांचे एकुण १२ हजार प्लॉट टाईपची घरे बांधणचे काम चालु आहे. यासाठी सिमेंट, रेती, विटा, दाखल फरशी या वरील जकात गृहीत धरल्यास जवळपास १० कोटी वसुली यावयास पाहिजे होती परंतु फक्त एप्रील २००१ मध्ये ३.३१ कोटी वसुली झाल्याचे दाखवुन मागील एप्रील महिन्यातच चालु एप्रील महिन्यात झालेली वाढ ४% ने जास्तीची झालेली आहे. असे दाखविण्यात आले. ६१ कोटीचे जकातीचे उद्दीष्ट ठेवलेले असतांना ५५ कोटीच अपेक्षित आहे. असे उत्तर देणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांच्या का पदावर ठेवतात.

**मा.उप. आयुक्त (प्रशासन) :** जकात वसुली संदर्भात स. सदस्यांनी आरोप केलेले आहे. ते स्पेसिफीक नाहीत आतापर्यंत जी वसुली केलेली आहे. त्याची आकडेवारी सहीत तपशील आपल्याकडे दिलेल्या पत्रासोबत जोडलेला आहे. गेल्या ५ ते ६ वर्षापासुन जकात वसुली ही साधारणत: ऑगस्ट महिन्याच्या नंतर वाढवुन येते. प्रथम टक्केवारी लक्षात घेतली असता ६% ४% ३% अशी ३-३ महिन्यानंतर वाढ झालेली दिसुन येईल. मागील वर्षीची वसुली व चालु वर्षातील आतापर्यंतच्या वसुलीत ४% नी वाढ झाल्याचे दिसुन येईल. गरवारे कंपनीस येणाऱ्या कच्च्या मालामुळे प्रत्येक महिन्यात घट झालेली आहे. या शहरात येणाऱ्या कच्च्या मालाची आवक कमी झालेली आहे. या संदर्भात इतर महानगरपालिकेतील माहिती घेतली असता मागील ३ वर्षापुर्वीची व मागील वर्षानुसार झालेली जकातीची घट पुणे येथे ५%, पिपंरी-चिंचवट ९%, कोल्हापुर २%, नाशिक १% अशी घट झाल्याची आकडेवारी उपलब्ध झालेली आहे. मागील वर्षात ५३ कोटीचे उद्दीष्ट ठेवण्यात आले सुधारीत ५० कोटी केले. त्यानुसार ४८ कोटी वसुली झालेली आहे. म्हणजेच ९६% जकातीचे उद्दीष्ट पुर्ण झाले. मागील वर्षाच्या तुलनेत आजची झालेली वसुली १०% ती जास्त झालेली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत आजची झालेली वसुली १०% नी जास्त झालेली आहे. मागील वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या तुलनेत ८% नी जास्त वसुली झालेली आहे. ९७-९८ या वर्षात आपण २५ ॲटमच्या जकात वसुलीत वाढ केलेली आहे. त्यामध्ये एकुण ३० ॲटमचे रेटस वाढविण्यात आलेले आहे. या ॲटमवर १०% वाढीव उद्दीष्ट गृहीत धरण्यास ५४.५५ कोटीपर्यंत जकातीचे उद्दीष्ट पुर्ण होणे अपेक्षीत आहे. असे दिलेले आहे. गेल्या तीन महिन्यामध्ये खेळाचे साहित्य तसेच वह्या, पुस्तके यांची आवक होत नाही. त्यामुळे उत्पन्न कमी येते. गेल्या ४ महिन्यापासुन मंदीची लाट असल्यामुळे या शहरात औद्योगिक वसाहतीत येणाऱ्या मालाच्या आयातीत घट झालेली असून, २४८ वाहने कमी आले आहे. ऑगस्ट महिन्याच्या नंतर जकातीच्या उत्पन्नात वाढ निश्चित होईल.

**श्री. जबिंद दलबीरसिंग :** मागील वर्षाचे बजेटनुसार ४८ कोटीची फक्त वसुली करण्यात आलेली आहे. २ कोी कमी आलेले आहे. या वसुलीमध्ये काही चेकचा समावेश होतो सदर चेक पास करण्यात आले किंवा काय त्यांचा खुलासा करावा. ज्या ज्या ठिकाणी मशिनरी तसेच कपडा व इतर साहित्य उतरविले जाते तेथे जाऊन तपासणी करुन जकात आकारणी केली पाहिजे. राधाप्रेम

ट्रॅव्हलची गाडी शहरात कपडा घेऊन येते. काही वेळा जकातच घेण्यात येत नाही. यामध्ये संगनमत होत आहे. असे समजते एका गाडीला माल उतरविण्यासाठी वेळ दिल्यानंतर पुन्हा तीच गाडी त्याच पावतीवर माल शहरात आणण्याचे चित्र दिसुन येते. याबाबतीत चौकशी झाली पाहिजे. एका गाडीच्या संदर्भात मा. आयुक्तांनी जकात अधिक्षक यांना चौकशी करण्याचे अधिकार दिले होते. त्याबाबतीत अद्यापपर्यंत चौकशी करण्यात आलेली नाही.

**श्री. जगदीश सिध्द :** दिनांक १०-०७-२००१ च्या पत्रानुसार उपआयुक्त (प्र.) यांनी कळविले आहे की, शहरात साहित्य व वह्या-पुस्तके यांचा पुरवठा झालेला नाही. परंतु माझ्या माहितीप्रमाणे वह्या-पुस्तके व इतर साहित्य शहरात आयात झालेले आहे. मंदीची लाट दाखविलेली आहे. मी जो प्रश्न विचारला तो वेगळा आहे. खुलासा वेगळया पध्दतीने जो की, दिशाभुल करणारा दिलेला आहे. इतर महानगरपालिकेत झालेली घट याबाबत माहिती देण्यात आली परंतु पुणे सारख्या महानगरपालिकेत येथील शहरातील इतके अनाधिकृत बांधकामे चालु नाहीत. बांधकामासाठी शहरात येणार साहित्य या मालावर आकारण्यात येणारा जकात मिळुन एकुण एप्रील २००१ मध्ये ३.३१ कोटीची वसुली झालेली दाखविण्यात आलेली आहे. महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडुन बांधकाम परवानगी दिली जाते त्यानुसार कोणत्या भागात किती जागेवर बांधकाम होत आहे व त्यासाठी लागणारे साहित्य कोणते व किती किंमतीचे लागेल याचा अंदाज येऊ शकतो. यावरुन शहरात येणारे बांधकाम साहित्यावर किती जकात वसुल व्हावयास पाहीजे होती याचा सुध्दा अंदाज लागतो. बांधकामाचे साहित्य शहरात आल्यानंतर त्याची जकात घेतली का? किती जकात आली याची माहिती घेण्यात यावी. एकदाच पावती फाडुन बऱ्याच वेळा साहित्य शहरात आणले जाते. यासाठी अधिकाऱ्याचे सहकार्य लागते. बांधकाम करणाऱ्यांना पत्र देऊन जकात भरल्याची पावती भागवावी ही चोरी थांबविली तर यापासुन ७ ते ८ कोटी रुपये जकात वसुली दर महिन्या होईल. आज सुध्दा २० लाख जकात पोटी येऊ शकतात परंतु जकातीतील होणारी चोरी व तेथील सतत ७ ते ८ (१९९३-९४) पासुन काम करणाऱ्यांच्या बदल्या न होणे ही प्रमुख कारणे आहे. येथील कर्मचाऱ्यांचे सर्व लागेबांधे आहेत. मोकाशी व हिवराळे पायलट व इतर नावाने या विभागात प्रसिध्द झालेले आहे. कोणती गाडी कशी आडवावी व किती जकात वसुल करावा, किती रक्कम स्वत:कडे ठेवावी याची सर्व माहिती या कर्मचाऱ्यांना असते. अशा कर्मचाऱ्यांच्या त्वरीत बदल्या कराव्यात तसेच मागील बैठकीत जकात अधिक्षक, उपआयुक्त (प्र.) यांचेकडील सुध्दा चार्ज काढण्याबाबत चर्चा झालेली आहे. या शहरात एकुण ४७५ बीयर बार ची दुकने कार्यरत आहे. किती दारु येऊ शकते. याची माहिती घेऊन मा. आयुक्तांनी त्वरीत कार्यवाही करावी. अ कार्यक्षम अधिकारी/कर्मचारी यांना या विभागातुन काढुन टाकावे.

**श्री. मीर हिदायत अली :** जकात न भरता एक गाडी नाक्यावरुन शहरामध्ये आली व ती अडवुन संबंधित अधिकारी व गाडी मालक यांचे देवाण घेवाण याबाबत चर्चा चालु होती. त्या संदर्भात मा. आयुक्तांना मी घरी जाऊन माहिती दिली. मा.

आयुक्तांनी माहिती घेतली. सदर गाडीची १ लाख ४ हजार जकात भरावयास लावले.

**श्री. इलियास किरमानी :** उपआयुक्त (प्र.) यांचेकडील जकात विभागाच्या चार्ज काढुन उपआयुक्त (म.) यांचेकडे सोपवावा. जकातीमध्ये वाढ होईल. विकास कामे होतील.

**श्री. जगदीश सिध्द :** प्रतिनियुक्तीवर आलेल्या उपआयुक्तांना चार्ज द्यावा. उपआयुक्त (प्र.) यांना शहरातील होणारी अनाधिकृत बांधकामे यावर देखरेख ठेवण्यासाठी नियुक्ती करावी.

**मा. सभापती :** वसुली कमी का येते याचा खुलासा जकात अधिक्षक यांनी करावा व आता वसुलीत वाढ करण्यासाठी काय उपययोजना करणार आहात.

**जकात अधिक्षक :** जकात आवाकावर अवलंबुन असते. माल आला नाही तर जकात वाढ होत नाही. ओपन डिलेवरील सुरु केली बाजारभावाने मुल्यांकन करुन जकात आकारणी करण्यात येत आहे. सध्या जकात नाक्यावर व सेंट्रल नाक्यावर मिळुन २-३ वेळेस गाडयाची तपासणी केली जाते व त्यानुसार जकात आकारण्यात येत आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कार्यालयाकडे किती वाहनांचे रजिस्ट्रेशन झालेले आहे. अशी माहिती आपल्या कर्मचाऱ्यांन आणली आहे. त्यानुसार कार्यवाही केली जाईल. तसेच दारुबंदी अधिक्षक कार्यालयात आपले कर्मचारी पाडवुन दारुच्या संदर्भात माहिती घेऊन एप्रील महिन्यापासुन पावत्याची मागणी करुन कार्यवाही होईल.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** राधा प्रेम ट्रॉव्हलच्या गाडीत शहरात कपडा व इतर साहित्य आणले जाते. त्याची चौकशी करण्याचे आदेश तत्कालीन आयुक्त यांनी दिले होते. अद्याप चौकशी झाली नाही तसेच एका प्रकरणात पदाधिकारी/नगरसेवक यांना पैसे दयावे लागतात असे जकात अधिक्षक यांनी म्हटले ज्यांना पैसे देतात. त्यांची नांवे सभागृहात त्यांनी सांगावी.

**जकात अधिक्षक :** शहरात येणाऱ्या ट्रॉव्हल्स गाडयाची माल उतरवितांना तपासणी करुनच जकात आकारणी केली जाते. राधाप्रेम ट्रॉव्हल्वी गाडी सकाळी ४-५ वाजता येते. त्याचा संपुर्ण माल उतरुन घेतो. त्यांचा मॅनेजर येऊन जकात भरुन माल घेऊन जातो. यापुर्वी दोन्ही वसुल केला आहे.

**मा. आयुक्त :** जकात अधिक्षक यांनी पुढील महिन्यापासुन १०% जकात वसुलीत वाढ करुन दाखवावी.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** शहरात " रक्षाबंधन " या सणा निमित्त खुप मोठया प्रमाणात राखी आलेली आहे. १००/- रु. मध्ये जकात नाक्यावरुन गाडया सोडु दिल्या. त्यामुळे जकात वसुली न होता. महानगरपालिकाचे यात नुकसान झालेले आहे.

**जकात अधिक्षक :** शहरात माल आल्यास त्याची तपासणी करण्यासाठी आपण पथके तयार केलेली आहे.

**श्री. नंदकुमार फुलारी :** शहरामध्ये एकुण ४५० परमींट रुम-बीयरबार आहेत. शहराच्या बाहेर पंढरपुर येथे दारु उतरविली जाते व ३-३ बॉक्स करुन लहान गाडयावर जकात चुकवुन ती शहरात आणली जाते.

**मा. आयुक्त :** शहरात किती दारु येते याची माहिती दारु बंदी अधिक्षक कार्यालयात मिळेल. माहिती घेऊन कार्यवाही केली जाईल.

**श्री. सावंत मधुकर :** शहरात १३ दारुच्या कंपन्या आहेत किती दारुवर जकात वसुल केली जाते.

**श्री. जगदीश सिध्द :** शहरात बांधकामासाठी लागणारे साहित्य सिमेंट, विटा, वाळु, लोखंड किती येते व किती जकात वसुल झाली. हा प्रश्न मी मागील बैठकीत उपस्थित केला होता जकात अधिक्षक यांनी का माहिती आजच्या बैठकीत सादर केली नाही.

**श्री. जयवंत ओक :** जवळपास ११ वर्षापासुन जकात खाजगीकरणाचा प्रश्न चालु आहे. यात आणखी काय दुरुस्ती करुन खाजगीकरण करता येईल याकडे मा. आयुक्तांनी स्वतः लक्ष द्यावे. आताच शहरात येणार सिमेंट, विटा, लोखंड, वाळु यावर जकात आकारली जात नाही अशा सुचना करण्यात आल्या तसेच टी.व्ही वर जे चॅनल चालतात त्यांचे साहित्य आणले जाते. अशा सर्वच वस्तुवर किती जकात आकारावी व आकारली जाते याचा खुलासा घ्यावा जकातीमध्ये मोठया प्रमाणात चोरी होते हा सभागृहाचा उघडपणे आरोप आले. असे वाटते म्हणुन जकातीची चोरी थांबवायची असेल तर, लाचलुचपत खात्याची प्रत्येक नाक्यावर एक कर्मचारी नेमण्यात यावे जेणेकरुन चोरी होणार नाही व वसुलीत वाढ होईल सदर कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेने वेतन भत्ता देणे परवडेल. त्यांचे वेतनापेक्षा चोरीचे प्रमाण खुप होते. शहरात प्रत्येक दुकानाला सील लावावे आलेल्या मालाची जकात दिलेली आहे का? याची विचारणा करुन कार्यवाही केल्यास जकातीत वाढ होईल. तपासणी केल्यास जवळपास ७०% माल जकात न भरता शहरात आलेला आपणास दिसुन येईल. अशी परिस्थिती आहे. जकात विभागाच्या चार्ज उपआयुक्त (म.) यांचेकडे देण्यात यावा. नुसतीच सभागृहात चर्चा होते कार्यवाही काहीही नाही असे होऊ नये. प्रशासनाचे कर्मचाऱ्यांवर नियंत्रण आवे. वसुलीत वाढ होऊन विकास कामे व्हावीत एवढीच अपेक्षा आहे.

**श्री. तुळशी बागवाले किशोर :** अधिकारी / कर्मचाऱ्यांवर नेहमीच आरोप होतात त्यांचे खंडन करावे. जकात विभागामध्ये ६५ क. लिपीक, २५ हमाल, व इतर असे एकुण २२५ कर्मचारी कार्यरत असून, हा कर्मचारी वर्ग सक्रिय असला पाहिजे. जे कर्मचारी या विभागात १९९० व १९९३ या वर्षाच्या दरम्यान तेथे गेलेत त्यांच्या त्वरीत बदल्या कराव्यात जकात वसुलीसाठी वेगळे उपआयुक्त पद निर्माण करावे. जकातीचे उत्पन्न वाढवावे अशी आमची अपेक्षा आहे. कर्मचारी वर्ग सक्रिय असावा. ४५० बीयर बार आहेत. १३५ कोटीचे बजेट प्रत्यक्षात ८८ कोटीचे वसुली झाली. अशी परिस्थिती असेल तर विकास कामे करता येणार नाही. कर्मचाऱ्यांच्या बदल्यासंबंधी बऱ्याचवेळा सभागृहात नावानिशी चर्चा केली अशा कर्मचाऱ्यांना जकात विभागात ठेऊ नये. खालचे सर्व लोकही जबाबदार असतात. सभागृहात जो निर्णय घेतला गेला त्याची अंमलबाजावणी करण्याचे काम मा. आयुक्तांचे झाले.

**श्री. जयवंत ओक :** बऱ्याच वेळा कर्मचाऱ्यांच्या बदल्या होतात बदलीच्या ठिकाणी २-३ महिने राहतात. पुन्हा तेच कर्मचारी परत त्यांच्या पुर्वीच्या विभागात जातात अशी परिस्थिती आहे. त्यामुळे पुन्हा बदल्या करण्यासंदर्भात सभागृहात चर्चा होते. बऱ्याच वेळा नाक्यावर कर्मचारी यांना १००/- रुपये दिले की, एक गाडी सोडुन देतात असे चित्र आहे. याचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावयाचा असेल तर, मा. आयुक्तांनी माझ्या बरोबर यावे सर्व माहिती मिळेल. गाडी कुणी

अडवावी, तपासणी कुणी करावी, पावती कुणी दयावी याचे सर्व नियोजन असले पाहिजे कर्मचाऱ्यांच्या सर्व रक्कमेत वाटा-घाटी होतात सर्वांचे संगनमत आहे. म्हणुन अशा कर्मचाऱ्यांवर मा. आयुक्तांनी कार्यवाही करावी. त्वरीत बदल्या कराव्यात.

**मा. सभापती** : आपण आज जकातीबाबत चर्चा करतो. पत्रकार नाही आपण हा चांगला निर्णय घेत आहोत मी एक व्यापारी आहे. त्यानंतर नगरसेवक सर्वात मोठी चुक कोठे होते ते म्हणजे सेंट्रल नाक्यावर बोलाविणे. फार किचकट असेल तर, पाठवावे. एका पावतीवर शहरात ३ ते ४ गाडया येतात. क्रमांक तेच असते. माझ्या बरोबर चला सिमेंट गोडवुन दाखवुन सिमेंट गोडावुनची एक पावती फाडतो व ४ ट्रीप करतात. बीड नाक्यावरुन पैठण कडे जाण्यासाठी २० रुपयांची ट्रांमीट पावती फाडतात. पैठणला न जाता नवीन उड्डाणपुलावरुन शहरात घुसतात. पैठणला माल न जाता सरळ शहरात येतो. शहरात फटाके येतांना वरती गोळया बिस्कीटे असतात व खाली फटाके असतात. माल दुकानात येईपर्यंत हमी घेण्यात येते. कुणीही मालावर जकात फाडत नाही. कुरीअर एजन्सीज कडुन हफ्ते बांधलेले आहेत. पाकीट फोडु नये म्हणुन व त्रास देवु नये म्हणुन बाबा पेट्रोल पंपावर कुरियर वाल्याकडुन ५ दिवस उशीर झाला की गाडी आणुन ठेवली. नांवे माहित आहेत. जवानाच्या घरांची चौकशी करावी. एकाच नाक्यावर तेच तेच लोक ठेवण्यात येतात. काही एजन्सीज पुर्ण एक नंबर मध्ये बील फाडतात. ५०% एजन्सी व ५०% कंपनी जकात भरेल असेही काही प्रकरणे असतात. नाक्यावर इन्स्पेक्टर नाही म्हणुन गाडी लावली. मीच गुद्दे साहेब उच्च न्यायालयात होतो. वाहुळ यांना फोन लावला. गाडी उभ आहे अधिकारी नाही त्यांनी नंतर श्री. मोकाशीला पाठवुन पावती फाडली. काही मालावर वाहन चालकास एका गाडीवर एक गाडी फ्री मिळते. बीड नाक्यावर कितीतरी येतात. सिल्लोडच्या नावांने जकातीची पावती मात्र दुकान येथे असते. ही सर्व तडफोड असते. यात कोणत्याही एका अधिकाऱ्याच्या दोष नाही. कोल्हापुरला खाजगीकरण झाले त्यात १०% वाढ झाली. चोऱ्या चालुच असतात. व्यापारांना सांगण्यात येते की, खाजगीकरण होत नाही. रक्कम वाटाव्या लागतात असेही सांगण्यात येते. ओपन डिलेवरी का घेत नाही. ट्रान्सपोर्टवाले माझे मित्र आहेत. त्यांचेकडुन माहिती मिळते. टायर स्टील ई पावती नाही. निम्मे-निम्मे वाटुन घेतले जाते. सर्वच चोरी थांबणार नाही. सर्वांनाच मध्यवर्ती जकात नाक्यावर बोलवु नका काही वाहने क्रांतीचौक पर्यंत येतात नंतर मध्येच घुसतात. जकातीबाबत धाडसी निर्णय घेण्यात यावा. पुणे महानगरपालिका जकातसंबंधी यापुर्वी कल्पना दिली होती. त्याचा अभ्यास करायला हवा. ओपन डिलेवरी मध्ये १३ लाखाचे २० लाख होते. मध्यवर्ती जकात नाक्यावर जागा वाढवुन घ्यावी. ट्रक खाली करुन घ्यावे, यांत्रिकी विभागात जागा जास्त आहे. या व्यतिरिक्त सुचना करुन इच्छितो की, तुम्ही एकटे कारणीभुत नाहीत येथे ९३-९४ पासुन कर्मचारी काम करतात. जकात विभागात १ वर्षापेक्षा जास्त ठेवु नका व पुन्हा ३ वर्ष जकात विभागात घेऊ नका. तरच जकात बरोबर चालेल. मी देखील राधाप्रेम ट्रॉव्हल्स बाबत १० वेळा सांगितले असेल. भावनेची कदर व्हावी. मी जे बोललो ती वस्तुस्थिती आहे. महानगरपालिकेच्या हितासाठी बोलणे.

**श्री. जयवंत ओक :** मा. सभापती यांनी जी सुचना केली यावर मा. आयुक्तांचे काय मत आहे. खुलासा दयावा. याबद्दल मा. आयुक्तांची काय भुमिका आहे.

**मा. सभापती** : शहरात ज्या ज्या वेळी कोणत्याही गाडी माल घेऊन येते. पावतीवर वेळ टाकण्यात आला पाहिजे. तसेच ज्यांचे चेक बाऊन्स होत आहे अशा लोकांवर पोलीस गुन्हा दाखल करण्यात यावे.

**जकात अधिक्षक :** जकात घेतल्याची जी पावती दिली जाते. त्यावर वेळ टाकण्यात येतो. तीन तासाच्या आत संबंधित मालकाने गाडीतील माल उतरावयास पाहिजे असे नियमात आहे.

**मा. उप आयुक्त (प्र.) :** ज्यांचे चेक बाऊन्स झाले अशा लोकांनानियम क्र. ३० नुसार पहिल्यांदा संबंधित मालकास १५ दिवसांची नोटीस देण्यात येवुन त्यानंतरच गुन्हा नोंदविता येतो.

**श्री. जगदीश सिध्द :** ज्यांनी चेक दिले ते जर बाऊन्स झाले तर त्यांचेकडुन रोखीने वसुली करावी.

**मुख्यलेखाधिकारी :** आतापर्यंत ११ ट्रान्सपोर्ट एजन्सीचे चेक बाऊन्स झालेले आहे. त्यांचेकडुन रोखीने रक्कम वसुल करावी म्हणुन आपण पत्र दिलेले आहे. त्यानुसार संबंधिताकडुन रोख रक्कम वसुल करण्यात येईल.

**मा. उपआयुक्त (प्र.) :** मा. सभापती यांनी आताच एक सुचना केली की, सेंट्रल नाक्यावर गाडी येण्याच्या अगोदर इतर नाक्यावर गाडीची ओपन डिलेवरी व्हावी परंतु त्याची अंमलबजावणी आपणास सध्यातरी जागे अभावी करता येणार नाही.

**मा. सभापती** : मा. आयुक्तांच्या सुचना करतो की, जकातीचे उत्पन्न जास्ती व जास्त कसे वाढेल याकडे लक्ष देऊन वसुलीत वाढ करावी.

**मा. आयुक्त** : जकातीत गळती ही स्टाफशिवाय होत नाही. आपली जकात ७० कोटी पर्यंत व्हावी. निविदा प्रसिध्द केल्यानंतर किती येईल ते कळेल. ऑक्टोबंर मध्ये खाजगीकरणाबाबत विचार व्हावा. आपणाकडे ८-१० वर्षापासुन काम करत असल्याने सर्वांसह संबंध दृढ झालेले आहे. साखळी तुटणार नाही. या खात्यास ४ पॉकेट तर इतर खात्याकडे १-२ पॉकेट असतात. दारुमध्ये चोरी होते. दुमत नाही. एक्साईज अधिक्षक यांचेकडुन जावक झाल्याबद्दलची माहिती घ्यावी. जकात भरलेली नाही कळेल. १० पट वसुल करता येईल. नवीन वाहने नोंदणी घेतात. त्याची माहिती घेतल्यास जकात भरली की नाही ते समजु शकेल आपणास कापडयाची चोरी दिसते सोने, चांदी, सिगारेट ई. ची चोरी होत असेल तर, खात्यास किड आहे. ती काढावा लागेल.

**श्री. जगदीश सिध्द :** बदलुन गेलेले तत्कालीन आयुक्त तसेच मा. महापौर यांनी " महानगरपालिका आपल्या दारी " हा कार्यक्रम राबविला त्यावेळी मा. आयुक्त तसेच मा. महापौर माझ्या वार्डात येऊन पाहणी करुन गेले. माजी आयुक्तांनी दिलेले आदेश रद्द होतात का? माझ्या वार्डातील कोटीच्या वाडा येथे असलेल्या ड्रेनेजच्या लाईन नेहमी चोक अप होते. मा. आयुक्तांनी यावेळी प्रत्यक्ष संबंधित अधिकाऱ्यांना ही पाईपलाईन काढुन २०० फुट लांबीची ड्रेनेज लाईन टाकण्याचे आदेश दिलेले असतांना संबंधित अधिकारी यांनी ४० फुट लांबीची ड्रेनेज लाईन टाकण्याची कार्यवाही केली. सदर ड्रेनेज लाईन टाकावयाचे जागेवर कुणाचाही आक्षेप नाही. त्या जागेचा

नकाशा माझ्याकडे आहे. अतिक्रमणात येत असेल तर, ते पाडण्याचे आदेशही आयुक्तांनी दिले असतांना का कार्यवाही केलेली नाही.

**कार्यकारी अभियंता (पा. पु.) :** मा. आयुक्तांनी लेखी आदेश दिलेले नाही. ज्या जागेवरी मंजुरी नाही तेथे करता येणार नाही. संबंधित लोकांकडे त्यांची मालकी हक्काबाबतची कागदपत्रे आहेत. त्यामुळे पुढील कार्यवाही करता येणार नाही.

**श्री. जगदीश सिध्द :** सदर जागेवर कुणाचा मालकीहक्क किंवा अतिक्रमण आहे. काय याबाबत कर्मचारी अभियंता यांनी प्रशासकीय विभागाकडे पत्र देऊन विचारणा केलेली आहे काय? कार्यकारी अभियंता यांचेकडे झोन अधिकारी यांनी सुध्दा ४ पत्र देऊन या कामाची कार्यवाही करण्याचे कळविले आहे. मा. आयुक्त, मा. महापौर यांनी येथे ड्रेनेज लाईन टाकण्याचा निर्णय घेतलेला असतांना अद्याप का कार्यवाही झालेली नाही.

**मा. सभापती** : यासंबंधी कार्यवाही अभियंता यांनी नियमानुसार कार्यवाही करावी.

**श्री. जगदीश सिध्द :** मा. उच्च न्यायालयाचे निर्णय झालेला आहे. कार्यकारी अभियंता, उप-अभियता मा. उच्च न्यायालयाचे आदेश पाळत नाही. ४ दिवसांपुर्वी अधिकाऱ्यांच्या पदा संदार्भात मा. उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला असतांना सदर संचिकेवर पुन्हा वेगवेगळे शेरे देऊन संचिका सादर होत आहेत. मा. सर्वोचच न्यायालयाने स्थगिती देईपर्यंत राहणार आहेत का? ३ तारखेला निर्णय व ४ तारखेपासुन तेच सध्या करतात.

**मा. आयुक्त** : न्यायालयाने घेतलेल्या निर्णयाची प्रत प्रशासनाकडे प्राप्त झालेली नाही. या संदर्भात प्रशासकीय कार्यवाही चालु आहे. नियमाप्रमाणे प्रशासन कार्यवाही करील. या संदर्भात स. सदस्या यांनी लेखी प्रश्न करावा. त्याचे उत्तर लेखी स्वरुपात दिले जाईल. न्यायालयीन प्रकरणात सभागृहात चर्चा करणे योग्य नाही.

**श्री. भरत लकडे :** माझ्या वार्डात एक व्यक्तीने महानगरपालिकेचा खुल्या जागेवर अतिक्रमण करुन ८ महिन्यापुर्वीच स्वतःच्या नावांने पी. आर. कार्ड तयार केले. या संदर्भात मी ५ महिन्यापासुन संबंधित सर्व विभागांना पत्र दिले कार्यवाही क झालेली नाही. तसेच बऱ्याच वेळी स्थायी समितीच्या सभेत सुचना करुन प्रश्न उपस्थित केलेला आहे. (याचवेळी पी. आर. कार्डची प्रत. म. आयुक्तांकडे देतात.)

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी यासंबंधी कार्यवाही करावी.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** १० लाख रुपयापर्यंतचे विकास कामे करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना देण्यात आलेले आहे. त्यापेक्षा अधिक रक्कमेचे अधिकार स्थायी समितीला आहे. आतापर्यंत ५० हजारापेक्षा जास्त रक्कमेची झालेली विकास कामे कोणती १० लाखाच्या रक्कमेपर्यंत झालेली कामे कोणती याची यादी संबंधित विभागाचे अधिकारी यांना दयावयाचे सांगण्यात आलेले होते. अद्याप त्याची माहितीची यादी आलेली नाही. त्यानंतर दोन स्थायी समितीच्या बैठका संपन्न झालेल्या आहेत.

**मा. सभापती** : यासंबंधी सर्व विभाग प्रमुखांना माहिती सादर करण्याचे आदेशित केलेले होते.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** ५० हजार रक्कमेच्या वर विकास कामे झाल्या बाबतची यादी उदया पाठविण्यात येईल.

**अतिरिक्त शहर अभियंता :** अशा प्रकारच्या विकास कामाची यादी देण्यात आलेली आहे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** माहिती तयार नाही लवकरच देण्यात येईल.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** आरोग्य विभागाचे औषधी व गोळया खेरदी बाबतचे ३५ लाखाचे निविदा मंजुरीसाी येणार होत्या त्याबद्दल काम झाले खुलासा करावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** तसा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करण्यात येईल.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** जलतरण तलाव या विभागामध्ये एस. सी. या जातीच्या संवर्गातील पद असतांना तेथे खुल्या संवर्गातील उमेदवाराची नेमणुक करण्यात आलेली आहे.

**मा. आयुक्त** : नियमाने कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** रामदासनगर येथील बांधकाम संचिका नगररचना विभागात मिळत नाही महानगरपालिकेस दयावयाच्या एकुण १६ लाखात पार्कीगमध्ये दुकाने लोकांना विक्री केल्या (त्याबाबतच्या कागदपत्राची प्रत मा. सभापती यांचेकडे देतात.) विचारणा केली असता सदर प्रकरणाची संचिका गहाळ झाल्याचे सांगण्यात येते. असे होत असेल तर योग्य नाही.

**मा. आयुक्त** : संचिका गहाळ होत असेल तर, संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कार्यवाही केली जाईल यात शंका नाही.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** स्मशान घाटच्या बाजुला संरक्षित भिंतींचे काम केले. संबंधिताने महानगरपालिकेची परवानगी घेतलेली आहे का, खुलासा करावा. माझ्या माहितीप्रमाणे विना परवानगीने बांधकाम केलेले आहे.

**मा. सभापती** : प्रशासकीय अधिकारी यांनी या संबंधी माहिती घेऊन तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री. इलियास किरमानी :** मोंढा भागात तीन दुकांनाना भीषण आग लावुन ५ लोक गंभीर जख्मी होऊन त्यापैकी तीन लोक अतिशय जख्मी होऊन त्यांना दवाखानयात दाखल करण्यात आलेले आहे. यात बरीच मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान सुध्दा झालेले असून, दुकानांच्या भिंती सुध्दा पडलेल्या आहेत. सदर भिंतीचे दुरुस्तीचे काम करण्यासाठी त्या लोकांना परवानगी देण्यात यावी. या संदर्भात वृत्तपत्रात सुध्दा बातमी आलेली आहे.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी स्थळ पाहणी करुन पुढील कार्यवाही करावी. आजच्या बैठकीत जकात वसुली या विषयावर सर्वांनी अत्यंत अभ्यासपुर्वक चर्चा केली व अधिकारी यांनी सुध्दा चांगल्या प्रकारे उत्तरे दिली व जकात वाढविण्याबाबत प्रशासनाने प्रयत्न करावे हे सभागृह प्रशासनाचे पाठीशी आहे. आजच्या बैठकीला सर्वांचे सहकार्य मिळाले त्याबद्दल धन्यवाद देतो.

या बरोबर " जण गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | स्थायी सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ११-०९-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मंगळवार दिनांक ११-०९-२००१ रोजी मा. सभापती, श्री. प्रशांत देसरडा, यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समिती सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे सकाळी ११.३० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला कार्यालयीन अधिकारी यांचेसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. कावडे साहेबराव रणुबा | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. सिध्द जगदिश कन्हैयलाल | -//- |
| ३. | स. स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग | -//- |
| ४. | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ५. | स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | -//- |
| ६. | स. स. श्री. सलीम पटेल समशेर पटेल | -//- |
| ७. | स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| ८. | स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली | -//- |
| ९. | स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| १०. | स. स. श्री. शे. इलियास किरमानी शे. उमर | -//- |
| ११. | स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतू | -//- |
| १२. | स. स. श्री. ओक जयवंत केशवराव | -//- |
| १३. | स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | -//- |
| १४. | स. स. श्री. डॉ. श्रीमती आशा बिनवडे | -//- |

सभेचे कामकाज सुरु होण्यापुर्वी सभागृहातर्फे स. सदस्य श्री. घोडेले नंदकुमार यांचेकडील श्री. राधाकिसन घोडेले यांचे दुःखद निधन झाले. त्याबद्दल सर्वांनी ०२ मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली.

**संवाद :**

**श्री. जयवंत ओक :** आजच्या सभेला अधिकारी उपस्थित दिसत नाही. महिन्यातुन एक बैठक होते. सर्व अधिकारी सभेला उपस्थित असणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : मा. आयुक्त आजारी आहे. उपआयुक्त (प्र.) श्री. कांबळे साहेब मला विचारत गेलेले बाकी कुण्याही अधिकाऱ्याने मला पुर्व कल्पना दिलेली नाही.

**श्री. किरमानी इलियास :** सभापती यांची पुर्व परवानगी न घेता अधिकाऱ्यांनी अनुपस्थित राहणे हा सभापती तसेच सभागृहाचा अपमान आहे.

**श्री. सलीम पटेल :** जे अधिकारी पुर्व परवानगी न घेता सभेला गैरहजर आहे. त्यांना ५०% दंड करण्यात यावा.

**मा. सभापती** : जे अधिकारी सभेला उपस्थित नाही. त्यांचे बद्दल प्र. आयुक्त काय निर्णय घेणार माहिती दयावी.

**प्र. आयुक्त. (उआ. म.) :** प्रशासकीय अधिकारी श्री. जरारे हे एका प्रकरणासंबंधी न्यायालयात गेलेले आहे. इतर कुण्याही अधिकाऱ्यांनी तशी पुर्व कल्पना

दिलेली नाही व अशा अधिकाऱ्यावर काय कार्यवाही करायवी हे सभागृहाने ठरवावे.

**श्री. सलीम पटेल :** जे अधिकारी उपस्थित आहे. त्यांचे नावाची नोंद घ्यावी जे गैरहजर आहेत. त्यांना ५०/- रु. दंड आकारावा.

**मा. सभापती :** जे उपस्थित आहे. त्यांची नोंद घ्यावी. जे उशिरा आले त्यांची सुध्दा नोंद घ्यावी. सभागृहात उपस्थित असलेले अधिकाऱ्यांची नांवे खालील प्रमाणे.

१) पशुधन विकास अधिकारी, २) सहाय्यक आयुक्त-१, ३) अग्निशमन अधिकारी, ४) शहर अभियंता, ५) आरोग्य वैद्यकीय अधिकारी, ६) मुख्य लेखाधिकारी, ७) उप अभियंता-१, ८) विद्युत उपअभियंता-२ तसेच, ९) उपआयुक्त (म.), १०) शाखा अभियंता-१ (काळेले) नगररचना विभाग ११) नगरसचिव

१) अतिरिक्त शहर अभियंता, २) करमुल्य निर्धारण अधिकारी-२, ३) श्री. निकम अधिकारी सभागृहात विना परवानगीने अनुपस्थित आहेत. त्यांना ५०/- रु. दंड लावण्यात यावा. जे उशिरा आले त्यांली लेखी द्यावी.

**श्री. जयवंत ओक :** पत्रकारांना सर्वसाधारण सभेच्यावेळी पत्रकार कक्षात बसण्याची परवानगी देण्यात येते. त्याचप्रमाणे स्थायी समितीच्या सभेचे वेळी सुध्दा बसण्याची परवानगी द्यावी. आपण सर्वांनी सभागृहात घेतलेले निर्णय व त्यानुसार होणारी विकास कामे यास प्रसिध्दी मिळेल. जनतेला समजेल की, नागरिकांसाठी हे सभागृह काय निर्णय घेतात.

**मा. सभापती :** महापौर यांचे दालनात मा. आयुक्त व सर्व पदाधिकारी व समवेत बैठक झाली. नुतन आयुक्त यांना सर्वांनी सहकार्य करण्याची भावना व्यक्त करुन दोन-तीन प्रश्नावर निर्णय घेण्यात आले. त्यात मा. आयुक्त यांना भेटण्याची वेळ ३.०० वाजेनंतर ठरविण्यात आली तसेच प्रभाग समिती सभा महिला बाल कल्याण समिती व स्थायी समिती इतर सर्वसाधारण सभे व्यतिरिक्त होणाऱ्या सर्व सभांना पत्रकारांना पत्रकार लक्षात येण्याचे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन पुन्हा मा. आयुक्तांशी चर्चा करण्यात येईल व याबद्दल विचार करावा लागेल.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** हे सभागृह याबाबतीत निर्णय घेऊ शकते. आयुक्तापेक्षा सभागृह सर्वोच्च आहे.

**श्री. जयवंत ओक :** वेगळया भावनेतुन पत्रकारांना सभेच्या वेळी परवानगी नाकारली अशी शंका आहे. सध्या शहरात कुठेही कामे चालु नाही. एकाच संचिकेवर ३-३ रिमार्क येतात. अनाधिकृत वसाहतीत कामे करता येत नाही. तो मुद्दा तर बाजुलाच ठेवावा परंतु ज्या अधिकृत वसाहती आहे तेथे सुध्दा विकास कामे होत नाही. जनतेला आम्हाला तोंड दयावे लागते. अधिकाऱ्याकडे जनता येत नाही. सभागृहात चर्चा होते. त्यानुसार कामे न झाल्यास प्रशासन बदनाम होते. अशा प्रकारच्या बातम्या येतात यादृष्टीने पत्रकारांना येण्याचे नाकारले असले तर, योग्य नाही नियमाने मंजुरीसाठी गेलेल्या संचिका मंजुर होऊनच आल्या पाहिजे. केवळ आयुक्त जे म्हणतील याप्रमाणे कामकाज करायचे हे योग्य होणार नाही. सर्वसाधारण सभेव्यतिरिक्त इतर सभा संपन्न झाल्यानंतर सभापतींनी पत्रकारांना माहिती दयावी व सर्वसाधारण सभेत बसण्याची परवानगी देतात तर महापौरांना सुध्दा सभा संपल्यानंतर सर्वसाधारण सभेतील घेतलेल्या निर्णयाच्या संदर्भात पत्रकारांना सभा संपल्यानंतर माहिती

देऊ शकतात तर सर्वसाधारण सभेत सुध्दा पत्रकारांना येण्याचे बंद करावे. सर्वच कामकाज गोपनीय चालु दयावे. नसता स्थायी समिती सभेल सुध्दा पत्रकारांना येण्याची परवानगी देण्यात यावी.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :**सर्वसाधारण सभेसाठी पत्रकारांना परवानगी आहे. त्याप्रमाणे स्थायी समिती सभेस बसण्याची सुध्दा परवानगी का नाही हे स्पष्ट व्हावे. पारदर्शकता असावी कारण आर्थिक बाबीबाबत येणारे सर्व प्रस्ताव स्थायी समिती यापर्यंत मंजुर होऊन विकास कामे केली जातात. बैठकीत जे कामकाज चालते पत्रकारांनी योग्य ती बातमी जनतेपर्यंत पोहचली तर यात गैर काय? पत्रकारांना परवानगी देण्यास हरकत नाही. सभागृहाने तशी भावना व्यक्त केली.

**मा. सभापती** : मा. महापौर दालनात बैठक आली त्यावेळी सर्व पदाधिकारी मा. आयुक्त उपस्थित येते जेव्हा हा मुद्दा उपस्थित झाला तेव्हा मा. आयुक्तांनी मत मांडले की इतर महानगरपालिकेतुन पत्र देऊन माहिती घेतली असता सर्वसाधारण सभे व्यतिरिक्त इतर सभांना पत्रकारांना प्रवेश बंद आहे. त्या धरतीवर आपल्या महानगरपालिकेमध्ये सुध्दा अंमलबजावणी करु त्यानुसार कार्यवाही केलेली आहे.

**श्री. जयवंत ओक :** कुणाच्या सांगण्यावरुन निर्णय घेतलेला असेल तर, तो निर्णय रद्द करुन सभागृहात पत्रकारांना येण्याची परवानगी देण्यात यावी जेणेकरुन हे सभागृह काय काम करते कोणते निर्णय कसे घेतात हे जनतेला प्रत्यक्ष दिसुन येतील. जर पत्रकारांनी चुकीची बातमी छापल्यास नियमाने कार्यवाही करता येते.

**मा. सभापती** : पत्रकास योग्य बातम्या छापतात व त्यानुसार मा. आयुक्तांना या संमतीने कामे करावी लागतात व पत्रकारांना येण्यास नाकारले व कामे होत नसेल तर, या संदर्भात मा. आयुक्तांशी चर्चा करुन सभागृहाच्या भावना लक्षता घेऊन योग्य तो निर्णय आपणास घेता येईल.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** सभागृहात पत्रकारांना बसण्यासाठी पत्रकार कक्ष तयार केला आहे. महानगरपालिकेचा पैसा खर्च झाला. मा. आयुक्तांना विचारण्याची आवश्यकता नसून, हा सभागृहास निर्णय घेण्याचा अधिकार आहे. आपण तसे आदेश करावेत.

**श्री. तुळशीबागवाले :** आयुक्त नुकतेच रुजु झालेले होते. पदाधिकाऱ्या समवेत मा. महापौर दालनात बैठक आली. आयुक्तांनी प्रश्न उपस्थित केला की, इतर महानगरपालिकेमध्ये सर्वसाधारण सभे व्यतिरिक्त इतर सभांना पत्रकारांना प्रवेश नाही व सभा संपल्यानंतर सभापती किंवा सभेचे अध्यक्ष पत्रकारांना त्यांचे कक्षात बोलावुन सभेतील माहिती देऊ शकतात. सभागृहात उपस्थित होणार प्रश्न व स. सदस्य व अधिकारी यांचेत झालेल्या चर्चेचा संवाद वृत्तपत्रात उलटसुलट छापल्या जातो. अशी सुध्दा चर्चा झाली व त्यामुळे अशा सभांना पत्रकाराचा प्रवेश बंद करावा म्हणुन निर्णय आला सर्व पदाधिकारी यांनी मान्य केला पुन्हा झालेला निर्णयात बदल करण्याचा अधिकार या सभागृहाला आहे.

**श्री. जयवंत ओक :** पत्रकाराच्या भितीनेच अधिकारी कामे करत असतील तर योग्य नाही. पत्रकार चुकीच्या बातम्या छापतात असे म्हणता येणार नाही. कोणत्याही वार्डात कामे चालु नाही १-१ महिना संचिका एकाच टेबलावर पडुन

आणतात. मंजुरीसाठी संचिका गेल्यास ३-३ वेळेस रिमार्क येतात. टेंडर झालेल्या कामा संदर्भातील संचिका सुध्दा मंजुर होत नसेल तर, योग्य नाही. खडकेश्वर भागातील एका रस्त्यावर फुटपाथ बाबतची संचिका या विभागातुन दुसऱ्या विभागाने जाते. कोणते काम केव्हा व्हावे यासाठी वेळ निश्चित असावे. कोणतीही कामे केव्हा ही करायची असे प्रशासनाचे धोरण योग्य नाही. निविदा स्तरावर संचिका थांबविण्यात येत आहे.

**श्री. सलीम पटेल :** माझ्या वार्डातील फुटपाथचे एका कामाचे टेंडर मंजुर होऊन २ महिने झाले संचिक तशीच पडुन आहे.

**श्री. भरत लकडे :** चर्चा करायची नसेल तर फाईलवर तसे कशाला लिहीतात.

**मा. सभापती** : सभागृहात ज्या भावना व्यक्त केल्या त्यासी मी सहमत आहे. एक संचिका टॅग नव्हता टॅग लावण्यास १० मिनिटे लागतात. म्हणुन एका विभागात दिड महिना सदर संचिका पडुन होती. अशी परिस्थिती असेल तर, योग्य नाही.

**श्री. मीर हिदायत अली :** एकाच संचिकेवर ४ वेळेस चर्चा करा असे दिल्यास खालचे अधिकारी काम चर्चा करणार अशा सर्व संचिका निकाली काढाव्या तसेच एका संचिकाबाबत ३ महिन्यापुर्वी खालच्या अधिकाऱ्यांना चर्चा करावी असे निर्देश दिले अद्याप चर्चा केलेली नाही. वार्डातील कोणतीच कामे होत नाही. नुसती बैठकीत चर्चाच होते याला काही अर्थ नाही.

**श्री. साहेबराव कावडे :** वार्डात लाईटचे पोल मिळण्यासंदर्भात २-३ वेळेस पत्र दिले नुसते आश्वासन देतात कार्यवाही काहीच होत नाही. बजेट नाही म्हणुन सांगण्यात येते दुसऱ्या हेड मधुन पोल खरेदी करावे.

**अतिरिक्त शहर अभियंता :** विद्युत साहित्यासाठी (पोलसाठी) आपल्याकडे सध्या बजेट नाही. मे. महिन्यातच बजेट संपले असून, त्यानंतर कोणते इस्टिमेंट तयार केलेले नाही.

**मा. सभापती** : दुसऱ्या हेड मधुन रक्कम घेता येत असेल तर, तशी कार्यवाही केलेली नाही. बजेटमधील तरतुद नोंद झालेल्या सर्व संचिका निकाली काढाव्यात.

**श्री. सलीम पटेल :** ज्या ज्या कामाचे निविदा निघाल्या अशी सर्व कामे करावी. नवीन कामासाठी अंदाजपत्रक तयार करु नये. कोणत्याही संचिकेबाबत चौकशी केली असता उडवाउडवीचे अधिकाऱ्यांकडुन उत्तेर मिळतात.

**मा. सभापती** : सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन ज्या संचिकेमध्ये विकास कामासाठी बजेट नोंद झाली. निविदा काढल्या एजन्सी निश्चित करण्यासाठी संचिका थांबवुन आहे. अशा सर्व संचिका संबंधित अधिकारी यांनी आजच्या आज मा. आयुक्तांच्या मंजुरीसाठी पाठवुन पुढील कार्यवाही करण्यात यावी प्रत्येक बैठकीत संचिकेबाबत सभागृहात चर्चा होणे योग्य नाही. वेळेवर कामे व्हावी अशी सभागृहाची भावना आहे. बजेट नसेल तर, दुसऱ्या हेडमधुन घेऊन कार्यवाही करावी.

**श्री. मधुकर सावंत :** रमानगर चेतनानगर या स्लम भागात एका कामा संदर्भात पत्र दिले होते. विचारणा केली असता सदरील काम करण्यासाठी म्हाडाकडे पाठविले असे सांगण्यात येते. पत्र देऊन वर्ष झाले पावसाळयाचे दिवसात सदर भागात ३-४ इमारतीत पाणी जाते.

**मा. सभापती** : रमानगर, चेतनानगर येथील भागातील स. सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे काल का झाले नाही याचा अहवाल पुढील बैठकीत संबंधित अधिकारी यांनी दयावा.

**मुख्यलेखाधिकारी :** जी. आय. पोलीसाठी १० लक्षाची तरतुद होती. स्पील ओव्हरची काही कामे होती.

**श्री. कावडे साहेबराव :** स्पील ओव्हरची किती कामे केली जी. आय. पोलसाठी १० लक्षची तरतुदी होती ती संपलेली आहे काय? नवीन पोल असो किंवा जुने असो त्यात आमची कामे झाली पाहिजे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** प्रशासनाने सर्व स. सदस्यांच्या निर्दशनास आणुन दयावे की,१२५ कोटीचे आपण बजेट ठेवले. स्पील ओव्हरची किती कामे केली चालु आर्थिक वर्षातील एकुण झालेली कामे व चालु असलेली कामे किती याची माहिती सभागृहाला दिली पाहिजे.

**श्री. नंदकुमार फुलारी :** माझ्या वार्डामध्ये महाराणा प्रताप सदगुरु कृपा गृहनिर्माण संस्थेचे स्वेच्छा निधीतुन एक काम करण्याचे प्रलंबीत आहे. का काम होत नाही. माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती** : या संदर्भात संबंधित अधिकारी यांनी तात्काळ नियमाने कार्यवाही करावी.

**श्री. मीर हिदायत अली :** एक काम लहान रक्कमेचे खर्चापर्यंत आवश्यक व तात्काळ करणे गरजेचे होते म्हणुन मी दिनांक १८-०८-२००१ ला पत्र दिले. या संदर्भात संबंधित विभागातील कनिष्ठ अभियंत श्री. पवार यांचे ते काम आहे. लहान कामाचे कनिष्ठ अभियंता यांनी रेट लिस्ट तयार करुन २ दिवसात ते काम करण्याचे आदेश करावेत चेलीपुरा पोलीस चौकी समोर एक माणुस पडला त्याचा हात फ्रॅक्चर झाला.

**श्री. जगदीश सिध्द :** अंगुरीबाग, पानदरीबा, चौराहा भागातील काही रस्त्याचे काम करण्याचे अंदाजपत्रक मंजुर झाले. निविदा काढण्यात आली नाही. या संचिकेबाबत माहिती घेतली असता कुठेही संचिका आढळुन आलेली नाही संचिका कुणाकडे आहे माहिती घ्यावी.

**अतिरिक्त शहर अभियंता :** या भागातील रस्त्याचे कामा बाबतची संचिका पाठविलेली आहे पाहुन सांगतो.

**श्री. जगदीश सिध्द :** ज्या विकास कामासाठी खर्चाच्या लेखा विभागात नोंदी आल्या अशा सर्व संचिका निकाली काढल्या नवीन अंदाजपत्रक तयार करण्यात येऊ नये.

**मा. सभापती** : कोणत्या वार्डात कोणती विकास कामे चालु आहे व सन्माननीय सदस्यांनी पत्रानुसार कामे करण्याबाबत मागणी केली ती कामे का करता येत नाही व ज्या कामाच्या संचिका थांबवुन आहे त्याचे कारण काय याबाबत संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी स. सभासदांना लेखी स्वरुपात माहिती पुरवावी. सदस्यांचा गैरसमज दुर होईल. बजेटनुसार अधिकारी कामे करत नसतील तर मा. आयुक्त कार्यवाही करतील.

**श्री. सलीम पटेल :** माझ्या वार्डात कैसर कॉलनी येथे एका कामाचे टेंडर होऊन एका गुत्तेदारास काम दिले. कामाची मुदत ६ महिन्याची होती ती मुदत संपलेली असून, एकुण ५ लाखाचे काम होते. अशा ठेकेदारास काळया यादीत का समावेश करु नये. दोन दिवसाचे काम आहे. योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**अतिरिक्त शहर अभियंता :** पॅथवर्क व ड्रेसींग केली. मॅकडेमची कामे केली नाही. काम सुरु केले होते. पावसामुळे काम थांबविले.

**मा. सभापती** : सध्या कुठेच पाऊस पडेना काम सुरु करण्यात यावे. जर काम करण्यास दिरंगाई वेळ लावत असेल तर, त्या ठेकेदाराला काळया यादीत समाविष्ट करावे. तसे संबंधित ठेकेदाराला पत्र देऊन कळवावे.

**श्री. सावंत मधुकर** : शहानुरवाडी येथे एका रस्त्याच्या संदर्भात सभागृहात दोन स्थायी समिती सभेपुर्वी चर्चा होऊन समिती गठीत केलेली होती समितीचा अहवाल आला असेल तर, सभागृहात वाचुन दाखवावा.

**मा. सभापती** : अहवाल सादर झालेला आहे. स. न. ९/२ शहानुरवाडी रस्त्याचे पाहणी बाबत आहे. नगररचना विभागाने प्रत्यक्ष जागेवर पाऊस रस्त्याची आखणी (मार्किग) करावी व त्यानुसार पुढील कार्यवाही नियमाने करावी. यावर सर्वांची संमती मिळाली. अहवाल सादर करण्यात येतो की, दिनांक ०४-०६-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत शहानुरवाडी सर्व्हे नं. ९/२ येथील १२ मी. विकास योजना रस्त्याची पाहणी करण्यासाठी मा. सभापती यांनी एक समिती गठण केली आहे. सदर समितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. जयवंत केशवराव ओक | सदस्य स्थायी समिती |
| २. | मा. श्री. दलबीसिंग जबिंदा | -//- |
| ३. | मा. श्री. किशोर तुळशीबागवाले | -//- |
| ४. | मा. श्री.मधुकर सावंत | -//- |
| ५. | मा. सौ. साधना सुरडकर | सदस्य वार्ड क्र. २१ (संबंधित प्रभागाच्या नगरसेविका) |
| ६. | नगररचनाकार तर विभाग महानगरपालिका औरंगाबाद | |
| ७. | उपअभियंता (बांध-२) महानगरपालिका औरंगाबाद. | |

वरील समितीच्या सर्व सदस्यांनी आज दिनांक १९-०६-२००१ रोजी सदर पाहणीच्या वेळी नगररचना विभागाकडुन समितीच्या सदस्यांना मंजुर विकास योजना आराखडा (७५) व विकास योजना आराखडा (९५) चे (पी. प्री.) दोन्ही ही दाखविण्यात आले. सदर पाहणीच्यावेळी मा. अतिरिक्त शहर अभियंता ही उपस्थित होते. तसेच पाहणीच्या वेळी प्रस्तावीत रस्त्याच्या पश्चित बाजुस सन ९/२ च्या महानगरपालिकेला खुल्या जागेजवळ खाजगी भुखंडावरती बांधण्यात आलेल्या संरक्षित भिंती बाबत नगररचना विभागाने अतिक्रमण आहे किंवा नाही तपासावे ठरले.

तसेच पुढे काम करण्यासाठी नगररचना विभागाने सदर रस्त्याची आखणी करुन द्यावी व नंतर काम सुरु करावे असे समितीने ठरविले.

सदर रस्त्याच्या पाहणीच्यो वेळी चर्चा झाल्यानंतर सदर समितीच्या सदस्यांचा कुठलाही आरोप नाही.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. जयवंत केशवराव ओक | |
| २. | मा. श्री. दलबीरसिंग जबिंदा | |
| ३. | मा. श्री. किशोर तुळशीबागवाले | स्वाक्षरीत/- |
| ४. | मा. श्री. मधुकर सावंत | स्वाक्षरीत/- |
| ५. | मा. श्री. सौ. साधना सुरडकर | स्वाक्षरीत/- |
| ६. | नगररचना न. र. महानगरपालिका औरंगाबाद | |
| ७. | उपअभियंता (बांध-२) महानगरपालिका औरंगाबाद स्वाक्षरीत/- | |

**श्री. जयवंत ओक :** अहवाल आल्यानंतर नगररचना विभागाचे अधिकारी यांनी मार्किंग करुन रस्ता बदलला व अशा प्रकारे बदल करण्याचे अधिकार कुणाला आहे. रस्ता बदला येतो कोणते अधिकारी कर्मचारी यांची नियुक्त त्या कामासाठी केलेली होती शहरातील इतर लोकांना आवश्यकता पडल्यास अशाप्रकारे डी. पी. प्लॅन बदलुन रस्ता बदलण्यात येऊन त्याप्रमाणे कार्यवाही करणार का? त्याचा सुध्दा खुलासा करावा.

**प्र. नगररचनाकार (श्री. कालेले) :** विकास नियंत्रण नियमावलीचे नियम क्र. १३.६ नुसार मा. आयुक्तांना अशी कार्यवाही करण्याचे अधिकार आहे व आयुक्तांच्या अधिकारानुसार ही कार्यवाही केलेली आहे.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** नियम क्र. १३.६ प्रमाणे आयुक्तांना अधिकार आहे का कलम ३७ कशासाठी आहे. किरकोळ फेर बदलाची कार्यवाही करावी लागते. नियमावलीत आहे. ॲक्टमध्ये दाखवावे.

**प्र. नगररचनाकार (श्री. कालेले) :** नियमामध्ये जे दिले ते पुढील बैठकीत त्यासंबंधी माहिती दिली जाईल.

**श्री. जयवंत ओक :** जे नियमात बसते त्याप्रमाणे मा. आयुक्तांच्या अधिकारात कार्यवाही कली असे संबंधित अधिकाऱ्यांच्या खुलाशावरुन दिसुन येते. यापुढे शहरात एखाद्या व्यक्तीला जागेची गरज भासल्यास बदल करुन त्यांना जागा देता येतील काय? एका प्रकरणात बदल केला जातो. दुसऱ्या प्रकरणात असा प्रश्न निर्माण झाल्यास नियम दाखविले जातात. हे योग्य होणार नाही.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** डी. पी. प्लॅन एकदा मंजुर केल्यानंतर बदलता येत नाही.

**मा. सभापती :** संबंधित नगररचना विभागाचे अधिकारी यांनी कोणत्या नियमानुसार या रस्त्याचा बदल केला त्याची सविस्तर माहिती सर्व स्थायी समितीच्या सदस्यांना प्रत देण्यात यावी.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** बायो केमिकल वेस्ट, हॉस्पीटल वेस्टसाठी इंसीनीरेटर बसविले बाबत पुढे काय कार्यवाही झाली. केव्हा घेणार आपण बजेट ठेवलेले अद्याप कार्यवाही काही झालेली नाही.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** यासंबंधी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुर आला. अंदाजपत्रक २० लक्षच्या वर असल्याने पुन्हा प्रस्ताव मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेपुढे सादर करावा लागणार आहे. हे दोन ठिकाणी करणार असून, नारेगांव व बेगमपुरा येथे करणार आहोत.

**मा. सभापती :** येणाऱ्या २० तारखेच्या बैठकीत संबंधित अधिकारी यांनी तसा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करावा. व पुढील कार्यवाही करावी.

**श्री. सलीम पटेल :** बऱ्याच कर्मचाऱ्यांचया बदल्या केल्या बदली आदेशात असे म्हटले की, पुन्हा बदलीच्या ठिकाणाहुन बदली करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी राजकिय दबाव आणल्यास कार्यवाही केली जाईल असे आहे. परंतु लेखा विभागात रतनकुमार पंडागळे यांचे बंधु उत्तम पंडागळे यांची बदली करण्यात आली होती. बदली केल्यानंतर लगेचच त्याची पुन्हा ८-१० दिवसात लेखा विभागातील नियुक्तीचे आदेश रद्द केले कुणाच्या दबावाखाली केले. आदेशात जो उल्लेख केला तो स. सदस्यांना बदनाम करण्याचा एक प्रकार आहे.

**प्र. आयुक्त (अ. सा. म.) :** कर्मचाऱ्यांच्या बदल्या कराव्यात या संदर्भात बऱ्याच वेळा बैठकीत चर्चा झालेली आहे. त्यानुसार प्रशासनामार्फत योग्य ते ठराविक निकाल लावुन बदल्याची कार्यवाही केलेली ज्या कर्मचाऱ्यांना सुमारे १०, ७, ५, ३

वर्ष झाले एकाच विभागात काम करतात. त्या सर्वांच्याच जवळपास बदल्या केलेल्या आहे. जे राहीले असतील त्यांची सुध्दा बदल्या करण्यात येतील. आदेशात कुणाचा दबाव वगैरे या संदर्भात स. सदस्य यांनी प्रश्न उपस्थित केला परंतु जनरली हे राज्य शासनाच्या नियमानुसार प्रत्येकी बदली आदेशात टाकण्यात येते, उत्तम पंडागळे यांना लेखा विभागात ३ वर्ष झालेले नव्हते त्याची नुकतीच बदली केल्यानंतर त्यांनी विनंती अर्ज दिला की, ते लेखा विभागात काम करण्यास इच्छुक नाही त्यानुसार त्यांच्या अर्जाचा विचार करुन पुन्हा त्याची बदली इतरत्र विभागात करण्यात आलेली आहे तरी सुध्दा पुन्हा बदल्या झालेल्या कर्मचाऱ्यांच्या आदेशाची छाननी करुन योग्य ती कार्यवाही केली जाईल.

**श्री. सलीम पटेल :** यानंतर बदल्या झालेल्या कर्मचारी यांनी त्यांचे इच्छेनुसार ज्या त्या विभागात बदल्या करणार काय?

**प्र. आयुक्त (उ. आ. म.)** : योग्य ते निकष लावुन बदल्या केलेल्य आहे. कुणाच्याही दबावासाठी कर्मचाऱ्यांच्या बदल्या दिलेल्या नाही. गुणवत्त बघुनच काग्रवाही केलेली आहे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** प्रशासनाच्याकामात सुसूत्रता आणण्यासाठी ज्या कर्मचाऱ्यांना अधिकाऱ्यांना ३, ५, १० वर्ष एकाच विभागात झाले त्या सर्वांच्याच बदल्या करण्याचे आश्वासन महपौर दालनात झालेल्या बैठकीत प्रशासनामार्फत दिलेले होते. बदली झाल्यानंतर पुन्हा त्या कर्मचाऱ्यांना इतरत्र वेगळया विभागात बदली आदेश देणे याचा अर्थ प्रशासनावर कुणाचा तरी दबाव आलेला आहे.

**प्र. आयुक्त (उ. आ. म.)** : काही कर्मचाऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानुसार १, २ वर्षे एका विभागात झालेले असेल तर, त्यांचे बदल्या केलेल्या आहेत.

**श्री. सलीम पटेल :** प्र. आयुक्त चुकीचा खुलासा करीत आहे. माझ्या वार्डातील महानगरपालिकेच्या शाळेत १०-१० वर्षापासुन शिक्षक कार्यरत आहे. तक्रार करुन सुध्दा का बदल्याकेल्या नाही. येथील शाळेवरील शिक्षकांच्या अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहे.

**मा. सभापती** : एकाच विाागात ३ वर्ष पुर्ण सेवा झालेल्या सर्वच कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात याव्यात तसेच ज्या कर्मचाऱ्यांची तक्रार प्राप्त झाली असेल, त्याची तपासणी करुन ३ वर्षे सेवा झालेली नसेल तरी, बदली करण्यात येईल.

**श्री. जयवंत ओक :** जकात विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या त्यांना पुन्हा तीन वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीच्या आत पुन्हा जकात विभागात बदल्या करु नये. बदल्याची अंमलबजावणी केल्यानंतर जकातीत कितीने वाढ झाली प्रशासनाने खुलासा करावा.

**श्री. भरत लकडे :** एका कर्मचारी यांची १ महिन्यापुर्वी झोन क्र. ७ मध्ये बदली झाल्यानंतर पुन्हा त्यांना लेखा विभागात देण्यात आले. त्यांचे नावाने कुणाची तक्रार होती का? खुलासा करावा का तात्काळ बदली करण्यात आली.

**प्र. सहाय्यक आयुक्त-१ (सहाय्यक आयुक्त-२) :** मुख्य लेखाधिकारी यांनी लेखा विभागात चांगले काम करणारे कर्मचारी पाहीजे असे कळविल्यानुसार बदलण्यात आले.

**मा. सभापती** : सर्व अधिकारी चांगले काम करणारे कर्मचारी मागतील तर इतर कर्मचाऱ्यांना कोठे पाठविणार एकदा बदली झाल्यानंतर ते कर्मचारी त्या

विभगात ३ वर्ष ठेवावे. यापुढे अशा बदल्या करण्यात येऊ नये. कोणत्या कर्मचाऱ्यांच्या कोणत्या विभागात किती दिवसात बदल्या केल्या व का केल्या त्याची सविस्तर कर्मचाऱ्यांच्या नावासहीत माहिती सहाय्यक आयुक्त-१ यांनी पुढील स्थायी समितीच्या बैठकीत ठेवावी.

**श्री. जगदीश सिध्द :** लाचलुचपत प्रकरणात कामावरुन कमी केलेले इमारत निरीक्षक श्री. राचतवार यांनी स्थायी समितीकडे अपील करुन स्थायी समितीने त्यांना कामावर घेण्याबाबतचे अपील मंजुर केले त्यानंतर संचिका मा. आयुक्ताकडे गेली आयुक्त सहमत नाही म्हणुन सदर प्रकरण सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी ठेवले. सर्वसाधारण सभेत तसा प्रस्ताव ठेवण्यात आला. सर्वसाधारण सभेने या प्रकरणात स्थायी समितीनेच निर्णय घ्यावा असे निर्देश दिले. यानंतर पुन्हा स्थायी समितीपुढे प्रस्ताव येऊन न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहुन त्यांना कामावर घ्यावे. असा ठराव मंजुर झाला याच दरम्यान मा. आयुक्त यांनी नगर विकास विभागात एक पत्र पाठवुन सदर कर्मचारी यांनी लाचलुचपत प्रकरणात लाच घेतलेली नाही. दिनांक ०५-०६-९९ रोजी आरोपी कामावर नव्हते. असे पत्र पाठविले. त्यानुसार नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी प्रशासनाला एक पत्र पाठवुन कळविण्यात आले की, स्थायी समितीने न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहुन घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करुन कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. स्थायी समितीने ठराव मंजुर करुन ही मा. आयुक्तांनी मी यासी सहमत नाही. शासनाकडे प्रकरण पाठविले व पत्रात सदर कर्मचारी यांनी लाच स्विकारली नाही अशी दुरुस्ती भुमिका घेऊन व शासनाचे निर्देश असतांना त्यांना अद्याप कामावर घेतले नाही अशा एका प्रकरणात श्री. मुनीर नावाचे कर्मचारी यांना स्थायी समितीच्या ठरावानुसार मा. आयुक्तांनी कामावर घेण्याचे आदेश काढले हे दुटप्पी धोरण बरोबर नाही. (त्याचवेळी स्थायी समितीने मंजुर केलेला ठराव व नगर विकास विभाग मुंबई यांचेकडे मा. आयुक्त यांनी पाठविले पत्र मा. सभापती यांचेकडे देतात.)

**मा. सभापती** : मा. आयुक्त यांनी श्री. रयतवार यांचे प्रकरणात दुय्यपी भुमिका घेतलेली आहे. स्थायी समितीने वेतन वेळेस ठराव पास करुन मा. आयुक्त यांनी निर्णय घेतला नाही. उलट शासनाकडे पत्र पाठवुन त्यांनी लाच स्विकारली नाही वगैरे दिनांक २८-०७-२००० शासनाकडे पत्र पाठविले शासनाने सदर कर्मचाऱ्यांनी लाच घेतली नाही तर, स्थायी समितीने न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहुन पास केलेल्या दिनांक २२-०६-९९ च्या ठरावानुसार कामावर घेण्याचे निर्देश दिले असतांना सुध्दा व स्थायी समिती व सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर होऊन कामावर घेण्याची का कार्यवाही करण्यात आली नाही. यात आयुक्तांनी पक्षपाती पणाची भुमिका असे सिध्द होते.

**श्री. जगदीश सिध्द :** महानगरपालिकेचे एक कर्मचारी श्री. शौकत अली यांना लाचलुचपत विभागाने लाच स्विकारतांना १ महिन्यापुर्वीच पकडले. या गोष्टीला १ महिना झाला तरी संबंधित कर्मचाऱ्यांना अद्याप निलंबित का करण्यात आले नाही. एक तास चर्चा चालणार संचिका मागवुन सविस्तर खुलासा घ्यावा.

**श्री. मीर हिदायत आली :** शौकत अली यांना २० तासाच्या आत जामीन मंजुर झालेला होता म्हणुन त्यांना निलंबित करण्यात आलेले नाही.

**मा. सभापती** : सहाय्यक आयुक्त-१ यांनी श्री. रयतवार, श्री. मुनीर शेख, श्री. शौकत अली यांचे प्रकरणा संदर्भातील संचिका सभागृहात आणाव्या व माहिती दयावी.

**श्री. इलियास किरमानी :** महानगरपालिकेने अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली यात जे रोजी रोटी भरणारे लोक आहे त्यांच्या सुध्दा टपऱ्या काढल्या अशा गरीब व मध्यमवर्गीय लोकांना पर्यायी जागा व्यवसायाठी देण्यात येणार आहे काय?

**उपआयुक्त (म.) :** मिलकॉर्नर ते रेल्वेस्टेशन रोडवर ज्यांनी अनाधिकृतपणे जागा बळकावुन टपऱ्या केल्या अशी सर्व २३६ अतिक्रमणे न्यायालयाच्या निर्णयानुसार हटविण्याची कार्यवाही चालु आहे. अतिक्रमण हटविण्याचे काम चालु आहे.

**श्री. भरत लकडे :** सेंट्रल नाक्यावर मच्छी विक्रेते रस्त्यावर येऊन मच्छी विक्री करतात. अशा लोकांसाठी प्रशासन काय कार्यवाही करणार आहे.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी सेंट्रल नाक्यावर स्थळ पाहणी करावी. नियमाप्रमाणे व पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री. जयवंत ओक :** मा. उच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतरच महानगरपालिका प्रशासन अतिक्रमण काढणार काय? मिलकॉर्नर येथे रस्त्याच्या बाजुला चौकाजवळ ज्यांच्याकडे टपरीची परवानगी नाही त्यांचे टपऱ्या काढण्यात आल्या नाही. फक्त न्यायालयाने सांगितल्यानुसार मिलकॉर्नर ते रेल्वेस्टेशन रस्त्यावरील तिबेटी लोकांच्या टपऱ्या काढण्यात आल्या किती फुट टपऱ्या फुटपाथवर येत होत्या जेवढे रस्त्यामध्ये टपरी येत होती तेवढीच न काढता सर्व टपऱ्या काढुन टाकुन त्यांचे नुकसान केले. त्यांनी महानगरपालिकेस या अगोदर करापोटी रक्कम भरलेली आहे. किती रक्कम भरली खुलासा दयावा. जागेवरची वस्तुस्थिती काय आहे. एसटीडीची परवानगी होती ती काढली. सर्वांना सारखीच कार्यवाही करावी. नियमाने सर्वच अतिक्रमण काढावे असे निर्देश न्यायालयाचे आहे बाकीचे का काढले नाही.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** न्यायालयाने कोणते ही आदेश दिलेले नाही. या प्रकरणात सुनावणी होईल त्यानंतर कार्यवाही करण्यात यावी. असे आदेश आहे. न्यायालयाचे आदेश सभागृहात वाचुन दाखवावे.

**मा. सभापती** : ज्यांच्याकडे टपरी परवानगी नाही त्यांनी अनाधिकृतपणे अतिक्रमण केलेले असेल, असे सर्व अतिक्रमण काढण्याची कार्यवाही व्हावी मिलकॉर्नर चौकात प्रत्यक्ष अधिकारी यांनी पाहणी करुन कार्यवाही करावी.

**विषय क्र. ३०/१ :**

दिनांक ११-०७-२००१ व दिनांक ०८-०८-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. भरत लकडे :** दिनांक ०८-०८-२००१ च्या इतिवृत्तातील पान क्र. २५ वर मागील बैठकीत मी प्रश्न उपस्थित केला होता की, माझ्या वार्डामध्ये महानगरपालिकेच्या जागेवर एका व्यक्तीने अतिक्रमण करुन स्वतःच्या नावाचे पी. आर. कार्ड काढुन एक दुकान उघडले आहे. सध्या तेथे गाडया दुरुस्तीचे काम होत आहे. मागील बैठकीत चर्चा केल्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

**उपआयुक्त (म.) :** कार्यवाही करण्याचे काम करण्यात आलेले होते. परंतु संबंधिताने न्यायालयातुन स्थगिती आदेश अणलेले आहे. याची सविस्तर माहिती स. सदस्यांना लेखी स्वरुपात दिली जाईल.

**श्री. फुलारी नंदकुमार :** जालना रोड यशोदीप मागील उमजली अनाधिकृत बांधकामाबाबत काय कार्यवाही केली.

**श्री. भरत लकडे :** मी प्रत्येक बैठकीत यासंबंधी प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यानुसार प्रशासनाने संबंधितावर पोलीस गुन्हा का दाखल केलेला नाही.

**मा. सभापती :** इतिवृत्त दिनांक ०८-०८-२००१ पान क्र. २५ वर स. सदस्य श्री. भरत लकडे यांनी चर्चा केल्याप्रमाणे प्रशासनाने काय कार्यवाही केली.

**उपआयुक्त (म.) :** संबंधिताला नोटीस दिली आहे. स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास स्थगिती हटवुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल. प्रशासकीय अधिकारी न्यायालयात गेलेले आहे. सर्व सदस्यांना लेखी कळविण्यात येईल. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम ५२ खाली गुन्हा ठरतो याची व महिन्याच्या मुदतीची नोटीस देण्यात येते. कोर्टाचा जैसे थे आदेश असेल तर, काढता येणार नाही. पी जी कार्ड रद्द करण्यासाठी अपील केले आहे. मा. विभागीय आयुक्त श्री. रमणीसाहेब व मा. जमाबंदी आयुक्त यांचे निदर्शनास आणले आहे.

**मा. सभापती :** मागील बैठकीत या प्रनावर चर्चा झालेली होती. त्यानंतर प्रशासनाने काय कार्यवाही केली त्याची लेखी स्वरुपात स. सदस्यांना माहिती दयावी.

**श्री. जबिंदा दलीबीरसिंग, श्री. जयवंत ओक :** दि. ११-०७-२००१ च्या इतिवृत्तातील पान क्र. ११ वर महानगरपालिका कर्मचारी श्री. रगडे यांना १५ दिवसाच्या आत कामावर घेण्यात येईल. असे आश्वासन दिले होते. सदर कर्मचारी सेवानिवृत्त होणार आहे.

**उपआयुक्त (म.) :** सदर कर्मचारी यांनी महानगरपालिकेच्या रक्कमेचा अपहार केलेला आहे. त्यांनी बिलबुकनुसार ज्या पावत्या गहाळ केल्या त्या पावत्याची त्यांना नोटीस देऊन मागणी केलेली आहे. त्यांनी गहाळ केलेल्या पावत्या व त्या पावत्यानुसार येणारी रक्कम जी काही असेल ती महानगरपालिकेकडे त्यांनी जमा करावी त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** काही विभागातील मोजमाप पुस्तक हरविली आहे. दुसरे मोजमाप (एम. बी.) कसे देतात. व यासंबंधी काय कार्यवाही केली आहे. असे प्रकार घडलेले आहे.

**अतिरिक्त शहर अभियंता :** एम. बी. गहाळ झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविल्या जातो व समाधानकारक खुलासा न आल्यास नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाते.

**मा. सभापती :** विभागातील एम. बी. गहाळ झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर वेगळया प्रकरची तात्काळ कार्यवाही केली पाहिजे.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** एका सी. आय. पाईप लाईन टाकणेच्या कामात ६०० मीटर लांब सी. आय. पाईपचे देयक देण्यात आलेले आहे. परंतु प्रत्यक्षात ५०० मी. लांबीचे पाईप अथरण्यात आले १०० मीटर पाईप नाही. याबद्दल काय कार्यवाही झाली कर्मचारी कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांना सांगण्यात आलेले आहे.

**श्री. जयवंत ओक :** दिनांक १०-०९-२००० रोजी श्री. आर. एन. एनदा दुय्यम आवेक्षक यांनी कनिष्ठ अभियंता या पदावन नियुक्त जाती (एस.टी) संवर्गातुन पदोन्नती करावी. म्हणुन अर्ज दिलेला आहे. तरी याचा विचार व्हावा. महानगरपालिकेत जी पदे रिक्त आहे. त्या पदावर पदोन्नतीद्वारे जे की, ज्यांची २० ते २५ वर्ष सेवा या महानगरपालिकेत झालेली आहे त्यांची नियुक्ती करावी या मतावर मी आहे. कर्मचाऱ्यांची सेवा विचारात घेऊन त्यांना पदोन्नती दिल्यास उदया तेच कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास महानगरपालिकेचे नांव येतील. नाराज राहणार नाही दीर्घकाळ सेवा केलेल्या कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याच्या बाबतीत सहानुभवी पुर्वक विचार व्हावा. श्री. लकडे यांना २० वर्ष झाले पदोन्नती द्यावी. नियमात बसत असेल तर, द्यावे एस. सी. एस. टी. यांना ही द्यावे. तसे आदेश देण्यात यावे.

**उपआयुक्त (म) :** श्री. सनदा यांचे जातीचे प्रमाणापत्र वैध झालेले नाही. एस. टी. प्रवर्गातील जातीचे कडक आदेश आहेत की, ते वैध होईपर्यंत कार्यवाही करता येणार नाही. विशेष दुता मार्फत त्यांचा प्रस्ताव पाठवुन देण्यात येईल संबंधित कर्मचाऱ्यांचे आपल्याकडील असलेले प्रमाणपत्र जात पडताळणी समितीकडे पाठवुन ते वैध ठरविण्यात आल्यानंतर आपणास पुढील कार्यवाही नियमानुसार करता येईल.

**श्री. सलीम पटेल :** आतापर्यंत एस. टी. संवर्गातील रिक्त पदावर ज्या ज्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे. त्याचे प्रमाणपत्र पडताळणी समितीकडुन वैध घेऊन आलेले आहे काय?

**मा. सभापती :** महानगरपालिकेच्या अस्थापनेवर अधिकारी/कर्मचारी यांनी जातीचा दावा करुन ज्यांना ज्यांना पदोन्नती देऊन अधिकारी केले किंवा जातीच्या दाव्यावर काही फायदे घेतले अशा सर्व कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र जात पडताळणी समितीकडे पाठवुन त्यानुसार ज्या कर्मचाऱ्यांचे प्रमाणपत्र अवैध असल्याचे निष्पन्न झाल्याचे जात पडताळणी समितीकडुन कळविण्यात आल्यानंतर प्रशासनाने ताबडतोब आक्षेप घेऊन ज्यांनी जातीचा दावा करुन पदे मिळविली किंवा इतर फायदे घेतले. त्याबाबतची योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. नंदकुमार फुलारी :** सिडको-हडको भागात एक दिवसा आड पाणी पुरवठा होता अशावेळी येथील जनतेकडुन निम्मी पाणीपट्टी घेणार आहे का? पाणी वेळेवर व दररोज दिले नाही तर जनता पाणीपट्टी भरणार नाही. याची नोंद घेण्यात यावी.

**श्री. जगदीश सिध्द :** दि. ११ जुलै २००१ च्या इतिवृत्ततील पान क्र. १२ वर मी चर्चा केलेली आहे. एका अधिकाऱ्यावर निलंबनाची कार्यवाही केली व त्याच प्रकरणात उपआयुक्त (प्र.) यांना सुध्दा निलंबित करावे अशी मागणी केलेली होती. त्यावर असा खुलासा करण्यात आला होता की, आता नवीन आयुक्त येतील. चौकशी अहवाल सहीत संचिका मा. आयुक्तांकडे पाठविण्यात येईल. असा खुलासा केलेला होता. आतापर्यंत का कार्यवाही केलेली नाही.

**उपआयुक्त (म.) :** उपआयुक्त (प्र.) यांचेवर कार्यवाही करण्याच्या संदर्भात यामध्ये संयुक्त चौकशी चालु होती. त्यामध्ये मुख्यलेखाधिकारी मी स्वतः होतो. त्याचा अहवाल सादर झालेला आहे. अंतीम निर्णयासाठी मा. आयुक्तांकडे सादर

करणार असून, मा. आयुक्त या प्रकणामध्ये योग्य तो नियमानुसार निर्णय घेतील.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** इतिवृत्तातील पान क्र. ५ वर मा. सभापती यांच्या संवादमध्ये दिले की, सिडकोचे लवकरच महानगरपालिकेकडे हस्तांतरण होणार आहे. म्हणुन महानगरपालिकेस दोन प्रशासकीय अधिकारी असावेत. अशी कार्यवाही करावी. तसेच तांत्रिक कर्मचाऱ्यांमधुन ही पदे भरावी. आतापर्यंत प्रशासनाच्या माध्यमातुन काय कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**उपआयुक्त (म.) :** मा. सभापती यांनी दिलेल्या रुलींगनुसार कार्यवाही करण्यात येईल. शहराचे दोन भाग करुन दोन्ही भागाचे कामकाज पाहण्यासाठी दोन प्रशासकीय अधिकारी जो की, एक शासनाने नियुक्त केलेले असतील तर, दुसरे प्रशासकीय अधिकारी म्हणुन टेक्नीकल वर्गामधुन महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांमधुन भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. सध्या प्रशासकीय अधिकारी म्हणुन श्री. कंकाळ शाखा अभियंता यांचेकडे चार्ज दिलेला आहे.

**श्री. जयवंत ओक :** झोन वाईज आपण अद्यापपर्यंत विभागीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केलेल्या नाहीत. वसुली वाढविण्याच्या दृष्टीने तात्काळ नियुक्त्या कराव्यात.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** वकीलाचे पॅनल बदलण्याबाबत मागील बैठकीत चर्चा झालेली होती अद्याप प्रशासनाने कार्यवाही केली नाही असे दिसुन येते खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** यासाठी जाहीर प्रगटनाद्वारे अर्ज मागवुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** दि. ११-०७-२००१ च्या इतिवृत्तातील पान क्र. २४ वर कोकणवाडी येथे शाळेसाठी घेणाऱ्या जागेचा काही वाद आहे काय यासाठी जाहीर प्रगटन देऊन जनतेच्या हरकती मागविण्याबाबत सुचना केलेली होती प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे.

**उपआयुक्त (म.) :** संबंधित विभागाचे अधिकारी सभागृहात उपस्थित नाही योग्य माहिती देता येणार नाही परंतु जाहीर प्रगटन दिल्याशिवाय पुढील कार्यवाही आपणास करता येणार नाही.

**मा. सभापती** : या जागे संबंधीचे हरकती मागविण्यासाठी तात्काळ जाहीर प्रगटन दिलेले नसेल तर देण्यात यावे. विषय क्र. १ सर्वानुमते मंजुरी करण्यात येत आहे.

**ठराव :**

दिनांक ११-०७-२००१ व दिनांक ०८-०८-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३१/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, बेगमपुरा भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता सा. ब. खात्याच्या सन २०००-२००१ च्या दरसुचीनुसार र. रु. ११,५१,०००.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाच्या खर्च " पुर्नडांबरीकरण " या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल. तरी र. रु. ११,५१,१००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बेगमपुरा भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता तयार कण्यात आलेल्या र. रु. ११,५१,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२/३ :**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा. संजयनगर (स्लम) येथील जुनी वाहती गटार तोडुन नवीन गटार बांधणेबाबत सा. बा. खाते यांच्या वर्ष ९९-२००० च्या दरसुचीनुसार र. रु. ११,८४,२५९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम " खुली गटार तरतुद " या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिनांक १८-०८-२००१ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले र. रु. ११,८४,२५९/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा. संजयनगर (स्लम) येथील जुनी वाहती गटार तोडुन नवीन गटार बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ११,८४,२५९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिका प्रशासकीय इमारत टप्पा क्रमांक ३ च्या कामासाठी लागणाऱ्या अतिरिक्त बाबी रक्कम रु. १७,८२,२००/- ला प्रशासकीय मान्यता मिळाली असून, त्यास सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र. ४११/४ दिनांक २०-०६-२००१ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामाच्या मंजुरा प्रशासकीय रक्कमेत रु. २९,४६,९०६/- ची बचत रक्कमेतुन यापुर्वी रु. १०,१४,२७०/- चे अतिरिक्त बाबीस प्रशासकीय मान्यता मिळालेली असून, उर्वरीत रु. १९,३२,६३६/- मधुन वाढीव कामासाठी म्हणजेच कुंपण भिंत, परिसर सुधारणा, इमारतीस पोच रस्ता व पार्कींगमध्ये फरशी ऐवजी कॉक्रेटींग इत्यादीसाठी रक्कम रु. १७,८२,२००/- खर्च (अपेक्षित) प्रस्तावित आहे. ज्याचा तपशील येणेप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | नविन अतिरिक्त बाब | रु. ४,१५,१६०/- (अ.) |
| २. | मंजुरा अतिरिक्त बाब | रु. ६,०२,००५/- (ब.) |
| ३. | रेग्युलर टेंन्डर बाब | रु. ७,६४,८१५/- (क.) |
| | **एकुण** | **रु. १७,८२,२००/-** |

उपरोक्त पैकी (क) चे काम हे रेग्युलर टेंडर बाबचे आहे व ही शेडयुल " ब " दराप्रमाणे करुन घेण्याचे प्रस्तावित असून, शिवाय हे काम मंजुर दरावर १०.८% कमी दराने करणे आहे. रेग्युलर टेंडरच्या वाढीव बाबी तसेच अतिरिक्त बाबीमध्ये होणाऱ्या वाढीव बाबीसाठी नंतर सुध्दा बी-१ निविदाच्या कम ३८ अन्वये संविदाप्रमाणे अपेक्षित फायदा

गुत्तेदारास देय होणार नाही या अटीवर वाढीव अतिरिक्त रक्कम रु. १७,८२,२००/- च्या खर्चाच्या प्रस्तावास सर्वसाधारण सभेने दिनांक २०-०६-२००१ रोजी मान्यता दिलेली आहे. मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार वाढीव खर्चाच्या करारनाम्यास मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** प्रशासकीय इमारतीसाठी एकुण अंदाजपत्रक २.०० कोटीची होते. प्रत्येक वेळेस वाढीव अंदाजपत्रक, मंजुरीसाठी येत आहे. २.२५ कोटी पर्यंत जात आहे.

**श्री. जयवंत ओक :** एकदा अंदाजपत्रक केल्यानंतर त्यात नेहमी वाढ करुन अंदाजपत्रकास मंजुरी घेणे योग्य नही. अशी वाढ करता येते का?

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** छत्रपती शिवाजी पुराण वस्तुसंग्राहालय यासाठी सुध्दा २८ लक्ष अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्याचा एकुण खर्च २ कोटी व २ गेलेला आहे. अधिकाऱ्यांनी मनपाच्या फायदयाची कामे करावीत. केवळ प्रस्ताव सादर करुन मंजुरी घेऊन मनपाचे नुकसान करु नये. आपण नागरिकांकडुन कर जमा करतो. विकास झाला पाहिजे. या प्रस्तावाला सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली आहे. आता पुन्हा स्थायी समितीची मंजुरी घेण्याचे कारण काय?

**श्री. जगदीश सिध्द :** नकाशाप्रमाणे ॲग्रीमेंट झाल्यानुसार व ठेकेदाराने केलेले इमारतीचे बांधकाम बरोबर आहे काय? इमारतीच्या वरच्या मजल्यावर वेगळेच मस्जिद आले का मंदिर आहे समजत नाही.

**मुख्यलेखाअधिकारी :** स्थायी समितीस २० लक्ष रुपयेपर्यंत अधिकारी असून,र. रु. २९,४६,९०६/- इतक्या बचत रक्कमेतुन यापुर्वी १०,१४,२७०/- चे अतिरिक्त बाबीस प्रशाकीय मान्यता मिळालेली असून, उर्वरीत १९,३२,६३६/- मधुन १७,८२,२००/- ला सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली आहे. रक्कम रु. २९,४६,९०६/- इतकी असल्याने व स्थायी समितीला २० लक्ष पर्यंत पावर असल्याने सर्वसाधारण सभेची अगोदर मंजुरी घेऊन स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर रक्कमेचा खर्च करण्याच्या करारनामा करण्याच्या दृष्टीने स्थायी समितीकडे प्रस्तव सादर केलेला आहे. ही इमारत समितीकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. ही इमारत परिपुर्ण होण्यासाठी आणखी कोणकोणत्या बाबींची आवश्यकता आहे यासाठी आपल्याकडे श्री चर्वे यांची तांत्रिक सल्लागार म्हणुन नेमणुक केलेली होती व त्यांनी सल्ला दिल्यानुसार वाढीव कामाचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. यात योग्य तो सल्ला देण्यासाठी मुख्य लेखा परीक्षक यांचा पण समावेश होता.

**श्री. नंदकुमार फुलारी :** कोणते काम किती रक्कमेचे करणार, याबाबत उल्लेख केलेला नाही.

**अतिरिक्त शहर अभियंता :** सदरची निविदा १०.८% कमी दराची असून, पोच रस्ता कुंपण भिंत व फरशीखाली क्रॉंक्रीट या कामाचा यात समावेश आहे.

**श्री. मधुकर सावंत :** मागील वर्षासुध्दा १३ लक्षचे वाढीव काम करायचे म्हणुन प्रस्ताव सादर करुन मंजुरी घेतली त्यावेळी सुध्दा मी स्थायी समितीचा सदस्य होतो. व यापुढील वाढीव काम निघणार नाही असे सांगितले गेले होते.

**श्री. सलीम पटेल :** काम करणे आवश्यक आहे. परंतु त्याच ठेकेदाराकडुनच का?

**श्री. साहेबराव कावडे :** नकाशाप्रमाणे इमारत, बरोबर झालेली आहे काय? किती खर्च व काय करावे लागेल हे अगोदर कामाचे अंदाजपत्रक तयार केले तेव्हा का समजले नाही. मनपाचे नुकसान करण्याचा प्रयत्न होऊ नये.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** इमारत बांधकामाचे पहिल्यांदा सादर झालेले अंदाजपत्रक त्यातच या कामाचा समावेश पाहीजे होता. दुसरी बाब अशी की, सध्या इमारतीच्या समोर मुरुम टाकत आहे. चिखल होईल नंतर सिमेंट कॉक्रीट करायचे असा पाच लक्ष रुपये पर्यंत प्रस्ताव सादर होईल. मनपाचे येणारे उत्पन्न अनावश्यक खर्च कसे होईल याकडे अधिकाऱ्यांचा कल दिसतो. असे वाटते. शिवाय त्याच ठेकेदाराला हे काम का दिले जाते.

**श्री. जगदीश सिध्द :** प्रस्ताव स्थगित करण्यात यावा. चौकशी करण्यात यावी. कमीटी नेमावी. अहवाल मागवुन पुढील कार्यवाही करावी.

**अतिरिक्त शहर अभियंता :** कॉक्रीटींगचे काम करणार नाही. तेथे लहान उद्यान करणार आहोत. स्लोप करुन पाणी इमारतीच्या बाजुने काढले जाईल.

**श्री. मधुकर सावंत :** छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तुसंग्राहालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र तसेच प्रशासकीय इमारत या चारही वास्तुची चौकशी व्हावी. नसता मी न्यायालयात जाईल मंत्रालयात जाईल.

**श्री. जगदीश सिध्द :** सागवानचे लाकुड १० वर्षापर्यंत टिकुन असतात. परंतु ४ वर्षात शिवाजी पुराण वस्तु संग्राहालयात लाकडातुन भुसा येत आहे, लाकुड असल्याचे निदर्शनास आले व प्रस्ताव मजुर करतांना सागवान लाकुड खरेदी करीत आहोत असे देऊन रक्कम अदा करण्यात आली. मनपाचे नुकसान झालेले आहे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** सिमेंट कॉक्रीट करणार नाही. असे अधिकारी सांगतात. जनतेकडुन आपण निविदा प्रकारे कराच्या माध्यमातुन पैसा जमा करतो तो वाया जाऊ नये असे आमचे मत आहे. प्रत्यक्ष जागेवर आताच पाहणी करण्यात यावी.

**अतिरिक्त शहर अभियंता :** आपण स्पष्टीकरण करुन भराव टाकल्यावर जोत्याचे बांधकामापासुन उतार देवुन रॅप करीत आहोत. बाजुला पावसाचे पाणी पाण्यासाठी लहान नाली करावी लागणार आहे. तसेच जुनी संरक्षित भिंतीला लहान गेट आहे ते काढुन मोठे गेट बसवुन इमारतीच्या तळमजल्यात वाहन तळासाठी जाण्याची व्यवस्था करावी लागणार आहे. एकुण मुळ अंदाजपत्रक २.२८ कोटीचे होते. प्रशासकीय मान्यता १.९६ कोटी सुरुवातीची निविदा काढली तेव्हा १०.८% कमी दराने मंजुरी मिळालेली होती. इमारतीचा पाया भरणीचे खोदकाम करतांना पाणी येत होते. त्यावर पॅनलवरील वास्तुशास्त्रज्ञ यांचा सल्ला घेतला. पश्चिमेस स्टीलस फ्लोअरचे खोदकामाचे वेळी पाणी येत होते. मानद तांत्रिक सल्लागार श्री वर्दे यांच्या सल्यानुसार वॉटर प्रफ्रुींग फौडेशनमुळे खर्च वाढला त्यात नवीन अतिरिक्त बाब म्हणुन ४.१५ लक्ष तसेच मंजुरा अतिरिक्त बाब म्हणुन ६.०२ लक्ष मागील मंजुर झालेल्या रेग्युलर टेंडर बाब ७.६४ लक्ष खर्चात वाढ दिलेली आहे. रस्ता कुंपन भिंत ही कामे इमारतीच्या संलग्न असलेली कामे आहेत. पुर्वी निघालेल्या १०.८% कमी दराने निघालेल्या निविदा प्रमाणे काम करुन घेण्यात येत आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** निविदा काढल्या तेव्हा साहित्य काय लागणार दिलेले होते काय अंदाजपत्रका व्यतिरिक्त वाढीव काम होत आहे काय? इतका खर्च लागतो का? तपासावे.

**अतिरिक्त शहर अभियंता :** पुर्वीचे सर्व काम ज्या ठेकेदारांनी केले त्यांनाच पुन्हा हे काम दिलेले आहे, पुर्वीचे कामातील काही काम बाकी होते.

**श्री. मधुकर सावंत, श्री. किशोर तुळशीबागवाले :** या इमारतीच्या झालेल्या सर्व कामाची चौकशी व्हावी. समिती नेमावी. वेगळे काम होते तर टेंडर काढावयास पाहिजे होते.

**मा. सभापती :** ज्या ज्या सुचना सभागृहात स. सदस्यांनी उपस्थित केल्या त्याची संबंधित अधिकारी यांनी दाखल घ्यावी. स. सदस्यांच्या सुचना विचारात घेवुन ६ सदस्यांची समिती गठीत करण्यात येते. या समितीच्या सुचनेप्रमाणे व देखरेखीत काम पुर्ण होईल. अगोदर सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुर होतो व नंतर स्थायी समितीकडे प्रस्ताव येतात यानंतर अशी प्रथा पाडु नये.

**श्री. साहेबराव कावडे :** आतापर्यंत जे काम झाले त्याची सुध्दा चौकशी व्हावी. अंदाजपत्रक कितीचे व प्रत्यक्षात किती खर्च होतात हे देखील बघावयास पाहिजे काम चांगले व्हावे. यापुढे पत्रकारांना सभेत बसण्यासाठी प्रवेश द्यावा. सभागृहातील कामकाज जनतेला दिसुन येईल. तसेच इमारतीसाइी वापरलेले सिमेंट वाळु बरोबर नाही. याची सुध्दा कमीटीने चौकशी करावी.

**श्री जगदीश सिध्द :** इमारतीचे बांधकाम करण्यासंबंधीचा जो नकाशा त्याप्रमाणे काम झालेले आहे काय?

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** तेवढा खर्च लागतो का नाही ते तपासावे.

**मा. सभापती :** इमारतीचे झालेले काम व या प्रस्तावानुसार होणारे काम योग्य रितीने होते किंवा कसे यासाठी एक समिती स्थापन करण्यात येत असून, या समितीमध्ये सन्माननीय सदस्य श्री. किशोर तुळशीबागवाले, श्री. सलीम पटेल, श्री. मधुकर सावंत, श्री. जगदीश सिध्द, श्री. जयवंत ओक व श्री. साहेबराव कावडे या सहा स. सदस्यांची समिती स्थापन करण्यात येते. काम होत आहे यात काही सुचना असेल तर, मांडण्यात यावी. बांधकाम साहित्य सिमेंट रेती, दाखविण्यात यावी. हा विषय मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका प्रशासकीय इमारतीचे अतिरिक्त कामाचे अंदाजपत्रक १७,८२,२००/- च्या कामास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरचे काम मंजुर निविदा मधील रेग्युलर टेंडर बाबीसाठी निविदाधारकाकडुन प्रस्तावित केल्याप्रमाणे १०.८% कमी दराने व नियमित निविदेच्या अटीप्रमाणे व वाढीव बाबींसाठी बी-१ निविदाच्या कलम ३८ अन्वये संविदेप्रमाणे अपेक्षित फायदा गुत्तेदारास होणार नाही या अटीवर सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सदर कामाचे पडताळणीसाठी सन्माननीय सदस्य श्री. किशोर तुळशीबागवाले, श्री. सलीम पटेल, श्री. मधुकर सावंत, श्री. जगदीश सिध्द, श्री. जयवंत ओक व श्री. साहेबराव कावडे या सहा सदस्यांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४/५ :**

मा. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, आरोग्य विभागातील आरोग्य केंद्रे व रुग्णालये व नवीन उघडण्यात आलेली आरोग्य केंद्र व आरोग्य विभाग यासाठी औषधी व साहित्याची अत्यंत गरज आहे. त्यानुसार जाहीर निविदा काढुन दरपत्रके मागविण्यात आली होती. मा. आयुक्तांनी मे. केंकरे ब्रदर्स व मे. आश्विनी फार्मास्युटीकल्स यांचे बरोबर चर्चा केली व त्यानुसार दरपत्रकातील वाढीव दर गतवर्षाच्या दराप्रमाणे देणे बाबत संबंधिताची लेखी संमती घेतली. त्यानुसार मे. केंकरे ब्रदर्स यांचे खालील प्रमाणे एकुण ५३६ ॲटम मे. आश्विनी फार्मास्युटीकल्स यांचे ३४ ॲटम कमी दराचे असल्याने मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर दि. ३०-०३-२००१ रोजी ठेवला होता. ठराव ११९/१ च्या स्थायी समितीच्या मंजुरीनुसार पुन्हा ठराव खालील प्रमाणे सादर करीत आहे.

निविदा धारकांच्या नावासमोर दर्शविलेले ॲटम कमी दराचे असून, ते खालील प्रमाणे.

१. मे. केंकरे ब्रदर्स : क्रमांक १ ते ११, १३ ते २१, २५ ते ३१, ३४ ते ३८, ४० ते ४२, ४४, ४६ ते ५०, ५७, ६० ते ६२, ६६, ६८, ७० ते ८८, ९०, ९२, ९३, ९९, १०१ ते १०९, ११७, ११८, १२१, १२४, १२५, १२७ ते १२९, १३१ ते १३९, १४२ ते १४४, १४८ ते १६४, १६६, १६८ ते १७३, १७५, १७७ ते १७९, १७१ ते २०१, २०४ ते २११, २२१ ते २२८, २३०, २३२ ते २६४, २६६ ते २८५, २८७ ते ३०२, ३०४ ते ३२६, ३३० ते ३६४, ३६८, ३७० ते ३७५, ३७७ ते ३८६, ३८८, ३९० ते ४२३, ४२५ ते ४२९, ४३१ ते ४४०, ४४२ ते ४५९, ४६१ ते ४७७, ४७९ ते ४८५, ४८७, ४८८, ४९० ते ४९२, ४९४ ते ५०२, ५०४, ५०५ ५०७ ते ५३८, ५४० ते ५४९, ५५५, ५५७ ते ५६०, ५६२ ते ५८४, ५८६ ते ६१७, ६२२ ते ६२७, ६३४, ६३५ आणि ६५२ (एकुण ५३८ ॲटम)

२. मे. आश्विनी फार्मास्युटीकल्स : क्रमांक १२, ५१, ६९, ९४ ते ९७, १००, ११५, ११९, १२०, १२३, १२६, १६५, १६७, १७४, १७६, १८०, २०२, २०३, २२९, २३१, ६३६ ते ६४७ (एकुण ॲटम ३४)

मा. आयुक्तांनी दिनांक ०८-०८-२००१ रोजी मंजुरी दिल्याप्रमाणे नवीन आरोग्य केंद्र व एक रुग्णालय व पुर्वीचे आरोग्य केंद्र व रुग्णालये यासाठी जुलै २००१ ते मार्च २००२ पर्यंत व दोन महिन्याचा जादा साठा लक्षात घेऊन अंदाजपत्रकातील शिल्लक रक्कम औषध खरेदीसाठी रु. ३५ लाख व साहित्य खरेदीसाठी रु. २५ लाख असून, इतक्या रक्कमेची खरेदी करावयाची असून, वरील पुरवठा धारकांकडुन मंजुर दरानुसार खरेदी करण्यास मंजुरी द्यावी व संबंधिताबरोबर सन २००२ मार्चपर्यंत मंजुर दरानुसार खरेदीसाठी करार करण्यास मान्यता द्यावी. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**उपआयुक्त (म.) :** फक्त औषधी खरेदी (मेडीसीन) साठी मंजुरी द्यावी. साहित्य खरेदीचा समावेश करु नये.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** महानगरपालिकेचे ३ जुन दवाखाने व २० आरोगय केंद्र काही नवीन दवाखाने यासाठी लागणारी औषध साहित्य खरेदी ३५ लाखाची औषध व साहित्य (इक्विपमेंट) २५ लाखाचे असे प्रस्तावित केले आहे. शहरातील जनतेला आपण पाणी, लाईट, ड्रेनेज, स्वच्छता ई. सोयी सुविधा पुरवितो त्या पुरविण्यासाठी बऱ्याचशा आर्थिक अडचणींना तोंड दयावे लागते. अशा सुविधा पुरविण्यासाठी आर्थिक बाबींची तडजोड करुन सुविधा देण्यास थोडा

फार उशिर झाला तरी चालतो परंतु या प्रस्तावानुसार जी जी औषधी घ्यावयाची व साहित्य घ्यावयाचे ते कमी जास्त घ्यावयाचे अशी तडजोड करता येणार नाही. त्यात पसंती (चॉईस) नसते. एखादया आजाराची तपासणी व तो आजार बरा करण्यासाठी जी औषधी लागते ती देणे आवश्यकच असते. जिवंत मरणाचा प्रश्न असतो. मी स्वत: स्त्रीरोग तज्ञ असून, (डीजीओ) जबाबदारीने बोलत आहे. प्रस्तावात ज्या प्राईज लिस्ट आहेत त्या अत्यंत चुकीच्या दिलेल्या असून, आश्चर्यचकित करण्यासारखे आहेत असे खेदाने सांगावेसे वाटते. तसेच ज्या नागरिकांकडुन आपण सुविधा देण्याबाबत विविध प्रकारचा कर जमा करतो त्याच नागरिकांकडुन आरोग्य सेवा देण्यासाठी जास्तीचा आर्थिक भार टाकुन वसुली करणे योग्य होणार नाही. याची सुध्दा काळजी घेतली गेली पाहिजे. या प्रस्तावानुसार जी औषधी व साहित्य खरेदी करायचे त्या संबंधी मी काही प्रश्न सभागृहात मांडु इच्छितो माझी विनंती आहे की, संबंधित अधिकारी यांनी समोर येऊन उत्तरे दयावी. निविदा संबंधी कोणत्या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन देण्यात आलेले होते.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** स्थानिक जे रोटेशन मध्ये वृत्तपत्र येतात त्या वृत्तपत्रात जाहीरात दिलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे सामना शासन सम्राट व इतर एक असे तीन वृत्तपत्रात जाहीर प्रगटन देऊन कार्यवाही केलेली आहे. शहरात १२५ ते १५० औषधी व साहित्य वितरक आहेत.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** जे वृत्तपत्र जास्त प्रसिध्द नाही त्यांना जाहीर प्रगटन देण्यात आलेले आहे. सर्वात जास्त चालणाऱ्या वृत्तपत्रास द्यावयास हवे होते.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** जे रोटेशन मध्ये वृत्तपत्र येतात त्या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन देणेची जबाबदारी जनसंपर्क अधिकारी यांची आहे. कोणत्या पेपरला द्यायचे तेच ठरवितात. रोटेशन पध्दतीने निविदा पाठविलेली आहे.

**मा. सभापती** : यापुढे नियमाप्रमाणे वृत्तपत्रात निविदेची जाहरी प्रगटन देण्यात यावे.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** जाहरी प्रगटन दिल्यानंतर किती निविदा फॉर्म विक्री गेले व किती लोकांनी निविदा भरल्या औषधी वितरकांना निविदाची माहिती आहे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** तीन फॉर्म विक्री गेलेले होते त्यापैकी दोन निविदा भरुन आलेल्या होत्या औषधाचा पुरवठा एक वर्ष पुरेल असा मागविला जातो. टेडंर मध्ये जे रेट दिले तेच रेट वर्षभरासाठी बंधनकारक असतात.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** एकुण १५० औषधी वितरक आहेत. फक्त ३ पर्यंतच पोहोचतो. दोनच एजन्सीजने निविदा भरलेल्या असल्याने जास्तीत जास्त दराने दर दिलेले आहे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** निविदा धारकांनी जे रेट दिलेले होते त्याचे निगोसिएशन दोनच दर दिलेले आहे. जे मागील वर्षापेक्षा कमी झालेले आहे. सर्व ॲटमसाठी आपण ही कार्यवाही करत आहोत. एका ॲटमसाठी २५ हजार रुपये भरणे ही ठेकेदाराची वैयक्तिक बाब आहे.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** औषधी खरेदी करण्यासाठी शासनाचे दरकाम घालुन दिले. जी. आर. वाचुन दाखववावा व त्यानुसार ही औषधी व साहित्य खरेदी करावे. जास्तीचे दर मंजुर केलेले आहे. चांगल्या प्रतीची औषधी खरेदी करावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** शासनाचा जी आर महानगरपालिकेस लागु होत नाही महानगरपालिकेच्या कायद्यात नाही. आपणास बंधनकारक नाही. दर

निश्चितीचे अधिकार महानगरपालिकेस आहे. चांगल्या प्रतीची औषधी मागतो ती रुग्णांना दिली जाते. आतापर्यंत आपल्या दवाखान्यामध्ये कुणी व्यक्ती मृत्यूमुखी पडलेला नाही. शासनाचे दराप्रमाणे औषधी खरेदी करायची असेल तर, त्याचे हमी आपण होऊ शकत नाही. दराचे बाबतीत मा. आयुक्त यांनी एजसी धारक, यांना प्रत्येक अॅटमचे वाटाघाटी करुन मागील वर्षा जे रेट होते. त्याप्रमाणेच जवळपास दर निश्चित केलेले आहे.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** प्रस्तावामध्ये कोणती औषधी किती नग घेणार नमुद केलेले नाही.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** या संबंधीचे (बुकलेट) पुस्तिका तयार केलेली आहे. त्यामध्ये प्रत्येक साहित्याची नग साईज किंमत दिलेली आहे. सदर पुस्तिका मुळ संचिकेमेध्ये लावण्यात आलेली आहे. आमच्या मुळ पुस्तिकेत किती औषधी लागणार आहे. ते सादर केलेले आहे.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** जी दरपत्रकाची पुस्तिका आहे त्यामध्ये क्र. ७ मध्ये बेटनसोल या औषधाची किंमत ४.७३ रुपये ही १० नगाची दिलेली आहे. परंतु एम. आर. पी. नुसार या औषधाची किमंत ४.४५ होते. जर कुणी विक्रीधारक जास्तीच्या रेटने औषधी विक्री करत असेल तर, त्या औषध विक्रेत्यावर पोलीस गुन्हा दाखल होऊन त्यास सहा महिने कारावासाची शिक्षा होऊ शकते. या दरपत्रकामध्ये जवळपास सर्वच औषधी गोळयांची किंमत वाढवुन दिलेली आहे. औषधी व साहित्य मिळुन ६० लक्ष रु. मोजावयाचे असून, ६० लक्ष रुपये देऊन २५ लक्ष रुपयांची औषधी महानगरपालिकेस मिळणार आहे. यामध्ये महानगरपालिकाचे मोठया प्रमाणात नुकसान होणार आहे. कंपनी दरापेक्षा जास्त दर आहेत.

**मा. सभापती** : ज्या ज्या डिलरला जे. जे. अॅटम वितरीत करण्याचे देण्यात येईल प्रस्तावानुसार याच प्रतीचे औषधी देणार काय?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** जाहीर प्रगटन देऊन निविदा पध्दतीने दरपत्रक मागविलेले आहे. आलेल्या दोन एजन्सीकडुन जे जास्तीत जास्त दर होते त्यासंबंधी मा. आयुक्त यांनी दोन्ही एजन्सीज मालकाबरोबर चर्चा करुन प्रत्येक अॅटमचे कमीत कमी दरपत्रकामध्ये नमुद केलेले आहे. एक बॉम्बे मार्केट आहे. त्यांचे दराप्रमाणे जवळपास निविदाधारक दर भरतात. प्रस्ताव सभागृहापुढे सादर केलेला आहे. मंजुर करायचा किंवा नाही हे सभागृहाने ठरवावे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी प्रत्येक वेळेस सभागृहाची दिशाभुल करतात. प्रत्येक वेळेस ३ महिन्यांसाठी औषधी खरेदी करण्याची परवानगी घेतात व नंतर पुन्हा औषधी नाही म्हणुन परवानगी देण्यात येते. अशी पध्दतचा अवलंब करणे योग्य नाही.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** एम. आर. पी. रेटने औषधी खरेदी केल्यास त्यास महानगरपालिका किंवा संबंधित अधिकारी हे जबाबदार राहणार असे संबंधित अधिकारी यांनी खुलासा केलेला आहे. परंतु चांगल्या प्रतीचे तसेच कमीत कमी दराने औषधी घेण्याचे प्रयत्न अधिकाऱ्याचे असावेत. महानगरपालिकेचे नुकसान होणार नाही याची दखल घेतली जावी. २५ लक्ष रुपयाचे साहित्य औषधीसाठी ६० लक्ष रुपये देणे योग्य नाही. यास अधिकारी जबाबदार आहे. मुदत संपलेली औषधे येतात.

**श्री. नंद कुमार फुलारी :** मी औषधी (गोळया) येते ते बंद पाकीटमध्ये येत नाही. त्यामुळे जी व्यक्ती ज्या आजाराचा ईलाज करण्यासाठी येतात त्या आजाराच्या गोळया औषधी न देता दुसरेच गोळया औषधी दिल्या जातील यामुळे लोकांना आणखी काही रोगाची लागन होऊ नये याची दक्षता घेतली जावी खरेदी होणारी सर्व औषधा बंद पॉकीटामध्येच जे की कंपनीचा सिल लावलेली असावी.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** महिलांचे प्रसुतीसाठी किती दवाखान्यामध्ये सुविधा उपलब्ध आहे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** एका दवाखान्यामध्ये सध्या सुविधा दिल्या जातात. तसेच इतर दोन दवाखाने सिल्कमिल कॉलनी, नेहरुनगर कैसरकॉलनी येथील कारखान्यामध्ये सुविधा देण्याचे प्रयत्न चालु आहे.

**मा. सभापती :** शासनाचे जी. आर. नुसार दर मागविल्यास मी जबाबदारी राहणार नाही असे अधिकारी यांनी उत्तरे देणे बरोबर नाही. अधिकारी जबाबदार राहतील जे की, पुरवठाधारक सुध्दा जबाबदार राहील. चुकीच्या औषधी गोळया घेणार नाही. म्हणुन अधिकारी सुध्दा जबाबदार राहील.

**श्री. जगदीश सिध्द :** एजन्सी धारकांशी चर्चा केल्यानंतर या दराच्या बाबतीत मा. आयुक्तांच्या निर्दशनास ही बाब आणुन दिली का?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी** : हे निर्दनास आणुन दिले होते.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** एम. आर. पी. दराने किंमत यावयास पाहिजे होती. किती व कोणती औषधी घेणार प्रस्तावात नमुद केलेले नाही. तसेच अटी शर्ती काय होत्या याचा सुध्दा खुलासा दयावा. होलसेल रेट पुन्हा कमी असतो.

**श्री. सलीम पटेल :** प्रस्तावित दराने एक महिन्यासाठी औषधी खरेदी करावे त्यानंतर लागणारे औषधी साहित्य खरेदीसाठी नवीन टेंडर काढण्यात यावे. त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** सरळ (डायरेक्ट) वितरकाकडुन घ्यावे ६० लाखांचे २५ लाखात होईल.

**श्री. जयवंत ओक :** नियमाप्रमाणे टेंडर काढण्यात आलेले आहे. प्रस्ताव नामंजुर करावयाचा असेल तर, आता ठरवावे कोणत्या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन दयायचे माझ्याकडे कोणतेही टेंडर काढण्यात येऊ नये. डायरेक्ट कंपनीशी संपर्क साधावा. जसे लाईटच्या बाबतीत आपण बजाज कंपनीकडुन साहित्य मागवितो. औषधी २५ लक्ष रुपयात येणार आणि प्रस्तावा ६० लक्षचा सादर होतो यात महानगरपालिकेचे ३५ लाखाचे नुकसान होत आहे. आता औषधी किती दिवस पुरेल याचा विचार करुन पुन्हा अल्पमुदतीची ३ दिवसाची निविदा काढुन कार्यवाही करावी. संपुर्ण वृत्तपत्रात जाहीर प्रगटन दयावे.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** फारमालाईन चेंबर २ मायक्रोस्कोप कोठे व कशासाठी वापरण्यात येतात.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** फाईल पाहुन सांगण्यात येईल.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** दर पुस्तिकामध्ये पान क्र. १८ वर अ. क्र. ५३७ वरील जी १.९० लक्ष रुपयांची किंमत दाखविली ती फक्त ९० हजार रुपयामध्ये मिळवु शकते. सध्या एकाच दवाखान्यामध्ये ही सुविधा दिली जाते व आणखी ३ दवाखान्यामध्ये प्रसुती सुविधा देण्याची कार्यवाही सुरु करण्यात येणार आहे.

त्याचा विचार करता एवढी आषधी खरेदी करणे खरोखरच गरजेचे आहे का?

**श्री. जगदीश सिध्द :** औषधाचे दर निश्चित करतांना संबंधित अधिकारी यांनी मा. आयुक्तांची दिशाभुल केलेली असून, एवढया जास्तीच्या दराने खरेदी करणे महानगरपालिकेस परवडेल काय?

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** २५ लक्ष रुपयाची औषधी आपण ६० लख रुपयामध्ये खरेदी करीत आहोत यास संबंधित अधिकारी सुध्दा जबाबदार आहे. दर निश्चित करतांना दिशाभुल झालेली आहे. शासनाचा जी. आर. नुसार चांगल्या प्रतीचे तसेच कमीत कमी दराने औषधी खरेदीचे दर मागवावे नसता पुन्हा ४ नामाकिंत वृत्तपत्रात निविदा देऊन कार्यवाही करावी व आलेल्या दरामध्ये वाटाघाटी करुन कमीत कमी दराने औषधी मिळेल अशी कार्यवाही करावी. शासनाचे दरपत्रक मागवावे. त्यानुसार कार्यवाही व्हावी. जोपर्यंत ठराव मंजुर होत नाही तोपर्यंत लोकच खरेदी करावेत कोणती औषधी खरेदी केली व कोणत्या दरोन खरेदी केली त्याचा पुढील तपशील सादर करण्यात यावा.

**मा. सभापती** : पुन्हा टेंडर देऊन किती दिवसात कार्यवाही करता येईल मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** उद्याच वृत्तपत्रात जाहीर प्रगटन दिल्यास टेंडर मागवुन कार्यवाही करण्यास १५ दिवस लागतील २ दिवस दर निश्चित करण्यासही लागतील.

**श्री. जयवंत ओक :** सिमेंट, लोखंड, स्टील, आपण डायरेक्ट कंपनीशी संपर्क साधुन मागवितो त्याप्रमाणेच आरोग्य विभागासाठी लागणारी औषधी व साहित्य सुध्दा मागविले पाहीजे. असे केल्यास महानगरपालिकेच्या फायदा होईल.

**मा. सभापती** : सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन जे दर निश्चित होऊन आलेले आहे ते कमी जास्त प्रमाणात आहे. असे सभागृहाने मत व्यक्त केलेले आहे. औषधी व साहित्य खरेदीसाठी पुन्हा उदयाच राज्यस्तरीय चार वृत्तपत्रात जाहरी निविदा मागविण्यात याव्यात शासनाचे जे दर निश्चित केलेले आहे त्याची यादी संबंधित अधिकारी यांनी मागवावी व त्यातुन तुलना करावी हा प्रस्ताव रद्द करण्यात येत आहे.

**ठराव :**

हा प्रस्ताव रद्द करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेच्या दवाखाने व आरोग्य केंद्र यासाठी लागणारे औषधी व साहित्य खरेदीसाठी पुन्हा चार राज्यस्तरीय वृत्तपत्रात जाहीरात निदि मागवुन व आलेल्या दर व शासन नियमानुसारचे दर याची तुलना करुन पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३५/६ :**

मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांच्या मान्यतेने अग्निशमन विभागासाठी "अग्नीशमन रेस्क्यू टुल्स व साहीत्य" खरेदीसाठी दुसऱ्या वेळेस निविदा सुचना राज्यस्तरीय वर्तमानपत्रामधुन प्रसिध्दीस देऊन निविदा मागविण्यात आल्या. त्यानुसार दोन निविदा प्राप्त झाल्या.

१. श्री. ललीता कंपनी, मुंबई,

२. पावर फ्लॅक्स इंडस्ट्रीज, मुंबई

यापैकी निविदा धारक श्री. ललीता क्र. मुंबई यांचे दर कमी असून दर वाटाघाटीनुसार श्री. ललीता मुंबई यांनी अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २ टक्के दर कमी

करण्याचे मान्य केलेले आहे. अंदाजपत्रकीय रक्कम रु. १३,४४,९४४/- (जकात कराशवाय) अशी असून, (२ टक्के दर कमी करुन रु. २६,८९९/- वजा जाता) रु. १३,१८,०४१/- असा एकुण खर्च येत आहे.

करीता निविदेनुसार ॲटम क्र. १, २, ३, ४, ५, ६ अग्निशमन रेस्क्यू टुल्स व साहित्य खरेदीसाठी रु. १३,१८,०४१/- (अक्षरी तेरा लक्ष अठरा हजार एक्केचाळीस रुपये फक्त) खर्चास मान्यतेसाठी प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व वैधानिक कार्यावाहीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. जयवंत ओक :** या विभागाची सध्याची परिस्थिती काय आहे? शहरामध्ये आग लागल्यानंतर किंवा इतर आकस्मिक घटना घडल्यानंतर पुरेसा कर्मचारी वर्ग या विभागामध्ये आहे का? एम. आय. डी. सी. चिकलठाणा भागात मागील काही दिवसापुर्वी अग्निशमन केंद्र उभारण्यात आले. सध्या ते बंद आहे. त्या ठिकाणी कर्मचारी वर्ग दिला नाही म्हणुन बदं आहे अशी माहिती मिळाली.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** गणपती महोत्सवाच्या वेळी ३ ते ४ दुर्घटना घडलेल्या होतया त्या आटोक्यात आणण्याचे चांगल्याप्रकारे काम संबंधित अधिकारी यांनी केलेले आहे. त्यांना यंत्र सामुग्रीची आवश्यकता आहे.

**मा. सभापती :** संबंधित विभागाचे अधिकारी यांची काय समस्या आहे. खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** सन १९९६ ला महानगरपालिकेने एम. आय. डी. सी. चिकलठाणा येथे अग्निशमन केंद्र बांधुन दिलेले आहे. या केंद्रासाठी ३ गाडया सुध्दा देण्यात आलेल्या आहे. कर्मचारी नाही म्हणुन वाहने उभी आहेत. हॉटलाईनची व्यवस्था केली परंतु कर्मचारी नाहीत. शहरामध्ये बऱ्याच वेळा वेगवेगळया प्रकारच्या दुर्घटना होतात. नियमानुसार प्रत्येक गाडीवर कमीत कमी ६ कर्मचारी असावेत परंतु कर्मचारी वर्ग कमी असल्यामुळे सध्या एका गाडीवर ३ ते ४ कर्मचारी दिले जातात. त्यामुळे बऱ्याचवेळ अडचण निर्माण होते. काम करण्यास वेळ लागतो. आताच काही दिवसापुर्वी सत्यम टॉकीज जवळ घडलेल्या प्रकरणात जवळपास आपल्या कर्मचाऱ्यांना १२ तास काम करावे लागले. काम करण्यास वेळ लागला म्हणुन आजुबाजुच्या भागातील जवळपास १० हजार लोक त्या ठिकाणी एकत्र जमा झालेले होते. पुरेपुर साहित्य नव्हते म्हणुन ही कार्यवाही करण्यास वेळ लागला. लोकांचा जमाव झाला अशा वेळी दुसरी एखादी घटना घडु शकते.

**मा. सभापती :** वाळुज एम. आय. डी. सी. आपल्या महानगरपालिका हद्दीत येत नाही. तेथील नियुक्त केलेले कर्मचारी घेणार होते.

**मुख्य अग्निशमन अधिकारी :** वाळुज येथील केंद्रामध्ये एकुण २६ कर्मचारी दिलेले आहे. त्यांना जे वेतन दिले जाते व सिडको वाळुज प्रशासन देणार आहे. एम. आय. डी. सी. चिकलठाणा येथील उपकेंद्रावर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्यास आपणास त्याचा पगार दयावा लागेल.

**उपआयुक्त (म) :** एम. आय. डी. सी. वाळुज केंद्रावर जे १२ कर्मचारी होते त्याचे वेतन सिडको वाळुज प्रशासनाने दिलेले नाही. म्हणुन तिकडील सर्व कर्मचारी आपल्याला चिकलठाणा येथील केंद्रावर देता येतील.

**मुख्यलेखाधिकारी :** एम. आय. डी. सी. वाळुज येथील कर्मचाऱ्यांचा पगार एम. आय. डी. सी. ने दिलेला नाही. म्हणुन तेथील सर्व कर्मचारी चिकलठाणा येथे देणार आहोत. वाळुज हा भाग महानगरपालिकेच्या अंतर्गत येत नाही.

**मुख्य अग्निशमन अधिकारी :** एकुण १४ कर्मचाऱ्यांचा पगार सिडको वाळुज प्रशासनाने दिलेला आहे. दोन वर्षापासुनचा पगार बाकी आहे. पुरेसा कर्मचारी आपल्याकडुन दिल्या जात नाही. म्हणुन पगार थांबवुन ठेवलला आहे.

**श्री. जयवंत ओक :** या विभागासाठी पुरेसा कर्मचारी, साहित्य तसेच कर्मचाऱ्यांना काम करतांना लागणारा गणवेश पुरविण्याची व्यवस्था व्हावी. संबंधित अधिकारी यांना चांगले काम केल्याबद्दलचे राष्ट्रपती पुरस्कार प्रदान करण्यात आलेला आहे. मा. आयुक्तांनी या विभागाकडे लक्ष दयावे व पुरेसा कर्मचारी वर्ग देऊन चिकलठाणा येथील अग्निशमन केंद्र तात्काळ सुरु करण्याची कार्यवाही करावी.

**मुख्य अग्निशमन अधिकारी :** रेस्क्यु व्हॅन खरेदीबाबत आपण सन १९९६ मध्ये प्रस्ताव पारीत केलेला आहे. या व्हॅनसाठी बजेटमध्ये तरतुद करुन कार्यवाही व्हावयास पाहिजे. या गाडीची किंमत १ कोटी रुपयांपर्यंत आहे. रेस्क्यु व्हॅन खरेदीसाठी मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाकडे सुध्दा आपण रक्कमेची मागणी केलेली आहे. आतापर्यंत जवळपास जे जे आयुक्त येथे आलेले आहेत. त्यांनी त्यांचे सही निशी वैधानिक विकास महामंडळाकडे या गाडीसाठी अनुदानाची मागणी केलेली आहे. अद्याप अनुदान मंजुर झालेले नाही.

**मा. सभापती** : या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. चिकलठाणा येथील अग्निशामन केंद्र चालू करण्यासाठी कर्मचारी व आवश्यक साहित्याची आवश्यकता आहे. म्हणुन मा. आयुक्तांनी कर्मचारी व इतर सुविधा देण्यासाठी तात्काळ मंजुरी देऊन कार्यवाही करावी. तसेच रेस्क्युव्हॅनचा प्रश्न उपस्थित झालेला आहे. आपण रेस्क्युव्हॅन घेण्यासाठी पर्यंत सुचना दिलेल्या होत्या. व्हॅन खरेदीसाठी येणाऱ्या बजेट मध्ये नावानिशी बजेट ठेवण्याची कार्यवाही व्हावी. तसेच वैधानिक विकास महामंडळाकडुन या गाडीसाठी अनुदान मिळविण्यासाठी विरोधी पक्ष नेता यांनी प्रयत्न करावे कारणत्यांचे पक्षाचे सरकार आहे. त्यांनी अनुदान मिळवुन दिल्यास त्यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येईल.

**श्री. सलीम पटेल :** रेस्क्यु व्हॅन आणल्यानंतर त्यांची योग्य ती तपासणी करण्यासाठी ४ ते ५ सदस्यांची चौकशीसाठी नेमणुक करावी त्यानंतरच बिल अदा करण्यात यावे.

**मा. सभापती** : ५ सदस्यांना प्रात्याक्षिके दाखवुन देयक अदा करावे. ८३ सदस्यांना लेखी पाठवा. जे येतील ते येतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन विभागासाठी " अग्निशमन रेस्क्यु टुल्स व साहित्य " खरेदीकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी श्री. ललीता कंपनी, मुंबई, यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार ॲटम क्र. १, २, ३, ४, ५, ६ चे अग्निशमन रेस्क्यु टुल्स व साहित्य त्यांचेकडुन अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २% कमी दराने खरेदी करण्यास तसेच या कामासाठी लागणाऱ्या रक्कम रु. १३,१८,०४१/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६/७ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ पोटकलम " ड " अन्वये आणि महाराष्ट्र शासन सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १७ दिनांक १६ सप्टेंबर २००० अन्वये झालेल्या दुरुस्ती प्रमाणे मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी रु. ५०,०००/- पेक्षा जास्त परंतु रु. १०,००,०००/- (रुपये दहा लाख) मर्यादेपर्यंत मंजुर केलेल्या निविदांचे तपशील विभाग प्रमुखांकडुन प्राप्त झालेला आहे. ते विभाग निहाय मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे. विभाग प्रकल्प संचालक

प्रकल्प विभाग

महानगरपालिका, औरंगाबाद हद्दीतील अनाधिकृत वसाहतीचे सर्वेक्षणाचे कार्य प्रशासकीय मंजुरी घेऊन श्री. मनिष तबरावाला यांचे संस्थेस सर्वेक्षण काम देण्यात आले.

या सर्वेक्षणाकरीता रु. १,५०,०००/- खर्चास मंजुरी आहे. यापैकी रु. ५०,०००/- चे देयक संस्थेला अदा करण्यात आले आहे. करीता माहितीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. जयवंत ओक :** प्रस्तावानुसार संबंधित गुत्तेदारास (संस्थेला) ५० हजार रुपये देण्यात आले आता १ लक्ष देणार आहात. शहरातील सर्व वसाहतीचे सर्वेक्षणाचे काम केल्यानंतरच उर्वरीत रक्कम देण्यात यावी.

**मा. सभापती :** ज्या ज्या भागाचा सर्वेक्षणाचे काम झालेला आहे. त्यासंबंधी त्या त्या प्रभागातील स. सदस्यांचे तसे, संबंधित अधिकारी यंनी पत्र घ्यावे सर्व वार्डातील सर्वेक्षणाचे काम पुर्ण झाल्यानंतरच संबंधित संस्थेस बील अदा करावे प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ पोटकलम " ड " अन्वये आणि महाराष्ट्र शासन सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १७ दिनांक १६ सप्टेंबर २००० अन्वये झालेल्या दुरुस्ती प्रमाणे मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी रु. ५०,०००/- पेक्षा जास्त परंतु रु. १०,००,०००/- (रुपये दहा लाख) मर्यादेपर्यंत मंजुर केलेल्या निविदाचा प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आलेल्या तपशीलास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**अतिरिक्त शहर अभियंता विभाग**
**बांधकाम विभाग**

दिनांक ०१-०४-२००१ ते ३०-०७-२००१ पर्यंत रु. ५०,०००/- ते रु. १०,००,०००/- पर्यंत मंजुर झालेल्या कामाची यादी.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | समर्थनगर येथे बॉक्स टाईप गटार बांधणे | १,२०,८३३/- |
| २. | सर्वे नं. १९२/पी हर्सुल येथील विविध रेखांकनातील रस्त्याचे काम करणे. | ४,७४,५६१/- |
| ३. | नागसेन कॉलनी येथे रस्त्याच्या बाजुस फुटपाथ बांधणे | ८,७८,५५६/- |
| ४. | शहाबाजार भागातील गल्यामध्ये क्रॉक्रेट करणे | ८,७१,२१४/- |
| ५. | गणेश कॉलनी येथे दगडी गटारीचे बांधकाम करणे | ४,२३,४१२/- |

| | | |
|---|---|---|
| ६. | लोटाकारंजा भागातील रस्त्याचे डांबरीकरण | ६,०७,४१३/- |
| ७. | विद्यापीठ गेटसमोर रस्ता रुंदीकरण करुन खडी रस्ता तयार करणे. | ४,७९,२३५/- |
| ८. | टी. व्ही. सेंटर चौकात छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळ उभारण्यासाठी चौथऱ्याचे काम करणे. | १,७१,४६३/- |
| ९. | साईनगर म्हाडा कॉलनी मधील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २,९४,२४४/- |
| १० | मोंढा ते हरी मजीद रस्त्यावर पावसाचे पाणी निचरा होण्यासाठी गटारीचे काम करणे. | ७४,५३४/- |
| ११ | नवाबपुरा येथे पाण्याचा निचरा होण्यासाठी पाईप टाकणे. | ८०,१५४/- |
| १२ | रेल्वेस्टेशन भाजीमंडई ते बन्जीलालनगर या रुंद विकास रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ५,१७,५००/- |
| १३ | अजबनगर येथे एम. जी. एम. दवाखाना रस्त्यावर ३०० मी. मी. व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार गटार बांधणे | ९८,२००/- |
| १४ | वेदांतनगर येथे फुटपाथ बांधणे | ८,८१,७९४/- |
| १५ | चक्रपाणी कॉलनी एम. आय. डी. सी. लघुउद्योग वसाहत रेल्वेस्टेशन व म्हाडा कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे रिसरफेसींग करणे. | ३,४७,००४/- |
| १६ | पद्मपाणी कॉलनी नंदादीप हौ. सो. उमाजी कॉलनी बन्सीलालनगर येथे पुर्नडांबरीकरण करणे. | १,७५,८९३/- |
| १७ | शाहु कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याच्या बाजुस (उद्यानाभोवती) फुटपाथ बांधणे. | ७३,८००/- |
| १८ | उस्मानपुरा येथे मुख्य रस्त्यालगत फुटपाथ बांधणे | ६,५२,२५४/- |
| १९ | रचनाकार कॉलनी मधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करो. | ३,७७,२८४/- |
| २० | श्रेयनगर सर्वे नं. ४३ सी. टी. एस. नं. १५८५१ भाग अंतर्गत खडी रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १,०१,४१२/- |
| २१ | विकास नगर, गजानन कॉलनी, मित्रमंडळ सोसा, भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ४,४१,४७९/- |
| २२ | अजबनगर येथे एम. जी. एम. हॉस्पीटल रोडवर ३०० मी. मी. व्यासाची अर्धगोलाकार गटार बनविणे | ९३,४८८/- |
| २३ | सब्जीमंडी येथे श्री. नुर मोहमंद यांच्या घरापासुन शिवाजी हायस्कुल रस्त्यापर्यंत अरुंद गल्लीत आर. सी. सी. प्रीकॉस्ट पॅनल टाकणे | १,३९,३५४/- |

बांधकाम नं. १

सन्माननीय सभापती (स्था. स.) यांना द्यावयाचा कामाचा अहवाल रुपये ५०,०००/- ते ३.०० पर्यंतच्या कामाची माहिती.

| **अ. क्र.** | **कामाचे नांव** | **अंदाजपत्रकीय रक्कम** | **झालेला खर्च** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| १. | मो. समर्थनगर येथे बॉक्स टाईप गटार बांधणे | १,२०,८३३/- | - | निविदा प्राप्त झाल्या, कमी दराची निविदा मंजुरीस्तव वरीष्ठाकडे पाठविण्यात आल्या. |
| २. | मो. टीव्ही सेंटर हडको चौकात छ. संभाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यासाठी चौथऱ्याचे बांधकाम करणे. | १,७१,४६३/- | | काम प्रगती पथावर |
| ३. | साईनगर सिडको एन-६ येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २,९४,२४४/- | | निविदा मागविण्यात आल्या आहेत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | श्री. निकेतन कॉलनी डांबरी रस्त्याचे दोन्ही साईड पॅनिंगचे खडीकरण करणे. | १,४३,८९०/- | | निविदा प्राप्त झाल्या. |
| ५. | वार्डा क्र. ७७ मोंढा ते हरी मजीद गटारीचे काम करणे. | ७४,५३४/- | | निविदा प्राप्त झाल्या. |
| ६. | नवाबपुरा वार्डात क्र. ७७ पावसाचे पाणी जाण्यासाठी पाईप टाकणे. | ८०,१५४/- | | निविदा प्राप्त झाल्या. |

## अतिरिक्त शहर अभियंता विभाग
## विद्युत विभाग

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | बन्सीलाल नगर प्रभागात शाहुनगर कॉलनीत पथ दिव्याकरीता विद्युतीकरण करणे. | ३,१६,०००/- |
| २. | बन्सीलालनगर प्रभागात आदर्शनगर कॉलनी रस्त्यावर पथदिव्याकरीता विद्युतीकरण करणे. | २,६७,०००/- |
| ३. | सादातनगर येथील जमजम स्कुलच्या रस्त्यावर पथ दिव्याकरीता विद्युतीकरण करणे. | २,२५,०४६/- |
| ४. | शहाबाजार वार्डात पथ दिव्याकरीता विद्युतीकरण करणे. | २,९९,२६६/- |
| ५. | जाणननगर येथे पथदिव्याकरीता विद्युतीकरण करणे. | ४,४९,७४०/- |
| ६. | प्रभाग क्र. २८ मध्ये टु सेट सोडीयम फिटींगचे काम करणे. | ८८,४१५/- |
| ७. | तरुणभारत ते एम. आय. टी. कॉलेज रस्त्यावरील पथदिव्याची दुरुस्ती करणे. | ६६,४०४/- |
| ८. | बीबीका मकबरा पासुन हनुमान टेकडीकडे जाणाऱ्या रोडच्या वळणावर सोडीयम दिवे बसविणे. | ६७,०११/- |

## यांत्रिकी विभाग

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | अपेक्षीत खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| १. | टाटा वाहनांसाठी स्पेअर पार्टपुरवठा करणेबाबत (वार्षीक करार) | ५ लाख | |
| २. | मनपाच्या सर्व वाहनासाठी ॲटो इलेक्ट्रीकल स्पेअर पार्ट पुरवठा करणे व जॉबवर्क करणे व बाबत (वार्षिक करार) | ५ लाख | |
| ३. | मनपा वाहनाचे वाशपंप (दोन) रिपेअरिंगसाठी स्पेअर पार्ट पुरवठा करणे व जॉबवर्क करणे बाबत (वार्षीक करार) | २ लाख | |
| ४. | मनपा वाहनांच्या निरनिराळया साईजच्या टायर रिमोंल्डींग | २ लाख | |
| ५. | प्रभाग समिती सभापती करीता चार मारोतीकार खरेदी | ८,२६,२३६/- | प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. |

## कार्यकारी अभियंता (स्लम)

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये. |
|---|---|---|
| १. | मो. गांधीनगर (स्लम) येथे सार्वजनिक शौचालये सुलभ शौचालयात रुपांतर करणे | ३,०४,६४३/- |
| २. | मो. कुतुबपुरा येथे खडी रस्त व क्रॉक्रीट रस्ते तयार करणे. | ७,५२,९५८/- |
| ३. | मो. भिमनगर भावसिंगपुरा स्लम येथे सुलभ शौचालय बांधणे. | ५,५४,४४४/- |

| | | |
|---|---|---|
| ४. | चिकलठाणा कामागार कॉलनी पुष्पक गार्डन येथे नवीन डांबरी रस्ते तयार करणे. | ६,१२,४९५/- |
| ५. | मो. आंबेडकरनगर वार्ड क्र. ६ येथील ड्रेनेज पाईप लाईन बदलणेबाबत | ५,५४,०७९/- |
| ६. | मो. मसनतपुर येथे सी. सी. रस्ते तयार करणे. | ८,३५,०९६/- |
| ७. | मो. डॉ. आंबेडकर येथे संरक्षित भिंतीचा परिसर सुशोभित करणे. | २,२३,६२७/- |
| ८. | मो. मयुरनगर (हमालवाडा) येथे १/२ मो. गटार बांधणे | ३,३४,४६७/- |
| ९. | मो. मयुरनगर (हमालवाडा) येथे २०० मी. मी. व ३०० मी. मी. व्यासाची जलनिःसारण वाहिनी टाकणे. | ३,१७,००६/- |
| १०. | मो. मयुरनगर (हमालवाडा) येथे खडी रस्ते तयार | २,०७,३१५/- |
| ११. | मो. भिमपुरा उस्मानपुरा येथे १/२ गो. गटार बांधणे. | १,५५,९३५/- |
| १२. | मो. बौध्दवाडा चिकलठाणा येथे खडी रस्ते तयार करणे. | २,२४,६५५/- |
| १३. | मो. बौध्दवाडा चिकलठाणा येथे ड्रेनेज लाईन टाकणे | १,५२,६९६/- |
| १४. | मो. काश्मीरीनगर (कांचनवाडी) येथे १/२ गो. गटार बांधणे. | ६,०९,७८४/- |
| १५. | मो. काश्मिरीनगर कांचनवाडी येथ्् २०० मी. मी. व्यासाची व ३०० मी. मी. व्यासाची जलनिःसारण वाहिनी टाकणे. | ६,७८,६३४/- |
| १६. | मो. कश्मिरीनगर (कांचनवाडी) येथे खडी रस्ते तयार करणे. | ४,४१,३१३/- |
| १७. | मो. एकतानगर हर्सुल येथे खडी रस्ते तयार करणे. | ४,२६,८८८/- |
| १८. | मो. गीतानगर येथे खडी रस्ते तयार करणे. | १,२१,९६४/- |
| १९. | मो. गीतानगर येथे १/२ गो. गटार बांधणे | १,८३,७४३/- |
| २०. | मो. गीतानगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे | ३,१९,९७८/- |

## " स्लम विभाग "

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये. |
|---|---|---|
| १. | हर्षनगर स्लम येथे कॉक्रीट रस्ते तयार करणे. | ६,६७,४८३/- |
| २. | फुलेनगर हर्सुल स्लम येथे समाज मंदिरास कुंपन भिंत बांधणे | १,२९,१६८/- |
| ३. | फुलेनगर हर्सुल स्लम येथे दगडी गटार बांधणे | ५१,५२७/- |
| ४. | शहाबाजार स्लम येथे संरक्षित भिंत बांधण्यास संरक्षित भिंतीची उंची वाढविणे | ६,३५,५५८/- |
| ५. | चौसरनगर स्लम येथे कॉक्रींट रस्ते तयार करणे. | २,६४,४५५/- |
| ६. | नक्षत्रवाडी गांव येथे कॉक्रींट रस्ते तयार करणे. | ४,४०,०५९/- |
| ७. | कांचनवाडी स्लम येथील कॉक्रींट रस्ते तयार करणे. | २,०२,२०१/- |
| ८. | सादतनगर येथील नाल्याची संरक्षित भिंत दुरुस्त करणे व संरक्षित भिंत बांधणे | १,२७,४२८/- |
| ९. | सादतनगर स्लम येथील मुख्य रस्त्यावरील पुला लगत दगडी गटार बांधुन स्लॅब टाकणे. | २,५४,९७४/- |
| १०. | सादतनगर स्लम येथील शौचालयाजवळ बॉक्स टाईप कलर्व्हट बांधणे | १,६४,८४७/- |
| ११. | फुलेनगर उस्मानपुरा स्लम येथे कॉक्रींट रस्ते तयार करणे. | २,०७,३३७/- |
| १२. | क्रांतीनगर स्लम येथे कॉक्रींट रस्ते तयार करणे. | ५,०९,७९३/- |
| १३. | प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम येथे श्री. खरात यांच्या घरासमोरील सार्वजनिक शौचालय दुरुस्त करणे. | ४१,४४४/- |
| १४. | राहुलनगर स्लम येथे डांबरी रस्ते करणे. | ३,०१,८४०/- |
| १५. | इटखेडा गांव येथे पुर्नडांबरीकरण करणे. | २,०६,५३२/- |
| १६. | इटखेडा गांव येथे अर्धगोलाकार गटार बांधणे | १,७६,२४४/- |
| १७. | कांचनवाडी गांव येथे कॉक्रीट रस्ते तयार करणे. | १,५८,४६२/- |
| १८. | कांचनवाडी गांव स्लम " अ " येथे नाल्यातील गाळ काढणे व नाला साफ | ७७,८०४/- |

| | | |
|---|---|---|
| | करणे. | |
| १९. | फुलेनगर हर्सुल स्लम येथे खडी रस्ता तयार करणे. | ६८,९८६/- |
| २०. | मो. किराडपुरा (स्लम) येथे जुनी आर. सी. सी. पुल तोडुन नवीन पुल तयार करणे. | ६४,६२४/- |
| २१. | किराडपुरा येथील उर्वरीत रस्त्याचे डांबरी व पुर्नडांबरीकरण करणे. | ४,४८,२४९/- |

कार्यकारी अभियंता (स्लम)

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये. | मुदत |
|---|---|---|---|
| १. | मो. इटखेडा गांव येथे कॉक्रींट रस्ते तयार करणे. | ३,७५,६९३/- | ३ महिने |
| २. | मो. शहानुरवाडी स्लम येथे कॉक्रींट रस्ते तयार करणे. | ४,८०,५०२/- | ४ महिने |
| ३. | मो. रोजाबाग येथे डांबरी रस्ते तयार करणे. | १,६४,३४६/- | ६ महिने |
| ४. | मो. इंदिरानगर बायजीपुरा (स्लम) मुख्य रस्त्यावर गटार बांधणे व इतर | ९,१६,४८८/- | ६ महिने |
| ५. | फुलेनगर हर्सुल (स्लम) येथे कॉक्रींट रस्ते तयार करणेबाबत. | २,५४,१२९/- | ३ महिने |

भांडार विभाग

मुंबई प्रांतीक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३ पोटकलम " ३ " अन्वये आणि महाराष्ट्र शासन सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १७ दि. १६-०९-२००० अन्वये झालेल्या दुरुस्ती प्रमाणे मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी रु. ५०,०००/- पेक्षा जास्त परंतु रु. १०,००,०००/- मर्यादेपर्यंत मंजुर झालेल्या निविदेच्या तपशीलानुसार मुख्य लेखाधिकारी हे प्रस्ताव सादर करीत आहे की, मनपा कार्यालयासाठी आवश्यक साहित्य खरेदीसाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येऊन साहित्य खरेदी करण्याचे आदेश निर्गमित केले आहे.

**१) किटक नाशके :**

सन २००१-२००२ या आर्थिक वर्षासाठी नोव्हान, फिनेल व कार्बोदिक पावडर खरेदीस्तव निविदा प्रसिध्द करण्यात येवुन निविदा दरपत्रके मागविण्यात आली. ६ निविदा दरपत्रके प्राप्त झाली. त्यापैकी एक निविदा दरपत्रक कागदपत्रा अभावी उघडण्यात आली नाही. त्यातील तुलनात्मक दरांचा तक्ता खालील प्रमाणे देण्यात आलेला आहे. तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची तुलना गतवर्षीच्या मान्य दराशी केली असता फिनेल व पावडरमध्ये गतवर्षापेक्षा कमी दर प्राप्त झाल्याने प्राप्त कमी दराची निविदा दरास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली असून, त्या दराने साहित्य पुरवठा करण्यास संबंधितास आदेश निर्गमित करण्यात आले.

| अ. क्र | साहित्याचा तपशील | इंशा ट्रेडींग क्र. | एसबी सर्व्हिसेस | सलवा इंटरप्रायजेस | रोशन सेल्स कापी | यश ॲग्रो | सन ००-०१ चे मान्य दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | काळे फिनेल प्रति लिटर | १७.०० | १७.०० | १९.५० | १७.०० | १८.९० | १९.५० |
| २. | नावाने प्रति लिटर | ३८९.०० | ४१०.०० | ४८०.०० | ३९०.०० | ३९४.०० | ३८०.०० |
| ३. | बॅक्टोरिनो कार्बोदिक | १९.० | १७.०० | १६.८० | १८.०० | १८.४० | १७.६० |

| | | |
|---|---|---|
| १. | मे. रोशन सेल्स कार्पोरेशन फिनेल | रक्कम रु. १७,००००/- |
| २. | मे. इंशा ट्रेडींग कंपनी फिनेल नाबान | रक्कम रु. १७,००००/- |
| ३. | मे सल्बा इंटरप्रायजेस कार्बोदीक पावडर | रक्कम रु. ५०४०००/- |
| | | **रक्कम रु. ९२१०००/-** |

वरील प्रमाणे वार्षीक मागणीनुसार साहित्य खरेदीचे आदेश देण्यात आले तसचे फिनेल मध्ये दोघांचे वर समसमान असल्याने विभागुन आदेश निर्गमित करण्यात आले.

**२. स्वच्छता साहित्य :**

सन २००१-२००२ या आर्थिग वर्षासाठी विभागीय कार्यालये व इतर विभागांना स्वच्छता साहित्य देणे संदर्भाने निविदा सुचना प्रसिध्द करण्यात येवुन निविदा दरपत्रके मागविण्यात आली असावा दोन निविदा दरपत्रके प्राप्त झाली. तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दर, गतवर्षीचे मान्य दर व बाजारातील दर इत्यादीची तुलना केली असता निविदा धारकास दर वाटाघाटीस बोलावुन ५% वर कमी करुन तुलनात्मकदृष्ट्या कमी दरास प्रशासकीय मान्यता घेऊन साहित्य पुरवठा करण्यास संबंधितास आदेश निर्गमित करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १. | विजय जनरल स्टोअर्स - ॲटम क्र. | ६, ७, ८, ९, १५, २३, ३६, ४९, ५० व ५१ (एकुण १०) |
| २. | इंशा ट्रेडींग कंपनी - ॲटम क्र. | २ ते ५, १० ते १५, १७ ते २२, २४ ते ४८ व ५२ (एकुण ५) |
| ३. | न्यु भारत स्टोअर्स - ॲटम क्र. | १ (एकुण) |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे ॲटम क्र. संबंधिताच्या नावांसमोर दर्शविण्यात आलेले आहेत. त्यानुसार वार्षीक मागणी पत्रानुसार खालील प्रमाणे साहित्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. इंशा ट्रेडिंग कंपनी | रक्कम रु. ५६४६९०/- |
| २. | न्यु भारत स्टोअर्स | रक्कम रु. ४९०००/- |
| ३. | विजय जनरल स्टोअर्स | रक्कम रु. ६४४१०/- |
| | **एकुण** | **रक्कम रु. ६७८१००/** |

**३. गणवेश साहित्य :**

मनपातील कर्मचारी (गणवेश विनिमयानुसार देय असलेले कर्मचारी) यांना विनिमयानुसार चप्पल, बुट इत्यादी साहित्य पुरवठा करणेस्तव निविदा सुचनाद्वारे निविदा दरपत्रके मागविण्यात आली. त्यानुसार ३ निविदा दरपत्रके प्राप्त झाली. प्राप्त दर पत्रकासोबत नमुने पसंतीस्तव कर्मचारी/कामगार युनियन पदाधिकारी तसेच कर्मचारी/कामगार प्रतिनिधी यांना बोलावुन नमुने पसंत करुन घेण्यात आली. पसंत नमुन्याच्या दरामध्ये संबंधित निविदाधारकास बोलावुन दर वाटाघाटी अंती ५% दर प्राप्त दरामध्ये कमी करुन प्रशासकीय मान्यता घेण्यात येवुन संबंधितास साहित्य पुरवठा करण्यास आदेश निर्गमित करण्यात आले.

| अ. क्र | साहित्याचा तपशील | महाराष्ट्र उद्योग विकास नं. | फरा इंटरप्रायजेस | इंशा ट्रेडींग | पसंत नमुन्याचे दर |
|---|---|---|---|---|---|
| १. | लेडीज चप्पल (प्रति जोड) | १७२.०० | १२०.०० | ९०.०० | १२०.०० |
| २. | जेन्टस चप्पल प्रतीजोड | २१४.०० | १४५.४५ | १६०.०० | १६०.०० |
| ३. | कॅन्व्हॉसशुज प्रतीजोड | १५५.०० | १२५.०० | ११०.०० | १२५.०० |
| ४. | लेदर शुज प्रती जोड | ५३०.०० | ३२५.०० | ३५०.०० | ३५०.०० |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त दर दर्शविण्यात आले असून, पसंत साहित्याचे दर नमुद करण्यात आलेले आहेत. सदरील दरात दर वाटाघाटी अंती ५% दर कमी करुन आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

१. मे. इंशा ट्रेडींग कंपनी रक्कम रु. ३००१९०/-
२. मे. फरा इंटरप्रायजेस रक्कम रु. ७००३९/-

**एकुण रक्कम रु. ३७७०२२९/-**

## शहर अभियंता (इमारत बांधकाम)

| अ. क्र | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | कामावरील खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मा. आयुक्त महोदय यांचे निवासस्थानी एक बेडरुमची वाढ करणे व इतर कामे करणे. | २,८४,०२५/- | २,२९,३०९ | काम पुर्ण |
| २. | बन्सीलाल नगर, सांस्कृतिक केंद्र व वाचनालय उर्वरित कामे करणे. | २,२९,०००/- | १,८६,८४७ | काम पुर्ण |
| ३. | म्हडा कॉलनी स्टेशन रोड सांस्कृतिक हॉल बांधणे | १,७८,१४६ | १,४६,२० | काम पुर्ण |
| ४. | बेगमपुरा पहाडसिंगपुरा येथे व्यायामशाळा बांधणे | ४,५१,५४४ | ४,३८,०६९ | काम पुर्ण |
| | भावसिंगपुरा पेठेनगर व्यायाम शाळा बांधणे | २,२५,१७० | -- | प्रगतीपथावर |
| ६. | बेगमपुरा प्रा. शाळच्या खुल्या जागेत व्यायामशाळा बांधणे | ३,४०,००० | -- | नुकतेच भुमीपुजन झालेले आहे. जागे बाबत कार्यावाही स्तव. |
| ७. | प्राणी संग्राहालयातील पांढरे वाघ, सिंह व चित्याच्या पिंजऱ्यात नवीन तक्ते बसविणे. | ६७,२५१ | ५३,७९३ | कामपुर्ण |
| ८. | सिंहाच्या पिंजऱ्यावर फायबर शिट बसविणे | ८६,२५० | -- | काम पुर्ण देयक अदार्हस्तव |
| ९. | प्राणी संग्राहालय, सर्पालय, घरात अल्युमिनियम खिडक्या बसविणे | ५०,१९७ | -- | प्रगतीपथा वर |
| १० | सिडको एन-७ येथील मनपा प्रा. शाळा परिसरात वाचनालय बांधणे | ५,००,००० | ३,४२,८४० | प्रगतीपथा वर |
| ११ | वार्ड क्र. ७ ब्रीजवाडी व नारेगांव येथे मुतारीसह बांधणे | ७०,०२ | ५२,३८१ | काम पुर्ण |
| १२ | रविवार आठवडीबाजार ओटयामध्ये कॉक्रींट रस्ता व डब्ल्यु बी. एम. रस्ता तयार कणे. | ३,८७,०५० | -- | प्रगतीपथा वर |
| १३ | संत एकनाथ रंगमंदिर येथे खुर्च्या दुरुस्ती करणे. | २,८५,००० | २,२९,११८ | कामपुर्ण |
| १४ | संत एकनाथ रंगमंदिर येथे सिलींगला पी. ओ. पी. करणे. | ८५,००० | ९४,०९८ | -//- |
| १५. | काचीवाडा समाज मंदिराच्या परिसरात फरशी बसविणे | ७२,४५५ | ७४,५६८ | -//- |
| १६ | जयभिमनगर समाजमंदिराच्या परिसरात कॉक्रीटींग करणे. | ७५,०९९ | ५६,६४० | -//- |
| १७. | नेहरुभवन परदे दुरुस्ती करणे | १,१७,२५० | १,१५,००० | -//- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८. | सिडको एन-८ मनपा दवाखान्याच्या संरक्षित भिंतींची उंची वाढविणे | १,७६,६९० | -- | -//- |
| १९. | मनपा प्रा. शाळा सिडको एन-९ इमारतीची किरकोळ दुरुस्ती व रंगरंगोटी करणे. | १,२६,१० | १,२४,७५३ | -//- |
| २०. | संजयनगर मनपा पाण्याच्या टाकीमागे मनपा निवासस्थानासमोर फरशी बसविणे | ६२,७७२ | -- | निविदा मंजुरीस्तव |
| २१. | मनपा प्रा. शाळा मुंकुंदवाडी कुंपन भिंतीवर वाय टाईप वायर फेन्सींग करणे. | ८८,२६० | ८६,२७८ | कामपुर्ण |
| २२. | मनपा प्रा. शाळा बडी गिरणी मिलकॉर्नर येथील दुरस्ती व रंगकाम करणे. | ८७,७३० | -- | प्रगती पथा वर |

## उद्यान बांधकाम विभाग
## २०००-२००१ मधील मंजुर अंदाजपत्रके (उर्वरीत)

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथील घनकचऱ्याची विल्हेवाट लावे (खडी रस्ता तयार करणेबाबत.) | ९,१०,७४४.०० | कार्यादेश |
| २. | उदय कॉलनी येथील खुल्या जागेत ओटा व रोड बांधणे बाबत | ८,५१,५८९०.०० | काम पुर्ण |
| ३. | म्हाडा कॉलनी येथील जुने रोड तोडुन नवीन ओटा व रोड उभारणे | ९४,९२१.०० | -//- |
| ४. | बन्सीलालनगर येथील जागृती शाळेसमोरील मनपाच्या जागेत ओटा रोड | ५२,६६०.०० | -//- |
| ५. | कांचनवाडी कॅम्प येथील मनपाच्या क्वॅार्टरस जवळील खुल्या जागेत ओटा व रोड बांधणेबाबत | ४०,७७२.०० | -//- |
| ६. | शहानुरमियॅादर्गा जवळ एक सामाजीक सभागृह बांधणे | ४,२२,६५५.०० | -//- |
| ७. | शक्तीनगर येथील खुल्या जागेत ओटा व रोड बांधणे बाबत | ०,५२,१४६.०० | प्रगती पथा वर |
| ८. | विभागीय आयुक्त कार्यालया भागातील मनपाच्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे | ६४,६१०.०० | -//- |
| ९. | सिध्दार्थ उद्यान येथे उद्यान अधिकाऱ्याचे कार्यालयाची इमारत बांधणे | ५,००,८८०.०० | -//- |
| १०. | वार्ड क्र. ४७ मधील एन-९, एम एन-११ ए, एन-११, सी-१ येथील खुल्या जागेत कॉक्रींटींग करणेबाबत | २,०९,०००.०० | २% पत्र दिले. |
| ११. | कैलास नगर स्मशानभुमी येथे बर्निंग रोडच्या परिसरात पाथवे तयार करणे. | ०,६२,२२५.०० | काम पुर्ण |
| १२. | रेल्वेस्टेशन हमालवाडा स्मशानभुमी मध्ये रेस्टींग रोडसाठी विविध काम करणे. | २,२०,३०४.०० | प्रगती पथा वर |
| १३. | व्यंकटेशनगर उद्यान येथे संरक्षित भिंत दुरुस्ती व फरशी बसविणेबाबत | १,०२,२००.०० | काम पुर्ण |
| १४. | एन-६ साईनगर येथील म्हाडा वसाहतीमधील खुल्या जागेवर उद्यान विकसीत करणे. | १०,३६,४०५.०० | २% पत्र दिले. |
| | | **३८,२९,९०७.००** | |
| १५. | सह्याद्रीनगर सर्वे नं. १७/३ गारखेडा येथील रेखाकंनाच्या खुल्या जागेत कुंपन भित बांधणेबाबत | १,६६,६३३/- | -//- |

| | | | |
|---|---|---|---|
| १६. | गांधीनगर येथील मनपाच्या खुल्या जागेमध्ये उद्यान विकसित करणे बाबत | १,७९,२७८/- | प्रगती पथा वर |
| १७. | प्रभाग क्र. २८ नक्षत्रवाडी येथील स्मशान भुमीत संरक्षित भिंत बांधणे व शेडला कॉक्रीटींग करणे व विटकामात बेंचेस करणे. | ३,४६,६५७/- | -//- |
| १८. | प्रगती कॉलनी येथील उद्यानात खेळणी बसविणे व बेंचेस बसविणेबाबत | ४१,६७२ | कामपुर्ण |
| १९. | रमानगर स्मशानभुमी येथे सुविधा पुरविणे बाबत | १,४५,३४४/- | -//- |
| २०. | नंदनवनकॉलनी जवळील स. न. २९ व ३० मधील खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे | २,९२,३८०/- | काम पुर्ण |
| २१. | मसनतपुर येथील स्मशानभुमीस संरक्षित भिंत बांधणे बाबत | २,४४,५२८/- | प्रगती पथा वर |
| २२. | संजयनगर मुंकुंदवाडी येथे उद्यान विकसीत करणे बाबत | २,३७,८१९/- | काम पुर्ण |
| २३. | आंबेडकरनगर येथील गौतमनगर येथे समाजमंदिर बांधणेबाबत | ५३,४९०३/- | प्रगती पथा वर |
| २४. | उस्मानपुरा येथील प्रतापनगरमध्ये वॉचमनरुम व संरक्षित भिंत बांधणे | १,१४,८२५/- | -//- |
| २५. | नवयुवक कॉलनी पद्मपुरा संरक्षित भिंत बांधणे | २९,७७७/- | काम पुर्ण |
| २६. | राहुलनगर स्मशानभुमी येथे विविध कामे करणे. | ६६,११२/- | प्रगती पथा वर |
| २७. | सारंग हौ. सो. येथील खुल्या जागेत संरक्षित भिंत बांधणे | ९७२५०/- | -//- |
| २८. | भावसिंगपुरा मनपा शाळेजवळील उदयानाचे उर्वरीत कामे करणे. | ४५३७८/- | -//- |
| २९. | जयविश्वभारती कॅलनी स. न. ६२ गारखेडा येथे संरक्षित भिंत बांधणे. | ७१,३०४/- | -//- |
| ३०. | रणजीतनगर येथील मनपाच्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे | ९७,२६१/- | काम पुर्ण |
| ३१. | नवाबपुरा येथील कालीमस्जिद कब्रस्थानमध्ये सुविधा पुरविणे बाबत. | २,३९,४१५/- | प्रगती पथा वर |
| ३२. | सम्राटनगर येथील मनपाच्या जागेवर उद्यान विकसीत करणे. | ४४२३६४/- | प्रगतीपथा वर |
| ३३. | स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथील मनपाच्या जागेत सांस्कृतिक सभागृह बांधणे | ४६१६०४/- | -//- |
| ३४. | सरस्वतीभुवन संस्थे जवळील बौध्दवस्तीतील सभागृह बांधणे | २३४५४०/- | -//- |
| ३५. | माजी सैनिक कॉलनी येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे | २२९३५४/- | -//- |
| ३६. | संत एकनाथ हौसो. येथील ओटयावर लोखंडी पत्र्याचे शेड उभारणे | ३७२७३/- | कामपुर्ण |
| ३७. | चिकलठाणा यथील स्मशानभुमीच्या जागेस संरक्षित भिंत बांधणे | २६१०६०/- | प्रगती पथा वर |
| ३८. | पुष्पनगरी उद्यान येणे संरक्षित भिंत बांधणे | १७८१११/- | काम पुर्ण |
| ३९. | औरंगाबाद टाईम्स कॉलनी ११३१५ रेखाकंनातील खुल्या जागेत संरक्षित भिंत बांधणे | ३९९९१६/- | प्रगती पथा वर |
| ४०. | बुढ्ढीलाईन भागात जामा मस्जिद समोरील जागेत संरक्षित भिंत बांधणे | ३७९४७८/- | -//- |
| ४१. | दशमेशनगर सी. टी. एस. नं. १६२९३ येथील जागेत संरक्षित भिंत बांधणे | १०३१८२/- | -//- |

| | | | |
|---|---|---|---|
| ४२. | अशोकनगर गारखेडा येथील जागेत संरक्षित भिंत बांधणे व खेळणी बसविणे. | १७७२५८/- | काम पुर्ण |
| ४३. | मुकुंदवाडी येथील कब्रस्थानास संरक्षित भिंत तार कुंपण खडी रस्ता तयार करणे. | ३७४४७७/- | प्रगती पथा वर |
| ४४. | नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड घान कचऱ्यांच्या जागेसमोरील बाजुस संरक्षित भिंत कमान | ८२८३५५/- | प्रगती पथा वर |
| ४५. | एन-११ मयुरनगर सिडको येथील दत्ताजी भाले सांस्कृतिक सभागृह तार कुंपन गेट कमान | ३५६९२/- | काम पुर्ण |
| ४६. | नाथपुरम कांचनावाडी येथील खुल्या जागेत ओटा व शेड बांधणेबाबत | ४०७७२/- | काम पुर्ण |
| ४७. | भाग्यनगर उद्यानामध्ये अंतर्गत पाथ्वे, कमान व रंगरंगोटी करणेबाबत | १७७३४७/- | -//- |
| ४८. | मिटमिटा स्मशानभुमी येथील जागेत संरक्षित भिंत बांधणेबाबत | १२९८४७/- | काम पुर्ण |
| ४९. | कांचननगर येथील मनपाच्या खुल्या जागेत ओटाव-शेड बांधणे बाबत | ४०७७२/- | -//- |
| ५०. | एन-६ आविष्कारकॉलनी वार्ड क्र. ५२ मध्ये सामाजिक सभागृह बांधणेबाबत | ६०५६०४/- | काम प्रगती पथावर |

**उद्यान बांधकाम अंदाजपत्रके २०००-२००१**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मुकुंदवाडी स्मशानभुमी येथे सुविधा पुरविणेबाबत | ४४८६३/- | कामपुर्ण देयक बाकी |
| २. | बनेवाडी येथील स्मशानभुमी मध्ये आय. पी. एम. फ्लोरींग करणे. | ४९३४२/- | कार्यादेश देण्यात आला. |
| ३. | नागसेन कॉलनी येथील मनपाच्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे | १०२७१८ | प्रगतीपथावर |
| ४. | रामनगर पद्मपुरा येथील मनपाच्या खुल्या जागेवर उद्यान विकसित करणे. | २२९४७०/- | -//- |
| ५. | कटकटगेट जवळील सीटीसर्व्हे नं. ११३१५ येथील मनपाच्या खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे तार कुंपन करणेबाबत. | ११८१७७/- | -//- |
| ६. | भावसिंग पुरा येथील पेठेनगर रेखांकनाच्या मनपाच्या खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे व तारकुंपन करणेबाबत. | ५७३९७५/- | -//- |
| ७. | हर्सुल येथील बौध्द स्मशान भुमी मध्ये रेसींग रोड व पाथवे तयार करणे बाबत | १६४९९१/- | काम पुर्ण |
| ८. | मो. हत्तेसिंगपुरा कटकटगेट नगर भु. क्र. ११६०२ साईट क्र. २०८ येथील खुल्या जागेत संरक्षित भिंत व तार कुंपण करणेबाबत | ६७०६४/- | प्रगतीपथावर |
| ९. | सिडको एन-६ स्मशानभुमीमध्ये सुविधा पुरविणेबाबत | ६१९९९/- | काम पुर्ण |
| १०. | ज्ञानेश्वर सगृ निस सर्व्हे नं. ६० गारखेडा येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेबाबत | २१३०८४/- | |
| ११. | आसेफिया कॉलनी लक्ष्मीदेवी मंदिर परिसरात संरक्षित भिंत बांधणेबाबत | १३७८१९/- | प्रगती पथा वर |
| १२. | घाटी परिसरातील आनंद नगर रेखांकनातील खुल्या | १२१९९९/- | काम पुर्ण |

| | | | |
|---|---|---|---|
| | जागेवर संरक्षित भिंत बांधणे बाबत | | |
| १३. | व्यंकटेश नगर उद्यान येथील संरक्षित भिंतीची दुरुस्ती व फरशी बसविणे. | ९६३८०/- | -//- |

**चर्चा :**

**श्री. जगदीश सिध्द :** श्री. रयतवार यांना कामावर घेण्याबाबतचा खुलासा देणार आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा दयावा.

**मा. सभापती** : सहाय्यक आयुक्त-१ यांनी खुलासा करावा.

**सहाय्यक आयुक्त-१ :** श्री. रयतवार यांचे निलंबनाबाबत दि. २८-०२-२००१ रोजी शासनाचे पत्र पाठविले की, मा. आयुक्त हे सक्षम आहेत. त्यांनी त्यांना कामावर घ्यावे असे दिले आहे. त्यानुसार संचिका प्रस्तावित करण्यात आली होती. तत्कालीन आयुक्त यांनी २८-१२-२००० रोजी अशी टिप्पणी केली आहे की, मी याबाबत सहमत नाही. श्री. रयतवार यांना लाच लुचपतीच्या प्रकरणात निलंबित कलेले आहे. प्रकरण न्यायालयात गेलेले आहे. सबब ४५१ खाली स्थायी समितीने घेतलेला ठराव रद्द करण्याबाबत शासनास ठरविले. त्यानुसार शासनाने महानगरपालिकेस २८-०२-२००१ रोजी पत्र दिले.

**मा. सभापती** : शासनाने संबंधित कर्मचाऱ्यास कामावर घेण्याबाबतचे निर्देश दिलेले आहे. तत्कालीन आयुक्त हे स्थायी समितीन घेतलेल्या ठराव रद्द करण्यासाठी पुन्हा शासनाकडे पत्र पाठविता हे योग्य नाही. आयुक्त यांचे पत्रात असा उल्लेख केलेला आहे की, संबंधित श्री. रयतवार यांना न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन कामावर रुजु करुन घेण्याबाबत स्थायी समितीने निर्णय घेतलेला असून, त्यांनी लाचलुचपत खात्याची कोणतीही लाच स्विकारलेली नाही या पत्रानुसार शासनाने २०-०२-२००१ रोजी पत्र पाठवुन सदरील कर्मचाऱ्यांस स्थायी समितीने सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयानुसार कामावर घेण्याचे निर्देश दिले तरी, शासनाच्या निर्णयाचे पालन करावे. शासन निर्णयाप्रमाणे त्वरीत रुजू करुन घ्यावे.

**मा. उपआयुक्त (म.) :** स्थायी समितीने ठराव पारीत केल्यानंतर न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन संबंधित कर्मचाऱ्यांना कामावर घेण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना आहेत. परंतु या प्रकरणात मा. आयुक्त सहमत झालेले नाही. म्हणुन प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला होता.

**मा. सभापती** : स्थायी समितीने ठराव पास केल्यानंतर तो आयुक्तांना मान्य नव्हता तर सर्वसाधारण सभेत पाठविण्याची गरज काय होती. ठराव पास झालेला शासनाकडे पाठविला शासनाने संबंधित कर्मचाऱ्यांस कामावर घेण्याचे निर्देश दिलेले असतांना सुध्दा मा. आयुक्तांनी त्यांना कामावर घेतले नाही.

**श्री. जगदीश सिध्द :** श्री. मुनीर नावाने कर्मचारी अशाच प्रकरणात गुंतलेले होते स्थायी समितीने त्यांना कामावर घेण्याबाबतचा ठराव पास केल्यानंतर मा. आयुक्तांनी त्यांना कामावर घेतले याकाळातीत मा. आयुक्त यांनी शासनाकडे माहिती का विचारली नाही याचा अर्थ श्री. रयतवार यांचे बाबतीत मा. आयुक्त यांनी घेतलेला निर्णय योग्य नाही. म्हणुन संबंधित कर्मचारी यांना शासन निर्णयानुसार व स्थायी समितीने पास केलेल्या ठरावानुसार त्वरीत कामावर घेण्यात यावे.

**मा. सभापती** : श्री. रयतवार यांना कामावर घेण्याबाबत शासनाचे जे काही निर्देश आलेले आहे त्याची पडताळणी करुन मा. आयुक्त यांनी संबंधित कर्मचारी यांना कामावर घेण्यात यावे. शासनाचे निर्णयाचे पालन व्हावे. उदया हे कर्मचारी न्यायालयात गेल्यास महानगरपालिकेची प्रतिभा खराब होईल.

**श्री. जगदीश सिध्द** : लाचलुचपत विभागाने श्री. शौकत अली, यांचेवर धाड टाकली व त्यांना लाच घेतांना पकडले या घटनेला १ महिना झालेला असतांना सदर कर्मचाऱ्यांस अद्याप निलंबीत का करण्यात आलेले नाही.

**मा. सभापती** : उपआयुक्त (म.) यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.)** : श्री. शौकत अली यांचे बाबतीत ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाकडुन एक अहवाल प्राप्त झालेला आहे. या विभागाचे कर्मचाऱ्यांनी श्री. शौकत अली यांना लाच घेतांना दिनांक ०३-०६-२००१ रोजी सायंकाळी पकडलेले होते. त्यानुसार प्रकरण न्यायालयात गेलेले आहे. या प्रकरणाच्या बाबतीत विधी सल्लागार यांचेकडुन आलेल्या पत्रात असे म्हटले आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा नियम क्र. १९७९ चे नियम क्र. ४ (२) अ. नुसार फौजदारी आरोपावरुन किंवा अन्य कारणावरुन अटक करुन कर्मचाऱ्यांस ४८ तासापेक्षा जास्त पोलीस कोठडीत ठेवले असेल तर, त्यांना निलंबन करावे. या प्रकरणात संबंधित कर्मचारी यांना ०३-०८-२००१ रोजी १९.१५ वाजता लाचलुचपत खात्याने पकडले होते. व त्यावेळीच त्यांना अटक करण्यात आलेली आहे. दिनांक ०४-०८-०१ रोजी त्यांना जमिनीवर मुक्त करण्यात आलेले आहे. असे संबंधित विभागाचे पत्राने कळविण्यात आलेले आहे. तसेच सदरील कर्मचारी यांना ३० तासाच्या आत जमिनावर मुक्त करण्यात आलेले आहे. म्हणुन सदरील परिस्थितीनुसार सदर कर्मचारी यांना ४८ तासापेक्षा जास्त पोलीस कोठडीत किंवा न्यायालयीन कोठडीत ठेवलेले नाही. असे कळविलेले आहे. म्हणुन त्यांना निलंबित करण्यात आलेले नाही.

**श्री. जगदीश सिध्द** : लाचलुचपत प्रकरणात जे कर्मचारी या अगोदर गुंतलेले होते ते कर्मचारी २० तासाच्या आत जमिनावर सुटविले आहे. त्यांना का निलंबित करण्यात आले हेते. संबंधित ॲन्टीकरप्शन ब्युरो या विभागाने पकडुन १ महिना झालेला आहे. का निलंबित केले नाही संचिका सभागृहासमोर आणावी काय घडले सभागृहास वाचुन दाखवावे. मागील काही दिवसापुर्वी दोन इमारत निरीक्षक यांना सुध्दा लाचलुच खात्याने लाच घेतांना पकडले होते. २० तासाच्या आत जमिनावर सुटलेले अहे. त्यांचेवर का निलंबनाची कार्यवाही करण्यत आली होती.

**मा. सभापती** : कोणत्याही कर्मचाऱ्यांवर अशा प्रकरणाचे गुन्हे दाखल झालेले असतील व काहींना न्याय दिला नसेल त्यांचेवर अन्याय झालेले असेल त्यांनी स्थायी समितीपुढे तसे अपील सादर करावे योग्य न्याय दिला जाईल. ज्या ज्या कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली कोणते कर्मचारी किती तास पोलीस किंवा न्यायालयीन अधिकक्षेत राहीले या सर्व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत एक अहवाल संबंधित विभागाने तयार करुन पुढील स्थायी समितीसमोर ठेवावा. दुटप्पी भुमिका विधी विभाग होत असेल तर, मा. आयुक्त यांनी विधी सल्लागार यांचेवर कार्यवाही करावी. टिप्पणी तयार करुन कायदेशीर सल्ला काय दिला ते पुढील स्थायी समितीच्या बैठकीत घ्यावा.

या बरोबरच " जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | स्थायी सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १५-०९-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. शनिवार दिनांक १५-०९-२००१ रोजी मा. सभापती, श्री. प्रशांत देसरडा, यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समिती सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे सकाळी ११.३० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला कार्यालयीन अधिकारी यांचेसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. अशरफ युनूस मोतीवाला | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. सिध्द जगदिश कन्हैयलाल | -//- |
| ३. | स. स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग | -//- |
| ४. | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ५. | स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | -//- |
| ६. | स. स. श्री. सलीम पटेल समशेर पटेल | -//- |
| ७. | स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| ८. | स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली | -//- |
| ९. | स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| १०. | स. स. श्री. शे. इलियास किरमानी शे. उमर | -//- |
| ११. | स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतू | -//- |
| १२. | स. स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |

अमेरिकेतील बॉब हल्यात जे भारतीय नागरीक मृत्यूमुखी पडले त्यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्धता पाळुन श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली व निषेध व्यक्त केला.

**विषय क्र. ३७/१ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, उस्मानपुरा येथे ३०० व ४५० मी. मी. व्यासाच्या पुर्वरचित अर्धगोलाकार आर. सी. सी. गटारी (बसविणे) बांधणे या कामासाठी सन १९९९-२००० च्या सा. बा. विभाग आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या दरसुची दराने रक्कम रुपये ११,७१,७०२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ११,७१,७०२/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**मा. सभापती** : विषय सर्वानुमते मंजुरी करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उस्मानपुरा येथे ३०० व ४५० मी. मी. व्यासाच्या पुर्वरचित अर्धगोलाकार आर. सी. सी. गटार बांधणेच्या कामासाठी र. रु. ११,७१,७०२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८/२ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सद्यस्थितीत महानगरपालिकेमध्ये ठराविक व दैनिक वेतनावर तृतीय श्रेणी मध्ये खालील प्रमाणे कर्मचारी कार्यरत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | दैनिक वेतन रु. ७५/- नुसार | एकुण ४२ कर्मचारी |
| २. | ठराविक वेतन रु. १०००/- नुसार | एकुण १८ कर्मचारी |
| ३. | ठराविक वेतन रु. १५००/- नुसार | एकुण ०७ कर्मचारी |
| ४. | ठराविक वेतन रु. ७५०/- नुसार | एकुण ०१ कर्मचारी |
| ५. | ठराविक वेतन रु. ७००/- नुसार | एकुण ०२ कर्मचारी |
| | | **एकुण ७० कर्मचारी** |

नुकतीच चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचा दैनिक वेतनात वाढ केली असल्याने तृतीय श्रेणी कर्मचारी यांच्याही वेतनात वाढ करणे बाबत प्रश्न विचाराधिन होता, महानगरपालिकेची सद्यः आर्थिक परिस्थिती विचारात घेता प्रशासनातर्फे खालील प्रमाणे वेतनवाढ करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | दैनिक वेतन कर्मचारी रु. ७५/- | ऐवजी रु. ९०/- |
| २. | ठराविक वेतन रु. १०००/- | ऐवजी रु. १७००/- |
| ३. | ठराविक वेतन रु. १५००/- | ऐवजी रु. २२००/- |
| ४. | ठराविक वेतन रु. ७५०/- | ऐवजी रु. १२००/- |
| ५. | ठराविक वेतन रु. ७००/- | ऐवजी रु. १२००/- |

प्रस्तावितनुसार, तृतीय श्रेणी दैनिक वेतन व ठराविक वेतन कर्मचाऱ्यांचे वेतन वाढविल्यास महानगरपालिकेवर वार्षिक रु. ४,२३,९६०/- या अतिरिक्त बोजा पडेल सदरच्या दैनिक/ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांच्या वेतनात मागील ४ वर्षापासुन वाढ केलेली नाही. अशा परिस्थीत सदरील तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करणे गरजेचे असल्याने व वाढता महागाई निर्देशांक लक्षात घेता प्रस्तावित केल्यानुसार प्रस्तावास मान्यता देण्यास हरकत नाही. प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (२) अन्वये मा. स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. मीर हिदायत अली :** वाहनचालक यांना ११४.०० रुपये दैनिक वेतन करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन देण्यात यावा.

**मा. सभापती** : मुख्य लेखाधिकारी यांनी यांसबंधी माहिती द्यावी.

**मुख्यलेखाधिकारी :** दोन स्थायी समितीच्या बैठकीपुर्वी चतुर्थ श्रेणी कामगारांना दैनिक वेतनात वाढ करण्याचा प्रस्ताव सादर होऊन रु. ८०/- दैनिक वेतन देण्यात यावे असे स्थायी समितीच्या बैठकीत निर्णय झालेला आहे. त्याचप्रमाणे तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ व्हावी म्हणुन पालीका कर्मचारी महासंघाचे पदाधिकाऱ्यांची मागणी होती. त्याचा विचार करुन प्रशासनातर्फे तपासणी करण्यात आली. सध्या तृतीय श्रेणीतील कर्मचाऱ्यांना ७५/- दैनिक वेतन दिला जातो. असे ४२ कर्मचारी आहेत. ठराविक वेतन १०००/- रुपये प्रमणे एकुण १८ कर्मचारी आहेत रुपये १५००/- ठराविक वेतनावर ७

कर्मचारी तसेच रु. ७५०/- ठराविक वेतनावर व रु. ७००/- ठराविक वेतनावर २ कर्मचारी आहेत. दैनिक वेतनावरील व १०००/- ते १५०० दरमहा वेतनावर जे कर्मचारी आहे ते पुर्ण ८ तास काम करतात जे ७५०/-, ७००/- वेतनावर आहे जे फक्त ४ तासच काम करतात. कोणते कर्मचारी किती वेळ काम करतात. त्यानुसार वेतनामध्ये वाढ प्रस्तावित केलेली आहे. चतुर्थश्रेणी कामगारांना प्रशासनातर्फे ७५/- रुपये दैनिक वेतनात रु. १०/- जास्तीची वाढ प्रस्तावित केलेली होती. त्यात ५/- रुपये वाढवुन रु. ८०/- दैनिक वेतन करण्यात आलेले आहे. वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना सुध्दा ७५/- रुपये दैनिक वेतन देण्यात येतो. त्यांचे वेतनामध्ये १५ रुपयांची वाढ करुन ९०/- रुपये दैनिक वेतन द्यावा असे प्रस्तावित केलेले आहे. यात एकुण दर महिन्याच्या पगारामध्ये महानगरपालिकेवर रु. ४,२३,९६४/- आर्थिक बोजा पडणार आहे.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** वाहन चालक यांना ११४.०० दैनिक वेतन देण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे या प्रस्तावानुसार वर्ग-३ च्या सर्वच कर्मचाऱ्यांना ११४.०० दैनिक वेतन लागु करावा वाहन चालक व क. लिपीक व इतर काही पदे व वर्ग-३ च्या संवर्गातच येतात. त्यामुळे सर्वांना सारखेच वेतन दिले गेले पाहिजे.

**मुख्य लेखाधिकारी :** वाहन चालक ही टेक्नीकल पदे आहेत या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासन निर्देशानुसार दैनिक वेतन रुपये ११४.०० देण्यात येत आहे.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** दोन्हीही पदाची वेतन श्रेणी एकच आहे. दोन्ही पदे ही एकाच संवर्गात येतात. यामुळे सर्वांना ११४.०० दैनिक वेतन देण्यात यावा.

**डॉ. आशा बिनवडे :** लिपीक संवर्गातील कर्मचारी यांनी वेगवेगळया प्रकारच्या पदव्या प्राप्त केलेल्या आहे. त्यांचे शिक्षणाला काही महत्व नाही काय? वाहन चालकाप्रमाणे त्यांना सुध्दा तेवढाच दैनिक वेतन लागु करावा.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** काही कर्मचारी ठराविक वेतनावर का आहेत. त्याचा खुलासा करावा. त्यांचे वय काय आहे. सर्वांना दैनिक वेतन देण्यात यावे. ११४/- लागू करावे.

**मुख्यलेखाधिकारी :** कर्मचाऱ्यांचे वय वगैरे याचा काही संबंध नाही. ज्यांना सुरुवातीला ठराविक वेतन आदेश दिले ते ठराविक वेतनावरच आहे. ठराविक वेतन रु. १५००/- दरमहावर काही क. लिपीक यांचा सुध्दा समावेश आहे.

**श्री. भरत लकडे :** दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना ११४/- रु. दैनिक वेतन देत असेल तर, ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये सुध्दा २०० ते ३०० रुपयाने वाढ करावा.

**श्री. सावंत मधुकर :** ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये सुध्दा वाढ करण्यात यावी.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** महागाईचा विचार केल्यास ९०/- रु. दैनिक वेतन फार कमी होतात. ११४.०० जो की, वाहनचालक यांना देण्यात येतो. त्याप्रमाणे दैनिक वेतन लागु करावा.

**मा. सभापती** : दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये वाढ करण्याच्या प्रस्ताव सादर झालेला आहे. अस्थायी कर्मचारी सुध्दा ८ तास काम करतात व सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन रु. ११४/- करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच ठराविक वेतन रुपये १०००/-

ज्यांना आहे. त्यांना १७०० ऐवजी १९००/- देण्यास मंजुरी देण्यात येते. जे कर्मचारी ठराविक वेतन रु. १५००/- वर कार्यरत आहे. त्यांचे वेतनामध्ये २२००/- रु. प्रस्तावित केले आहे. त्यांचे वेतनामध्ये २००/- ने वाढ करुन रुपये २४०४/- दरमहा वेतन देण्यास मंजुरी देण्यात येते न जे कर्मचारी ७५४/-, ७००/- रुपये दरमहा वेतनावर आहे. त्यांचे वेतनात वाढ म्हणुन १२००/- प्रस्तावित केले आहे. त्यांना २०४/- ने वाढ करुन १४००/- दर महा ठराविक वेतन देण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दैनिक वेतन व ठराविक वेतनावर तृतीय श्रेणीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे खालील प्रमाणे वेतनवाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १. | दैनिक वेतन कर्मचारी रु. ७५/- | ऐवजी रु. ११४/- |
| २. | ठराविक वेतन रु. १०००/- | ऐवजी रु. १९००/- |
| ३. | ठराविक वेतन रु. १५००/- | ऐवजी रु. २४००/- |
| ४. | ठराविक वेतन रु. ७५०/- | ऐवजी रु. १४००/- |
| ५. | ठराविक वेतन रु. ७००/- | ऐवजी रु. १४००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुख्य लेखा परिक्षक, महानगरपालिका औरंगाबाद यांनी जा. क्र./मनपा/मुलेप/९५/१०५ दिनांक १६-०८-९५ नुसार जकात विभागातील न ठरलेल्या धनादेशाबाबतचा अंतरीम चौकशी अहवाल सादर केलेला होता. ज्यानुसार तत्कालीन नाका चेकर श्री. एम. ए. साजदे यांनी जकात पावती अन्वये जकात रोखीने केला असून, त्याचा भरणा बोगस चेकद्वारे केल्याचे कळविलेले होते. उक्त बाबीस श्री. एम. ए. साजेद जकात लिपीक हे जबाबदार असल्याचे निर्दशनास आल्यावरुन व त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे योजिल्यावरुन श्री. एम. ए. साजेद जकात लिपीक जकात विभाग, मनपा औरंगाबद यांस कार्यालयीन आदेश जा. क्र./मनपा/अस्था-१/९५/२६३० दि. १७-०८-९५ नुसार यांना निलंबित करण्यात आले. मुख्य लेखा परिक्षक यांनी त्यांचेकडील जा.क्र./मनपा/मुलेप/१९९/९५ दिनांक ०६-०९-९५ नुसार प्रकरणात सविस्तर लेखा परिक्षक अहवाल सादर केला. ज्यानुसार श्री. साजेद यांनी रोख रक्कमेची अफरातफर करुन खोटे धनादेश मनपा फंडात जमा करुन रु. १,९६,३२२/- इतक्या रक्कमेची अफरातफर केल्याचे कळविलेले होते. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष जकात वसुली रक्कमेपेक्षा कमी भरणा मनपा फंडात करुन त्यांना रु. २,७७,८९/- इतक्या रक्कमेची अफरातफर केल्याचे कळविले होते. अशा प्रकारे एकुण रक्कम रु. ४,७४,२१४/- इतक्या कमी रक्कमेचा अपहार केल्याचे त्याचप्रमाणे सि. पुस्तक क्रमांक ८६० व ३१८१ हे त्यांनी जकात विभागात जमा न केल्यामुळे त्याचे लेखा परिक्षण न करण्यात आले असल्याचे कळविण्यात आलेले होते.

श्री. एम. ए. साजेद जकात लिपीक (निलंबित) यांचे खाते चौकशी प्रकरणात तत्कालीन शहर अभियंता श्री. आय. टी. गायकवाड यांची चौकशी अधिकारी म्हणुन तर सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री. व्ही. एस. कुलकर्णी तत्कालीन जकात अधिक्षक यांची दिनांक १३-१०-९५ च्या आदेशानुसार नियुक्ती करण्यात आलेली होती. श्री. एम. ए. साजेद

यास दि. १३-१०-९५ नुसार दोषारोप पत्र देण्यात आले. ज्यात लेखा परिक्षणात नमुद करण्यात आलेल्य उक्त बाबींचा समावेश करण्यात आलेला होता.

चौकशी अधिकारी तथा शहर अभियंता यांनी त्यांचेकडील पत्र क्र. ३६३/९६ दि. ०४-११-९६ नुसार उक्त खाते चौकशी प्रकरणी मा. आयुक्तांकडे चौकशी अहवाल सादर केला. ज्यानुसार ते खालील निष्कर्षास आलेले होते.

जकात विभागातील जकात करापोटी रोखीने अदा केलेल्या रक्कमेचा खोटया धनादेशाद्वारे भरणा करुन रु. १,९६,३२२/- इतक्या रक्कमेची अफरातफरी बाबत तयांना शिक्षा प्रस्तावित केली आहे की, त्यांचे भावी काळातील वेतन वाढीववर कायम परिणाम होईल अशा रितीने चार वर्षासाठी त्यांची पुढील वेतनवाढ रोखुन ठेवण्यात यावी व त्यांना पुर्न:स्थितीत करण्यात येऊन निलंबनाबाबतचा कालावधी हा श्री. एम. ए. साजेद यांना देय व अनुज्ञेय असलेल्या रजेमध्ये रुपांतरीत करण्यात यावा. चौकशीमध्ये उशिरा (म्हणजे १५ महिन्यांनी) रु. ३६,९६०/- जमा केल्याचे निष्पन्न झाले व १५ महिने त्यांनी रक्कम वावरली हे सिध्द झालेले आहे. सबब वर दर्शविल्याप्रमाणे श्री साजेद यांचे भावी काळातील वेतनवाढीवर कायम परिणाम होईल अशा रितीने चार वर्षासाठी पुढील वेतनवाढ रोखुन ठेवण्यात येऊन त्यांना पुर्न:स्थापित करण्यात येऊन निलंबनाचा कालावधी हा देय अनुज्ञेय रजेत रुपात करण्यात यावा. रु. २,२२,९२९/- इतकी रक्कम कमी जमा करण्याबाबतचा आरोप गुंतागुतीचा व सभ्रम निर्माण करणारा असल्यामुळे पारदर्शकता आणण्याचे दृष्टीने मुख्य लेखा परिक्षकमार्फत सविस्तर चौकशी होणे योगय राहील अशी त्यांनी शिफारस केलेली होती.रु. १८,०००/- कमी जमा झाले, त्यास श्री. एम. ए. साजेद जबाबदार असल्याचे निष्कर्षास चौकशी अधिकारी आलेले होते व उक्त रक्कम जमा करणेबाबत नोटीस देऊन पैसे व्याजासह वसुल करणे योग्य होईल अशी त्यांनी शिफारस केली होती. उक्त रक्कमेचा विहीत मुदतीत भरणा न झाल्यास फौजदारी केस करणे योग्य होईल अशीही त्यांनी शिफारस केलेली होती.

वरील प्रमाणे चौकशी अहवाल सादर करण्यात आला असता, " सार्वजनिक पैशाची अफरातफर करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द कठोर कार्यवाही करणे आवश्यक असल्यामुळे व त्यास सेवेतुन बडतर्फ करण्यात यावे या निष्कर्षात आयुक्त आल्यामुळे " यासंबंधाने समख चौकशीस उपस्थित राहण्यासाठी दि. ०७-१०-९७ रोजी उपस्थित राहणेस्तव श्री. साजेद यास २९-०९-९७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले. श्री. सजेद यांनी ०६-१०-९७ च्या अर्जान्वये पुढील तारीख देण्यासाठी विनंती केल्यावरुन १४-१०-९७ अशी तारीख देण्यात आली. त्यावर श्री. साजेद यांनी तारीख वाढवुन देण्यासाठी १४-१०-९७ रोजी अर्ज दिला असता पुढील तारीख २७-१०-९७ अशी ठेवण्यात आली. तथापी २७-१०-९७ रोजी सुनावणी होऊ शकली नव्हती. प्रकरणी श्री. साजेद यांनी युएलपी १८८/९५ मध्ये मा. न्यायालयाने दिलेला " जैसे थे " आदेश न्यायालयाने दि. ०६-०९-९९ रोजी व्हॅकेट केल्यावरुन श्री. साजेद यास ०५-१०-९९ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी दि. २७-०९-९९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले. दि. ०५-१०-९९ रोजी श्री. साजेद हे हजर होते. परंतु सुनावणी न आल्यामुळे पुढील तारीख १२-१०-९९ अशी ठरली होती.

श्री. मो. साजेद यांनी त्यांचे निलंबन रद्द करुन संपुर्ण पगारासह त्यांना कामावर रुजु करु घेणेबाबत मा. औद्योगिक न्यायालयात तक्रार १२०/२००१ सादर केलेली होती. त्या अनुषंगाने दि. २४-०७-२००१ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी श्री. साजेद यास २१-०७-२००१ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. उक्त पत्र श्री. साजेद यांना स्पीड पोस्टद्वारे पाठविण्यात आले असता, त्यांनी ते घेण्यास नकार दिल्यास पोस्ट खात्यातर्फे कळविण्यात आलेले होते. मा. औद्योगिक न्यायालयाने दि. २५-०७-२००१ रोजी संबंधिताचा

निलंबन आदेश रद्द करण्यात यावा, चार्ज शिट संपुर्ण चौकशीची प्रोसेडिंग व चौकशी रिपोर्ट रद्दबात्तल करण्यात यावा, निलंबन कालावधी व सर्व वेतन भत्ते देण्यात येऊन त्यास जकात विभागात लिपीक पदावर कामावर घेण्यात यावे व श्री साजेद यांच्या विनंतीबाबत आदेश दिला की, निलंबन आदेशास स्थगिती देण्यात येत आहे. ज्या कारणे दाखवा नोटीसच्या व चार्ज शिटच्या आधारे चौकशीची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली. त्यासही तक्रार निकाली लागेपर्यंत स्थगिती देण्यात आली. तसेच श्री. सजेद यास जकात विभागात लिपीक म्हणुन कामावर घेण्यास व एक महिन्यात संबंधितास पुर्ण पगार निलंबनाचा दिवसाचा दयावा असा निर्देश मा. औद्योगिक न्यायालयाने अंतरीम आदेश पारीत करुन दिले होते.

प्रकरणात मा. औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयास स्थगिती देण्यासाठी महानगरपालिकेतर्फे दाखल केलेल्या रिट याचिकेत मा. उच्च न्यायालयात दि. ०१-०८-२००१ रोजी सुनावणी झाली व औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयास स्थगिती मिळाली. तथापिक प्राप्त चौकशी अहवालावर एक महिन्यात अंतीम निर्णय घेऊन त्यासंबंधीचा अहवाल मा. उच्च न्यायालयात सादर करण्यासाठी मा. उच्च न्यायालयाने निर्देशित केलेले होते. त्यानुषंगाने श्री. साजेदे यास दि. १३-०८-२००१ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी व त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी दि. ०२-०८-२००१ च्या पत्रान्वये कळविण्यात आले. परंतु दि. १३-०८-२००१ रोजी मा. सर्वसाधारण सभा असल्यामुळे दि. १४-०८-२००१ रोजी दु. ४.०० वा. सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी श्री. साजेद यांना दि. १३-०८-२००१ च्या पत्रानुसार कळविण्यात आले. श्री. साजेद हे दि. १४-०८-२००१ रोजी सुनावणीस उपस्थित राहिले तथापि मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे डिव्हीजन बेंचसमोर अपील दाखल केले असल्याचे त्यांनी सांगितलेले होते.

श्री. साजेद यांनी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे डिव्हीजन बेंचससमोर एलपीए ६२/२००१ सादर केली होती. त्यात दिनांक २१-०८-२००१ रोजी सुनावणी होऊन त्यांच्या वकिलाने ती परत घेतली. तथापि प्रकरणात दि. ३१-०८-२००१ पुर्वी निर्णय घेण्याचे मा. न्यायालयाने आदेशित केलेले होते.

त्यानुसार श्री. साजेद यांना दि. २७-०८-२००१ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी दि. २३-०८-२००१ नुसार कळविण्यात आले असता तो समक्ष उपस्थित राहिले. व त्यांनी त्यांचे म्हणणे सादर केले होते. प्रकरणात अंतीम निर्णय घेण्यासाठी मुदतवाढ मिळविण्यासाठी मा. उच्च न्यायालयास रिट याचिका क्र. ३०१७/२००१ मध्ये सिव्हील ॲप्लीकेशन क्र. ४९७५/२००१ नुसार विनंती करण्यात आली असता मा. उच्च न्यायालयाने दि. ३१-०८-२००१ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे १७ सप्टेबंर २००१ पर्यंत मुदतवाढ मान्य केलेली होती.

उक्त सर्व परिस्थिती विचारात घेता चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालाशी आयुक्त सहमत आहेत. परंतु चौकशी अधिकाऱ्यांनी प्रस्तावित केलेल्या शिक्षेची सहमत नसल्यामुळे व शासकीय पैशाचा अपहार ही बाब विचारात घेता श्री. साजेद यास महापालिका सेवेतुन बडतर्फ का करण्यात येऊ नये. याबाबतचे लेखी स्पष्टीकरण सादर करण्यासाठी (७ दिवसात) जा. क्र./मनपा/अस्था-१/२००१/२५०४ दि. ३१-०८-२००१ च्या नोटीसक्षेर कळविण्यात आले. उक्त नोटीस त्यांना दि. ०१-०९-२००१ रोजी स्पीड पोस्टद्वारे प्राप्त झाली. तथापि श्री. साजेद यांचे दि. ०३-०९-२००१ च्या अर्जान्वये स्पष्टीकरण सादर करण्यासाठी दिनांक १०-०९-२००१ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याबद्दल जा. क्र./मनपा/अस्था-१/२००१/२५५ दि. ०७-०९-२००१ नुसार श्री. साजेद यांना कळविण्यात आलेले होते.

त्याउत्तरी श्री. एम.ए. साजेद यांनी त्यांचे दि. १०-०९-२००१ रोजी लेखी स्पष्टीकरण सादर केलेले आहे. तथापि त्यांनी सादर केलेले स्पष्टीकरण हे असमाधानकारक असल्यामुळे व विभागीय चौकशीमध्ये त्यांचेवरील दोशारोप सिध्द झालेले असल्यामुळे दोषाआरोपातील गंभिरता विचारात घेता दोष आर्थिक बाबींचा असल्यामुळे रक्कम भरणा केल्यानंतरही दोषमुक्त होऊ शकत नाही. अशा प्रकरणात लहान शिक्षा देणे संयुक्ति होत नाही. त्यामुळे त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम ३ चा भंग केल्याचेही सिध्द झाल्यामुळे त्यांचेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील तरतुदीनुसार शास्ती लावणे आवश्यक आहे.

करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील उपकलम २ (ह) नुसार पुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल. अशा प्रकारे श्री. एम. ए. साजेद कनिष्ठ लिपीक (सध्या निलंबित) यास महानगरपालिका औरंगाबादच्या सेवेतुन बडतर्फ करणेबाबतचा प्रस्ताव प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. मधुकर सावंत :** सदरील प्रस्ताव सभागृहामध्ये वाचुन दाखवावा अशी विनंती करतो.

**मा. सभापती** : ठिक आहे. सचिवांनी प्रस्ताव वाचुन दाखवावा.

**नगरसचीव** : प्रस्ताव वाचुन दाखवितात.

**श्री. शे. इलियास किरमानी :** या संदर्भात माझे २-३ प्रश्न आहेत. याचा खुलासा व्हावा. श्री. एम. ए. साजेद यांच्या चौकशीचा कालावधी किती होता व किती कालावधी लागला. चौकशी करुन किती दिवसाने द्यावा याबाबतीतली माहिती द्यावी. तत्कालीन आयुक्त श्री. डी. एन. वैद्य यांना या प्रकरणात नॉन बेलेबल वॉरंट काढले होते का मुंबई प्रा. मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ब) नुसार श्री. साजेद यांना निलंबन करणेपुर्वी सर्वसाधारण सभेची परवानगी घेतली होती काय? श्री. साजेद यांना यापुर्वी कोर्टाने रु.एक हजार देण्याबाबत महानगरपालिकेस दंड केलेला आहे. त्याचा धनादेश त्यांना दिलेला आहे का? याची माहिती सभागृहात द्यावी.

**मा. सभापती** : स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांबाबत श्री.साजेद यांच्या चौकशीचा कालावधी किती होता आणि चौकशी अहवालात जे प्रस्तावित केलेले होते. त्यानुसार संबंधितावर गुन्हा वगेरे दाखल केलेले होता काय? याचा सविस्तर खुलासा सभागृहात करावा.

**सहाय्यक आयुक्त-१** : १. मुख्य लेखा परिक्षक मनपा, औरंगाबद यांनी जा. क्र./मनपा/मुलेप/९५/१८५ दिनांक १६-०८-९५ नुसार मा. आयुक्तांकडे जकात विभागातील नवटलेल्या धनादेशाबाबतचा अंतरीम चौकशी अहवाल सादर केला.

२. उक्त बाबीस श्री. एम. ए. साजेद जकात लिपीक हे जबाबदार असल्याने निर्देशनास आल्यावरुन जा.क्र./मनपा/अस्था-१/९५/२६३० दि. १७-०८-९५ नुसार श्री. साळवे यास निलंबीत करण्यात आले.

३. मुख्य लेखा परिक्षक मनपा औरंगाबाद यांनी जा. क्र./मनपा/मुलेप/९५/१८५ दिनांक ०६-०९-९५ नुसार प्रकरणातीन सविस्तर लेखा परिक्षण अहवाल सादर केला.

४. जा.क्र./मनपा/अस्था-१/९५/३१०९ दिनांक १३-१०-९५ नुसार प्रकरणात चौकशी अधिकारी म्हणुन श्री. आय. टी. गायकवाड, तत्कालीन शहर अभियंता तर ३११०/९५ दिनांक १३-१०-९५ नुसार सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री. व्ही. एस. कुलकर्णी, तत्कालीन जकात अधिक्षक यांची नियुक्ती करण्यात आली.

५. जा.क्र./मनपा/अस्था-१/१११/९५ दि. १३-१०-९५ नुसार श्री. साजेद यांस आरोपपत्र देण्यात आले. आरोपपत्रात खालील आरोपांचा समावेश होता.

अ) रोखीने अदा केलेल्या रक्कमेचा खोटया धनादेशाद्वारे भरणा करुन १,९६,३२२/- इतक्या रक्कमेची अफरातफर

ब) प्रत्यक्ष जकात वसुल रक्कमेपेक्षा कमी भरणा मनपा फंडात करुन रु. २,७७,८९४/- इतक्या रक्कमेची अफरातफर

क) सी पुस्तक क्र. ८६० व ३९८१ जकात विभागात जमा न करणे, त्यांचे लेखा परीक्षण करता आले नाही.

६. चौकशी अधिकारी तथा शहर अभियंता यांनी त्यांचे कडील पत्र क्र. ३६३/९६ दि. ०४-११-९६ नुसार उक्त खाते चौकशी प्रकरणी अहवाल मा. आयुक्तांकडे सादर केला.

७. सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार चौकशी अधिकाऱ्यांनी खालील प्रमाणे निष्कर्ष सादर केला.

अ. क्र. आरोप क्र. १-- रु. १,९६,३२२/- बाबत.

जकात विभागातील जकात करापोटी रोखीने अदा केलेल्या. रक्कमेचा खोटया धनादेशाद्वारे भरणा करुन रु. १,९६,३२२/- इतक्या रक्कमेची अफरातफरी बाबत त्यांना शिक्षा प्रस्तावित केली आहे की, त्यांचे भावी काळातील वेतनवाढीवर कायम परिणाम होईल अशा रितीने चार वर्षासाठी त्यांची पुढील वेतनवाढ रोखुन ठेवण्यात यावी व त्यांना पुन:स्थापित करण्यात येऊन निलंबनाबाबत कालावधी हा श्री. एम. ए. साजेद यांना देय व अनुज्ञेय असलेल्या रजेमध्ये रुपांतरीत करण्यात यावा.

अ. क्र. आरोप क्र. २ (ड) मधील रु.
३६,९६७/- रुपयांच्या अफरातफरीबाबत

चौकशीत उशिरा (म्हणजे १५ महिन्यांनी) रक्कम जमा केल्याचे निष्पन्न झाले आहे व १५ महिने त्यांनी (श्री साजेद) यांनी रक्कम वापरली हे सिध्द झाले आहे. सबब आरोप क्र. १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे श्री. साजेद यांचे भावी काळातील वेतनवाढीवर कायम परिणाम होईल अशा रितीने चार वर्षासाठी पुढील वेतनवाढ रोखुन ठेवण्यात येऊन व त्यांना पुन:स्थापित करण्यात येऊन निलंबनाचा कालावधी हा श्री.एम. ए. साजेद यांना देय व अनुज्ञेय असलेल्या रजेमध्ये रुपांतरीत करण्यात यावा. अ. क्र. ३ आरोप क्र. २ अ) रु. २,२२,९२९/- कमी जमा करणे बाबत आरोप

वरील आरोप गुतांगुतींचा संभ्रम निर्माण करणारा असल्यामुळे पारदर्शकता आणण्याचे दृष्टीने स्वतंत्रपणे मुख्य लेखा परिक्षकामार्फत सविस्तर चौकशी होणे योग्य राहील.

**श्री. शे. इलियास किरमानी :** चौकशी कालावधी वाढवुन देणेबाबात शासनाकडुन परवानगी घेतली होती काय? किंवा महानगरपालिकेची परवानगी घेतली होती काय?

**सहाय्यक आयुक्त-१ :** नाही. याबाबत शासनाकडुन परवानगी घेतली नाही.

**मा. सभापती** : चौकशी अहवालामध्ये काय प्रस्तावित केलेले आहे.

**श्री. सलीम पटेल :** श्री. एम. ए. साजेद यंनी कार्यालयात रक्कम रु. १,९६,३२२/- चा भरणा केलेला होता काय

**सहाय्यक आयुक्त-१ :** होय केली आहे.

**श्री. सलीम पटेल :** प्रस्तावात सांगितल्याप्रमाणे श्री. एम. ए. साजेद यांच्या चौकशीमध्ये नमुर केले आहे की, आरोप क्र. २ (अ) नुसार गुंतागुंतीची व संभ्रम निर्माण करणारा आरोप आहे व याबाबतची लेखापरिक्षण करणे योग्य राहील असे म्हटलले होते. मग मुख्य लेखा परिक्षकांमार्फत लेखा परिक्षण केले काय? गेल्या ७/८ वर्षापासुन संबंधित कर्मचाऱ्यास निलंबित करुनही पुर्णपणे चौकशी झाली नाही. याचा अर्थ काय? नियमाप्रमाणे कोणत्याही कर्मचाऱ्यांची चौकशी पुर्णपणे होणे आवश्यक असते. संबंधित कर्मचाऱ्यांची चौकशी न करता एकदम " बडतर्फे " करण्याचा प्रस्ताव ठेवणे योग्य नाही. मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५९(२) (ब) अन्वये संबंधित कर्मचाऱ्यांची चौकशीची मुदतवाढ करणेची सर्वसाधारण सभेपुढे मंजुरी घेतलेली नाही किंवा शासनाचीही मंजुरी घेतलेली नाही. मग संबंधित कर्मचायाबाबतीत बडतर्फीचा प्रस्ताव कसा आणला. हे नियमास धरुन आहे काय? याचा खुलासा द्यावा.

**मा. सभापती** : आताच विधी विभागाने संबंधित कर्मचाऱ्यांबाबतीत त्यांचे पत्रासोबत कोर्टाच्या आदेशाची प्रत माझ्याकडे आताच प्राप्त झाली आहे. तेव्हा विधी सल्लागारांनी सांगावे की, कोर्टाचा काय निर्णय आहे. ते सभागृहाला सांगावे व या विषयावर सभागृहात चर्चा करुन आपण निर्णय घेवु शकता किंवा कसे.

**श्री. मधुकर सावंत :** मला असे विचारणा करावयाची आहे की, सदरचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे येण्याचे कारण काय?

**मा. सभापती** : चौकशी अधिकारी यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे अ. क्र. ३ आरोप क्र. २ (अ) मधील रक्कम रु. २,२२,९२९/- कमी जमा करणे बाबतच्या आरोपा संदर्भात हा आरोप गुंतागुतीचा व संभ्रम निर्माण करणारा असल्यामुळे पारदर्शकता आणल्याचे दृष्टीने स्वतंत्रपणे मुख्य लेखा परिक्षकामार्फत लेखा परिक्षण का केले नाही. आणि आजच स्थायी समितीसमोर चौकशी न घेता व लेखा परिक्षण न होता प्रस्ताव समोर कसा आणला याची माहिती द्यावी.

**उपआयुक्त (प्र.) :** चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवाल दिला. तत्कालीन आयुक्त श्री. डी एन. वैद्य साहेब यांचे समोर चौकशी अहवाल सादर केला. परंतु न्यायालयात वेगवेगळया प्रकारच्या दाखल झालेल्या प्ररकणांमुळे निर्णय घेता आला नाही. तत्कालीन आयुक्त श्री. वैद्य यांनी निर्णय घ्ज्ञेऊन संबंधितास नोटीस दिली होती. औद्योगिक न्यायालयात आव्हान देण्यात आले. मा. आयुक्तांनी प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवला म्हणुन औद्योगिक न्यायालयापुढे मांडण्यात आले. यावर स्थायी समितीत चर्चा करुन निर्णय घेता येईल. औद्योगिक न्यायालयाचे आदेश आहेत की, औद्योगिक न्यायालयाचा निर्णय होईपर्यंत आयुक्तांना अंतीम आदेश काढता येणार नाही. चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवाल सादर केला. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (अ) प्रमाणे कार्यवाही करावी लागेल.

स्थायी समितीच्या मंजुरीशिवाय बडतर्फीची कार्यवाही आयुक्तांना करता येत नाही. म्हणुन स्थायी समितीपुढे प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे. चौकशी अधिकारी यांचे शिफारशी नुसार संबंधिताचे चार वर्षाकरीता वेतनवाढ बंद करणे अशी चौकशी अधिकारी यांनी शिफारस केली होती. परंतु अशा कोणत्याही प्रकरची शिक्षा प्रस्तावित करण्याचे अधिकार चौकशी अधिकारी यांना नाही. हे अधिकार मा. आयुक्त यांना आहेत. चौकशी ही बरोबर झालेली आहे. आतापर्यंत संबंधिताने वेगवेगवळया याचिका न्यायालयात दाखल केलेल्या आहेत. चौकशी बरोबर झालेली नाही असे न्यायालयाने म्हटलेले नाही.

**श्री. सलीम पटेल** : चौकशी अधिकाऱ्यांला स्वतःलाच माहिती नाही की, शिक्षा प्रस्तावित करायची नसते. परंतु शिक्षा प्रस्तावित केली. चौकशी बरोबर झालेली नाही.

**उपआयुक्त (प्र.)** : आयुक्तांनी काम निर्णय घेताला ते मा. उच्च न्यायालयात दिनांक १७-०९-२००१ ला सादर करावयाचे आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा** : विधी सल्लागारांनी चर्चा करुन योग्य तो निर्णय घ्यावा. तो पर्यंत ही सभा पुढे ढकलण्यात यावी. कायदेशीर मत घेवुनच निर्णय घ्यावा.

**श्री. मधुकर सावंत** : जाणुन-बुजून सदर कर्मचाऱ्यांसाठी प्रशासनाला सहाकार्य केलेले नाही. भ्रष्टाचारी कर्मचाऱ्यांची बाजु सभागृहाने घेऊ नये. चांगले निर्णय घ्यावे. त्यांना बडतर्फ करावे.

**श्री. सलीम पटेल** : चौकशी अहवाल बरोबर नाही. संबंधिताने मनपाकडे १.९६ लक्ष रक्कम भरलेली आहे. त्यांना बडतर्फ करु नये. त्यांना कामावर घेण्यात यावे. करण चौकशीचा कालवधी नियमानुसार, ६ महिन्याच्या वर झालेला आहे. सहा महिन्याच्या वर कर्मचाऱ्यांना निलंबित ठेवता येत नही. महानगरपालिकेची परवानगी का घेतली नाही. मा. उच्च न्यायालयाने महानगरपालिकेस दंड आकारलेला आहे.

**श्री. जगदीश सिध्द** : सभागृहाने घेतलेल्या निर्णयावर न्यायालयाने काही ताशेरे ओढु नये. मा. आयुक्त सभेस नाहीत. आयुक्त समक्ष असल्यानंतर असे प्रस्ताव मांडण्यात यावे.

**श्रीमती डॉ. आशा बिनवेड** : संबंधित कर्मचाऱ्याने रोखीने पैसे घेऊन कार्यालयामध्ये बोगस चेकद्वोर भरणा केला. आपण सिध्द करु शकलो नाही. सदर कर्मचाऱ्यास जबाबासाठी वेळोवळी बोलावुन सुध्दा हजर होऊ शकले नाही. येण्याचे टाळाटाळ केली. काही गोष्टी लक्षात घेऊन नियमानुसार आजचा होणारा निर्णय शेवटचा असतांना मा. आयुक्त सभेला उपस्थित नाहीत. कायदेशीर बाबी तपासणी करुन कार्यवाही करावी. उद्या सभागृह बदनाम घेऊ नये. संबंधित कर्मचारी खरोखरच दोषी आहे का? त्यांची चौकशी ही बरोबर आहे का? लेखा परिक्षणाचा अहवाल प्राप्त झाला का? खरोखरच दोषी असेल तर त्यांना बडतर्फ करण्यात यावे. त्याच बरोबर सिध्दतेबाबत पडताळणी करावी.

**श्री. सलीम पटेल** : माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. कलम ५६(२) (ब) नुसार ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी चौकशीसाठी लागल्यास पुन्हा चौकशी साठी मनपाची सर्वसाधारण सभेची मंजुरी घेतली काय? निलंबन कालावधी आतापर्यंत कायम का ठेवण्यात आला.

**डॉ. आशा बिनवडे :** कशासाठी मुदतवाढ दिली. याला कोण जबाबदार याची देखील चौकशी व्हावी.

**मा. सभापती** : त्याचा निलंबन कालावधी ६ महिन्यापेक्षा जास्त झालेला असून, आता प्रशासकीयदृष्ट्या त्यांना बडतर्फ करता येते. त्याबाबतचे नियम काय आहे. याची माहिती निधी सल्लागार यांनी द्यावी.

**विधी सल्लागार :** या प्रकरणात चर्चा होऊन ५६(२) (ब) नुसार सर्वसाधारण सभेची परवानगी घेतली का असा प्रश्न उपस्थित झाला. बडतर्फ करण्यास स्थायी समिती सक्षम असल्याने सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्याची आवश्कता नाही.

**मा. सभापती** : संबंधित कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मा. आयुक्त यांनी लिहिलेली टिप्पणी संचिकेमध्ये काय आहे ते वाचुन दाखवावे. संबंधित यांचिकेमध्ये मा. आयुक्त यांचे असे स्पष्ट मत आहे की, आक्षेप क्र. २-अ बद्दल अफरातफर केलेल्या रक्कमेबाबत मुख्य लेखा परिक्षकाकडुन सविस्तर चौकशी करुन त्याचा अहवाल एक महिन्यात स्थायी समितीपुढे ठेवावा. स्थायी समिती चर्चाक करुन निर्णय घेतील. त्यानुसार या प्रस्तावामध्ये लेखा परिक्षण झाल्याचे अहवाल प्राप्त नाही.

**उपआयुक्त** : आरोप क्र. २ बाबत चौकशी अधिकारी यांनी सविस्तर चौकशी वेगळी करावी व आरोप क्र. ३ बाबत बडतर्फीचा सविस्तर प्रस्ताव स्थायी समितीकडे ठेवावा असे प्रस्तावित केले आहे.

**श्री. डॉ. इलियास किरमानी :** या प्रस्तावावर मतदान घ्यावे. त्यानुसार निर्णय घ्यावा.

**डॉ. आशा बिनवडे :** संबंधित कर्मचारी दोषी असल्यास बडतर्फ करण्यात यावे. अशा कर्मचाऱ्यांना सभागृहाने पाठीशी घालता कामा नये. त्यांना शिक्षा मिळावी.

**श्री. जगदीश सिध्द :** चौकशी अधिकारी यांनी दि. ०४-११-९६ ला मा. आयुक्त यांचेकडे खाते चौकशी प्रकरणी चौकशी अहवाल सादर केला. त्यावेळेतच स्थायी समितीपुढे प्रस्ताव का सादर केला नाही. आजच का करण्यात आला. चौकशी अधिकारी सेवानिृत्त झाले. कुणाला माहिती विचारणार तत्कालीन आयुक्त हे चौकशीशी सहमत होते. मा. सभापतींनी निर्णय घ्यावा.

**श्री. सलीम पटेल :** आम्ही आमची बाजु मांडलेली आहे. सदरील कर्मचाऱ्यास बडतर्फ न करता कामावर घेण्यात यावे, कायद्याने बडतर्फ करता येत नाही.

**श्री. मीर हिदायत अली :** सदरील प्रकरण न्यायालयात आहे. कोणते कर्मचारी किंवा अधिकारी यांनी भ्रष्टाचार केला असल्यास त्यांना शिक्षा व्हावी. अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सभागृहात चर्चा न करता प्रशासानाने केलेल्या कार्यवाही बाबत निर्णय व्हावा. नसता यामध्ये सभागृहाची बदनामी होईल. कोठडी आपणाकडे बोट ठेवु नये. (असे बोलुन सभेतुन बाहेर जातात.)

**श्री. मधुकर सावंत :** दोषी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सभागृहात मतदान घेण्यास आमची काही हरकत नाही. कोणत्याही भ्रष्टाचारी कर्मचाऱ्यास सभागृहाने पाठीशी घालु नये. त्यांचा बडतर्फीचा प्रस्ताव आलेला आहे. त्यांना बडतर्फ करावे.

**डॉ. आशा बिनवडे :** दोषी असेल तर, बडतर्फ करावे व त्यास शासन व्हावे.

**श्री. शे. इलियास किरमानी, श्री. सलीम पटेल :** संबंधित कर्मचाऱ्यास कामावर घ्यावे.

**मा. सभापती** : ) सर्व सन्माननीय सदस्यांच्या एकत्रिक मतानुसार फक्त ठराव पाठविले होते संबंधित संचिका स्थायी समितीकडे पाठविण्यत यावी. सविस्तर प्रस्ताव यावयास पाहिजे, आरोप क्र. २ सिध्द झाले नाही.

२) आरोप क्र. २ बाबत मा. आयुक्त यांनी निर्देश केल्यानुसार मुख्य लेखा परिक्षक यांचेकडुन चौकशी करुन घ्यावी व हे प्रस्तावात यायला हवे होते. मुख्य लेखा परिक्षकाचा अहवाल लवकरात लवकर घेण्यात यावा. सखोल अभ्यास करुन निर्णय घेण्यात यावयास पाहिजे करीता सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री. एम. ए. साजेद जकात लिपीक (निलंबीत) यांचे खाते चौकशी मधील आरोप क्र. २ बाबत मुख्य लेखा परिक्षकाकडुन लवकरात लवकर चौकशी करुन घ्यावी. तोपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो. यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

या बरोबर " जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | स्थायी सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ०९-१०-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मंगळवार दिनांक ०९-१०-२००१ रोजी मा. सभापती, श्री. प्रशांत देसरडा, यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे सकाळी ११.३० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्ग यांचेसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. अशरफ युनूस मोतीवाला | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| ३. | स. स. श्री. सिध्द जगदिश कन्हैयलाल | -//- |
| ४. | स. स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग | -//- |
| ५. | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ६. | स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | -//- |
| ७. | स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| ८. | स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली | -//- |
| ९. | स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| १०. | स. स. श्री. शे. इलियास किरमानी शे. उमर | -//- |
| ११. | स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतू | -//- |
| १२. | स. स. श्री. ओक जयवंत केशवराव | -//- |
| १३. | स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | -//- |
| १४. | स. स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |

सभागृहातर्फे विमान अपघातात निधन झालेले कॉंग्रेसचे श्रेष्ठ नेते स्व. श्री. माधवराव शिंदे तसेच त्याच अपघातात काही पत्रकार यांचे सुदा निधन झालेले असून, तसेच स्व. श्री. धर्मराज भोहीर प्रसिध्द चित्रकार यांचे सुध्दा दु:खद निधन झाले या सर्वांना ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली.

**विषय क्र. ४०/१ :**

दिनांक ११-०९-२००१ व दिनांक १५-०९-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**मा. सभापती** : विषय क्र. १ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आले.

**ठराव :**

दिनांक ११-०९-२००१ व दिनांक १५-०९-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४१/२ :**

सन १९९७-९८, १९९८-९९, व १९९९-२००० च्या लेखा परिक्षण अहवालानुसार विचार विनिमय करणे. (या सोबत सन १९९७-९८, १९९८-९९ व १९९९-२००० च्या लेखा परिक्षण अहवालाची छापील प्रत पाठविण्यत येत आहे.)

**संवाद :**

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** सन ९७-९८, ९८-९९, ९९-२००० या तिन्ही वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल एकाच वेळी सादर केलेले आहे. दिलेले अहवाल हे १००% बरोबर आहे का? नियम क्र. १०५ किंवा कलम १०६ प्रमाणे वेळेवर सादर केलेला आहे का १ वर्ष संपल्यानंतर लगेच ऑडीट केले जाते. वर्षाच्या शेवटी लगेच अहवाल सादर न होता उशिरा लेखापरिक्षण अहवाल सादर केले. माहिती देण्यात यावे.

**मा. सभापती** : ३ लेखा परिक्षण अहवाल ठेवले. दरवर्षी द्यावयास पाहिजे. मुख्य लेखा परिक्षक यांनी खुलासा करावा.

**मुख्यलेखापरिक्षक :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे साप्ताहिक लेखा परिक्षण विभागाकडुन होत होते. नियमाने करण्यात येते. १९९७ मध्ये स्थायी समितीमध्ये एक ठराव घेऊन लेखा परिक्षण अहवाल साप्ताहिक ऐवजी दर महिन्याचा अहवाल सादर करावा असे ठरले त्यानुसार दर महिन्याचा अहवाल प्रत्येक महिन्याचा १० तारखेच्या आत मा. सभापती यांचेके सादर केलेला आहे. सभागृहाला साप्ताहीक अहवाल अशी इच्छा असेल तर साप्ताहीक अहवाल ठेवला जाईल. यापुर्वी ८२ ते ९० तसेच ९१ ते ९४ पर्यंतचे असे दोन अहवाल प्रशासनाच्या कारकीर्दीत प्रशासनाने सादर केलेले होते. सन ९६-९७ नंतर जे ऑडीट शिल्लक होते. ते संपुर्ण करुन ९६-९७, ९७-९७८, ९८-९९, ९९-२००० असे चार ऑडीट अहवाल स्थायी समिती समोर सादर केलेले आहे. यातील ६७-६८ चा अहवाल आर्थिक वर्ष संपल्यानंतर कलम १०६ प्रमाणे मार्च ९८ मध्ये सादर करावयास पाहिजे होता तो २६-०३-९८ मध्ये सादर केलेला आहे. ९८-९९ चा मार्च ऐवजी नोव्हेंबर ९९ मध्ये तर ९९-२००० चा मार्च ऐवजी दि. १०-०५-२००१ ला सादर केलेला आहे. ९७-९८ व ९८-९९ चे अहलवा मा. सभापतीकडे दिलेले होते व मंजुरीसाठी ठेवले नाही ते सांगु शकत नाही. मुख्य लेखा परिक्षक यांचे काम अहवाल तयार करुन मा. सभापतीकडे सादर करण्याचे आहे.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** यापुर्वीही सन ९९ मध्ये एकत्रित लेखा परिक्षण अहवाल सादर केलेले होते. दर वर्षाचा अहवाल वर्षाच्या शेवटी यावयास पाहिजे. असा नियम आहे.

**मुख्य लेखा परिक्षक :** सन १९९६ मध्ये मी महानगरपालिकेस रुजु झालेला आहे. यापुर्वीच जे अहवाल का उशिरा आलेले आहे.

त्याची माहिती मी देऊ शकत नाही. मी येथे आल्यानंतर सुध्दा मागील १९९३-९४ चे लखा परिक्षक अहवालाचे बाकी असलेले काम पुर्ण करुन अहवाल सादर केलेला होता. अहवाल तयार करण्यासाठी जो वेळ लागतो त्याचे कारण असे की, ऑडीट विभागाकडुन इतर संबंधित विभागाकडे माहिती मागविली जाते. त्यापत्राचे उत्तर येण्यास उशिर होतो. ती उत्तरे आल्यानंतर त्यावर योग्य तो निर्णय घेऊन त्या त्या विभागाला कळवावे लागते. हे सर्व करण्यासाठी वेळ लागतो. त्यामुळे गेल्या वर्षाचा अहवाल सादर करण्यास २ ते ३ महिने उशिर झालेला आहे.

**श्री. सावंत मधुकर :** लेखा परिक्षण अहवाल तयार करण्यासाठी बाहेरील विभागातील अधिकारी कर्मचारी नियुक्त केलेले आहे काय?

**मुख्य लेखा परिक्षक :** कलम ४५ प्रमाणे या पदावर प्रतिनियुक्ती, नामनिर्देशन, पदोन्नती यातुन मुख्य लेखा परिक्षक या पदावर नियुक्ती करता येते. हा अधिकार महानगरपालिकेस आहे. आतापर्यंत या पदावर प्रतिनियुक्तीवर अधिकार काम करीत आहे.

**श्री. तुळशी बागवाले किशोर :** कोणकोणत्या विभागाचे आक्षेप नोंद झालेली आहे. त्याबाबतचा त्या त्या विभागाचा सारांश दिला पाहीजे. अमुक पानावर अमुक कार्यवाही केली किंवा करीत आहे. असे अहवालात देऊन चालणार नाही. काय आक्षेप घेण्यात आले त्याची सुध्दा सविस्तर माहिती दयावयास पाहिजे.

**मुख्यलेखापरिक्षक :** या विभागामध्ये काम करण्यासाठी एक वरिष्ठ लेखा परिक्षक, चार कनिष्ठ लिपीक व वरिष्ठ लिपीक १००+१००=२०० कोटीचे लेखा परिक्षण करावयाचे आहे. यामध्ये १०० कोटीचे बजेट धरल्यास जमा खर्च बाजु मिळुन दोनशे कोटीचे बजेटचे ऑडीट होते. या लेखापरिक्षण अहवालामध्ये जकात व पाणीपट्टी बाबतची संपुर्ण लेखा परिक्षण, जकात, मालमत्तावर झोन कडील पाणीपट्टी वसुलीचे १००% लेखा परिक्षण होते. वसुली झालेल्या पावत्याचे (रिसीप्ट) महिना संपल्यानंतर ऑडीट करावे लागते. विविध संचिका एक वर्षामध्ये अंतिम होत नाही. त्यामुळे १००% ऑडीट होत नाही. एखादी संचिका १९९६ मध्ये सादर होते त्या संचिकेबाबत जोपर्यंत निर्णय होत नाही वेळ लागतो व ती संचिका या विभागाडके येत नाही. संचिका जोपर्यंत येत नाही. तोपर्यंत ऑडीट करणे शक्य नाही. जेव्हा जेव्हा संचिका या विभागाकडे येतात तेव्हा ऑडीट केले जाते. जे रेकॉर्ड उपलब्ध होतील तेवढे ऑडीट केले जाते.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** या अहवालामध्ये नगररचना विभागाचे लेखापरिक्षण केले नाही.

**मुख्यलेखापरिक्षक :** ९६-९७ ला या कामास सुरुवात केली लेखापरिक्षण हे तांत्रिक काम आहे. त्यांना ऑडीटची सर्व माहिती असेल तेच काम करु शकतात. सन ९४-९५, ९५-९६, ९६-९७ नगररचना विभागाचे कर्मचारी यांचे नियमित घेणाऱ्या बदल्यामुळे होऊ शकले नाही. लेखा परिक्षण सुरुवातीला झाले आहे. ९९-२००० चे अहवालाता नगररचना विभागाचे ऑडीट दिले आहे. माझ्‍ या विभागामधील दोन जेष्ठ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहे. त्यामुळे काम कमी होते.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** कर्मचाऱ्यांच्या होणाऱ्या नियमित बदल्या यामुळे ऑडीट करता आले नाही असे उत्तद देणे संयुक्तिक होणार नाही तसा रिपोर्ट आपण संबंधित विभागाकडे दिलेला आहे काय? नगररचना विभागाचे ऑडीट करणे आवश्यक आहे. या विभागकडुन महानगरपालिकेस उत्पन्न मिळते.

**मुख्यलेखा परिक्षक :** सर्वच विभागाचे ऑडीट करण्यासंबंधी मा. आयुक्तांचे आदेश आहे. त्यानुसार सर्वच विभागाचे दर वर्षाचे बाकी असलेल्या वार्ताचे ऑडीट करण्यात येईल. इतर महानगरपालिकेची परिस्थिती पाहिल्यास आतापर्यंत ९९-२००० या वर्षाचे ऑडीट सादर करणारी ही पहिलीच महानगरपालिका आहे. गेल्या ५ वर्षामध्ये लेखा परिक्षण अहवालावर ही दुसऱ्यांदा सभा होत आहे. सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करता येईल. कर्मचारी उपलब्ध झाल्यास २००० ते २००१ या वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल सुध्दा लवकरच तयार करण्यात येईल. जास्तीत जास्त काम करण्याचा माझा

प्रयत्न आहे. यामध्ये काही त्रुटी असतील तर, स्थायी समितीने तसे आदेश करावे त्यानुसार कार्यवाही होईल.

**श्री. कावडे साहेबराव :** महानगरपालिकेचे दरवर्षी जे लेखापरिक्षण व्हावयास पाहिजे ते होत नाही. म्हणुन महानगरपालिकेस जो फंड शासनाकडुन येतो तो येत नाही अशी माहिती मिळते.

**मुख्य लेखापरिक्षक :** लेखा परिक्षण अहवाल शासनाकडे जात नाही ते सर्व साधारण सभेपुढे ठेवण्यात येते. ऑडीट होत नाही. म्हणुन शासनाकडुन येणाऱ्या अनुदानावर काहीही परिणाम होत नाही.

**श्री. कावडे साहेबराव :** शासनाकडुन जे अनुदान येते. त्यामध्ये कोणती विकस कामे केली ते अनुदान कोठे खर्च केले ऑडीटची माहिती जात नाही. म्हणुन अनुदान देण्यास शासन टाळाटाळ करते असे माझे मत आहे.

**मुख्यलेखापरिक्षक :** शासनाकडुन जे अर्थसाह्य / अनुदान मिळते ते खर्च केल्याबद्दल विनीयोग प्रमाणपत्र द्यावे लागते. ते लखा विभागाकडुन शासनाकडे दिले जाते. विनियोग प्रमाणपत्र (utilization certificate) दिले नसेल असे घडलेले नाही.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतुन शहरातील काही संस्थांना मदत करण्यात आली या संस्थाची नोंदणी झालेली आहे का? खर्च केलेला आहे त्यांच्या नोंदी घेतल्या आहेत का

**मुख्यलेखापरिक्षक :** प्रलंबित होते ते पुर्ण झाले. हे नियमित कामामध्ये समाविष्ट होते. २००१ पर्यंत खर्चाचे लेखापरिक्षण करावयाचे आहे.

**श्री. जगदीश सिध्द :** ज्या पध्दतीने अहवाल सादर करावयास पाहिजे होता. तसा अहवाल दिलेला नाही यामध्ये फक्त ज्या चुका झाल्यास ते छापुन आलेले आहे.

**मुख्यलेखापरिक्षक :** ज्या चुका निर्दशनास येतात ते हाफमाजीने ते दिल्या जाते. ज्याची पुर्तता होते यातुन वगळण्यात येते.

**श्री. मधुकर सावंत :** बी. जी. एम. सी. ॲक्टचे कलम १०५ नुसार साप्ताहीक अहवाल स्थायी समितीपुढे येणे आवश्यक आहे. १००% ऑडीट झालेनाही तर ऑडीटला असे नाही. महानगरपालिकेमध्ये काही गैरव्यवहार झाला तर तो उघडकीस येणारच नाही. १००% ऑडीट झाले बाबत लेखी देण्यात यावे अशी विचारणा कावी. १९८५ पासुन ते ९५ पर्यंत नगररचना विभागाचे ऑडीट झालेच नाही. याबाबत खुलासा व्हावा. काही कारणाने ८५ पासुन १००% ऑडीट झाले नाही. त्यामुळे कर कमी जास्त केल्याची प्रकरणे उघडकीस आले नाहीत. नगररचना विभागाचा १० वर्षापासुनचा अहवाल सादर केलेला नाही.

**मुख्यलेखापरिक्षक :** जे ऑडीट झाले ते १००% झालेले नाही. या अगोदर खुलासा केलेला आहे. या अहवालानुसार जे ऑडीटचे बाकी काम होते ते पुर्ण होण्याच्या तयारीमध्ये आपण आलेला आहोत. यापुर्वीचे सन ९० पर्यंत तसेच ९४-९५ च्या अहवालमध्ये नगररचनाचे ऑडीट आहे. आता जे ऑडीट येईल ते रेग्युलर वर्षांचे येईल २०००-२००१ चे ऑडीट अहवाल सुध्दा लवकरच सादर होईल. सभागृहाने सुचना केल्याप्रमाणे मागील सर्व वर्षाचे ज्या ज्या विभागाचे ऑडीट करायचे बाकी आहे ते सर्व करण्यात येणार आहे. ज्या ज्या विभागीच माहिती यायची बाकी आहे. ते आपण वार्षीक अहवालात समावेश करतो.

**श्री. इलियास किरमानी, श्री. सावंत मधुकर** : तीन वर्षाचे एकदम ऑडीट अहवाल सादर केलेले आहे. यावर अभ्यास करण्यास वेळ मिळाला नाही म्हणुन ही सभ तहकुब करुन पुन्हा ८ दिवसाने याच विषयावर चर्चा करण्यासाठी सभा आयोजित करावी.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** तीन वर्षाचे अहवाल सादर झालेले आहे. प्रत्येक बैठकीत एक वर्षाच्या अहवाल ठेवण्यात यावा. एकाच वेळी चर्चा करुन योग्य ते निर्णय घेता येणार नाही.

**मा.सभापती** : तीन वर्षाचे ऑडीट अहवाल सादर केलेले असून, उदा. ९७-९८ च्या अहवालामध्ये सुरुवातीस लेखा विभागाचे पाच प्रलंबीत प्रकणे आहे. यापैकी किती निकाली काढले किती प्रकरणावर कार्यवाही झाली अशा प्रकारची एक टिप्पणी प्रत्येक विभाग प्रमुखांनी आजच्या एक महिन्याच्या तारखेत तीन वर्षाच्या सादर केलेल्या अहवालानुसार स्थायी समितीने सादर करावी.

**श्री. जगदीश सिध्द :** नगररचना विभागाचे ऑडीटची माहिती या अहवालात आलेली नाही. म्हणुन ही सभा तहकुब करावी व सविस्तर प्रत्येक विभाग वागग वाईज माहिती सादर करावयास आदेश दयावेत.

**श्री. मधुकर सावंत :** कर आकारणी विभागाचे सुध्दा ऑडीट आले पाहिजे. गेल्या १० वर्षापासुन या विभागाचे ऑडीट केलेले नाही.

**मा. सभापती** : ९७-९८ चे ऑडीट सादर केलेले होते. त्यावेळचे सभापती यांनी त्यावर बैठक बोलाविलेली नव्हती. यात प्रशासनाचा दोष नाही. आजच्या एक महिन्याने आपण बैठक घेणार आहोत. त्या बैठकीमध्ये सविस्तर प्रत्येक विभागाची टिप्पणीसह माहिती सादर करावी व ज्या ज्या विभागाचे ऑडीट करणे बाकी आहे. ते सर्व वर्षाचे सर्व विभागाचे ऑडीट करण्यात यावे. नगररचना विभागाचे लेखा परिक्षण होणेसाठी कालमर्यादा निश्चित करावी. याबद्दल २ महिन्यात पुर्ण करुन सविस्तर अहवाल स्वंतत्ररित्या तयार करुन लेखापरिक्षण करण्यात यावे.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** महानगरपालिकेच्या बऱ्याच जागा लिज पध्दतीने दिलेल्या आहेत. त्याचा उल्लेख नाही. जाहीरात फलकाचे सन १९८४ ते दर व आजचे दर तेच आहेत. दर वाढविण्यात यावे. परवाने नुतनीकरण दरवर्षी व्हावे. कर न भरता नुतीनकरण का करुन दिले.

**श्री. इलियास किरमानी :** जे अहवाल सादर केलेले आहे याच्या प्रती सर्व सदस्यांना देण्यात यावे.

**मा. सभापती** : या अहवालावर स्थायी समितीने, सविस्तर चर्चा व निर्णय घेतल्यानंतर ते सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी मांडावे लागते. त्यावेळेस सर्व स. सदस्यांना याच्या प्रती दिल्या जातील. आताच झालेल्या चर्चेनुसार सर्व सदस्यांना विभाग निहाय सविस्तर टिप्पणी द्यावी. आजच्या १ महिन्याने सभा आयोजीत केली जाईल. तत्पुर्वी सर्व विभाग प्रमुखांनी तसेच नगररचना विभागाचे लेखा परिक्षण २ महिन्याच्या आत करुन स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी ठेवावे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सन ९७-९८, ९८-९९, ९९-२००० च्या लेखा परिक्षण अहवालावर आजच्या १ महिन्याने सभा आयोजीत करुन सविस्तर चर्चाक करण्यात येईल

असे सर्वानुमते ठरले तसेच विभाग प्रमुखांनी लेखा परिक्षण अहवालाबाबत सविस्तर टिप्पणी सभेपुर्वी सर्व स्थायी समिती सदयांना देण्यात यावी. आणि नगररचना विभाग तसेच इतर विभागाचे लेखा परिक्षण करण्याचे बाकी असेल ते २ महिन्यात पुर्ण करुन स्थायी समिती समोर अहवाल ठेवण्यात यावा यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**चर्चा :**

**श्री. मीर हिदायत अली :** आरोग्य विभगामार्फत ५ ते ६ वर्षापासुन बीफ मटन शॉप धारकाचे दुकान परवाना नुतनीकरण करण्यात आलेले नाही.

**मा. सभापती** : माझ्या माहिती प्रमाणे संबंधित दुकान मालक हे भाडेकरु असतात व कर भरलेला नसेल तर, दुकान परवान्याचे नुतनीकरण संबंधित विभाग करुन देत नाही. घर मालक कर भरीत नाही. ४-५ प्रकरणात असा प्रश्न आला नाही.

**श्री. जगदीश सिध्द :** कुशलनगर येथे महानगरपालिकेची आरक्षित जाग असून, सुध्दा अतिक्रमण होत आहे. सर्व नंबर १४८४४/बी माध्यमिक शाळा करीता आरक्षित ४ एकर जागा त्यामध्ये सध्या एका व्यक्तीने २० x ३० चे प्लॉटींग सुरु केलेले असून, अतिक्रमण होत आहे हे सर्व होत असतांना आपले अधिकारी आम्हाला काहीही माहित नाही. म्हणुन कार्यवाही करीत नाही. या संदर्भत मी मा. आयुक्तांना सुध्दा पत्र दिले. पत्र देऊन आज २० दिवस झालेले असून, अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. आज सुध्दा प्लॉटींग पाडण्याचे काम चालु आहे.

**श्री. किरमानी इलियास :** शहरात शासकीय जमिनीवर प्लॉटींग पाडण्याचे काम चालु असून, सर्रासपणे खरेदी विक्री चालु आहे. अनेक वेळा सांगण्यात आलेले आहे.

**मा. सभापती** : मालमत्ता अधिकारी हे मा. आयुक्तांच्या आदेशानुसार सिडको मधील अतिक्रमणे हटविण्यासाठी गेलेले आहे. आज ते बैठकीस उपस्थित नाही. यापुढे बैठकीस सर्व अधिकारी उपस्थित राहतील याची प्रशासनातर्फे दक्षता घेण्यात यावी.

**श्री. जयवंत ओक :** हा एकाच भागाचा प्रश्न नसुन संपुर्ण शहरात प्लॉटींगचे काम चालु आहे. ज्या आरक्षित जागा आहे त्या सर्व महानगरपालिकेच्या मालकीच्या आहेत का संबंधित मालकांना महानगरपालिकेने पैसे दिले आहे का? जे प्लॉटींग करुन विक्री करत आहे. त्यांनाती जागा महानगरपालिकेने दिलेली आहे.का हे सुध्दा पाहिजे पाहिजे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** शहराच्या हद्दीत येणाऱ्या सर्व जागा महानगरपालिका विकत घेऊन शकत नाही. त्यासाठी (दोन) हजार कोटी सुध्दा कमी पडतील तशी परिस्थिती महानगरपालिकेची नाही. जे आरक्षित झोन आहेत. ती जमीन तशीच ठेवावी सध्या महानगरपालिकेकडे पैसा नाही. एखादा भुखंड आरक्षित असेल तर, तो भुखंड विकण्याचा अधिकार कायदयानुसार पोहचत नाही. दिवसें दिवस अतिक्रमणाचे प्रकार वाढत असून, ज्या जमिन मालकांना महानगरपालिकेने रक्कम देऊन जागा घेतल्या त्या जागेवर अतिक्रमण होत असेल तर ते थांबविणे गरजेचे आहे. ती महानगरपालिकेची जबाबदारी आहे.

**मा. सभापती** : प्रशासनामर्फत एक पत्र प्रशासकीय विभागास देऊन कुशलनगर येथील अतिक्रमण तात्काळ काढण्याचे आदेश दयावेत.

**श्री. भरत लकडे :** माझ्या वार्डात एका व्यक्तीने महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण केलेले असून, स्वतःच्या नावाने पी. आर. कार्ड तयार केले. ज्यावेळी अतिक्रमण केले त्यावेळेस कार्यवाही न झाल्याने संबंधित व्यक्तीने न्यायालयात प्रकरण दाखल करुन न्यायालयाचे स्थगिती आदेश मिळविले. योग्य वेळीच कार्यवाही का करण्यात आलेली नाही. जागा महानगरपालिकेच्या मालकीची व संबंधित व्यक्तीने स्वतःच्या नावाने पी. आर. कार्ड कसे तयार केले. न्यायालयाचे स्थगिती आदेश उठविण्यात आले का?

**श्री. नंदकुमार फुलारी :** स. सदस्य ४ ते ५ बैठकीपासुन हा सुध्दा उपस्थित करतात. प्रत्येक बैठकीत कार्यवाही केली जाईल असे सांगितले जाते. आजच्या बैठकीत कार्यवाही केली जाईल असे सांगितले जाते. आजच्या बैठकीत यावर योग्य तो अंतीम निर्णय घेण्यात यावा.

**श्री. मधुकर सावंत :** माझ्या वार्डात शैक्षणिक झोनमध्ये ७ एकर जागेवर १३ इमारती उभ्या आहेत त्याला परवानगी दिली आहे का?

**मा. सभापती** : स. सदस्या श्री. लकडे यांचे वार्डामध्ये एका व्यक्तीने महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण केलेले असून, स्वतःच्या नावाने पी. आर. कार्ड तयार केले अतिक्रमण झाले त्यावेळेस स. सदस्य यांनी महानगरपालिकेकडे प्रशासनाकडे लेखी पत्र देऊन सुचना दिलेल्या होत्या. तसेच चार ते पाच बैठकीत चर्चा सुध्दा झाली. तरी प्रशासनाने कार्यवाही केलेली नाही. उलट सदरील व्यक्तीला वेळ देण्यात आला ही बाब गंभीर स्वरुपाची आहे.

महानगरपालिकेच्या जागेवर कुणी अतिक्रमण करत असेल व ही बाब प्रशासनाच्या निर्दशनास आणुन दिल्यानंतरही कार्यवाही होत नसेल तर, योग्य नाही. संबंधित व्यक्तीने न्यायालयाने स्थगिती आदेश आणलेले आहे. प्रशासनाच्या वतीने आजच नियमानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी. आपल्या महानगरपालिकेच्या खुल्या जागा संबंधी जाहरी प्रगटन देवुन टाका. खुल्या जागावर कुणी पी. आर. कार्ड करणार नाही.

याच बरोबर " जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याने मा. सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २५-१०-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. गुरुवार दिनांक २५-१०-२००१ रोजी मा. सभापती, श्री. प्रशांत सुभाष देसरडा, यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे सकाळी ११.३० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्ग खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. अशरफ युनूस मोतीवाला | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| ३. | स. स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग | -//- |
| ४. | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ५. | स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | -//- |
| ६. | स. स. श्री. सलीम पटेल समशेर पटेल | -//- |
| ७. | स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| ८. | स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली | -//- |
| ९. | स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| १०. | स. स. श्री. शे. इलियास किरमानी शे. उमर | -//- |
| ११. | स. स. श्री. ओक जयवंत केशवराव | -//- |
| १२. | स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | -//- |
| १३. | स. स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |

**चर्चा :**

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** मनपातील शालेय विद्यार्थ्यांना १५ ऑगस्टपुर्वी गणवेश देणार होतो. तसा ठराव सुध्दा आपण घेतलेला आहे. १५ ऑगस्टला दोन महिने होऊन गेलेले आहे. आता शालेय विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सुट्या लागणार आहे. केव्हा गणवेश देणार याचा खुलासा व्हावा. प्रत्येक वर्षी गणवेश देण्यात उशिर हातो. सभागृहाने ठराव पास केल्यानंतर सुध्दा एवढा उशीर का झालेला आहे. सविस्तर माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती** : शालेय विद्यार्थ्यांना गणवेश देण्यासंबंधीची संचिका आलेली आहे. परंतु आपण ऐनवेळी विषय घेत नसल्याने आता पुढील बैठकीत तो विषय घेण्यात येईल. प्रस्तावाची कार्यवाही वेळेवर का झाली नाही यासंबंधी मुख्य लेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी** : शालेय विद्यार्थ्यांना गणवेश देण्यासंबंधीच्या निविदा एप्रील मध्येमागविलेल्या होत्या. त्यानुसार झालेल्या दराने तुलनात्मक तक्ता करुन चार एजन्सीजचे दर निश्चित करुन जे सॅम्पल मागविलेले हेते ते मुंबई येथे तपासणीसाठी पाठविण्यात आलेले आहे. त्यात दीड महिना गेला. मधल्या काळात मा. आयुक्त सुध्दा नव्हते. नवीन आयुक्तांकडे प्रकरण ठेवण्यात आले.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** एप्रील महिन्यामध्ये टेंडर काढले. एप्रील, मे. जुन, जुलै, ऑगस्ट असे पाच महिने गेले. कार्यवाही का झाली नाही. अधिकारी

सभागृहाची दिशाभुल करतात ते वेळकाढुपणा करतात. त्यामुळे या सभागृहाची प्रतिमा खालावत आहे. स्थायी समितीच्या निर्णयाला अधिकारी किंमत देत नाही. स्थायी समितीचे अधिकार कमी झाले आहेत असे त्यांना वाटते.

**मा. सभापती** : स्थायी समितीला कार्यवाही करण्याचे अधिकार किती याची माहिती सर्व अधिकाऱ्यांना आहे.

**श्री. मधुकर सावंत :** ज्या बैठकीत गणवेश बाबत प्रस्ताव आलेला होता त्यावेळी तत्कालीन आयुक्त श्री. जहागीरदार हे सुध्दा सभागृहात उपस्थित होते, यापुर्वी प्रत्येक वेळेस शालेय मुलांना गणवेश उशिरा देत आलेला आहोत, किमान या वर्षीपासुन वेळेवर १५ ऑगस्ट पुर्वीच गणवेश देण्यात यावे म्हणुन निर्णय झालेला होता. यानंतर दरवर्षी १५ ऑगस्टपुर्वीच गणवेश देण्याचा आपण निर्णय घेतलेला असतांना का उशिर झाला याचा खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच मनपाच्या शाळेत जे शिक्षक आहेत. त्यांची मुले इतर शाळेमध्ये शिकतात मनपाच्या शाळेत जे शिक्षक आहेत. त्यांची मुले मनपाच्याच शाळेत असावी अशी सक्ती घालण्यात यावी.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** एखाद्या कामासंबंधी अधिकारी यांना लेखी, तोंडी, सुचना केल्यानंतर सुध्दा योग्य उत्तर मिळत नाही. काम करण्यात येईल म्हणुन आश्वासन देतात. कामे करत नाही. अधिकारी सदस्य तसेच पदाधिकारी यांना कमी लेखत आहेत. अशा अधिकाऱ्यांवर आपण काय कार्यवाही करणार आहात. दोन महिन्यापासुन एका कामाबाबतची संचिका गहाळ झालेली होती. दोन दिवसांपुर्वी सापडली. नगररचना विभगामध्ये होती. त्या संचिकेबाबतचे आवक-जावक क्रमांक माझेकडे आहे. अधिकारी हे जागेवर नसतात. साईटवर किंवा न्यायालयात गेले म्हणुन सांगण्यात येते. निश्चित कुठे जातात याची काही माहिती त्यांचे विभागातील कर्मचाऱ्यांना नसते. उडवा उडवीची उत्तरे मिळतात. याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

**मा. सभापती** : एखाद्या कामासंबंधी पदाधिकारी किंवा स. सदस्या यांनी माहिती विचारली व त्यासंबंधी अधिकारी यांनी उडवा उडवीवी उत्तरे देणे योग्य नाही. स. सदस्यांची दिशाभुल अधिकारी करत असेल तर, त्यांचेवर कार्यवाही होईल. स्थायी समितीला तसे अधिकार आहे. तसेच एक संचिका दोन-दोन महिने एकाच विभागात थांबवुन राहात असेल तर, याबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद अधिकाऱ्यांनी घ्यावी. संचिकेवर तारखा असाव्या. कोणत्या विभागात किती वेळ संचिका राहील त्यानुसार मा. आयुक्तांनी कार्यवाही करावी.

**श्री. भरत लकडे :** माझ्या वार्डात एका व्यक्तीने मनपाच्या जागेवर अतिक्रमण केलेले आहे. स्वतःच्या नावाने पी. आर. कार्ड तयार केले. अधिकाऱ्यांच्या निर्दशनास ही बाब आणुन देऊन सुध्दा कार्यवाही झालेली नसून ३ ते ४ बैठकीपासुन मी हा प्रश्न उपस्थित करीत आहे. योग्य खुलासा करण्यात यावा.

**उपआयुक्त (प्र.) :** विधी सल्लागार यांचेकडुन एक रिपोर्ट केलेला आहे.

**मा. सभापती** : रिपोर्ट केव्हाचा आहे. स. सदस्या यांची तक्रार केव्हाची आहे. यात फार तफावत येत असून, स. सदस्यांनी केलेली तक्रार ही तीन महिन्यापुर्वीची आहे, त्यांनी आतापर्यंत ५ ते ६ बैठकी पासुन हा मुद्दा उपस्थित केलेला आहे. ८-८ महिने माहिती देऊन सुध्दा मनपाच्या जागेवर कुणी अतिक्रमण

करीत असेल त्याची कार्यवाही संबंधित प्रशासकीय अधिकारी त्या भागातील इमारत निरीक्षक तसेच विधी सल्लागार यांचेकडुन वेळेवर होत नसेल तर, संबंधित अधिकाऱ्यांवर प्रशासन काय कार्यवाी करणार आहे. त्याचा खुलासा प्र. आयुक्त म्हणुन बसलेले श्री. कांबळे साहेबांनी द्यावा.

**उपआयुक्त (प्र.) :** या प्रकरणांबाबत न्यायालयाने दिनांक ०९-०८-२००१ " जैसे थे " ठेवावे असे आदेश दिलेले आहे. महानगरपालिकेमध्ये म्हणणे त्याबाबत दाखल झालेले आहे. सदर जागा मंजुर ले-आऊटमध्ये आहे किंवा काय याबाबतचा अहवाल नगररचना विभागाकडुन अद्याप सादर झालेला नाही. ०१-१०-२००१ ला नगररचना विभागाकडे तसे पत्र पाठविण्यात आलेले असून, येत्या २९-१०-२००१ रोजी मनाई हुकुम रद्द करण्यासाठी हे प्रकरण न्यायालयात ठेवलेले आहे. सदर जागा मंजुर ले-आऊटमधील आहे का किंवा खुल्या जागामधील मंजुर ले-आऊटमधील आहे हे म्हणणे मांडण्यासाठी नगररचना विभागाकडुन त्यासंबंधीच्या कागदपत्राची आवश्यकता आहे व आज हे कागदपत्र मिळणार आहेत. कागदपत्र सादर केल्यानंतर या प्रकरणात मनाई हुकूम रद्द होऊ शकतो.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** सदर जागेवर पी. आर. कार्ड तयार करण्याच्या अगोदर पासुन स.सदस्यांनी अतिक्रमण केल्याबाबत तक्रार केलेली होती. त्यानंतर संबंधिताने पी. आर. कार्ड तयार केले. तक्रार केल्यानुसार तात्काळ कार्यवाही का झाली नाही. अधिकाऱ्यांनी संबंधित व्यक्तीस न्यायालयात जाण्यास वेळ दिलेला आहे हे सिध्द होते.

**श्री. भरत लकडे :** पी आर कार्ड तयार करण्याच्या अगोदर मी तक्रार केलेली होती. आपल्या अधिकाऱ्यांनी संबंधित व्यक्तीला साथ दिलेली आहे. न्यायालयात प्रकरण दाखल करण्यास मदत केली असा संशय येत आहे.

**मा. सभापती :** यामध्ये एक मुद्द उपस्थित होत आहे की, स. सदस्या श्री. लकडे यांनी या जागेसंबंधी प्रशासनाला वेळोवेळी सुचना केलेल्या होत्या. त्यानंतर संबंधित व्यक्ती न्यायालयात गेलेली आहेत व न्यायालयाकडुन ०९-०८-२००१ ला जी माहिती सादर करण्या संदर्भात आदेश आले त्या अगोदर स. सदस्या यांनी सांगितल्यानुसार सदर जागेवर बोर्ड लावला असता. तसेच जागेला तारकुंपण केले असते तर, अतिक्रमण झाले नसते. मनपाच्या मालकीची जागासंबंधीत व्यक्तीने नावांवर करुन घेतली नसती.

मनपाच्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे सदर जागेचे त्या व्यक्तीने पी. आर. कार्ड तयार करुन घेतले प्रकरण न्यायप्रविष्ट झाले. आता मनपाचे वकील न्यायालयात प्रत्येक तारखेस उपस्थित राहणार नाही व न्यायालयाच्या एकतर्फी निकाल लागुन संबंधित व्यक्तीने नावांवर ती जागा होईल. जे अधिकारी यात दोषी आहेत. त्यांचेवर काय कार्यवाही होणार आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** संबंधित व्यक्तीने कोणत्या कागदपत्राच्या आधारावर प्रकरण न्यायप्रविष्ट केलेले आहे. महानगरपालिकेच्या मालकीची जागा असतांना संबंधिताना अतिक्रमण काढण्याबाबत नोटीस देण्याची आवश्यकता नव्हती. स. सदस्यांनी तक्रार केल्यानुसार ताबडतोब कार्यवाही व्हावयास पाहिजे होती. ती झालेली नाही. यात अधिकाऱ्यांचा दोष आहे.

**मा. सभापती** : ०१-१०-२००१ रोजी नगररचना विभागाकडे माहिती मागितली आहे. अद्याप प्रशासनाला माहिती या विभागाकडुन दिलेली नाही. यासंबंधी अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याबाबत काम निर्णय घ्यायचा ते सभागृहाने ठरवावे. प्र. आयुक्त म्हणुन सभागृहात बसलेले श्री. कांबळे साहेब यांनी खुलासा करावा की, दोषी अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करणार.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा** : वार्डातील एका कार्यक्रमाच्या पत्रिकेवर स. सदस्य म्हणुन श्री. शेख ईसाक शे. जै. नौद्यीन यांचे नांव छापलेले आहे. न्यायालयाने त्यांचे जात प्रमाणपत्र रद्दबातल ठरविलेले असून, ते सध्या सदस्य नाहीत. दि. २६-१०-२००१ रोजी हा कार्यक्रम आहे. यावर कुणीही न्यायालयात जाऊ शकतो. यात मनपाची बदनामी होईल.

**मा. सभापती** : कार्यक्रम पत्रिका छापल्यानंतर न्यायालयाने संबंधित सदस्यांचे जात प्रमाणपत्र रद्दबातल केलेले आहे. यानंतर ज्यांना पत्रिका वाटप करावयाच्या आहे. त्यातील स. सदस्यांचे नांव रद्द करुन वाटप कराव्यात या ठिकाणी प्र. आयुक्त म्हणुन बसलेले श्री. कांबळे साहेब यांनी अतिक्रमणे संबंधीची संचिका मागवुन काय कार्यवाही करणार योग्य खुलासा करावा.

**श्री. नंदकुमार फुलारी** : बांधकाम झाल्यावर परवानगी देणार की, बांधकाम परवानगी दिल्यानंतर बांधकाम करणार?

**मा. सभापती** : मागील बैठकीत सुराणानगर येथील बांधकामाबाबत श्री. फुलारी यांनी सुचना केल्यानुसार चर्चा झालेली होती. सदरचे बांधकाम चालु होते. आता बांधकाम परवानगीसाठी संचिका संबंधित व्यक्तीने सादर केलेली आहे. नियमाने कार्यवाही करावी. परवानगी नसतांना बांधकाम कसे होऊ दिले. याबाबतची सविस्तर माहिती स. सदस्य श्री. फुलारी यांना संबंधित विभागाचे अधिकारी यांनी लेखी स्वरुपात द्यावी.

**डॉ. आशा बिनवडे** : दोन बैठकीपुर्वी औषधी व साहित्य खरेदीवर चर्चा झाली याबाबत पुन्हा जाहरी प्रगटन देऊन कार्यवाही करावी म्हणुन निर्णय झाला. त्यानुसार टेंडर कधी काढण्यात आले. ९९ साली औषधी व साहित्य खरेदी करण्यात आली. त्यानंतर निविदा ाकिढण्यात आलेल्य नाहीत. १ वर्षात, १८ लाखांची खरेदी टप्याटप्याने करण्यात आली. कोणती औषधे, कोणत्या कंपनीची कोणत्या दराने, त्यांचे वितरक कोण हे सभागृहापुढे मांडावे. तसेच याबाबत मी दिनांक १९-०९-२००१ रोजी पत्र देऊन माहिती मागविली. अद्याप माहिती मला मिळालेली नाही. विलंब का होतो. सर्व गोष्टी संशयास्पद वाटतात. सदर सभेचे इतिवृत्त ९ ऑक्टोबरच्या बैठकीत कायम सुध्दा झालेले आहे. टेंडर काढले का? सविस्तर माहिती देण्यात यावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी** : यासंबंधीची माहिती माझ्या विभागाशी संबंधीत असली तरी, यामध्ये इतर विभागाकडुन सुध्दा माहिती मागवुन कार्यवाही करावी लागेल. लेखा व अभिलेखा विभागाकडुन माहिती मागवावी लागेल.

**श्री. किशोर तुळशीबागवाले** : आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे नेहमी सभागृहाची दिशाभुल करतात. संबंधित अधिकारी यांना सक्तीने सेवानिवृत्त करावे. त्याचे कामावर लक्ष नाही. तसा निर्णय या सभागृहाने घ्यावा. अधिकारी हे सभागृहाला किंमत देत नाही. स.सदस्यांना कमी लेखतात. कोणतीही कार्यवाही वेळेवर होत नसेल तर, या सभेला काही अर्थ नाही.

**डॉ. आशा बिनवडे :** सभागृहात बरेच निर्णय होतात. अधिकारी त्याची दखल घेत नाही. वेळीच कार्यवाही का घेत नाही. पुन्हा त्यासंबंधी सभागृहात चर्चा करावी लागते.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना सक्तीने सेवानिवृत्त करावे. नेहमीच सभागृहात सत्य माहिती देत नाहीत. कोणत्याही स. सदस्य पदाधिकारी यांना अधिकारी किंमत देत नाहीत.

**श्री. जयवंत ओक :** सभागृहात पदाधिकारी असो किंवा स. सदस्य असो यांनी अधिकारी यांचा मानपान राखणे गरजेचे आहे. एखाद्या कामासंदर्भात अधिकारी कायवाही करीत नसेल तर, नियमाने प्रशासन कार्यवाही करेल. तसे लेखी आपण दिले पाहिजे. परंतु अधिकाऱ्यांना अरे रावीची एकतर्फी शब्द वापरुन बोलणे योग्य होणार नाही. कारण उद्या अधिकारी सुध्दा या सभागृहाचा मान ठेवणार नाहीत. संबंधित आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना अरे रावीची भाषा वापरल्यावरुन मी निषेध करुन सभागृहासमोर जात आहे.
(याचवेळी स. सदस्य श्री.जयवंत ओक सभागृहाबाहेर जातात.)

**मा. सभापती** : सभागृहात प्रश्न उपस्थित केल्यानंतर कोणत्याही अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती देऊ नये. नसता योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार या सभागृहाला आहेत. त्याप्रमाणे निर्णय घेण्यात येईल.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** स. सदस्या श्रीमती डॉ. बिनवडे यांनी माझ्या विभागाकडे पत्र दिलेले असून, माहिती मागविली आहे. सदर माहिती ही २/३ विभागाकडुन प्राप्त करावी लागेल. दोन दिवसात सादर करण्यात येईल.

**डॉ. आशा बिनवडे :** औषधी खरेदी बाबत मुख्य लेखाधिकारी यांना विचारणा केली या बाबतीतल्या सर्व संचिका आरोग्य विभागाकडेच आहे असे उत्तर मिळाले. परंतु आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे २-३ विभागाकडे सांगतात.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** आरोग्य विभागाकडुन यासंबंधीचे बोल लेखा विभागाकडे सबमीट केलेले आहे. दोन वर्ष झाले. अभिलेखात जमा आहे. याला वेळ लागेल. दोन दिवसात माहिती देण्यात येईल.

**मा. सभापती** : काहीतरी उडवा उडवीची माहिती देवु नये. संबंधित अधिकारी यांनी औषधी व साहित्य खरेदी बाबतची माहिती स. सदस्या डॉ. श्रीमती आशा बिनवडे यांना आजच्या आज द्यावी व त्याची प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी.

**डॉ. आशा बिनवडे :** जाहीर प्रगटन काढण्यात आले ते सदोष आहे. दवाखान्यासाठी लागणारे लॉकर हे साहित्य तसेच मेडिसीन यामध्ये औषधी व गोळया तसेच सदर साहित्य याचे एकत्रित टेंडर केलेले आहे. एकच एजन्सी दोन्ही प्रकारचा माल पुरवठा करु शकेल कातशी एजन्सी कोठे आहे. एकत्र टेंडर काढयामागे उद्देश काय आहे. याबाबतीत सविस्तर खुलासा देण्यात यावा.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** अधिकारी सभागृहाला प्रस्ताव आणतांना व्यवस्थित आणत नाहीत. सभागृहात माहिती बरोबर होत नाही. अधिकारी सभागृहाचा वेळ वाया घालवतात. कोणतीही कामे करण्याची तयारी अधिकाऱ्यांची नसते. त्याबद्दल मी निषेध करुन सभागृहाबाहेर जात आहे. (याचवेळी स. सदस्य श्री. किशोर तुळशीबागवाले हे निषेध करुन सभागृहाबाहेर निघुन जातात.)

**मा. सभापती** : अधिकारी वेळेवर काम करीत नाहीत म्हणुन सभागृहात कोणतयाही सदस्यांनी अधिकाऱ्यांना एकतर्फी भाषा वापरणे योग्य होणार नाही. जे

अधिकारी काम करीत नाहीत त्यांचेवर नियमाने कार्यवाही आपल्याला करता येईल तसा निर्णय आपण सभागृहात घेऊ शकतो. कुण्याही सदस्यांनी सभागृहाबाहेर जाऊ नये. सभा १० मिनिटांसाठी तहकुब करण्यात येते.

( वेळ १२.२० वाजता तहकुब झालेली सभा पुन्हा १२.३० वाजता सुरु)

( याचवेळी निषेध करुन गेलेले स. सदस्य श्री. तुळशीबागवले व इतर उपस्थित सर्व सदस्य पुन्हा सभागृहात येतात.)

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** स. सदस्या डॉ. बिनवडे यांनी टेंडर बाबत जो प्रश्न विचारला त्याबाबत खुलासा करण्यात यावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** टेंडर वेगहे काढलेले आहे. पहिल्या टेंडरमध्ये फर्निचर, औषधी तसेच लॅबोरेटरीज साहित्याचे टेंडर काढलेले होते. जाहीरात एकत्र करुन पाठविली.

**मा. सभापती :** स्थायी समितीने निर्णय घेतल्यानंतर सुध्दा दोन वेगवेवगळे टेंडर काढलेले आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** दुसऱ्यांदा जे टेंडर काढले त्यामध्ये सुध्दा इन्स्ट्रुमेंटमध्ये फर्निचरचे टेंडर दिले. यात वॉशिंग मशीन, फ्रिज, लॉकर, टेबल बाबत दिले. वेगळे द्यावयास पाहिजे होते. स्टील साहित्या बरोबर फर्निचर देणार काय?

**श्री. सलीम पटेल :** दवाखान्यासाठी सर्व औषधी व साहित्य हे भांडार विभागानेच खरेदी करण्याची काग्रवाही करावी प्रत्येक विभागामार्फत वेगवेगळया प्रकारचे साहित्य बाहेरुन मागविण्यातची योजना बंद करावी.

**मा. सभापती :** स्थायी समितीने निर्णय घेतल्यानंतर सुध्दा पुन्हा पुर्वीप्रमाणेच टेंडर काढण्यात आले.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** औषधी व साहित्य आणि फर्निचर यांचे वेगवेगळे टेंडर काढले होते. त्यात चुक झाली म्हणुन आता एकत्र काढण्यात आलेले आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** सदर साहित्य हे पाच ग्रुपस मध्ये खरेदी करण्याबाबत टेंडर काढण्याची आवश्यकता होती. इन्स्ट्रुमेंट, इक्विपमेंट, फर्निचर, औषधी ई. अशा प्रकारचे वेगळे करावे. डी.-फेब्रीलेटर कशासाठी खरेदी करण्यात येते.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी पहिली जाहीरात काढली ती एकत्र होती म्हणुन वेगवेगळी जाहीरात द्यावी म्हणुन आपण निर्णय घेतला. त्यानंतर दुसरती जाहीरात प्रकाशित केली. त्यामध्ये तीन टप्पे करण्यात आले.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** नवीन काढणार आहोत. हार्ट संबंधित आहे.

**डॉ. आशा बिनवडे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** हे अत्यंत खोटे आहे. आय. सी. सी. यु. साठी उलटे होते. अगोदर इन्स्ट्रुमेंट नंतर व्यवस्था बनवावयाचे आहे.

**श्री. नंदकुमार फुलारी :** आपणाकडे दंत चिकित्सक नाही.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** ठरावानुसार औषधी खरेदी करावे.

**डॉ. आशा बिनवडे :** ठरावानुसारच साहित्य खरेदी व्हावे, इतर साहित्याचा समावेश नसावा. आय. सी. सी. यु अगोदर तयार करावे त्यानंतर साहित्य खरेदी करावे. यासाठी किमान २ वर्षे बनविण्यासाठी लागतील. किती क्वालीटी घेणार, त्याचे स्पेसिफिकेशन्स काय आहे. टेंडर रिसेट करावे लागणार आहे.

**मा. सभापती :** २० लाखाच्या गोळया-औषधी खरेदी करणार कोणत्या प्रकारच्या गोळया, औषधी किती कॉन्टीटी खरेदी करणार हा स. सदस्यांचा मुद्दा आहे. त्याबाबत सविस्तर टेंडरमध्ये का दिले नाही. हा सदस्यांना प्रश्न आहे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** पर्चेस फार्म मध्ये सर्व दर दिलेले आहेत.

**मुख्यलेखाधिकारी :** औषधी खरेदी निविदा काढल्या होतया त्याचे फॉरमेट मध्ये ३५ लाखाचे १% एम एल डी यास आक्षेप म्हणुन ३ फॉर्म वेगळे केले. यासंबंधी पुन्हा दुरुस्ती सुचना देऊन कार्यवाही करण्यात आली. मा. आयुक्तांनी आदेश दिल्यावरुन उपसंचालक, आरोग्य यांचे कडुन माहिती मागविली दर करार आहे. प्रती युनिटचे दर मागविले. जेवढे खरेदीचे तेवढेच मागविले. शासन नियमाने जे वितरीत होते. त्याप्रमाणे कार्यवाही करणार आहोत. शासनाने ३ तज्ञ डॉक्टरांची कमीटी नेमली होती. १९९६ ला अधिष्ठता (दोन) ला बोलाविले. श्री. भोगे साहेब व आरोग्य वैद्यकीय अधिकारी होते. चालु वर्षा निविदा बाबत डॉ. तालीब यांचे मार्गदर्शन घेऊन पुढील कार्यवाही करणार.

**डॉ. आशा बिनवडे :** या चार वर्षात कितीतरी कंपन्या बाजारात आलेल्या आहेत. आपण एकच कंपनीची मागणी करतो. इतर कंपन्याचे दर मागविल्यास काय अडचण्ण येणार आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** जी औषधी तसेच साहित्य येणार आहे. याची योग्य तपासणी करण्यासाठी एक कमीटी स्थापन करावी.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** सन १९९२ मध्ये एक चौकशी समिती बसविण्यत आलेली होती. त्या समितीचा अहवाल मागवुन आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी. ९२ मधील चौकशी समितीचा अहवाल लागु करण्यात यावा.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नानुसार अधिकारी यांनी सुध्दा खुलासा केलेला आहे. या प्रकरणात स्थायी समितीने निर्णय घेतल्यानंतर त्यात असे ठरले होते की, जाहीर प्रगटन देतांना वेगवेगळे टेंडर काढावे संबंधित अधिकारी यांनी पुन्हा एकत्रित टेंडर करुन १ क्रमांकाची जाहीरात काढण्यात आलेली आहे. यासंबंधी स. सदस्यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या ही बाब निदर्शनास आणुन दिली की, स्थायी समितीच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. म्हणुन पुन्हा दुसऱ्यांदा टेंडर आले. त्यामुळे सुरुवातीस जी जाहीरात दिली त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे व जी पहिल्यांदा जाहीरात काढण्यात आली ती संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे काढण्यात आलेली आहे. म्हणुन मा. आयुक्तांना अशी सुचना करण्यात येते की, त्या जाहीरातीचा खर्च संबंधित अधिकाऱ्यांकडुन वसुल करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**डॉ. आशा बिनवडे :** महानगरपालिकेकडे एकुण डॉक्टर किती आहेत.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** २१ आरोग्य केंद्र ३ खटी एकुण ३२ डॉक्टरांची आपल्या विभागास आवश्यकता आहे. यापैकी काही डॉक्टर ठराविक वेतन रु. ५०००/- वर कार्यरत असून, शासनाकडुन पदे मंजुर होऊन न आल्यामुळे ठराविक वेतनावर त्यांची नियुक्ती करावी लागली. २० डॉक्टर आहेत. आता सध्या ८ पदांना शासनाची मंजुरी आलेली आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** एम. बी. बी. एस. पदवी धारण केलेले डॉक्टरर्स किती, इतर पदवी धार केलेले डॉक्टरर्स किती.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** एम. बी. बी. एस. पदवी धार केलेले ४ डॉक्टरर्स आहेत. ४ (चार) आयुवैदीक डॉक्टर आहेत. ते ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करतात.

**डॉ. आशा बिनवडे :** आयुर्वैदिक डॉक्टरांना ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करता येते का? न्यायालयाने एक प्रकरणामधुन अशी प्रॅक्टीस करण्यास मनाई केलेली आहे. ज्या पॅथीची

पदवी तीच प्रॅक्टीस करता येते. आयुर्वेदाला ॲलोपॅथीची प्रॅक्टीस हा गुन्हा ठरत नाही का?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** होमोओपॅथीसाठी देखील आता आरक्षण ठेवलेले आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** ज्यांना ज्या पॅथीची माहिती नाही त्याबद्दल त्यांनी कशी प्रॅक्टीस करावयाची व कुठली प्रॅक्टीस करायची. शासनाचे निर्णय काय आहेत.

**मा. सभापती** : शासन जी आर नुसार अधिकारी यांनी अभ्यास करुनच कार्यवाही करावी.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** १९९२ मध्ये जी चौकशी समिती नेमण्यात आलेली होती त्या कमीटीचा अहवाल मागवावा. त्यानुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी. त्याचा अहवाल पुढील सभेत ठेवावो. आयुवैदिक, होमीऔपॅथी यांना ॲलोपॅथी प्रॅक्टीस करता येते का?

**मा. सभापती** :१९९२ मध्ये जी कमीटी नेमण्यात आलेली होती त्याचा अहवाल पुढील स्थायी समितीसमोर ठेवावा. तसेच जी पॅचर्स कमीटी असेल तसेच आयुवैदिक डॉक्टरांना ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करता येते का? जे जे मुद्दे स. सदस्यांनी उपस्थित केलेले आहे. त्यासंबंधी स्थायी समितीच्या काही सदस्यांची कमीटी स्थापन करण्यात येत आहे. या कमीटीने देखरेख व नियंत्रक म्हणुन काम करावे. संबंधित अधिकारी यांनी या प्रस्तावाच्या संबंधिच्या सर्व बाबी या कमीटीच्या निर्दशनास आणुन द्यावयास पाहीजे. या कमीटीत डॉ. आशा बिनवडे, श्री. दलबीरसिंग, जबिंदा, श्री. अशरफ मोतीवाला, तसेच श्री. किशोर तुळशीबागवाले या चार सदस्यांची कमीटीमध्ये समावेश करण्यात येत आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** जे टेंडर काढण्यात आले ते रद्द करावे. आता कमीटटी स्थापन केलेली आहे.

**मा. सभापती** : टेंडर रद्द करण्याची आवश्यकता नाही. टेंडर मान्यतेसाठी स्थायी समितीसमोर येणार आहेच. त्यात काय दुरुस्त्या करायच्या त्या करता येतील. वेळ पडल्यास टेंडर रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**डॉ. आशा बिनवडे :** जे टेंडर काढले ते रीसेट करावे. यात फक्त तीन लोकांनी टेंडर भरलेले कंपन्या निट नाही. त्यामुळेच मी बोलते. अभ्यासपुर्वक बोलते ३ री जाहीरात काढावी. मागच्या वेळी ३० लाखाचे ६० लाख झाले. नंतर ३५ लाख ३५ लक्ष रुपयांमध्ये फक्त पाच लाखाचे फर्निचर खरेदी करणार आहोत. मागच्या टेंडरमध्ये फर्निचर नव्हते. पाच ग्रुप वेगवेगळे का करण्यात आलेले नाही.

**मा. सभापती** : २५ तारीख शेवटची आहे. आणखी १५ दिवसांच्या आत पुन्हा टेंडर स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर होईल.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** १९९२ ला जी कमीटी स्थापन केलेली होती. त्या कमीटीचा अहवाल मागवावा काय कार्यवाही करायची ती करण्यात यावी.

**श्री. साहेबराव कावडे :** स. सदस्या डॉ. बिनवडे सर्व माहिती देत आहेत. काढण्यात आलेले टेंडर रद्द करावे. पुढील बैठकीत प्रस्ताव येणार तो आपण चर्चा करुन रद्द करणार पुन्हा वेळ जाणार आहे. आजच निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**मा. सभापती** : दुसऱ्यांदा काढण्यात आलेल्या टेंडरमध्ये सुध्दा काही चुका झाल्याचे स. सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यानुसार आजा ज्या कुणाला निविदा भरावयाच्या आहेत. त्या लोकांना भरता येणार नाही. फक्त काही

लोकापुरत्याच निविदा भरणेसाठी मर्यादीत राहील. दुसऱ्यांदा जे टेंडर काढले आहे त्यात भरपुर चुका झालेल्या आहेत. म्हणुन आताच जी कमीटी नेमण्यात आली त्या कमीटीने व शासनाची जी कमीटी या दोन्ही कमीटीच्या विचाराने दुसरे टेंडर काढण्याची कार्यवाही करावी.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** महानगरपालिकेने हातगाडी विक्रेत्यांना लायसन्स दिलेले आहे. काही लोकांनी मुख्य रस्त्यावर दुसऱ्याच पदार्थाची विक्री सुरु केलेली असून, त्यांना ज्या विक्रीसाठी लायसन्स दिले तेथे दुसरेच पदार्थ विक्री होत आहेत. त्यामुळे अशा काही भागात तणावग्रस्त परिस्थिती निर्माण झालेली आहे. हातगाडी विक्रेते यांना परवानगी दिली का? सार्वजनिक जागेवर परवानगी देऊ नये. बीजा/मटन खिम्याचे समोसे, टिकीया, मटन पकोडे ई. विक्रीस परवानगी देऊ नये.

**श्री. भरत लकडे :** सार्वजनिक ठिकाणी परवानगी दिली असेल तर, ती रद्द करावी.

**श्री. सलीम पटेल :** मटन व बीफ विक्रेत्यांना परवानगी दिलेली आहे जे खाद्य पदार्थ विक्री करीत असेल तर, त्या पदार्थाचे नांव त्यांनी प्लेट तयार करुन त्यावर लावण्यात यावे. म्हणजे कशाचे पदार्थ आहेत ते समजेल.

**मा. सभापती** : सार्वजनिक रस्त्यावर मासांहारी पदार्थ विक्रीची परवानगी दिलेली आहे का? याचा खुलासा व्हावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** महानगरपालिका फुड अडल्ट्रेशनसाठी पाहवे. खाद्य पदार्थ अडल्ट्रेशन होऊ नये म्हणुन स. सदस्य म्हणतात त्याप्रमाणे तपासणी करण्यात येईल. फुड अडल्ट्रेशन अंतर्गत काय विकावे, शाकाहारी किंवा मांसाहारी हे येत नाही. ॲक्ट मध्ये तरतुद नाही.

**मा. सभापती** : यापुढे जे हातगाडी विक्रेते यांना लायसन्स दिले जातील त्यामध्ये अट टाकण्यात यावी की, त्यांनी सार्वजनिक जागेवर मांसाहारी पदार्थ विक्री करु नये. अशी परवानगी देतांना ही द्यावी. स. सदस्यांनी मुद्दा उपस्थित केल्यानुसार जे कोणी सार्वजनिक रस्त्यावर विना परवानगीने विक्री करीत असेल अशा विक्रेत्यांना लायसन्स रद्द करण्यात यावे. पुढील कार्यवाही करण्यास पोलीस विभागास सोपे होईल.

**श्री. सलीम पटेल :** हे हातगाडी कोठे लावणार, सार्वजनिक ठिकाण्ी नाही तर जंगलात लावणार का?

**श्री. मीर हिदायत अली :** सध्या मनपा गेटसमोर लाईनमन ३ पोषणास बदलेले आहे. त्याची मागणी विचारात घेऊन कार्यवाही करावी. सदर कर्मचारी हे जबाबदारी कामे करावी लागतात. कारण मागे श्री रफिक नावांचे लाईनमन एका खांबावरुन पडुन जख्मी झाले होते. मनपातर्फे त्यांना औषधोपचारासाठी काहीही मदत मिळाली नव्हती.

**मा. सभापती** : असे किती कर्मचारी आहेत. सध्याच्या दैनिक वेतन काय आहे. वाढवुन दिल्यास किती बोजा पडेल याबाबत मुख्य लेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** असे एकुण २४ कर्मचारी हे अस्थायी असून, त्यांना रु. ७५/- दैनिक वेतन दिले जाते त्यांनी स. ११४/- प्रमाणे दैनिक वेतनाची मागणी केलेली आहे. अस्थायी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत काही अनुचित घटना घडलयास त्यांना मनपामार्फत आर्थिक मदत देता येत नाही. दैनिक वेतनात किती वाढ करता येईल यावर विचार करुनच कार्यवाही करण्यात येईल.

**मुख्यलेखाधिकारी :** असे एकुण २४ कर्मचारी हे अस्थायी असून त्यांना रु. ७५/- दैनिक वेतन दिले जाते त्यांनी रु. ११४/- प्रमाणे दैनिक वेतनाची मागणी केलेली आहे. अस्थायी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत काही अनुचित घटना घडल्यास त्यांना मनपामार्फत आर्थिक मदत देता येत नाही. दैनिक वेतनात किती वाढ करता येईल यावर विचार करुनच कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती** : अस्थायी लाईनमन यांना दैनिक वेतनात वाढ करण्यासंदर्भात पुढील बैठकीत प्रशासनामार्फत तसा प्रस्ताव सादर करावा. जे उपोषणास बसलेले आहेत. त्यांना आजच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाची माहिती देण्यात यावी.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** गुरु रामदासनगर येथे एका व्यक्तीने इमारत बांधुन विकलेली आहे. त्यासंबंधीचे प्रकरण न्यायालयात गेलेले आहे. याबाबतची संचिका मनपाकडे मिळत नाही. गहाळ झालेली आहे, या इमारतीचा कर मनपा आकारणी करते का म्हणुन सर्वसाधारण सभेत सुध्दा प्रश्न उपस्थित केलेला आहे. कोणतेही कागदपत्र व संचिका आढळुन येत नाही.

**श्री. भरत लकडे :** सचिका गहाळ झालेली असेल तर, संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे.

**मा. सभापती** : या इमारतीच्या संबंधात न्यायालयीन प्रकरण चालु आहे. न्यायालय मनपावर काही ताशोरे ओढत आहे काय? तसेच मनपाकडुन योग्य ते कागदपत्र दिल्या जात नाही. म्हणुन संबंधित व्यक्तीच्या बाजुने निष्काळ लागेल असे चित्र आहे. सदर संचिका कुठे आहे. याची प्रशासनास काही माहती आहे का?

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** या प्रकरणाबाबत मी देशमुख नावाचे कर्मचारी यांना माहिती होती. फाईल कोर्टात होती आपण परवानगी दिली नाही. ३ मजली परवानगी दिली. शेवटची नोटसी देवुन संचिका मागविता येईल. पुढच्या स्थायी समिती पर्यंत कागदपत्र व अहवाल तयार ठेवावा.

**मा. सभापती** : ज्या व्यक्तीने इमारत बांधकाम केले त्यांनात तीन मजली इमारत बांधण्याची परवानगी मनपाने दिलेली होती. मनपाकडे कागदपत्र मिळत नसतील तर संबंधित व्यक्तीला मनपाच्या नियमाप्रमाणे आजच एक शेवटची नोटसी देऊन त्या इमारतीचे जे कागदपत्र त्या व्यक्तीकडे उपलब्ध असतील त्याची मागणी करण्यात यावी. दोन दिवसांच्या आत कागदपत्र दाखल करण्यास कळवावे. नसता मनपाच्या नियमाने आपल्यावर कार्यवाही करण्यात येईल असे त्या नोटसीमध्ये सुचना करावी. पुढील स्थायी समितीच्या सभेपर्यंत सर्व कागदपत्र मनपाकडे सादर झाली पाहीजेत. त्याप्रमाणे कार्यवाही करावी. तसा अहवाल सभागृहात ठेवण्यात यावा.

**डॉ. आशा बिनवडे :** कोकणवाडी येथे मनपाच्या शाळेच्या जागे संदर्भात अद्याप जाहीर प्रगटन काढले नाही. मागील बैठकीत यासंबंधी चर्चा झालेली होती. का कार्यवाही केली नाही.

**उप अभियंता (न. र.), श्री. निकम :** जाहीर प्रगटन काढलेले नाही.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** दोन महिन्यापुर्वी या विषयावर चर्चा झालेली होती. सदर मिळकत घेत आहोत. योग्य ती नियमाने कार्यवाही होण्यासाठी जाहीर प्रगटन देऊन पुढील कार्यवाही म्हणुन तसार प्रश्न स. सदस्यांचा होता. जाहीर प्रगटन का दिले नाही.

**मा. सभापती** : या संदर्भात लवकरात लवकर जाहीर प्रगटन काढण्यात यावे. पुढील कार्यवाही नियमाने करण्यात यावी.

**विषय क्र. ४२/१ :**

दिनांक ०९-१०-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**मा. सभापती :**

विषय क्रमांक १ ते ६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहेत.

**ठराव :**

दिनांक ०९-१०-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४३/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, महेशनगर, व्यंकटेशनगर मधील रस्त्यावर फुटपाथ बांधण्याच्या कामाकरीता सा. बा. खात्याच्या सन २०००-२००१ च्या दरसुचीनुसार र.रु. १३,०५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च फुटपाथ बांधण्यासाठी ठेवण्यात आलेल्या रक्कम रुपये ५० लक्षच्या तरतुदीमधुन करण्यात येईल. तरी रु. १३,०५,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व्यंकटेशनगर मधील रस्त्यावर फुटपाथ बांधण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १३,०५,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४/३ :**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, चिकलठाणा येथील उर्वरीत गटारी दुरुस्त करणे करीता र. रु. ११,०१,२४३/- चे सा. बा. विभाग औरंगाबाद यांच्या दरसुची नुसार (२०००-२००१) अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून, मा. आयुक्तांनी त्यास दि. ०२-१०-२००१ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम मनपा अर्थसंकल्प २००१-२००२ मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतुद लेखा शिर्ष " खुल्या गटारी व संरक्षित भिंत " मध्ये खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा येथील उर्वरीत गटारी दुरुस्त करणे करीता तयार करण्यात आलेल्या र. रु. ११,०१,२४३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, उस्मानपुरा पोलीस चौकी मागील जुनी शालेय इमारत पाडुन नवीन सार्वजनिक सभागृह बांधणे बाबतच्या कामाच्या अंदाजपत्रक र. रु. १०,६२,५२१/- ला मा. स्थायी समिती ठराव क्र. ५/४ दि. ०४-०६-२००१ अन्वये मान्यता मिळाल्यानुसार सदरील कामाची निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/२३/२००१ दिनांक १२-०७-२००१ अन्वये निविदा मागविण्यत आल्या असता निविदा विक्रीच्या तारखेला एकुण१९ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृती या तारखेला एकुण ४ निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थितांसमोर उघडण्यात आल्या असता प्राप्त झालेले निविदा दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मौला अली यारखार | १३.८९% कमी दराने |
| २. | श्री. एस. ए. नवाब | ११.५३% कमी दराने |
| ३. | श्री. शेख शरीफ | ११% कमी दराने |
| ४. | श्री. सय्यद शरीफ | ७.३३% कमी दराने |

प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १३.८६% कमी दराची निविदा श्री. मौला अली यारखान यांची आहे. करीता श्री. मौला अली यारखान यांची अं. प. दरापेक्षा १३.८९% कमी दराची निविदा मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उस्मानपुरा पोलीस चौकी मागील जुनी शालेय इमारत पाडुन नवीन सार्वजनिक सभागृह बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १३.८९% कमी दराची श्री. मै ला अली यारखान यांची निविदा मिळण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, लोटाकारंजा येथे जुने मटन मार्केट तोडुन दुकान केंद्र बांधणे करीता सा.बा. विभागाचे सन ९९-२००० नुसार र. रु. १६,१३,५८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. १७-०१-२००१ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेस्तव ठेवण्यात आला असता मा. स्थायी समितीने विषय क्र. ९०/२ दि. ०७-०२-२००१ च्या इतिवृत्तन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार कार्यालयीन निविदा सुचना क्र. लेखा/नि/७७/२००० दि. १४-०३-२००१ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण २१ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण (३) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | शमीम कमाल सहाब | १६.५१% कमी दराने |
| २. | एस. एम. सजजाद | १०.५% जास्त दराने |
| ३. | सुजात हाश्मी | ८% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टीने सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा १६.५१% कमी दराची निविदा श्री. शमीम कमाल सहाब यांची प्राप्त झालेली आहे. तथापि त्यांनी काम कण्यास लेखी पत्राद्वारे नकार दिला त्यानुसार मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेनुसार संबंधित गुत्तेदारास काळया यादीत टाकुन त्यांची निविदेसोबत भरलेली १% इसारा रक्कम जप्त

करण्यात आली आहे. तसेच द्वितीय क्रमांकाचे निविदा धारकास लेखी पत्रकाद्वारे विचारणा केली असता अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार असल्याबाबत कार्यालयास कळविले व तृतीय क्रमांकाचे निविदाधारकाने अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.५% जास्त दराने काम करण्यास तयार असल्याबाबत कार्यालयास कळविले. तसेच वरीलप्रमाणे कार्यवाही करुन मा. आयुक्त यांचे आदेशान्वये कार्यालयीन निविदा सुचना क्रं. मनपा/लेखा/नि/१८/२००१ दि. २२-०६-२००१ अन्वये फेरनिविदा मागविल्या असता एकुण १६ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत २ (दोन) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मो. सिराजोद्दीन सिध्दीकी | ४.१३% कमी दराने |
| २. | परफेक्ट कन्स्ट्रक्शन | निविदेसोबत १% इसार रक्कम भरली नसल्याकारणाने निविदा उघडण्यात आली नाही. |

त्यानुसार मो. सिराजोद्यीन सिध्दीकी यांची ४.१३% कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. मा. मुख्यलेखाधिकारी यांचे दि. २५-०७-२००१ चे आदेशान्वये संबंधित ठेकेदारास पुन्हा किती दर कमी करुन शकता याबाबत लेखी पत्राद्वारे विचारणा केली असता ठेकेदारांनी अं. प. दरापेक्षा ४.५०% कमी या दराने काम करण्यास तयार असल्याबाबत कार्यालयास कळविले. तथापि मा. आयुक्त महोदय यांचे दालनात दि. २६-०९-२००१ रोजी झालेल्या दराबाबतच्या वाटाघाटी अंती अं. प. दरापेक्षा ४.५०% कमी दराऐवजी संबंधित गुत्तेदारांनी अं. प. दरापेक्षा ६% कमी दराने काम करण्यास तयार असल्याबाबत संमती दिली आहे. त्यानुसार मो. सिरजोद्दीन सिध्दीकी यांची अं. प. दरापेक्षा ६% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लोटाकारंजा येथे जुने मटन मार्केट तोडुन दुकान केंद्र बांधणेच्या कामकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी श्री. मो. फिराजोद्दीन सिध्दीकी या निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडुन अं. प. दरापेक्षा ६% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पोलिस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी त्यांचे कडील पत्र जा.क्र./सीआर-००/औबाद/२००१/३२७८ दि. ६ ऑक्टोबर २००१ नुसार आरोपी लोकसेवक श्री. सय्यद शौकत अली, कनिष्ठ अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांचे विरध्दची लाचलुचपतीची सापळा केस प्रकरणी त्यांचे विरुध्द न्यायालयात अभियोग लावण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. पत्रासोबत सदरच्या गुन्हा प्रकरणाच्या तपासाचे संपुर्ण कागदपत्र संच त्यांनी पाठविलेली आहे.

सर्व कागदपत्रे बारकाईने तपासली आहेत. संबंधित श्री. सय्यद शौकत अली यांच्या विरुध्द न्यायालयात अभियेग लावण्यासाठी पुरेसा पुरावा दिसुन येत आहे. सबब प्रस्ताव मान्य करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पोलिस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांचेकडील पत्र जा. क्र. सीआर-००/औबाद/२००१/३२७८ दि. ६ ऑक्टोबर २००१ नुसार श्री. सय्यद शौकत अली, कनिष्ठ अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांचे विरध्दची लाचलुचपत सापळा केस प्रकरणी त्यांचे विरुध्द न्यायालयात अभियोग लावण्यासाठी परवानगी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

**मा. सभापती** : निलंबित कर्मचाऱ्यांच्या बाबतीत माहिती सभागृहात ठेवण्याबाबत मागील बैठकीत निर्णय झालेला आहे. सचिन यांचेकडे तशी माहिती उपलब्ध इ ाालेली नाही. संबंधित विभागाकडुन एक पत्र प्राप्त झालेले आहे. लाचलुचपत प्रकरणामध्ये एकुण १० कर्मचारी निलंबीत झालेले आहेत. त्यापैकी काहींना कामावर घेतले. बाकी ६ (सह) कर्मचारी यांना का? घेतले नाही. उर्वरीत जे कर्मचारी बाकी आहेत ते ४८ तासाच्यावर पोलीस कोठडीत होते का? ज्यांना घेतले ते कर्मचारी ४८ तासापेक्षा कमी वेळ पोलीस कोठडीत होते का? नसेल तर त्यांना कोणते निकष लावुन घेण्यात आले एकाच प्रकारच्या प्रकरणात सर्वात सारखेच नियम लागु असावेत त्यादृष्टीने कार्यवाही झालेली आहे का माहिती देण्यात यावी?

**श्री. मीर हिदायत अली :** सर्वच कर्मचारी ४८ तासाच्या आतच पोलीस कोठडीतुन मुक्त झालेले आहेत. अशा सर्व कर्मचाऱ्यांना कामावर घेण्यात यावे.

**श्री. भरत लकडे :** बाकीच्या लोकांना देखील घेण्यात यावे.

**मा. सभापती** : जे कर्मचारी ४८ तासाच्या आत पोलीस कोठडीतुन मुक्त झाले अशा कर्मचाऱ्यांना निलंबीत केले. परंतु काही कर्मचाऱ्यांच्या बाबतीत संचिका विधी सल्लागार यांचेकडे का पाठविण्यात आली. इतर कर्मचाऱ्यांचे बाबतीत निलंबन करण्या संदर्भात अभिप्राय का घेतले नाही. कर्मचाऱ्यांना निलंबन काळात ७५% पगार दिला जातो.

**सहाय्यक आयुक्त-१ :** लाचलुचपत प्रकरणात एकुण १० कर्मचाऱ्यांना पकडण्यात (गुंतलेले) आलेले आहे. त्यापैकी ६ (सहा) कर्मचारी हे निलंबित असून, त्यांना अद्याप कामावर घेण्यात आलेले नाही. सदर निलंबन हे मा. आयुक्तांच्या आदेशानुसार करण्यात आलेले आहे.

**मा. सभापती** : जी माहिती प्रशासनाच्या वतीने निलंबित कर्मचाऱ्यांच्या बाबतीत दिलेली आहे. त्या अनुषंगाने प्रशासनास सुचना करतो की, जे कर्मचारी ४८ तासाच्या आत पोलीस कोठडीत होते त्या सर्वच कर्मचाऱ्यांना कामावर घेण्याची कार्यवाही करण्यात यावी व निलंबनाच्या वेळी विधी सल्लागार यांचा कोणताही सल्ला न घेता डायरेक्ट संबंधित अधिकारी यांनी मा. आयुक्तांकडे संचिका दिली व निलंबित केले. काही कर्मचाऱ्यांच्या बाबतीच का सल्ला घेण्यात आला. याबाबत त्यावेळचे कार्यरत असलेले अधिकारी यांची चौकशी करुन त्यांचेवर प्रशासनाने कार्यवाही करावी. कारण निलंबित कर्मचाऱ्यांना सुध्दा मनपा ७५ वेतन देते. कामे करण्यासाठी कर्मचारी कमी पडतात. त्यामुळे यात मनपाचे नुकसान होत आहे. या प्रकरणात नियमाने योग्य ती कार्यवाही करावी.

या बरोबरच " जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | स्थायी सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १३-११-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तात. मंगळवार दिनांक १३-११-२००१ रोजी मा. सभापती, श्री. प्रशांत देसरडा, यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे सकाळी ११.३० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. अशरफ युनूस मोतीवाला | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| ३. | स. स. श्री. सिध्द जगदिश कन्हैयलाल | -//- |
| ४. | स. स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग | -//- |
| ५. | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ६. | स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | -//- |
| ७. | स. स. श्री. सलीम पटेल समशेर पटेल | -//- |
| ८. | स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| ९. | स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| १०. | स. स. श्री. ओक जयवंत केशवराव | -//- |
| ११. | स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | -//- |
| १२. | स. स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |

**विषय क्र. ४८/१ :**

दिनांक २५-१०-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. भरत लकडे :** माझ्या वार्डातील एका जागेवर अतिक्रमण झाले त्या संदर्भात मी इतिवृत्तातील पान क्र. २ वर मुद्दा उपस्थित केलेला होता. त्या संदर्भात या बैठकीत सविस्तर माहिती सादर करणार होते. खुलासा करावा. पी. आर. कार्ड एकाच्य नावांवर व न्यायालयाचे स्थगिती आदेश दुसऱ्याच व्यक्तीच्या नावावंर आहे. अशी माहिती मिळालेली आहे.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी सविस्तर खुलासा करावा. न्यायालयाने काम निर्णय दिलेला आहे याची सुध्दा माहिती देण्यात यावी.

**विधी सल्लागार :** सन्माननीय सदस्य श्री. भरल लकडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नासंबंधी सदरचे प्रकरण हे रामविहार गृहनिर्माण संस्थेचे असून, न्यायप्रविष्ट आहे. श्री. हमीदखान बाबखान यांनी त्यांचे जागेमध्ये सि. स. नं. १२१९९/१० स. नं. ३८ प्लॉट नं. १० या जागेबाबत वाद न्यायालयात दाखल केलेला आहे. या प्रकरणी न्यायालयाने सर्व बाबी ऐकुन देऊन तसेच पी. आर. कार्ड संबंधिताच्य नांवे आहे ही बाब सुध्दा न्यायालयाने लक्षात घेतलेली आहे. मनपाच्या संबंधित जागेच्या ले-आऊटच्या बाबी सुध्दा न्यायालयाने लक्षात घेतलेल्या आहेत. ओरीजनल ओनरकडुन ही जागा संबंधिताने लीजवर

घेतलेली आहे. हा व्यक्ती टेनंट म्हणुन आहे. त्यांचे नांवे पी. आर. कार्ड केलेले आहे. भाडे पट्टा नोंदणीकृत केलेला नाही. न्यायालयाने महानगरपालिकेची बाजु विचारात घेऊन संबंधिताचा मनाई हुकुमाचा अर्ज फेटाळलेला आहे. आणि संबंधिताने न्यायालयाने विनंती केली की, अपिलापर्यंत जैसे थे परिस्थिती ठेवण्यात यावी. अपिलाची मुदत १ महिन्यापर्यंत असते. स्थगिती आदेश मिळालेला नाही. एक महिन्यात संबंधितास स्थगिती आदेश मिळाला नाही. तर मनपास आवश्यक ती पुढील कार्यवाही करता येईल.

**श्री. भरत लकडे :** श्री शे. रहीम माने पी. आर. कार्ड केले. न्यायालयाचे स्थगिती आदेश कोणाच्या नावाने याचा खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** स्थगिती हमीदखानने घेतली व पी. आर. कार्ड हे श्री. हबीबखाच्या नावाने आहे हे स्थगिती संबंधितांनी भाडे तत्वावर जागा घेतलेली होती. लिजच्या आधारे त्यांनी न्यायालयाकडुन स्थगिती आदेश मिळाविले आहे. परंतु यामध्ये १२१९९/१० हा सि. सं. नंबर टाकलेला आहे. या सी. टी. एस. च्या पुरता हा स्थगिती आदेश मिळविलेला आहे. ओरीजनल ओनर यांचेकडुन लिजवर घेतलेले आहे.

**श्री. भरत लकडे :** संबंधिताने जागा स्वतःच्या नावाने कशी करुन घेतली प्रशासकीय अधिकारी तोडायला जातात तेव्हा तो माणुस समोर येत नाही.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** सेकंड पार्टी कोण आहे. त्यांनाही न्यायालयात प्रतिवादी करण्यात यावे. लिजवर ज्याचेकडुन घेतले त्यांना पार्टी करावे.

**मा. आयुक्त** : पी. आर. कार्डवर नांव असेल तर, पार्टी करता येईल. पी. आर. कार्डच्या संदर्भात जर न्यायालयाने स्थगिती आदेश दिले तर, त्या पी. आर. कार्डचे उपयोग होईल नसता स्थगिती आदेश मिळालेनाही तर, न्यायालयाने निर्देशानुसार आपल्याला पी. आर. कार्डवर मनपाचे नांव आणावे लागेल. काढलेले पी. आर. कार्ड रद्द करावे लागेल.

**श्री. भरत लकडे :** संबंधिताने ५ महिन्यापुर्वीच अतिक्रमण केलेले आहे. प्रशासकीय अधिकारी यांना सुचना देऊन सुध्दा कार्यवाही वेळीच केली नाही. न्यायालयाचे स्थगिती आदेश दुसऱ्याच व्यक्तीच्या नावाने आलेले आहे.

**मा. आयुक्त** : या जागेचे न्यायालयीन प्रकरण संपले आहे. अपिलात जाऊन स्थगिती आदेश मिळाविण्यासाठी प्रयत्न होईल. या संदर्भात मनपाने कव्हटे दाखल केले आहे मनपाचे मत मांडलेले आहे. आता न्यायालयाने संबंधित व्यक्तीला अपिलासाठी एक महिन्याची मुदत मिळते. त्या मुदतीपर्यंत आपल्याला थांबावे लागेल. न्यायालयाने स्थगिती आदेश दिले नाही तर त्या जागेच्या संदर्भात पुढील आवश्यक ती कार्यवाही केली जाईल. मनपाची मालमत्ता मनपाच्या नावावर करण्याबाबत कार्यवाही होईल. झालेले अतिक्रमण काढण्याची कार्यवाही होईल.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** इतिवृत्तातील पान क्र. ११ वर गुरु रामदासनगर येथील एका इमातीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केल्यानुसार सदरची संचिका गहाळ झालेली ती संचिका व इतर सविस्तर माहितीचा अहवाल या सभागृहात ठेवण्याचे रुलींग आपण दिलेले आहे. तसा अहवाल प्रशासनाने दिलेला आहे का? माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती** : गुरु रामदासनगर येथील इमारतीच्या संदर्भात अहवाल ठेवणार होते. खुलासा करावा.

**उपसंचालक नगररचना :** गुरु रामदासनगर येथील इमारतीच्या बांधकामासंदर्भात संबंधित मालकास महानगरपालिकेने परवानगी दिली का व आवश्यक कागदपत्रे दाखल करण्यास पत्र पाठविले असता ते घेतले नाही. आपणाकडे संचिका आढळुन आली नाही.

**मा. आयुक्त** : संबंधित मालक नोटीस घेत नसेल तर, रितसर पंचनामा करुन नोटीस डकवण्यात यावी. एक आठवडयात कागदपा दाखल केली नाही तर पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

**मा.सभापती** : ठिक आहे. आताच मा. आयुक्तांनी खुलासा केल्याप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** मनपाची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही असे सांगितले जाते. तर दुसऱ्या बाजुने असे निर्दशनास येते की, मनपास उत्पन्न मिळत नसतांना स. न. ५४ मधील मनपाच्या लिजवरच्या जागेवर काही लोकांनी कब्जा करुन जागा २५०, २६० रु. भाडेतत्वार ४०,००० ते ५०,००० चौ. फुट जागा दिलेली आहे. २५ हजार रुपयांचे विकास कामे करण्याची संचिका तीन वेळेस खाली येऊन सुध्दा मंजुर होत नाही. मनपास या जागेपासुन उत्पन्न मिळत नसुन नुसता एन. ए. मनपा भरते. हे बरोबर होणार नाही. यापुर्वी या जागेच्या संदर्भात मनपाने ४० लाख रुपये अकृषी सारा भरलेला आहे आणि १०-१२ लाख उत्पन्न सुध्दा मिळालेले नाही. करीता मा. जिल्हाधिकारी यांना मनपाकडुन एक पत्र पाठवुन कळवावे की, या जागेचे मनपास उत्पन्न मिळत नाही व मनपाची आर्थिक परिस्थिती सध्या बरोबर नाही. मनपा एन. ए. भरु शकत नाही.

**मा. सभापती** : सं. न. ५४ मधील मनपाच्या जागेवर काही भाडेकरुंनी अतिक्रमण केले व मनपाने त्या जागेचा ४० लक्ष रुपये एन. ए. भरलेला आहे असे स. सदस्य यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. सविस्तर खुलासा द्यावा.

**मा. आयुक्त** : हा प्रश्न सर्वसाधारण सभेचा होतो. मी जे बोलतो त्यासंबंधी शंका घेऊ नये. मनपाच्या बऱ्याच जागा १००/- रु. भाडेपट्टयाने दिलेल्या आहेत. परंतु ज्या मालमत्ता भाडेपट्टयावर दिल्या त्या संबंधीचे भाडे किती आकारावे याबाबत शासनाने स्पष्ट आदेश दिलेले आहेत. कोटयावधी किंमतीची जमीन मनपाने ९४/-, १००/- रु. ने लिजवर दिलेल्या आहेत. मी या घटकेला कायद्याप्रमाणे भाडे बसवावे लागेल.

**मा. सभापती** : मागील वेळसे संबंधित भाडेधारकांना नोटसी देवुन कागदपत्रांची मागणी केलेली होती. ८ दिवसांची मुदत दिली होती. तर नोटीस दिल्यानंतर त्यांचेकडुन काही कागदपत्रे आली का? त्याचा खुलासा द्यावा. दिले नसेल तर, प्रशासनाने काय कार्यवाही केली खुलासा द्यावा व पुढील बैठकीत सविस्तर अहवाल सादर करावा.

**मा. आयुक्त** : लीज पध्दतीने देण्यात आलेल्या जागेच्या संदर्भात कायद्यानुसार किती भाडेपट्टा आकारणी करता येईल याची तपासणी करुन ठोस निर्णय घ्यावा लागेल. जेणे करुन मनपाचे उत्पन्न वाढेल.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** ज्या सामाजीक संस्था, स्वयंसेवी संस्था आहेत. अशा संस्थेस लीजवर कमी दराने दिल्यास सभागृह मान्य करु शकेल. परंतु सदर

जागेवर उघडपणे संबंधित लोक व्यवसाय करीत आहेत. त्यांना उत्पन्न मिळते व त्या उत्पन्नाच्या दृष्टीने किती भाडेपट्टा आकारणी करावयास पाहिजे याचा आजपर्यंत का विचार करण्यात आलेला नाही. नगरपरिषदेच्या काळात जागा लिजवर दिलेली आहे. नगर परिषदेकडुन मनपाकडे जागा आली मनपा होऊन १८ ते २० वर्ष होत आहेत. अद्याप का कार्यवाही होऊ शकली नाही. ४० लक्ष रुपये एन. ए. मनपाने संबंधित विभागाकडे भरणा केला. तेवढे उत्पन्न मनपास मिळाले नाही.

**मा. आयुक्त** : पुढील बैठकीत संबंधित अधिकारी हे सविस्तर माहिती देतील.

**श्री. किशोर तुळशीबागवाले** : पुढील बैठकीत अधिकारी उपस्थित राहणार नाही. ही नेहमीचीच पध्दत अधिकाऱ्यांनी सुरु केली. अगोदरच्या बैठकीत माहिती विचारल्यास पुढील बैठकीत देण्यात येईल असे सांगितले जाते. परंतु ते अधिकारी त्या बैठकीस उपस्थित नसतात, असे मत असेल तर, या सभेला अर्थ नाही.

**मा.आयुक्त** : एकदा करारनामा (ॲग्रीमेंट) झाला तर तो दोघांना बंधनकारक असतो. संबंधित भाडेपट्टा धारकांना पत्र देऊन नियमानुसार सुधारीत दराप्रमाणे भाडे भरणा करण्यासाठी संबंधितास नोटीस द्यावी लागणार आहे. अन्यथा या जागेची आम्हास गरज आहे म्हणुन नोटसी द्यावी लागेल. याबाबत कायदेशीर मत घ्यावे लागेल.

**श्री. जयवंत ओक** : लिजवर देण्यात आलेल्या जागा व त्या जागेवर कुणी व्यवसाय करत असेल तर, त्यांना कमी दराने देणे योग्य नाही. ज्या प्रमाणात जागा लिजवर दिलेल्या आहेत. केव्हा दिली याची सविस्तर माहिती पुढील बैठकीत ठेवावी. या सभागृहाचे १६ सदस्यांना देण्यात यावी.

**मा. सभापती** : शहरात मनपाने अशा किती जागा लिजवर दिलेल्या आहेत. जागेचे ठिकाण जागा किती, केव्हा दिली, कोणत्या प्रभागात येते. याचा सविस्तर अहवाल पुढील बैठकीत द्यावा. त्या अहवालाच्या प्रती सर्व स्थायी समिती सदस्यांना देण्यात याव्यात.

**मा. आयुक्त** : सामाजिक संस्थांना लिजवर जागा देतांना त्या संदर्भाने सुध्दा जे निकष आहेत ते पहावे लागेल.

**मा. सभापती** : मनपाच्या ज्याही मालमत्ता लिजवर दिलेल्या आहेत त्या मालमत्तेचे नांव किती वर्षासाठी दिलेल्या आहेत, दर आकारणी किती करण्यात येते. याची सविस्तर माहिती १६ सदस्यांना देण्यात यावी. तसेच या मालमत्तेसंबंधी वेळोवेळी सभागृहात चर्चा झाल्यानुसार व संबंधितांना शेवटची नोटीस दिल्यानंतर प्रशासनामार्फत काय कार्यवाही करण्यात आली याची सविस्तर माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी मा. आयुक्तांच्या निर्देशनास आणुन द्यावी.

**डॉ. आशा बिनवडे** : प्रत्येक बैठकीत एकाच विषयावर वारंवार चर्चा करावी लागते. चर्चेअंती निर्णय होतात. अधिकारी उत्तरे देतात. मा. सभापती उत्तरे-सुचना देतात. तरी सुध्दा काहीच कार्यवाही होत नाही. तीन-चार बैठकीपासुन औषधी व साहित्य खरेदी बाबतच्या विषयावर चर्चा होत आहे. मागील सभेत सविस्तर माहिती दोन दिवसात देण्यात येईल असे संबंधित अधिकाऱ्यांनी पान क्र. ५ वर खुलासा केलेला आहे. आता बैठक होऊन १५ दिवसाचा कालावधी गेला. अद्याप माहिती देण्यात आलेली नाही व संबंधित आ. वै. अधिकारी आजच्या बैठकीला सुध्दा उपस्थित नाहीत. यावरुन सभागृहाची दिशाभुल होते असा

संशय निर्माण होते. मा. आयुक्तांना विनंती करण्यात येते की, कृपया माहिती द्यावी.

**मा.आयुक्त** : आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी माहिती दोन दिवसात का दिली नाही यासंबंधी त्यांची लेखी खुलासा देण्यात येईल.

**डॉ. आशा बिनवडे :** गेल्या वर्षभरात १८ लाखांची कोणती औषधी खरेदी केली इतिवृत्त पान क्र. ५ वर दिलेले आहे. साहित्य कोणते खरेदी केले. त्यांचे दर काय आहेत. त्यासंबंधीची माहिती सभागृहापुढे आणु इच्छित नाहीत संबंधित अधिकारी सभागृहाची करत आहेत. असे होत असेल तर, सभा घेऊन काही अर्थ राहणार नाही.

**मा. सभापती** : जाहीरात काढल्यानंतर बऱ्याच वेळा लेखा विभागाला माहिती नसते. म्हणुन औषधी व साहित्य खरेदीचे सर्व निविदांची कामे लेखा विभागामार्फत करावे. जसे इतर विभागांची कार्यवाही केली जाते. त्याप्रमाणे आरोग्य विभागाची सुध्दा कार्यवाही व्हावी.

**डॉ. आशा बिनवडे :** आयुवैदिक, होमोओपॅथीचे डॉक्टर्स ऑलोपॅथीची प्रॅक्टीस करतात, यासंबंधी सुध्दा मुद्दा या सभागृहात उपस्थित केलेला होता.

**मा. सभापती** : आयुवैदिक डॉक्टरांना वेगळी प्रॅक्टीस करावयास संबंधित अधिकाऱ्यांनी सुचविले. हा गुन्हा होऊ शकतो. यासंबंधी मी काही डॉक्टरांशी चर्चा सुध्दा केली. मनपाकडे आयुवैदिक दवाखाना नाही. संबंधित अधिकारी त्याच क्षेत्रातील आहेत. विषय त्यांना माहित आहे. दुसऱ्या पॅथीची प्रॅक्टीस करणे गुन्हा आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** आयुवैदिक पदवीधर डॉक्टरांना त्यांचे पदवीनुसार पद दिले जाते व प्रॅक्टीस ॲलोपॅथीची करावयास लावणे हा गुन्हा होऊ शकतो. जेव्हा पासुन त्यांना नियुक्ती दिली तेव्हापासुन प्रॅक्टीस करतात आणि या डॉक्टरांसाठी तसे काही आरक्षण ठेवलेले असेल तर, शासनाच्या पत्राची एक प्रत आम्हाला देण्यात यावी आरक्षण ठेवणे व ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करावयास लावणे या दोन गोष्टी वेगळया आहेत. त्यांना जी पदे दिली त्याच पॅथीची प्रॅक्टीस करावयास लावणे आवश्यक होते. दुसऱ्या पॅथीची प्रॅक्टीस करावयास लावणे हा गुन्हा असून, विभाग प्रमुखांना याची जाणीव असून, सुध्दा ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करायला लावतात.

**मा.आयुक्त** : आपल्याकडे त्या पदाची आवश्यकता नसेल तर, कामावरुन कमी करावे लागेल.

**डॉ. आशा बिनवडे :** विभाग प्रमुख यांना सर्व माहिती असतांना त्यांनी ॲलोपॅथीची प्रॅक्टीस का करावयास लावली. दुसरे असे की, टेंडर संदर्भात सुध्दा आपण चर्चा केलेली होती. चुकीचे टेंडर काढले त्याबाबतीत प्रशासनाने काय कार्यवाही केली.

**मा.आयुक्त** : यावर्षा शासन ज्या पध्दतीने निविदा काढते त्याच धर्तीवर आपण करणार आहोत.

**डॉ. आशा बिनवडे :** मागील बैठकीत मुख्य लेखाधिकारी यांनी असा खुलासा केला होता की, चार वर्षापुर्वी एक कमीटी नेमण्यात आलेली होती. त्या कमीटीचा अहवाल घेऊन त्यानुसारच हे टेंडर काढलेले होते. त्या कमीटीचा अहवाल काम होता तो यावेळी सादर करायच्या सुचना केलेल्या होत्या. तशी इतिवृत्तांत नोंद

झालेली आहे. तो अहवाल केव्हा सादर करणार आहेत. माहिती देण्यात यावी.

**मुख्य लेखाधिकारी :** सन १९९६ चार सदस्यांची कमीटी तयार केली होती. त्यामध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी मा. आयुक्त तसेच घाटी दवाखान्याचे अधिष्ठता (डीन) व डॉ. तालीफ हे या कमीटीत होते, असा मी उल्लेख केलेला होता. चालु वर्षा काय करणार ते बोललो होतो.

**डॉ. आशा बिनवडे :** सर्व अहवाल सभागृहापुढे सादर करावा. आपण अहवालाबद्दल बोलले होते. १९९६ ला जी कमीटी गठीत केलेली होती. या कमीटीने सादर केलेल्या चार वर्षापुर्वीच्या अहवालाची माहिती सभागृहासमोर ठेवावी. असा मागील बैठकीत झालेल्या चर्चचा उद्देश होता. तो अहवाल ठेवावा. त्यानुसार आपणास पुढील कार्यवाही योग्य पध्दतीने हाताळता येईल. मागील बैठकीत त्या अहवालानुसार ही कार्यवाही होत असल्याचे मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा केलेला होता.

**मा. सभापती** : अधिकारी सांगतात ३ दिवसात अहवाल सादर करण्यात येईल. परंतु सभागृहासमोर तसा काही अहवाल प्राप्त झालेला नसुन संबंधित अधिकारी अहवाल सादर करण्यास टाळाटाळ करीत असतील तर मा. आयुक्त यांनी त्यांचेवर कार्यवाही करावी. यानंतर औषधी व साहित्य खरेदीचे टेंडर या सभागृहात येणार आहे. त्या टेंडर बरोबर सर्व माहिती आपल्यासमोर सादर हेईल. त्या प्रस्तावास मान्यता द्यायची की नाही यावर सभागृहा निर्णय घेईल. चार वर्षापुर्वा गठीत केलेल्या कमीटीचा अहवाल सुध्दा देण्यात यावा. इतिवृत्तातील पान क्र. ६ वर आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा केल्याप्रमाणे जी १८ लाखांची औषधी खरेदी केलेली आहे. त्यासंबंधी माहिती सुध्दा देण्यात यावी.

**डॉ. आशा बिनवडे :** चार वर्षापुर्वी गठीत केलेल्या कमीटीचा अहवाल सादर करावा. औषधी व साहित्य खरेदीसाठी नवीन तज्ज्ञ लोकांची कमीटी स्थापन करावी.

**मा. आयुक्त** : आपण शिफारस करावी. त्यानुसार नवीन कमीटी नियुक्त करण्याबाबत कार्यवाही होईल. संबंधित अधिकारी सेवानिवृत्त होणार आहेत. यानंतर चांगले नेमावे.

**मा. सभापती** : औषधी व साहित्य खरेदीचे अधिकार या विभागातुन काढुन लेखा विभागाकडे कार्यवाहीसाठी पाठवितात. आरोग्य विभागाकडुन टेंडर काढल्यानंतर लेखा विभागात माहिती सुध्दा नसते. आताच मा. आयुक्तांनी सांगितल्याप्रमाणे नवीन तज्ज्ञ लोकांची कमीटी नेमण्याबाबत कार्यवाही करावी.

**ठराव :**

दिनांक २५-१०-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४९/२ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र, फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेसाठी आवश्यक असणारी तुरटी वर्ष २००१-०२ साठी खरेदीचा प्रस्ताव रु. १५,४०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त महोदय ांनी

दिनांक ०८-१०-२००१ रोजी मान्यता प्रदान केली आहे व प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्यास शिफारस केली आहे.

सदरील प्रस्तावाचा खर्च हा सन २००१-२००२ या आर्थिक वर्षा अंतर्गत रसायने खरेदी (केमीकल परचेस) या लेखा शिर्षका अंतर्गत करण्यात येईल. तरी रक्कम रु. १५,४०,०००.०० च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव स्थायी समिती समोर सादर.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र, फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेसाठी आवश्यक असणारी तुरटी वर्ष २००१-०२ साठी खरेदी करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १५,४०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०/३ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांना दर वर्षाप्रमाणे याही वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत सन २००१-२००२ साठी तयार गणवेश देणे आहे. यास्तव खालील वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली.

| | |
|---|---|
| १. | दै. लोकमत, औरंगाबाद |
| २. | दै. सामना, औरंगाबाद |
| ३. | दै. सकाळ, औरंगाबाद |
| ४. | दे. महाराष्ट्र टाईम्स, मुंबई |

एकुण २० निविदा विक्री झाल्यापैकी १३ निविदा लेखा विभागात प्राप्त झाल्या. यापैकी ५ निविदा कागदपत्राच्या अभावी उघडण्यात आलेल्या नाहीत. उर्वरीत एकुण ८ निविदा खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १. | रवि ड्रेसेस, लातुर |
| २. | बासुटकर ड्रेसेस, सोलापुर |
| ३. | एम. एस. एस. आय. डी. सी. औरंगाबाद |
| ४. | वासवाळी ड्रेसेस पुणे |
| ५. | अरुदीप लेडीज पॅराडाईज, औरंगाबाद |
| ६. | शुभम इंडस्ट्रीज, पैठण |
| ७. | सिध्दी विनायक महिला, येवला |
| ८. | महिला आर्थिक विकास महामंडळ, औरंगाबाद |

वरील निविदा धारकांनी दिलेल्या दरानुसार प्राप्त दरचा तक्ता जोडण्यात आला असून, अधोरेखीत केलेले दर हे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दर आहेत. वेगवेगळया साहित्यात एकुण चार निविदा धारकांचे आहेत, ते खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| १. | रवि ड्रेसेस, लातुर - एकुण तीन बाबी |
| २. | बासुटकर ड्रेसेस, सोलापुर - एकुण अठरा बाबी |
| ३. | एम. एस. एस. आय. डी. सी. औरंगाबाद - एकुण आठ बाबी |
| ४. | वासवाणी ड्रेसेस पुणे - एकुण सहा बाबी |

मा. आयुक्त यांनी तजविजा दिनांक १६-०८-२००१ नुसार वरील चार ही निविदा धारकांनी दिलेले कपडांचे नमुने केंद्रीय कपास औद्योगिक अनुसंधान संस्थान, माटुंगा मुंबई याप्रयोग शाळेत तपासणीसाठी पाठविण्यत आले. त्यानुसार संबंधिताचे पत्र क्रमांक के. क्र. प्रा. अ. सं./परिक्षण कक्ष/१७९/दि. ०६-०९-२००१ अनुसार या कार्यालयास परिक्षण अहवाल प्राप्त झाला. सदरील अहवालानुसार वरील चार पैकी तिघा निविदा धारकांचे नमुने हे दिलेल्या विवरणानुसार नसल्याने फेटाळण्यात आले. मे. बासुटकर ड्रेसेस, सोलापुर व महिला आर्थिक विकास महामंडळ यांना मा. आयुक्त याची तजवीज दि. ०७-०९-२००१ नुसार अनुक्रमे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दरात काम करण्यास कळविण्या आले. सदरील पत्राचे उत्तरी संबंधितांनी खालील प्रमाणे कळविले.

१) बासुटकर ड्रेसेस, सोलापुर - यांनी त्यांचे पत्र दि.
११-०९-२००१ नुसार खालील प्रमाणे एकुण १५ बाबी मध्ये त्यांचे दर दिले.

| | **साहित्य मुलांसाठी खाकी रंगाची हाफ पँट** | **दिलेले दर (रु.)** | **तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दर** |
|---|---|---|---|
| १. | वयोगट ५ ते ६ वर्षे | १८.१५ | १७.०० |
| २. | वयोगट ६ ते ७ वर्षे | १९.२५ | १७.९० |
| ३. | वयोगट ७ ते ८ वर्षे | २०.५० | १९.९० |
| ४. | वयोगट ९ ते ९ वर्षे | २२.५० | २१.९० |

| | **साहित्य मुलांसाठी पांढरा हॉफ शर्ट** | **दिलेले दर (रु.)** | **तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दर** |
|---|---|---|---|
| | १) वयोगट ५ ते ६ वर्षे<br>मुलींसाठी निळा स्कर्ट | १८.१५ | १७.५० |
| १. | वयोगट ८ ते ९ वर्षे | ३८.२५ | ३६.४० |
| २. | वयोगट ९ ते १० वर्षे | ४१.०० | ३७.७० |
| ३. | वयोगट ५ ते ६ वर्षे<br>(पिनी फ्रॉक) मुलींसाठी पांढरे ब्लाऊज | ४९.०० | ४५.०० |
| १) | वयोगट ५ ते ६ वर्षे<br>मुलींसाठी निळया रंगाचा सलावार | १८.५० | १७.५० |
| १) | वयोगट ३० ते ११ वर्षे | ५८.२५ | ४५.०० |
| २) | वयोगट ११ ते १२ वर्षे | ६१.९० | ५०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | वयोगट १२ ते १३ वर्षे मुलींसाठी पांढरा पंजाबी शर्ट | ६४.९५ | ५५.०० |
| १) | वयोगट १० ते ११ वर्षे | ५६.०० | ४६.०० |
| २) | वयोगट ११ ते १२ वर्षे | ५८.०० | ५१.०० |
| ३) | वयोगट १२ ते १३ वर्षे | ६१.०० | ५६.०० |

२) महिला आर्थिक विकास महामंडळ : यांना कामधेनु योजने अंतर्गत ५०% काम देण्या संदर्भाने तुलनात्मकदृष्ट्या कमी दरात काम करण्यास कळविण्यात आले असता, त्यांनी मान्य दरात १०% वाढ करुन देण्याची विनंती केली.

वरील प्राप्त पत्रानुसार मा. आयुक्त यांची तजविज दि. १३-०९-२००१ अन्वये पाच ही निविदा धारकांना प्रत्यक्ष चर्चेसाठी बोलविले असता दि. २५-०९-२००१ रोजी झालेल्या चर्चेत मे. बासुटकर ड्रेसेस, सोलापुर यांना तुलनात्मकदृष्ट्या कमी दरात पुरवठा करणे बाबत विचारणा केली असता संबंधिताने नकार दिला त्यामुळे प्राप्त कमी दर व मे. बासुटकर यांनी दिलेले वरील दर यातील. तफावर पाहता महानगरपालिकेस जवळपास रु. २ लक्षऐवढी जास्तीची झळ सोसावी लागेल यामुळे सदरील जास्तीच्या खर्चात कमी दर देण्यास मे. बासुटकर यांना विचारणा केली असता त्यांनी खालील प्रमाणे दर कमी करुन काम करण्यास तयारी दर्शविली आहे.

| | **साहित्य** | **दिलेले दर (रु.) दि. ११-०९-२००१** | **दि. २५-०९-२००१ चे चर्च अंती दिलेले दर** |
|---|---|---|---|
| | मुलांसाठी खाकी रंगाची हाफ पँट | | |
| १. | वयोगट ५ ते ६ वर्षे | १०.१५ | १७.८५ |
| २. | वयोगट ६ ते ७ वर्षे | १९.२५ | १८.९० |
| ३. | वयोगट ७ ते ८ वर्षे | २०.५० | २०.३५ |
| ४. | वयोगट २२ ते ९ वर्षे | २२.५० | २२.३५ |

फुलांसाठी पांढरा हाफ शर्ट

१) वयोगट ५ ते ६ वर्षे १८.५० १८.००

| | **साहित्य** | **दिलेले दर (रु.) दि. ११-०६-२००१** | **दिलेले दर (रु.) दि. २५-०९-२००१** |
|---|---|---|---|
| | मुलींसाठी नळ स्कर्ट | | |
| १. | वयोगट ८ ते ९ वर्षे | ३८.२५ | ३८.४५ |
| २. | वयोगट ९ ते १० वर्षे | ४१.०० | ३९.५५ |
| ३. | वयोगट ५ ते ६ वर्षे (पिनो फ्रॉक) मुलींसाठी पांढरे ब्लाऊज | ४९.०० | ४७.४५ |
| ४. | वयोगट ५ ते ६ वर्षे मुलींसाठी निळया रंगाचा सलावार | १०.५० | १८.०५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १) | वयोगट १० ते ११ वर्षे | ५८.२५ | ५४.९० |
| २) | वयोगट ११ ते १२ वर्षे | ६१.९० | ५८.९० |
| ३) | वयोगट १२ ते १३ वर्षे<br>मुलींसाठी पांढरा पंजाबी सुट | ६४.९५ | ६२.४५ |
| १) | वयोगट १० ते ११ वर्षे | ५६.०० | ५३.५० |
| २) | वयोगट ११ ते १२ वर्षे | ५८.०० | ५६.२५ |
| ३) | वयोगट १२ ते १३ वर्षे | ६१.०० | ५९.७५ |

वरील प्रमाणे मे. बासुटकर ड्रेसेस, सोलापुर यांनी दिलेले दर प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून, मे. महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी मागणी केल्यानुसार १०% वाढ देणे बाबतची विनंती फेटाळण्यात येऊन त्यांना मान्य दरानुसार ५०% काम देण्याची प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार व वयोगटानुसार घ्यावयाच्या गणवेशाचा तपशील नोंदविण्यत आला आहे. शिक्षण विभाग व प्रकल्प विभाग यांनी दिलेल्या विद्यार्थ्यांच्या संस्थेनुसार बालवाडी ते ५ वीच्या विद्यार्थ्यांना हाफ पँट व हाफ शर्ट तर ६ वी व ७ वीच्या विद्यार्थ्यांना फुल पँट व हाफ शर्ट तर बालवाडीच्या विद्यार्थ्यांना पिनो फ्रॉक तसेच १ ली ते ३ रीच्या विद्यार्थ्यांनींना स्कर्ट ब्लाउज व ४ थी व ७ वीच्या विद्यार्थीनींना सलवार कमीज अशी निवड केलेली आहे. त्यानुसार एकुण खर्च रु. १८,८८,१८७/- इतका प्रस्तावित करण्या येत असून, दर्शविलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येतुन गतवर्षीच्या शिल्लक १५५२ गणवेश वजा करण्यात आले आहेत.

त्यानुसार ५०% काम मे बासुटकर ड्रेसेस, सेलापुरा व मे. महिला आर्थिक विकास महामंडळ औरंगाबाद यांना ५०% काम देणेबाबत, डॉ. बाबसाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजना अंतर्गत पुरवावयाच्या गणवेश खरेदीचा प्रस्ताव विचारार्थ सादर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | साहित्याचा तपशील | वयोगट वर्ष | दर (रु.) | नग | खर्च (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| **अ) मुलांसाठी खाकी रंगाची हाफ पँट** | | | | | |
| १) | बालवाडी | ५ ते ६ | १७.८५ | २३९७ | ४२७८६ |
| २) | इयत्ता १ ली | ६ ते ७ | १८.९० | २२६४ | ४२७९० |
| ३) | इयत्ता २ री | ७ ते ८ | २०.३५ | २१०९ | ४२९१८ |
| ४) | इयत्ता ३ री | ८ ते ९ | २२.३५ | १९९२ | ४४५२१ |
| ५) | इयत्ता ४ थी | ९ ते १० | २३.२० | १८२० | ४२२२४ |
| ६) | इयत्ता ५ वी | १० ते ११ | २४.९० | १६८६ | ४१९८१ |
| **मुलांसाठी खाकी रंगाची फुलपँट** | | | | | |
| ७) | इयत्ता ६ वी | ११ ते १२ | ६८.९५ | १३८३ | ९५३५८ |
| ८) | इयत्ता ७ वी | १२ ते १४ | ७२.६१ | ९८० | ७११५८ |
| **ब) मुलांसाठी पांढरा रंगाचा हाफ शर्ट** | | | | | |
| १) | बालवाडी | ५ ते ६ | १८.०० | २३९७ | ४३१४६ |
| २) | इयत्ता १ ली | ६ ते ७ | १९.९५ | २२६४ | ४५१६७ |
| ३) | इयत्ता २ री | ७ ते ८ | २१.०० | २१०९ | ४४२८९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४) | इयत्ता ३ री | ८ ते ९ | २३.०० | १९९२ | ४५८१६ |
| ५) | इयत्ता ४ थी | ९ ते १० | २५.६५ | १८२० | ४६६८३ |
| ६) | इयत्ता ५ वी | १० ते ११ | २८.९५ | १६८६ | ४८८१० |
| ७) | इयत्ता ६ वी | ११ ते १२ | ३१.७० | १४८३ | ४७०११ |
| ८) | इयत्ता ७ वी | १२ ते १४ | ३२.६५ | ९८० | ३१९९७ |
| **क) मुलींसाठी निळा स्कर्ट** | | | | | |
| १) | इयत्ता १ ली | ६ ते ७ | ३१.०० | १४५९ | ४५२२९ |
| २) | इयत्ता २ री | ७ ते ८ | ३३.६५ | १८६४ | ६२६२४ |
| ३) | इयत्ता ३ री | ८ ते ९ | ३७.४५ | १८७८ | ७०३३१ |
| **ड) मुलींसाठी पांढरे ब्लाऊज** | | | | | |
| १) | इयत्ता १ ली | ६ ते ७ | २०.५० | १४५९ | २९९१० |
| २) | इयत्ता २ री | ७ ते ८ | २२.६५ | १८६४ | ४२२२० |
| ३) | इयत्ता ३ री | ८ ते ९ | २४.८५ | १८७८ | ४६६६८ |
| इ) | पिनो फ्रॉक | ५ ते ६ | ४७.४५ | २३०४ | १०९३२५ |
| **इ) मुलींसाठी निळा सलवार** | | | | | |
| १) | इयत्ता ४ थी/५वी | ९ ते ११ | ५४.९० | ३८४८ | २११२५५ |
| २) | इयत्ता ६ वी | ११ ते १२ | ५८.९० | १३९० | ८१८७१ |
| ३) | इयत्ता ७ वी | १२ ते १३ | ६२.४५ | १०४७ | ६५३८५ |
| **फ) मुलींसाठी पांढरा पंजाबी शर्ट** | | | | | |
| १) | इयत्ता ४ थी/५वी | ९ ते ११ | ५३.५० | ३८४८ | २०५८६८ |
| २) | इयत्ता ६ वी | ११ ते १२ | ५६.२५ | १३९० | ७८१८८ |
| ३) | इयत्ता ७ वी | १२ ते १३ | ५९.७५ | १०४७ | ६२५५८ |
| | **एकुण** | | | | **१८८८१८७** |

उपरोक्त नुसार या योजनेअंतर्गत एकुण खर्च रु. १८,८८,१८७ इतका येणार आहे. या योजनेअंतर्गत एकुण ३५ लाखाची अंदाजपत्रकीय तरतुद करण्यात आली आहे.

करीता उपरोक्त तरतुदीच्या अधीन राहुन वस्तुनिष्ठ विद्यार्थी संख्येच्या आधारे मे. बासुटकर ड्रेसेस, सोलापुर व महिला आर्थिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांना प्रत्येकी ५०% पुरवठा आदेश देण्याचा व रक्कम रु. १८,८८,१८७/- इतका खर्चाचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. किशोर शिंदे :** शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वेळेवर दिला नाही. प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर प्रशासनाने ताबडतोब कार्यवाही करावी. उशीर होऊ देऊ नये.

**मा.आयुक्त** : असे प्रस्ताव हे मर्यादीत तारखेपर्यंत मंजुर होऊन कार्यवाही होणे गरजेचे आहे. तीन महिन्या पुर्वीपासुन कार्यवाही सुरु केल्यास वेळेवर गणवेश वाटप होऊ शकतील.

**मा. सभापती** : मा. आयुक्त यांनी चांगला मुद्दा मांडला आहे. जे प्रस्ताव मर्यादीत स्वरुपाचे असतात. उदा. शालेय गणवेश वाटप हे १५ ऑगस्टपुर्वी व्हावयास पाहिजे. अशा प्रस्तावावर तीन महिन्यापुर्वीच कार्यवाही सुरु केल्यास वेळेवर सर्व कार्यवाही होईल असे मत मा. आयुक्तांनी व्यक्त केलेले आहे. याबाबत स्थायी समिती निर्णय घेईल परंतु प्रशासनाने सुध्दा वेळेवर कार्यवाही सुरु केली पाहीजे.

**मुख्यलेखाधिकारी :** ६ शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटप संदर्भाची सदर संचिकेवर वेळेवर जे की, तीन महिन्यापुर्वीच कार्यवाही सुरु झालेली होती. दिनांक २३-०५-२००१ रोजी निविदा काढण्यात येऊन १४-०६-२००१ रोजी निविदा स्विकारल्या २२-०६-२००१ रोजी निविदा उघडण्यात आल्या. २८-०६-२००१ रोजी भरुन आलेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता करण्यात आला. १६-०८-२००१ रोजी तुलनात्मक तक्ता तपासणीसाठी पाठविण्यात आलेला होता. मध्यंतरीच्या काळात प्रभारी आयुक्त कार्यरत होते. त्यानंतर नवीन आयुक्त यांसमोर ७ सप्टेंबरला सविस्तर अहवाल सादर करण्यात येऊन मान्यता घेण्यात आली व १३ सप्टेंबरला पुरवठा धारकांना बोलविण्यात आले होते. २९-०९-२००१ ला मा. आयुक्तांनी मंजुरी व ०६-१०-२००१ ला स्थायी समितीकडे पाठविले. या संदर्भात तीन महिन्यापुर्वीच मे-२००१ पासुनच प्रोसीजर सुरु झालेली होती.

**मा. आयुक्त** : पुढील वर्षी शालेय विद्यार्थ्यांना वेळेवर गणवेश वाटप होईल तशी कार्यवाही अगोदरच तीन महिन्या पुर्वीपासुन सुरु करण्यात येईल.

**श्री. सलीम पटेल :** या बैठकीत लाईट खरेदी बाबतचे टेंडरचा प्रस्ताव झालेला आहे. हा प्रसताव सुध्दा येण्यास उशीर झालेला असून, ८ महिन्याचा कालावधी निघुन गेलेला आहे. अगोदरच का कार्यवाही होत नाही. लाईटबाबत सुध्दा बजेट मंजुर झाल्यानंतर लगेच कार्यवाही सुरु केली पाहिजे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गणवेशची संस्था व शाळेतील हजेरी पटावरील उपस्थित संख्या बरोबर आहे काय? सद्यःस्थितीत शाळेत उपस्थित मुलांची संख्या किती याची माहिती घेतलेली आहे का?

**मुख्यलेखाधिकारी :** विषय पत्रिकेवर पृष्ठ क्र. ५ वर मुलांची/मुलींची संख्या किती? याबाबत तक्ता दाखविण्यात आलेला आहे.

**श्री. सलीम पटेल :** प्रस्तावात दाखविलेली संख्या चुकीची वाटते. शाळेमध्ये ३०० मुलांची उपस्थित दाखविण्यात येते. परंतु प्रत्यक्षात त्या शाळेत १४० मुलेच असतात. संबंधित एजन्सीज मुख्याध्यापकांशी संगनमत करुन जास्तीची नांवे टाकुन उपस्थित दाखविली जाते काय. या गणवेशामध्ये अफरातफर करतात अशी शंका येते. माहिती विचारली असता दुसऱ्याच विद्यार्थ्याचे नांव व तारखा दाखविल्या जाते. ज्या विद्यार्थ्याची उपस्थिती ८०% असलेल्यानाच गणवेश द्यावे. सध्याच्या परिस्थितीत शाळेत मुले किती, सदर मुले किती टक्के उपस्थित असतात याचा सविस्तर सर्व करुन पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

**मा. आयुक्त** : मुख्याध्यापक असे करणार नाहीत मुख्याध्यापकांनी चुकीचा रेकॉर्ड देऊन जास्तीची नांवे दाखविण्यात येत असतील तर, संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. ज्या विद्यार्थ्यांची उपस्थित मागील ३ महिन्यांनी सरासरी ८०% पेक्षा कमी असेल त्यांना गणवेश देवु नये.

**श्री. सलीम पटेल :** मागील उपस्थिती दाखवुन गणवेश वाटप केले जातात.

**मा. आयुक्त :** ज्याची मागील ३ महिन्याची उपस्थिती लक्षात घेऊनच कार्यवाही करण्यात येईल. बोगस नांवे दिसुन आल्यास त्यात मुख्याध्यापक व शिक्षणाधिकारी हे दोघेही दोषी ठरतील.

**श्री. जयवंत ओक :** प्रयोगशाळेमध्ये तपासणी करुन आलेलेच (कपडे) गणवेश विद्यार्थ्यांना देणार आहोत का? नसता पुन्हा काही दोष आढळुन झाल्यास काय कार्यवाही करणार आहोत?

**मा. आयुक्त :** ज्या कपडयाच्या सॅम्पलला आपण मान्यता दिली तोच कपडा संबंधित एजन्सी देईल. यात काही दोष आढळुन आल्यास संबंधित एजन्सीवर फॉजदारी (४२०) चा गुन्हा दाखल करुन पुढील कार्यवाही केली जाईल. संबंधित एजन्सी असे करु शकत नाही.

**श्री. सलीम पटेल :** शाळेतील उपस्थित मुलांचा अगोदर सर्व्हे करावा. नंतरच ही कार्यवाही सुरु करावी.

**डॉ. आशा बिनवडे :** माझ्यावार्डात मनपाच्या दोन शाळा आहेत. लहान मुलांना सुध्दा मोठया आकाराचा गणवेश असावा वयोगटानुसार गणवेश द्यावेत. शाळेत तसा सर्व्हे करण्यात यावा.

**मुख्यलेखाधिकारी :** वयोगटानुसार आपण गणवेश देत आहोत. वयोगटानुसार जे नंबर असतात त्यापेक्षा १ नंबर वाढवुन गणवेश खरेदी करणार आहोत.

**मा. सभापती :** उदा. ५ वी वर्गात शिक्षण घेत असलेला विद्यार्थी यांना ८ नंबर गणवेश लागत असेल तर, यापुढील त्याच वर्गातील मुलांसाठी ८, ९, १० असा नंबरचे द्यावे.

**मा. आयुक्त :** आपण सॅम्पल मागविले आहे. सर्वच शाळेत गणवेश लोकप्रतीनिधीचे हस्तेच वाटप करण्यात येईल. गणवेश जास्त मोठया साईजचे (सैल) झाल्यास पुन्हा टेलरकडे दुरुस्तीस जातात.

**श्री. सलीम पटेल :** याचप्रमाणे विद्युत साहित्याचा सुध्दा प्रस्ताव आलेला आहे. वार्डात वि्ुत साहित्य बसविल्यानंतर संबंधित वार्डातील नगरसेवकांची स्वाक्षरी घेऊनच कार्यवाही व्हावी. यात सुध्दा मोठया प्रमाणात चोरी होते.

**मा. सभापती :** या विषयावर नंतर चर्चा करावी.

**श्री. जयवंत ओक, श्री. जगदीश सिध्द :** कोणात्या शाळेच किती मुलांची उपस्थिती तसेच त्या विद्यार्थ्यांना पॅन्ट शर्ट कोणतया नंबरचे येऊ शकतात. त्याबाबतीत सर्व्हे करुन घ्यावा. त्याप्रमाणे गणवेश (संख्या) खरेदी करावे.

**मा. सभापती :** मागच्या वेळेसचा गणवेश रेडीमेड दिलेले होते.

**मा. आयुक्त :** ३ कॅटेगिरीमध्ये गणवेश मागविले तर योगय होईल असे माझे मत आहे.

**श्री. सलीम पटेल :** शाळेचा सर्व्हे करावा. उंची नुसार गणना करुन गणवेश खरेदी करावे.

**श्री. जगदीश सिध्द :** शाळेतील प्रत्येक शिक्षकाकडुन त्याचे वर्गात शिक्षण घेत असलेल्या मुलांची संख्या घ्यावी. कोणत्या उंचीच्या गटात किती विद्यार्थी येतात सर्व माहिती घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**मुख्यलेखाधिकारी :** ५ वर्षाच्या विद्यार्थ्यांना जो गणवेश लागतो तोच गणवेश ६ वर्षाच्या विद्यार्थ्यांना येतो. यात काही फरक आढळुन येत नाही. या कपडयामध्ये १ ते २% मुलांना अडचण येत असेल.

**मा. सभापती :** निविदाधारकाने दोन व्यक्ती दिले तर शाळेचा सर्व्हे करत उंचीनुसार सर्व्हेची कार्यवाही करु शकतो. शाळेमधील मुख्याध्यापकांशी चर्चा करुन

कार्यवाही होऊ शकतो. शाळेची यादी संबंधित एजन्सीजला देण्यात यावी. सर्वांना चांगला जो की, मंजुर केलेल्या क्वॉलीटीचाच कपडा येईल याची खात्री करावी. याबाबतीत प्रशासनाने दखल घ्यावी.

**मा. आयुक्त** : गणवेश कमी जास्त मापाचे झाले तर टेलरकडुन दुरुस्त करुन देवू

**मा. सभापती** : या विषयावर चर्चा चालु असतांना स. सदस्य श्री. पटेल यांनी चांगल्या पध्दतीने मुद्दा उपस्थित केलेला आहे की, ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती ही किमान ८०% असेल अशा विद्यार्थ्यांनाच गणवेश देण्यात यावेत. दुसरा मुद्दा स. सदस्या डॉ. बिनवडे यांनी उपस्थित केला की, विद्यार्थ्यांचे गणवेश कमी जास्त होतात. त्यासाठी संबंधित एजन्सीजचे त्यांचे दोन कर्मचारी देऊन प्रत्येक शाळेत जाऊन सर्वे करावा, उंचीनुसार कोणत्या नंबरचा गणवेश किती विद्यार्थ्यांना लागेल याची यादी तयार करुन घ्यावी. शालेय विद्यार्थ्यांना वेळेवर गणवेश देण्याबाबत मे-२००१ मध्ये कार्यवाही सुरु केलेली होती. मध्यंतरीच्या काळात मा. आयुक्त नव्हते. परंतु ती सुध्दा ७ ते ८ महिन्याचा कालावधी निघुन गेलेला आहे. पुढील वर्षी गणवेश खरेदीचा प्रस्तावाची ३ महिने अगोदरपासुन कार्यवाही सुरु करावी. जेणे करुन वेळेवर १५ ऑगस्ट पुर्वी शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटप होईल. तसेच काही शाळेत हजेरी पटावर ३०० विद्यार्थी असल्याची नोंद आहे व प्रत्यक्षात १४०, १५० विद्यार्थीच शाळेत असतात. असे असेल तर, मा. आयुक्त संबंधित मुख्यध्यापकावर कार्यवाही करतील. तसेच गणवेश वाटपाच्या वेळी उपस्थिती रजिष्टर समोर ठेवावे तीन महिन्यापुर्वीची उपस्थितीची सरासरी काढावी. जी शिक्षण कमीटी आहे. त्या कमीटीच्या हस्ते किंवा अधिकाऱ्यांच्या हस्ते गणवेश वाटपाची कार्यवाही व्हावी. जेणे करुन काही दोष असेल तो दिसुन येईल.

**प्रकल्प संचालक :** बालवाडीतील विद्यार्थ्यांची संख्या कमी असते. मधल्या सुटीनंतर आणखीनच उपस्थिती कमी होते.

**मा. सभापती** : सभागृहात झालेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी. पुढील वर्षी ३ महिने अगोदर पासुनच या प्रस्तावासंबंधी कार्यवाही सुरु करण्यात यावी. प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दरवर्षी प्रमाणे याही वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत सन २००१-२००१ साठी तयार गणवेशाकरीता उपरोक्त तरतुदीच्या अधिन राहुन वस्तुनिष्ठ विद्यार्थी संख्येच्या आधारे मे. बासुटकर ड्रेसेस, सोलापुर व महिला आर्थिक विकास महामंडळ औरंगाबाद यांना प्रत्येकी ५०% पुरवठा आदेश देण्याचा व रक्कम रु. १८,८८,१८७/- इतक्या खर्चाची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच महानगरपालिकेचे ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती ८०% व त्यापेक्षा जास्त असेल अशाच विद्यार्थ्यांना या योजनेचा लाक्ष देण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. सदर ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात आली.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१/४ :**

मालमत्ता अधिकारी हे मा. आयुक्त यांच्या तजविजीनुसार प्रस्ताव सादर करत आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे संत एकनाथ रंगमंदिर येथील वाहनतळ मार्च २००२ पर्यंत चालविण्यास देणे बाबतची निविदा मागविण्यात आले असता एकुण चार निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | सचिन अशोक शिंदे | रु. ८,९००/- दरमहा |
| २. | अमरसिंग जयसिंग परदेशी | रु. ६,०००/- दरमहा |
| ३. | बबनकुमार बी. चुडीवाल | रु. ५,९०३/- दरमहा |
| ४. | रमेश पन्नालाल तिवारी | रु. ५,५००/- दरमहा |

वरील चार निविदात श्री. सचिन अशोक दोंदे यांची निविदा सर्वात जास्त दराची रु. ८,९००/- दरमहा प्रमाणे प्राप्त झाली आहे. करीता निविदा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. जगदीश सिध्द :** मार्च २००२ पर्यंत ठेका देणार, चार महिन्यासाठीच ठेका देणार आहे का? संपुर्ण वर्षाचे पैसे भरुन घेणार आहे का सर्व माहिती देण्यात यावी.

**श्री. भरत लकडे :** निविदा केव्हा कसढण्यात आलेल्या आहेत. माहिती देण्यात यावी.

**मालमत्ता अधिकारी :** दिनांक ०३-०४-२००१ रोजी निविदा काढण्यात आलेली होती. एकच निविदा प्राप्त झाली म्हणुन पुन्हा २३-०८-२००१ ला निविदा मागविण्यात आलेली होती.

**श्री. सलीम पटेल :** कोणत्या वृत्तपत्रात निविदा काढण्यात आलेल्या होत्या?

**मालमत्ता अधिकारी :** दैनिक सामना तसेच शासन सम्राट या वृत्तपत्रात निविदा देण्यत आलेली होती.

**मा. सभापती :** एक महिन्यासाठी ८,९००/- येणार असून, सरासरी प्रत्येक महिन्याचे उत्पन्न काय आहे.

**मालमत्ता अधिकारी :** तुर्त माहिती देता येणार नाही.

**मा. आयुक्त :** कोणत्याही विभागाकडुन प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवल्यानंतर त्या संबंधित अधिकाऱ्यांनी पुरेपुर अभ्यास करुन यावयास पाहिजे. विभागाकडुन आलेल्या प्रस्तावावर सविस्तर माहिती देता आली पाहिजे.

**मा. सभापती :** मालमत्ता अधिकारी म्हणुन यापुर्वी श्री जरारे यांनी काम पाहिले आहे. त्यांनी खुलासा करावा.

**माजी मालमत्ता अधिकारी :** मार्च महिन्यात प्रथम निविदा काढण्यत आलेली होती. ७,२००/- चे दर आपल्याला अपेक्षित होते. कमी दराची निविदा आपल्याकडे प्राप्त झालेली होती. २ निविदाधारकांना नोटीस देवुन रु. ५०००/- जात (फोरफीट) करण्यात आले. त्यानंतरची रु. ६,९००/- दराची निविदाधारकांना ७ दिवसांची नोटीस दिली. संबंधिताने ७ दिवसात रक्कम न भरल्याने त्याची ५०००/- रुपये आपण फोरफीट करण्यात आले. सद्य:स्थितीत काय वसुली झाली याची माहिती मला नाही.

**मा. सभापती :** प्रश्न असा आहे की, एप्रील पासुन आजपर्यंत म्हणजे गेल्या सहा महिन्यापाससुन कोण चालवित होते व दर महिन्याला मनपास किती उत्पन्न झालेले आहे, याचा खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** सहा महिन्यातुन फक्त २ महिने महानगरपालिकेने चालविलेली आहे. त्या दोन महिन्यामध्ये एकुण १० हजार रुपये मनपास मिळालेले असून, गेल्या दोन महिन्याच्या अगोदर चार महिन्यापासुन बंद होते. कुणीही चालवित नव्हते.

**श्री. जयवंत ओक :** सरासरी दर महिन्याला किती उत्पन्न तेथे मिळते याचा हिशोब करुन हे टेंडर द्यावे, नसता पुन्हा जाहीरात देणार त्यासाठी ५ हजार रुपये खर्च

होईल संबंधित व्यक्ती ही रक्कम भरण्यास तयार आहे का? नसता पुन्हा मनपाचे नुकसान होईल.

**मा. आयुक्त** : संबंधित ज्यांनी टेंडर घेतले त्यांनी नमुद केलेली रक्कम भरली नाही तर, जमा केलेले रक्कमेतुन ५०००/- फोरफीट करण्यात येतील. मनपास दरमहा ५०००/- रुपये उत्पन्न सरासरी महिन्याला येत होते. यामध्ये वाढ होऊन आता आपणांस ९ हजार रुपये दरमहा मिळणार आहेत. यामध्ये मुलभुत पध्दत अशी असावी की, शासनाच्या नियमाप्रमाणे बोली करतांना ऑक्शनच्या वेळी संबंधित व्यक्तीने २५% रक्कम अगोदर भरावयास पाहिजे. जेणे करुन टेंडर घेणार काम सोडणार नाही. किंवा ५०००/- रुपये ऐवजी १००००/- रुपये बोलीच्या वेळी जमा करण्याचे निश्चित करावे. या दोन्ही पध्दतीतुन एक पध्दत ठेवावी.

**मा. सभापती** : चार महिन्यासाठी हे टेंडर आपण देणार आहोत. अपेक्षेप्रमाणे टेंडर नुसार जास्तीची रक्कम मनपास येत आहे. म्हणुन या टेंडर धारक जर पुढील वर्षाचे दरमहा रुपये प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे देण्यास तयार असेल तर तशी कार्यवाही व्हावी. नसता पुढील वर्षापासुन बोलीच्या वेळी ऑक्शन होईल त्यावेळी २५% रक्कम जमा करुन घेऊन कार्यवाही करावी. प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीचे संत एकनाथ रंगमंदिर येथील वाहनतळ मार्च २००२ पर्यंत चालविण्यास देणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात जास्त दराची श्री. सचिन अशोक दोंदे यांची दरमहा रु. ८,९००/- या दराची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२/५ :**

मा. स्थायी समितीने दि. ०८-०१-९९ रोजी संपन्न झालेल्या विषय क्र. ४५७/२४ अन्वये मंजुर केलेला ठराव रद्द करणे बाबत.

मौ. उस्मानपुरा, येथील सर्व्हे ६ मधील रहिवाशी वापरासाठीचे रेखांकन सन १९६६ मध्ये तत्कालीन औरंगाबाद नगरपालिकेने मंजुर केले होते. ह्या मंजुर रेखांकनात २४ मी. विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र दर्शविण्यात आले होते. सदर २४ मी. विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्राचा मावेजा जमीन मालकास अद्याप देण्यात आलेला नाही. सदर मावेजा धन स्वरुपात देण्याऐवजी रेखांकनातील खुल्या जागेतुन मोबदल्याच्या रक्कमेच्या मुल्यांकनाचा भुखंड रेखांकनात सोडलेल्या खुल्या जागेतुन देण्यासंबंधीचा प्रस्ताव अर्जदाराने विनंतीवरुन मनपा प्रशासनापुढे आला असताप्रशासनाने त्यावर विचार करुन रेखांकनातील १०% खुल्या जागेतील भुखंड मोबदल्याचे स्वरुपात अर्जदारास देण्यात यावा. असा निर्णय तत्कालीन आयुक्त यांनी दि. २१-०७-९८ रोजी घेतला.

ह्या निर्णयानंतर सदर विषय मा. स्थायी समितीच्या सभेपुढे दिनांक ०८-०१-९९ रोजी विचारार्थ ठेवण्यत आला असता स्थायी समितीने २४ मी. विकास योजना रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्राचे मोबदल्या पोटी रेखांकनातील १०% खुल्या जागेपैकी २५० चौ. मी. क्षेत्रफळाचा भुखंड मुळ जमीन मालकास निवासी वापरासाठी देण्यात यावा. असा ठराव पारीत केला.

मा. स्थायी समिती सभेच्या ठरावाच्या अनुषंगाने करारनामा व इतर अटी-शर्ती ह्या संबंधाने पुढील कार्यवाही प्रशासनाने पुर्ण करुन मुळ मालकासोबत दिनांक १५-०५-१९९९ रोजी करारनामा करण्यात आला. ह्या करारनाम्यात २५० चौ. मी. क्षेत्राचा भुखंड रेखांकनातील १०% खुल्या जागेचा क्षेत्रातुन अर्जदारास देण्यासंबंधी उल्लेख करण्यात आलेला आहे. दरम्यानच्या काळात तत्कालीन मा. विरोधी पक्षनेता ह्यांनी त्यांचे पत्र क्र. २९/९९ दिनांक २८-०१-९९ अन्वये स्थायी समितीच्या ठरावास व रेखांकनातील खुल्या जागेपैकी क्षेत्रातुन रहिवासी वापराचा भुखंड देण्याच्या प्रस्तावास आक्षेप घ्ोतला आणि सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात यावा व तोपर्यंत प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही करु नये अशी मागणी केली. करार नाम्यानुसार रेखांकनातील खुल्या जागेपैकी २५० चौ. मी. भुखंड मुळ जमीन मालकास देण्याबाबत स्थायी समितीचा ठराव झालेला असतांना संबंधित जमीन मालकाने शहर भुमापन कार्यालयातुन ३९२.७५ चौ. मी. ह्या क्षेत्राच्या भुखंडाचे पी. आर. कार्ड प्राप्त करुन घेतले. जे करारनाम्यानुसार नाही व स्थायी समितीच्या ठरावाची पायमल्ली करणारे आहे. मंजुर रेखांकनातील किमान १०% किंवा त्यापेक्षा जास्त सोडण्यात आलेल्या सार्वजनिक खुल्या जागेत रहिवाशी भुखंड देण्याची व खुल्या जागेचे आवश्यक क्षेत्र विकास नियंत्रण नियमावलीनुसार न सोडता ते कमी करण्याची कार्यवाही कायद्याला व नियमाला धरुन नाही. स्थायी समितीच्या उक्त ठरावाद्वारे रेखांकनाती खुल्या जागेत मुळ जमीन मालकास रहिवासी भुखंड दिल्यास खुल्या जागेचे क्षेत्र रेखांकनातील एकुण क्षेत्राच्या ८.५४% एवढे राहते. जे कायद्यात न बसणारे व नियमाचा भंग करणारे ठरते. प्रशासनाने सदर प्रकरणातील झालेल्या कार्यवाहीचा, स्थायी समितीच्या ठरावाचा संपुर्ण अभ्यास केला असता स्थायी समितीच्या ठरावाची अंमलबजावणी करणे कायदा व नियम सोडुन होईल ह्या निष्कर्षाप्रत प्रशासन आलेले आहे. रेखांकनातील खुल्या जागेत रहिवाशी भुखंड नियमानुसार देता येत नसल्यामुहे २४ मी. विकास योजना रस्त्याने बधीत क्षेत्राचा मोबदला धनस्वरुपात किंवा बदली चटई क्षेत्र निर्देशांकाद्वारे मुळ जमीन मालकास देणे हे कायद्याला व नियमाला धरुन होईल. असे प्रशासनाचे मत आहे. तरी सदर प्रस्तावात झालेली कार्यवाही व मुळ जमीन मालकाने प्राप्त करुन घेतलेल्या बेकायदेशीर पी. आर. कार्डचा पुनर्विचार करुन मा. स्थायी समितीने ठराव क्र. ४५७/२४ दिनांक ०८-०१-९९ रद्द करावा व कायदेशीर प्रक्रिया पुन:स्थापित करावी असा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यात येतो.

**संवाद :**

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** महानगरपालिकेच्या एका जागेवर मनपाचे कर्मचारी तार फेन्सींग साठी गेलेले होते. परंतु त्या जागेवर तार फेन्सींग करु दिले नाही. जागा मनपाची असतांना असे प्रकार होत असतील तर योग्य नाही. मनपाच्या मालकीच्या जागा महानगरपालिका सांभाळु शकत नाही का? १५ वर्षापुर्वी कुंपन भिंत झाली होती. या प्रस्तावामध्ये संबंधित व्यक्तीने ३९२.७५ चो. मी. जागा स्वतं:च्या नावावर कशी करुन घेतली. मनपास या बाबतीत ३ वर्षानंतर म्हणजे आज माहिती मिळाली काय?

**सहाय्यक संचालक (नगररचना) :** १९६६ मध्ये रेखांकन मंजुर झालेले आहे. २४ मी विकास येजना रस्त्याने बाधीत होते. या २४ मी विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्राच्या मोबदल्याऐवजी रेखांकनात सोडलेल्या १०% खुल्या जागेतुन देण्यासंबंधीचा प्रस्ताव अर्जदाराचे विनंतीवरुन मनपा प्रशासनाकडे आला व प्रशासनाने त्यास मान्यता देऊन रेखांकनातील १०% खुल्या जागेतील २५० चो. मी. भुखंड मोबदल्याचे स्वरुपात अर्जदारास देण्यात यावा, असा निर्णय

तत्कालीन आयुक्त यांनी घेतला व तसा प्रस्ताव दिनांक ०८-०१-९९ च्या स्थायी समितीसमोर ठेवण्यात आलेला होता. स्थायी समितीने २५० चौ. मी. क्षेत्राचा भुखंड रेखांकनातील १०% खुल्या जागेच्या क्षेत्रातुन अर्जदारास देण्यासंबंधी मान्यता दिलेली आहे. नियमानुसार रेखांकनातील १०% खुल्या जागेच्या क्षेत्रातुन जागा देता येत नाही व कायदया विरुध्द असल्याने आत स्थायी समितीने मंजुर केलेला प्रस्ताव रद्द करण्यासाठी हा प्रस्ताव पुन्हा विचारार्थ सादर केलेला आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** याच रेखांकनातील दुसरी खुली जागेबाबत सहा महिन्यापुर्वी निविदा काढल्या होत्या. त्या ठिकाणी काम करु दिले नाही. व अशा प्रकारे जागा देता येत नाही.

**मा. आयुक्त** : रेखांकनातील १०% खुल्या जागेतुन मोबदला म्हणुन जागा देता येते का? कोणी प्रस्ताव पाठविला यास कोण जबाबदार आहे? कोणी शिफारस केली आहे.

**उपअभियंता नगररचना-२ :** संबंधित मालकास रेखांकनातील १०% खुल्या जागेतुन २५० चौ. मी. क्षेत्राचा भुखंड देण्याबाबत तत्कालीन आयुक्त यांनी मान्यता दिली. त्यानुसार स्थायी समितीने सुध्दा मान्यता दिली आहे. नियमानुसार अशी जागा देता येत नाही.

**श्री. जयवंत ओक :** जी जागा मनपाने भुसंपादन केली ती जागा श्री. तुळशीराम गंगाराम घोरपडे, उस्मानपुरा यंचे नावाने ले-आऊट मंजुर आलेले आहे. सन १९६६ पासुन सदर जागा संबंधित व्यक्तीच्या नावाने आहे. १९९९ पर्यंत त्या व्यक्तीच्या नावाने ती जागा होती. या जागेमधुन नगरपालिकेने ५०, ८० फुट डी. पी. रोड काढण्यात आलेले आहे. संबंधित व्यक्तीची यामध्ये ५००० स्क्वेअर फुट जागा बाधीत झालेली आहे. सदर जागा ही महानगरपालिकेने विकास कामासाठी घेतलेली आहे. या डी. पी. रोडमध्ये दशमेशनगर कडुन एक रस्ता येतो. इतर दोन असे तीन रस्त्यांचा विकास मनपास करणे शक्य झालेले आहे. डी. पी. रोड होत आहे म्हणुन कुणीही जागा देण्यास तयार नव्हते. तत्कालीन आयुक्त यांनी संबंधित व्यक्तीला त्याचे जमीन मोबदल्यात रक्कम देण्याऐवजी रेखांकनातील खुल्या १०% जागेमधील २५० चौ. मी. जागा देण्याबाबत दि. ०८-०१-९९ रोजी स्थायी समितीकडे प्रस्ताव दिलेला होता. व तसा निर्णय घेतलेला आहे. ३ खुल्या जागा सोडल्या आहेत. करार जेव्हा झाला तर परवानगीसाठी दाखल केले. २५० चो. मी. जागा दिल्या गेली. संबंधित व्यक्तीने पी. आर. कार्डवर जे ३९२.७५ चौ. मी. करुन घेतल्याची सर्व जागा याच व्यक्तीच्या नावावर आहे. व त्यांनी उर्वरीत १४२.७५ चौ. मी. जागा मनपाने हस्तांतर करावी. त्या व्यक्तीच्या नावाने १९-०१-२००० भुसंपादनासंबंधी पत्र दिलेले आहे. म्हणुन २५० चौ. मी. जागा देण्याबाबत ठराव पास झालेला आहे. तयानुसार कार्यवाही व्हावी व उर्वरीत १४२.७५ चौ. मी. जागा मनपाकडे त्या व्यक्तीची हॅंडओव्हर करावी. यामध्ये वादाचा प्रश्न निर्माण होऊ देऊ नये.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** सर्व्हे नं. ६ शासकीय जमीन आहे. या जागेचे कागदपत्रे पाहण्यात यावे. या रेखांकनात ३ ठिकाणी खुली जागा सोडलेली आहे. त्यापैकी एका खुल्या जागेवर १५ वर्षापुर्वी कुंपनभिंत बांधलेली आहे. एका खुल्या जागेसंबंधी निविदा काढण्यात आलेल्या आहेत. या १०-१२ वर्षात काहीच

केले नाही या जागेवर ३ लोकांनी क्लेम केलेला आहे. मगरीबी, बाबु गवळी यांनी क्लेम केलेले आहे. रस्त्याच्या जागेचे मोबदला मिळण्याबाबत क्लेम केलेले आहे का? व यापुर्वी कधी केलेला आहे का? १९६६ पासुन काम करीत होते नियमानुसार रेखांकनातील १०% खुल्या जागेतील भुखंड मोबदल्याचे स्वरुपात देऊन शकत नाही. विकास नियमावलीच्या नियम क्र. १३.३ च्या तरतुदीप्रमाणे जास्तीत जास्त २०० चौ. मी. व्यायाम शाळा जिम्नॅशियम, टेनिस इ. साठी देय होते. त्यात स्वच्छतागृहाचे बांधकाम करता येत नाही. देणार असेल तर यास माझा विरोध नोंदविण्यात यावा.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** त्यावेळेच मुद्दे समोर ठेवुन निर्णय घेतला असेल तो घेतलेला निर्णय या प्रस्तावानुसार रद्द केल्याने स्थायी समितीचा अपमान आहे.

**उपअभियंता नगररचना-२ :** डी. पी. रोड भुसंपादन करुन रेखांकनातील १०% खुल्या जागामधील २५० चौ. मी. जागा मोबदला म्हणुन देता येत नाही. शासनासही अशी जागा देता येत नाही.

**श्री. जगदीश सिध्द :** सबंधित व्यक्ती व महानगरपालिकेचा जो करारनामा झाला तो कशाच्या आधारे झालेला आहे त्या करारनाम्यात काय अटी व शर्ती आहेत त्याची माहिती देण्यात यावी. करारनामा नियमानुसार बरोबर केला आहे का करारनामा ज्यांनी केला त्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरणार काय?

**श्री. भरत लकडे :** लिगल ओपीनिअन काय आहे. माहिती द्यावी ज्यांनी सही केली असेल त्यांचेवर कार्यवाही करावी. बरीच प्रकरणे बाहेर निघतील.

**श्री.जयवंत ओक :** मनपास विकास कामासाठी मदत केली म्हणजे चुक केली असे म्हणावे लागेल.

**मा. आयुक्त** : कायदे व नियम बदलावे लागेल. अशा प्रकारे जागा देण्याचा आयुक्तांना व शासनाला अधिकार नाही.

**श्री. जगदीश सिध्द :** एकुण जागा ५ हजार स्क्वेअर फुट असून, ४० लाख रुपये संबंधित व्यक्तीस द्यावे लागतील. ज्या अधिकाऱ्यांनी आयुक्तांकडे संचिका सादर केली. त्या अधिकाऱ्यांवर प्रथम कार्यवाही करावी.

**मा. आयुक्त** : २५० चौ. मी. जागा देण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे ती नियमाला धरुन नाही व नियमात बसत नाही संचिका आयुकतांकडे मंजुरीसाठी पाठवुन चुकीचा निर्णय घेण्यास भाग पाडलेले आहे असे दिसते. उपसंचालक नगररचना यांनी हा प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवण्याबाबत केलेल्या शिफारशी बाबत मी पुर्ण सहमत आहे. आपण जरी निर्णय घेतला तरी कार्यवाही करता येणार नाही. ज्यांनी शिफारस केली त्यांना चार्जशिट देण्यात येईल.

**श्री. भरत लकडे :** दिनांक ०८-०१-९९ ला प्रशासकीय ठराव स्थायी समिती समोर सोडुन सभागृहाची दिशाभुल केली. त्यावेळचे आयुक्त कोण होते. त्यांची संचिकेवर सही कोणता निकष लावुन केली. कायदेशीर बाब का तपासली नाही.

**डॉ. आशा बिनवडे :** खुल्या भुखंडातील जागा इतर बाधीत केलेल्या भुखंडाच्या बदलण्यात देता येत नाही. हे नियमामध्ये बसत नाही. नियमबाह्य कामासाठी हे सभागृह नाही. चुकीचा असेल तर रद्द करावा. प्रशासकीय मंजुरी कशी मिळाली. विभागीय/खाते चौकशी करावी. योग्य ती कार्यवाही झाली पाहिजे काय कार्यवाही झाली त्यासंबंधीचा संपुर्ण अहवाल सभागृहासमोर आला पाहिजे. हे सभागृह निश्चितच यापुढे चांगले निर्णय घेतली. परंतु अशा प्रकरणाची

माहिती ही सर्वांसमोर येणे आवश्यक आहे. जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** असे प्रस्ताव नेहमीच येतील व त्यास मान्यता होत गेल्यास या सभागृहाची बदनामी होते. आपण लोकप्रतिनिधी आहोत. लोकांचा विश्वास राहणार नाही. तत्कालीन आयुक्त व स्थायी समिती सदस्यांचा अपमान आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** तेथील लोकांचे मत घ्यावे. आमचे मत आहे ते आम्ही मांडत आहोत. आम्ही त्या भागातील आहोत.

महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीचे नियम क्र. १३-०३-०१ प्रमाणे देता येते की नाही या नियमावलीच्या विरुध्द देण्यात येत असेल तर त्यास माझे आक्षेप नोंदविण्यात यावे.

**श्री. जयवंत ओक :** संबंधित व्यक्तीच्या नावाने १९९९ पर्यंत सदर जागा होती. स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी व्हावी. संबंधित व्यक्तीला २५० चौ. मी. जागा देण्यात यावी. विकासासाठी त्यांनी मनपास जागा दिलेली आहे. याचा विचार व्हावा.

**श्री. भरत लकडे :** ज्या अधिकाऱ्यांनी संचिका आयुक्तांकडे मंजुरीसाठी पाठविली. त्या अधिकाऱ्यांवर प्रथम कार्यवाही करावी. नंतर रद्द करावी.

**मा. सभापती :** डी. पी. रोड करण्यासाठी संबंधित व्यक्तीकडुन महानगरपालिकेने जागा भुसंपादीत केलेली आहे. करारनामा काय केला. त्याचे अटी व शर्ती काय आहेत. या सर्व बाबींचा विचार व्हावा व तशी चर्चासुध्दा या ठिकाणी झालेली आहे. त्या अनुषंगाने जो प्रस्ताव सादर झाला तो प्रशासनामार्फत सादर झालेला आहे. याबाबत मा. आयुक्त यांनी सविस्तर संचिका पाहुन कार्यवाही करावी. तशी एक टिप्पणी तयार करुन सविस्तर माहिती सभागृहासमोर ठेवण्यात यावी. संपुर्ण संचिका तपासणी करु नये. योग्य ती कार्यवाही व्हावी तो पर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे. आतापर्यंत रेखांकनातील १०% खुल्या जागेपैकी किती जागा देण्याबाबत निर्णय कसा घेण्यात आला, करारनामा केला त्यात अटी-शर्ती काय त्याबद्दलची सुध्दा माहिती देण्यात यावी.

सविस्तर चौकशी करुन घ्यावी.
तो पर्यंत हा प्रस्ताव स्थगित करण्यात येतो.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार या प्रकरणाच्या संचिकेची पुनर्तपासणी करुन त्यासंबंधी एक टिप्पणी तयार करुन सविस्तर माहिती सभागृहापुढे ठेवण्यात यांनी तो पर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ५३/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहानुरवाडी सर्व्हे नं. ९/२ येथील १२ मीटर रुंद विकास योजनेतील रस्याचे खडीकरण, सरफेस ड्रेसिंग, साईड गटार व पुलाचे बांधकाम करण्या करीता सा. बा. खात्याच्या सन २०००-२००१ च्यादरसुचीनुसार र. रु. १२,२५,२५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

दिनांक ०४-०६-२००१ च्या स्थायी समितीतील विषय क्र. ३ नुसार सदर प्रस्तावाबाबत स्थळ पाहणीसाठी समिती गठीत करण्यात आलेली होती. समितीच्या सर्व स.

सदस्यांसह दि. १९-०६-२००१ रोजी पाहणी झाली व पाहणी अहवाल मा. स्थायी समितीस सादर झालेला आहे. नगररचना विभागाने प्रत्यक्ष जागेवर जाऊन रस्त्याची आखणी (मार्किंग) करावी असे सर्व संमतीने ठरले. त्यानुसार प्रत्यक्ष काम सुरु करते वेळी नगररचना विभागाकडुन मार्किंग घेऊन प्रस्तावित काम सुरु करण्यात येईल.

तरी रक्कम रु. १२,२५,२५०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा सुधारीत प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. सलीम पटेल :** प्रस्तावानुसार स्थळ पाहणीसाठी समिती गठीत करण्यात आलेली होती. समितीने जुन २००१ मध्ये स्थळ पाहणी केली. यास सहा महिने झाले व आज प्रस्ताव मंजुरीसाठी येत आहे. एवढा उशीर का झाला?

**अति.शहर अभियंता :** दिनांक ०४-०६-२००१ च्या स्थायी समितीसमोर प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवण्यात आलेला होता. या बैठकीत या विषयासंबंधी एक समिती स्थळ पाहणीसाठी गठीत करण्यात येऊन समितीने दि. १९-०६-२००१ रोजी स्थळ पाहणी करुन नगररचना विभागाने प्रत्यक्ष जागेवर जाऊन रस्त्याची पाहणी करुन आखणी (मार्किंग) करावी असे अहवालात म्हटले आहे व तसा अहवाल मा. स्थायी समितीस सादर केलेला आहे. १२ मीटर रुंद विकास योजनेतील रस्त्याचे प्रस्तावात दर्शविल्यानुसार काम करण्यात येणार आहे.

**श्री. सलीम पटेल :** स्थळ पाहणीसाठी प्रस्ताव स्थगित ठेवलेला होता. पुन्हा जुलै २००१ मध्येच प्रस्ताव मंजुरीसाठी का ठेवण्यात आलेला नाही, ६ महिने का उशीर झाला?

**अति. शहर अभियंता :** या विभागाकडुन नगररचना विभागाकडे तसे पत्र सुध्दा देण्यात आलेले आहे.

**मा. सभापती** : विषय क्रमांक ६ च्या संदर्भात स्थळ पाहणीसाठी कमीटी नेमण्यात आलेली होती. सदर कमीटीने असा अहवाल दिला की, नगररचना विभागाने प्रत्यक्ष जागेवर जाऊन रस्त्याची आखणी (मार्किंग) करावी असे अहवालात म्हटले आहे. त्यानुसार संबंतिध विभागाने अहवालानुसार कार्यवाही करावी. या अटीसह हा प्रस्ताव मंजुर करण्यत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानुरवाडी सर्व्हे नं. ९/२ येथील १२ मीटर रुंद विकास योजनेतील रस्याचे खडीकरण, सरफेस ड्रेसिंग, साईड गटार व पुलाचे बांधकाम करण्या करीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १२,२५,२५४/- च्या अंदाजपत्रकास प्रत्यक्ष काम सुरु करते वेळी नगररचना विभागाकडुन रस्त्याची आखणी (मार्किंग) करुन घ्यावी. या अटीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहरातील विद्युत पथ दिव्यांच्या दुरुस्तीकरीता सोडीयम व्हेपर लॅम्प खरेदीकरण्याकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १९,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास विषय क्र. २५/१ दिनांक ०८-०८-२००१ अन्वये मा. स्थायी समितीची मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदरील विद्युत साहित्य खरेदी करण्याकरीता निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण पाच कोटी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या

अंतीम तारखेपर्यंत सदरील पाचही निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| **तक्ता क्रमांक -१** | | | | |
|---|---|---|---|---|
| | | **साहित्य / प्राप्त दर** | | |
| **अ. क्र.** | **एजन्सीचे नांव** | **७० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प** | **१५० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प** | **२५० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प** |
| १. | मे. बजाज इलेक्ट्रीकल | ३५४.०० | ४१९.०० | ४६०.०० |
| २. | मे. क्रॉम्टन ग्रीव्हज | ३०३.०० | ४१४.०० | ४९५.०० |
| ३. | मे. सुर्या रोशणी लि. | २९५.०० | ४३४.०० | ४७५.८० |
| ४. | मे. फिलीप्स इंडिया लि. | ४६९-४०९ | ४२३-४५ | ४७५-५५ |
| ५. | मे. व्हॅलिएन्ट इलेक्ट्रीकल्स | निविदापत्रक उघडण्यात आले नाही. | | |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर व एजन्सी खालील दर्शविल्याप्रमाणे आहेत.

| **तक्ता क्रमांक -२** | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **साहित्याचा तपशील** | **कंपनीचे नांव** | **प्राप्त कमी दर (प्रति नग)** |
| १. | ७० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प | मे. सुर्या रोशणी लि. | २९५.४० |
| २. | १५० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प | मे. क्रॉम्प्टन ग्रीव्हज | ४१४.०० |
| ३. | २५० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प | मे. बजाज इलेक्ट्रीकल्स | ४६०.०० |

वरील तक्ता क्रमांक २ मधे दर्शविलेल्या दरानुसार विद्युत साहित्य खरेदी करावयाचे झाल्यास खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| **तक्ता क्रमांक -३** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **साहित्याचा तपशील** | **नग** | **सर्वात कमी प्राप्त दर** | **एकुण खर्च रुपये** |
| १. | ७० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प | ३०० नग | २९५.४० | ८८,६२०.०० |
| २. | १५० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प | १२०० नग | ४१४.०० | ४,९६,८००.०० |
| ३. | २५० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प | १२०० नग | ४६०.०० | ५,५२,०००.०० |
| | | **एकुण अपेक्षित खर्च रुपये** | | **११,३७,४२०.००** |

तरी तक्ता क्रमांक ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे विद्युत साहित्य खरेदी करावयाचे झाल्यास तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे एकुण र. रु. ११,३७,४२०.०० इतका खर्च अपेक्षीत आहे. म्हणजेच अंदाजपत्रकात दर्शविलेल्या रक्कमेपेखा रु. ८,२२,५८०/- इतका कमी खर्च येणार आहे.

तरी तक्ता क्र. २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी प्राप्त दरानुसार संबंधित एजन्सीजकडुन विद्युत साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. भरत लकडे :** मागील वर्षी किती विद्युत साहितय खरेदी करण्यात आलेले होते. खरेदी होणारे साहित्य वार्ड निहाय वाटप व्हावे. साहित्य खरेदी केल्यानंतर लगेच मागणी केल्यानंतर सुध्दा साहित्य देण्यात येत नाही किती साहित्य खरेदी केले खुलासा द्यावा.

**श्री. जयवंत ओक :** बजेट मंजुर झाल्यापासुन बरेच महोत्स घेऊन गेलेले आहे. त्यामध्ये नवरात्र महोत्स दिवाळी गणपती महोत्सव इतर बरेच सण होऊन गेलेले आहेत. शहरात बऱ्याच ठिकाणी अंधार दिसुन येतो. वेळीच या प्रस्तावाची कार्यवाही का होत नाही. सर्वच नगरसेवकांच्या वार्डामध्ये लाईटची गरज भासते. हा विषय महत्वाचा असून, ज्याप्रमाणे शालेय विद्यार्थ्यांना गणवेश खरेदी बाबतची कार्यवाही तीन महिने अगोदर सुरु करणार त्याचप्रमाणे वि्ुत साहीत्य सुध्दा खरेदीची कार्यवाही बजेट मंजुर झाल्यानंतर लगेच करावयास पाहिजे. जेणे करुन, जुन जुलै, मध्ये सर्व विद्युत साहित्य येईल. ते साहित्य उपयोगात आणता येईल.

**मा.आयुक्त** : प्रत्येक टेंडरच्या बाबतीत ३ महिने अगोदर पासुन कार्यवाही करणार आहोत. जेणे करून वेळेवर सभागृहाची मंजुरी घेऊन कार्यवाही करता येईल.

**श्री. भरत लकडे :** कोणत्या वार्डासाठी कोणते साहित्य दिले, किती दिले याची नोंद असावयास पाहिजे.

**अति. शहर अभियंता :** मटेरियलचा वापर कशा पध्दतीने करण्यात येतो याची तीन रजिस्टरला नोंद घेण्यात येते. त्या रजिस्टरला १०९, ११०, १११ असे नंबर दिलेले आहेत. १०९ नंबरच्या रजिस्टरला मटेरियल आल्याची नोंद होते तर ११७ नंबरच्या रजिस्टरला मटेरियज कोठे दिले याची नोंद घेतली जाते तर १११ नंबरच्या रजिस्टरमध्ये कोणत्या लाईनमनकडे मटेरियल देण्यात आले. त्या लाईनमचे नांव असते.

**श्री. सलीम पटेल :** लाईनमनला साहित्य दिल्यानंतर तेवढे सहित्य लावण्यात येत नाही. उदा. ६ बल्ब, ६ चोक इत्यादी साहित्य दिल्यास त्यापैकी ५० टक्के साहित्य लावण्यात येते. जुन्या साहित्यामध्ये ॲडजस्टमेंट करुन शिल्लक साहित्य पुन्हा कार्यालयात जमा होत नाही. अशा बऱ्याच नागरिकांच्या लाईनमन विषयी तक्रारी आहेत. त्यासाठी वार्डात साहित्य लावल्यानंतर संबंधित नगरसेवकांची स्वाक्षरी किंवा पत्र घेवुन यापुढे कार्यवाही व्हावी अशी माझी सुचना आहे. जे वापरले गेले ते शिल्लक आहे का याची देखील माहिती नाही.

**श्री. जयवंत ओक :** कोणत्या वार्डात केव्हा व किती साहित्य लावण्यात येते, पोल नंबर टाकुन याची नोंद होत होती. ती पध्दत का बंद केली. साहित्य घेऊन गेल्यानंतर नगरसेवकांना विचारुन कार्यवाही होत होती. दोन वार ठरलेले होते ती पध्दत आता बंद केली.

**मा. आयुक्त** : लाईनमनला साहित्य दिल्यानंतर कोणत्या वार्डात किती साहित्य लावले, पोलवर क्रमांक टाकलेले आहेत. कोणत्या ठिकणी लावल्यास आले याची नोंद ठेवण्यात यावी. परत किती साहित्य आले याची सुध्दा नोंद घेतली गेली पाहिजे. तसेच जुने किती साहित्य काढले याची नोंद होईल.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** थ्री सेट पोलवर नंबर असावे. जेणे करुन जेथे साहित्य लावल्यानंतर त्या पोलचा नंबर नोंद म्हणुन ठेवला पाहिजे. मनपा ३ सेट व जी आय. पोलवर क्रमांक नाही. म. रा. वि. मंडळाचे क्रमांक टाकलेले आहेत.

**श्री. साहेबराव कावडे :** प्रत्येक वार्डात पोलवर नंबर असावे जे साहीत्य लावण्यासाठी देण्यात येते या संबंधीची कल्पना नगरसेवकांना अगोदर मिळावयास पाहिजे. कारण

एका वार्डासाठी उदा. ४ टयुब लावण्यासाठी दिल्यास त्या टयुब इतर दुसऱ्या वार्डात लावण्यात येतात. असे बरेचवेळा घडलेले आहे. माझ्या वार्डासाठी ४ टयुब, चार बल्ब लावण्यासाठी दिले. संबंधित लाईनमनने कोणत्या वार्डात नेऊन लावले काही पत्ता नाही. असे न होण्यासाठी प्रत्येक वार्डात पोलवर नंबर असावे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा** : या विभागाकडे कर्मचारी कमी आहे. कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्यात यावी.

**मा. सभापती** : या विभागामार्फत कामे वेळेवर होण्यासाठी काही तरी नियोजन करावे. पाच वार्डासाठी एक प्रमुख किंवा पाच वार्डासाठी अमुक-अमुक गाडी देण्यात येईल. असे काहीतरी नियोजन या विभागाकडुन व्हावे. तर कामे करण्यास वेळ कमी लागेल. ऑफिसमध्ये किती कर्मचारी काम करतात.

**उपअभियंता (विद्युत-१) :** प्रत्येक वार्डवाईज लाईनमन दिलेले आहेत. ४ ते ५ लाईनमन ऑफिसमध्ये काम करतात. आणखी ५ कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

**अति. शहर अभियंता :** विद्युत बाबतच्या वार्डवाईज तक्रारी झोन कार्यालयात येतात. तेथुन संबंधित जेई. तक्रारी घेऊन येतात. त्यानुसार ३ दिवसाच्या आत तक्रारीचे निवारण केले जाते.

**श्री. साहेबराव कावडे :** लाईनमन यांना दररोज काम नसते. असे माझे मत आहे. अधिकाऱ्यांनी खुलासा करावा. ४ दिवस कामावर आले नाही. तरी त्याची हजेरी भरुन जाते.

**श्री. जयवंत ओक :** झोनमध्ये तक्रारी घेतल्या जात नाहीत. नागरीकांना येथे यावे लागते.

**अति. शहर अभियंता :** जेव्हा ११ हजार पोल होते. तेव्हा जेवढे कर्मचारी होते, तेवढेच कर्मचारी आता २२ हजार पोलवरील कामे करतात.

**मा. आयुक्त** : ऑफिसच्या कामासाठी ५ कर्मचारी असतील तर त्यातील तीन कर्मचारी काढुन घ्यावेत, फक्त २ कर्मचारी ठेवावे. काही वार्डातील कामे ही खाजगी पध्दतीने देण्याची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी.

**श्री. जयवंत ओक :** झोनमध्ये तक्रारी घेतल्या जात नाही. म्हणुन बरेच नागरीक तक्रार घेऊन मुख्य कार्यालयात येतात. म्हणुन झोनमध्ये तक्रारी घेवुन ताबडतोब कार्यवाही झाली पाहिजे.

**मा. आयुक्त** : विद्युत विभागाच्या भरपुत तक्रारी असतात. नागरिकांना मुख्य कार्यालयात तक्रार केल्यानंतर त्या तक्रारी सोडविणे शक्य होत नाही म्हणुन तक्रारी झोन कार्यालयातच घेतल्या पाहिजे. जेणे करुन तक्रारीचे तात्काळ निवारण करता येईल.

**अति. शहर अभियंता :** सध्या ४१ लाईनमन काम करतात.

**मा. सभापती** : ४१ कर्मचारी असतील तर दोन वार्डासाठी १ कर्मचारी असावयास पाहिजे. कामाच्या बाबतीत या विभागाने नियोजन करावे. कर्मचारी कमी होत असतील तर तशी प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा. आयुक्त** : विद्युत लाईट बाबतच्या तक्रारी झोन कार्यालयातच घेण्यात येतील. कोणत्या लाईनमनला कोणते व कोठे लावण्यासाठी साहित्य दिले किती साहित्य लावण्यात आले याची नोंद ठेवण्यात येईल. तसेच साहित्य लावतांना नगरसेवकांना यासंबंधी माहिती देऊनच करण्यात यावे.

**श्री. जगदीश सिध्द :** लाईटचे दर फारच कमी आलेले आहे. पुढील वर्षी जास्त दर येतील. त्यामुळे पुढील वर्षासाठी आजच साहित्य घेता येईल काय याची सुध्दा कार्यवाही करण्यात यावी.

**मा. आयुक्त** : तशी कार्यवाही आपल्याला करता येणार नाही. नियमाने कार्यवाही होईल.

**मा. सभापती** : इतर वर्षापेक्षा यावर्षी लाईटचे दर फारच कमी झालेले आहेत. पुढील वर्षी साहित्य खरेदी करतांना जेव्हा टेंडर काढण्याची कार्यवाही होईल त्यावेळेस या एजन्सीकडुन याच दराने विद्युत साहित्य देण्यास तयार असतील तर तशी विचारणा करु. ते देत असतील तर देण्याबाबत विचार व्हावा. हा विषय मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विद्युत पथदिव्यांच्या दुरुस्ती करीता सोडीयम व्हेपर लॅम्प खरेदी करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे तक्ता क्रमांक २ मध्ये दर्शविण्यात आल्यानुसार (१) ७० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प साठी मे. सुर्या रोषणी लि. यांच्या प्रति नग रु. २९६.४० (२) १५० वॅड सोडीयम व्हेपर लॅम्प साठी मे. क्रॉम्प्टन ग्रिव्हज यांच्या प्रतिनग रु. ४१४.०० (३) २५० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प साठी मे. बजाज इलेक्ट्रीकल्स यांच्या प्रतिनग रु. ४६०.०० या दरास त्याचप्रमाणे तक्ता क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे विद्युत साहित्य खरेदीकरीता लागणाऱ्या रक्कम रुपये ११,३७,४२०.०० च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेची सध्याची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट असून, माहे ऑक्टोबर अखेर महानगरपालिकेस खालील प्रमाणे रक्कमा विविध लेखा शिर्षा अंतर्गत देणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांचे विद्युत | देयक रक्कम रु. १२६.०० कोटी |
| २. | महाराष्ट्र जीवन प्राधीकरण पाणीपट्टी | देयक रक्कम रु. ५५.४० कोटी |
| ३. | नगररचना विभागाचे कर्ज | देयक रक्कम रु. ००.०२ कोटी |
| ४. | म्हाडा कार्यालयाकडुन घेतलेले कर्ज | देयक रक्कम रु. ००.०३ कोटी |
| ५. | हडको कार्यालयाकडुन घेतलेले कर्ज | देयक रक्कम रु. ००.१५ कोटी |
| ६. | एल. आय. सी. कडुन घेतलेले कर्ज | देयक रक्कम रु. ०५.८६ कोटी |
| ७. | खुल्या बाजारातुन घेतलेले कर्ज | देयक रक्कम रु. २०.८० कोटी |
| ८. | हमी शुल्क | देयक रक्कम रु. ००.३८ कोटी |
| ९. | पोलीस दल पगार व भत्ते | देयक रक्कम रु. ००.४७ कोटी |
| १०. | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ | देयक रक्कम रु. ०४.५० कोटी |
| ११. | पाचवा वेतन आयोग थकबाकी | देयक रक्कम रु. ०१.५० कोटी |
| | **एकुण** | **देयक रक्कम रु. २१५.११ कोटी** |

| | |
|---|---|
| सन २००१-२००२ चे वार्षीक अंदाजपत्रक | रु. १३५.५६ कोटी |
| माहे ऑक्टोंबर पर्यंतची प्रत्यक्ष जमा माहे | रु. ४७.६७ कोटी |
| ऑक्टोंबर पर्यंतचा प्रत्यक्ष खर्च | रु. ४९.६५ कोटी |

महानगरपालिकेचे सध्याची आवक ही मासीक रुपये ६.९१ कोटीची असून, आवकच्या प्रमाणात प्रतिमाह खर्च रु. ७.०९ कोटी इतका आहे.

महानगरपालिकेची उत्पन्नाची बाजु विचारात घेतली तर, नागरिकांकडे कर व पाणीपट्टी संदर्भाने खालील प्रमाणे थकबाकी आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मालमत्ता कर | रु. ३६.४२ कोटी |
| २. | पाणीपट्टी | रु. १२.२७ कोटी |
| ३. | दुकान भाडे व इमारत भाडे | रु. ००.२१ कोटी |
| ४. | शासनाकडे प्रलंबित असलेले अनुदान | |
| अ) | रस्ता दुरुस्ती अनुदान | रु. ०१.०० कोटी |
| ब) | कुटुंबकल्याण व माताबद्दल संगोपन | रु. ०३.२९ कोटी |
| क) | नागरी हिवताप योजना अनु. | रु. ०२.८७ कोटी |
| ड) | शालेय इमारत भाडे अनुदान | रु. ००.८० कोटी |
| | **एकुण** | **रु. ५६.८६ कोटी** |

शासनांचे दरवर्षी औरंगाबाद महानगरपालिकेस रु. १० कोटी विशेष अनुदान देण्यात येईल म्हणुन निर्णय जाहीर केला होता. त्या अनुषंगाने अंदाजपत्रकामध्ये शासनाकडुन रु. १० कोटीचे उत्पन्न अनुदान स्वरुपात अपेक्षीत केलेले होते. परंतु शासनाने त्यांचे पत्र क्र. जी. ई एन १०/२००१/९८०३/प्र.क्र.५५/२०००/नगरविकास २४/दिनांक २७ जुलै २००१ नुसार महानगरपालिकेस कळविले आहे की, चालु आर्थिक वर्षात या महानगरपालिकेस फक्त रु. ६ कोटीचेच अनुदान देय राहील.

त्यामुळे अंदाजपत्रकात सुमारे रु. ४ कोटीची तुट निर्माण होणार आहे. दहाव्या वित्त आयोगाची ही पंच वार्षीक मुदत संपल्यामुहे रु. ७० लाखाचे अनुदान महानगरपालिकेस प्राप्त होणार नाही. सद्यः परिस्थितीतील वसुलीचे प्रमाणे विचारा घेता चालु आर्थिक वर्षात ३५ ते ४० कोटीची अर्थसंकल्पात तुट निर्माण होऊ शकते.

उपरोक्त बाबींचा विचार करता आता नवीन कामे हाती घेण्याबद्दल अडचण निर्माण झाली आहे. करीता या बाबतीत मा. स्थायी समिती सभेने मार्गदर्शन करावे.

**संवाद :**

**मा. सभापती** : मनपाची आर्थिक परिस्थिती बाबतचा प्रस्ताव प्रशासनाने स्थायी समिती समोर ठेवलेला आहे. अहवाल स्थायी समिती समोर ठेवला व स्थायी समितीनेच विविध प्रस्तावास मंजुर दिली व म्हणुनच मनपाची आर्थिक परिस्थिती ढासळली. यातुन प्रशासन सुटेल व सभागृह अडके असा काही प्रकार होऊ नये.

**मा. आयुक्त** : मनपाची सध्याची आर्थिक परिस्थिती काय आहे. वस्तुस्थिती समोर ठेवली आहे.

**मुख्यलेखाअधिकारी :** सदर प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्याचे कारण म्हणजे आर्थिक बाबींसाठी स्थायी समिती सक्षम आहे. महानगरपालिकेला विविध देणे आहे. सध्याची महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजुक आहे. शासनाकडुन जे अनुदान मिळणार होते. त्यापैकी दि. २७-०७-२००१ रोजी शासनाने परिपत्रक काढुन १० कोटी रु. अनुदनापैकी ५ कोटी रुपये मिळणार आहे. असे दिले आहे. तसेच सन २००१-२००२ च्या अर्थसंकल्पात

जकातीचे खाजगीकरण करण्याबाबत निर्णय घेतला व जकातीमधुन जास्तीत जास्त उत्पन्न प्राप्त होईल त्यादृष्टीने आपण बजेट मंजुर केले व त्या विभागातील २०० कर्मचारी इतर विभागात देऊन वसुलीचे जास्तीत जास्त प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न होणार होते. जकातीचे खाजगी करणाबाबत टेंडर काढले. परंतु ती प्रक्रिया पुर्णतः बारगल्ली आहे. सध्याची जकात वसुली सुध्दा म्हणावी तशी आलेली नाही. ऑक्टोबर पर्यंतची एकुण वसुली ४७.६७ कोटी झालेली आहे. यामध्ये जकात मालमत्ता, पाणीपट्टी वसुली हे सर्व आलेले आहे. माहे ऑक्टोंबर पर्यंतचा प्रत्यक्ष खर्च ४९.६५ कोटी झालेले असून जवळपास १.९८ कोटी रुपये जास्तीचा खर्च झालेला आहे. आता बरेच प्रस्ताव नगरसेवकांचे वार्डातील विविध कामे करण्याबाबत प्राप्त होत आहे. परंतु परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की, यापुढे कोणतेही नवीन काम आपल्याला करता येणार नाही. जी कामे देखभाल दुरुस्तीची आहे. तीच कामे करता येतील. त्यामध्ये लाईट, ड्रेनेज पाणीपुरवठा संबंधीची देखभाल दुरुस्तीची कामे आपल्याला करता येतील. या परिस्थितीचा आढावा मा. आयुक्तांच्या बैठकीत सुध्दा घेण्यात आलेला आहे. चालु आर्थिक वर्षात ३५ ते ४० कोटी रुपये आपल्या बजेटनुसार तुट येणा असून, यामध्ये प्रामुख्याने शासनाकडुन येणार अनुदान जकातीमध्ये होणारी तुट तसेच बजेटमध्ये मालमत्ता वसुलीचे सुध्दा टारगेट दिलेले होते. त्याचप्रमाणे सिडकोचे मनपाकडे हस्तांतरण होईल. मनपास सिडकोकडुन ४ कोटी रुपये येणार असे अपेक्षीत धरलेले होते. ती सुध्दा कार्यवाही झालेली नाही.

मालमत्ता कराचे उद्दीष्ट गेल्या वर्षी १० कोटीचे होते. यावर्षी २४ कोटीचे ठेवण्यात आले. कारण की, जकातीचे खाजगीकरण होईल व तेथील कर्मचारी मालमत्ता वसुलीसाठी होता येतील या विचाराने उद्दीष्ट जास्त ठेवण्यात आले. जे अंदाज बांधलेले होते. ते आजच्या वेळी पुर्ण अंमलात आलेले नाही. अर्थसंकल्पात जी वसुली गृहीत धरलेली होती ती वसुली होणार नाही असे चिन्ह आहे. मागील वर्षा स्पील ओव्हरची १९.४३ कोटीची कामे आपण केलेली आहेत. चालु वर्षी सुध्दा १५.७६ कोटीची कामे करण्यात आलेली आहेत. अतिरिक्त शहर अभियंता शहर अभियंता, पाणी पुरवठा या तीन विभागासाठी एकुण ४२ कोटी, ४५ लाख रुपयांची तरतुद केलेली होती. शासनाकडुन आपल्याला १० कोटी ऐवजी ५ कोटी येणार आहेत. ८ कोटीचा आराखडा तयार करुन शासनाकडे पाठविलेला आहे. तेही अनुदान शासनाकडुन येणे बाकी आहे. म्हणुन चालु आर्थिक वर्षात आता यापुढे कोणतेही नवीन कामे हाती घेता येणार नाहीत. या दृष्टीकोनातुन हा प्रस्ताव स्थायी समितीच्या निर्दशनास आणुन देऊ इच्छितो.

**श्री. सलीम पटेल :** ज्या कामाचे टेंडर झालेले आहे ती कामे होणार की नाही, खुलासा द्यावा.

**मा. आयुक्त** : माझ्याकडे सध्या १.०० कोटीची कामे पडलेली आहेत. ज्या कामाचे करारनामा झालेली आहे. ज्या कामाचे सर्व ऑर्डर झालेल्या आहेत ती कामे करण्यात येतील.

**मा. सभापती** : ज्या कामावर बजेट धडे पडलेले आहे ती कामे करण्यास काहीही हरकत नाही अशा कामाने रक्कम आज द्यायची नसुन चार महिन्याने द्यायचे आहे.

**मा.आयुक्त** : बजेटमध्ये दरवर्षी मालमत्ता कराचे १० कोटीचे उद्दीष्ट असे. परंतु यावर्षी २४ कोटीचे ठेवण्यात आले. तसेच पाणीपट्टीचे उद्दीष्ट १० ऐवजी १५ कोटी, जकातीचे खाजगीकरण होईल यादृष्टीने ६१ कोटी ठेवण्यात आलेले होते. वरीलपैकी जकातीमध्येच फक्त वसुलीत थोडीफार वाढ झालेली आहे. महाराष्ट्रात जकात वसुलीत आपली महानगरपालिका पुढे आहे. गेल्यावर्षीपेक्षा सुमारे १०५ कोटी जास्त आहे. आपणांस रक्कमा अदा करण्याचे मोठे प्रस्ताव आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण २ कोटीपैकी ५० लाख, रस्ते विकास महामंडळ एम. ई. आर. सी. २७ कोटी देणे आहे. याबद्दल मार्गदर्शन व्हावे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** मनपाची आर्थिक परिस्थिती नाजुक आहे. यास जबाबदारी कोण आहे? ज्यावेळी देणी द्यायची त्यावेळी विचारार्थ प्रस्ताव सभागृहाकडे येतात. मागील वेळेस या सभागृहाने मारुती गाडया खरेदी करण्याची आवश्यकता नाही असे मत मांडले होते का खरेदी केल्या. मारुती गाडया खरेदी करण्याची गरज नव्हती.

**मा. सभापती** : ज्या कामासाठी बजेट पडलेले आहे ती कामे करणे आवश्यक आहे. इतर नवीन कामे करता येणार नाही. असे प्रशासनो मत व्यक्त केले.

**श्री. सलीम पटेल :** ज्या कामाचे टेंडर, अंदाजपत्रक तयार केलेले आहे अशी सर्व कामे करण्यात यावीत.

**मा. आयुक्त** : कसे करावे ते दाखविण्यात यावे. ज्या कामाचे करारनामा झाला, निविदा मंजुर झाल्या ते करणार नविन करता येणार नाही. झोपडपट्टी अंतर्गत ५% दलीत वस्तीची कामे बंद होणार नाही. एकुण १३५ कोटीचा अर्थसंकल्प आपण ठेवलेला आहे. जवळपास ८० कोटीच वसुल होतील असे गृहीत धरुन यामध्ये स्पील ओव्हरची २० कोटीची कामे आपण केलेली असून, अतिरिक्त शहर अभियंता यांचे विभागातील ४ कोटी, शहर अभियंता यांचे विभागातील ६ कोटी तसेच पाणी पुरवठा विभागातील ८ कोटी अशी एकुण २० कोटची कामे केलेली आहे. आतापर्यंत ४२.५ ऐवजी २०+१६=३६ कोटी मंजुर झाले आहे.

**मा. सभापती** : बजेटचा विचार केल्यास गेल्या ५ महिन्यामध्ये फक्त ३०% वसुली झाली असे दिसुन येते. वसुली झाली नाही व त्यामुळे कामे करता येत नाही. यास प्रशासन जबाबदार आहे. सभागृह नाही.

**श्री. सलीम पटेल :** टेंडर काढलेल्या कामांना मान्यता द्यावी. पुढील वर्षामध्ये ती कामे करण्यात यावी.

**मा. आयुक्त** : अशा कामांना मंजुरी देण्यात येईल. पुढील वर्षी ती कामे हाती घेण्यात येतील.

**श्री. किशोर शिंदे :** एकाच वार्डामध्ये १ कोटीच्या वर विकास कामे झाली. काही वार्डात एकही कामे झाले नाही यास जबाबदार कोण आहे. मा. आयुक्तांनी जातीने लक्ष देणे गरजेचे आहे.

**मा. सभापती** : आताच लेखाधिकारी यांनी खुलासा केला की, जकातीचे खाजगीकरण होणार होते. तेथील कर्मचारी मालमत्ता वसुलीसाठी देणार याचा अर्थ वसुली जास्त झाली असती. जकातीचे खाजगीकरण आले नाही तर मालमत्ता व पाणीपट्टी वसुली करणार नाही का? इतर कर्मचारी देऊन ही वसुली करणे आवश्यक आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** वसुलीचे काम थांबलेले नाही. परंतु जेवढी व्हावयास पाहिजे तेवढी झालेली नाही. मालमत्ता वसुली ही २६ कोटींची आहे. ही थकबाकी १० वर्षापुर्वी पासुनची असून, थकीत ४ कोटी रुपये यावर्षी वसुल केलेले आहे.

**श्री. साहेबराव कावडे :** महानगरपालिकेची जनतेकडे असलेली थकीत रक्कम सुल करण्यासाठी प्रशासनाने वेळीच प्रयत्न करावे. वसुलीमध्ये कोणी नगरसेवक हस्तक्षेप करणार नाही. कोणी हस्तक्षेप केल्यास त्या सदस्यांचे नांव सभागृहात सादर करावे. परंतु अधिकारीच वसुलीच्या बाबतीत दोषी ठरत असतील तर, त्यांचेवर मा. आयुक्तांनी कडक कार्यवाही केली पाहीजे. शहरातील काही इमारती होऊन १० वर्ष झाले. त्यांना अद्याप कर लावण्यात आलेला नाही. लाखो रुपयांचे मनपाचे नुकसान होत आहे. याचा विचार मा. आयुक्तांनी करावा.

**मा. सभापती** : शासनाकडुन मनपास जे अनुदान प्राप्त होत होते. त्यापैकी जिल्हा नियोजन मंडळाकडुन किती अनुदान येत आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** जिल्हा नियोजन मंडळाकडुन जे विकास आराखडयासाठी मिळणारे २३.३३% अनुदान आता शासनाने बंद केलेले आहे.

**मा. सभापती** : अर्थसंकल्पातील पान क्र. ५८ वर नमुद केल्याप्रमाणे उद्यान मधील कचऱ्यांचे आपण सध्या काय करतो.

**मुख्यलेखाधिकारी :** कचरा आपण सध्या विक्री करीत नाही. खत निर्मिती करतो आहे. शासनाकडे अनुदानाची मागणी करावयाची झाल्यास ३ वर्षाचे रेकॉर्ड दाखवावे लागतील.

**मा. सभापती** : प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**श्री. साहेबराव कावडे :** मागील १० वर्षापासुन इमारतीचा कर वसुल करण्यात आलेला नाही. का वसुली होत नाही.

**मा. आयुक्त** : २५ वर्षापासुनची वसुली आहे. मागील वर्षापेक्षा यावर्षी ४.५० कोटीची वसुली जास्त झालेली आहे.

**मा. सभापती** : यावर्षी मालमत्ता कर वसुलीत ४.५० कोटीची वाढ झाल्याने मा. आयुक्त व अधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्तावावर विचार विनिमय करण्याकरीता सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

## ऐनवेळचा विषय

**नगरसचिव** : (प्रस्ताव वाचुन दाखवतात विद्युत साहित्य खरेदी संबंधी)

**विषय क्र. ५६/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहरातील पथदिव्यांच्या दुरुस्तीकरीता चोक व टयुब रोड खरेदी करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १९,९४,०००.०० च्या अंदाजपत्रकास विषय क्र. २६/२ दिनांक ०८-०८-२००१ अन्वये मा. स्थायी समितीची मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदरील विद्युत साहित्य खरेदी

करण्याकरीता निविदापत्रके मागविण्यता आली. असता निविदापत्रके विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण पाच कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत सदरील पाचही निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

**तक्ता क्रमांक -१**

| अ. क्र. | साहित्याचा तपशील | मे. सुर्या रोशणी लि. | क्रॉम्प्टन ग्रीव्हज | बजाज इलेक्ट्रीकल्स | फिलीप्स इंडिया लि. | फिन्सो लाईट इंडस्ट्रिज |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ७० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प | २८५-०० | ३०५-०० | २९१-०० | ३५८-०० | २७२-०० |
| २. | १५० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प | ४६३-०० | ४७४-३४ | ४१९-०० | ४९५-१० | ३९५-०० |
| ३. | २५० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प | ६२३-०० | ६२८-२० | ५९९-०० | ६००-०० | ५२०-०० |
| ४. | ७०/१५०/२५० वॅट इग्नायटर | १०४-५० | १२८-०० | १०६-०० | १८२-४० | ९९-०० |
| ५. | ४० वॅट टयुबसाठी चोक | ९४-४० | ९५-४० | ९१-०० | १०६-०० | ८७-०० |
| ६. | ४० वॅट टयुब रॉड | ३३-०० | ३५-९१ | ३९-०० | ४४-३० | -- |
| ७. | ४० वॅट टयुब स्टार्टर | ५-१० | ६-९० | ५-९५ | १०-०० | ५-०० |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर व एजन्सी खालील प्रमाणे आहेत.

**तक्ता क्रमांक -२**

| अ. क्र. | साहित्याचा तपशील | कंपनीचे नांव | प्राप्त कमी दर (प्रति नग) |
|---|---|---|---|
| १. | ७० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प | मे. फिक्सोलाईट इंडस्ट्रीज | २७२-०० |
| २. | १५० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प | -//- | ३९५-०० |
| ३. | २५० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प | -//- | ५२०-०० |
| ४. | ७०/१५०/२५० वॅट इग्नायटर | -//- | ९०-०० |
| ५. | ४० वॅट टयुब चोक | -//- | ८७-०० |
| ६. | ४० वॅट टयुब रॉड | मे. सुर्या रोषणी लि. | ३३-८० |
| ७. | ४० वॅट टयुब स्टार्टर | मे. फिक्सोलाईट इंडस्ट्रीज | ५-०० |

वरील तक्ता क्र. २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे विद्युत साहित्य खरेदी करावयाचे झाल्यास खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ. क्र. | साहित्याचा तपशील | नग | सर्वात कमी प्राप्त दर | एकुण अपेक्षीत खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | ७० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प | १०० नग | २७२-०० | २७,२००-०० |
| २. | १५० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प | ६५० नग | ३९५-०० | २,५६,७५०-०० |
| ३. | २५० वॅट सोडीयम व्हेपर लॅम्प | ५२५ नग | ५२०-०० | २,७३,०००-०० |
| ४. | ७०/१५०/२५० वॅट इग्नायटर | १००० नग | ९०-०० | ९०,०००-०० |
| ५. | ४० वॅट टयुब चोक | १५०० नग | ८७-०० | १,३०,५००-०० |
| ६. | ४० वॅट टयुब रॉड | ८००० नग | ३३-८० | २,७०,४००-०० |
| ७. | ४० वॅट टयुब स्टार्टर | ८००० नग | ५-०० | ४०,०००-०० |
| | | | **एकूण खर्च** | **१०,८७,८५०=००** |

तक्ता क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे विद्युत साहित्य खरेदी करावयाचे झाल्यास तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे एकुण र. रु. १०,८७,८५०-०० इतका खर्च अपेक्षित आहे. म्हणजेच अंदाजपत्रकात दर्शविलेल्या रक्कमेपेक्षा रु. ९,०६,१५०-०० इतका खर्च कमी येणार आहे.

तरी तक्ता क्र. २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी प्राप्त दरानुसार संबंधित एजन्सीकडुन विद्युत साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** शहरामध्ये विविध ठिकाणी १० हायमास्ट दिवे लावण्यात आलेले आहेत. आवश्यकता नसतांना काही ठिकाणी लावण्यात आले असे हायमास्ट दिवे काढण्यात यावे.

**मा. सभापती** : प्रशासन नियमाने कार्यवाही करेल. विषय मंजुर करण्यात येत आहे. सभागृहातर्फे दिपावली निमित्त सर्वांना शुभेच्छा दिपावली सणानिमित्ताने शहरातील कोणत्याही भागात विद्युत दिवे बंद दिसणार नाहीत याची संबंधित विद्युत विभागाने दक्षता घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील पथदिव्यांच्या दुरुस्तीकरीता चोक व टयुब रॉड इ. खरेदी करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे ७० वॅट सोडी व्हे चोक, १५० वॅट सोडी, व्हेक चोक, २५० वॅट सोडी. व्हे. चोक, ७०/१५०/२५० वॅट इग्नायटर, ४० वॅट टयुब चोक व ४० वॅट टयुब स्टार्टन या साहित्याकरीता मे. फिक्सोलाईट इंडस्ट्रीट यांचे अनुक्रमे रु. २७२/-, ३९५/-, ५२०/-, ९४/-, ६७/-, व ५/- प्रतिनग या दरास आणि ४० वॅट टयुब रॉडसाठी मे. सुर्या रोषणी लि. यांचे रु. ३३-८० प्रति नग या दरास व त्या अनुषंगाने तक्ता क्र. २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे विद्युत साहित्य खरेदीसाठी लागणाऱ्या र. रु. १०,८७,८५०/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच " जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १५-१२-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. शनिवार दिनांक १५-१२-२००१ रोजी मा. सभापती, श्री. प्रशांत देसरडा, यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे सकाळी ११.३० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. सलीम पटेल समशेर पटेल | -//- |
| ३. | स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| ४. | श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली | -//- |
| ५. | श्री. औताडे रावसाहेब ममतु | -//- |
| ६. | स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | -//- |
| ७. | स. स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |

(सभागृहातर्फे दोन दिवसापुर्वी संसदेवरील हल्यात जे भारतीय जवान शहीद झाले त्यांना तसेच मनपातील विरोधी पक्ष नेते यांचे वडील स्व. बाबुलाल तुळशीबागवाले यांचे दुःखद निधन झाले. त्याचप्रमाणे मनपातील अधिकारी श्री. बनसोडे यांच्या आईचे दुःखद निधनाबद्दल ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

**विषय क्र. ५७/१ :**

दिनांक १३-११-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. भरत लकडे :** माझ्या वार्डातील मनपाच्या जागेवर अतिक्रमण होऊन एका व्यतीने स्वतःच्या नावावर पी. आर. कार्ड काढले आहे. त्यासंबंधी प्रशासन कार्यवाही करणार होते. आतापर्यंत काय कार्यवाही केली खुलासा करण्यात यावा.

**मा. सभापती** : याप्रकरणासंबंधी विधी सल्लागार यांनी एक टिप्पणी सादर केलेली आहे. सचिन यांनी सदर टिप्पणी सभागृहात वाचुन दाखवावी.

**नगरसचीव** : रामविहार हौसींग सोसायटीच्या मोकळया जागेबाबत सी. टी. एस. नं. १२१९९/१० सर्व्हे नं. ३८, प्लॉट क्र. १०, क्षेत्रफळ ७२१.५ चौ. मी. किराडपुरा या जागेबाबत श्री. हमीद खान यांनी विन्दा क्र. ९१६/२००१ हा दाखल केलेला होता.

सदरील प्रकरणी मा. न्यायालयाने महानगरपालिकेचे म्हणजे एकुण संबंधिताचा मनाई हुकुमाचा अर्ज दि. ०१-०१-२००१ रोजी फेटाळुन लावला आणि संबंधिताने विनंती केल्यानुसार अपिलाची मुदत संपेपर्यंत मा. न्यायालयाने " जैसे थे " या आदेश दिलेला होता. सदरील आदेशा विरुध्द वादीने अपील केलेले असून, व अपिलामध्ये श्रीराम गृहनिर्माण संस्थेस प्लॉट क्र. १०, सी. टी. एस. नं. १२१९९/१० हा महानगरपालिकेतर्फे सोसायटीच्या

ताब्यात दिला असून, त्यांची ताबा पावती मा. न्यायालयात सादर केल्याने मा. न्यायालयाने दि. १८-१२-२००१ पर्यंत " जैसे थे " चा आदेश देवुन प्रकरण अंतीम सुनावणीसाठी ठेवण्यात आलेले आहे.

सदरील ताबा पावती मालमत्ता विभागातील शाखा अभियंता यांनी दि. ०३-१२-९६ रोजी करुन दिल्याने त्यास मा. आयुक्तांनी मान्यता होती का? ही बाब पाहणे जरुरी आहे. तसेच न्यायालयाच्या निर्णय महानगरपालिकेच्या बाजुने प्राप्त करुन घेण्याचे दृष्टीने सदरील ताबा पावती सुध्दा रद्द करणे आवश्यक वाटते.

करीता या प्रकरणी ताबा पावती व त्यासंबंधीची मुळ रेकॉर्ड प्राप्त करुन न्यायालयात सादर करण्यासाठी मालमत्ता विभागाकडुन तात्काळ प्राप्त काढण्यासाठी प्रकरण वरीष्ठाच्या अवलोकनार्थ सादर करुन संचिका मालमत्ता विभागाकडे वर्ग करण्यात आली आहे.

**श्री. भरत लकडे :** मालमत्ता विभागाकडुन प्राप्त झालेली सर्व कागदपत्रे न्यायालयाच्या निर्दशनास आणुन देण्यात आलेली आहे का? नसता दोन दिवसानंतर अंतीम सुनावणी होऊन संबंधितांच्या बाजुने निकाल लागेल.

**उपआयुक्त (म.) :** स. सदस्य श्री. भरत लकडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या बाबतीत विधी सल्लागार या विभागाकडुन सादर झालेली टिप्पणी आताच सचिवांनी सभागृहाच्या माहितीसाठी वाचुन दाखविलेली आहे. न्यायालयाचा निकाल लावल्यानंतर ती जागा मनपाच्याच नावाने होईल. तसा दावा मनपातर्फे न्यायालयात करण्यात आलेला आहे. जी ताबा पावती दिलेली आहे ती आज आपल्या रेकॉर्डवर आलेली आहे ती बनावट किंवा खोटी आहे का? याची तपासणी करुन ती रद्द करण्यासाठी येत्या १८ तारखेला मनपामार्फत ॲडव्होकेट श्री. सोमन हे सुनावणीसाठी हजर राहुन ही ताबा पावती रद्द करणार आहेत. त्यामुळे मनपाची जागा ही मनपाच्या नावाने होईल. मुळ संचिका अद्याप उपलब्ध झालेली नाही. ताबा पावती देण्याबाबत मा. आयुक्तांना अधिकार आहे. त्याशिवाय ताबा पावती देता येत नाही. ताबा पावती खोटी बनावटे आहे का याबाबतची सर्व माहिती सादर करुन रद्द करुन घेतली जाईल व मनपाच्या नावाने ती जागा होईल.

**डॉ. आशा बिनवडे :** इतिवृत्तातील पान क्र. ५ वर जो प्रश्न मी उपस्थित केला होता त्याचे उत्तर दिलेले नाही. दोन दिवसात आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना उत्तर देण्याचे आदेश मा. सभापती यांनी केलेले होते. त्यांनी उत्तर का दिले नाही. यावर मागील बैठकीत चर्चा झाली व मा. आयुक्तांचे स्टेटमेंट आहे की, माहिती का दिली नाही. म्हणुन त्यांचा लेखी खुलासा घेण्यात येईल. त्यानुसार मा. आयुक्तांनी लेखी खुलासा घेतलेला आहे का? संबंधित अधिकारी मागील बैठकीत नव्हते. आज सुध्दा उपस्थित नाहीत.

**मा. सभापती :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पल्स पोलीओच्या बैठकीला गेलेले आहे. माझी त्यांनी परवानगी घेतलेली असुन १२.३० वाजेपर्यंत येईल असे आश्वासन त्यांनी दिलेले आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** मागील इतिवृत्त कायम, होत असतांना त्यातील प्रश्नाच्या खुलासा जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत इतिवृत्त कायम करता येणार नाही. विषय क्र. १ इतिवृत्त कायम करण्याचा प्रस्ताव स्थगित ठेवता विषय क्र. २ पासुन चर्चेस सुरुवात करावी. आयुर्वेदिक, होमीओपॅथीचे डॉक्टर्स ॲलोपॅथीची

प्रॅक्टीस करतात. हा एक माझा प्रश्न होता गेल्या ७ वर्षापासुन काम करतात. काय कार्यवाही केली, १९९६ चा अहवाल अद्याप झालेला नाही.

**मा. सभापती** : आरोग्य वैद्यकीय अधिकारी दुपारी १२.३० वाजेपर्यंत येणार आहेत. त्यांचेकडुन माहिती घेऊन इतिवृत कायम केले जाईल. इतिवृत्तातील पान क्र. ३ वर गुरुरामदासनगर येथील इमारतीच्या संदर्भात संबंधित व्यक्तीला नोटीस देणार होते. आतापर्यंत प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. माहिती देण्यात यावी.

**सहाय्यक संचालक नगररचना :** संबंधित व्यक्तींचा राहण्याचा पत्ता घेतलेला आहे. आवश्यक कागदपत्रे दाखल करण्यासंदर्भात रजिष्टर्ड पोस्ट ए. डी. ने. नोटीस दि. ०७-१२-२००१ ला पाठविण्यात आलेली आहे. त्याची पोच पावती अद्याप आलेली नाही. या प्रकरणामध्ये न्यायालयीन प्रकरण झालेले असून, संचिका उपलब्ध नाही.

**मा. सभापती** : विधी सल्लागार यांनी यासंबंधी माहिती द्यावी.

**विधी सल्लागार** : आमच्याकडे जी संचिका आहे ती बांधकाम परवानगीची नाही. सुखबीरसिंग तारासिंग नावाने १९९० ला दावा दाखल झालेला आहे. न. भु. क्र. १२८४३/९ १२८४३/१० जालना रस्ता संबंधी बांधकाम परवानगी संदर्भात दावा दाखल झाला आहे. कार्यालयातर्फे त्यांना कलम २६० अन्वये नोटीस दिलेल्या आहेत त्यास आव्हान देण्यात आले संचिका क्र. ४४४/७०/८५ दि. १५-०४-८६ अन्वये बांधकाम परवानगी दिली. मनपा/नर/३५१९/९० दिनांक ०६-०६-९० अन्वये स्थगिती आदेश पोस्टाने पाठविले आहे.

**उपआयुक्त (म.)** : यामध्ये दोन वेगवेगळे प्रश्न आहेत. संबंधिताला नोटीस दिल्यानंतर बांधकाम परवानगी घेतलेली आहे का हे पहावे लागेल. नगररचना विभागामध्ये नोंदवहीतील नंबर घेऊन पुढील कार्यवाही करावी लागेल. एका प्रकरणात एक आय. आर. दाखल केले आहे.

**सहाय्यक संचालक नगररचना :** या विभागामध्ये या प्रकरणाची संचिका नाही. रेकॉर्ड नाही.

**श्री. भरत लकडे :** या प्रकरणाची संचिका गहाह झालेली असून, कोणतेही रेकॉर्ड नगररचना विभागामध्ये नाही असे अधिकारी सांगतात. यास जबाबदार कोण? संबंधितावर काय कार्यवाही प्रशासन करणार आहे?

**मा. सभापती** : संचिका मनपाकडे नाही तर उपआयुक्त (म.) पुढील कार्यवाही काय करणार आहेत, खुलासा द्यावा.

**उपआयुक्त (म.) :** संबंधितास नोटीस दिलेली आहे. नोटीस घेऊन संबंधितांनी सर्व कागदपत्रे सादर केली नाही तर, पोलीस गुन्हा (एफ. आय. आर.) दाखल करावा लागेल. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती** : आताच विधी सल्लागार यांनी गुरु रामदासनगर येथील जागेचे प्रकरणाबाबत खुलासा केला. परंतु काहीही ऐकावयास आलेले नाही. याचा संबंधित अतिरिक्त शहर अभियंता यांनी गांभीर्याने विचार करुन पुढील बैठकीपर्यंत अधिकारी यांना खुलासा करण्यासाठी सभागृहात माईकची व्यवस्था करण्यात यावी. या अगोदर सुध्दा बऱ्याच वेळा यासंबंधी सभागृहात चर्चा झालेली असतांना अधिकारी कार्यवाही करीत नसतील तर सभागृहाला वेगळी भुमिका घ्यावी लागेल. माईक का लावण्यात आलेला नाही, खुलासा करण्यात यावा. सदस्यांनी पैसे जमा करुन माईकची व्यवस्था करायची का? असा प्रश्न निर्माण होतो.

**अति. शहर अभियंता :** सभागृहात माईक लावण्याबाबतची संचिका मंजुरीसाठी सादर केलेली आहे. मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ कार्यवाही करण्यात येईल.

(दुपारी १२.३० पर्यंत आरोग्य वैद्यकीय अधिकारी सभागृहात उपस्थित न झाल्याने पुन्हा विषय क्र. १ वर चर्चा होते.)

**मा. सभापती** : आता दुपारचे १२.४० वाजले असून, आरोग्य वैद्यकीय अधिकारी झालेले नाहीत. विषय क्रमांक १ वर काय निर्णय घ्यायचा तो सभागृहाने ठरवावे.

**डॉ. आशा बिनवडे :** विषय क्र. १ संबंधी खुलासा करण्यासाठी अधिकारी नही तर इतिवृत्त कायम करता येणार नाही. पुढील बैठकीत घेण्यात यावे. आयुवैदिक, होमीओपॅथीचे डॉक्टर्स ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करतात हा सुध्दा मुद्दा उपस्थित केलेला होतो.

**मा. सभापती** : आरोग्य विभागाच्या संदर्भात इतिवृत्तामध्ये जो वृत्तांत सादर केलेला आहे तो पुढील सभेच्या वेळी विषय क्र. १ वर चर्चेसाठी सादर करण्यात यावा. उर्वरीत विषय क्र. १ इतिवृत्तांत कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक १३-१०-२००१ च्या सभेतील सर्वसाधारण चर्चेतील आरोग्य विभागासंबंधीचा वृत्तांत वगळुन उर्वरीत वृत्तांत व सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५८/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वर्ग-४ संवर्गातील कामगारांना स्थायी समितीच्या ठराव क्र. ४ दिनांक ०८-०८-२००१ अन्वये दैनिक वेतनात रु. १५/- ची वाढ करण्यास मान्यता देण्यात आली नाही. त्याप्रमाणेच सध्या विद्युत लाईनमनला दैनिक वेतनाचा दर रु. १५/- ने वाढविण्यास प्रशासनाचे मत आहे.

करीता विद्युत विभागातील दैनिक वेतनावरील लाईनमन जे सेवा भरती नियमानुसार शैक्षणिक अर्हता धार करीत आहेत अशा दैनिक वेतनावरील विद्युत लाईनमत यांना दैनिक वेतनाचा दर रु. ७५+१५=९०/- रु प्रमाणे देण्याचा प्रस्ताव निर्णयास्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. भरत लकडे :** दैनिक वेतनावर किती लाईनमन कर्मचारी कार्यरत आहेत. त्याचे दैनिक वेतनामध्ये वाढ केल्यास मनपावर किती आर्थिक बोजा पडणार आहे, खुलासा द्यावा.

**मुख्यलेखाधिकारी :** एकुण २४ लाईनमन दैनिक वेतनावर असून, सध्या त्यांना ७५/- रुपये दैनिक वेतन देण्यात येत आहे.

**श्री. नंदकुमार फुलारी :** दैनिक वेतन रु. ९०/- ऐवजी रु. १००/- करण्यात यावे.

**मा. सभापती** : अस्थायी लाईनमन यांना दैनिक वेतन रुपये १००/- करण्यास मंजुरी देण्यात येते. दैनिक वेतनामध्ये २५/- रुपयांनी वाढ केलेली आहे.

**श्री. भरत लकडे :** दैनिक वेतन वाढवुन दिल्यानंतर शहरातील सर्व लाईटची व्यवस्था होईल का? कामामध्ये काही प्रमाणात वाढ होईल का?

**श्री. मधुकर सावंत :** मनपाचे लाईनमन हे ठेकेदारी पध्दतीवर जास्त प्रमाणात कामे करतात त्यामुळे मनपाच्या कामावर दुर्लक्ष होते. जनतेच्या तक्रारीचे निवारण वेळेवर होत नाही.

**मा. सभापती** : संबंधित कर्मचाऱ्यांमधुन जास्तीत जास्त काय करुन घ्यावे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या निर्णयानुसार विद्युत विभागातील दैनिक वेतनावरील लाईनमन जे सेवा भरती नियमानुसार शैक्षणिक अर्हता धार करीत आहेत अशा दैनिक वेतनावरील विद्युत लाईनमन यांना दैनिक वेतनचा दर रु. ७५+२५=१०० रुपये प्रमाणे देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९/३ :**

मा. महापौर, महानगरपालिका औरंगाबाद यांचे दिनांक ३०-१०-२००१ च्या पत्रानुसार त्यांचे कार्यालयीन वापराकरीता हुडामी ॲसेंट जी. एल. एस. वातानुकुलीत कार खरेदी करावयाची असून, त्यांचे वापरातील सध्याची कार एम. एच-२०/यु १४९२ ही उपमहापौर यांच्यासाठी वापरता येईल.

महानगरपालिकेची जुनी ॲम्बेंसेडर कार एमएच-२०/८२२२ ही पुर्वीच मोडीत काढुन लिलावात विक्री पण केलेली आहे. त्याजागी दुसरी कार अद्यापी घेतलेली नाही. त्यामुळे त्यांचे जागी ही नवीन कार मा. महापौर यांचे कार्यालयीन वापरासाठी घेता येईल.

नवीन वाहने खरेदी करु नये म्हणुन शासनाचे निर्देश आहेत. तथापि स्थायी समितीन याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे जरुरी आहे.

मे. धुत मोटर्स, वाळुज, जि. औरंगाबाद यांनी कारसाठी दरपाक दिले असून, ते खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १. हुंडामी ॲसेंट जी. एल. एस मॉडेलची वातानुकुलीत कार | र. रु. ६,१३,४०२-०० |
| पी डी. आय हँडलींग, नंबर प्लेट | र. रु. १,०००-०० |
| २. मनपा औरंगाबादची १.५% जकात | र. रु. ९,२१६-०० |
| ३. टेप कुरान, रिव्हॉलव्हींग लँप इत्यादी ॲक्सेसरीज खरेदी करण्यासाठी अंदाजे | र. रु. ५०,०००-०० |
| ४. विमा चार्जेस अंदाजे | र. रु. १५,४००-०० |
| एकुण | र. रु. ६,८९,०१८-०० |
| | र. रु. ६,८९,०००-०० |

नवीन कार घेण्यासाठी एकुण रु. ६,८९,०००/- खर्च येणार असून, मुख्य लेखाधिकारी यांनी वाहन खरेदी करीता या वित्तीय वर्षात आर्थिक तरतुद करण्यात आलेली नाही. तथापि " घसारा विधी " या लेखा शिर्षाखाली सदरील खरेदी करण्यास हरकत नसावी अशी शिफारस केली आहे. मा. आयुक्तांनी पण अतिरिक्त शहर अभियंता व मुख्य लेखाधिकारी यांनी केलेल्या शिफारशी नुसार कम खरेदीचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर निर्णयास्तव ठेण्यासाठी शिफारस केली आहे. तरी काम खरेदीसाठी मे. धुत मोटर्स, औरंगाबाद यांचे दरपत्रक मंजुर झाल्यास त्याप्रमाणे त्यांचेकडुन डिमांड ड्राफ्टद्वारे अदाई करुन कार खरेदी करण्यात येईल. ॲक्सेसरीज खरेदी करण्यासाठी दरपत्रके गोळा करुन कमी दर दिलेल्या

दरपत्रक धारकाकडुन खरेदी करण्यात येईल. तरी प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. मधुकर सावंत :** महापौरांसाठी कार घेण्यास हरकत नाही. परंतु त्याच बरोबर अगोदर कचरा उचलण्यासाठी ट्रॉली रिक्षांची आवश्यकता आहे. या संदर्भात सभागृहाने निर्णय सुध्दा घेतलेला आहे. त्याप्रमाणे आतपर्यंत का कार्यवाही करण्यात आलेली नाही. कचरा उचलल्या जात नाही. म्हणुन जनता आमच्याकडे तक्रारी करतात. यास जबाबदार कोण आहे?

**श्री. नंदकुमार फुलारी :** सदर कार खरेदीच्या संचिकेवर मा. आयुक्तांनी काय मत मांडले याचा खुलासा करण्यात यावा.

**अति. शहर अभियंता :** मुख्य लेखाधिकारी तसेच अतिरिक्त शहर अभियंता यांनी शिफारस केल्यानुसार मा. महापौरांसाठी कार खरेदी संदर्भात स्थायी समितीची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : यावरुन असे दिसुन येते. मा. आयुक्तांचे गाडी खरेदीसाठी मत नाही. संबंधित मुख्य लेखाधिकारी तसेच अतिरिक्त शहर अभियंता यांचेवर जबाबदारी टाकुन स्थायी समितीची मंजुरी घेण्यास सुचविले आहे. मा. आयुक्तांची मान्यता नाही. यात पोलीस केसेस वगैरे घेऊ शकतात. काही अडचणी आल्यास संबंधित मुख्य लेखाधिकारी तसेच अतिरिक्त शहर अभियंताच जबाबदार राहतील. ज्यावेळेस प्रभाग समिती सभापतींना कार (गाडया) खरेदी केल्या त्यावेळस या गाडीचा प्रस्ताव ठेवण्याची का जाणीव झाली नाही.

**अति. शहर अभियंता :** सभापती, प्रभाग समिती यांना गाडया खरेदीबाबत सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली होती. दुसऱ्या हेडमधुन गाडया खरेदी केलेल्या आहेत.

**मा. सभापती** : दुसऱ्या हेडमधुन गाडया खरेदी करतांना सुरुवातीस स्थायी समितीची मान्यता का घेतलेली नाही. सदर गाडया कोणत्या हेडमधुन खरेदी केलेल्या आहेत.

**डॉ. आशा बिनवडे, श्री. भरत लकडे :** त्यावेळसे स्थायी समितीला १० लाखाचे पावर असतांना चार गाडया खरेदीचा प्रस्ताव स्थायी समिती समोर का आलेला नाही. यास अधिकारी जबाबदार आहेत. योग्य तो खुलासा व्हावयास पाहिजे.

**अति. शहर अभियंता :** विरोधी पक्ष नेता यांचेसाठी जी कार पर्चेस केली त्याच धर्तीवर प्रभाग समिती सभापतींसाठी गाडया खरेदी करण्यात याव्यात असा निर्णय स्थायी समितीने घेतलेला होता. त्यानुसार गाडया खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

**श्री. मधुकर सावंत :** याच प्रस्तावामध्ये पान क्र. २ वर परिच्छेद क्र. २ मध्ये पहिल्या ओळीमध्ये नवीन गाडया खरेदी करण्यात येऊ नये असे शासनाचे स्पष्ट निर्देश असतांना का गाडया खरेदी केल्या जात आहेत. कचरा उचलण्यासाठी रिक्षा खरेदी कराव्यात. जी कार महापौरांसाठी अगोदर होती त्याच गाडीमध्ये २५ हजार रुपये खर्च करुन ए. सी. वगैरे काय बसवायचे ते बसवावे व इतर खर्च करुन जुनीच गाडी चांगल्या स्थितीत करण्यात यावी. या रक्कमेमध्ये रिक्षा खरेदी होती.

**श्री. सलीम पटेल :** तात्कालीन सभापती श्री अशरफ मोतीवाला यांचे पहिल्याच बैठकीत कचऱ्यासाठी रिक्षा खरेदीचा निर्णय घेण्यात आलेला होता. अद्याप रिक्षा खरेदी करण्यात आलेल्या नाहीत.

**मा. सभापती** : रिक्षा खरेदीची निर्णय घेतलेला होता. त्याबाबत काय कार्यवाही झाली माहिती द्यावी.

**अति. शहर अभियंता :** रिक्षा खरेदीची मान्यता अद्याप घेतलेली नाही. बजेटमध्ये तरतुद करुन कार्यवाही करावी लागेल.

**मा. सभापती** : पुढील बैठकीत अतिरिक्त शहर अभियंता यांनी कचरा उचलण्यासाठी रिक्षा खरेदीचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करावा. या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**श्री. मधुकर सावंत :** वार्डातील कचरा वेळेवर उचलल्या जात नाही म्हणुन जनता आम्हाला त्रास देते. रिक्षा खरेदी संदर्भात मा. आयुक्तांनी तात्काळ मान्यता देऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. सलीम पटेल :** हा प्रस्ताव दोन अधिकाऱ्यांचे संमतीने सादर झालेला आहे मा. आयुक्तांना या बाबतीत अगोदर निर्णय घेऊ द्यावा. नंतर स्थायी समिती समोर सादर करावा.

**मा. सभापती** : प्रस्ताव आपण मंजुर केलेला आहे. कचयासाठी लागणाऱ्या रिक्षा खरेदीचा प्रस्ताव सादर करण्यास संदर्भात अधिकाऱ्यांना सुचना दिलेल्या आहेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा. महापौर यांचे कार्यालयीन वापराकरीता हुडामी ॲसेंट जी. एल. एस. वातानुकुलीत कार खरेदी करण्यास व त्याचे आवश्यक ते ॲक्सेसरीज खरेदी करण्यास प्रस्तावित रक्कम रु. ६,८९,०००/- खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच मे. धुत मोटर्स औरंगाबाद यांचे दरपत्रकासही सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कार्यालयीन आदेश क्र. अस्था-१/२००१/१८६६/दि. २२-०६-२००१ अन्वये महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील कार्यरत दैनिक वेतन वाहन चालकांच्या वेतनात रु. ७५.७० वरु रु. ११४.५० अशी वाढ करण्यात आली आहे. महानगरपालिका अस्थापनेवर यांत्रिकी विभागात दैनिक वेतनावर " वेल्डर " म्हणुन कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यास वाहन चालका इतकेच दैनिक वेतन देण्यात येते.

वाहन चालकाच्या दैलिक वेतनात वाढ करण्यात आली असून, वेल्डर या पदावरील कर्मचाऱ्यास वाहन चालकांप्रमाणेच दिनांक ०१-०१-२००१ पासुन रु. ११४.५० प्रमाणे दैनिक वेतन देण्यास मान्यता मिळाली. महानगरपालिका अस्थापनेवर वेल्डर म्हणुन एकच कर्मचारी दैनिक वेतनावर कार्यरत आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा. सभापती** : प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका अस्थापनेवरील यांत्रिकी विभागात दैनिक वेतनावर " वेल्डर " म्हणुन कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यास दै. वे. वाहन चालकाप्रमाणेच दिनांक ०१-०१-२००१ पासुन रुपये ११४.५०/- प्रमाणे दैनिक वेतन देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबादर महानगरपालिका अस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द वेळोवेळी कार्यालयीन अनियमितता व प्रशासकीय प्रकरणात विभागीय चौकशा प्रस्तावित करण्यात येत असतात. सदरच्या विभागीय चौकशा महानगरपालिका अस्थापनेवरील कार्यरत वर्ग-१ दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे दिल्या जातात. संबंधित अधिकाऱ्यांना स्वतःच्या विभागाची कामे सांभाळुन अशा विभागीय चौकशा कराव्या लागतात. मनपा अस्थापनेवरील अधिकारी त्यांच्याकडील कामाच्या व्यापामुळे विभागीय चौकशी सारख्या प्रकरणांना पुरेसा वेळ देवु शकत नाहीत परिणामी चौकशी प्रकणे निर्धारीत वेळेत पुर्ण न होता प्रदिर्घ काळासाठी प्रलंबित राहतात.

उपरोक्त बाबींचा विचार करता भारतीय प्रशासनिक सेवेत निवृत्त अधिकारी/निवृत्त जिल्हा न्यायाधीश/निवृत्त अतिरिक्त जिल्हाधिकारी यांची चौकशीच्या कामकाजासाठी विशिष्ट मानधनावर नियुक्ती केल्यास चौकशी प्रकरणे एकाच अधिकाऱ्या मार्फत व निर्धारीत वेळेत निकाली निघू शकतील. या कामासाठी औरंगाबाद शहरात वास्तव्यास असलेल्या निवृत्त अधिकारी व न्यायाधिशांकडुन सविस्तर तपशीलसह अर्ज मागविण्यता येतील. मानधनाबद्दल वेळोवळी स्थायी समिती सभेस माहिती देण्यात येईल.

**संवाद :**

**डॉ. आशा बिनवडे :** विभागीय चौकशी करण्यासाठी मनपाचे अधिकारी/कर्मचारी यांचा वेळ वाचविण्यासाठी अशी प्रकरणे विभागीय आयुक्तांकडे पाठविण्या संदर्भात एक पत्र देऊन शिफारस करावी. जेणे करुन येथील कर्मचारी यांचा वेळ वाचते व त्या वेळात इतर वसुली वगैरे सर्व कामे वेळेवर करता येतील.

**उपआयुक्त (म.) :** विभागीय आयुक्त कार्यालयात दोन विशेष चौकशी अधिकाऱ्यांची पदे आहेत. त्यामध्ये पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग हे एकाकडे तर इतर शासनाचे विभगासाठी एक या विभागाकडे केसेसची संख्या जास्त असून, जेष्ठतेप्रमाणे केसेस निकाली काढल्या जातात. त्यास वेळ लागतो. परवाच मा. विभागीय आयुक्त यांनी सर्व केसेस काढुन अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचेकडे दिल्या आहेत. मा विभागीय आयुक्तांकडे संपर्क साधुन त्यांचे पॅनल वरील १ ते २ अधिकारी मिळतील का अशी मागणी केलेली होती. त्यावर त्यांचकडुन असे उत्तर मिळाले की, आमच्याकडेच भरपुर प्रकरणे असून, इतर अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचेकडे प्रकरणे विभागणी केलेली असून, त्यामध्ये सुध्दा निवृत्त उपजिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचेकडे प्रकरणे सुपुर्द केले आहे. त्यांचेकडे केसेस जास्त असल्यामुळे आपलेकडील प्रकरणे ते पाहु शकणार नाहीत. म्हणुन हा प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवण्यात आलेला आहे.

**मा. सभापती** : या अगोदर मनपाने काही प्रस्ताव मा. विभागीय आयुक्तांकडे चौकशीसाठी पाठविलेले आहे का?

**उपआयुक्त (म.) :** त्या विभागाकडे असलेल्या पॅनलवरील दोन अधिकाऱ्याची मागणी आपण केलेली होती. त्यांचेकडे जवळपास १००० केसेस असल्यामुळे जे अतिरिक्त कलेक्टर तसेच उपजिल्हाधिकारी आहेत. त्यांचेकडे चौकशीसाठी केसेस वाटप करण्यात आलेल्या आहेत. बीड व उस्मानबाद जिल्हाच्या केसेस माझकडे आहेत. त्यांचे पॅनलवरील अधिकारी आपल्याला मिळत नाही.

म्हणुन मनपातर्फे सुध्दा निवृत्त अधिकारी चौकशीसाठी नियुक्त करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

**श्री. भरत लकडे :** मुख्य लेखाधिकारी तसेच सहायक आयुक्त-१ यांचेकडुन सर्व प्रकरणे चौकशीसाठी सोपवावी. सर्व प्रकरणाची माहिती उपलब्ध होऊन चौकशी केली जाईल.

**उपआयुक्त (म) :** कर्मचारी / अधिकारी यांचे अशा प्रकरणातील विभागीय चौकशा करण्याकरीता प्रशासकीय सेवेत निवृत्त झालेले अधिकारी किंवा निवृत्त जिल्हा न्यायधीश असावेत यास प्राधान्य देणे योग्य होईल कारण विधी शाखेची पदवी प्राप्त असणाऱ्यांना केसेस मध्ये अडचण येत नाही. नांदेड मनपामध्ये सुध्दा अतिरिक्त जिल्हाधिकारी यांची चौकशी पॅनलवर नियुक्ती केलेली आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** आतापर्यंत किती प्रकरणे विभागीय चौकशीसाठी पॅनलवर कुणी अधिकारी आहे का? याची माहिती घेण्याची यावी. अहवाल प्राप्त झाल्यानंतर या प्रस्तावावर निर्णय घेण्यात येईल. तोपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यत येत आहे.

**उप आयुक्त (म) :** पुढील बैठकीत सविस्तर माहिती देण्यात येईल.

**मा. सभापती :** विभागीय आयुक्तांकडे पत्र पाठवून विभागीय चौकशीसाठी पॅनलवर कुणी अधिकारी आहे का? याची माहिती देण्यात यावी. अहवाल प्राप्त झाल्यानंतर या प्रस्तावावरं निर्णय देण्यात येईल. तोपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार विभागीत आयुक्तांकडे चौकशीसाठी पॅनलवर कुणी अधिकारी आहे का? याबाबतची माहिती घ्यावी. अहवाल प्राप्त झाल्यानंतर या प्रस्तावावर निर्णय घेण्यात येईल. तोपर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ६२/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेची विकासात्मक कामे सत्वरतेने व नियोजनात्मकरित्या होण्यासाठी आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९ (१) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार रु. ५०,०००/- आर्थिक मर्यादेपर्यंतचे खर्चाचे अधिकार तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये महानगरपालिकेतर्फे करावयाच्या रु. ५०,०००/- मर्यादेपर्यंतचे करारनामा करुन देण्यासंदर्भाचे अधिकार सदरचे आदेश निर्गमित झाल्याच्या तारखेपासुन उपआयुक्त (म.) महानगरपालिका औरंगाबा यांना स्थायी समितीचा मंजुरीच्या अधिन राहुन प्रदान करण्यात आले आहेत. स्थायी समितीच्या मान्यतेनंतर अधिकारांचा वापर सुरु होईल. प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**मा. सभापती :** प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेची विकासात्मक कामे सत्वरतेने व नियोजनात्मकरित्या होण्यासाठी आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९ (१) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार रु. ५०,०००/- आर्थिक मर्यादेपर्यंतचे खर्चाचे अधिकार तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये महानगरपालिकेतर्फे

करावयाच्या रु. ५०,०००/- मर्यादेपर्यंतचे करारनामा करुन देण्यासंदर्भाचे अधिकार उपआयुक्त (महसुल) यांना प्रदान करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेतील बऱ्याचशा कामामध्ये दर्जा व गुणवत्त राखली जात नाहीत, अशा तक्रारी येत असतात. तसेच वेळोवेळी वर्तमानपत्रातुन बातम्याही येत असतात. बऱ्याचशा निविदा ह्या निविदा रक्कमेपेक्षा फार कमी दराने प्राप्त संबंधित विभाग प्रमुखांचे याबाबतीत म्हणणे आहे की, त्यांच्याकडे मोठया प्रमाणावर छोटी व मोठया स्वरुपाची कामे असल्यामुळे प्रत्येक कामावर पुर्ण वेळ नियंत्रण ठेवणे शक्य होत नाही. याकरिता शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या तज्ज्ञ प्राध्यापकांमार्फत कामाचे पाहणी अहवाल मागवुन सदर कामाचे देयक दिले जाईल. जेणे करुन निविदेतील अटी व शर्ती व अंदाजपत्रकातील नमुद बाबी नुसार दर्जा व गुणवत्त राखुन काम केले जाईल. या कामाकरीता शासनाच्या नियमानुसार व शासनाने ठरविलेल्या दरानुसार मानधन दिले जाईल.

करीता महानगरपालिकेच्या विविध कामावर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राध्यापकांमार्फत परिक्षण (थर्ड पार्टी इन्स्पेक्शन) करण्यात येत आहे. करीता माहितीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. सलीम पटेल :** जी कामे मंजुर झाली व चालु आहेत अशाही कामाबाबतचे प्रस्ताव थर्ड पार्टीकडे तपासणीसाठी पाठविणार का?

**मुख्य लेखाधिकारी :** बऱ्याच कामाची कमी दराने निविदा सादर होतात. त्या कामाचा दर्जा तसेच गुणवत्ता चांगली असावी. कामे नियमाने होत नाही अशा बऱ्याच सदस्यांच्या तक्रारी असतात. तसेच या विकास कामात फरशी बसविणे, डांबरीकरणाची तसेच मोठमोठया पाईपलाईनचे कामाचा समावेश होतो. ही कामे चांगल्या प्रकारे व्हावीत म्हणुन कामाची गुणवत्ता व दर्जा चांगला असावा या दृष्टीकोणातुन वार्ड पार्टीकडुन याची तपासणीच्या कार्यवाहीस्तव प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

**श्री. सलीम पटेल :** किती रक्कमेपर्यंतच्या कामाची थर्ड पार्टीकडुन परिक्षण करणार याची मर्यादा ठेवावी. तसा निर्णय घेण्यात यावा. ५ लाखापर्यंत रक्कमेच्या कामाचे थर्ड पार्टीकडुन परिक्षण व्हावे. असा निर्णय घेण्यात यावा असे माझे मत आहे. कारण थर्ड पार्टीला सुध्दा टक्केवारीनुसार मनपस रक्कम द्यावी लागेल. यात मनपाचा पैसा खर्च होणार आहे.

**मा. सभापती** : खर्च कोण करणार आहे. खुलासा द्यावा.

**मुख्य लेखाधिकारी :** थर्ड पार्टीला मनपा मार्फत खर्च द्यावा लागणार आहे. यामुळे कामाची गुणवत्त चांगली राहील. प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या विविध कामाचे संदर्भात निविदेतील अटी व शर्ती व अंदाजपत्रकातील नमुद बाबीनुसार कामाचा दर्जा व गुणवत्ता राखुन काम करण्याचे दृष्टीने शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालयाच्या तज्ज्ञ प्राध्यापकामार्फत परिक्षण (थर्ड पार्टी इन्स्पेक्शन) करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

**मा. सभापती** : मागील बैठकीत सर्व नंबर ५४ मधील जागेच्या संदर्भात चर्चा झालेली होती. अहवाल प्राप्त झालेला आहे. या अहवालानुसार पाच लोकांना लिजवर जागा दिलेली आहे. त्या ठिकाणी एकुण ९ एकर जमीन मनपाची आहे. दीड एकर जमीन स्मशानभुमीसांठी दिलेली असून, दीड एकर जमीन पाच लोकांना लिजवर दिलेली आहे. अशी ३ एकर जमीन होत आहे. उर्वरीत ६ एकर जमीन कोठे आहे त्यावर अतिक्रमण आहे का? त्या अतिक्रमण आहे का? याबाबतचा खुलासा व्हावयास पाहिजे होता.

**मालमत्ता अधिकारी :** सदर उर्वरीत जागेवर २१ लोकांची घरे झालेली आहेत. १९६५ ला ले-आऊट झालेले आहे. घरे बांधण्यास मनपाने परवानगी दिलेली आहे. सदर जागेचा सातबारा मनपाचे नावाने तर पी. आर. कार्ड संबंधितांच्या नांवे आहे.

**मा. सभापती** : ले-आऊट कसा मंजुर झाला. यास कोण जबाबदारी घरे बांधण्यास परवानगी कशी दिली.

**श्री. मधुकर सावंत :** सर्वे नंबर ५४ महानगरपालिकेच्याच मालकीचा आहे. आजही सात बारा मनपाच्या नावाने आले. काही लोकांनी चुकीच्या मार्गाने जागा स्वत:च्या नांवाने करुन घेतल्या. यात आपले अधिकारी जबाबदार आहेत. पुन्हा उलट त्याच जागेवर इमारत बांधकामास परवानगी दिली त्यावेळी का चौकशी करण्यात आलेली नाही. या जागेचा महानगरपालिकेने आतापर्यंत शासनास ९ कोटी रुपये अकृषी कर (एन.ए.) भरलेला आहे. मनपास उत्पन्न म्हणुन फक्त ते २३ ते २४ हजार रुपये आतापर्यंत मिळालेले आहे. आता पुन्हा ९९ लाख रुपये एन. ए. पोटी भरण्यास मनपास शासनाची नोटीस आलेली आहे.

**मालमत्ता अधिकारी :** एन. ए. पोटी या जागेचा महानगरपालिकेने मा. जिल्हाधिकारी यांचेकडे रु. ९,७४,१६२/- रुपये भरणा केलेले आहे. ९ कोटी नाही.

**श्री. मधुकर सावंत :** यात सर्व काही घोळ झालेला आहे. अधिकारी सुध्दा यात गुंतलेले आहेत. याची कसुन चौकशी होऊन नियमाने अधिकाऱ्यांवर कार्यवाही व्हावी. सदर जागेवर अतिक्रमण करणाऱ्यांना नियमाप्रमाणे ८१ (ब) प्रमाणे जमीन रिकामी करुन देणे बाबत नोटीस अपील करण्यात यावी. ती जागा मनपाच्या नावांवर करण्याबाबत कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : सर्व्हे नं. ५४ ची जागा मनपाच्या ताब्यात येण्यासाठी सिटी सर्व्हे ऑफिसमध्ये काय कार्यवाही करण्यात आली.

**मालमत्ता अधिकारी :** सदर जागा मनपाच्या ताब्यात घेण्यासाठी तीन वर्षापुर्वी भुमी अभिलेख कार्यालयाकडे तसे अपील करण्यात आलेले आहे.

**मा. सभापती** : अपील केले तेव्हाच संबंधित अधिकारी यांना माहिती होते की, ही जागा मनपाच्या ताब्यात नाही. त्यावेळेच संबंधित लोकांवर नोटीस तामीळ करुन पुढील कार्यवाही व्हावयास पाहिजे होती. ती झालेली नाही.

**श्री. मधुकर सावंत :** महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१ नुसार संबंधित लोकांना नोटीस देऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी. जेणे करुन मनपाच्या मालमत्तेचे नुकसान होणार नाही.

**मा. सभापती** : सर्वे नं. ५४ मध्ये दीड एकर जागा स्मशानभुमीसाठी दिलेली असून, दीड एक जागा पाच लोकांना लीजवर अशी एकुण ३ एकर जागा नियमाप्रमाणे दिलेली असून, उर्वरीत ९ ऐकरपैकी ६ एकर जागा ही मनपाच्या ताब्यात नाही असे सिध्द होते. तीन वर्षापुर्वी ही जागा मनपाच्या ताब्यात यावी म्हणुन

सीटी सर्व्हे तीन वर्षापुर्वी ही जागा मनपाच्या ताब्यात नाही. असे माहित असतांना काहीही कार्यवाही केली नाही. फार गंभीर स्वरुपाची बाब आहे. मनपाच्या मालमत्तेचे संरक्षण करणे हे संबंधित विभागाचे काम आहे. त्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान या विभागाच्या माध्यमातुन होत आहे असे सिध्द होत आहे. या अनुषंगाने आता एक कमीटी तयार करुन संबंधित उपआयुक्त (महसुल) श्री. गुट्टे साहेब यांचे अध्यक्षतेखाली एक कमीटी तयार करुन योग्य ती चौकशी करुन सविस्तर अहवाल येणाऱ्या स्थायी समिती समोर ठेवण्यात यावा. त्यामध्ये सिटी सर्वे ऑफिसच्या माध्यमातुन काय कार्यवाही झाली जागा किती, ले-आऊट मंजुर केलेले आहे का, केव्हा केले, कुणी केले, यासंबंधी सर्व सविस्तर माहिती त्या अहवालामध्ये यावी.

**श्री. मधुकर सावंत :** ज्या लोकांना लिजवर जागा दिलेली आहे. त्यांचा सुध्दा करार संपलेला आहे. ती सुध्दा जागा मनपाच्या ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : याची सुध्दा चौकशी करुन लिजवर दिलेल्या जागेचा करार संपलेला असेल तर, जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी. जवळपास ४६ मालमत्ता लिज पध्दतीने दिलेल्या आहेत. या व्यतिरिक्त आणखी काही मालमत्ता असु शकतात. जवळपास ५० ते ५५ लिजवरील जागा असतील अशी शंका आहे. जी लिजवर दिलेल्या मालमत्तेची यादी सादर केलेली आहे याची पुन्हा चौकशी करुन व आणखी लिजवर दिलेल्या जागांची सुध्दा चौकशी करावी. याबाबत प्रशासकीय निर्णय काम घेणार आहेत. याचा सुध्दा खुलासा व्हावयास पाहिजे. तसा खुलासा अहवालात करण्यात यावा. उदाहरण द्यावयाचे झाल्यास पीपल्स बँकेच्या इमारतीमध्ये १२ दुकाने होत्या त्या लिजवर दिल्या, विकल्या असे काही प्रकार घडले यावर प्रशासन काय कार्यवाही करणार संबंधितांना नोटीस देऊन काय कार्यवाही करणार? याचा सर्व खुलासा अहवालामध्ये देण्यात यावा.

ऐनवेळी प्रशासकीय प्रस्ताव आलेले आहे. ते मंजुरीसाठी घ्यायचे किंवा कसे याबाबत सभागृहाने निर्णय घ्यावा. त्यानुसार चर्चा करता येईल.

**श्री मधुकर सावंत :** ऐनवेळी आलेले विषय न घेण्याचे आपण निर्णय घेतलेला आहे. ऐनवेळी कोणतेही विषय न घेता पुढील बैठकीत सादर करावेत.

**श्री. सलीम पटेल :** मनपामधील प्रभाग समितीचे जे सभापती आहेत त्यांचे गाडीमध्ये जे टेप वगैरे आणखी काही सुविधा देण्यात येत नाही. त्या देण्यात याव्यात. इरत पदाधिकारी यांचे गाडयामध्ये सर्व सुविधा दिल्या जातात.

**मा. सभापती** : प्रशासनाने नियमाने प्रभाग समितीच्या सभापती याचे गाडयांसाठी योग्य सुविधा देण्याबाबत कार्यवाही करावी. इतर पदाधिकारी यांचे गाडयामध्ये सुविधा दिल्या जातात. त्याप्रमाणे याही गाडयांमध्ये सुविधा देणे आवश्यक आहे.

याच बरोबरच " जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | स्थायी सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ०२-०१-२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तात. बुधवार दिनांक ०२-०१-२००२ रोजी मा. सभापती, श्री. प्रशांत देसरडा, यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे सकाळी ११.३० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. अशरफ युनूस मोतीवाला | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| ३. | स. स. श्री. सिध्द जगदिश कन्हैयलाल | -//- |
| ४. | स. स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग | -//- |
| ५. | स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | -//- |
| ६. | स. स. श्री. सलीम पटेल समशेर पटेल | -//- |
| ७. | स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली | -//- |
| ८. | स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| ९. | स. स. श्री. शेख इलियास किरमानी | -//- |
| १०. | स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतु पाटील | -//- |
| ११. | स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | -//- |

**विषय क्र. ६४/१ :**

सन १९९७-९८, १९९८-९९ व १९९९-२००० च्या लेखा परिक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** मागील बैठकीत चर्चा केल्याप्रमाणे नगररचना विभागाने संदर्भाने आपण काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी. मी वेळोवेळी नगररचना विभागातील प्रश्न विचारणा करतो. मात्र संबंधित अधिकारी योग्य ती माहिती देत नाहीत.

**मा. सभापती :** याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**मुख्यलेखापरिक्षक :** मागील सभेमध्ये वार्षीक अहवालावर चर्चा करण्यासाठी स्थायी समिती सभेमध्ये नियम चर्चेसाठी ठेवण्यात आलेला होता. तथापि स्थायी समिती सभा काही कारणास्तव होऊ शकली नाही. त्यामुळे या वार्षीक अहवालावर चर्चा झाली नाही. परंतु या सभेमध्ये नगररचना/मालमत्ता व कर आकारणी विभाग यांना त्यांचे विभागाकडील आक्षेपाबाबत अनुपालन संदर्भात सुचना दिलेल्या आहेत. आणि त्या विभाग प्रमुखांकडील संबंधित आक्षेपाचे अनुपालन जे आलेले आहेत. ते या अहवालात नमुद करुन घेण्यात आले. त्यानुसारच स्थायी समिती समोर तयार करुन ठेवण्यात आलेले आहे. आता सन १९९७-९८, ९८-९९ व ९९-२००० या तीन वर्षाचा वार्षिक अहवल एकत्रितरित्या आपल्यासमोर ठेवण्यात आलेला आहे. आता सुध्दा नगररचना विभागाकडुन जे आक्षेपाबाबतचे अहवाल प्राप्त झालेले नाहीत. त्याबाबत दिनांक ०१-०१-

२००२ पर्यंत ज्या ज्या विभागाने अहवाल सादर केला त्याचे अनुपालन अहवाल या सभेमध्ये सादर करीत आहे. कृपया या अहवालावर स्थायी समिती सभागृहात चर्चा करावी.

**मा. सभापती** : सन १९९७-९८ च्या लेखा परिक्षण अहवालावर विभागावर सभागृहात चर्चा करावी.

**मा. आयुक्त** : संबंधित विभाग प्रमुखांनी यावर चर्चा करुन नेमका खुलासा करावा व त्या पुढेही संबंधितांना वेळ पाहिजे असल्यास त्यांनी तशी वेळ सभागृहापुढे मागावी व त्यानुसार अहवाल सादर करावा.

**मा. सभापती** : लेखा विभागाकडे विना तजविज परत झालेल्या (न वटलेल्या धनदेशाबाबत) माहिती द्यावी.

**मुख्यलेखाधिकारी :** विभाग क्र. १ ते ७ व मालमत्ता विभाग तसेच जकात विभागाकडील असे एकुण र. रु. ३,६९,६३६/- अशाप्रकारे न वटलेल्या सन ९६-९७, ९७-९८ या वर्षातील धनदेशाची स्लम रु. ५,२३,८७५/- इतकी आहे. परंतु सदरील रक्कम वसुल न होणे प्रकरणी लेखा विभागाने वेळोवळी पत्राद्वारे संबंधित विभागास कळवुन सदरची रक्कम वसुल करण्यात आलेली आहे. संबंधित झोनने रक्कम वसुल करुन कार्यालयात जमा केलेली आहे. यामध्ये असे प्रकार आहेत की, संबंधित झोनला कराचे वसुलीसाठी चेक दिल्या जाते, मात्र त्या कालावधीत ते चेक वटल्या जात नाहीत व चेक बाऊन्स होतो. त्यामुळे अशी प्रकरणे विविध झोनमध्ये असल्याने संबंधितावर कार्यवाही करण्यासाठी झोनला कळविण्यात आलेले आहे. पृष्ठ क्र. ५ वर मुद्दा क्र. १ ते ५ पहा ज्या ज्या झोनकडील सहा-सहा महिनेपेक्षा अधिक कालावधीत धनादेश व वटवुन चेक बाऊन्स झालेले असतील त्यांचेवर तत्कालीन आयुक्त यांच्या मान्यतेने कार्यवाही करण्यासाठी कार्यालयामार्फत सुचना दिलेल्या आहेत.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** सहा-सहा महिने चेक न वटल्याबाबत कार्यालयाने काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

**मुख्य लेखा अधिकारी :** याबाबत वेळोवेळी संबंधित विभागांना तत्कालीन आयुक्त यांच्या मान्यतेने कळविण्यात आलेले आहे.

**मा. सभापती** : ॲक्ट प्रमाणे कार्यवाही केली आहे काय?

**मुख्यलेखाधिकारी :** निगोशिएबल इस्ट्रमेंट्स ॲक्ट संदर्भाने संबंधितांना वेळोवेळी पत्राने कळविले आहे.

**मा. आयुक्त** : संबंधित मालमत्ता धारकाकडे धनादेश न वटल्यानंतर कार्यालयाने तातडीने कार्यवाही केली काय? मागील डिमांड आता दाखविली आहे काय?

**मुख्यलेखाधिकारी :** होय ज्या झोनमध्ये संबंधित मालमत्ता धारकांनी दिलेले चेक बाऊन्स झालेले असतील त्यांना झोनमधील अधिकाऱ्यांनी त्यांचेकडील असलेली थकबाकी तातडीने वसुल करणे आवश्यक आहे. यासाठी झोन अधिकाऱ्यांनीच कार्यवाही करुन वसुलीची रक्कम कार्यालयात जमा करावी. असे आदेशीत केलेले आहे व त्याचे कडील मागील थकीत वसुली चालु वर्षातील डिमांडमध्ये वाढवुन दाखविण्यात आलेली आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** सन १९९७-९८ च्या वर्षाचे आक्षेप असा पर्यंत पुर्ण झालेले नाही तर आतापर्यंत काय केले.

**मा. आयुक्त** : सन १९९७-९८ मधील जे चेक बाऊन्स झालेले आहेत त्या वेळेपासुनच कार्यालयाने कार्यवाही करावयास पाहिजे होती. ती कार्यवाही वेळीच केलेली नाही. त्यामुळे अशा प्रकरणात संबंधित मालमत्ता धारकांवर नियमाप्रमाणे नोटीस बजावुन कार्यवाही करणे आवश्यक होते व त्यांचे डिमांडमध्ये वाढ करुनच प्रशासनाने कार्यवाही करावयास पाहीजे होती. ती केलेली नाही.

**मा. सभापती** : अशा प्रकारची अनेक विभागामार्फतची वसुली थांबल्याने आपण काय कार्यवाही करु शकतो.

**मा. आयुक्त** : अशा प्रकारची चेक बाऊन्स झालेले आढळल्यास प्रॉसिक्युशन ॲक्ट अन्वये संबंधितांवर १५ दिवसात कार्यवाही व्हावी. यापुर्वी सन १९९५-९६ ची वसुली १००% झालेली आहे काय? हे सुध्दा यावरुन पाहावे लागेल.

**मुख्यलेखाधिकारी :** ज्या वेळेस अशा प्रकारच्या घटना निर्दशनास आल्या त्याचवेळी कार्यालयाने तात्कालीन मा. आयुक्तांच्या निर्दशनासही बाब आणुन दिली आणि त्यांच्या मान्यतेने सर्व वसुली विभागांना कळविलेले आहे व कार्यवाही करणेच्या सुचनाही दिलेल्या आहेत. यामध्ये काही प्रकरणात कोर्ट प्रकरणेही झालेले आहेत. सध्या ज्यांची वसुली चेक देऊनही न वटलेल्या धनादेशाबाबत झालेली नाही त्या संबंधित झोन अधिकाऱ्यांनी त्यांचेवर आवश्यक ती कार्यवाही करणे योग्य राहील.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** ज्या मालमत्ता धारकांकडे प्रॉपर्टी नाही त्यांनी परस्पर विक्री करुन निघुन गेले त्यांचेसोबत आपण काय कार्यवाही केली आहे. अशा प्रकारची केसेस जकात विभागामध्ये सुध्दा भरपुर प्रमाणात आहेत. त्यांचेवर सुध्दा प्रशासनाने काहीही कार्यवाही केलेली नाही. सन १९९७-९८ या वर्षातील अशी प्रकरणे चालु आहेत तर यापुर्वीचीही किती प्रकरणे असतील याचा अंदाज लावावा. त्यामुळेच प्रशासनाने अशा सर्व प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे. काही मालमत्ता धारकांकवर आपण वसुली संदर्भाने नोटीस बजावतो. मात्र ते हयात आहेत किंवा नाही त्यांचे मुळ मालक कोण आहेत. मग आपण वसुली कोणाकडुन करणार? जे संबंधित अधिकारी त्या वेळेस होते त्यांनी चेकद्वारे धनादेश वटवुन जमा का नाही केला? आजपर्यंत प्रकरण प्रलंबित का ठेवले. यास संबंधित काळातील अधिकारी/कर्मचारी जबाबदारी समजण्यात यावा असे माझे मत आहे.

**मुख्य लेखाधिकारी :** जकात विभागामध्ये रु. ४० हजाराचे केसेस अशा प्रकारचे झालेले आहे.

**मा. सभापती** : या संदर्भाने संबंधित झोनमधील ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी वसुली बाबत ज्या मालमत्ता धारकांकडुन जकातीवरुन चेकद्वारे धनादेश स्विकारला मात्र तो बऱ्याच कालावधीपर्यंत वटला नाही त्यास संबंधित जो कुणी अधिकरी/कर्मचारी त्यावेळेसचा असेल तोच जबाबदार धरुन अशा वसुलीचे चेकद्वारे घेतलेल्या धनादेशाची रक्कम संबंधिताच्या पगारातुनच वसुल करावे. यामध्ये जे अधिकारी/कर्मचारी तो त्या वेळेसचा असेल तो सेवानिवृत्त झालेल्या असल्यास त्याच्या पेन्शनमधुन कपात करावे अशी प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मुख्यलेखाधिकारी :** प्रॉसिक्युशन ॲक्ट प्रमाणे पोलीस केस करुन १५ दिवसात कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** जकात मधील रु. ४० हजाराचे बाबतीत जे चेक बाऊन्स झाले तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांनी ते चेक घेतल्यानंतर वटविल्या गेले नाही. तर त्या कर्मचारी/अधिकाऱ्यांवर आपण काय कार्यवाही करणार

**मा. आयुक्त** : सपुर्ण पणे चौकशी केल्याशिवाय आता काहीही करणे शक्य नाही, या प्रकरणात चौकशी केल्याशिवाय सांगता येणार नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी त्या काळपासुन आजपर्यंतच काहीही केलेले नाही. त्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल. स्थायी समितीला विनंती आहे की, त्यांनी ऑडीट रिपोर्ट चर्चा करुन निर्णय घ्यावा.

**श्री. शे. इलियास किरमानी :** दरवर्षी ऑडीट रिपोर्ट स्थायी समितीला का सादर होत नाही एकदमच २-३ वर्षाचे अहवाल सभागृहात सादर झाले. तेव्हा वेळेवर एवढया मोठया प्रमाणात चर्चा कोण करणार.

**मा. आयुक्त** : यास जबाबदार स्थायी समिती राहणार, याचे कारण दरवर्षी ऑडीटचा अहवाल स्थायी समिती समोर चर्चेसाठी ठेवणे आवश्यक आहे.

**मुख्यलेखापरिक्षक :** जुन-जुलै महिन्यातच ऑडीट अहवाल देणे आवश्यक होता. तो त्या कालावधीतच देता आला नाही म्हणुन माहे मार्चला दिलेला आहे व आता सन १९९६-९७ पासुनचा रेग्युलर ऑडीट अहवाल देण्यात येतो.

**मा. सभापती** : सन १९९६-९७ मधील बाऊन्स झालेले चेक आहेत. त्यावर प्रशासनाने आजपर्यंतही कार्यवाही का केली नाही. मा आयुक्त यांनी या संदर्भात संबंधित कर्मचारी/अधिकरी यांचा पगार थांबविण्याची कार्यवाही करावी. दुसरे असे की, ८३,४५४/- इतकी रक्कम कर्मचाऱ्यांकडे त्यांच्या नावांवर प्रलंबित आहे. तर ती रक्कमही अद्याप वसुल करण्यात आलेली नाही. याचे कारण काय?

**मुख्यलेखाधिकारी** : विविध शाखांमधील कर्मचा-यांनी वैयक्तिक कारणास्तव, मेडीकल कारणास्तव तर काहींनी घर अग्रीमसाठी कर्ज घेतलेले आहेत. त्यापैकी काहींनी समायोजन केलेले आहे. काहींनी केलेले नाही. अशा कर्मचाऱ्यांना २० तारखेपर्यंत कार्यालयात समायोजन करण्यासाठी नोटीस पाठविण्यात येईल. त्यानंतरही समायोजन न केल्यास संबंधिताच्या पगारातुन ती उर्वरीत राहिलेली रक्कम टप्प्याटप्प्याने कपात करण्यात येईल. आता यापुढे कर्मचाऱ्यांना अग्रीम देणेपुर्वी मागील अग्रीमचे समायोजन केले आहे किंवा नाही ते पाहुनच पुढील अग्रीम दिल्या जाते. या संदर्भात दोन्हीही उपआयुक्त यांना अर्धशासकीय पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

**मा. सभापती** : रु. ८३,४५० सन ९६-९७ पासुन कर्मचाऱ्यांकडे प्रलंबीत रक्कम आहे. याबाबत मनपाने संबंधित कर्मचाऱ्यांकडुन वसुल करीत असतांना व्याजासहीत वसुल करावे आणि त्यापैकी एखादा कर्मचारी सद्या हयात नाही किंवा सेवानिवृत्त झालेला असल्यास आपण त्यांचेकडुन कशा पध्दतीने पैसे वसुल करणार आहोत.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** महापौर निवासस्थानी वेळोवळी नवीन फर्निचर विकत घेतल्या जाते. त्यातील काही फर्निचर कमी झालेले आहे. याचे मोजमाप भांडार विभागाकडुन होत नाही असे लक्षात आलेले आहे. याशिवाय त्या फर्निचरच्या खर्चा केली ऑडीट केल्या जात नाही.

**मा. आयुक्त** : ठिक आहे. या संदर्भाने संबंधित विभागास सांगुन पडताळणी करण्यात येईल. दुसरे असे की, ज्या विविध कारणाने कर्मचारी/अधिकारी यांनी

कार्यालयातर्फे अग्रीम उचल केलेली आहे व त्याचे समायोजन अद्यापही दिलेले नाही. अशा सर्व कर्मचा-यांवरती १५ दिवसाची नोटीस देऊन विचारणा करण्यात यावी. आणि त्यानंतर पगारातुन समान हफ्त्यात उर्वरीत रक्कम वसुल करण्यात येईल.

**मा. सभापती** : ठीक आहे. मुद्दा क्र. २ बाबत मा. आयुक्त यांनी सुचविल्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांकडे अग्रीम शिल्लक आहे त्यांनी अद्यापही कार्यालयात समायोजन केलेले नाही त्या कर्मचाऱ्यांकडुन १५ दिवसांची नोटीस पाठवुन त्यांचेकडील थकीत पगारातुन वसुल करण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी.

रु. २३९.५० लक्ष रु. कर्जफेडीसाठी तरतुद असतांना पैकी रु. २८.०० लक्ष परतफेड केलेली आहे. उर्वरीत रक्कम देणे आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे. याबाबत अंदाजपत्रकात तरतुद करुन परतफेडी बाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. कारण आजपर्यंत कर्ज रुपाने घेऊनही परतफेड लवकर न केल्यास त्यावरील व्याज किती झाली असेल त्याचा बोजा कुणावर पडतो आहे याचा विचार प्रशासनाने करावयास पाहिजे.

**मा. सभापती** : यासाठी महानगरपालिकेची वसुली जास्तीत जास्त होणे आवश्यक आहे. दिलेल्या उद्दीष्टप्रमाणे वसुली झाल्यास घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे शक्य होईल.

## जकात विभाग

**मुख्य लेखा परीक्षक :** जकातमध्ये ज्या पावती पुस्तकाद्वारे पावत्या फाडलेल्या आहेत त्यावरुन १००% ऑडीट केल्या जाते.

**जकात अधिक्षक :** सन ९४-९५ च्या बाबतीत जी थकीत दाखविलेली आहे त्या बाबतचे आपल्याकडे तपशीलवार माहिती मिळालेली नाही.

**श्री. जगदीश सिध्द :** असे निर्दशनास येते की, काही वेळेस जकात फाडतांना कमी-जास्त जकात फाडल्या जाते याबाबत दोषी कोण राहणार याची माहिती द्यावी.

**मा. आयुक्त** : यासाठीच दरवर्षा ऑडीट होणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : एकंदरीत १६३५ प्रकरणी वसुलीची कार्यवाही करण्यास निर्दशनास बाब आलेली आहे. याबाबत कोणती कार्यवाही होणार.

**मा. आयुक्त** : अशा सर्व प्रकरणाबाबत इंटरनल ऑडीट होणे आवश्यक आहे.

**श्री. जगदीश सिध्द :** ज्या कर्मचाऱ्यांनी अशा प्रकारची कामे केलेली आहेत. आणि त्यांनी कार्यालयात पैसे जमा केलेले नाहीत तेव्हा संबंधित कर्मचाऱ्यांच्या पगारातुन वसुल करण्याची कार्यवाही करावी.

**मा. आयुक्त** : संबंधित जे कर्मचाऱ्यांनी पावती पुस्तकातुन कमी-जास्त जकात आयतीवर जकात फाडलेली आहे. त्याची तपासणी करुन मुख्य लेखापरिक्षकाकडुन ऑडीट करुन जे दोषी आढळतील त्यांचेवर कार्यवाही करुन पैसे वसुल केल्या जातील.

**मा. सभापती** : जकात विभागातील ज्या कर्मचाऱ्यांकडे पावती पुस्तकाद्वारे कमी जास्त जकात फाडलेली आढळल्यास शिवाय जकात फाडल्यानंतर चेकद्वारे धनादेश स्विकारला असल्यास तो धनादेश लवकर वटलेला नाही अशा संबंधित कर्मचारी/अधिकारी यांचे बाबतीत १५ दिवसांची नोटीस बजावुन त्यांचेवर

जमा होत असलेल्या रक्कमेचे हफ्ते पाहुन संबंधिताच्या पगारातुन वसुल करण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी.

## कर आकारणी विभाग

**मुख्य लेखाधिकारी :** झोन क्रमांक - ७ दोन आक्षेप
झोन क्रमांक - २ एक आक्षेप
झोन क्रमांक - ३ एक आक्षेप
असे ५ (पाच) आक्षेप आहेत.

**मा. सभापती** : १५ तारखेपर्यंत संबंधित बाबतीत वसुली करावी. व सभागृहात माहिती द्यावी.

**श्री. साहेबराव कावडे :** सर्व प्रकरणात निर्णय देऊन १५ दिवसांची नोटीस बजावुन कर्मचारी/अधिकारी यांचेकडुन वसुल करावयाचे ठरले तर अशा प्रकारचे तिन्ही वर्षाचे ऑडीट अहवालावर एकच निर्णय घेऊन टाकावा. आपण या ठिकाणी सभागृहात चर्चा करण्यासाठी बसण्याचे कारण काय आहे?

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** गेल्या २-३ महिन्यापासुन संबंधित झोनकडुन सुचना करुनही अद्यापही वसुलीबाबत कार्यवाही झालेली नाही. तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांवर " शो कॉज नोटीस " बजाविण्यात यावी.

**मा. आयुक्त** : काही अग्रीम रक्कम कर्मचाऱ्यांनी वैयक्तिकरित्या घेतलेली आहे. तर काही अग्रीम कार्यालयीन कामासाठी घेण्यात आलेली आहे. ३ प्रॉपर्टीजना कर आकारणी लावलेली आहे. ती आकारणी कमी लावल्यामुळे ती पुनर्तपासणी करुन वाढीव वसुली करावी लागेल. ज्या कर्मचाऱ्यांनी कर कमी लावुन कामात निष्काळजीपणा केला त्यांना नोटीस बजावुन कार्यवाही करावी लागेल.

**करमुल्य निर्धारण अधिकारी :** संबंधित झोनला या संदर्भात कळविण्यात आलेले आहे. झोनमधील ५ पैकी १ झोनने वसुली केलेली आहे. आणखी ४ आक्षेप बाकी आहेत. संबंधित झोनला कळवुन संबंधित मालमत्ता धारकास पुढील डिमांडमध्ये वाढवुन देण्याचे आदेशित केलेले आहे.

**श्री. साहेबराव कावडे :** ९४-९५ पासुन टॅक्स वसुली केली आहे. परंतु असे निर्दशनास येते की, संबंधित झोनमध्ये टॅक्सची पावत्या फाडुनही झोनमधील रजिस्टरला नोंदी होत नाहीत. याला कारण काय?

**मा. सभापती** : एकंदरीत झोनमधील वसुली बाकी असलेले एक झोनची वसुली झाल्याचे सांगितले तर आणखी ४ झोन मधील मालमत्ता धारकांकडील वसुली बाकी आहे. तेव्हा संबंधित जे कर्मचारी त्या वेळेस चेक घेऊन ठरविण्यासाठी कार्यालयात दाखल करीत असेल त्या वेळेसच्या वसुली कर्मचाऱ्यांस जबाबदार धरुन त्यांनाच वसुली करावयाचे सुचना द्यावे आणि कर्मचाऱ्यांना १५ दिवसांची नोटीस बसावुन त्यांच्या पगारातुन हफ्ते वाटुन टॅक्सची रक्कम वसुल करावी, दुसरा मुद्दा उपस्थित झाल्याप्रमाणे झोनमध्ये काही नागरिक टॅक्स भरुन जातात. मात्र त्यांच्या नावांची रजिस्टरला नोंद केल्या जात नाही. असे लक्षात येते की, कर आकारणी विभागाने संबंधित झोनला असेसमेंट रजिस्टर मार्च ते मार्च महिन्यात पाठवावे.

### मालमत्ता विभाग

**मा. सभापती** : लेखा परिक्षणातील अहवालावरुन एकुण १२ अधिकारी/कर्मचारी यांनी घर विकत घेण्यासाठी कार्यालयामार्फत कर्ज घेतलेले आहे. तरीही आजच्या परिस्थितीत ते महानगरपालिकेच्या क्वॉर्टरमध्ये राहतात. याबाबत प्रशासनाने अद्यापही कार्यवाही का केली नाही.

**मा. आयुक्त** : ज्या कर्मचारी/अधिकारी यांनी कार्यालयातर्फे घरासाठी कर्ज घेतलेले आहे. तरीही महानगरपालिकेचा क्वॉर्टरमध्ये सध्याही राहतात त्या कर्मचारी/अधिकारी यांना कार्यालयातर्फे ८ दिवसांची नोटीस बजावुन त्यांना घर रिकामे करण्याचे आदेश देण्यात येतील.

**मा. सभापती** : येत्या १५ तारखेपर्यंत संबंधित कर्मचारी/अधिकारी यांना नोटीस बजावुन महानगरपालिकेचे क्वॉर्टर रिकामे करण्याची कार्यवाही करावी. आणि जे कर्मचारी/अधिकारी क्वॉर्टर रिकामे करण्यास मज्जाव करतील त्यांच्या इतरत्र असलेल्या मालमत्ता जप्त करण्यात व क्वॉर्टरला सिल लावावे. याशिवाय जे कर्मचारी सेवानिवृत्त/मयत झालेले असतील तरीही त्यांचे कुंटुंब का होईना गैर कानुनी राहात असतील तरीही त्यांचेवर मनपातर्फे कार्यवाही करावी.

## शहर अभियंता विभाग

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** सन्माननीय नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीचा वापर या विभागातील कामावर खर्च करण्यात येतो काय? याची माहिती द्यावी कारण बऱ्याच ठिकाणी खर्च न करता बोगस नोंदी घेऊन खर्चा झाल्याचे दाखविले आहे.

**मुख्यलेखापरीक्षक :** सन २०००-२००१ या वित्तीय वर्षाचे अहवालात तसे आहे. स. सदस्यांना सुचना केल्याप्रमाणे स्वेच्छा निधीचे प्रकरणामध्ये काही संस्थाना मदतीचा वापर केलेला आहे. त्यामध्ये फर्निचर वाटप, वह्या, पुस्तके वाटप केल्याच्या नोंदी आहेत. मात्र ते तपासणी करणे आवश्यक आहे.

**मा. आयुक्त** : अशा संस्थांना जर नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतुन मदत दिलेली असेल आणि त्या संस्थाचे ३ वर्षाचे ऑडीट झालेले आहे काय? याबाबतचा अहवाल देणे आवश्यक आहे.

## स्लम - २ विभाग

**अति. शहर अभियंता :** शासकीय अनुदान सन १९९२-९३ अंतर्गत इंदिरानगर बायजीपुरा सन २०, २५ या भागातील डांबरीकरण करण्याच्या कामासाठी संबंधित गुत्तेदाराने कालमर्यादेत समाधानकारक काम न केल्याने संबंधितास माहे जुन-९७ ला पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. तथापि काम उशिरा केल्याने रु. ६६०४/- दंड आकारण्यात आला.

**श्री. साहेबराव कावडे :** संबंधित गुत्तेदाराने काम उशिरा करुनही संपुर्ण देयक का दिले गेले याची माहिती द्यावी.

**मा. आयुक्त** : याबाबत स्लम-२ विभागामार्फत दंड आकारण्यात आलेली रक्कम रु. ६६००/- वसुल करावे.

**मा. सभापती** : स्लम-२ या विभागातील मुद्दा क्र. १ अन्वये रु. ६६००/- चा दंड संबंधित गुत्तेदारास लावण्यात आला होता. तो त्यांनी अद्यापही कार्यालयात भरणा केलेला नाही. त्याचप्रमाणे मुद्दा क्र. २ बाबत इंदिरानगर दगडी गटार बांधण्याच्या कामासाठी संबंधित गुत्तेदाराने ७५ दिवस विलंब केल्याने त्यास

रु. ७५००/- दंड आकारणी केली होती आणि त्याचा भरणा अद्याप पावतो झालेला नाही. तेव्हा संबंधितांना १५ दिवसांचा अवधी देऊन संबंधित बाबतीत पैसा भरणा करण्यास सुचना द्याव्यात व त्यानंतरही संबंधितांनी दोन्ही मुद्दयांचे बाबतीत पैसे भरणा न केल्यास स्लम-२ विभागाकडुन त्या वेळेसच्या कर्मचारी/अधिकारी यांचेकडुन पैसे वसुल करण्याची कार्यवाही व्हावी.

## बांधकाम-१ (अतिरिक्त शहर अभियंता) विभाग

**मा. सभापती** : मुद्दा क्र. १ गरमपाणी येथे खाम नदीवर पाईप कलर्व्हट बांधणेच्या कामासाठी छावणी बोर्ड व महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रत्येकी ५०% रक्कम खर्च करावी असे ठरल्याचे निर्दशनास आले. तथापि छावणी मंडळाकडुन ५०% कपात अद्यापही करण्यात आलेली नाही. याबाबत एका महिन्यात स्थायी समितीला अहवाल सादर करावा.

मुद्दा क्र. २ बाबत लिटल फ्लॉवर ते विद्यापीठ गेटपर्यंत खडी रस्ता रुंदीकरण व पाईप कलव्हर्ट बनविणे या कामासाठी ३२.१०% कमी दराची निविदा प्राप्त झाली होती. तथापि या अंतर्गत एका ठेकेदाराकडुन निविदापत्रकाची किंमत रु. ६२५/- पा. क्रमांक ९०३४४ पुस्तक क्र. ९०४ दि. ०४-०३-९४ अन्वये वसुल करण्यात आल्याचे दर्शविण्यात आले. मात्र लेखा विभागात अभिलेख तपासले असता सदरील रक्कम वसुल झालेली नसल्याचे निर्दशनास आले. तसेच पावती क्र. ९१३४४ दि. ३०-०३-९४ द्वारे मे. राणा कन्स्ट्रक्शन यांचेकडुन निविदापत्रक किंमत रु. १६५०/- वसुली दर्शविण्यात आली. प्रत्यक्षात सदरील पावतीद्वारे दिनांक ३१-०३-९४ रोजी एम. एम. बेग यांचेकडुन रु. २४७५/- वसुल करण्यात आले आहेत. म्हणजेच एकंदर मुद्दा क्रं. १ व २ या दोन्हीही बाबतीत रक्कमेचा अपहार झाल्याने पोलीस स्टेशन येथे फौजदारी गुन्हा दाखल करावे.

## विद्युत-१ विभाग

**मा. आयुक्त** : विद्युत विभागातील भंगार-मटेरियल(स्क्रॅप) बाबत काय कार्यवाही केली.

**उपअभियंता (विद्युत-१) :** याबाबत टेंडर काढावयाचे आहे.

**मा. सभापती** : संबंधित विभागाने याबाबत लवकरात लवकर टेंडर काढावे.

**श्री. जगदीश सिध्द :** विद्युत विभागातील मुद्दा क्र. ४ बाबत शहाबाजार भागात जी. आय. पोल बसविण्याच्या कामाचे देयक रु. १५८५/- अदा करतांना मा. आयुक्त यांनी रु. १०,०००/- अदा करावे असे निर्दशनास आले. असे असतांनाही रु. १५,०८५/- इतकेच अदा करण्यात आले याची कारण काय?

**उपअभियंता (विद्युत)** : शहाबाजार भागात जी. आय. पोल बसविण्याच्या कामाबाबत रु. १५,०८५/- देयकाऐवजी मा. आयुक्त यांनी रु. १०,०००/- देण्याचे मान्य केले. तथापि लेखा विभागाने सदरील देयक दिलेले आहे.

**मुख्यलेखापरिक्षक** : लेखा विभागाने नोटींग न पाहता रु. ५०८५/- जादा रक्कम दिलेली आहे. आता सदरील जादा रक्कम रु. ५०८५/- भरणा केलेली आहे.

**मा. सभापती** : याबाबत संबंधितांनी जवळपास ७ दिवसात कार्यालयात पैसा जमा करावयाच्या होता. तथापि त्यांनी उशिरा भरणा केला. संबंधितांवर कार्यवाही व्हावी.

## यांत्रिकी विभाग

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** वाहन चालक गाडयांच्या वापरानुसार लॉगबुकमध्ये नोंदी नियमित केल्या जाते काय?

**मुख्यलेखापरीक्षक :** होय.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** मुद्दा क्र. २ मध्ये वाहन क्रं. एम एच-२०-९९९१ च्या दुरुस्तीवर रु. २१६५/- इतक्या खर्चाची बिले दोनदा सादर करण्यात आली व परिणामी रु. २१८५/- जादा अदा करण्यात आले. याचे कारण काय? यास कोण कर्मचारी/अधिकारी जबाबदार आहे. याची माहिती द्यावी.

**उपअभियंता (म) :** सदरील देयक चुकीने तयार करण्यत आलेले आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** बिले चुकीने कशी तयार केल्या जाते. संबंधित एजन्सीने ते मिळाले सुध्दा याचाच अर्थ मनपावर बोजा पडलेला दिसतो. याबाबत जबाबदार कोण याची माहिती द्यावी.

**मा. आयुक्त** : याबाबतची संचिका माझ्याकडे पाठवावी

**मा. सभापती** : सदरची संचिका मा. आयुक्त यांचकडे आजच पाठवावी व एकाच कामासाठी दोनदा बिले एकाच एजन्सीजला कशी दिली यास जबाबदार कोण कर्मचारी/अधिकारी आहे ते तपासुन मा. आयुक्त यांनी कार्यवाही करावी.

**श्री. शे. इलियास किरमानी :** यांत्रिकी विभागात जेवढे भंगार पडलेले आहे. त्याची चौकशी होते काय?

**मुख्यलेखापरिक्षक :** होय काढलेले आहे. (लिलावाबाबत कार्यवाही केलेली आहे.)

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** यांत्रिकी विभागातील वाहनांची कालमर्यादा संपल्यानंतर त्या गाडयांची हरौसी केलेली आहे काय?

**मुख्यलेखापरिक्षक :** होय, आतापर्यंत ३ वेळेस झालेले आहे याशिवाय याबाबतची कमीटी देखील होती.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** मुद्दा क्र. २ बाबत वाहन क्र. एमएच-२०/५६१९ दुरुस्तीबाबत श्री. बी. पी. कारके यांच्याकडुन रु. २७४५/- वसुल करावेत असे नमुद करण्यात आले. परंतु यापैकी रु. १६००/- वसुल करुन रु. ११४५/- थकीत आहे. याचे कारण काय?

**उपअभियंता (यां) :** एका झोनमधील गाडीवर दगड मारल्याने काचा तडकल्या आहेत. ते दुरुस्तीसाठी रु. २७४५/- खर्च करण्यात आले. पैकी संबंधितांनी रु. १६००/- भरणा केलेले असून, उर्वरीत रु. ११४५/- बाकी आहेत. सदरील रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांकडुन घ्यावयाची आहे.

**श्री. भरतकुमार लकडे :** याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल झालेला आहे काय? नसता कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : संबंधित कर्मचाऱ्यांना नोटीस देऊन त्यांचेकडुन लिहुन घ्यावे.

**मा. आयुक्त** : मुद्दा क्र. ४ बाबत टाटा वाहने स्पेअर पार्ट वार्षिक करारानुसार १९% जादा दराचा करारनामा केलेले असून, या अंतर्गत बदल करण्याचा अधिकार दुसऱ्यांना नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** किंमतीच्या यादीमध्ये फलकय्युएशन झालेले आहे.

**उपअभियंता (यां.**) : प्रत्यक्षात पाहणीनुसार त्यांचे किंमतीत वाढ होऊन रु.१०७७/- जादा किंमत झाली.

**मा. आयुक्त** : सदरची रक्कम संबंधित विभागाकडुन वसुल करण्यात यावी.

**(क) ड्रेनेज-२ (कार्यकारी अभियंता) विभाग**

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** या संदर्भात वर्तमानपत्रात बातम्या छापुन आलेल्या आहेत. जालना रोड ते बनेवाडी मुख्य जलवाहिनी " क " भाग-१ मधील उर्वरीत काम पुर्ण करण्यासाठी रु. ८,२५,८७७/- चे अंदाजपत्रक तयार करुन सदरील कामासाठी मनपा भांडारातुन एकुण १२३८ गोणी सिमेंट देण्यात आल्याचे तत्कालीन भांडारपालयांनी नमुद केले होते. आणि गुत्तेदारास तपासणी केली असता १६३८ गोणी सिमेंट देण्यात आल्याचे दिसते. तेव्हा ४०० गोणी सिमेंटची वसुली संबंधिताकडुन अद्यापही का करण्यात आली नाही. याची माहिती द्यावी.

**कार्य. अभि (पापु) :** ड्रेनेज-२ कडुन न जाता भांडार विभागाकडे सदरील बाब असल्याने त्या विभागाकडुन माहिती मिळेल असे माझे मत आहे. आम्हाला १२३८ मोठी सिमेंट दाखविलेले आहे. मात्र इश्यु १६३८ करुन दाखविल्याची नोंद आहे. आणि संबंधित भांडार प्रमुख सद्या सेवानिवृत्त झालेला आहे.

**मा. सभापती** : याबाबतची संचिका आजच्या आज मा. आयुक्त यांचेकडुन पाठण्याची व्यवस्था संबंधित विभागने करावी. त्यानुसार मा. आयुक्त यांनी कार्यवाही करावी.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** बिफचे लायसेन्सचे नुतनीकरण का केले जात नाही.

**मा. सभापती** : आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** एकंदर ७८ लायसेन्स दिलेले आहेत. जे नियमानुसार असतात. पोलीस कार्यालयाकडुन ना हरकत मिळाल्यानंतर या विभागातर्फे कार्यवाही केली जाते.

**मुख्य पशुधन अधिकारी :** शहरात अनाधिकृत मांस विक्री करणारे आहेत. त्यांच्यापैकी १४४ लोकावर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**श्री दलबीरसिंग जबिंदा :** आतापर्यंत चामडयाचे केसेस व अनाधिकृत दुकानाबाबत आपण काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

**मा. सभापती** : बाजयीपुरा रोडवरील जे अनाधिकृत मांस विक्रीसाठी बसलेले आहेत. त्यांचे विरुध्द कार्यवाही व्हावी.

**भांडार विभाग**

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** झोन मध्ये वेळावेळी कचरा कुंडया नवीन विकत घेऊन वितरीत करण्यात येतात. त्याचे ऑडीट करण्यात येत नाही काय? त्याचप्रमाणे एम. बी. रेकॉर्ड हे संबंधित कनिष्ठ अभियंता यांचेकडे दिल्यानंतर ते हरवितात व पुन्हा त्यांचे मनपाला वाटेल त्यानुसार दुसरी बनवितात हे बरोबर आहे काय?

**श्री. भरतकुमार लकडे :** आमच्याकडे अशी माहिती आहे की, भांडार विभागाकडुन ज्या नवीन कुंडया वितरीत केल्या जातात त्या नवीन खरेदी केलेल्या वसुल जुन्याच असतात त्या रिपेअर करुन रंग मारुन संबंधित झोनला वितरीत केल्या जाते.

**श्री मीर हिदायत अली :** हे खरे आहे. कुंडयाप्रमाणेच उद्यान विभागामार्फत जे सुरक्षित ठेण्यासाठी ट्री गार्ड पुरविले जातात ते सुध्दा जुनेच असतात. तुटलेले

असतात व नवीन म्हणुन दुरुस्ती करुन रंग मारुन वाटप केल्या जाते. ही वस्तुस्थिती आहे.

**मा आयुक्त** : या संदर्भाने मला चौकशी करावी लागेलच व शासकीय अभियंत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांचेकडे पाठवावे लागेल.

**मा. सभापती** : जो टेंडर घेतो तोच गुत्तेदार ट्री गार्ड व हातगाडया/कुंडयासाठी एकच आहे, असे समजते.

**श्री. भरत लकडे :** असे लक्षात येते की, मनपाच्या जागेवर काही ठिकाणी अनाधिकृत, बांधकामे करुन जागा हडप करण्याचे कारस्थान होत आहे. याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : विधी विभागाने अभिप्राय द्यावा.

**प्र. विधी सल्लागार :** अशा प्रकारची शहरात ५-६ प्रकरणे आहेत. त्यातील एक केस कोर्टात प्रलंबित आहे.

**मुख्य लेखाधिकारी :** नवीन हातगाडया यावर्षी झोनच्या मागणीनुसार जवळपास १५० हातगाडया नवीन विकत घेऊन संबंधित झोनला वाटप करण्यात आले.

**मा. सभापती** : याबाबत सविस्तर अहवाल पुढील बैठकीतच्या वेळी स्थायी समितीस सादर करावा. सन १९९७-९८ ला लेखा परिक्षणाच्या अहवालावर सभागृहात चर्चे अंती झालेल्या सर्व आक्षेपार्ह निर्णयावर १५ दिवसात कार्यवाही करुन दि. १६ जानेवारी २००२ च्या सभेत सादर करावा.

**ठराव :**

सन १९९७-९८ च्या वार्षीक लेखा परिक्षण अहवालातील प्रत्येक मुद्दयावर सांगोपांग चर्चा झालेली आहे. त्या मुद्दयासंबंधी चर्चेच्या वेळी संबंधित दोषी/कर्मचारी यांचेवर नियमानुसार योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत निर्णय दिलेला आहे. त्यानुसार संबंधित विभाग प्रमुख व प्रशासन यांनी योग्य ती कार्यवाही करुन १५ दिवसात अहवाल सन १९९८-९९ च्या लेखा परिक्षण अहवालावरील चर्चेच्या सभेपुर्वी सादर करावा, असे सर्वानुमते ठरले.

या बरोबरच " जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | स्थायी सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २४-०१-२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तात. बुधवार दिनांक २४-०१-२००२ रोजी मा. सभापती, श्री. प्रशांत देसरडा, यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे सकाळी ११.३० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. अशरफ युनूस मोतीवाला | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| ३. | स. स. श्री. सिध्द जगदिश कन्हैयलाल | -//- |
| ४. | स. स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग | -//- |
| ५. | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ६. | स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | -//- |
| ७. | स. स. श्री. सलीम पटेल समशेर पटेल | -//- |
| ८. | स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| ९. | स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली | -//- |
| १०. | स. स. श्री. शेख इलियास किरमानी शे. उमर | -//- |
| ११. | स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतु पाटील | -//- |
| १२. | स. स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |

**संवाद :**

**श्री. जगदीश सिध्द :** गेल्या २ तारखेला सन ९७-९८ च्या लेखा परिक्षण अहवालावर आपण चर्चा केली. चर्चेनुसार काही निर्णय आलेले होते व १६ तारखेपर्यंत पुर्ण करुन सभा आयेजीत करणार होते. घेतलेल्या निर्णयानुसार प्रशासनाने काय कार्यावाही केली. तसेच आजच्या बैठकीत ९८-९९ या वर्षाच्या लेखापरिक्षण अहवाल मंजुरीसाठी ठेवलेला असून, मागील सभेचे इतिवृत्त न देता या अहवालावर चर्चा करणे योग्य होणार नाही. मागील सभेचे इतिवृत्त का देण्यात आलेले नाही. त्याचा खुलासा घेण्यात यावा.

**मा. सभापती** : मागील बैठकीत इतिवृत्त दिलेले नाही याबद्दल सचिव यांनी माहिती द्यावी.

**नगरसचिव** : मागील बैठक संपन्न झाली त्यावेळेस मी मा. महापौर यांचे बरोबर लखन्नो येथे महापौर परिषदेसाठी गेलेलो होतो. मा. सभापती यांना पुर्वकल्पना दिली होती. त्यावेळी या विभागातील ठराविक वेतनावरील लघु टंकलेखक यांना १ व २ तारखेला दोन दिवसांचा तांत्रिक खंड दिलेला असल्याने ते कार्यालयात आलेले नव्हते. सभागृहात सचिव म्हणुन उपआयुक्त (प्र.) यांनी काम पाहिले. त्यांचे स्वीय सहाय्यक यांनी सदर सभेच्या इतिवृत्तांची नोंद घेतलेली असून, अद्याप पावतो माझ्याकडे इतिवृत्त प्राप्त झालेले नाही. विषय पत्रिकेवर इतिवृत्त कायम करण्याचा विषय ठेवलेला नाही.

**मा. सभापती** : सभागृहात असलेले प्रभारी आयुक्त म्हणुन श्री. जावरे यांनी यासंबंधी खुलासा करावा.

**प्र. उपआयुक्त (प्र.) श्री. जावरे :** दोनच दिवसापुर्वी प्र. उपआयुक्त (प्र.) या पदाचा पदभार मी स्विकारलेला आहे. इतिवृत्तांत दिलेला नाही. तथापि एक दिवसाचा अवधी द्यावा. इतिवृत्तांत तयार करण्यात येईल.

**श्री. जगदीश सिध्द :** गेल्या १६ तारखेलाच आपण बैठक घेणार होतो. मागील सभेत घेतलेल्या निर्णयानुसर पुन्हा चर्चा करुन कार्यवाहीचे आदेश करणार होते. गेल्या १६ तारखेपासुन आजपर्यंत आणखी आठ दिवस मिळाले. तरी सुध्दा इतिवृत्त देण्यात आलेले नाही.

**मा. सभापती** : आताच सचिव यांनी खुलासा केला की, संबंधित कर्मचारी यांनी इतिवृत्तांत सचिव यांचेकडे सादर केलेला नाही. गेल्या १६ तारखेलाच सभा घेणार होतो. त्यापुर्वीच इतिवृत्त द्यावयास पाहिजे. दुपारी २ वाजेपर्यंत इतिवृत्त तयार करुन सभागृहात इतिवृत्त तयार करुन सभागृहात सादर करावे.

**श्री. किशारे तुळशीबागवाले :** स्थायी समितीच्या सभेला अधिकारी/कर्मचारी जुमावत नाही. आजच्या सभेला बजेच अधिकारी उपस्थित नसुन दोन्ही उपआयुक्त सुध्दा व्यवस्थित नाहीत. अशी परिस्थिती असेल तर, सभा होऊन अर्थ नाही. आपण घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणारे एकही जबाबदार अधिकारी या ठिकाणी उपस्थित नाही.

**प्र. उपआयुक्त (प्र.), श्री. जावरे :** आताच सचिवांनी जो खुलासा केला ती, परिस्थिती सत्य आहे. सचिवांचे सहीनेच इतिवृत्त दिले जाते. प्रशासनातर्फे आणखी एका दिवसांचा वेळ मागण्यात येत आहे. मान्य करावे. इतिवृत्त तयार करण्यात येईल. सभा जास्त वेळ झाल्याने इतिवृत्तांत तयार करण्यास वेळ लागेल.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** स्थायी समितीच्या बैठकीला अधिकारी उपस्थित राहत नाहीत. आपल्या रुलींगला कुणीही मानत नाही. दिलेले रुलींग नुसार अंमलबजावणी होत नाही. असे असेल तर, योग्य नसून, आता ९८-९९ च्या लेखापरीक्षण अहवालावर चर्चा करुन निर्णय घेतल्यास त्याची अंमलबजावणी होणार आहे का? स. स. श्री. शेख इलियास किरमानी याचा खुलासा घेण्यात यावा यापुर्वी सुध्दा मी स्थायी समितीचा सदस्य होतो. निर्णय घेतल्यानुसार ५०% अंमलबजावणी होत होती. परंतु आता तसे होत नाही. अहवालावर प्रत्येक पानावर अधिकारी/कर्मचारी दोषी असल्याचे आढळुन येत आहे. उत्तर द्यावे लागेल म्हणुन जबाबदार अधिकारी वेळकाढुपणा करुन सभेला उपस्थित राहत नाहीत अशी शंका येते. कर्मचारी/अधिकारी यांचेकडे एकुण १७ लाख रुपये ८८-९९ पासुन बाकी आहे. दहा वर्षात कर्मचाऱ्यंकडे वसुल करता आले नाही. अधिकारी काय करतात हे येथे दिसुन येते.

**मा. सभापती** : दुपारी दोन वाजेपर्यंत सभा तहकुब करण्यात येते. परंतु २ वाजेपर्यंत इतिवृत्त दिले नाही तर प्र. उप आयुक्त संबंधित अधिकाऱ्यावर काय कार्यवाही करणार आहे.

**प्र. उपआयुक्त (प्र.) श्री. जावरे :** काय कार्यवाही करावयाची याचे अधिकार समितीला आहेत. इतिवृत्त तयार करण्यासाठी एक दिवसाची मुदत द्यावी अशी विनंती आहे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** या शहरातील लोकांचे हे सभागृह लोकप्रतिनिधीत्व करते. प्रशासनाला घाबरण्याची आवश्यकता नाही. सर्व अधिकाऱ्यांना सभागृहात उपस्थित राहण्याचे आदेश करावे. तोपर्यंत सभा चालु करु नये. दोन्ही उपआयुक्त सुध्दा सभेला उपस्थित असावे. जेथे असतील तेथुन बोलवावे.

**प्र. उपआयुत (प्र.) श्री. जावरे :** मागील बैठकीत प्र. सचिव म्हणुन असलेले उपआयुक्त (प्र.) श्री. कांबळे साहेब हे वैद्यकीय रजेवर आहेत. इतिवृत्तांवर त्यांचे स्वाक्षरीची आवश्यकता आहे.

**श्री. मधुकर सावंत :** कोणते अधिकारी किती दिवस रजा घेतात. सभेच्या दिवशी सभापती यांची परवानगी घेत नाहीत. या महानगरपालिकेचा कारभार कसा चालतो हे जनतेला समजण्यासाठी पत्रकार कक्ष खुला करुन पत्रकारांना या ठिकाणी सभेच्या वेळी बसण्याची परवानगी द्यावी. २ वाजेपर्यंत इतिवृत्त मागवावे तोपर्यंत सभा तहकुब करावी.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** पत्रकारांना बसण्याची परवानगी द्यावी. पत्रकारांचा कक्ष खुला करण्यात यावा.

**मा. सभापती :** दुपारी दोन वाजेपर्यंत मागील सभेचे इतिवृत्त सभागृहात सादर करावे. तोपर्यंत सभा तहकुब करण्यात येत आहे. दुपारी पत्रकार कक्ष उघडण्यात येऊन सभेच्या वेळी पत्रकारांना पत्रकार कक्षात बसण्याची परवानगी देण्यात येते. पत्रकार कक्षात बसण्याची परवानगी देण्यात येते. पत्रकार कक्ष उघडुन द्यावा.

(तहकुब केलेली सभा पुन्हा दुपारी २.१० वाजता सुरु झाली.)

**डॉ. आशा बिनवडे :** बऱ्याच दिवसानंतर पत्रकारांना पत्रकार कक्षात बसण्याची परवानगी देण्यात आली. या सभागृहाने कामकाजाची पारदर्शकता राहावी व दृष्टीकोन समोर ठेवुन मा. सभापती यांनी जो निर्णय घेतला व पत्रकारांना बसण्याची संधी मिळाली त्याबद्दल सभागृहातर्फे सभापती यांचे अभिनंदन करते.

**श्री. जगदीश सिध्द :** मागील बैठकीचे इतिवृत्त सादर झालेले नाही ज्यावेळेस अधिकारी रजेवर जातात त्यावेळेस मा. सभापती, मा. महापौर यांची परवानगी घेतात का सचिव यांनी मा. सभापती यांची परवानगी घेतली होती का?

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** कोणते अधिकार रजेवर गेलेले आहे व तशी परवानगी मा. सभापतींची त्यांनी घेतलेली आहे खुलासा करावा.

**मा. सभापती :** मा. आयुक्त, मुख्यलेखाधिकारी व सचिव यांनी परवानगी घेऊन जावे असे नियमान आहे. सचिव मा. महापौरांबरोबर लखनौला गेले त्यावेळेस त्यांनी माझी परवानगी घेतलेली होती. त्यावेळेस सचिव म्हणुन उपआयुक्त (प्र.) श्री. कांबळे साहेब होते. आज ते सभागृहात उपस्थित नाहीत व माझी त्यांनी परवानगी सुध्दा घेतलेली नाही. तसेच इतिवृत्तासंबंधी प्र. अधिकारी यांना सुध्दा काही माहिती दिलेली नाही.

**श्री. भरत लकडे :** मा. आयुक्त आजपर्यंत सभेच्या वेळेसच तीन वेळा रजेवर गेले. आपली परवानगी घेतली होती का? आज किती अधिकारी रजेवर गेलेले आहे. त्यांनी परवानगी घेतलेली आहे का?

**श्री. किशार :** अधिकारी/कर्मचारी नेहमी रजेवर असतात तशा बातम्या वृत्तपत्रात छापुर येत आहेत. कोणते अधिकारी/कर्मचारी रजेवर गेले. किती दिवसांसाठी गेले. नियमाने परवानगी घेऊन गेलेले आहेत का याची पुर्ण शहानिशा झाली पाहिजे. आज जे अधिकारी रजेवर गेलेले आहे. त्यांनी सभापतींची परवानगी घेतलेली आहे का? खुलासा देण्यात यावा.

**मा. सभापती :** किती अधिकारी रजेवर आहेत. प्र. आयुक्त यांनी खुलासा करावा.

**श्री. जगदीश सिध्द :** मागील बैठकीत श्री. कांबळे साहेब सचिव म्हणुन सभागृहात होते त्यांनी इतिवृत्त सादर केले नाही व रजेवर जातांना तशी माहिती सुध्दा दिलेली नाही. योग्य ती कार्यवाही करण्याबाबत प्रशासनाला आदेश करावेत.

**श्री. शे. इलियास किरमाणी :** सभेच्या दिवशी कोणत्याही अधिकाऱ्यांनी मा. सभापतीची परवानगी घेऊनच गेले पाहीजे नसता अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहीजे. सभागृहात कोणत्याही प्रश्नाचा खुलासा व्यवस्थित होत नाही. विभाग प्रमुखाचे खालचे अधिकारी उपस्थित असतात त्यांना काहीही माहिती नसते. उत्तर बरोबर देत नाही.

**मा. सभापती** : मा. आयुक्ता यांनी प्रत्येक वेळेस रजेवर जातांना माजी परवानगी घेतलेली आहे.

**श्री. जगदीश सिध्द :** जो लेखा परिक्षण अहवाल सादर केला होता त्यामध्ये ज्या त्रुटी मागील बैठकीत आढळुन आल्या त्यासंबंधी आपण चर्चा केलेली होती. त्यामध्ये अधिकारी / कर्मचारी दोषी असल्याचे दिसुन आले. अशी परिस्थिती भविष्यात होऊ नये म्हणुन प्रत्येक स्थायी समितीला मा. आयुक्तांनी उपस्थित रहावे व तसा प्रस्ताव मी मांडत आहे. तो मंजुर करुन सर्वसाधारण सभेपुढे मांडण्यात यावा.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती** : स. सदस्य श्री. जगदीश सिध्द यांनी मांडलेला प्रस्ताव व त्यास स. सदस्य श्री. तुळशीबागवाले यांनी अनुमोदन दिलेल्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रत्येक स्थायी समिती सभेला मा. आयुक्तांनी हजर राहीलेच पाहीजे व तसा प्रस्ताव येणाऱ्या सर्वसाधारण सभेत पाठविण्यात यावा.

**श्री. भरत लकडे :** आज किती अधिकारी रजेवर गेलेले आहे. खुलासा देण्यात यावा.

**मा. सभापती** : किती अधिकारी रजेवर आहेत. खुलासा देण्यात यावा.

**प्र. उपआयुक्त (प्र.) :** किती अधिकारी रजेवर आहेत हा विषय ऐनवेळी विचारलेला असल्याने नेमका खुलासा करता येणार नाही. पंरतु उपआयुक्त (म.) उपआयुक्त (प्र.) हे वैद्यकीय रजेवर गेलेले आहेत.

**श्री. भरत लकडे, श्री. मधुकर सावंत :** तसा वैद्यकीय रिपोर्ट सादर केला आहे का? असेल तर कोणत्या डॅक्टराचे प्रमाणपत्र आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** सहा. संचालक नगररचना श्री. गोस्वामी हे सुध्दा गेलेले आहेत. त्यांचा पदभार कोणाकडे दिलेला आहे. त्यांची या मनपामध्ये काम करण्याची इच्छा नाही. म्हणुन ते रजेवर गेलेले आहेत अशी माहिती मिळावी.

**प्र. उपआयुक्त (प्र.) श्री. जावरे :** सहा. संचालक नगररचना या पदाचा पदभार शहर अभियंता श्री. सोनी यांचेकडे दिलेला आहे. त्यांचे वैयक्तिक कामास्तव रजेवर गेलेले आहेत.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** नगररचना विभागामध्ये किती बांधकाम परवानगीसाठी संचिका पडुन आहेत? किती लेआऊट मंजुर झाले. किती संचिका थांबुन आहे याची माहिती आजच्या बैठकीत अधिकारी देऊ शकेल का? खुलासा देण्यात यावा. शहरातील बरेच नागरीक परवागीसाठी चकरा मारतात वेगवेगळी कारणे दाखवुन नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येत नाही. या विभागाकडुन कोणतीही कार्यवाही वेळेवर होत नाही. असे असेल तर योग्य नाही. लोक पैसे भरण्यास तयार असून, अधिकारी, कर्मचारी जागेवर नसतात. असले तरी

कार्यवाही करुन घेण्यास तयार नसतात त्यामुळे मनपास येणारे उत्पन्न येत नाही.

**श्री. मीर हिदायत अली :** शहरात अनाधिकृत बांधकामे चालत आहेत. नगररचना विभागामध्ये एका सर्वसाधारण व्यक्तीला बांधकाम व इतर परवानगी घ्यावयाची असेल तर, ३ व ४ महिने लागतात. मी ८-१० दिवसांपासुन एका प्रकरणात पाठपुरावा करतो. नगरसेवकांना ५ चकरा माराव्या लागतात तर इतर जनतेला किती चकरा माराव्या लागत असतील. ठेकेदारांची संचिका असेल तर, ८ दिवसाच्या आत परवानगी मिळते. अशी परिस्थिती या विभागात आहे. सर्वसाधारण नागरीक परवानगीसाठी बरेच चकरा मारतात. त्यांना परवानगी मिळत नाही. त्यामुळे मनपास येणारे उत्पन्न येत नाही. यास अधिकारी / कर्मचारी दोषी आहे असे दिसुन येते. सभागृहाने याबाबतीत योग्य निर्णय घ्यावा. मनपाचे उत्पन्न वाढवावे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** महानगरपालिकेच्या हद्दीतील काही भाग सालारजंग यांच्या मालकीच्या असल्याचे दाखवुन त्या भागात बांधकाम, ले-आऊट करण्याची परवानगी मिळेना. ती जागा कोणाची आहे. त्याचा खुलासा करावा. हैद्रबाद कोर्टाने स्थगिती दिली. तेथील आदेश येथे लागु होतात का?

**विधी सल्लागार :** सालारजंगच्या जागे संदर्भात हैद्राबाद हायकोर्टमध्ये श्री. दाऊद अमीर अली ई. च्या वेगवेगळया ५ ते ६ रिट याचिका दाखल झालेल्या आहेत. या प्रकरणामध्ये या जागेवर न्यायालयाने स्थगिती आदेश दिलेले आहे. त्यामध्ये वेगवेगळे सि. स. नंबर्स दिले सालारजंग मालमत्तेचा त्यामध्ये उल्लेख आहे. त्याची प्रत आपणास सुध्दा दिलेली आहे. " जैसे थे " ठेवावे असे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे परवानगी वगैरे देण्याची कार्यवाही करता येणार नाही. या प्रकरणामध्ये महानगरपालिकेला पार्टी केलेले आहे.

**मा. सभापती** : स्थगिती आदेश आहे तर संबंधित विभागात का लेखी, स्वरुपाती कळवित नाही. संचिकेवर का लिहीले नाही. न्यायालयाचे स्थगिती आदेश आहे तर, सर्वांना सारखेच नियम आहे. परंतु सिटी सर्व्हे कार्यालयामार्फत या जागेवरील सर्व कार्यवाही चालु आहे. कालच एका जागेची रजिस्ट्री केलेली आहे. स्थगिती आदेशाची प्रत आपल्या नियमाकडे आलेली आहे का? आलेली असेल तर, तसेच संबंधित विभागाला संचिकेवर लेखी का कळविले जात नाही.

**विधी सल्लागार :** मुळ प्रत आलेली नाही. छायाप्रत आहे. स्थगिती आदेश झालेले आहे किंवा काय याची खात्री करुन घेण्यासाठी विधीज्ञ यांचेकडुन माहिती मागविली आहे. ही बाब मा. आयुक्तांच्या निर्दशनास आणुन दिलेली आहे. ज्या सिटी सर्व्हे नंबरचा उल्लेख आहे. त्यासंबंधी नगररचना विभागाला कळविलेले आहे.

**श्री. दलबीसिंग जबिंदा :** एका व्यक्तीने सहा महिन्यापासुन परवानगी मागितली आहे. त्यांना उत्तर दिलेले नाही. कार्यवाही होईल किंवा काय काहीही सांगण्यात येत नाही. सालारजंगच्या नावाखाली अधिकारी इतर ठिकाणच्या सुध्दा परवानगी देत नाहीत. उडवाउडवीची उत्तरे दिली जातात.

**मा. सभापती** : सालारजंग प्रकरणाच्या संदर्भात पार्टी एकच असेल, कालच मी सिटी सर्व्हे कार्यालयात चौकशी केली असता तेथुन सालारजंगच्या जागेवर रजिस्ट्री

केली जाते तर मनपाकडुन परवानगी का दिली जात नाही. पाच प्रकरणापैकी तीन प्रकरणे निकाली लागलेली आहेत. अशी बातमी आहे.

**श्री. शे. इलियास किरमाणी :** हैद्राबाद न्यायालयाने दिलेले स्थगिती आदेश रद्द झालेले आहे. आपण मनपातर्फे सदर जागेवर परवानगी देऊ शकतो. त्याची प्रत सुध्दा माझ्याकडे आहे. १५ ते २० मिनिटाच्या आत आपल्याला प्रत दाखवु शकतो.

**विधीसल्लागार :** या आदेशाची शहानिशा करण्यासाठी कार्यवाही सुरु आहे. कारण मागे जे कोर्टाचे आदेश होते. त्यामध्ये काही कागदपत्र खोटे व बनावट होते. हे सर्व शहर वासियांना माहीत आहे. मागील सर्व या जागेच्या संदर्भात जे वाईट अनुभव आले ते सर्वांना माहित आहे. या कागदपत्राची खात्री करण्यासाठी पॅनल वरील कील यांचे ज्युनियर काल हैद्राबाद न्यायालयात गेलेले आहेत.

**श्री. भरत लकडे :** इतर विभागातील सर्वच अधिकारी उपस्थित नाही.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** ज्या प्रकरणात भ्रष्टाचार झालेला आहे. त्या त्या विभागाचे अधिकारी सभेला उपस्थित नसतात. आज जकात तसेच नगररचना विभागाचे अधिकारी उपस्थित नव्हते. आता जकात अधिक्षक आलेले आहेत. या दोन्ही विभागावर मागील सभेत जे आक्षेप घेतलेले होते. त्याची कार्यवाही केली का?

**मा. सभापती :** जे ज्युनियर वकील माहिती घेण्यासाठी पाठविलेले आहे ते जातील किंवा काय याबद्दल शंका निर्माण होते. परंतु शहरातील जे ज्येष्ठ व तज्ज्ञ वकील आहेत. त्यांना या प्रकरणाची माहिती घेण्यासाठी नियुक्ती करावी व त्यांचा अभिप्राय घेण्यात यावा. या जागेचा संदर्भात आदेशात असे वाचण्यात आले आहे की, या जागेवर महानगरपालिकेस काहीही कार्यवाही करण्यास बंधनकारक नाही.

**श्री. इलियास किरमानी :** न्यायालयाच्या आदेशाची प्रत माझ्याकडे आहे. १५ मिनिटाच्या आत सादर करतो. सत्य परिस्थिती समोर येईल. अधिकाऱ्यांना सर्व माहिती असतांना उत्तर बरोबर देत नाहीत.

**मा. सभापती :** प्रत आणावी. त्याची सुध्दा पडताळणी करता येईल. आता ९७-९८ च्या अहवालावर चर्चा करावी. कारण मागील बैठकीत जे आक्षेप घेण्यात आले. त्यानुसार त्यावर १६ तारखेपर्यंत कार्यवाहीचे आदेश केलेले होते. त्याप्रमाणे काय कार्यवाही झाली. एकएक मुद्दयावर चर्चा करावी. मागील बैठकीचा इतिवृत्तांत विषय क्र. १ म्हणुन आज आपण कायम करीत आहोत. त्यानुसार खुलासा करण्यात यावा. लेखा विभागातील मुद्दा क्र. १ नुसार सन ९७-९८ अखेर धनादेश न वटलेली एकत्रित रक्कम रु. ५,२३,८७५/- थकीत आहे. ज्यांचे धनादेश वटलेले नाही व त्यांचेकडे कोणतीही मालमत्ता नाही. त्यांचेकडुन वसुली कशी करणार याचा खुलासा देण्यात यावा.

**मुख्यलेखाधिकारी :** ज्यांचेकडे थकबाकी आहे. त्याची काही मालमत्ता आहे काय याची तपासणी करण्या संदर्भात झोन कार्यालयास कळविलेले आहे. तपासणी करुन कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** २ तारखेला बैठक झाली. १६ तारखेपर्यंत कार्यवाही करण्यासंदर्भात झोन अधिकारी यांना कळविलेले नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** झोन अधिकारी यांना या संदर्भात फॉरमेट मध्ये सर्व सुचना केलेल्या आहेत. ज्या कंप्लेन्टस होत्या त्यासंबंधी यापुर्वी अहवालात नमुद केल्याप्रमाणे १ ते ५ नुसार कार्यवाही करण्याचे कळविले आहे. यात बँकेतुन चेक न

वटता परत आला त्याच दिवशी रक्कम त्वरीत वसुल करणेबाबात नोटीस जारी करणे व मनपाचे आर्थिक नुकसान केल्याबाबत, लेखी स्पष्टीकरण मागविले पहिल्यांदा कारणे दाखवा नोटीस सुध्दा दिली. नोटीस देऊन फौजदारी गुन्हा दाखल करणे व त्याबाबत ३ दिवसात अहवाल सादर करणे नसता शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करणे इ. कार्यवाही करुनसुध्दा अहवालात नमुद केल्याप्रमाणे विभागवाईज ५,२३,८७५/- इतकी बाकी येणे आहे. गेल्या १५ तारखेला विभागावाईज सुचना केल्या तेव्हापासुन माहिती घेण्यास आठ दिवसांचा अवधी लागलेच. झोनची माहिती आलेली आहे. मुख्य लेखा परीक्षक यांचे विभागाकडे रिपोर्ट सादर केलेला आहे. यावर मुख्य लेखा परिक्षण विभागाकडुन तपासणी होऊन तसा अहवाल स्थायी समिती सभेत सादर करतील.

**मा. सभापती** : कोणत्या झोनची माहिती आली हे कसे कळणार. या सभागृहाने निर्णय कशाच्या आधारे घ्यायच्या आपण ९७-९८ च्या लेखा परिक्षण अहवाल सन ९९ ला सादर झालेला आहे. २००२ मध्ये चर्चा करीत आहोत.

**डॉ. आशा बिनवडे :** आपण ९७-९८ चा लेखा परिक्षण अहवालावर चर्चा करीत आहेत. याच्या प्रती दोन वर्षापवुर्वीच उपलब्ध झाल्या. दोन वर्षात का कार्यवाही केली नाही. जेव्हा सभा होईल. सभागृह निर्णय घेईल तेव्हाच कार्यवाही करणे योग्य आहे का प्रशासनाने त्यांचे पातळीवर जी कार्यवाही करण्यास पाहिजे ती केलेली दिसत नाही.

**मा. सभापती** : लेखा परीक्षण अहवालात जे आक्षेप घेण्यात आले. त्यानुसार त्या त्या विभागाने कार्यवाही का केली नाही याचा खुलासा देण्यात यावा. या अहवालावर आपण २ तारखेला चर्चा केली. लेखा परिक्षणात जे आक्षेप घेण्यात आले. त्यासंबंधी कार्यवाही करण्यासंदर्भात १६ तारखेपर्यंत कार्यवाही करण्याचे सुचना केल्या होत्या व १६ तारखेलाच आपण सभा घेणार होतो. काही कारणास्तव २४ तारखेला होत आहे. प्रशासनाने कार्यवाही करण्यास हलगर्जीपणा केलेला आहे. असे दिसुन येते. बैठकीमध्ये चर्चा केल्यानंतरच कार्यवाही करणे योग्य नाही. जे आक्षेप होते त्यानुसार यापुर्वीच कार्यवाही व्हावयास पाहिजे होती. ती झालेली नाही ज्यांनी चेक दिले. त्यांचे नावांवर आजा सध्या मालमत्ता नाही. कशी वसुली करणार हा माझा मुद्दा आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** यापुर्वी आपण नोटीस वगैरे जारी करुन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केल्याबाबत लेखी स्पष्टीकरण मागविले आहे. त्यावरही रक्कम भरल्यास संबंधित व्यक्तीवर फौजदारी गुन्हा दाखल करुन कार्यवाही करावी लागेल.

**मा. सभापती** : प्र. आयुक्त श्री. जावरे यांनी यासंबंधी सविस्तर खुलासा द्यावा.

**प्र. उपआयुक्त (प्रशासन) :** मुख्य लेखाधिकारी यांनी मो. खुलासा केला ते योग्य आहे. मागील २ तारखेला लेखा परीक्षक अहवालावर चर्चा झाली व ज्या ज्या सुचना करण्यात आल्या तेव्हापासुनच खऱ्या अर्थाने यावर कार्यवाही करण्याच्या हालचाली सुरु आल्या. या संदर्भात विभागीय अधिकारी यांना लेखी सुचना देऊन कळविण्यात आले होते. त्यानुसार झोनवाईज अनुपालन अहवाल सादर झालेले असून, तो मुख्य लेखाधिकारी यांनी मुख्य लेखा परिक्षण विभागामार्फत सभागृहासमोर सादर करण्यात येईल.

**मा. सभापती** : २ तारखेच्या बैठकीत रुलींग दिले. १६ तारखेपर्यंत का कार्यवाही केली नाही. एखाद्याच्या नावावर मालमत्ता नसेल तर त्यांचेकडुन वसुली कशी करणार.

**मुख्यलेखाधिकारी :** जी पुर्तता झाली आहे. त्यासंबंधी कार्यवाही करण्याचे काम चालु आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** न वटलेल्या चेकनुसार रक्कम जमा झाली नाही. हा अहवाल सन ९७-९८ चा आहे. दोन वर्ष झाले. याचा अर्थ झोन अधिकरी यांनी अद्याप काहीही कार्यवाही केलेली नसल्याने ही परिस्थिती आहे. वसुली झाली नाही तर, झोन अधिकारी यांचेकडुन वसुल करावे.

**मा. सभापती** : मुख्य लेखा परिक्षक यांनी यावर खुलासा द्यावा.

**मुख्यलेखापरिक्षक :** लेखा परिक्षण झाल्यानंत जेव्हा या प्रती दिल्या गेल्या त्या वेळेसच विभागीय अधिकाऱ्यांना कार्यवाही करण्याबाबत कळवुन सुचना करावयास पाहीजे होत्या. यास आता उशिर झालेला असून, विभागीय अधिकारी यांचेकडुन १० तारखेला माझ्याकडे आलेले पुर्तता अहाल व संबंधित लेखा विभागाने केलेली कार्यवाही या दोन्ही बाबी तपासणी करुन घ्यावी लागेल प्रत्येक झोनला जास्त तपासणी करावी लागेल. प्रत्यक्षात डिमांड नोटसी गेली का. एक संधी द्यावी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती** : सन ९७-९८ च्या सर्व प्रती विभाग प्रमुखांना २ वर्षापुर्वीच दिलेल्या असून, जे आक्षेप घेण्यात आले त्यानुसार विभाग प्रमुखाने त्यांचे अंतर्गत येणाऱ्या विभागाकडुन आतापर्यंत माहिती देऊन कार्यवाही करावयास पाहीजे होती. परंतु तसे काही झालेले दिसत नाही. आता पहिला मुद्दा तपासणीसाठी किती दिवस लागणार आहेत.

**मुख्यलेखापरिक्षक :** विभागीय अधिकारी यांचेकडुन रिपोर्ट आलेला असून, त्यात एकुण मालमत्तेची माहिती दिलेली असेल. त्या मालमत्ता कुठे आहे. कुणाच्या आहेत. याची झोनला कर्मचारी देऊन तपासणी करावी लागेल. कारण डिमांड नोटीस दिलेली होती का? हा सुध्दा मुद्दा तपासुन पहावा लागेल.

**मा. सभापती** : लेखा परीक्षणात जे आक्षेप घेण्यात आले. त्यानुसार लेखा परिक्षक यांनी सर्व कागदपत्रांची मागणी करावी. सर्व अभिलेख मागवुन तपासणी करावी. हा मुद्दा तपासणीसाठी किती दिवस लागतील. जास्त कर्मचारी तपासणीसाठी लागत असेल तर अस्थापना विभागाकडे मागणी करावी.

**मुद्दा क्र. २** : कर्मचाऱ्यांकडे असलेल्या प्रलंबित अग्रीम रक्कमाबाबत.

**मुख्यलेखाधिकारी :** सन ९७-९८ च्या वर्षातील कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या अग्रीम रक्कमेचे समायोजन अहवाल सादर करेपर्यंत कर्मचाऱ्यांकडे ५,६६,५५०/- इतकी रक्कम अग्रीम पोटी प्रलंबीत होते. त्यापैकी ४ लक्ष वसुल केले. सन ९६-९७ च्या वार्षीक अहवालामध्ये सुध्दा संपुर्ण अग्रीम रक्कमेचे समायोजन अद्याप पावेतो झालेले नाही.

**मा. सभापती** : उर्वरीत ८३,४५०/- इतकी रक्कम कशी वसुल करणार याचा खुलासा व्हावा.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** मला मा. मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी जायचे ५ हजार रुपये अग्रीम रक्कम मंजुर होत नाही. आणि येथे कर्मचाऱ्यांकडे ५ लाख रुपये अग्रीम म्हणुन ९७ पासुन थकीत आहे. वसुल करण्यात आले नाही. खेदाची बाब आहे. ही अग्रीम रक्कम घेतल्यानंतर किती दिवसात समायोजन करावयास पाहिजे त्याचे सुध्दा नियम आहे. त्याचे पालन झाले का?

**मा. सभापती** : खुलासा देण्यात यावा.

**मुख्यलेखाधिकारी :** अग्रीम रक्कम घेतल्यानंतर १५ दिवसाच्या आत उर्वरीत रक्कम समायोजन करावयास पाहिजे. या संदर्भात संबंधित कर्मचाऱ्यांना वसुली संदर्भात नोटीस दिल्या असून त्याचे पगार थांबविले आहे.

**श्री. मधकुर सावंत :** कलम १०५ किंवा १०६ नुसार लेखा परिक्षण अहवाल दरवर्षी का सादर झालेला नाही. कलम १०५ नुसार साप्ताहीक अहवाल सादर करणे आवश्यक आहे. यात ३ वर्षाचे एकत्र अहवाल दिले.

**मुख्यलेखपरिक्षक :** मु. प्रा. मनपा अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे साताहीक लेखा परीक्षण या विभागातील होत होते. १९९६ ला स्थायी समितीमध्ये एक ठराव घेऊन लेखा परिक्षण अहवाल साप्ताहीक ऐवजी दर महिन्याचा अहवाल सादर करावा असे ठरले. त्यानुसार दर महिन्याचा अहवाल पुढील प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आत मा. सभापतींकडे सादर केलेले आहे. साप्ताहीक अहवाल अपेक्षित असेल तर, तसा ठराव घेण्यत यावा. हा वार्षीक अहवाल कलम १४६ प्रमाणे सादर केलेला आहे.

**मा. सभापती** : ज्या कर्मचाऱ्यांच्या नावांवर अग्रीम रक्कम आहे. अशा कर्मचाऱ्यांच्या पगारामधुन का कपात करीत नाही. गेल्या बैठकीत निर्णय घेतल्यानुसार का कपात करण्यात आलेली नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** १ तारखेला कर्मचाऱ्यांचे पगार होतात २ तारखेला बैठक झाली. आता यापुढील महिन्याच्या पगारातुन रक्कम कपात करण्याबाबत कार्यवाही केली जाईल.

**मा. सभापती** : ज्या कर्मचाऱ्यांनी अग्रीम पोटी रक्कम घेतली त्याचे समायोजन १५ दिवसाच्या आत नियमाने करावयास पाहीजे. परंतु तसे झालेले नाही. कर्मचायांनी २ ते ३ वर्षापासुन खर्चाच्या व्यतिरिक्त जी जास्तीची अग्रीम रक्कम जमा करावयास पाहीजे ती केलेली नाही त्यारक्कमेचा त्यांनी वापर केला. अशा रक्कम ज्या ज्या कर्मचाऱ्यांकडे निघतील त्यावर नियमाने व्याज लावुन व्याजासहीत रक्कम वसुल करण्याबाबत हे सभागृह निर्णय घेत आहे व त्याचे पगाराच्या वरती रक्कम निघत असेल तर, त्याना पुर्ण पगार कापुन घ्यावा व रक्कम वसुल करण्यात यावी. मनपाचे नुकसान होणार नाही. याची दखल घ्यावयास पाहीजे.

**मुद्दा क्र. ३** :

**मुख्य लेखाधिकारी :** सन ९६-९७ पासुन रोख पुस्तिकेतील शिल्लक याचा ताळमेळ घेण्यात आला आहे. असे मुख्य लेखाधिकारी यांनी कळविले आहे. पडताळणी नंतर हा मुद्दा वगळण्यात येईल.

**मा. सभापती** : मान्यता देण्यात येते.

**मुद्दा क्र. ४** :

**मा. सभापती** : कर्जाची फेड वेळेवर करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**मुद्दा क्र. ५** :

**मा. सभापती** : याबाबत लेखा विभागाने विशेष दक्षता घेऊन पारीत झालेली देयके वेळेवर अदा केली जातील याबाबत काळजी घ्यावी.

**जकात विभाग :**

**मुख्यलेखापरिक्षक :** सन ९७-९८ च्या नियमित लेखा परिक्षणा अंतर्गत ३१,०८४/- इतकी रक्कम कमी वसुल करण्यात आली होती. त्यापैकी ११,५८२/- इतकी रक्कम

लेखा परिक्षण आक्षेपाअंती वसुल झाली. उर्वरीत १९,५०२/- पैकी रु. २१५१/- रु. वसुल करण्यात आले उर्वरीत रक्कम वसुल करणे बाकी आहे.

**जकात अधिक्षक :** ९७-९८ च्या परिक्षण अहवालानुसार जकात विभागाकडे एकुण २३,४४५/- रुपये बाकी होते. त्यापैकी २२,६७०/- जमा केलेले असून, त्याचा अनुपालन अहवाल दि. ०९-०१-२००२ सादर केलेला आहे. फक्त ७५५/- बाकी असून, त्या बाबतीत तेथील बील बुकाची तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. पावती क्रमांक या विभागात उपलब्ध आहे.

**मा. सभापती** : किती दिवसात कार्यवाही होणार आहे. याचा खुलासा द्यावा.

**जकात अधिक्षक :** जकात विभागाच्या गोडाऊनमध्ये प्रत्येक वर्षी एकुण ५ हजार पुस्तके जमा होतात यात पावत्या नेमक्या कोणत्या पुस्तकातील आहे, कोणत्या कर्मचाऱ्यांने पावती दिली याची तपासणी करण्यास वेळ लागेल. कारण गोडाऊनमध्ये नंबरवाईज पुस्तके ठेवलेली नाही. तपासुन ते पैसे वसुल करावे लागतील.

**मा. सभापती** : आता आपण सांगितल्याप्रमाणे जर रु. ७५५/- बाकी आहे. पावत्या असतील तर, सापडण्यासा वेळ लागणार नाही. न सापडल्यास तेवढी रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या पगारामधुन कपात करण्यात यावी.

**जकात अधिक्षक :** नावाचा स्पष्ट बोध होत नाही. सापडल्यास तसे लेखा विभागात कळविण्यात येईल १५-२० दिवस लागतील.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** बील बुक दिल्यानंतर तपासणी करण्यास वेळ व्हावयास नको गोडाऊनमध्ये त्याची रितसर मांडणी होत नाही का? बील बुक ठेवतांना तेथे कुणी जबाबदार कर्मचारी नाही का? असेल तर त्यास जबाबदार धरावे.

**जकात अधिक्षक :** या अगोदर मी या पदावर नव्हतो. त्यांनी का वर्षवाईज लावले नाही हे सांगु शकत नाही. बीलबुक पोत्यात भरुन आणुन टाकलेले आहे.

**मुख्यलेखापरीक्षक :** ऑडीट झाल्यानंतर ती बुके कोठे ठेवायचे व कशा पध्दतीने ठेवायचे ही जबाबदारी जकात अधिक्षक यांची आहे.

**जकात अधिक्षक :** जी पुस्तके दिल्या जातात त्याचे अभिलेख अद्यावत ठेवलेले नाही तसे कार्यालयास मी कळविलेले आहे.

**श्री. भरत लकडे :** लेखा परिक्षण विभागात कुणी जमा केले ऑडीट झाल्यानंतर पुस्तके कुणी घेऊन गेले याची रेकॉर्ड ठेवणे आवश्यक आहे.

**श्री. मधुकर सावंत, श्री. भरत लकडे :** पावती बुकचा रेकॉर्ड ऑडीटसाठी किंवा इतर महत्वाच्या कामासाठी ठेवणे आवश्यक आहे. सदर बुक कोणी घेऊन गेल्यास समजणार नाही. अशी परिस्थिती असेल तर, योग्य नाही जे जबाबदार असतील त्याचेवर कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : जकात बील बुक ठेवण्याची जबाबदारी जकात अधिक्षक यांची असतांना ते स्वतः सांगतात की बील बुक व्यवस्थिती ठेवलेले नाही. घेऊन गेल्यास समजणार नाही. असे असेल तर, यास जबाबदार जकात अधिक्षक आहे, असे म्हणता येईल. यापुढे जकात अधिक्षक म्हणुन ज्याची नेमणुक होईल त्यांनी संपुर्ण रेकॉर्ड बघुनच चार्ज घ्यावा व रेकॉर्ड विभागात जशी व्यवस्थित मांडणी होते. त्याप्रमाणे या जकात बील बुकाची १० दिवसाच्या आंत रितसर सिरीयल मांडणी करुन घ्यावी. जी कर्मचारी वर्ग आवश्यक असेल तो प्रशासनाकडुन जकात अधिक्षक यांनी मागवावा. मी स्वतः १० दिवसानंतर केव्हाही गोडाऊनला भेट देऊन सर्व व्यवस्थित दिसावयास पाहीजे. उर्वरीत

७५५/- रुपये रक्कमेचा रेकॉर्ड सापडला नाही तर १० दिवसाच्या आत संबंधित कर्मचाऱ्याच्या पगारामधुन कपात करु घ्यावे.

**श्री. भरत लकडे :** १५ ते १६ लाख दररोजची जकात होत होती. ती आता ११ ते १२ लाख येत आहे. एकदम २ ते ३ लाख कमी येत आहे कारण काय?

**श्री. मधुकर सावंत :** ३ लक्ष कमी येत आहे.

**जकात अधिक्षक :** गेल्या १० दिवसापासुन खाजगी ट्रॅव्हल्स गाडया बंद आहेत. या शहरातुन १०० गाडया बाहेर जातात व १०० गाडया येतात. यापासुन मनपास एका गाडीमागे १०००/- रु. धरल्यास १ लक्ष रुपये जकात करापोटी मिळतात. तसेच बाजारात मंदीची लाट असल्याने व पेट्रोल व डिझेलचे दर कमी झाल्याने जकात कमी येत आहे.

**मा. सभापती :** जकात विभागाला मी प्रश्न देऊन उत्तर मागविले. त्यावेळी ट्रॅव्हल गाडयापासुन फक्त दररोज २७ हजार रुपये मिळतात असे उत्तर दिले. आता १ लक्ष रुपये सांगतात. जकात अधिक्षकाकडे अतिरिक्त कार्यभार आहे. या ठिकाणी कायमस्वरुपी सक्षम अधिकारी असणे आवश्यक आहे. आयुक्तांना सुचना करु इच्छितो की, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन आर्थिक बाबींचा मुद्दा उपस्थित झाला त्यामुळे सक्षम अधिकाऱ्यांची जकात अधिक्षक म्हणुन नियुक्ती करण्यात यावी.

**कर आकारणी -१** :

**मुख्य लेखा परिक्षक** :- मुद्दा क्र. १, २ अनुपालन प्राप्त आहे. मुद्दा क्र. ३ वरील आक्षेप वगळण्यात आलेला आहे.

**मा. सभापती :** मान्य करण्यात येते.

**कर आकारणी -२** : मुद्दा क्र. १ व २ वर वसुली बाबत कळविलेले आहे.

**मा. सभापती :** मान्य करण्यात येते.

**कर वसुली विभाग :**

**मुख्य लेखा परिक्षक :** मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भात सुचनात्मक मुद्दा असल्याने वगळण्यात आलेला आहे. तसेच मुद्दा क्र. ४ चे अनुपालन करण्यात आले आहे.

**मा. सभापती :** मान्यता देण्यात येते.

**मालमत्ता विभाग :**

**मा. सभापती :** घरबांधणीसाठी कर्ज घेतलेले किती कर्मचारी आहेत. त्यापैकी किती कर्मचारी निवासस्थानात राहतात व जे मयत/सेवानिवृत्त झाले अशा कर्मचाऱ्यांची निवासस्थाने रिकामी झालेली आहेत का? खुलासा द्यावा.

**मालमत्ता अधिकारी :** घर बांधणीसाठी कर्ज घेतलेले एकुण ११ कर्मचारी असून, त्यापैकी तीन लोक निवासस्थानात राहतात. त्यामध्ये उद्यान अधिक्षक श्री. भडके जे एम, श्री. खाजा मोईनोद्दीन, श्री. प्रकाश नेकीराम आहेत. संबंधितांना दि. ०७-०७-२००२ ला नोटीस सुध्दा दिलेल्या आहेत.

**उद्यान अधिक्षक (श्री. भडके) :** १५,०००/- घर बांधी अग्रीम घेतले ते परत केले. जागेबद्दल वाद निर्माण झाल्याने बांधकाम कसा आले नाही.

**मालमत्ता अधिकारी :** सेवा निवृत्त जे झाले त्याचे जागेवर त्यांचे कुटुंबातील सेवेत घेतलेले आहे ते त्या निवासस्थानात राहतात. मयतपैकी एक वाहन चालक श्री. शर्मा म्हणुन एक महिन्यापुर्वी मयत झाले. त्याचे जे वारसदार आहे त्यांना निवासस्थान रिकामे करण्याबाबत नोटीस दिलेली आहे. लवकरच कार्यवाही होईल.

**शहर अभियंता विभाग**

**मा. सभापती** : मुद्दा क्र. १, २, ३, ४ चे अनुपालन अहवल देण्यात आलेले आहे. त्यास मान्यता देण्यात येते.

**स्लम-२ विभाग :**

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा की, दंड का वसुल करण्यात आलेला नाही.

**अति. शहर अभियंता :** रक्कम रुपये ६६००/- दंड वसुल करायचे होते. दंडात्मक कार्यवाही करण्याबाबत संबंधित ठेकेदाराला पत्र दिले आहे. श्री व्यकंटेश तमखाने ठेकेदार असून, सध्या आजारी असल्याने कार्यवाही होत नाही. त्यांनी जर रद्द जमा केली नाही तर, संबंतिध विभागातील उप अभियंता, क. अभियंता यांचेकडुन ही रक्कम वसुल करण्यात येईल. तसे लेखा परिक्षण विभागाला कळविण्यात आलेले आहे.

**मा. सभापती** : ताबडतोब पुन्हा नोटीस देऊन ठेकेदाराकडुन रक्कम वसुल करावी. नसता कर्मचाऱ्यांकडुन वसुल करण्यात यावी.

**अतिरिक्त शहर अभियंता - (बांधकाम-१) :**

**मा. सभापती** : मुद्दा क्र. १ वर खुलासा द्यावा.

**मुख्यलेखापरिक्षक :** गरमपाणी येथे खाम नदीवर पाईप कलव्हर्ट बांधण्यासाठी छावणी बोर्ड व मनपा औरंगाबाद यांनी प्रत्येकी ५०% रक्कम खर्च करण्याचा निर्णय झाला. करारनामा केला किंवा काय बोध होत नाही. खर्ची रक्कम ५४% प्रमाणे रु. २,४६,४६५/- येते. ती आलेली नाही. स्लम विभागास तसे कळविले. पुढील हफ्त्यात कमी करणार म्हणुन आजच पत्र आले आहे. करारनामा मागविला होता. अद्याप उपअभियंता यांचेकडुन उपलब्ध झालेला नाही.

**उपअभियंता (श्री. खमर) :** छावणी बोर्डला तसे पत्र दिलेले आहे. त्यांचेकडुन तसे उत्तर प्राप्त झालेले नाही.

**उपअभियंता (बांध-१) :** जकात अधिक्षक यांना यापुर्वीच सन १९९८ मध्ये पत्र येऊन कळविले आहे व जकात अधिक्षक व माझी चर्चा झाली की, छावणी बोर्डला जकात नाक्याच्या करापोटी रक्कम द्यावी लागते. त्यातुन ही रक्कम वळती करुन घ्यावी. सर्व कागदपत्रांची पुर्तता केली. तसेच ही रक्कम या अगोदर वसुल हावयास पाहीजे होती. ती झालेली नाही. गेल्या दोन तारखेच्या आदेशाप्रमाणे करारनाम्याचा संबंध येत नाही. ५४% रक्कम खर्च करण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे डायरेक्ट वसुल करावयास पाहीजे होती. तसेच संचिकेमध्ये सुध्दा ९१ मध्ये स्थायी समितीने चर्चा केल्यानुसार मा. आयुक्त यांनी सुध्दा ५४% रक्कम कपात करण्याबाबत नोंद केली. तसेच गुत्तेदाराचे बील देण्याच्या अगोदर सुध्दा उपअभियंता तसेच अतिरिक्त शहर अभियंता यांनी सुध्दा संचिकेवर नोंदविलेले आहे की, ५४% रक्कम कपात करावी. तरच ठेकेदाराने बील द्यावे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** छावणी बोर्ड व मनपाचा करारनामा झालेला असेल त्याप्रमाणे वसुली का केली नाही. खुलासा द्यावा.

**उप अभियंता (बां-१) :** छावणी मंडळाने ना हरकत पत्र दिले. त्यानुसार प्रकरणात कार्यवाही झाली. पत्र व्यवहार झाले. करारनामा झालेला नाही.

**मा. सभापती** : आक्षेप असा की, छावणी बोर्डकडील ५४% वसुली नुसार रु. १,०६,४६५/- वसुल झाले किंवा कसे चर्चा होत आहे. करारनाम्यावर अधिकारी काय उत्तरे देतात याचा ताळमेळ लागत नाही.

**उप अभियंता (बां-१) :** १९९१ मध्ये जकात अधिक्षकांना पत्र दिले. कपात आवश्यक ५०-५०% ठरले होते. मा. आयुक्त व मुख्य लेखा परिक्षकाचे टिप्पणी प्रमाणे ५०% वळती करुन बिले देण्याबाबत ठरलेले आहे. २ तारखेच्या आदेशाप्रमाणे काम करतो.

**मा. सभापती** : संचिकेमध्ये जी नोंद आयुक्तांनी केली त्याची प्रत लेखा विभागात उपअभियंता यांनी सादर करावी व आता यापुढे छावणी बोर्डला जकात करापोटी देण्यात येणाऱ्या रक्कमेतुन मनपाची खर्च झालेली ही रक्कम वसुल करण्यात यावी. मुद्दा क्र. २ वर खुलासा द्यावा.

**अति. शहर अभियंता :** गेल्या दोन तारखेला बैठक झाल्यानंतर आपण दिलेल्या निर्देशानुसार १६१.०२ ला १६५४/- वसुल करण्यात आलेले आहे.

**मा. सभापती** : जे आदेश झालेले आहेत. त्याची प्रत लेखा विभागाला पाठविण्यात यावी.

**बांधकाम-२ विभाग :**

**मा. सभापती** : मुद्दा क्र. १, २ आक्षेपातुन वगळण्यास मंजुरी देण्यात येते.

**विद्युत विभाग** :

**मा. सभापती** : मुद्दा क्र. १ नुसार ६१७/- आपण वसुल केले. वसुली झाली म्हणुन आक्षेप वगळणे योग्य होणार नाही. कारण हे असे चालत राहिले तर कर्मचरी नेहमीच चुका करतील कर्मचाऱ्यांनी चुक केली ६१७/- रुपये गुत्तेदारास का जास्त दिले. यात मनपाचे नुकसान झाले. आक्षेप काढल्यानंतर कुणी ६१७/- रु भरले. यात जबाबदारी म्हणुन अशा प्रकरणात कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करावयास पाहीजे.

**मुख्य लेखा परिक्षक :** जी आय पोल बसविण्यासाठी रु. २९,९६०/- चे अंदाजपत्रक होते. त्यामध्ये वाटाघाटीनंतर १४.१% कमी दराने ठरल्यानुसार रु. २६,८२०/- रुपये अदा करतांना रु. ३७८२/- ऐवजी ३१६५/- कपात करण्यत आले. ६१७/- रु गुत्तेदाराला जास्त देण्यात आले.

**मुख्यलेखाधिकारी :** जाणीवपुर्वक चुक झालेली नाही. गोळा बेरीज करतांना चुक झालेली आहे. रु. ६५४/- जास्त दिले. अशी तपासणी होण्यासाठीच ऑडीट होते. जे आक्षेप आहेत. त्यानुसार पुढील काळात त्या आक्षेपाचे निवारण करणे आवश्यक असते. ते सजेस्टीव आक्षेप आहेत. आक्षेपानुसार पुर्तता करण्यात येते.

**मा. सभापती** : मुद्दा क्र. २ वरचा खुलासा करावा. दोन वेळेस बील देण्यात आले. कस दिले, यास जबाबदार कोण?

**उपअभियंता (यांत्रिकी)** : संबंधित दुय्यम आवेक्षक श्री घुले यांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. त्याचे त्यांनी उत्तर दिले की, हे जाणुन-बुजुन केलेले नाही. चुकुन झालेले आहे. तरी क्षमा करावी आणि त्यावेळी श्री शिरसाठ उपअभियंता होते. त्यांना सुध्दा नोटीस दिली होती. त्यांनी सुध्दा वरील प्रमाणेच उत्तर दिले. जास्तीची दिलेली रक्कम संबंधित एजन्सीज कडुन भरुन घेतलेले आहे.

**श्री. इलियास किरमानी :** एकच जे. ई दोन वेळेस बील कसे अदा करु शकतो. एकच गाडी दोन ठिकाणी दुरुस्त झाली असती तर, समजु शकलो असतो. परंतु एकाच

एजन्सीजला दोन बीले एकाच गाडी संबंधी जाणुन बुजून दिले असे सिध्द होते.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** स्वच्छतेच्या दृष्टीने वार्डातील गटार साफसफाई करण्यासाठी २ ते ३ हजार रुपयापर्यंतची रेटलिस्टच्या कामासंदर्भात तक्रार केल्यानंतर संबंधित जे. ई सदर ठिकाणी पाहणी केल्याशिवाय कार्यवाही करीत नाही. असे सांगतात आणि नाही त्या ठिकाणी दोनदा बीले देऊन मनपाचे अधिकारी/कर्मचारी नुकसान करतात. यास जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा आपण योग्य तो निर्णय घ्यावा. आज किमान ४-५ लोकांना निलंबीत करावे. तर या सभागृहाचे महत्व राहील. असे माझे मत आहे.

**मा. सभापती** : येथे दंडात्मक कार्यवाही करण्याबाबत सुचविण्यात आले आहे. काय कार्यवाही करायची सभागृहाने ठरवावे.

**श्री. मीर हिदायत अली :** जे. ई. कडुन दोन वेळेस एकच देयक कसे देण्यात येते. जाणुन बुजुन दिले आहे. कारण एकाच एजन्सीजला दिले गेले. त्यांचेवर कार्यवाही करण्याचा निर्णय घ्यावा नसता आज २१८५/- रु. दिले, उद्या २ लाख देण्या येतील. असे होऊ शकते जाणुन बुजुन डबल बील दिले आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :**नियमानुसार कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात यावा नसता असे प्रकरण सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात यावे.

**श्री इलियास किरमानी, श्री किशोर तुळशीबागवाले :** अशा कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही व्हावी. दुसऱ्या वेळेस कर्मचारी अशी चुक करणार नाही. या सभागृहाचे महत्व अधिकारी कर्मचारी यांना कळेल. चुकीने काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना घरी पाठवावे.

**श्री. मधुकर सावंत :** दोन वेळेस रक्कम देऊन संबंधित एजन्सीज बरोबर संगनमत करुन आपले कर्मचारी त्या पैशाचा वापर करीत असावे अशी शंका आहे. कार्यवाही कण्याचा निर्णय घेण्यात यावा या सभागृहाचे महत्व कर्मचाऱ्यांना कळेल.

**मा. सभापती** : अशा प्रकरणात इतर व निलंबनाची कार्यवाही करण्याचा अधिकार कोणास आहे. विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** पैशांचा गैरविनियोग झाल्याबद्दल चौकशी करुन तपासणी करावी लागेल. व कर्मचाऱ्यांना शिक्षा देणेपुर्वी त्यांचे म्हणणे ऐकुन घ्यावे लागेल. मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ नुसार आयुक्त हे त्या कर्मचाऱ्यांवर ठपका ठेवणे, वेतनवाढ रोखणे, निलंबन करणे इ. कार्यवाही करण्याची तरतुद आहे.

**मा. सभापती** : अशा कर्मचाऱ्यांना दंडात्मक कार्यवाही केल्यास त्याचे सेवेवर किंवा सेवा निवृत्तीवर काय परिणाम घेऊ शकतो.

**विधी सल्लागार :** अशी कार्यवाही करण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांचे म्हणणे एकुण घ्यावे लागेल. तशी नोटीस वगैर देऊन कार्यवाही करावी लागेल. त्यानंतर दंडात्मक कार्यवाही करता येईल.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** सदर कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्याचे आदेश मा. आयुक्तांना देण्यात यावे असा निर्णय सभागृहाने घ्यावा.

**श्री. मीर हिदायत अली :** जे लोक नाक्यावर २०-२० रुपये घेतात अशांना प्रशासनाने निलंबित केलेले आहे. या कर्मचाऱ्यांनी तर २१८५/- दोन वेळेस देयक दिले.

त्यानुसार नियमाने या कर्मचारी कार्यवाही झालीच पाहीजे निर्णय घेण्यात यावा. त्या चोरीमध्ये व या चोरीमध्ये काय फरक आहे.

**श्री मधुकर सावंत :** संबंधित कर्मचाऱ्यांना समज द्यावी व दंड आकारणी करुन तो वसुल करण्याची सुध्दा कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : मागील बैठकीत या विषयावर चर्चा झालेली होती. त्यानुसार मा. आयुक्तांकडे सदर संचिका पाठविलेली आहे का? त्यावर काय ॲक्शन घेण्यात आलेली आहे.

**उप. अभिय (यां.) :** सदर संचिका अतिरिक्त शहर अभियंता यांचेकडे पाठविलेली आहे.

**अति. शहर अभियंता :** या प्रकरणातील दोन संचिका आहेत. एक संचिका आहे. दुसरी शोधावी लागेल. दोन फाईल एकत्रित करुन मा. आयुक्तांकडे पाठवावयाचे आहे. पडताळणी करण्यात येत आहे. प्रकरण ९५-९६ चे आहे. दोन्ही संचिका तीन दिवसाच्या आत मा. आयुक्तांकडे पाठविण्यात येईल.

**मा. सभापती** : संचिका उद्याच शोधुन काढावी व परवा मा. आयुक्तांकडे पाठविण्यात यावी. मुद्दा क्र. ३ व ४ वगळण्यास मंजुरी देण्यात येते.

**यांत्रिकी विभाग :**

**मा. सभापती** : मुद्दा क्र. १, २, ३ वगळण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
मुद्दा क्र. ४ वर खुलासा करावा.

**अति. शहर अभि. :** सदर प्रकरणातील १०७७/- इतकी रक्कम वसुल करण्यात आलेली आहे.

**मा. सभापती** : वसुली केल्याबाबतची कागदपत्रे संबंधित विभागाकडे देण्यात यावी.

**कार्यकारी अभियंता :**

**मा. सभापती** : मुद्दा क्र. १, २, ३ वगळण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच पाणी पुरवठा-२ मधील मुद्दा क्र. १ व २ वगळण्यास सुध्दा मंजुरी देण्यात येते.

**ड्रेनेज-२** :

**मा. सभापती** : ४०० गोणी सिमेंटची वसुली या संदर्भात खुलासा करण्यात यावा.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :**भांडार विभागाने खुलासा करावा.

**प्र. शहर अभियंता :** ड्रेनेजच्या कामासाठी १६०० बॅग आवश्यक आहे. असा रिपोर्ट होता. १६०० गोणी टाकण्यात आल्या १२०० गोणी सिमेंटची वसुली संबंधिताकडुन करण्यात आलेली आहे. ४०० गोणीचे बाकी आहे. त्याची किमंत ४४,६६०/- इतकी आहे. सदर काम हे उदय इंजिनिअरींग यांचे होते. त्यांचे वेगवेगळे २ ते ३ ठिकाणी कामे होती. जेथे सिमेंट पाठविले ते कोणत्या कामामध्ये पाठविण्यात आले होते याची तपासणी करावी लागेल. तसेच त्यापुर्वी जे स्टोअर किपर होते ते सध्या सेवानिवृत्त झालेले आहे. त्यांना सुध्दा बोलाविण्यात आलेले आहे व संबंधित उदय इंजिनिअरींग मालक यांना सुध्दा नोटीस देऊन ४०० गोणी सिमेंट आपल्याकडे जास्त आल्याने त्याची रक्कम भरणा करावी म्हणुन नोटीस दिलेली आहे.

**मा. सभापती** : मागील बैठकीत आपण सांगितले हेते की, पावत्या सापडत नाही. ऑडीटमध्ये सुध्दा कमी वसुल करण्यात आले म्हणुन आक्षेप आलेला आहे. यावर ताबडतोब कार्यवाही व्हावयास पाहिजे होते. ती झालेली नाही. म्हणुन त्यावेळी जे स्टोअर किपर होते ते आता सेवानिवृत्त झालेले आहे. त्यांचे पेन्शन आपल्याकडुन देण्यात येते. जोपर्यंत सदर संचिका सापडुन संबंधित एजन्सीकडुन रक्कम वसुल होत नाही तोपर्यंत सेवानिवृत्त झालेले स्टोअर

किपर यांचे पेन्शन देवु नये. कपात करता येईल का लेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** पगाराची/पेन्शनची पुर्ण रक्कम कपात करता येणार नाही. भागशः वसुली करता येईल.

**मा. सभापती** : बऱ्याच विभागामध्ये हीच परिस्थिती आढळुन आलेली आहे. आताच यांत्रिकी विभागावर चर्चा होत असतांना अधिकारी सांगतात निलंबीत करु नये. परंतु अधिकारी/कर्मचारी चुकीच्या पध्दतीने कामे करतात. जाणुन बुजुन होतात. अशी शंका सभागृहाने व्यक्त केली. ही परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने योग्य निर्णय घेणे आवश्यक आहे. यासाठी सदर सेवानिवृत्त स्टोअर किपर यांचे पेन्शनमधुन जो पर्यंत संचिका सापडुन कार्यवाही होत नाही. तोपर्यंत अर्धा रक्कम वसुल करण्यात यावी.

**विषय क्र. ६५/१ :**

सन १९९८-९९ च्या लेखा परिक्षण अहवालावर विचार विनिमय करणे. (दि. ०२-०१-२००२ च्या स्थायी समिती सभेतील निर्णय)

**मा. सभापती** : सन १९९८-९९ च्या लेखा परिक्षण अहवालावर चर्चा करावी.

**चर्चा**

**लेखा विभाग :**

**मा. सभापती** : मुद्दा क्र. १ वर मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

**मुख्य लेखाधिकारी :** मनपा कडुन अधिकारी/कर्मचारी यांना काही कार्यालयीन कामकाजास्तव अथवा आजारी कारणास्तव अग्रीम रक्कम म्हणुन १७,३५,६०४/- इतकी रक्कम दिलेली होती. त्यापैकी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी ५,६२,४७८/- इतके समायोजन केलेले असून, उर्वरीत ११,७३,१२२/- इतकी थकीत रक्कम आहे.

**मा. सभापती** : रुपये ११,७३,१२२/- इतकी रक्कम कोणते अधिकारी/कर्मचारी यांचे नावावर आहे. माहिती द्यावी.

**मुख्यलेखाधिकारी :** नगररचना विभागात कार्यरत असलेले श्री. काळेले क. अभियंता यांचे नावाने ६ लक्ष ५ हजार रु. आहे. सदर नगररचना विभागामार्फत जागा संपादनाची कर्यवाही होते त्यावेहेस बॉन्ड खरेदी करण्यासाठी खर्च लागतो व इतर खर्चासाठी म्हणुन सदर रक्कम श्री. काळेले यांचे नांवाने अग्रीम दिलेली आहे. अद्याप त्यांनी समायोजन केलेले नाही. १,५२,८९४/- इतक्या रक्कमेचे अलम खरेदीसाठी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांना दिले बुक ॲडजस्टमेंट आहे. समायोजन करावे लागेल.

**कार्य. अभियंता (पा. पु. व ज. नि.) :** जितक्या रक्कमेचे अटम मागविण्यात येते तेवढयाच रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट दिला आहे. मालाचा पुरवठा झाल्यानंतर पावती मिळते. याचे समायोजन करण्यात येईल.

**मा. सभापती** : संबंधित कर्मचारी श्री. काळेले यांना बोलावुन घ्यावे त्यांनी का रक्कम समायोजन केलेली नाही.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** वार्डात कामे होत नसुन कर्मचाऱ्यांच्या नांवे ६ लक्ष का देण्यात येते. हे योग्य नाही. समायोजन केले नाही तर त्यांचेवर कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : ९८-९९ मध्ये अग्रीम रक्कम घेतली. अद्याप जमा केले नाही. पावत्या का जमा केल्या नाही. त्यांना बोलवावे. खुलासा घेण्यात येईल.

**मुख्यलेखाधिकारी :** श्री. कालेले यांचेकडे ६ लक्ष रुपये अग्रीम म्हणुन आहेत त्यांनी अद्याप समायोजन केलेले नाही. तशा सुचना त्यांना दिलेल्या होत्या. त्यांनी तात्काळ समायोजन केले नाही तर, त्यांचेवर निलंबनाची कार्यवाही प्रस्तावित करता येऊ शकतो. तसेच छत्रपती शिवाजी पुराण संग्राहालयासाठी बाबासाहेब पुरंदरे यांचे नावाने १-१ लक्ष असे २ लक्ष रुपये अग्रीम म्हणुन दिलेले आहे. त्यांना सुध्दा कळविण्यात आलेले आहे. इत रक्कम कर्मचारी यांना मेडीकल उपचारासाठी अग्रीम म्हणुन दिले आहे. काही कर्मचाऱ्यांनी इतर कामासाठी अग्रीम रक्कम घेतलेली आहे. त्यांनी समायोजन केले नाही तर, त्यांचे पगारातुन वसुल करण्यात येईल.

**मा. सभापती** : ज्या कर्मचाऱ्यांनी अग्रीम रक्कम घेतलेली आहे ती ती रक्कम त्या कर्मचाऱ्यांने वेतनातुन कपात करुन घ्यावी. श्री. कालेले यांना बोलाविण्यात यावे. ते येई पर्यंत दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

**जकात विभाग -**

**मा. सभापती** : जकात अधिक्षक यांनी खुलासा करावा सन ९८-९९ नुसार उर्वरीत रक्कम का वसुल करण्यात आलेली नाही.

**जकात अधिक्षक** :- सदर रक्कमेच्या संदर्भात पावती बुक बघण्याचे काम चालु आहे. पावत्या आढळुन आल्यास रक्कम वसुल करुन अनुपालन अहवाल सादर करण्यात येईल. या विभागाकडे एकुण २०७२/- रुपये बाकी आहे. उर्वरीत सर्व रक्कम भरलेली आहे.

**मा. सभापती** : आजच्या १० दिवसानंतर आपण पुन्हा सभा घेणार आहोत. तोपर्यंत पावत्या सापडल्या नाही तर संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतनामधुन रक्कम वसुल करावी. असे केल्यास सदर कर्मचारी स्वतः आपल्याकडे पावत्या जमा करतील.

**मुख्यलेखापरीक्षक :** या विभागातील बऱ्याच रजिस्टरची पान फाटलेल्या अवस्थेत आढळुन आलेली आहेत. त्यामुळे ऑडीट करतांना कर्मचाऱ्यांना त्रास होतो. यापुढे या विभागातील कर्मचाऱ्यांनी दक्षता घेणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : काही विभागाचे आपण संगणकीकरण केलेले आहे. त्यामध्ये कोणकोणते विभाग येतात. खुलासा देण्यात यावा.

**प्र. उपआयुक्त (प्र.) :** संगणकीकरणामध्ये मालमत्ता, तसेच पाणीपट्टीची देयके नोंदी घेण्यात येत आहे. वेळोवेळी जसा बदल होईल त्याप्रमाणे दुरुस्ती केली जाते. आता यानंतर कर आकारणी विभाग तसेच इतर विभागाचे संगणकीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी शासनाकडुन एक आदेश येण्याचे अपेक्षीत आहे की, शासनाने ठसुन दिलेली एजन्सी आहे त्या एजन्सी मार्फत मनपाचे संगणकीकरण करणे बंधनकार आहे. तसे शासनाचे आदेश आहेत.

**मा. सभापती** : अमुक एजन्सीद्वारेच संगणकीकरण करावे असे शासनाने घालुन दिलेल्या नियमानुसार मनपास ते आदेश बंधनकारक होणार नाही. होत असेल तर शासनाकडे तसे पत्र आपल्या विभागाकडुन गेलेले आहे का?

**प्र. उपआयुक्त (प्र.) :** शासन ठरवुन देईल त्याच एजन्सीजकडुन मनपाने संगणकीकरण करावे असे आदेश आहेत या अगोदरच्या एजन्सीजची मुदत सप्टेंबरला संपलेली असल्याने शासनाकडुन नवीन एजन्सीचे नांव यायचे आहे. त्यानुसार कार्यवाही करावी लागेल. शासनाकडुन तसे पत्र देऊन सदर

एजन्सीला मुदतवाढ दिली किंवा कसे याबाबत माहिती विचारलेली आहे. अद्याप माहिती आलेली नाही.

**कर वसुली विभाग :**

**मा. सभापती** : मुद्दा क्र. २ नुसार रजिस्टर व्यवस्थित ठेवणे. कागद चांगल्या दर्जाचा वापरणे व इतर ज्या सुचना संबंधित विभागीय अधिकारी यांना दिलेल्या आहेत. त्याचे पालन करावे. मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात थोडक्यात खुलासा करावा काय कार्यवाही केलेली आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :**मुद्दा क्र. ३ नुसार काय कार्यवाही करण्यात आली चौकशी झालेली आहे का?

**मुख्यलेखापरिक्षक** : या प्रकरणात तीन कर्मचारी यांना निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली होती. त्यामध्ये एक विभागीय अधिकारी सुध्दा होते. याबाबत आणखी खाते चौकशी चालु आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** खाते चौकशी किती दिवसापासुन चालु आहे. नियमानुसार सहा महिन्याच्या आत चौकशी न झाल्यास पुन्हा सभागृहाची परवानगी घेऊन चौकशी सुरु करावी लागते. सभागृहाची परवानगी घेतलेली आहे का?

**मा. सभापती** : ज्यांचेकडे खाते चौकशीची जबाबदारी सोपविली त्यांना मुदत दिलेली असेल. मुदतीच्या आत का कार्यवाही केलेली नाही. कोणते अधिकारी होते.

**मुख्यलेखापरिक्षक :** या प्रकरणामध्ये चौकशी अधिकारी म्हणुन नगररचना विभागाचे तत्कालीन अधिकारी श्री. चौथाई यांचेकडे हे काम होते. त्यांनी मा. आयुक्तांकडे चौकशी अहवाल सादर केलेला होता. तो अहवाल आयुक्तांना समाधानकारक न वाटल्याने त्यांनी चौकशीसाठी पुन्हा उपआयुक्त (प्र.) श्री. कांबळे यांचेकडे चौकशी करण्यासाठी जबाबदारी सोपविलेली आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** या प्रकरणामध्ये ज्यांना निलंबित केले त्यांची नांवे वाचुन दाखवावी.

**मुख्यलेखापरीक्षक :** या प्रकरणामध्ये विभागीय अधिकारी श्री. अभंग तसेच स्वच्छता निरीक्षक श्री. सितापुरे व श्री कय्युम यांना निलंबित करण्यात आले होते. स्थायी समितीच्या निर्णयानुसार त्यांना पुन्हा कामावर घेतलेले आहे. त्यांची विभागीय चौकशी चालु आहे.

**मा. सभापती** : या प्रकरणात संबंधित कर्मचारी/अधिकाऱ्यांवर पुढील काय कार्यवाही झाली त्याचा लेखी अहवाल प्रशासनाने १० दिवसांच्या आत सादर करावा.

**कर आकारणी विभाग-१ :**

**मा. सभापती** : यातील मुद्दा क्र. १ व २ वगळण्यात येत आहे. मुद्दा क्र. ३ वर खुलासा करावा.

**मुख्यलेखापरिक्षक :** अध्यक्ष कृषी उत्पन्न बाजार समिती यांना डिमांड देण्यात आलेली होती. डिमांड रजिस्टरला आक्षेपाअंती नोंद घेण्यात आलेली आहे. समोरची पार्टी यांनी प्रकरण न्यायप्रविष्ट केले होते. त्या संबंधीचा स्थगिती आदेश व्हॅकेट झालेला आहे. वसुलीची कार्यवाही करण्याबाबत विभागीय अधिकारी यांना सुचवावे लागेल.

**मा. सभापती** : या प्रकरणाचा स्टे आदेश होता तो व्हॅकेट झाला. आता १० दिवसांच्या आत वसुली करावी. झोन अधिकारी यांना तसे कळवावे. मुद्दा क्र. ४ वगळण्यात येत आहे.

**कर आकारणी विभाग-२ :**

**मा. सभापती** : मुद्दा क्र. १, २ वगळण्यास मंजुरी देण्यात येते.

**शहर अभियंता विभाग :**

**मा. सभापती** : उद्यान बांधकाम मुद्दा क्र. १, २, तसेच इमारती विभाग मुद्दा क्र. १ व उद्यान विभाग मुद्दा क्र. १ वगळण्यास मंजुरी देण्यात येते.

**अतिरिक्त शहर अभियंता विभाग :**

**मा. सभापती** : बांधकाम विभाग-२ कडील मुद्दा क्र. १ व विद्युत विभागातील मुद्दा क्र. १ वगळण्यात येतो. यांत्रिकी विभागातील वाहन क्र. एम. एच.-२०-ई-३२०० वरील ज्यादा खर्चाचा खुलासा मागवण्यित आलेला होता. तो तात्काळ लेखा परिक्षण विभागाकडे संबंधित अधिकाऱ्यांनी द्यावा.

**कार्यकारी अभियंता (पा. पु. - व ज. नि. ) :**

**मा. सभापती** : ड्रेनेज-१ मधील मुद्दा क्र. १ व २ तसेच ड्रेनेज-२ मधील मुद्दा क्र. १ व २ वगळण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**स्लम विभाग - २ :**

**मा. सभापती** : मुद्दा क्र. १ वगळण्यास मंजुरी देण्यात येते. मुद्दा क्र. २ वर खुलासा करावा.

**मुख्यलेखापरीक्षक :** मा. आयुक्तांनी आदेशित केल्यानंतर सुध्दा २००/- दंड वसुल केला. २७००/- बाकी आहे.

**अति. शहर अभियंता :** सदर संचिका अभिलेख विभागात दिलेली आहे. ११ जानेवारी रोजी मी पत्र देऊन संचिकेची मागणी केलेली आहे. तेथे सध्या कुणी कर्मचारी नाही. या विभागाचे कर्मचारी संचिकेचा शोध घेत आहोत. संचिका मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती** : शहाबाजार येथील कामाच्या संदर्भात ही संचिका आहे. आजच्या आज अभिलेख विभागाने ही संचिका द्यावी. तसा अहवाल कार्यवाही झाल्यानंतर मुख्य लेखा परिक्षण विभागास द्यावा. कार्यवाही होत नाही तोपर्यंत संबंधित कर्मचाऱ्याचे पेन्शन थांबवावे. कार्यरत असल्यास पगारातुन वसुल करावे.

**भांडार विभाग-**

**मा. सभापती** : ज्या सुचना भांडार विभागासाठी दिल्या त्याचे पालन करावे. यातील मुद्दा क्र. ४ मध्ये खुलासा समधानकारक नाही असे म्हटले. सभागृहाला सविस्तर माहिती द्यावी.

**मुख्यलेखापरिक्षक :** नियमानुसार कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांनाच गणवेश देता येतो. परंतु ९८-९९ मध्ये अस्थायी कर्मचाऱ्यांना सुध्दा गणवेश वाटप करण्यात आलेले होते. याबाबत धोरणात्मक निर्णय होऊन गणवेश नियमात तशी दुरुस्ती करुन नंतरच कार्यवाही करावयास पाहिजे होती. ती झालेली नाही.

**मुख्यलेखाअधिकारी :** अस्थायी कर्मचाऱ्यांना गणवेश देण्याबाबत सर्वसाधारण सभेने तसेच स्थायी समितीने मान्यता दिल्यानुसार कार्यवाही केलेली आहे.

**मुख्यलेखापरिक्षक :** मंजुरी झाली त्यास आक्षेप नाही. परंतु मंजुरी नुसार नियमात बदल (दुरुस्ती) केलेली नाही. त्यास आक्षेप घेतलेला आहे.

**संकीर्ण विभाग :**

**मा. सभापती** : यातील अस्थापना विभाग-१ मधील दोन्ही मुद्दयाने अनुपालन झाल्याने वगळण्यास मंजुरी देण्यात येते. अस्थापना-२ मधील मुद्दा क्र. १ पान क्र. ३४ वरील खुलासा करावी.

**मुख्यलेखापरिक्षक :** श्री. स. मोहमंद जाफर यांनी वैद्यकीय उपचारासाठी २५,०००/- अग्रीम रक्कम घेतलेली होती. वैद्यकीय उपचारासाठी ८०% रक्कम देण्यात येते. उपरोक्त रक्कमेतुन खर्च केलेली र. रु. ९,०२८/- च्या ८०% रक्कम मंजुर करण्यात आल्याने उर्वरीत ९,७७८/- रुपये संबंधित कर्मचाऱ्याकडुन आलेले नाही.

**मा. सभापती** : संबंधित कर्मचाऱ्यांच्या पगारातुन कपात करुन घेण्यात यावे. एखाद्या कर्मचाऱ्यांस अग्रीम दिल्यास पुन्हा त्याच कर्मचाऱ्याच्या नांवावर अग्रीम देण्याची पध्दत बंद करावी.

**मुख्यलेखा अधिकारी :** मागच्या वेळेस पासुन कर्मचाऱ्यांना एकदा अग्रीम रक्कम दिल्यानंतर पुन्हा देण्यात येत नाही. पहिल्या रक्कमेचे समायोजन करुन दिल्यानंतर अग्रीम रक्कम दिली जाते.

**मा. सभापती** : एका विभागात एका कर्मचाऱ्यांच्या नावांवर अग्रीम रक्कम दिल्यास त्याच विभागातील दुसऱ्या कर्मचाऱ्यांच्या नावांवर अग्रीम देण्यात येऊ नये. पुर्वी जे अग्रीम त्या विभागास दिले त्याचे समायोजन झाल्यावरच अग्रीम दिले जावे. विभाग वाईज अशी पध्दत चालु करता येत असेल तर, तशी कार्यवाही करावी.

**शिक्षण विभाग (पान क्र. ३९) :**

**मा. सभापती** : या संदर्भात खुलासा करावा.

**मुख्यलेखापरिक्षक :** या प्रकरणात ९७-९८ मध्ये डेस्क खरेदी करण्यात आले. ते विना निविदा खरेदी करण्यात आली. देयकावरुन सदर कंपनी विक्रीकर नोंदणी क्रमांक नसलेली आहे. या संदर्भात शिक्षणाधिकारी यांचेवर आरोपपत्र दाखल केलेले असून, पुढील कार्यवाही होणार आहे.

**जनसंपर्क विभाग :**

**मा. सभापती** : मुद्दा क्र. १ व ३ चे अनुपालन दिले आहे. वगळण्यास मंजुरी देण्यात येते. मुद्दा क्र. २ चा खुलासा करावा.

**मुख्य लेखा परिक्षक :** या प्रकरणात एकच जाहीरात दोन वेळेस देऊन देयक देण्यात आले. एका दिवाचे ८४०/- रु. होते. पुन्हा बील सादर होऊन दोन दिवस जाहीरात दिली. म्हणुन १६८०/- जादा अदा करण्यात आलेले आहे.

**जनसंपर्क अधिकारी :** दि. ११-०१-९७ रोजी श्वान प्रदर्शनाबाबत निमंत्रण याबाबत जाहीरात देण्यात आलेली होती. मा. आयुक्तांच्या तांडी आदेशानुसार सलग दुसऱ्यां दिवशी ही जाहीरात देण्यात आलेली होती. या विभागाचे कर्मचारी सदर जाहीरात घेऊन प्रेसला गेले. त्यांनी प्रेसकडुन १२-०१-९७ ला जाहीरात प्रसिध्द होईल. असे लिहुन आणले.

**मा. सभापती** : पत्रात काय नमुद केले वाचुन दाखववे.

**जनसंपर्क अधिकारी :** वरील संदर्भीय पत्र मिळाले. आपले पत्र क्र. जनसंपर्क/१२९७/दि. १०-०१-९७ क्र. १३९८ प्रमाणे श्वान प्रदर्शनाच्या जाहीराती दिल्या होत्या. आपल्या कार्यालयाकडुन श्री. पी. बी. व्यवहारे हे आले होते. सदर पत्रावर क्र. १३९८ नुसार ११-०१-९७ ची जाहीरात पुन्हा १२-०१-९७ रोजी प्रकाशित करावी. असे लिहीले आहे. तरी आमच्या कार्यालयाने संमतीपत्रावर तशी सही करुन दिले असून, आपल्या कार्यालयाच्या व्यक्तीने सांगितल्यानुसारच दि. १२-०१-९७ रोजी जाहीरात प्रसिध्द केलेली आहे.

**मा. सभापती** : दोन वेळेस जाहीरात देऊन मनपाचे नुकसान केले असे सिध्द होते. तोंडी आदेशानुसार जाहीरात देणे योग्य नाही.

**मुख्यलेखापरिक्षक :** मंजुरी एकच दिवस जाहीरात देण्याची होती. तोंडी आदेशानुसार दोन वेळेस जाहीरात दिले म्हणुन आक्षेप नोंदलेला आहे. त्या प्रेसला स्वत: जनसंपर्क अधिकारी गेलेले नाही. दुसऱ्या कर्मचाऱ्यांना पाठवुन त्या कर्मचाऱ्याने पुर्वीच्याच पत्रावर तारीख नमुद करुन कार्यवाही केली.

**मा. सभापती** : या संदर्भात प्रशासनाने नियमाने कार्यवाही करावी. १० दिवसाच्या आत रिपोर्ट सादर करावा.

**मुख्य लेखा परिक्षक :** मागील वेळेस चर्चा झाल्यानुसार जकात विभागाचे लेखा परिक्षण हे लेखा विभागामार्फत १००% व्हावयास पाहीजे. जकात विभागाव्यतिरिक्त लेखा विभागामार्फत अंतर्गत सर्व विभागाचे लेखा परिक्षण होते. त्याप्रमाणे लेखा विभागाने जकात विभागाचे अंतर्गत लेखा परिक्षण १००% करावे हा विभाग चाचणी लेखा परिक्षण करेल असा निर्णय झालेला होता. या संबंधीची कार्यवाही लवकरात लवकर व्हावी. व इतर विभागाचे लेखा परिक्षण करण्यास या विभागाला वेळ मिळेल.

**मा. सभापती** : यावर्षापासुन लेखा विभागाअंतर्गत जकात विभागाचे १००% ऑर्डर करण्यात यावे. त्यानंतर लेखा परिक्षण विभाग देखील १००% पोस्ट ऑडीट करतील असा निर्णय हे सभागृह घेत आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात खुलासा व्हावा श्री. काळेले आलेले आहेत खुलासा घ्यावा.

**शाखा अभियंता (श्री. कालेले) :** जागा संपादन केल्यानंतर भुसंपादन कार्यालयास मोजणी फीस भरावी लागते. तसेच काही प्रकरणात रजिस्ट्री खर्च म्हणुन रक्कम भरावी लागते. त्यासाठी अग्रीम घेतलेले होते. मोजणी फीस व रजिस्ट्री या झालेल्या आहेत. रजिस्ट्रीची प्रत मिळाली नाही. पावत्या आहे ते बुक ॲडजस्टमेंट राहीलेले आहे.

**मा. सभापती** : संबंधित विभागाला तसे लेखी कळविले आहे का?

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** आपण ९८-९९ चे लेखा परिक्षण मंजुर करीत आहोत. ९८-९९ मधील हे प्रकरण आहे. ८ दिवसात रजिस्ट्रीची प्रत मिळते. अधिकारी चुकीची माहिती देत आहे.

**शाखा अभियंता (श्री. काळेले) :** आपण कमी दराने रजिस्ट्री करतो. त्यामुळे चौकशीसाठी तशीच ठेवण्यात येते. त्यामुळे ते परत केले नाही. मुळ पावत्या दाखवल्या नाही तर रजिस्ट्रीची कागदपत्रे परत करत नाहीत या संदर्भात पत्रव्यवहार केलेला आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** रजिस्ट्री झाल्यानंतर संबंधित कार्यालयास पत्रव्यवहार केलेला आहे का?

**मा. सभापती** : पावत्या सर्व आहे तर देण्यास काय अडचण आहे. तसेच नगररचना विभागाचे या अगोदर ऑडीट होत नव्हते. फार खेदाची बाब आहे. सर्व पावती व संचिका घेऊन याव्यात.

**शाखा अभियंता (श्री. काळेले) :** अग्रीम रक्कम रु. ६,०५,०००/- होते. त्यामध्ये एकुण ३१ खाली कार्यवाही होती. रेडी रेकनरच्या दरापेक्षा कमी दराने रजिस्ट्री होते. त्या संदर्भात रजिस्ट्री झाल्यानंतर त्याची पडताळणी करण्यासाठी सदर सर्व कागदपत्रे संबंधित नोंदणी कार्यालयात असतात. ज्या ज्या प्रकरणाच्या

रजिस्ट्री झाली व मनपाने ज्या ज्या वेळेस रक्कमा भरण्यात आली. त्यासर्व पावत्या या विभागात त्या त्या संचिकेत लावण्यात आलेल्या आहेत. (संचिका सभागृहात आणुन दाखवितात.) बिलाची ॲडजस्टमेंट करुन उर्वरीत रक्कम समायोजन करुन अनुपानल अहवाल सदर करण्यात येईल.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** किती रजिस्ट्री पेंडींग आहे. मुल्यांकन जास्त झाले तर, अपिल करता येते. ४-५ वर्षे झाले आहे.

**मा. सभापती** : ६,०५,०००/- रक्कमेचे समायोजन करण्यास का उशीर झाला असा प्रश्न आहे. समायोजन करण्यास उशीर केला ज्या ज्या वेळेस रजिस्ट्री झाली त्या त्य वेळेस जी रक्कम भरणा केली त्याचा अहवाल लेखा विभागाला वेळोवेळी कळविली नाही. ही गंभीर स्वरुपाची बाब आहे. आपण ९८-९९ चे ऑडीट मंजुर करीत आहोत. दोन वर्षापासुन मनपाचे रक्कमेचा हिशोब दिलेला नाही. उद्याच्या उद्या सर्व रक्कमेचे समायोजन करुन अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करुन त्याची एक प्रत मला सुध्दा देण्यात यावी.

**श्री. इलियास किरमानी :** सालारजंग प्रकरणात स्थगिती आदेश उठलेले आहेत. त्याच्या प्रती माझ्याकडे आहे.

**मा. सभापती** : स. सदस्य श्री. किरमाणी यांनी सालारजंग प्रकरणाची प्रत आणलेली आहे. या संदर्भात खुलासा करावा.

**प्र. विधी सल्लागार :** ज्या प्रती सादर झालेल्या आहे त्या झेरॉक्स प्रती आहेत. सत्यप्रती आपल्याकडे सादर झालेल्या नाहीत ज्या प्रती आल्या त्याचीच शहानिशा करुन पुढील कार्यवाही करावी लागेल.

**मा. सभापती** : जो स्थगिती आदेश होते ते व्हॅकेट झालेले आहे. त्यावर दिनांक असेल. स्टे केव्हा व्हॅकेट झाला. पॅनलवरील वकील योग्य प्रकारे केस चालवित नाही. दि. ११-०१-०२ स्टे व्हॅकेट आला त्याची प्रत अद्याप आपल्याकडे का आलेली नाही. पॅनल वरील वकील काय करतात असा मुद्दा उपस्थित होतो. सालारजंग हा मोठा विषय आहे. ५ वार्डात आपण सध्या परवानगी देण्याचे बंद केले. या वार्डातील नागरिकांपासुन मनपास खुप उत्पन्न होते. तरी सुध्दा अधिकारी निष्काळजीपणे काम केल्याचे दिसुन येते. ११ तारखेला आपले वकील हजर होते का?

**विधी सल्लागार :** पॅनलचे वरील येवुन माहिती घेऊन जाणार होते. ज्या प्रती आपल्या त्याची तपासणी करणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : वेळेवर पॅनलवरील वकील हजर राहात नसेल तर, त्याचे सर्व अधिकार काढुन घ्यावे. पॅनलवर दुसऱ्या वकीलाची नियुक्ती करावी.

**विधी सल्लागार :** पॅनलवर श्री. सोपन वकील तारखेला माहिती घेऊन जाणार होते. परंतु नगररचना विभागाकडुन त्यांना माहिती प्राप्त झालेली नव्हती. वेळोवेळी त्यांनी रेकॉर्डची मागणी केली अद्यापपर्यंत त्यांचेकडे पुर्ण रेकॉर्ड नगररचना विभागाने दिलेला नाही.

**प्र. सहा संचालक नगररचना :** माहिती मोठया स्वरुपाती होती. विधी सल्लागार यांना तीन दिवसापुर्वी काही प्रकरणात माहीती दिलेली आहे. ६ केसेस आहेत. उर्वरीत प्रकरणात माहिती लवकरच देण्यात येईल.

**मा. सभापती** : मनपाच्या वसुलीचा विचार केल्यास ७-८ वार्डात जास्त वसुली होते. त्यापैकी या सालारजंग भागात ५ वार्ड येतात. त्या जागेवर स्टे आहे किंवा

काय स्टे व्हॅकेट झाला काय याची विधी सल्लागार यांनी चौकशी करुन प्रत घ्यावी व पुढील कार्यवाही व्हावी. याबाबतीत जे कागदपत्र आवश्यक आहे त्यासर्व कागदपत्राच्या प्रती सहा. संचालक नगररचना यांनी ताबडतोब उपलब्ध करुन घ्याव्यात.

**ठराव :**

सन १९९८-९९ च्या वार्षीक लेखा परिक्षण अहवालातील प्रत्येक मुद्दयांवर सांगोपांग चर्चा झालेली आहे. त्या मुद्यासंबंधी चर्चाच्या वेळी संबंधित दोषी कर्मचारी/अधिकारी यांचेवर नियमानुसार योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत निर्णय दिलेला आहे. त्यानुसार संबंधित विभाग प्रमुख व प्रशासन यांनी योगय ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल सन १९९९-२००० च्या लेखा परिक्षण अहवालावरील चर्चाच्या सभेपुर्वी सादर करावा, असे सर्वानुमते ठरले.

या बरोबरच " जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ३०-०१-२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तात. बुधवार दिनांक ३०-०१-२००२ रोजी मा. सभापती, श्री. प्रशांत देसरडा, यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे सकाळी ११.३० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्ग यांचेसह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. अशरफ युनूस मोतीवाला | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| ३. | स. स. श्री. सिध्द जगदिश कन्हैयलाल | -//- |
| ४. | स. स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग | -//- |
| ५. | स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | -//- |
| ६. | स. स. श्री. सलीम पटेल समशेर पटेल | -//- |
| ७. | स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| ८. | स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली | -//- |
| ९. | स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| १०. | स. स. श्री. शेख इलियास किरमानी शे. उमर | -//- |
| ११. | स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतु पाटील | -//- |
| १२. | स. स. श्री. ओक जयवंत केशवराव | -//- |
| १३. | स. स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |

**विषय क्र. ६६/१ :**

दिनांक १३-११-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त भागशः आणि दि. १५-१२-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**डॉ. आशा बिनवडे :** मागील बैठकीत दि. १३-११-२००१ च्या सभेचे इतिवृत्त कायम करतांना आरोग्य विभागाच्या संदर्भात चर्चा झालेली होती व त्या सभेत संबंधित अधिकारी उपस्थित नसल्याने त्या इतिवृत्तातील संवाद आजच्या बैठकीत विषय क्र. १ वर घेण्याचे आदेश केल्याने तो संवाद विषय क्र. १ मध्ये आलेला आहे. संबंधित अधिकारी आजही सभेला उपस्थित नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा ते का प्रत्येक सभेला अनुपस्थित राहतात.

**मा. सभापती** : संबंधित आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी माझ्याकडे एक पत्र दिलेले आहे. सदर पत्र मला आज दि. ११.१५ वाजता मिळालेले आहे. त्यांना आवश्यक कामासाठी पुण्याला जायचे आहे. असे पत्रात नमूद केलेले आहे. ते रजेवर गेले त्यांनी प्रशासनाची परवानगी घेतलेली आहे का, त्या संदर्भात प्रशासनाने खुलासा दयावा.

**मा. आयुक्त (म.) :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्र. आयुक्त यांचेकडे रजेचा अर्ज दिलेला आहे. त्यांनी व प्र. आयुक्त यांची काय चर्चा झाली याची कल्पना मला नाही. त्याच प्रकारचा अर्ज त्यांनी मा. सभापती यांना दिलेला आहे. पुर्व

परवानगी ही त्यांनी मा. सभापती यांची घ्यावयास पाहीजे होती. आजच्या तारखेपर्यंत या विभागाकडुन तशी परवानगी देण्यात आलेली नाही. सभेपुर्वी दुरध्वनीवरुन विचारणा केली होती.

**डॉ. आशा बिनवडे :** इतिवृत्तामध्ये विषय क्र. १ वर संबंधित विभागाच्या संदर्भात नोंद झालेली आहे. त्यांनी सभेला उपस्थित राहणे आवश्यक होते. असे असतांना त्यांना सभागृहात मागील बैठकीत उपस्थित केलेल्या प्रश्नाचा खुलासा (उत्तर) द्यावयाचे नही. म्हणुन ३ बैठकापासुन ते सभेला सतत उपस्थित नाही. यामुळे शंका निर्माण होते. प्रत्येक बैठकी अनुपस्थितीत राहणे बरोबर नाही. म्हणुन संबंधित विभागाच्या संदर्भात इतिवृत्तांत नमुद केलेल्या प्रश्नाच्या बाबतीत मी प्रश्न विचारणार आहे. मा. आयुक्तांनी त्याचा खुलासा दयावा व इतिवृत्तांवर चर्चा करण्यास हरकत नसावी.

**मा. सभापती** : विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**डॉ. आशा बिनवडे :** दि. १३-११-०१ च्या इतिवृत्तांतील पान क्र. ५ वर मी प्रश्न उपस्थित केला होता की, औषधी व साहित्य खरेदी बाबतच्या विषयावर चर्चा होत आहे. मागील सभेत सविस्तर माहिती दोन दिवसात देण्यात येईल. असे संबंधित अधिकाऱ्यांनी पान क्र. ५ वर खुलासा केलेला आहे. आता बैठक होऊन १५ दिवसाचा कालावधी मागच्या बैठकीच्या वेळेसच झाला आहे. अद्याप माहिती देण्यात आलेली नाही. त्या बैठकीत संबंधित अधिकारी उपस्थित नव्हते म्हणुन मा. आयुक्त यांनी असा संवाद केला की, सदर माहिती दोन दिवसात का दिली नाही यासंबंधी त्याचा लेखी खुलासा घेण्यात येईल. त्यानुसार त्यांनी मा. आयुक्तांकडे लेखी खुलासा सादर केला का? केलेला असेल तर, काय खुलसा देण्यात आला याची माहिती द्यावी.

**मा. उपआयुक्त (म.) :** आताच स. सदस्य यांनी प्रश्न उपस्थित केल्यानुसार दोन दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश दिल्यानुसार याबाबतीत डॉ. देशपांडे यांचे पद विभाग प्रमुखाचे असल्याने व या विभागाच्या संचिका उपआयुक्तांकडुन जात नसल्याने काय कार्यवाही झाली याची कल्पना मला नाही.

**मा. सभापती** : आरोग्य विभागाचे प्रतिनिधीत्व करणारे जे अधिकारी आहे त्यांनी खुलासा करावा.

**प्र. आरोग्य वैद्य अधिकार (श्री. सुरवसे) :** आरोग्य विभागाकडुन तसा खुलासा आयुक्तांकडे करण्यात आलेला नाही.

**डॉ. आशा बिनवडे :** इतिवृतातील पान क्र. ६ सन १९९६ ला चार सदस्यांची कमीटी तयार केली होती. त्यामध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा. आयुक्त, घाटी दवाखान्याचे डोन व डॉ. तालीब हे कमीटीत होते. असे मुख्यलेखाधिकारी यांनी संवाद केलेला आहे. त्या कमीटीचा अहवाल या सभागृहात मागविला होता तो अद्याप सादर केलेला नाही. सदर कमीटीने काय निर्देश दिले होते. त्याची माहिती या सभागृहात कळेल. यासाठी अहवाल ठेवण्याची आवश्यकता आहे. कमीटीच्या अहवालानुसार टेंडर काढले जात होते.

**मुख्यलेखाअधिकारी :** या विभागाच्या संचिका लेखा विभागामार्फतच जातात. सन १९९६ ला कमीटी स्थापन केली होती. त्या कमीटीत घाटीचे डिन, मा. आयुक्त तसेच आरोग्य वैद्यकीय अधिकारी होते. असे मी बोललो होतो. डॉ. तालीब यांचा कमीटीत आता समावेश करणार आहोत, त्या कमीटीत आता समावेश

करणार आहोत, त्या कमीटीत होत असे मी बोललो नाही. ते इतिवृत्तातुन वगळण्यात यावे.

**डॉ. आशा बिनवडे :** डॉ. तालीब हे कमीटीत होते. मी स्वत: त्यांचेशी चर्चा केली मुख्यलेखाधिकारी यांनी सुध्दा मागच्या बैठकीत असे सांगितले होते की, डॉ. तालीब हे कमीटीचे सदस्य होते. चुकीचे उत्तर देत आहेत. आतापर्यंत का अहवाल दिला नाही. अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार योग्य तो निर्णय घेण्यास सभागृहाला सोपे होईल.

**मा. सभापती** : जी कमीटी स्थापन केलेली होती. त्या कमीटीच्या अहवालाची ३ बैठकीपासुन मागणी होत आहे. प्रशासनाकडुन अहवाल आता मागविता येईल. दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

**डॉ. आशा बिनवडे :** इतिवृत्तातील पान क्र. ६ वर नमुद केल्याच्या अनुषंगाने वारंवार चर्चा होते. मनपाकडे डॉक्टर किती यांची माहिती घेतली असता २८ डॉक्टर्स आहेत असे उत्तर मला मिळाले. २४ ॲलोपॅथीचे म्हणजे एम. बी. बी. एस. असून, उर्वरीत ॲलोपॅथीचे नसून, मागील ७ वर्षापासुन त्यांना ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करायला लावले. त्यांचेकडुन जी पदवी आहे ते उपलब्ध करुन दिले नाही. ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करतात असे संबंधित अधिकाऱ्यांचे स्टेटमेंट आहे. पान क्र. ७ वर यासंबंधी सुध्दा मुद्दा उपस्थित केलेला होता. त्यावर आयुक्तांनी असे उत्तर दिले होते की, ज्या पदाची आवश्यकता नसेल तर, कामावरुन कमी करावे लागेल. याबाबतीत प्रशासन काय निर्णय घेणार आहे. ॲलोपॅथीची पदवी प्राप्त केलेली नसतांना त्यांना ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करावयास लावणे हा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार फौजदारी गुन्हा आहे. हा गुन्हा हे अधिकाऱ्यांना माहित असतांना सुध्दा का प्रॅक्टीस करावयास लावली असा आमचा प्रश्न आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. पदवी नसतांना त्यांना ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करावयास लावणे यात संबंधित अधिकारी सुध्दा दोषी असून, ज्यांनी प्रॅक्टीस केली ते सुध्दा डॉक्टर दोषी आहे. म्हणुन संबंधित अधिकार तसेच ज्यांनी प्रॅक्टीस केली अशा सर्व डॉक्टरांवर पोलीस गुन्हा दाखल करावा. अशी माझी मागणी आहे. ज्या पॅथीची पदवी आहे. त्याचीच प्रॅक्टीस करावी. मेडीकल कौंसील ॲक्ट १९५६ साली जी नोंदणी होते त्याचीच प्रॅक्टीस करता येते.

**मा. सभापती** : दोन तीन मुद्दयावर स. सदस्या श्रीमती बिनवडे यांनी प्रश्न उपस्थित केलेले आहे. त्यावर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. खुलासा करावा.

**मा. उपआयुक्त (प्र.) :** मागील बैठकीच्या इतिवृत्तांत व आजच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार केंद्र शासनाचे मार्गदर्शक तत्वानुसार तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयानुसार जी कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही प्रशासन करेल.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** दोन महिन्यापासुन प्रत्येक बैठकीमध्ये सभागृहात या विषयावर चर्चा होत असून, संबंधित अधिकारी नेहमी सभेला अनुपस्थितीत राहतात. हे प्रशासनाच्या दृष्टीने बरोबर आहे काय? आजपर्यंत का कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**मा. उपआयुक्त (म.) :** प्रश्न उपस्थित केल्यानुसार आज सभागृहात उत्तर देण्यासाठी मा. आयुक्त उपस्थित नाही डॉ. देशपांडे हे विभाग प्रमुख असल्यामुळे त्यांचेवर

कार्यवाही करण्यास मा. आयुक्तच सक्षम आहे. सभागृहात मा. सभापती जे रुलींग देतील त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** मा. आयुक्तांकडे रिपोर्ट सादर करण्याचे अधिकार उपआयुक्त यांना आहे. त्यांनी सभागृहात घेतलेल्या निर्णयानुसार आयुक्तांकडे अहवाल सादर करावा. झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी करावी.

**डॉ. आशा बिनवडे :** ७ वर्षापासुन ॲलोपॅथीची डॉक्टर प्रॅक्टीस करतात. हा गुन्हा आहे. म्हणुन अशा डॉक्टरवर कार्यवाही करण्याचे प्रशासनाला आदेश करावे, सभागृहात नुसती चर्चा होते. घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही होत नाही.

**श्री. भरत लकडे :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी जेव्हा सभागृहात उपस्थित राहतील तेव्हाच सभेचे आयोजन करावे गंभीर बाब आहे.

**श्री. मधुकर सावंत :** डॉक्टराकडे पदवी नसतांना ते दुसऱ्या पॅथीची प्रॅक्टीस करावयास लावणे गुन्हा आहे. ज्यांनी प्रॅक्टीस करावयास लावली त्यासंबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा. तसेच जे प्रॅक्टीस करतात. त्यांचेवरही गुन्हा दाखल करावा.

**मा. सभापती** : याबाबतीत प्रशासनाने दोन दिवसात कार्यवाही करावी.

**डॉ. आशा बिनवडे :** दि. १३-११-०१ च्या इतिवृत्तातील पान क्र. ५ वर आरोग्य विभागाअंतर्गत सन ९९ पासुन औषध व साहित्य खरेदी बाबतचे टेंडर काढले जाते. टेंडर नुसार औषधी पर्चेसिंग होत नाही. गेल्या वर्षभरात १८ लाखाची कोणती औषधी खरेदी केले. साहित्य कोणते व त्याचे दर काय आहेत. त्यासंबंधीची माहिती दि. १९-०९-०१ रोजी पत्र देऊन मागविली होती. दि. १३-११-०१ च्या सभेतील हा वृत्तांत असून, सभा संपल्यानंतर दि. २२-११-०१ रोजी मला संबंधित अधिकारी यांनी लेखी पत्र देऊन जे उत्तर प्राप्त केले. अर्धवट माहिती दिली. त्यामधील साहित्य व औषधी याचे जे दर दिले आहे. त्यातील दरात तसेच बाजार भावाच्या दरात फारच तफावत दिसुन येते. खरेदी केलेल्या औषधाची व साहित्यांची नांवे असा प्रश्न होता. त्यावर असे उत्तर मिळाले की, औषधी व साहित्याची यादी या सोबत जोडलेली आहे. दुसरा प्रश्न औषधी साहित्य कोणत्या कंपनीचे खरेदी केले याची सविस्तर माहिती त्याचे उत्तर मिळाले यादीमध्ये औषधी व साहित्याच्या नावांसमोर कंपनीचे नांव दर्शविलेले आहे. तिसरा प्रश्न औषधी व साहित्याची किती प्रमाणात खरेदी केली आहे. असा होता त्यावर असे उत्तर दिले की, (अ) मध्ये सन २००१-२००२ मध्ये औषधी व साहित्याची खरेदी तात्पुरता स्वरुपात दि. ३०-०३-२००१ रोजी स्थायी समिती ठराव क्र. ११९/१ अन्वये व मा. आयुक्तांना दिलेल्या अधिकारानुसार व मा. आयुक्तांनी मंजुरी दि. ०२-०५-२००१ रोजी होऊन खरेदी केली आहे व त्याची यादी या सोबत जोडली आहे. औषधी खरेदीवर रुपये ६,१०,२००/- इतका खर्च झालेला दाखविला तर साहित्याची खरेदी रु. १,५०,४४७/- इतकी आहे व ही खरेदी नियमानुसार करण्यात आलेली आहे असे उत्तर प्राप्त केले (ब) मध्ये असे दिले की, दि. ०५-१०-२००० रोजी जा. क्र. मनपा/आणि/२४९/२००० अन्वये जाहीर निविदा मागवुन मा. आयुक्तांच्या दहा लाखाच्या मर्यादीत खरेदी केलेली आहे. यामध्ये क्र. १ मध्ये मा. आयुक्तांनी मंजुरी दि. २९-०१-२००१ दिली आहे. तर क्र. २ मध्ये मा. आयुक्त यांची मंजुरी दि. ३०-०३-२००१ अशी दिलेली आहे. ३०-१०-२००० च्या जाहीर निविदानुसार मा. आयुक्तांच्या

१० लाखाच्या अधिकारात औषधी खरेदी करण्यात आलेली आहे. किती व कोणते औषधी खरेदी केलेली आहे. यासंबधीचे गोलमोल उत्तर दिलेले आहे. ज्या पुरवठा धारकाकडुन ही औषधी खरेदी केलेली आहे. ती एम. आर. पी. रेटपेक्षा जास्त दराने खरेदी केलेली आहे. सदर औषधी मे. केंक्रे ब्रदर्स, मुंबई, मे. आश्विनी फार्मास्टीकल्स, औरंगाबाद तसेच मे. टिव्हीम फार्माटीकल्स गोवा या एजन्सीजकडुन खरेदी केलेली आहे. ठराव क्र. ११९/१दिनांक ३०-०१-२००१ नुसार ही औषधी व साहित्य खरेदी केले असे दिलेल्या उत्तरातुन निष्कर्ष निघतो. परंतु एकुण १०१ वेगवेगळी औषधी ४० कंपन्यामधुन खरेदी यात फक्त १७ कंपन्यांचीच नांवे दाखविलेली आहे. उर्वरीत कंपन्याची नांवे नाही. त्या कंपन्या बोगस असु शकतात. ज्या कंपन्याची दर दिलेले आहे. त्यामध्ये खुप तफावत दिसुन येते. त्यातील काही औषधाच्या किंमती किती, किती मध्ये मिळावयास पाहिजे. घेतलेल्या किंमतीत या बाबतीत नमुद करु इच्छितो. १० गोळयाचा १ पॅकेट बाबत जे दर दिले त्यासंबंधीची जो तक्ता संबंधित विभागाकडुन मिळालेला आहे. त्यामधील क्र. १ मध्ये टॅब ३विल गोळीची किंमत एम. आर. पी. रेट नुसार २.०९ रु. इतकी आहे. होलसेलमध्ये सदर गोळी १.९५ रुपयात मिळते. ती गोळी २.३२ रुपयात खरेदी केलेली असून, अशा एकुण १००० गोळया खरेदी केलेल्या आहेत. जी गोळी एम. आर. पी. रेटने औरंगाबाद मध्ये खरेदी करु शकतो ती गोळी मुंबई, गोवा येथुन खरेदी करण्याची का आवश्यकता पडली. तसेच क्र.२ वर टॅब अस्तालीन या गोळीची एम. आर. पी. रेट ५.२१ रु. असून होलसेल मध्ये ती गोळी ५.०० रुपयाला मिळु शकते. ती गोळी ५.७८ रु. यात खरेदी केली असून, अशा २००० गोळया खरेदी केलेल्या आहे. क्र. ४ मध्ये बुफेन ४०० एमजीची गोळी ५.२६ किंमत असून, होलसेल मध्ये ४.९८ ही गोळी मिळु शकते ती गोळी ६.३४ रु यात खरेदी केलेली असून, ५००० गोळया खरेदी केल्या. क्र. ५ मधील बक्कीम डी. एस. गोळीची किमंत ११.४२ रुपये असून, होलसेल मध्ये ही गोळी १०.६२ रुपयामध्ये मिळु शकते ती गोळी १६.५६ रुपयात १० गोळयाचे पॅकेट खरेदी करुन असे एकुण १०,००० हजार गोळया खरेदी केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे क्र. १० मधील डेरीफ्लॅलीन या गोळीची किंमत रु. २.३६ रु. असून, होलसेल मध्ये २.१० रु. आहे सदर गोळी २.४८ रुपयात आपण खरेदी केलेल्या आहेत. क्र. ३६ मध्ये टॅब एविल १० गोळयांची किंमत ३९.९४ रुपये असून, होलसेल रेट ३५.४९ रुपये असून, ती गोळी ४४.३० रुपयात खरेदी करून अशा एकुण १०० गोळया खरेदी केलेल्या आहेत. तसेच क्र. ३८ मध्ये डॅक्सा मॅथोक्साईन प्रत्येकी ९.६९ रुपयात खरेदी केलेले असून, त्याची किंमत ४.५० रुपये इतकी असून होलसेलमध्ये रु. ४.०० रुपयात मिळु शकते. यादीतील क्र. ५७ मध्ये इलेक्ट्राल पावडर एफडीसी याचे एमआरपी रेट ११.२० रुपये असून, होलसेलमध्ये ९.९७ आहे. खरेदी केले. १२.०४ रुपयाप्रमाणे ५०० पॅकेट खरेदी केलेले आहे. जी औषधी खरेदी केलेली आहे ती औषधी रु. ६,१०,२००/- मध्ये कोणती खरेदी केली व किती नग खरेदी केलेले आहे. याची माहिती दिलेली नाही. एकुण ४० कंपन्यापैकी १७ कंपन्याची नावे दिलेली आहे. बाकीच्या कंपन्या बोगस असल्याची शक्यता

नाकारता येत नाही. कंपनीचे रेटस व खरेदी रेट यात तफावत येत आहे. याबाबत योग्य ती चर्चा होऊन कार्यवाही व्हावयास पाहिजे.

**मा. सभापती** : मुख्य लेखा परिक्षक यांनी ५ ते ७ वर्षापुर्वीच्या आरोग्य विभागाच्या औषधी व साहित्य खरेदी बाबतच्या सर्व संचिका ताब्यात घेऊन ॲडीट करण्यात यावे. ०८ दिवसाच्या आंत तसा अहवाल सादर करण्यात यावा.

**डॉ. आशा बिनवडे :** जी गोळी औरंगाबाद मध्ये मिळु शकते ती गोळी गोव्याच्या एजन्सीकडुन खरेदी केलेली आहे. तीन प्रकारच्या गोळयासाठी ४.७५ लक्ष रुपये देण्यात आलेले आहे.

**श्री. जयवंत ओक :** प्रत्येकी बैठकीत या विषयावर चर्चा होत आहे. टेंडर झालेले आहे का चौकशी करण्यात यावी तसा अहवाल सभागृहात सादर करावा. वारंवार चर्चा करणे योग्य होणार नाही. आता जी चर्चा होत आहे ते टेडंर पध्दतीने पर्चेस केलेले आहे काय किंवा विना टेंडर पध्दतीने पर्चेस केलेले आहे. याचा खुलासा दयावा.

**मा. सभापती** : मा. आयुक्तांच्या १० लाखाच्या अधिकारामध्ये कोटेशन पध्दतीने औषधी व साहित्य खरेदी केलेली आहे.

**श्री. जयवंत ओक :** टेंडर झालेले असेल तर, चॅलेंज नाही. यामध्ये भ्रष्टाचार झालेला असेल तर, चौकशी करण्यात हरकत नसावी.

**मा. सभापती** : एम. आर. पी. रेटच्या वर औषधी व साहित्य खरेदी केल्यास गुन्हा दाखल होऊ शकतो.

**श्री. जयवंत ओक :** मागील बैठकीत मी प्रश्न उपस्थित केला होता की, टेंडर न मागविता डायरेक्ट कंपनीकडुन औषधी व साहित्य खरेदी करावे जेणे करुन महापालिकेचा सुध्दा यात फायदा होईल. का टेंडर काढुन खरेदी करीत आहात जाहीरात मध्ये पैसा वाया गेलेला आहे. अधिकाऱ्यांनी यासंबंधी सविस्तर माहिती दयावी आता टेंडर सुध्दा झालेले आहे. औषधी व साहित्य आणलेले आहेत.

**मा. सभापती** : यावर आता निर्णय काय घ्यायचा ते सदस्यांनी ठरवावे.

**श्री. जयवंत ओक :** समिती नियुक्त करावी कमीटीस बाहेरील डॉक्टरांचा समावेश करावा. चौकशी करावी. विधी सल्लागार यांचा सल्ला घेऊन पुढील कार्यवाही करावी नसता सर्वसाधारण सभेसमोर निर्णयासाठी पाठवावे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** स. सदस्य श्री ओक हे सभागृहात आताच झालेले आहे. स. सदरचा डॉ. बिनवडे यांनी जे प्रश्न मांडले ते त्यांनी ऐकलेले नसल्याने काय चर्चा झाली. हे त्यांना माहित नाही. मा. आयुक्तांच्या १० लाखाच्या अधिकारामध्ये ही औषधी व साहित्य खरेदी केलेले आहे. एम. आर. पी. पेक्षा जास्त दराने खरेदी केलेले आहे. याचे टेंडर प्रमाणे कार्यवाही केलेली नाही. एम. आर. पी. पेक्षा जास्त दराने औषधी व साहित्य खरेदी करु शकत नाही असे स. सदस्या डॉ. बिनवडे यांचे म्हणणे आहे. त्यानुसार कार्यवाही झाली पाहिजे.

**मा. सभापती** : एम. आर. पी. पेक्षा जास्त दर आले यासंबंधी आयुक्तांनी कळविले होते का? खुलासा दयावा.

**मुख्यलेखाधिकारी :** यासंबंधीचे टेंडर काढण्यात आलेले होते. आलेले दर मंजुर न झाल्यामुळे तातडीची औषधी व साहीत्य खरेदी करावयाचे असल्याने मागील वर्षाचे जे

दर निश्चित केलेले होते. त्या दराने घ्यावे असा निर्णय झाल्याने मा. आयुक्तांच्या अधिकरात ही कार्यवाही झालेली आहे.

**डॉ. आशा बिनवडे :** मागील वर्षा सुध्दा औषधी व साहित्याचे जे दर होते ते एम. आर. पी. पेक्षा जास्तीचे आहे नियमानुसार कोणताही डिलर एम आर पी पेक्षा जास्त दराने औषधी विक्री करु शकत नाही. हा गुन्हा होऊ शकतो. तसेच महापालिकाचे अधिकारी यांना सर्व नियम माहित असतांना एम. आर. पी. पेक्षा जास्त दराने औषधी व साहित्य कसे खरेदी केले. त्यांचेवर सुध्दा गुन्हा दाखल होऊ शकतो कारण महापालिकाचे संबंधित अधिकारी यांनी जनतेच्या पैशाची उधळपट्टी केलेली आहे. म्हणुन ते या रक्कमेस जबाबदार आहे. म्हणुन त्यांचेवर नियमानुसार ४०८, ४०९, ४२० चा गुन्हा दाखल करण्यात यावे व याबाबत मा. सभापती यांनी रुलींग दयावे.

**श्री. जयवंत ओक :** नियमाने अशी कार्यवाही करता येते का? मा. आयुक्त, विधी सल्लागार यांचा खुलासा घेण्यात यावा. ज्यांना खुलासा चुकीचा वाटल्यास न्यायालयात जाऊ शकता.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांचेवर ४२० या गुन्हा दाखल करु शकतो का? खुलासा दयावा.

**मुख्यलेखाधिकारी :** औषधी व साहित्याची खरेदी बरोबर झालेली आहे किंवा कसे या संदर्भात सर्व संचिकेची तपासणी ( ऑडीट) करणे आवश्यक आहे. त्यात काही दोष आढळुन आल्यास संबंधित अधिकारी यांचेवर चार्जशीट दाखल करुन त्यांचे म्हणणे ऐकुन घ्यावे लागेल त्यानंतर आपण कायदेशीर कार्यवाही करु शकतो.

**श्री. कावडे साहेबराव :** येथे ऑडीटचा प्रश्न येत नाही. एम. आर. पी. पेक्षा जास्त दराने औषधी खरेदी करु शकत नाही. असा नियम आहे. केल्यास गुन्हा दाखल होऊ शकतो असा स. सदस्यांचा प्रश्न आहे. जास्त दराने का औषधी खरेदी करण्यात आलेली आहे. याचा खुलासा देण्यात यावा.

**मा. सभापती** : जवळपास चार बैठकीपासुन या विषयावर चर्चा होत आलेली आहे. यावरुन स्पष्ट होते की, एम. आर. पी. पेक्षा जास्त दराने औषधी व साहित्य खरेदी झालेले आहे. दुसरा मुद्दा असा की, आयुवैदिक, होमीओपॅथीचे डॉक्टर्स ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करतात. त्यांचेकडे जी पदवी आहे. त्या पदवीची प्रॅक्टीस ते करीत नाही. हा सुध्दा गंभीर स्वरुपाचा गुन्हा होऊ शकतो ही सर्व माहिती सभागृहाच्या निर्दशनास आणुन दिल्याबद्दल स. सदस्या डॉ. आशा बिनवडे यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करतो. मागील बैठकीत तसेच त्या मागील बैठकीत सतत चर्चा या विषयावर होत असतांना मा. आयुक्त याबाबतीत निर्णय घेत नाही. असे दिसुन येते. का निर्णय घेत नाही. याचा खुलासा घेणे आवश्यक आहे. दि. १३-११-०१ च्या बैठकीत चर्चा झाल्यानुसार दोन दिवसात आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी माहिती का दिली नाही म्हणुन दोन दिवसात लेखी खुलासा मागवुन कार्यवाही होईल असे मा. आयुक्तांनी सभागृहात स्पष्ट केल्यानंतर सुध्दा अद्याप संबंधित अधिकारी यांना लेखी खुलासा देऊन उत्तर मागविलेले नाही. ही गंभीर बाब आहे. यामुळे सभागृहाला संशय निर्माण होतो. एका वर्षाच्या औषधी खरेदीमध्ये एवढी तफावत येते तर मागील ५ ते ७ वर्षाच्या औषधी खरेदीमध्ये किती तफावत झाली असेल व महापालिकेचे किती रक्कमेचे

नुकसान झालेले असेल याचा सुध्दा विचार करणे आवश्यक आहे. १०१ प्रकारची औषधी खरेदी केलेली असून, एकुण १७ कंपन्याचे नांवे दाखविलेली आहे. उर्वरीत कंपन्याचे नांव तसेच ९० ॲटमचे रेट कोट केलेले नाही. त्यामधील ७ ते ८ कंपन्याचे दर एम. आर. पी. पेक्षा जास्त नसल्याने स्पष्ट होत आहे. ही गंभीर स्वरुपाची बाब असून, प्रशासनाला आदेश देण्यात येतात की, जी औषधी खरेदकी केली ती एम. आर. पी. पेक्षा जास्त दराने आहे ज्याचेकडुन ही औषधी खरेदी केली व महापालिकेच जे संबंधित अधिकारी यांनी ती खरेदी केली यावर प्रशासन काय कार्यवाही करणार तसेच आयुर्वेदिक, होमोओपॅथीचे डॉक्टर्स ७ वर्षापासून ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करतात हा गुन्हा होऊ शकतो असे स. सदस्या यांनी आताच सुचना मांडली यावर सुध्दा प्रशासन काय कार्यवाही करणार यासंबंधीचा अहवाल येत्या ४ तारखेपर्यंत सादर करावा या विषयावर येत्या ४ तारखेला विशेष बैठक घेण्यात येईल. तसेच गेल्या चार बैठकीपासुन संबंधित आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे सभेला जाणुन बुजुन गैरहजर राहातात. त्यांच्या त्या दिवशीच्या रजा प्रशासनाने मंजुर करु नये.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** मा. आयुक्त रजेवर आहे. ते आले नाही तरी प्र. आयुक्त यांनी अहवाल सादर करावा ते अहवाल सादर करु शकतात.

**श्री. किरमाणी इलियास :** प्रशासकीय अहवाल सादर केलेले आहे. त्यावर बैठक केव्हा घेणार आहात.

**मा. सभापती** : सन ९७-९८ व ९८-९९ या दोन वर्षाचे प्रशासकीय अहवाल प्राप्त झालेले असून प्रशासनाने सर्व सदस्यांना देण्यासाठी १६ प्रती न दिल्यामुळे तशी मागणी केलेली आहे. प्रती सादर झाल्यानंतर विशेष बैठक आयोजीत करुन सविस्तर चर्चा करण्यात येईल. त्यावेळी पुढील वर्षाचे अहवाल सादर करण्याचे आदेश सुध्दा दिले जातील.

**श्री. मधुकर सावंत :** दिनांक १५-१२-२००१ च्या इतिवृत्तातील पान क्र. १२ वर सर्वे १५४ च्या संदर्भात अहवाल मागविला होता. खुलासा देण्यात यावा.

**उपआयुक्त (म.) :** मा सभापती यांनी मागील बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार सर्वे नं. ५४ मधील चौकशी चालु असून, अंतीम टप्यात आले. सदर चौकशीचा अहवाल मा. आयुक्त यांचेकडे देण्यात येईल. सध्या मा. आयुक्त रजेवर आहे. ते आल्यानंतर अहवाल सभागृहात सादर करण्यात येईल.

**श्री. कावडे साहेबराव :** प्रत्येक वेळेस अधिकारी प्रश्न विचारल्यावर मा. आयुक्तांचे नांव दाखवुन उत्तरे देण्यास टाळाटाळ करतात. दुसरीकडे आयुक्त पत्रकारांशी चर्चा करतांना स्पष्ट करतात की, माझी स्थायी समितीला उपथिती आवश्यक नाही. यामध्ये दोषी कोणास ठरवावे असा प्रश्न आहे. जनतेचे प्रश्न कसे व कोणत्या माध्यमाने सोडविता येतील हे अधिकारी तसेच सभागृहाने ठरवायचे असते.

**श्री. सिध्द जगदीश :** ज्या अधिकाऱ्यांच्या संबंधित एका बैठकीत प्रश्न विचारल्यानंतर पुढील बैठकीत माहिती मागविल्यास सदर अधिकारी उपस्थित नसतात ही सत्य बाब आहे. मा. आयुक्त हे स्थायी समितीच्या सभेला उपस्थित नसतात. पत्रकारांना काहीही माहिती देत आहे. मला येथे ठेवायचे नसेल तर तसा ठराव सभागृहाने घ्यावा असे पत्रकारांना आयुक्तांनी संवाद केला. त्यांची इच्छा नसेल तर, सर्वसाधारण सभेत तसा प्रस्ताव सादर करावा.

**श्री. आशा बिनवडे :** इतिवृत्तातीत पान क्र. १० वर नमुद केल्यानुसार विभागीय आयुक्तांकडे, आतापर्यंत किती प्रकरणे चौकशीसाठी दिली अशी चर्चा केलेली आहे या बैठकीत माहिती देणार होते.

**मा. उपआयुक्त (म.) :** एकुण दोन प्रकरणे होती त्यामध्ये शहानुरवाडी रस्ता व रोलींगच्या बाबत प्रकरणे होती. या दोन्ही प्रकरणचा अहवाल त्यातल्या विभागाकडे प्राप्त झालेला आहेत.

**श्री. मधुकर सावंत :** पान क्र. ०८ वर मा. महापौरांसाठी ७ लाखाची गाडी खरेदी केली त्याऐवजी कचरा उचलण्यासाठी रिक्षा खरेदी केल्या असल्या तर योग्य झाले असते. रिक्षाचा प्रस्ताव येणार होता खुलासा देण्यात यावा.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांचेशी मी चर्चा केलेली असून, रिक्षा खरेदीसाठी कोटेशन मागविले असून, लवकरच कचरा उचलण्यासाठी रिक्षा खरेदी करण्याची कार्यवाही होईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, १३-११-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त स्थायी समिती सभेचे इतिवृत्त भागश: आणि दिनांक १५-१२-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६७/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे पोटकलम २९ " अ " नुसार महानगरपालिकामध्ये ४ प्रभाग समित्या स्थापन करण्यात आल्या असून, सदरील प्रभाग समित्यांची अधिनियमानुसार कार्यपध्दती व अधिकार निश्चीत करण्यास्तव तसेच प्रभाग समित्यांचे कामकाज पाहणेस्तव काही अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करणेस्तव खालील प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | प्रदान अधिकाराचे अधिकार | अधिकार प्रदान करण्यात येत असलेली अधिकारी/समिती | अधिकाराची मर्यादा |
|---|---|---|---|
| **१.** | **२.** | **३.** | **४** |
| १. | तांत्रिक मान्यता | संबंधित कार्यकारी अभियंता | रु. ५०,००० ते रु. ३,००,००० |
| २. | प्रशासकीय मान्यता | अ) उपआयुक्त (म.) | रु. ५०,००० पर्यंत |
| | | ब) प्रभाग समिती (मु. प्रा. म. अ. नुसार प्रदत्त असलेले) | रु. ५०,००० ते रु. ५०,००० ते रु. ३,००,००० पर्यंतची कामे. |

उपआयुक्त (म.) यांना अंदाजपत्रकीय रु. ३ लक्ष पर्यंत पडताळणी करुन प्रभाग समितीकडे पाठविणे तसेच कार्यकरी अभियंता यांनी रु. ३ लक्ष पर्यंत तांत्रिक मान्यता प्रदान करणे हे मा. आयुक्तांचे अधिकार कलम ६९ (२) नुसार स्थायी समितीच्या मान्यतेने उपाआयुक्त (म.) व कार्यकारी अभियंता यांना प्रदान करण्यात येत आहे. तसेच प्रभाग समित्यांची कार्यपध्दती, कर्तव्य याबाबत आदेश पारित करण्याचे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

( प्रभाग समित्यांची कार्यपध्दती व प्रभाग समिती माध्यमातुन करावयाच्या कामाकरीता प्रदान अधिकाराचे विवरण दर्शविणारे प्रपत्र यासोबत जोडण्यात येत आहे.)

**संवाद :**

**श्री. सलीम पटेल :** तांत्रिक मान्यता देण्यासाठी कार्यकारी अभियंता याना रु. ५०,०००/- ते रु. ३,००,०००/- ऐवजी रु. ५,००,०००/- करण्यात यावे. वार्डात कोणतीही कामे होत नाही. तसेच उपआयुक्त (म.), प्रभाग समितीला सुध्दा अधिकार वाढवुन द्यावे.

**श्री. मीर हिदायत अली :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे २९ " अ " मधील पोटकलम ७ (क) नुसारचे प्रभाग समितीची कामे आहेत. या ठिकाणी कलम ६३ दाखविले आहे ते सर्वसाधारण सभेचे अधिकार आहेत. नियम वाचुन दाखवावे किती रक्कमेपर्यंत अधिकार देता येतात.

**मा. सभापती** : प्रस्तावात दर्शविलेले कलम टाकण्यात चुक झालेली असावी

**मुख्य लेखाधिकारी :**प्रस्ताव पाठवतांना टंकलेखानाची चुक झालेली आहे.

**श्री. सावंत मधुकर :** ३ लक्ष ऐवजी ५ लक्ष करावे. वार्डात कामे होतील.

**मा. सभापती** : नगरसचिव यांना कलम २९ " अ " वाचुन दाखवावे.

**नगरसचीव** : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ " अ " पोटकलम७ (क) मध्ये दर्शविल्यानुसार प्रभाग समितीची कामे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण देखरेखीच्या नियंत्रणाच्या अधिन राहुन पुढील प्रमाणे असतील अ) पाणीपुरवठा व जलनि:सारण स्वच्छता आणि पावसाने तुंबलेल्या पाण्याची विल्हेवाट यासारख्या स्थानिक व अत्यावश्यक पालीका सेवाच्या संबंधित संबंधातील नागरिकांची सर्वसाधारण गाऱ्हाणे त्वरेने दुर करणे. ब) प्रभागातील संबंधित खर्चाच्या अंदाजाबद्दल अर्थसंकल्पाच्या निरनिराळया लेखाशिर्षकाखालील प्रस्ताव आयुक्ताकडे पाठविण्यापुर्वी त्यावर विचार करणे, त्यावर शिफारशी करणे, क) प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रात पार पाडावयाच्या पाच लाख रुपयांपर्यंतच्या खर्चाच्या पालीका बांधकामाच्या नकाशांना प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजुरी देणे. भाग महानगरपालिकेने मंजुर केलेल्या अर्थसंकल्पात त्यासाठी विनिर्दिष्ट तरतुद केलेली असली पाहिजे, अशी तरतुद आहे.

**मा. सभापती** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अ. क्र. १ व १ मध्ये अधिकाराची मर्यादा ३ लक्ष ऐवजी ५ लक्ष करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे मुं. प्रा. महानगरपालिका अधिनियम १९४९ चे क २९ " अ " (७) व त्या खालील तरतुदीप्रमाणे प्रभाग समित्यांची कार्यपध्दती व अधिकार निश्चित करण्यास तसेच प्रभाग समित्यांचे कामकाज पाहणेस्तव काही अधिकाऱ्यांना खालील प्रमाणे अधिकार प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | प्रदान अधिकाराचे अधिकार | अधिकार प्रदान करण्यात येत असलेली अधिकारी/समिती | प्रस्तावित अधिकाराची मर्यादा | प्रस्तावित अधिकाराची मर्यादा |
|---|---|---|---|---|
| **१.** | **२.** | **३.** | **४** | **४** |
| १. | तांत्रिक मान्यता | संबंधित कार्यकारी अभियंता | रु. ५० हजार ते रु. ३ लक्ष | रु. ५० हजार ते रु. ५ लक्षपर्यंत |
| २. | प्रशासकीय | अ) उपआयुक्त (म.) | रु. ५० हजार पर्यंत | रु. ५० हजार |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मान्यता | | | पर्यंत |
| | | ब) प्रभाग समिती (मु. प्रा. म. अ. नुसार प्रदत्त असलेले) | रु. ५० हजार ते रु. ३ लक्ष पर्यंतची कामे. | रु. ५० हजार ते ५ लक्ष पर्यंतची कामे. |

उपआयुक्त (म.) यांना अंदाजपत्रकीय रु. ३ लक्ष ऐवजी रु. ५ लक्ष पर्यंत पडताळणी करुन प्रभाग समितीकडे पाठविणे तसेच कार्यकाही अभियंता यांनी रु. ३ लक्ष ऐवजी रु. ५ लक्ष पर्यंत तांत्रिक मान्यता करण्यास उपआयुक्त (म) व कार्यकारी अभियंता याना अधिकार प्रदान करण्यास तसेच प्रभाग समित्यांची कार्यपध्दती व कर्तव्य याबाबत आदेश पारीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या अस्थापनेवर दैनंदिन कामे करण्यासाठी तसेच नागरिकांना प्राथमिक सुविधा पुरविण्यासाठी विविध विभागात कर्मचाऱ्यांची/डॉक्टरांची कमतरता भासल्याने कामाची निकड लक्षात घेता आवश्यकतेनुसार दैनिक वेतन/ठराविक वेतनावर नैमित्तीक कर्मचाऱ्यांची नेमणुक करुन कामे करुन घेण्यात येत आहेत. विविध विभागात एकुण मिळुन १३५ तृतीयश्रेणी कर्मचारी दैनिक/ठराविक वेतनावर नैमित्तीक स्वरुपात कार्यरत आहेत. त्यांच्या वेतनावर मासिक रु. ३,६२,६८०/- एवढा खर्च होतो. कामाची निकड लक्षात घेता तांत्रिक खंड देऊन त्यांना नव्याने सहा महिन्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये दैनिक वेतन/ठराविक वेतनावर नेमणुका देण्यात येतात. सबब अवलोकनार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. सिध्द जगदीश :** ठराविक वेतनावर एकुण किती कर्मचारी काम करतात. केव्हापासुन कार्यरत आहे. याचा खुलासा देण्यात यावा.

**मा. सभापती :** सहाय्यक आयुक्त-१ यांनी खुलासा करावा.

**सहा. आयुक्त-१ :** दैनिक/ठराविक वेतनावर वर्ग-३ चे एकुण १३५ कर्मचारी कार्यरत आहे. सन १९९२, ९३, ९४ व ९५ पासुन कामाची निकड विचारात घेऊन या कर्मचाऱ्यांना कामावर घेतलेले आहे.

**श्री. सिध्द जगदीश :** दिनांक १८-०१-९९ च्या सभेत अस्थायी सर्व ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनावर घेऊन दैनिक वेतन रु. १५ वाढ करावी असा ठराव पारीत झाला. त्यानुसार प्रशासकीय आदेश सुध्दा काढलेले आहे. त्यानुसार दैनिक वेतनावर का घेतले नाही. आदेशाची प्रत मा. सभापतींनी दाखवितात.

**मा. सभापती :** आपला प्रश्न विषय क्र. ४ च्या संबंधित आहे. विषय क्र. ३ वर चर्चा करावी.

**श्री. जयवंत ओक :** जे कर्मचारी ठराविक वेतनावर कार्यरत आहे. त्यांना दैनिक वेतनावर का घेत नाही. तसा ठराव सुध्दा झालेला होता. घेत नसेल तर त्यांचे पुढील भवितव्य काय आहे. प्रशासन त्यांना कायम करणार आहात काय? नियमानुसार काय तरतुद आहे. खुलासा करावा. बऱ्याच कर्मचाऱ्यांची १८-२०-२२ वर्षे सेवा झालेली आहे. त्यांचा महानगरपालिका काय फायदा करुन देणार आहे. दैनिक वेतनावरील कर्मचारी कायम होऊ शकतात. दुसरा मुद्दा

असा की, गेल्या ८-१० वर्षात असे प्रस्ताव मंजुरीसाठी आलेले नव्हते आज का गरज पडली याचा सुध्दा खुलासा व्हावा.

**श्री. मीर हिदायत अली :** दिनांक ०९-०१-२००२ ला पत्र दिलेले आहे व विचारणा केली की, किती लोक काम करतात. न्यायालयाची यादीची प्रत मला १६-०२-२००२ ला मिळाली असून, त्यानुसार ८०० कर्मचारी काम करतात व यादी व्यतिरिक्त ४६५ कामगार मा.उच्च न्यायालयाची यादी संपली का? संपली नसेल तर न्यायालयाची यादी व्यतिरिक्त कसे घेतो.

**श्री. सिध्द जगदीश :** दैनिक वेतनावर घेण्याबाबत ठराव पारीत झालेला असतांना अद्याप का घेतले नाही खुलासा देण्यात यावा.

**मुख्यलेखापरीक्षक :** ठराविक वेतनावरील कर्मचारी ८ तासापेक्षा कमी तास काम करतात. वाचनालय वगैरे येथे ४-५ तास काम असते. कामाचा निकष लावुनच त्यांना ठराविक वेतनावर नियुक्त्या केलेल्या आहे.

**श्री. सिध्द जगदीश :** वाचनालया व्यतिरिक्त इतर कर्मचारी ८ तासापेक्षा कमी तास काम करीत नाही. ८ तासापेक्षा आणखी उलट १०-१० तास कर्मचारी काय करतात. असे चित्र आहे. अधिकारी चुकीची माहिती देतात. जे कर्मचारी ८ तास काम करतात. त्यांना दैनिक वेतनावार का घेत नाही.

**मा. सभापती** : वर्ग-३ चे ठराविक वेतनावर किती कर्मचारी आहेत व किती तास काम करतात याचा खुलासा करावा. तसेच दैनिक वेतनावर घेण्याबाबत तसा ठराव पास झालेला आहे का ठराव झालेला असेल तर अंमलबजावणी का? झाली नाही.

**सहा. आयुक्त-१ :** वर्ग-३ मध्ये दैनिक/ठराविक वेतनावर एकुण १३५ कर्मचारी कार्यरत आहे. जे कर्मचारी दैनिक वेतनावर आहे. आजही ते दैनिक वेतनावरच आहे व जे ठराविक वेतनावर आहेत ते आजही ठराविक वेतनावरच आहे. १९९९ नंतर एकही दैनिक वेतनावर घेतलेले नाही.

**मा. सभापती** : उपआयुक्त (म.) यांनी सविस्तर खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** दैनिक/ठराविक वेतनावर एकुण १३५ कर्मचारी कार्यरत आहे. दिनांक १८-०१-९९ वर्ग-४ च्या कर्मचाऱ्याना दैनिक वेतनावर घेऊन दैनिक वेतनात वाढ करावी म्हणुन प्रस्ताव पारीत झालेला होता. यामध्ये कामगार वर्ग यांचा समावेश होता. वर्ग-३ मध्ये ठराविक वेतनावर वाचनालय येथे २-२ तास कर्मचारी काय करतात. बालवाडी मध्ये ३-३ तास काम करतात. त्यांना रु. ७५०-१००० वेतन देण्यात येते. ठरविक वेतनावरील वर्ग-३ मध्ये कर्मचारी येतात. कामगार नाही. जी ठरावाची प्रत सादर केली ती वर्ग-४ च्या संदर्भात आहे. कर्मचाऱ्यांची नाही. कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जोपर्यंत पदे शासनाकडुन मंजुर येऊन येत नाही तोपर्यंत कार्यवाही करता येणार नाही.

**श्री. सिध्द जगदीश :** सुरक्षा रक्षक वर्ग-३ मध्ये येतात ते ८ तास काम करतात. त्यांना दैनिक वेतनावर का घेतले नाही.

**उपआयुक्त (म.) :** पुन्हा यादी तपासणी करुन कार्यवाही केली जाईल.

**श्री. जयवंत ओक :** शाळेमध्ये ज्या बालवाडी शिक्षिका आहेत. १८-२० वर्षापासुन काम करतात. त्यांचे भवितव्य काय सदर शिक्षिका ८ तास काम करतात. इतर काही कम्रचारी ८ तास काम करतात. त्यांना दैनिक वेतनावर का घेण्यात येत नाही. या पदांना शासन मंजुरी देईल तेव्हा देईल नियमानुसार भरती होईल परंतु आज दैनिक वेतनावर त्यांना घेण्यात यावे. तसेच गेल्या ८-१०

वर्षात अशा प्रकारचा प्रस्ताव स्थायी समिती समोर मंजुरीाठी आलेला नाही. आज का सादर झाला त्याचा उद्देश काय.

**उपआयुक्त (म) :** ठराविक वेतनावरील कर्मचारी यांना ठराविक कालावधीसाठी घेतलेले आहे. प्रचलित कायद्यानुसार त्यांचे भवितव्याच्या बाबतीत काही तरतुद नाही. वाचनालयात २ तासासाठी, बालवाडीत ३ तासासाठी कामगार म्हणजे वर्ग-४ चे कर्मचारी कर्मचारी म्हणजे वर्ग-३ मध्ये मोडतात. ठरावाप्रमाणे अंमलबजावणी होत आहे. मागच्या स्थायी समितीमध्ये वाट दिली. जागा निर्मिती नंतर कायम पदावर घेता येईल व दैनिक वेतनावरील रिकाम्या पदावर ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांना घेता येईल.

**श्री. जयवंत ओक :** जो खुलासा केला तो योग्य वाटत नाही. ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांचे काही भवितव्य नाही असे अधिकारी सांगतात. महानगरपालिकेच्या शाळेत २०-२२ वर्षापासुन बालवाडी शिक्षिका ठराविक वेतनावर काम करतात. प्रशासनाने योगय ती कार्यवाही करावी नसता नंतर धरणे, निदर्शेने, आत्महत्या होणे असे प्रकार होतात. यामुळे प्रशासनाला त्रासदायक होते. ज्या ज्या वेळी वर्ग-३ च्या जागा रिक्त होतील त्यावेळी ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांनी संधी मिळावी असे माझे मत आहे. यावर विचार विनिमय करुन निर्णय घ्यावी. विधी सल्लागार यांचा सल्ला घ्यावा. योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच हा प्रस्ताव मंजुरीसाठी येण्याचे कारण काय खुलासा करावा.

**मुख्यलेखापरीक्षक :** ज्या नेमणुका होतात. त्या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार अस्थायी नेमणुका ६ महिन्यासाठी मा. आयुक्तांना स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने करता येतात. पुढील मदत वाढ देतांना कलम ५३ (३) प्रमाणे स्थायी समितीची मंजुर घेणे आवश्यक आहे.

**श्री. जयवंत ओक :** गेल्या १४ वर्षात असे प्रस्ताव का आले नाही. मुदतवाढ देतांना मंजुरी घ्यावी लागते अधिकारी सांगतात यावरुन या अगोदर सर्व बोगस भरती झाली का? कोणत्या जागा राखीव कोणत्या संवर्गात होत्या किती होत्या याची सर्व माहिती घ्यावी. ११ वर्षात किती जागा भरल्या चौकशी व्हावी. आवश्यकता पडल्यास नंदलाल कमीटी नेमावी.

**मुख्यलेखापरीक्षक :** नुतनीकरणाची पध्दत आता आपण सुरु केलेली असल्याने स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रस्ताव सादर केलेला आहे.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या अस्थापनेवर दैनंदिन कामे करण्यासाठी तसेच नागरिकांना प्राथमिक सुविधा पुरविण्यासाठी विविध विभागात कर्मचाऱ्यांची/डॉक्टरांची कमतरता भासल्याने कामाची निकड लक्षात घेता मुं. प्रा. महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये दैनिक वेतन/ठराविक वेतनावर १३५ तृतीयश्रेणी कर्मचाऱ्यांना तांत्रिक खंड देऊन नव्याने सहा महिन्यासासाठी देण्यात आलेल्या नियुक्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपलिकेच्या अस्थापनेवर वेळोवेळी मापदंडानुसार व आवश्यकतेप्रमाणे वर्ग-४ संवर्गातील पदे सर्वसाधारण सभेत मंजुर करुन शासनाच्या मंजुरीसाठी पद निर्मित प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. परंतु महानगरपालिकेस दैनंदिन कामे करण्यासाठी तसेच नागरिकांनी प्राथमिक सुविधा पुरविण्यासाठी विविध विभागात कामगारांची कमतरता भासल्याने कामाची निकड लक्षात घेता आवश्यकतेनुसार दैनिक वेतनावर नैमित्तीक कामगारांची नेमणुक करुन काम करुन घेण्यात येत आहे. विविध विभाग मिळुन एकुण १३४६ कामगार दैनिक वेतनावर नैमित्तीक स्वरुपात कार्यरत आहेत. दैनिक वेतनावरील कामगारांच्या वेतनावर मासिक खर्च रु. २७,९९,६८०/- इतका होतो. कामाची गरज व आवश्यकता लक्षात घेऊन तांत्रिक खंड देऊन नवीन नेमणुक मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये सहा महिन्यासाठी दैनिक वेतनावर नेमणुक देण्यात येते. सबब अवलोकनार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. जयवंत ओक :** असे प्रस्ताव यापुर्वी मंजुरीस केव्हाही आलेले नाही. आज का सादर करण्याची आवश्यकता पडली. वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात जी चर्चा झाली त्याचप्रमाणे वर्ग-४ मध्ये सुध्दा बरेच कर्मचारी ठराविक वेतनावर आहे. असे असेल तर, शासनाकडुन पदांना मंजुरी घेऊन नोकर भरती करावी.

**श्री. मीर हिदायत अली :** मी दिनांक ०८-०९-२००२ ला पत्र देऊन उत्तराची मागणी केली होती. त्यानुसार त्यामुळेच हा प्रस्ताव सादर झालेला असावा असे वाटते. पत्र देऊन माहिती घेतली असता वर्ग-४ कर्मचाऱ्यांच्या बाबतीत न्यायालयाने जी यादी दिली त्या यादीनुसार ८९० कर्मचारी काम करतात असे दिले ४५६ लोक यादीत नसलेले घेतलेले आहे. यादीनुसार तफावत येते. न्यायालयाने दिलेली यादी संपुष्टात आलेली आहे का? खुलासा द्यावा. यादीनुसार शिल्लक असेल तर, इतर कर्मचारी कसे भरती केले. याचा खुलासा देण्यात यावा.

**मा. सभापती** : न्यायालयाने दिलेली यादी व महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेल्या यादीत तफावत आहे असे स. सदस्य यांचे म्हणणे आहे. खुलासा करावा.

**प्र. उपआयुक्त (प्र.) :** महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील दैनिक वेतनावरील काही कामगारांनी सन १९९४ मध्ये त्यांना सेवेत कायम करण्याच्या संदर्भाने मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. सदरील याचिकाची एकत्रित सुनावणी होऊन दि. २१-१०-९४ रोजी निर्णय दिला की, महानगरपालिकेतील विविध विभागातील दैनिक वेतनावरील कामगाराची एकत्रित ज्येष्ठता यादी तयार करण्यात यावी. त्यानुसार एकत्रित जेष्ठता यादी तयार करण्यात आली. विविध विभागांना सदरील यादी मधुन जेष्ठतेनुसार कामगारांना कामे देण्यात येत होती. परंतु एकत्रित जेष्ठता यादीमधुन विविध विभागात त्या विभागाचा अनुभवी कामगार उपलब्ध करुन देतांना अडचणी निर्माण होऊ लागल्या असे प्रशासनाच्या लक्षात आले. त्यावेळेस प्रशासनामार्फत याचिकाच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयात लेखी स्पष्टीकरण देवुन महानगरपालिकेत दैनिक वेतनावरील कामगारांची विभाग निहाय ज्येष्ठता यादी तयार करण्यास परवानगी मागितली. त्यावर मा. न्यायालयाने दि. २०-०७-९५ रोजी निर्णय दिला व त्यानुसार विभागनिहाय

ज्येष्ठता यादी दि. ३१-१०-९५ रोजी अंतीमरित्या प्रसिध्द करण्यात आली. विभागनिहाय ज्येष्ठता यादीमधुन कामगारांची संख्या खालील प्रमाणे होती.

| | | |
|---|---|---|
| १. | सफाई मजुर (पुरुष ) | ३९८ |
| २. | सफाई मजुर (स्त्री ) | २८२ |
| ३. | सर्वसाधारण शिफाई | ४५ |
| ४. | प्रकल्प विभाग | ०७ |
| ५. | शिक्षण विभाग | ४८ |
| ६. | वाचनालय | १२ |
| ७. | जकात | २७ |
| ८. | अग्निशमन विभाग | ०१ |
| ९. | सुरक्षा | ५७ |
| १०. | मालमत्ता विभाग | २६ |
| ११. | प्राणी संग्राहालय | १८ |
| १२. | पशु चिकित्सालय | ०१ |
| १३. | कोंडवाडा | १४ |
| १४. | पशुधन विकास विभाग | १० |
| १५. | कत्तलखाना | १२ |
| १६. | बांधकाम विभाग | ३१ |
| १७. | स्लम विभाग | ०२ |
| १८. | उद्यान विभाग | ५९ |
| १९. | जलतरण विभाग | १० |
| २०. | यांत्रिकी विभाग | ४५ |
| २१. | पाणी पुरवठा विभाग-१ | १३० |
| २२. | विद्युत विभाग | २३ |
| २३. | पाणी पुरवठा विभाग-२ | ६५ |
| २४. | विभाग क्र ७ | ७८ |
| २५. | ड्रेनेज (स्विपर) | ४१ |
| २६. | मलेरिया | ७१ |
| २७. | आरोग्य विभाग | ४२ |
| | **एकुण** | **१५५२** |

वरील कामगारापैकी खालील दर्शविलेल्या विभागातील ज्येष्ठतेनुसार व पद उपलब्धतेनुसार २६१ कामगारांना सेवेत कायम केलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | सफाई मजुर (पुरुष ) | ७२ |
| २. | सफाई मजुर (स्त्री ) | ९५ |
| ३. | स्विपर (पुरुष) | ०९ |
| ४. | उद्यान विभाग (मुकबधीर) | ०२ |
| ५. | यांत्रिकी विभाग | १० |

| | | |
|---|---|---|
| ६. | विद्युत विभाग | ०४ |
| ७. | पाणी पुरवठा विभाग-१ | २४ |
| ८. | पाणी पुरवठा विभाग-२ | २४ |
| ९. | झोन क्र. ७ (पाणीपट्‌टी वसुली) | ०४ |
| | **एकुण** | **२६१** |

सध्या उक्त यादीमधील ८९० कामगार दैनिक वेतनावर कार्यरत आहे. सन १९९५ बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, गरवारे क्रिडा संकुल, छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्राहालय, भारत माता मंदिर, विविध नव्याने काढण्यात आलेल्या शाळा तसेच कचरा उचलण्यासाठी दुपारपाळीत चालणाऱ्या ट्रक यासाठी कामगारांच्या दैनिक वेतनाच्या ज्येष्ठता यादया नव्हत्या. त्यामुळे या विभागासाठी यादी व्यतिरिक्त कामगार नियुक्त करणे भाग पडले. तेच काही विभागाच्या ज्येष्ठता यादीमधील कामगार संपल्यामुळे व यादीमधील कामागार उपलबध होत नसल्याने यादी व्यतिरिक्त कामागारांची नेमणुक करावील लागली. तसेच पशुधन विकास विभागाच्या काही योजना नव्याने कार्यान्वीत झाल्या. उद्यानाचा नव्याने विकास करण्यात आला. तसेच मोठया प्रमाणावर आरोग्य केंद्र कार्यान्वीत झाल्याने यादी व्यतिरिक्त कामगारांची नेमणुक करण्यात आली आहे. आरोग्य विभागातील काही कर्मचाऱ्यांची जाहीरात देवुन व सेवायोजन कार्यालयाकडुन यादी मागवुन नेमणुका दिल्या आहे.

सन १९९७ मध्ये औरंगाबाद स्वच्छ मोहीम राबविण्यात आली होती. त्यावेळेस विभागीय अधिकारी यांना सफाईच्या कामासाठी कामगार नियुक्त करण्याचे अधिकार देण्यात आले होते. त्यावेळेस आवश्यकतेनुसार विभागीय अधिकारी यांनी कामगारांची यादी व्यतिरिक्त नेमणुका केल्या होत्या. पुन्हा सदरील मोहीम थांबविण्यात आली परंतु शहरातील कचरा एका पाळीत उचलणे शक्य होत नसल्याने दुपारपाळीत सर्व झोनचा सर्व कचरा उचलणाऱ्या गाडया चालु ठेवण्यात आल्या व त्यासाठी स्वच्छता मोहीमेत जे कामगार चांगले काम करीत होते. अशा १११ कामगारांना दुपारच्या पाळीतील ट्रकवर कचरा भरण्यासाठी यादी व्यतिरिक्त नेमणुका दिल्या आहेत.

यादी व्यतिरिक्त कार्यरत कामगारांचे विभाग व संख्या खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | सर्व विभागीय कार्यालय (साफ सफाई मजुर) | १६५ |
| २. | मुख्य कार्यालय (शिपाई ) | १० |
| ३. | पाणी पुरवठा विभाग | ०२ |
| ४. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र | ०६ |
| ५. | शिक्षण | ७८ |
| ६. | जकात | ०४ |
| ७. | सुरक्षा विभाग | २५ |

| | | |
|---|---|---|
| ८. | मालमत्ता विभाग (विविध इमारतीवर) | २३ |
| ९. | बांधकाम विभाग | ०३ |
| १०. | पशुधन विकास विभाग | १५ |
| ११. | उद्यान विभाग | २४ |
| १२. | विद्युत विभाग | ०८ |
| १३. | सिध्दार्थ जलतरण | ०६ |
| १४. | यांत्रिकी विभाग | ०४ |
| १५. | आरोग्य विभाग | ४७ |
| १६. | गरवारे क्रिडा संकुल | ०७ |
| १७. | सांस्कृतिक विभागांतर्गत भारत माता मंदिर | १२ |
| १८. | इमारती बांधकाम | ०५ |
| १९. | छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्राहालय | ०७ |
| २०. | प्रशासकीय विभाग | ०५ |
| | **एकुण** | **४५६** |

वरील यादी व्यतिरिक्त दैनिक वेतनावरील कामागार सन १९९८ पुर्वी नियुक्त केलेले नियुक्ती केलेली नाही.

सध्या यादीतील ८९० व यादी व्यतिरिक्त ४५६ असे एकुण १३४६ कामगार दैनिक वेतनावर कार्यरत आहेत. सध्या दैनिक वेतनाचा दर रु. ८४/- आहे.

**श्री. किशोर शिंदे** : वर्ग-४ चे कर्मचारी जे माझ्या वार्डात लाईनमन/साफसफाई करणारे मजुर ते अधिकाऱ्यांच्या घरी काम करतात. त्यांना दोन्हीकडे कामाचे आदेश आहे का. खुलासा द्यावा सक्तीने काम करावयास लावतात अशी माहिती मिळाली. अधिकाऱ्यांचया घरी वेगळे कर्मचारी दिलेले नाही का?

**मा. सभापती** : कोणत्या अधिकाऱ्याच्या घरी कोणते कर्मचारी दोन्हीकडे काय करतात. नावासहीत सांगावे त्यानुसारच कार्यवाही करता येईल. अधिकाऱ्याकडे कर्मचारी दिलेले आहेत का? विद्युत विभागाचे अधिकारी यांनी खुलासा द्यावा.

**मुख्यलेखाधिकारी** : वर्ग-१ मधील जे अधिकारी आहेत. त्यांचेकडे एक कर्मचारी नियमानुसार दिलेले आहे. एकाच कर्मचाऱ्यांना दोन ठिकाणी काम देता येत नाही.

**उपअभियंता-१ (विद्युत)** : या विभागातील कोणतेही कर्मचारी अधिकाऱ्याकडे काम करीत नाही.

**श्री. जयवंत ओक** : जी टिप्पणी प्र. उपआयुक्त (प्र.) श्री. जावरे यांनी वाचुन दाखविली त्याची एक प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी. २५ वर्षापासुन कर्मचारी काम करतात त्यांचे जीवनाचे काय याचा विचार व्हावा. ठराविक वेतनावरील सर्वच कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनावर का करु शकत नाही.

**मा. सभापती** : सर्वांना प्रत देण्यात यावी.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा** :शासनाने मंजुरी दिलेल्या पदानुसार जेष्ठतेनुसार वर्ग-४ चे कर्मचारी भरती केलेले नाही. बऱ्याच लोकांच्या तक्रारी होत्या. काही कर्मचारी बजाज कंपनीमध्ये नोकरी करीत असतांना सुध्दा २०० कामगारांच्या भरतीमध्ये त्याचा समावेश झाला. परंतु जे कर्मचारी या

महानगरपालिकेत काम करतात जेष्ठतेनुसार त्यांना सेवा भरतीमध्ये समावेश का झालेला नाही. या संदर्भात मागील एका बैठकीत चर्चा सुध्दा झालेली होती. सविस्तर माहिती सादर करणार होते.

**मा. सभापती** : किती लोकांनी असे प्रकारचे अपील केले त्याचा खुलासा द्यावा.

**सहा. आयुक्त-२ :** शासनाकडुन २०० कर्मचाऱ्यांचे सफाई कामगार म्हणुन पदे मंजुर होऊन आलेली होती. यात १७७ लोकांना सेवेत कायम केलेले आहे. जेष्ठता यादी नुसार केलेले आहे. या सेवा भरती संदर्भात काही कर्मचाऱ्यांचे आक्षेप आलेले असून, अभिलेख कक्षामार्फत त्याची पडताळणीचे काम चालु आहे. १७ लोकांचे आक्षेप आहे.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** २०० पैकी ११७ कर्मचारी कायम केले उर्वरीत २३ कर्मचारी न्यायालयाच्या यादीनुसार तात्काळ भरण्याची कार्यवाही करण्यात यावी तत्काली आयुक्त श्री. बलदेवसिंग साहेब असतांना तेव्हापासुन ही कार्यवाही चालु असून, उशीर झाल्यास व संबंधित लोक न्यायालयात गेल्यास त्याचा फरकासहीत पगार कोण देणार याचा सुध्दा विचार व्हावा.

**मा. सभापती** : २०० कर्मचाऱ्यांची भरती करते वेळेस वेगवेगळया तक्रारी प्राप्त झालेल्या आहे. राजेंद्र लोखंडे नावाचा कर्मचारी आपल्याकडे काम करीत असतांना दुसऱ्याच एका बजाज कंपनीमधील राजेंद्र लोखंडे नावाच्या व्यक्तीला सेवाभरती मध्ये समावेश करण्यात आला. जो कर्मचारी महानगरपालिकेत काम करीत होते ते न्यायालयात गेले त्यांनी न्यायालयाची तशी ऑर्डर १ वर्षापासुन अणली तरी सुध्दा त्यांना कामावर घेतले नाही. अधिकारी गरीबांवर अन्याय करतात. श्री. पत्र दिल्यानंतर बोगस राजेंद्र लोखंडे हा कामावरुन कमी केले. असे होत असेल तर, अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी. एकुण १७ अपील झालेले आहे. त्यांची जेष्ठता आहेत का. याची तपासणी करुन कार्यवाही व्हावी. येणाऱ्या स्थायी समिती सभेत तसा अहवाल सादर करण्यात यावा. श्री. राजेंद्र लोखंडे यांना तात्काळ कामावर घेतले नाही तर ते पुन्हा न्यायालयात जाणार आहे. मागील सर्वच पगाराची ते मागणी करणार आहे. उशीर झाल्यास संबंधित अधिकाऱ्याच्या वेतनातुन सुध्दा रक्कम देण्याची वेळ येऊ शकते हे विसरुन चालता येणार नाही. त्यासाठी त्यांना तात्काळ कामावर घेण्यात यावे.

**श्री. जयवंत ओक :** दैनिक/ठराविक वेतनावर किती कर्मचारी आहेत. किती वेतन दिले जाते.

**प्र. उपआयुक्त (प्र.) :** वर्ग-४ संवर्गातील कर्मचारी जे अस्थापना विभागामार्फत या विभागामध्ये नियुक्त केलेले आहे ते सर्वच कर्मचारी दैनिक वेतनावर आहे. ठराविक वेतनावर कुणीही नाही. जी चर्चा होत आहे. त्यानुसार विषय पत्रिकेवरील विषय क्र. ९ वर तसा प्रस्ताव सादर झालेला आहेत. मुख्य लेखाधिकारी यांचेकडे ठराविक वेतनावर जे कर्मचारी काम करतात. त्यांची यादी आहे.

**सहा. आयुक्त-२ :** या विभागात कोणी कर्मचारी ठराविक वेतनावर नाही. वर्ग-३ चे कर्मचारी ठराविक वेतनावर आहेत.

**मा. सभापती** : वर्ग-३ चे जे कर्मचारी काम करतात. या कर्मचऱ्यांना कायम करण्यासंदर्भात शासनाकडे तशी काही पदास मंजुरीची मागणी केलेली आहे काय?

**मुख्यलेखाधिकारी :** ठराविक वेतनावर ज्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या झाल्या त्या संदर्भात सर्वसाधारण सभेत काही पदनिर्मितीचे ठराव पास करुन शासन मंजुरीसाठी

पाठविलेले आहे. यामध्ये रिक्षाचालक, स्वीमींग फुल तसेच बालवाडी शिक्षिका पदाचे प्रस्ताव आहेत. आता वर्ग-३ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्राहालयात ठराविक वेतनावर कर्मचारी कार्यरत आहे. पद निर्मितीचे प्रस्ताव पाठविले असून, पदांना मंजुरी झाल्यानंतर सदर कर्मचाऱ्यांना सेवेत सामावुन घेण्याचा विचार करण्यात येईल.

**श्री. सिध्द जगदीश :** दिनांक १८-०१-९९ ला दैनिक वेतनावर घेण्याबाबत ठराव पास झाला त्यापैकी फक्त वर्ग-४ चे ३९ कामगारांना दैनिक वेतनावर घेतले इतरांना का घेतलेले नाही ज्यांनी पैसे दिले त्यांना घेतले. ज्यांनी पैसे दिले नाही त्यांना घेतले नाही असा त्याचा अर्थ निघतो.

**मा. सभापती** : ज्यांना दैनिक वेतनावर घेतले तसे शासनाचे काही निर्देश होते काय?

**मुख्यलेखाधिकारी :** संचिका तपासणी करुन पुढील बैठकीत सविस्तर माहिती देण्यात येईल.

**श्री. जयवंत ओक :** ३९ कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनावर घेतले एकुण ७० कर्मचारी आहे. इतरांना ही घेण्यात यावे. शिक्षण विभागामध्ये बालवाडी शिक्षिका १८-२०-२२ वर्षापासुन सेवा करीत आहे. त्यांना दैनिक वेतनावर घेण्यात यावे. सेवानिवृत्त झाल्या तरी त्यांना काही मिळणार नाही. हा दृष्टीकोन समोर ठेवुन दैनिक वेतन करावा.

**मा. सभापती** : ३९ कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनावर घेतले १) ७० ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनावर घ्यावे असा ठराव पास झालेला असतांना फक्त ३९ कर्मचाऱ्यांनाच दैनिक वेतनावर घेतले बाकीच्यांना का घेतले नाही. २) दैनिक वेतनावर ज्यांना घेतले त्यांना शासनाच्या आदेशानुसार घेतले आहे काय? व ज्यांना घ्यावयाचे आहे. त्याचेसाठी शासनाची परवानगीची आवश्यकता आहे का? याबाबतची सविस्तर माहिती पुढील बैठकीत सादर करावी. प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या अस्थापनेवर वेळोवेी मापदंडानुसार व आवश्यकतेप्रमाणे वर्ग-४ संवर्गातील एकुण १३४६ कामगारांचे कामाची निकड लक्षात घेऊन दैनिक वेतनावर कामगारांना तांत्रिक खंड देऊन नव्याने सहा महिन्यासाठी देण्यात आलेल्या नियुक्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०/५ :**

उपआयुक्त (म.) यांचेकडुन स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वित्तीय वर्ष सन २००२-२००३ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कराचे दर हे मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ मधील कलम ९९ अन्वये महापालिकेने दि. २०-०२-२००२ रोजी किंवा त्यापुर्वी निश्चित करणे व मंजुर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सन २००२-२००३ या वित्तीय वर्षासाठी खालील प्रमाणे कर प्रस्तावित आहेत. खालील दर हे करयोग्य मुल्यावर आकारले जातील.

**महानगरपालिकेचे दर :**

सन २००१-२००२ चे प्रचलीत व सन २००२-२००३ साठी प्रस्तावित सामान्य कर व इतर कराचे दर दर्शविणार तक्ता.

| अ. क्र. | कराचे नांव | सन २००१-२००२ चे प्रचलित दर कर योग्य मुल्य रु. | दर | सन २००२-२००४ साठी दर कर योग्य मुल्य रु. | दर |
|---|---|---|---|---|---|
| १. | सामान्य कर | १ ते १००० | २३% | १ ते १००० | २३% |
| | | १००१ ते १०००० | २४% | १००१ ते १०००० | २४% |
| | | १०००१ ते २०००० | २५% | १०००१ ते २०००० | २५% |
| | | २०००१ ते ५०००० | ३०% | २०००१ ते ५०००० | ३०% |
| | | ५०००१ ते १००००० | ३३% | ५०००१ ते १००००० | ३३% |
| | | १००००० च्या पुढे | ३५% | १००००० च्या पुढे | ३५% |
| २. | साफसफाई कर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | |
| | | अ) निवासी वापर | ३% | अ) निवासी वापर | ३% |
| | | ब) निवासेत्तर वापर | | ब) निवासेत्तर वापर | |
| | | १) १ ते ५०,००० | ८% | १) १ ते ५०,००० | ८% |
| | | २) ५०००१ ते पुढे | ८% | २) ५०००१ ते पुढे | १०% |
| ३. | वृक्ष कर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १.५% | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | २% |
| ४. | अग्निशमनकर | -//- | १.५% | -//- | १.५% |
| ५. | मनपाशिक्षण कर | -//- | १.५% | -//- | २% |
| ६. | पथकर | -//- | २% | -//- | २% |
| ७. | जललाभकर | -//- | १.५% | -//- | १.५% |
| ८. | जलनिःसारणकर | -//- | १.५% | -//- | १.५% |

९. मोकळया जागेचा कर करयोग्य मुल्यावर सामान्य कराच्या दराने
१०. राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर, मोठया निवासी क्षेत्रावरील कर, शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे, करयोग्य मुल्यावर आकारण्यात येतील.

**संवाद :**

**श्री. जयवंत ओक :** मागील वर्षा करात वाढ केली. तोच चुकीचा निर्णय झालेला आहे. जनतेला उत्तरे द्यावी लागतात. मनपाचा अर्थ सेवा देणे असा आहे. गेल्या वर्षा जी करवाढ झाली तीच कमी करावी. गरीब जनतेवर अन्याय झालेला आहे. आताच निर्णय घेऊन सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव पाठवावा.

**मा. सभापती** : येत्या ५ तारखेला सुधारीत अर्थसंकल्पावर चर्चा करणार आहोत. जो कर प्रस्तावित केला त्यात कमी करता येईल. सदर बैठकीत चर्चा करुन योग्य निर्णय घेतला जाईल.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** किती वर्षाला व किती टक्के कर वाढविला जातो. कर वाढवुन देऊन तेवढी वसुली केली जाते का कर वाढवायचा असेल तर नोटीफिकेशन काढावे लागते. ते काढलेले होते का? झोन कार्यालयात ३% ते ४% वाढवुन घेण्यात येते.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**करमुल्य निर्धारण अधिकारी-२ :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ नुसार दरवर्षी २० फेब्रुवारी पुर्वी आपणास कराचे दर निश्चित करावे लागतात. सामान्य कर व इतर कराची जी टक्केवारी आपण ठरवितो ती २० फेब्रुवारी पुर्वी ठरवावी लागते. मागील ४ ते ५ वर्षापासुन दरवाढ केलेली नव्हती. म्हणुन गेल्या वर्षी करवाढ केली. त्यामुळेच ३ ते ४% चा जो फरक आहे तो झालेला आहे.

**मा. सभापती** : एखाद्या व्यक्तीकडे ६०० रु. थकबाकी आहे. त्यांना पावती देतांना ४% वाढवुन घ्यावे असे मोघम का देण्यात येते.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** यासंबंधीचे नोटीफिकेशन काढलेले आहे का?

**कर मुल्य निर्धारण अधिकारी-२ :** सभागृहाची मान्यता झाल्यानंतर नोटीफिकेशन काढले जाते. सर्व जनतेला माहिती करुन दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्यात येते. गेल्या वर्षा सुध्दा नोटीफिकेशन काढलेले होते.

**मा. सभापती** : आपल्या विभागातुन प्रत्येक झोनचे असेसमेंट रजिस्टर जाते. त्यामध्ये ४% करवाढ करुन दिलीनाही. दिली असेल तर पावतीवर नाही

**करमुल्य निर्धारण अधिकारी-२ :** अशा प्रकारची एखादी केस असेल. कार्यवाही करण्यात येईल नेहमीसाठी असे होत नाही.

**मा. सभापती** : राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर, इतर कर मिळुन किती कर शासनाकडे आपण पाठवितो. रोजगार हमी कर किती पाठवितो. रोजगार हमी योजना ही ग्रामीण भागात राबविली जाते.

**मुख्यलेखाधिकारी :** शिक्षणकर व इतर कर मिळुन शासनाकडे जवळपास २ कोटी रुपये पाठविले जातात. रोजगार हमी कर शासन निर्देशानुसार लागु होता. शासनाने हा कर विधानसभेत मंजुर करुन लावलेला आहे. नागरी क्षेत्रात गोळा करुन ग्रामीण भागात पाठविले जाते. आर्थिक बाब आहे. वाढ सुचविली ती अशा मिळकतीवर ज्याचे करयोग्य मुल्य रु. ५०,०००/- ते १,००,०००/- मालमत्तेस १% करवाढ प्रस्तावित केलेली आहे. मनपा शिक्षणकर १.५% ऐवजी २% अशी वाढ सुचविली आहे. शिक्षण करापासुन ३० लक्ष रुपये मिळतात. १० कोटी रुपये खर्च होतो. व ४.५० कोटी शासन देते.

**श्री. जगदीश सिध्द :** हिंदु वस्तीत १००% वाढ केली. १५००० वाढ केली. पवनगॅसच्या पाठीमागील भागात विक्रम नगर येथील प्रकरण आहे. नंतर कमी करण्यात आले. कसे काय कमी झाले. पैसे वगैरे घेऊन कमी झाले असावे.

**मुख्यलेखाधिकारी :** ही करवाढ जुन्या इमारतींना लागु होणार नाही. कारण या अगोदरचा त्यांचे करयोग्य मुल्य ठरलेले असल्याने त्यात आपण बदल करु शकणार नाही. नवीन ज्या इमारती झालेल्या आहेत व नवीन होणार आहेत. त्यांना ही वाढ केलेली आहे. मागील अर्थसंकल्प प्रस्तावित केला होता. त्यास मान्यता झालेली आहे. करयोग्य मुल्यात बदल करता येत नाही. खर्चाच्या प्रमाणे उत्पन्न मिळाले. ते ३१-०३-२००१ नंतर वाढविलेले आहे.

**करमुल्य निर्धारण अधिकारी :** स. सदस्य यांनी असंसदीय शब्द वापरले आहे. कुणाबद्दल वापरले आहे. असे काही झालेले नाही.

**श्री. जगदीश सिध्द :** मी जर असे प्रकरण आणले तर कय कार्यवाही करणार पुढच्या स्थायी समितीसमोर सादर करणार. घडलेले आहे. अधिकाऱ्यांच्या वहिनी संबंधित व्यक्तीच्या विरोधात निवडणुकीस उभ्या होत्या. त्यांना प्रतिसाद दिला नाही.

त्यामुळे मुद्दाम हेतुपुरस्सर मालमत्ता कर वाढवुन दिला. अधिकारी राजकारण करतात. हे कसे बोलतात. झांबड इस्टेटचे पाहुन घ्या. पुर्णच्या पुर्ण पावत्या आणुन देतो. त्यांना एवढं का लागलय. त्यांनी सांगितले होते. आपण करुन घेवु म्हणुन आता खोट बोलतात. अभिलेख मागविण्यात यावे.

**मा. सभापती** : पुढील बैठकीत सदर खातेदाराचे रजिस्टर मागवुन घेवु रोजगार हमी कर आपण शहरात वसुल करतो. ही योजना ग्रामीण भागात चालते. शासनाकडुन रोजगार हमी योजने अंतर्गत शहरातील रस्त्यासाठी वगैरे अनुदान येत नाही. तर हा कर शहरातील जनतेवर का आकारण्यात येतो. याबाबत शासनास विचारणा व्हावी. याबाबत पदाधिकाऱ्यांनाच पुढाकार घ्यावा लागेल. मालमत्ता करात प्रस्तावानुसार सर्वाच्या सम्मतीने खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१. सामान्य कर सन २००२-२००३ साठी १ ते १००० सी २३%, १००१ ते १०,००० साठी २४% १०००१ ते २०००० साठी २५% २०००१ ते ५०००० साठी ३०%, ५०००१ ते १०,०००० साठी ३३% १,८०,००० ते त्यापुढे यासाठी ३६% दर ठेवण्यास मान्यता देण्यात येते.

२. **साफ सफाई कर :** अ) निवासी वापर ३% ब) १, १ ते ५०,००० पर्यंत ८% २. ५०००१ ते पुढे यासाठी ९% कर आकारण्यास मान्यता देण्यात येते.

३. वृक्ष कर १.५ करण्यास मंजुरी देण्यात येते.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** बांधकाम परवानगी देतांना आपण वृक्षाकर लावतो. यामुळे दोन वेळेस कर वसुल होत आहे.

**मा. सभापती** : नगररचना अधिकारी यांनी खुलासा करावा.

**नगररचनाकार :**

**श्री. निकम** : नगररचना विभागामार्फत बांधकाम परवानगी देतांना अनामत रक्कम रु. १०,०००/- रु डिपॉझिट असेल तर ७५००/- बां. प. अनामत व २५००/- वेगळे वृक्षालागवड अनामत म्हणुन देण्यात येते. परंतु वृक्ष लागवड पुर्ण केल्यानंतर तसे पत्र उद्यान विभागाकडुन मिळाल्यानंतर घेतलेले अनामत परंतु केले जाते. ही अनामत रक्कम आहे. कर नाही.

**मा. सभापती** : अग्निशमन कर १.५% करण्यास मंजुरी देण्यात येते. शिक्षण कर २% केल्यास मनपास किती रक्कम येऊ शकते.

**मुख्यलेखाधिकारी :** १५ ते २० लक्ष रुपये येऊ शकतात.

**मा. सभापती** : शिक्षण कर जो मिळतो, ती सर्व रक्कम शिक्षण विभागावरच खर्च करण्यात यावी. २% कर आकारण्यास मान्यता देण्यात येते. सतेच ६) पथकर २% ७) जललाभकर १.५% ८) जलनिःसारण लाभकर १.५% करण्यास मान्यता देण्यात येते. अ. क्र. ९ ते १० सुध्दा मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वित्तीय वर्ष सन २००२-२००३ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासाठी मालमत्ता कराचे दर खालील प्रमाणे निश्चित करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | कराचे नांव | सन २००१-२००२ चे प्रचलित दर कर योग्य मुल्य रु. | दर | सन २००२-२००३ साठी दर कर योग्य मुल्य रु. | स्थायी समिती ने मंजुर केलेले दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कर योग्य मुल्य | रु. दर | कर योग्य मुल्य | दर | दर |
| १. | सामान्य कर | १ ते १००० | २३% | १ ते १००० | २३% | २३% |
| | | १००१ ते १०००० | २४% | १००१ ते १०००० | २४% | २४% |
| | | १०००१ ते २०००० | २५% | १०००१ ते २०००० | २५% | २५% |
| | | २०००१ ते ५०००० | ३०% | २०००१ ते ५०००० | ३०% | ३०% |
| | | ५०००१ ते १००००० | ३३% | ५०००१ ते १००००० | ३४% | ३४% |
| | | १००००० च्या पुढे | ३५% | १००००० च्या पुढे | ३६% | ३६% |
| २. | साफसफाई कर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | | |
| | | अ) निवासी वापर | ३% | अ) निवासी वापर | ३% | ३% |
| | | ब) निवासेत्तर वापर | | ब) निवासेत्तर वापर | | |
| | | १) १ ते ५०,००० | ८% | १) १ ते ५०,००० | ८% | ८% |
| | | २) ५०००१ ते पुढे | ८% | २) ५०००१ ते पुढे | १०% | ९% |
| ३. | वृक्ष कर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १.५% | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | २% | १.५% |
| ४. | अग्निशमन कर | -//- | १.५% | -//- | १.५% | १.५% |
| ५. | मनपाशिक्षण कर | -//- | १.५% | -//- | २% | २% |
| ६. | पथकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | २% | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | २% | २% |
| ७. | जललाभकर | -//- | १.५% | -//- | १.५% | १.५% |
| ८. | जलनिःसारण कर | -//- | १.५% | -//- | १.५% | १.५% |

९. मोकळया जागेचा कर करयोग्य मुल्यावर सामान्य कराच्या दराने

१०. राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर, मोठया निवासी क्षेत्रावरील कर, शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे, करयोग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

वरीलप्रमाणे कराचे दर निश्चित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महेशनगर, व्यंकटेशनगर मधील ५० व ६० फुट विकास रस्त्यावर फुटपाथ बांधण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १३,०५,०००/- च्या अंदाजपत्रकास दिनांक २५-१०-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता मिळाली आहे. त्यानुसार सदरील कामाकरीता

निविदापत्रके मागविण्यात आली असता एकुण अकरा कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदपत्रके स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. महेश एस कालानी | २% कमी दराने |
| २. | मे. शहा कन्स्ट्रक्शन | ५.७०% जास्त दराने |
| ३. | श्री. सचिन माळवे | निविदापत्र एक लिफाफ्यात सादर केल्याने उघडण्यात आले नाही. |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री. महेश एस. कालानी यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २% कमी असे आहेत. तरी श्री. महेश एस. कालानी यांचे अं. प. दरापेक्षा २% कमी दराचे निविदापत्रके मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महेशनगर, व्यंकटेशनगर मधील ५० व ६० फुट विकास रस्त्यावर फुटपाथ बांधण्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची श्री. महेश एस. कालानी यांची अं. प. दरापेक्षा २% कमी दराची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, बेगमपुरा भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,५१,१००/- च्या अंदाजपत्रकास विषय क्र. ३१/२ दि. ११-०९-२००१ अन्वये मा. स्थायी समितीची मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण आठ निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत यापैकी फक्त दोन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असून, खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | १% कमी दराने |
| २. | के. बी. पाथ्रीकर | १०% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १% कमी आहेत. तरी मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे अं. प. दरापेक्षा १% कमी दराचे निविदापत्रके मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बेगमपुरा भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं. प. दरापेक्षा १% कमी दराची मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३/८ :**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. चिकलठाणा येथील उर्वरीत गटारी दुरुस्त करणे करीता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या दरसुचीनुसार २०००-२००१ नुसार रु. १३,०१,२४३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ०२-१०-२००१ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तसेच स्थायी समिती सभेत दिनांक २५-१०-२००१ रोजी विषय क्र. ४४/३ नुसार अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यत आल्या असून, अंतीम तारखेपर्यंत एकुण १९ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण १० निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. निलेश कन्स्ट्रक्शन | ३३.३३% कमी दराने |
| २. | मे. शहा कन्स्ट्रक्शन | ३३.११% कमी दराने |
| ३. | मे. हिटेक कं. | २६.००% कमी दराने |
| ४. | मे. आवंतिका कं. | २५.९९% कमी दराने |
| ५. | एस. एच. टोनगांवकर | २५.१७% कमी दराने |
| ६. | शे. मसुद | २३.७६% कमी दराने |
| ७. | शे. इमामोद्यीन | २३.७८६% कमी दराने |
| ८. | मन्नान खान | २१.८६% कमी दराने |
| ९. | रेणुका कन्स्ट्रक्शन | १४.३०% कमी दराने |
| १०. | एस. ए. शेख | १३.८९% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.३३% कमी दराची असलेली मे. निलेश कन्स्ट्रक्शन यांचे निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : सदर विषय दोन वेळेस रिकॉल झालेला आहे का?

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** चांगल्या प्रतीचे काम होईल का?

**अतिरिक्तश शहर अभियंता :** सदर प्रस्ताव रिकॉल झालेला नाही. चांगल्या प्रतीचे काम करुन घेण्याबाबत संबंधिताकडुन हमी घेणार आहोत. काम संपल्यानंतर संबंधिताचे डिपॉझीट आता ९० दिवसाऐवजी १२० दिवसानंतर अदा करणार आहोत.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे. ९० दिवसाऐवजी १२० दिवसानंतर डिपॉझिट परत करावे. काम चांगले झाल्याची खात्री करुन घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा येथील उर्वरीत गटारी दुरुस्त करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं. प. दरापेक्षा ३३.३३% कमी दराची मे. निलेश कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४/९ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दिनांक १५-०९-२००१ रोजी मा. स्थायी समितीने ठराव क्र. ३८/३ अन्वये वर्ग-३ संवर्गातील ठराविक वेतन, दैनिक

वेतनावरील कर्मचाऱ्यांना खालील प्रमाणे दैनिक वेतन व ठराविक वेतनाचे दर मंजुर केले आहेत.

| अ. क्र. | तपशील | प्रचलीत दर | स्थायी समितीने मंजुर केलेले दर |
|---|---|---|---|
| १. | दैनिक वेतन कर्मचारी | रु. ७५/- | रु. ११४/- |
| २. | ठराविक वेतन | रु. १०००/- | रु. १९००/- |
| ३. | ठराविक वेतन | रु. १५००/- | रु. २४००/- |
| ४. | ठराविक वेतन | रु. ७५४/- | रु. १४००/- |
| ५. | ठराविक वेतन | रु. ७००/- | रु. १४००/- |

मा. स्थायी समितीसमोर प्रशासनातर्फे मांडलेल्या प्रस्तावामध्ये खालील प्रमाणे दैनिक व ठराविक वेतनाचे दर प्रस्तावित करण्यात आले होते.

| अ. क्र. | तपशील | प्रचलीत दर | स्थायी समितीने मंजुर केलेले दर |
|---|---|---|---|
| १. | दैनिक वेतन कर्मचारी | रु. ७५/- | रु. ९४/- |
| २. | ठराविक वेतन | रु. १०००/- | रु. १७००/- |
| ३. | ठराविक वेतन | रु. १५००/- | रु. २२००/- |
| ४. | ठराविक वेतन | रु. ७५४/- | रु. १२००/- |
| ५. | ठराविक वेतन | रु. ७००/- | रु. १२००/- |

प्रशासनातर्फे प्रस्तावित वाढीव (wages) वर एकुण खर्च रु. ४,२३,९६४/- वाढणार होता. तथापि स्थायी समितीने पारीत केलेल्या ठरावानुसार रु. ६,९०,७४४/- खर्च होणार आहे. प्रत्यक्षात खर्चात रु. २,६६,७८४/- ने वाढ होणार आहे. तसेच वार्षीक खर्चात रक्कम रु. ३२,०१,४०८/- ने लक्षणीय वाढ होईल. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता अस्थापनेवर जास्त खर्च होणे म्हणजे विकास कामावर कमी निधी उपलब्ध होणे आहे करीता प्रशासनातर्फे स्थायी समितीसमोर मांडलेल्या दैनिक वेतन व ठराविक वेतनाच्या दरानुसारच प्रस्ताव मंजुर होण्याकरीता मा. स्थायी समिती समोर पुनःश्च विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : कर्मचाऱ्यांना वेतनात वाढ करण्याबाबत मागील १५-०९-२००१ च्या सभेत हा प्रस्ताव होता. जे दर वाढविले ते प्रशासनाने मान्य केले नाही. पुन्हा प्रस्ताव फेर मान्यतेसाठी ठेवलेला आहे.

**श्री. जगदीश सिध्द :** आता मान्यता दिल्यानंतर अंमलबजावणी होईल का? एकदा प्रस्ताव मान्य झाल्यानंतर पुन्हा आणण्याची आवश्यकता काय? प्रस्ताव वाचुन दाखवावा.

**मुख्यलेखाधिकारी :** मागील बैठकीत प्रशासनामार्फत जे दैनिक वेतन व ठराविक वेतन देण्याबाबत प्रस्तावित केले. त्यानुसार मान्यता न मिळाल्याने व जास्तीचा दैनिक वेतन व ठराविक वेतनात वाढ केल्याने आर्थिक बाबींचा प्रश्न निमा्रण झाला व पुन्हा प्रशासनामार्फत फेर प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला आहे.

**श्री. भरत लकडे :** दैनिक वेतन रु. १००/- करावा. ठराविक वेतनात १००/- ने वाढ करावी.

**मा. सभापती** : गेल्या बैठकीत दै. वेतन ११४/- करण्यात आलेला होता. ठराविक वेतनात २००/- वाढ केलेली होती. त्यानुसार अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. आता सभागृहाने दै. वेतन ११४/- ऐवजी, १००/- ठराविक वेतनात १००/- वाढ केल्यास प्रशासन मान्य करेल का? खुलासा द्यावा तरच हा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**श्री. मधुकर सावंत :** दै. वेतन १००/- करीता, ठराविक वेतनात सुध्दा १०४/- वाढ करुन मान्यता द्यावी.

**श्री. जगदीश सिध्द :** आपण ठराव मंजुर करायचा व पुन्हा दुरुस्तीसाठी आणणे बरोबर नाही. आता दुरुस्ती केल्यास पुन्हा प्रशासन मान्य करणार नाही. शासनाकडे पाठवतील. त्यास वेळ लागेल. आता दराबाबत दुरुस्ती केल्यास त्याची अंमलबजावणी झालीच पाहिजे. असा खुलासा प्रशासनाने करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** आताच मा. सभापती यांनी प्रस्तावित केल्यानुसार दरवाढ केल्यास १ फेब्रुवारी २००२ पासुन अंमलबजावणी करण्यात येईल.

**मा. सभापती** : दैनिक वेतन रु. ९०/- ऐवजी १००/- करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच ठराविक वेतन रु. १०००/- ऐवजी, १८००/- करण्यात येते. रु. १५००/- ऐवजी २३००/- रुपये करण्यात येते. ७५० व ७०० ऐवजी १४००/- रुपये फेब्रुवारी २००२ पासुन ठराविक वेतनात वाढ करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, तसेच सभागृहात झालेल्या चर्चेअंती झालेल्या निर्णयानुसार वर्ग-३ संवर्गातील ठरविक वेतन, दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना खालील प्रमाणे दैनिक वेतन व ठराविक वेतनाचे दर फेब्रुवारी २००२ पासुन लागु करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुर देण्यात येते.

| अ. क्र. | तपशील | प्रचलीत दर | प्रस्तावित दर | स्थायी समितीने मंजुर केलेले दर |
|---|---|---|---|---|
| १. | दैनिक वेतन कर्मचारी | रु. ७५/- | रु. ९०/- | रु. १००/- |
| २. | ठराविक वेतन | रु. १०००/- | रु. १७००/- | रु. १८००/- |
| ३. | ठराविक वेतन | रु. १५००/- | रु. २२००/- | रु. २३००/- |
| ४. | ठराविक वेतन | रु. ७५०- | रु. १२००/- | रु. १४००/- |
| ५. | ठराविक वेतन | रु. ७००/- | रु. १२००/- | रु. १४००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याचबरोबर " जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.